# संस्कृत नाट्यवाङ्मयाचा इतिहास



सुरेश वि. महाजन

# संस्कृत नाट्यवाङ्मयाचा इतिहास

श्री. सुरेश वि. महाजन

सावली प्रकाशन
पुणे

■ प्रकाशक
सावली प्रकाशन
'सावली' रक्षालेखा सोसायटी,
विक्रमनगर, धनकवडी, पुणे - ४११ ०४३.

■ प्रकाशन क्र. २७

■ संस्कृत नाट्यवाङ्मयाचा इतिहास

■ © सुरेश वि. महाजन

■ **प्रथमावृत्ती** - गुढीपाडवा १९ एप्रिल २००७

■ **मुखपृष्ठ** - जगदीश खैरे ☎ ९८२२५९८७८७

■ **अक्षरजुळणी** - प्रांजल एंटरप्रायझेस्, पुणे - ४३.
☎ २४३६२४६८

■ **मुद्रक** - जय गणेश ऑफसेट,
पुणे.

■ **मूल्य** - रुपये ४९५/- फक्त

# अर्पणपत्रिका

*संस्कृत नाट्यवाङ्मयाचे गाढे अभ्यासक*
*व ख्यातनाम रसिक पंडित*
*डॉ. गो. के. भट (इ.स. १९१४ ते १९८९)*
*यांच्या पवित्र स्मृतीस*
*हा ग्रंथ अर्पण करीत आहे.*

# अनुक्रमणिका


१) प्रस्तावना — सात

२) संस्कृत नाटकांचे स्वरूप — १

३) अश्वघोष — ३८
   १) शारिपुत्र प्रकरण
   २) निनावी रूपक

४) भास — ४०
   १) दूतवाक्य
   २) कर्णभार
   ३) दूत-घटोत्कच
   ४) ऊरुभंग
   ५) मध्यमव्यायोग
   ६) पंचरात्र
   ७) अभिषेक
   ८) बालचरित
   ९) अविमारक
   १०) प्रतिमा
   ११) प्रतिज्ञा-यौगंधरायण
   १२) स्वप्नवासवदत्त
   १३) चारुदत्त
   - यज्ञफल (बनावट - उत्तरकालीन नाटक)

५) कालिदास — १६२
   १) मालविकाग्निमित्र
   २) विक्रमोर्वशीय
   ३) अभिज्ञान शाकुंतल

६) विशाखदत्त २१९
१) मुद्राराक्षस
२) देवी-चंद्रगुप्त (अपूर्ण)

७) श्रीहर्ष २४५
१) प्रियदर्शिका
२) रत्नावली
३) नागानंद

८) शूद्रक २७९
१) मृच्छकटिक
२) पद्म प्राभृतक (भाण)

९) भवभूती ३०५
१) महावीर चरित
२) मालती-माधव
३) उत्तर रामचरित

१०) धीरनाग ३६१
१) कुंदमाला

११) भट्टनारायण ३६६
१) वेणीसंहार

१२) आठव्या-नवव्या शतकातील नाटककार ३८४
१) यशोवर्मा - रामाभ्युदय
२) मायुराज - उदात्तराघव
३) शक्तिभद्र - आश्चर्य चूडामणी

१३) मुरारी ३९२
१) अनर्घराघव

१४) राजशेखर ४०६

१) बालरामायण

२) बालभारत अथवा प्रचंड पांडव (अपूर्ण)

३) कर्पूरमंजरी

४) विद्धशालभंजिका

१५) उत्तरकालीन नाटककार ४४२

१) दामोदर मिश्र - हनुमन्नाटक

२) क्षेमीश्वर-चंडकौशिक

३) बिल्हण - कर्णसुंदरी

४) कृष्णमिश्र - प्रबोध चंद्रोदय

५) जयदेव - प्रसन्न राघव

६) वामन बाण - पार्वती परिणय

१६) अन्य नाटकांचा आढावा ४५७

१७) आधुनिक काळातील संस्कृत नाटके ४६४

१८) संस्कृत नाटकांचा ऱ्हास ४६७

१९) उपसंहार ४७०

२०) परिशिष्ट ४७५

१) संस्कृत नाटकांवरील संस्कृत टीकाकार

२) संदर्भ ग्रंथांची सूची

# प्रस्तावना

'संस्कृत नाट्यवाङ्मयाचा इतिहास' हा ग्रंथ रसिक वाचकांपुढे सादर करताना मला एक प्रकारचे समाधान वाटत आहे. कारण मराठीमध्ये संस्कृत नाटकांचा विवेचक असा इतिहास लिहिण्यात आलेला नाही. संस्कृत नाटकांवर पांडित्यपूर्ण लेखन भरपूर झालेले आहे. उदा. डॉ. के. ना. वाटव्यांचे 'संस्कृत नाट्यसौंदर्य,' म. म. मिराशी यांची 'कालिदास' व 'भवभूति' ही दोन उत्कृष्ट पुस्तके, डॉ. गो. के. भटांची 'विदूषक, पाच संस्कृत नाटके', 'संस्कृत नाट्यसृष्टी' व 'संस्कृत नाटके व नाटककार' ही रसाळ पुस्तके. डॉ. र. पं. कंगले यांचे 'कालिदासाची नाटके' हे माहितीपूर्ण पुस्तक इ. संस्कृत नाटकांच्या मराठीमध्ये चिकित्सक आवृत्त्याही निघालेल्या आहेत. पण या नाटकांचा क्रमवार सलग इतिहास मात्र आत्ताच वाचकांपुढे येत आहे.

प्रस्तुत पुस्तकात अश्वघोष-भास यांच्यापासून इ. स. च्या दहाव्या शतकात होऊन गेलेल्या राजशेखरापर्यंतच्या सर्व नाटककारांच्या कलाकृतींचा सविस्तर परिचय करून दिला आहे. यात प्रत्येक नाटककाराविषयी उपलब्ध असलेली माहिती, त्याचा काळ, नाटकाचा अंकवार सारांश, मूलाधार, स्वभावचित्रण व नाटकाचे समालोचन असा क्रम ठेवलेला आहे. समालोचनात माझ्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा केलेली आहे. शिवाय इतर अभ्यासकांच्या ग्रंथात जे चांगले व स्वीकार्य वाटले त्याचा निर्देश केलेला आहे. जरूर पडली तेथे अत्यंत महत्त्वाची अवतरणे दिली आहेत.

संस्कृत विषयाचे शिक्षक, प्राध्यापक व तरुण विद्यार्थी, तसेच मराठीमधील जाणकार व रसिक वाचक नजरेसमोर ठेवून ग्रंथाची रचना करण्यात आलेली आहे. महाविद्यालयात संस्कृत विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या एम.ए. पर्यंतच्या अभ्यासक्रमात लावण्यात

आलेली नाटके प्राय: याच कालखंडातील आहेत. त्यांचा परीक्षेच्या दृष्टीने आस्थेवाईकपणे अभ्यास करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यास या पुस्तकाचा विशेष उपयोग होण्यासारखा आहे.

यातील नाटककारांच्या काळाची चर्चा विशेष उद्देशाने केलेली असून त्याबाबत निश्चित निर्णय घेतलेले आहेत. त्यास अनुसरून सर्व नाटककारांचा क्रम लावलेला आहे व त्या क्रमानेच ते विचारात घेतलेले आहेत. भास व कालिदास यांच्या कालाबद्दल तीव्र मतभेद असल्याने मी घेतलेले निर्णय हे सर्वांना पसंत पडणार नाहीत, याची कल्पना आहे.

हा मुख्यत्वे करून नाट्यवाङ्मयाचा इतिहास आहे. संस्कृत रंगभूमीचा इतिहास नाही. या नाटकांचे प्रयोग कशा प्रकारे सादर केले जात होते अथवा भासासारख्या नाटककाराने या बाबतीत कोणते प्रयोग केले, या प्रश्नांची या पुस्तकात चर्चा केलेली नाही. तरीदेखील संस्कृत नाटकाचे स्वरूप ध्यानात येण्यासाठी रंगभूमीविषयी आवश्यक ती माहिती दिली आहे.

संस्कृत नाटकाकडे अथवा एकूण संस्कृत वाङ्मयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन परस्पर भिन्न आहे. काहींना संस्कृत वाङ्मय श्रेष्ठ वाटते ते केवळ प्राचीन आहे म्हणून. म्हणजे 'जुने ते सोने' या दृष्टीनेच ते याकडे पाहतात. त्यांची दृष्टी चिकित्सक नसून भाबडी असते. याउलट पाश्चात्त्य साहित्याचा अभ्यास केलेल्या आधुनिक सुशिक्षितांना संस्कृत वाङ्मय जुनाट व कालबाह्य वाटते. त्याचा अभ्यास न करताच ते त्यास टाकावू समजतात. या परस्परविरुद्ध दृष्टिकोनांमुळे प्रामाणिक अभ्यासकाची कोंडी होते.

अशा स्थितीत कोणताही पूर्वग्रह मनात न बाळगता तटस्थपणे संस्कृत नाटकांचे अवलोकन करून त्याचे स्वरूप सादर करण्याचा मार्ग मी निवडला. या दृष्टीने मी ही नाटके व्यवस्थित अभ्यासली, समजावून घेतली. त्यातून मिळणाऱ्या आनंदाचा मनमुराद आस्वाद घेतला. त्यांचे यथार्थ मूल्यमापन करण्यासाठी त्याचा सविस्तर

इतिहास लिहिण्याचा निश्चय केला. या मूल्यमापनासाठी मी संस्कृत काव्यशास्त्रातील अलंकार, रस, ध्वनी, औचित्य या कसोट्यांबरोबरच कथावस्तू, संवाद, स्वभावचित्रण, उत्कटता, तारतम्य, औचित्य या आधुनिक कसोट्यांचाही वापर केला आहे. संस्कृत नाटकांचे मर्म समजण्यासाठी संस्कृत टीकाकारांचीही मदत घेतलेली आहे. या दृष्टीने संस्कृत टीका अत्यंत महत्त्वाच्या आहेत. संस्कृत टीकाकार व त्यांच्या टीका यांचा थोडक्यात परिचय परिशिष्टात करून दिलेला आहे.

डॉ. प्र. ग. लाळे सरांनी या ग्रंथावर मर्मग्राही अभिप्राय दिलेला आहे. सरांचे माझ्या लिखाणाकडे सतत लक्ष असते व त्यांचे प्रोत्साहनही प्रेरणा देणारे असते. त्यांच्या बहुमोल अभिप्रायाबाबत त्याचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही. हे ठाऊक असूनही कृतज्ञ बुद्धीने आभार व्यक्त करीत आहे.

हा ग्रंथ ज्यांना अर्पण केला आहे, त्या डॉ. गो. के. भटांविषयी दोन शब्द लिहिणे उचित होईल. महाविद्यालयात असताना मी त्यांनी लिहिलेली 'वेणीसंहार' या नाटकाची प्रस्तावना वाचली. त्यांच्या लेखनाची जबरदस्त मोहिनी माझ्या मनावर पडली. तेव्हापासून गेली चाळीस वर्षे त्यांची पुस्तके वाचणे, हा माझा आवडता छंद बनला आहे. त्यांच्या ग्रंथांनी मला संस्कृत नाटकांची गोडी लावली. लेखन करण्याची उमेद व प्रेरणा दिली. त्यातूनच आज हा ग्रंथ तयार झाला आहे. त्यांच्या या ऋणात राहण्यातच मला आनंद आहे.

सावली प्रकाशनने या ग्रंथाची उत्कृष्ट छपाई वेळेत करून दिल्याबद्दल मी श्री. रामचंद्रपंत जोरवर व त्यांचे सहकारी यांचा अत्यंत आभारी आहे.

सरतेशेवटी जगन्नियंत्यास वंदन करून ही प्रस्तावना संपवितो.

**लेखक**

# पुरस्कार

कोठल्याही साहित्याचे चिरंतनत्व दिक् आणि काल यांच्या प्रमाणांवर अवलंबून असते. त्याची व्यापकता, मग ती भौगोलिक असो, वैचारिक असो किंवा कालिक असो, साहित्य सार्वकालिक व सार्वजनीन असते आणि दिशा किंवा अवधी यांची बंधने साहित्यावर येत नाहीत. प्रकृती (निसर्ग) आणि मनुष्य प्रकृती या दोन फटांमधून साहित्यसरिता प्रवाहित होत असते. त्यामुळे मनुष्य-स्वभावाचे तसेच प्रदेशाचे विविध दर्शन साहित्यातून होत असते. त्यामुळे लोकांचा साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोण अधिकाधिक आत्मीयतेकडे झुकतो. अनेक तऱ्हेच्या व असंख्य विकार-विचारांच्या लोकांना त्या साहित्यासंबंधी आकर्षण निर्माण होते. या दृष्टीने पाहतां संस्कृत भाषा ही दिक् आणि काल यांना ओलांडून स्वरसवाहिनी बनली आहे. संस्कृत नभात काव्य, नाटकादी अनेक तारे अखण्ड प्रकाशमान झाले आहेत. नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाऽप्येकं समाराधनम्' ही उक्ती संस्कृत नाटकांना यथार्थतेने लागू पडते.

अशा विशाल व्यापाच्या आणि विविध पात्रांनी नटलेले संस्कृत आहे. त्याचा सामग्र्याने अभ्यास श्री. महाजन यांनी प्रस्तुत ग्रंथात केला आहे. नाटके प्राचीन काळापासून आजपर्यंत लिहिली जात आहेत; भारताच्या सर्व प्रांतांत पूर्वी प्रयोग होत असत. सध्या जरी ती नाटके केवळ ग्रंथबद्ध वाटली, तरी त्यांचे मानवी मूल्य कमी झाले नाही. श्री. महाजन यांनी संस्कृत नाटकांचा साकल्याने अभ्यास करून, एका कुशल संशोधकाच्या सूक्ष्म दृष्टीने विपुल अशा नाट्यवाङ्मयाचा अभ्यास करून मराठीतील अशा तऱ्हेच्या ग्रंथांची असलेली उणीव भरून काढली आहे. नाटकांपेक्षा व्यापक असलेला दशरूपक शब्द शास्त्रांत प्रसिद्ध आहे. दहा नाट्यप्रकारांचे वर्णन करून कोणकोणती रूपके त्या त्या प्रकारांत बसतात, हे त्यांनी दाखवून दिले आहे. दशरूपकांत नाट्य, प्रकरण, नाटिका हेच प्रकार नाटककारांनी अधिकाधिक हाताळले आहेत. त्यांचे मुद्देसूद विवरण श्री. महाजन यांनी केले आहे.

मुख्यत: नाटकांच्या कथानकांची गुंफण कशी झाली आणि त्यांत मूळ आकरग्रंथाच्या कथेत काय काय फरक केला गेला आहे, याचे थोडक्यात दिग्दर्शन लेखकाने केले आहे. मूळ कथानकात काय फरक केले गेले आहेत आणि त्यांचे प्रयोजन काय आहे हे पाहणे हे संस्कृत नाट्यसाहित्याच्या अध्ययनाचा एक महत्त्वाचा अंश आहे. ते परिवर्तन करीत असतांना नाटककाराने पात्रपरिपोष कसा केला आहे आणि त्यांत कोणती स्वभाववैचित्र्ये प्रकट झाली आहेत हे पाहणे फार आवश्यक असते, तर नाटकांतील अङ्गरस आणि अङ्गिरस यांचा समन्वय कसा केला आहे. यात नाटकाचे भावनिक अंग अंतर्भूत झाले असते. तसेच ते संभाळीत असताना कोणती शैलीगत वैशिष्ट्ये नाटककाराने प्रदर्शित केली आहेत, हे पाहणेही रसग्राहकाचे एक महत्त्वाचे काम असते. अशा पद्धतीने अध्ययन करतांना श्री. महाजन यांनी व्यासंगी वृत्तीने केले आहे. लेखकांनी कथानक निवेदित करतानादेखील केवळ इतिवृत्ताची पद्धती अवलंबिली नाहीं. कथानक मोठ्या रसिकतेने, तसेच मनोरंजक पद्धतीने सांगितले आहे. शक्यतो सर्व पूर्ववर्ती ग्रंथांचा विमर्शात्मक उल्लेख केला आहे. शाकुंतल नाटकाच्या विवेचनांत पद्मपुराण, कंदहारिजातक, महाभारत इत्यादी आकरग्रंथांचे विवेचन केले आहे. त्याच विवेचनांत रवीन्द्रनाथ आणि डॉ. मिराशी यांच्या विधानांनाही यथायोग्य स्थान दिले आहे. कवींचा कालनिर्णय ठरवतांना त्यांनी अनेक पूर्वसूरींचा युक्तिवाद विचारात घेतला आहे. या विवेचनांत वामन भट्ट यांच्यासारख्या काही अल्पज्ञात नाटककारांचा परामर्श घेऊन लेखकाने संपूर्ण ग्रंथास संग्राहकता आणली आहे.

एकंदरीत मराठीमध्यें संस्कृत नाटकसाहित्यावरचा हा एक नवीनच ग्रंथ आहे. संस्कृतज्ञांनाच नव्हे, तर सर्वसाधारण मराठी वाचकांनादेखील हा ग्रंथ वाचून मूळ नाटके वाचावीत, अशी ओढ लागेल. शुद्ध प्रवाही भाषेत एका विशाल विषयाला संकलित केले आहे. मराठीत संकल्पेकरून असा ग्रंथ प्रथमच लिहिला गेला आहे. यांत अतिशयोक्ती आहे असे वाटत नाही. संस्कृत नाटकांवर इतके आलोचनात्मक विमर्शात्मक विवेचन मी तरी प्रथमच पाहिले आहे.

जुन्या विषयरत्नांना आलोचनेच्या नव्या कोंदणात बसविले. त्यामुळे हा ग्रंथ देदीप्यमान आणि सर्वजनावर्जक होईल यांत शंका नाही. संस्कृत साहित्याच्या इतर प्रकारांवरही असे सुबोध विवेचनात्मक ग्रंथ श्री. महाजन यांनी लिहावेत अशी त्यांना माझी विनंती आहे. त्यांच्या अगोदरच्या दोन उद्‌बोधक ग्रंथांत या ग्रंथाची भर पडल्यामुळे श्री. महाजन यांच्या व्यक्तिमत्त्वाला त्रिपथगाची स्थिती प्राप्त झाली आहे.

**डॉ. प्र. ग. लाळे**
(भांडारकर प्राच्य विद्या संशोधन केंद्र, पुणे)

# संस्कृत नाटकांचे स्वरूप

"देवानामिदमामनन्ति मुनयः कान्तं क्रतुं चाक्षुषं
रुद्रेणेदमुमाकृतव्यतिकरे स्वाङ्गं विभक्तं द्विधा ।
त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ॥"

(मालविका. १.४)

साहित्यशास्त्रावरील पहिला उपलब्ध ग्रंथ म्हणजे भरतमुनींचे 'नाट्यशास्त्र' हा होय. याची रचना इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात पूर्ण झाली. या ग्रंथात नाट्याची उत्पत्ती कशी झाली याविषयी पुढील आख्यायिका सांगितलेली आहे.

त्रेतायुग सुरू झाले. रजोगुणाचा निदर्शक असलेला कामादी विकारांचा पगडा लोकांच्या मनावर बसू लागला. ते पशूप्रमाणे आहार, निद्रादी ग्राम्यधर्मातच रममाण होऊ लागले. त्यामुळे त्यांना सुखदु:खाचा अनुभव येऊ लागला. तेव्हा इंद्राला आपला नेता बनवून सर्व देव ब्रह्मदेवाकडे गेले. त्यांनी ब्रह्मदेवाला विनंती केली, "भगवन, सध्याच्या या स्थितीत डोळ्यांनी जे पाहता येईल व कानांनी ज्याचा आस्वाद घेता येईल असे करमणुकीचे साधन आम्हाला द्या."

चारही वेद हे केवळ ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांपुरते मर्यादित असल्याने, शूद्रांनाही भाग घेण्याचा अधिकार असणारा, सर्व वर्ण समावेशक असा पाचवा वेद निर्माण करावा अशी त्यांनी ब्रह्मदेवास विनंती केली. त्यानुसार ब्रह्मदेवाने वेदांचे स्मरण करून व त्यातील काही भागांचे ग्रहण करून 'नाट्य' या पाचव्या वेदाची निर्मिती केली. त्यासाठी त्याने ऋग्वेदातून पाठ्य, यजुर्वेदापासून अभिनय, सामवेदातून गीत व संगीत व अथर्ववेदातून रस यांचे ग्रहण केले. अशा प्रकारे सर्वज्ञ अशा ब्रह्मदेवाने नाट्यवेदाची निर्मिती केली.

'चार वेदांपासून नाट्याची निर्मिती करण्यात आली' या विधानाचा अर्थ स्पष्ट होणे जरूर आहे. ऋग्वेदातून पाठ्य घेतले याचा अर्थ कथावस्तू व संवाद यांचे ग्रहण या वेदातून करण्यात आले. ऋग्वेदातील सूक्तात जशा प्रार्थना आहेत तसेच कथा, आख्याने व संवादही आहेत. उदा. - यम-यमी संवाद, पुरुरवा-उर्वशी संवाद, अगस्त्य-लोपामुद्रा संवाद, सरमा-पणी संवाद, इंद्र-शची-वृषाकपि संवाद, अशी अनेक लक्षणीय संवादस्थळे आहेत. सूक्तातील हे संवाद अत्यंत काव्यपूर्ण आहेत.

यजुर्वेदातून अभिनय घेतला. त्याचा अर्थ स्पष्ट आहे. या वेदात यज्ञयागाची चर्चा आहे. यज्ञ बिनचूक कसा पार पाडावा, याविषयी त्यात महत्त्वाच्या सूचना आहेत. या सूचना क्रियारूप आहेत. अनेक विधींविषयी दिलेल्या या सूचना अभिनयाशी जुळणाऱ्या आहेत. सारांश, अभिनय म्हणजे क्रियांचे अनुकरण, एवढा अर्थ ध्यानात आला तरी पुरे. या दृष्टीने यजुर्वेदापासून अभिनयाचे ग्रहण केले, असे म्हणता येईल. सामवेदात ऋचांचे गायन कसे करावयाचे हे सांगितलेले आहे. स्वरांचे चढ-उतार, त्यास देण्यात येणारी तालाची जोड यामुळे ऋचांचे गायन प्रभावी होत असले पाहिजे. तेव्हा सामवेदापासून गीत व संगीत घेतले याचा अर्थ स्पष्ट आहे.

परंतु 'अथर्ववेदातून रसाचे ग्रहण केले' या वाक्याचे आकलन होणे थोडे कठीण आहे. एक तर हा वेद मूळचा आर्यांचा नव्हे. चौथा वेद म्हणून यास उशीरा मान्यता मिळालेली आहे. यात देवतांच्या प्रार्थनांपेक्षा लौकिक गोष्टींवर अधिक भर आहे. जादू-टोणा, मंत्र-तंत्र, जारण-मारण, वशीकरण, औषधीविद्या, भौतिक विज्ञान अशा अनेक गोष्टी आहेत. सारांश, यात लोकजीवनाचे रंग उतरलेले आहेत. मानवी भावनांना स्थान मिळालेले आहे. तेव्हा या भावनांनाच रस मानले तर या वेदातून रसाचे ग्रहण कसे केले हे स्पष्ट होईल. पण हे स्पष्टीकरण दूरान्वयाचे आहे, हे मान्य केले पाहिजे.

ब्रह्मदेवाने हा नाट्यवेद इंद्राला द्यावयाचे ठरविले. परंतु या वेदाचे ग्रहण करणे किंवा तो प्रयोगरूपाने सादर करणे ही गोष्ट देवांना जमणारी नसल्याने इंद्राने त्याचा स्वीकार केला नाही. मग ब्रह्मदेवाने हा वेद भरतमुनींच्या स्वाधीन केला. भरतांनी आपल्या शंभर पुत्रांची मदत घेऊन तो प्रयोगान्वित करण्याचे ठरविले. यासाठी महादेवाकडून तांडवनृत्य, पार्वतीकडून लास्य व विष्णूकडून भारती, सात्वती, आरभटी व कैशिकी या चार वृत्ती प्राप्त केल्या. या संदर्भात भरतमुनींनी मनोरंजक कथा सांगितली आहे :

प्राचीन काळी भगवान विष्णू शय्येवर निजलेले असताना मधू आणि कैटभ हे दोन दैत्य त्या ठिकाणी आले. त्यांनी विष्णूंना युद्धाचे आव्हान दिले. भगवान युद्धास उभे राहिले. त्यांनी पावले टाकण्यास प्रारंभ करताच आरभटी नामक वृत्ती जन्माला आली. शार्ङ्ग धनुष्याचा टणत्कार करताच सात्वती वृत्ती उत्पन्न झाली. त्यांच्या भाषणातून भारती वृत्तीचा उदय झाला. ते जेव्हा आपले मोकळे सुटलेले केस बांधू लागले तेव्हा कैशिकी वृत्ती निर्माण झाली, इत्यादी.

या आख्यायिकेचा निष्कर्ष इतकाच की शृंगारात कैशिकी, वीरवृत्तीत सात्वती, रौद्रामध्ये आरभटी व अन्य ठिकाणी सामान्यपणे भारती या वृत्ती आढळतात. मात्र कैशिकीमध्ये केवळ शृंगारच असतो असे समजण्याचे कारण नाही. अभिनव गुप्ताने 'सौंदर्योपयोगी व्यापार: कैशिकी वृत्ति:।' असे तिचे व्यापक लक्षण दिले आहे. सारांश, वाणी, देह व मन यांचा रसानुकूल व्यापार दर्शविण्याच्या वृत्तीचा भरतांनी स्वीकार केला. असो.

यानंतर भरतमुनींनी इंद्रध्वज नामक महोत्सवप्रसंगी गंधर्व आणि अप्सरा यांची मदत घेऊन नाट्यप्रयोग सादर केला. सदर नाटकात देवांनी असुरांचा पराजय केला, असे दाखवलेले होते. नाट्यप्रयोग पाहून ब्रह्मादी देव संतुष्ट झाले. त्यांनी भरतमुनींवर अनेक देणग्यांचा वर्षाव केला. पण दैत्यांना राग आला. ते तेथून बाहेर पडले. त्यांनी नाट्यप्रयोगात अडथळे आणून ते बंद पाडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा इंद्राने प्रकट होऊन असुरांना पराभूत केले.

भरतमुनींच्या विनंतीनुसार ब्रह्मदेवाने विश्वकर्म्यास नाट्यगृह उभारण्यास सांगितले. नाट्यगृह तयार होताच त्याच्या रक्षणाची जबाबदारी ब्रह्मा, विष्णू व महेश यांनी स्वीकारली. मग ब्रह्मदेवानी असुरांना बोलावून नाट्यप्रयोगात विघ्न का आणले यासंबंधी विचारणा केली. तेव्हा दानवांची बाजू मांडताना विरूपाक्ष हा त्यांचा नेता म्हणाला, "भगवान, आपण देवतांच्या इच्छेनुसार हा नाट्यवेद निर्माण केला आहे. देवांना प्रसन्न करण्यासाठी आमचा अपमान केला आहे. आपण असे करायला नको होते. कारण देव आणि दानव हे दोघेही सृष्टीच्या प्रारंभी आपणापासूनच उत्पन्न झाले आहेत." असुरांच्या या आक्षेपावर ब्रह्मदेवांनी दिलेले उत्तर अत्यंत महत्त्वाचे आहे. ते म्हणाले,

"दैत्यहो, यामध्ये केवळ तुमच्या अगर देवांच्या चरित्राचे कथन नाही. जगात घडणाऱ्या अनेक प्रकारच्या घडामोडींचे व प्रवृत्तींचे हे चित्रण आहे. कोणत्याही पक्षाचा जय अथवा पराजय दाखवणे हा माझा उद्देश नाही. तेव्हा

तुम्ही दु:ख करू नका. सृष्टीत ज्याप्रमाणे चांगले-वाईट, शुभ किंवा अशुभ यांचे मिश्रण आढळते, त्याप्रमाणे येथेही ते आढळते. त्रैलोक्यात आढळणाऱ्या साऱ्या भाव-भावनांचे सर्वसामान्य दर्शन मला घडवायचे आहे. त्यामुळे कधी धर्म तर कधी अधर्म, कधी क्रीडा आढळतील; तसेच कधी हास्य तर कधी युद्ध, कधी अर्थ व कधी शम, कधी काम तर कधी क्षुधाही दिसून येतील.

''धार्मिक लोकांना यात धर्माचे दर्शन होईल तर विलासी लोकांना कामोपभोगाच्या गोष्टी आढळतील. दुष्टांचे निर्दालन व उन्मत्तांचे संयमन केलेले आढळेल. सारांश, ज्यात सर्व लोक-प्रवृत्तीचे प्रतिबिंब पडलेले असेल व सर्व अवस्थांचे सूचन झाले असेल अशा प्रकारचे नाट्य मी सर्व लोकांसाठी निर्माण केले आहे.'' इ.

नाट्याचा उगम कसा झाला यासंबंधीची वर दिलेली आख्यायिका काल्पनिक वाटण्याचा संभव आहे. ती तशी मानली तरी नाटकात सर्वांचा सहभाग आवश्यक असतो, ही गोष्ट मान्य होण्यासारखी आहे. नाट्याचे कथा, संवाद, संगीत, अभिनय व रस हे घटक त्यांनी वेदातून उचलले. नाट्याची निर्मिती करण्यासाठी वेदातून सामग्री गोळा करण्यात आली. याचाच अर्थ वेदकाळात नाटकाचे अस्तित्व नव्हते.

हिंदुस्थानात धर्म हे प्राचीन काळापासून जीवनाचे प्रमुख अंग मानलेले आहे. तेव्हा धर्माचा पगडा नाट्यावर असावा, यात नवल नाही. नाटकाच्या प्रयोगापूर्वी पडद्याच्या आत जो धार्मिक विधी पार पाडला जाई त्यास पूर्वरंग असे नाव आहे. नांदी ही पूर्वरंग समाप्त झाल्याची खूण आहे. नांदीमध्ये इष्ट देवतेस नमस्कार, नाट्यप्रयोग निर्विघ्न पार पडावा यासाठी प्रार्थना, आलेल्या प्रेक्षकांचे अभीष्ट चिंतन इत्यादी गोष्टी साधलेल्या असतात. कित्येकदा नांदी श्लोकातून कथावस्तूची अस्फुट सूचनाही दिलेली असते. आजदेखील नाट्य-प्रयोगास प्रारंभ करण्यापूर्वी रंगदेवतेसमोर कापूर लावणे, पुष्पमाला वाहणे, नारळ वाढवणे यांसारखे धार्मिक विधी करण्यात येतात. यावरून धर्माचा या गोष्टीशी कसा घनिष्ट संबंध आहे हे समजून येईल.

नाटकाचे यज्ञविधीशी विशेष साम्य आहे. कालिदासाने नाट्याला 'चाक्षुष यज्ञ' असेच म्हटले आहे. दोन्हींमध्ये अनेकांचे सहकार्य अपेक्षित असते. नाटकात सूत्रधार, नटवर्ग, गायक, वादक, नेपथ्य रचनाकार, सेवकवर्ग व प्रेक्षक या सर्वांचा सहभाग असतो. कोणाला यातील प्रेक्षकाचा निर्देश चमत्कारिक वाटेल.

परंतु भरताने प्रेक्षक कसा असावा याविषयी मार्मिक सूचना दिल्या आहेत. प्रेक्षकात अरसिकांचा भरणा असेल किंवा पूर्वग्रहदूषित लोक आलेले असतील तर नाटक रंगणे अशक्य आहे. वक्त्याचे भाषण रंगणे हे जसे श्रोत्यावर अवलंबून असते, तद्वतच नाट्यप्रयोग यशस्वी होणे हे प्रेक्षकांवर अवलंबून असते.

नाटकाचा मुख्य उद्देश मनोरंजन आहे, ही गोष्ट यात नजरेआड होऊ दिलेली नाही. थकलेल्या, भागलेल्या सामान्य लोकांच्या करमणुकीसाठी नाटक निर्माण झाले आहे. इतर कोणत्याही साधनापेक्षा नाटकाच्या योगे हे उद्दिष्ट चांगल्या प्रकारे साध्य होते. नाटक हे जसे श्राव्य असते तसेच ते दृश्यही असते. वाङ्मयाचे इतर प्रकार केवळ श्राव्य आहेत. रसिकाला त्यांचा आस्वाद स्वतंत्रपणे घेता येतो. नाटकात वाङ्मयीन गुण तर असतातच. शिवाय ते प्रयोगक्षम असते. ते एकाच वेळी सर्व प्रेक्षकांना आनंदित करते. यात कथा, संवाद, गायन, नृत्य, उत्तम देखावे, नटांचा अभिनय यांनी नटलेली जिवंत कलाकृती साकारली जाते. यासाठीच नाट्य हा काव्याचा सर्वश्रेष्ठ प्रकार मानलेला आहे. नाटक हे केवळ वाङ्मयीनदृष्ट्या उत्तम असून चालत नाही तर ते प्रयोगक्षम असावे लागते व त्यासाठी नाटककारास नाट्यतंत्र अवगत असावे लागते.

भरतमुनींच्या नाट्यविषयक संकल्पनेत लोकानुभव, लोकवृत्त व नाट्याभिनय यांना महत्त्व आहे. नाटकातील वाङ्मयीन गुणापेक्षा त्याच्या रंगभूमीवर होणाऱ्या प्रयोगावरच भरताने भर दिलेला आहे. यात चूक मानण्याचे कारण नाही. कारण नाटक हे करून दाखविण्यासाठी रचलेले असते, नुसते वाचण्यासाठी नव्हे. त्याच्या वाचनानेही आस्वाद मिळतो; पण सामान्य माणूस नाटक पाहायचेच पसंत करतो.

नाटककार नाटकाची संहिता तयार करतो. नाट्यदिग्दर्शक ती प्रयोग रूपाने रंगभूमीवर आणतो. यातील भूमिका नटांमध्ये वाटण्यात येतात. त्यांना त्या नीट पढवण्यात येतात. भूमिका सादर करताना नट यथोचित वेशभूषा करतात. संवाद म्हणतात. हावभाव करतात व त्यायोगे कथा जिवंत उभी करतात. देखावे व संगीत ग़ायोगे प्रयोगास उठाव येतो.

याचा अर्थ भरतांनी नाटकाच्या वाङ्मयीन अंगाकडे दुर्लक्ष केले असा नाही. नाटकातील कथावस्तू प्रभावी असावी लागते. रसपरिपोष योग्य प्रकारे व्हावा लागतो. नाटकातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे संवाद. ते काव्यपूर्ण असावे लागतात. संस्कृत नाटके काव्यवर्णनांनी तुडुंब भरलेली आहेत. सारांश,

वाङ्मयाच्या इतर प्रकारांप्रमाणे नाटकही वाङ्मयाच्या कसोटीस उतरणे आवश्यक आहे. नाटक वाङमयीनदृष्ट्या सकस असल्याशिवाय त्याचा प्रयोग उत्तम होणार नाही याची भरताला जाणीव आहे.

नाट्यशास्त्रात दिलेल्या आख्यायिकेवरून भरतमुनी हे आद्य नाट्यशास्त्रकार असावेत अशी समजूत होते; पण सध्या उपलब्ध असलेले नाट्यशास्त्र बरेच उत्तरकालीन आहे. यात पूर्वी होऊन गेलेल्या ग्रंथकारांचा उल्लेख आहे. विश्वकर्म्याचे वास्तुशास्त्र, तंडूचे नृत्तशास्त्र, तसेच नाट्यशास्त्रावर लेखन करणाऱ्या कोहल, वत्स, शांडिल्य, धूर्तिल, स्वाति, नारद व पुष्कर यांचा भरतांनी उल्लेख केला आहे. पण पूर्वीचे ग्रंथ उपलब्ध नसल्याने पुढील लेखकांनी भरतमुनींचा ग्रंथ प्रमाण मानून त्यावरच टीका-टिप्पणी लिहिल्या आहेत.

नाट्यशास्त्रावर कोहल, मातृगुप्त, उद्भट, लोल्लट, श्रीशंकुक, भट्टनायक, भट्टतौत, राहुल, अभिनवगुप्त, कीर्तिधर इत्यादि पंडितांच्या टीका आहेत. यांपैकी कोहल हा भरतमुनींचा शिष्य असावा. अभिनवगुप्ताने आपल्या टीकेत याच्या मताचा उल्लेख केला आहे. मातृगुप्ताचा उल्लेख राघवभट्टांच्या शाकुंतलावरील संस्कृत टीकेत आढळतो. भरतमुनींच्या रससूत्रावरील टीकेत अभिनवगुप्ताने भट्टलोल्लट, श्रीशंकुक, आपले गुरुजी भट्टतौत व भट्टनायक यांच्या टीकांचे सारांश उद्धृत केले आहेत. वरील टीकाकारांच्या 'नाट्यशास्त्रा'वरील टीका अभिनवगुप्ताच्या पांडित्यपूर्ण टीकेमुळे विस्मृतप्राय झाल्या.

अभिनवगुप्त (इ.स.९६० ते १०२०) हा महान् ग्रंथकार होता. त्याने भरतमुनींच्या नाट्यशास्त्रावर 'नाट्यवेद विवृत्ति' नामक प्रचंड टीका लिहिली आहे. त्याने लिहिलेली टीका स्वतंत्र ग्रंथाहून अधिक मौल्यवान आहे. हा मोठा तत्त्वज्ञ असून काश्मिरातील 'प्रत्यभिज्ञादर्शना'चा मोठा भाष्यकार आहे. याने 'रससिद्धान्ता'ची मांडणी केली आहे. त्याच्या विचारास तत्त्वज्ञानाची बैठक असल्याने त्यास प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

* * *

काव्याचे श्राव्य आणि दृश्य असे दोन प्रकार असून नाटक अथवा रूपक हा दृश्य प्रकार आहे. नाटकात कथा, संवाद, गीत व नृत्य असते. नटाच्या अभिनयास प्राधान्य असते. नट रामाचे सोंग घेतो व त्याचा आभास उत्पन्न करतो. प्रेक्षकही तो नट आहे असे माहीत असूनही त्याला रामच मानतात. नट रामाचे रूप धारण करीत असल्याने त्यास रूपक असे नाव पडले असावे.

यातील ‘अभिनय’ हा शब्द महत्त्वाचा आहे. अभि+नी (१ प.प.) म्हणजे नेणे, पोहचविणे. नट हा प्रेक्षकांपर्यंत नाट्यार्थ पोहचवितो. अभिनयावाचून नाट्यार्थाचा आविष्कार अशक्य आहे. अभिनयाच्या जोडीस नाट्यगृह, रंगभूमी, नेपथ्य, संगीत असल्याने त्याचा आविष्कार प्रभावीपणे होतो.

अभिनय हा आंगिक, वाचिक, आहार्य व सात्त्विक असा चार प्रकारचा असतो. संवाद म्हणत असताना नट जे हातवारे करतो, चेहऱ्यावर विविध भाव दर्शवतो, त्यास आंगिक अभिनय म्हणतात. नाटकातील संवाद प्रेक्षकांना ऐकू जातील-समजतील असे मोठ्याने, स्पष्ट व भावनांचा चढ-उतार दर्शवीत म्हणणे हा वाचिक अभिनय होय. नटाची वेषभूषा, रंगभूमीवरील सजावट, देखावे हा आहार्य अभिनय असून स्तंभ, स्वेद, रोमांच इत्यादी आठ सात्त्विक भावांद्वारे अनुभव प्रकट करणे हा सात्त्विक अभिनय होय.

नाट्य हा शब्द नट् (१ प.प.) म्हणजे नाचणे यावरून बनला आहे. नाचणे, अभिनयपूर्वक नाचणे, रूप बदलणे, विकार प्रकट करणे, अवस्थांचे अनुकरण करणे इत्यादी प्रकारे विकास पावलेला आहे. तात्पर्य नाट्य म्हणजे लोकव्यवहाराचे अनुकरण होय. प्रारंभी दिलेल्या ‘मालविकाग्निमित्र’ नाटकातील श्लोकामधील ‘त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितम्’ हे शब्द महत्त्वाचे आहेत. त्यांचा अर्थ नाटकात लोकवृत्तीचे म्हणजे मानवी व्यवहाराचे अनुकरण अथवा प्रतिबिंब आढळते, असा होतो.

‘नाटक हे लोकचरिताचे अनुकरण आहे.’ या विधानाचा अर्थ स्पष्ट होणे जरूर आहे. ‘अनुकृती’ या शब्दाचा अर्थ भरतमुनींनी स्पष्ट केलेला नाही. रससूत्रावरील टीकेत श्रीशंकुकाने याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्याच्या मते अनुकृती म्हणजे भावनांचे अनुकरण. नट हा मूळ पात्राचे अनुकरण करीत असतो; पण भट्टतौतांनी या मताचे खंडन केले आहे. नटाने जर नाटकातील मूळ पात्रास (राम, दुष्यंत, कर्ण किंवा शिवाजी) कधी पाहिलेलेच नाही तर तो त्याचे अनुकरण कसे करणार? तसेच तो अविमारक, चारुदत्त, माधव किंवा घनश्याम या काल्पनिक पात्रांस कसे पाहणार? तेव्हा अनुकृती म्हणजे अनुकरण हा अर्थ सोडून द्यावा लागतो.

आता नाटकाचे कथानक, पात्रे, संवाद, गाणी, नाच व पात्रांचा अभिनय हे सारे लोकजीवनाशी जुळेल असेच असते. इतकेच नव्हे तर ते दैनंदिन जीवनातूनच उचललेले असते. या दृष्टीने ते अनुकरणच असते; पण विषयाची निवड,

कथानकाची मांडणी, शब्दयोजना, पात्रांचे स्वभावचित्रण यामागे कवीची चोखंदळ दृष्टी असते. वाङ्मयीन कलाकृतीत कलावंताच्या अनुभूतीचे सार उतरलेले असते. कवी मानवी जीवनाची सही सही नक्कल करीत नसून त्या आधारे नवनिर्मिती करीत असतो, अनुभवाला नवा आकार देत असतो, हे ध्यानात घेतले पाहिजे.

* * *

भरतमुनींनी नाट्याच्या उगमाची जी हकीकत दिली आहे तिच्यावरून श्रमलेल्या, थकलेल्या सामान्य माणसांच्या करमणुकीसाठी नाट्य निर्माण झाले हे उघड आहे. नाट्याचे हे प्रयोजन अथवा हेतू त्यांनी नाट्यशास्त्राच्या पहिल्या अध्यायात स्पष्ट सांगितलेला आहे. तो याप्रमाणे 'दु:खी, श्रान्त-दमलेले, शोकग्रस्त व तपस्वी अशा सर्व तऱ्हेच्या लोकांचे मनोरंजन करणे हा नाट्यनिर्मितीमागचा प्रमुख हेतू आहे. नाट्य हे धर्म्य, यशकारक, आयुष्य व बुद्धी वृद्धिंगत करणारे आहे.' यात क्रोधाचाही निर्देश आहे पण तो दुय्यम आहे. सर्व प्रयोजनात आनंद हेच मुख्य प्रयोजन आहे.

आता 'आनंद' हे प्रयोजन मानले तरी त्यात काही अडचणी आहेत. एकाला जी गोष्ट आनंददायक वाटेल ती दुसऱ्याला तशी वाटेलच असे नाही. प्रत्येकाच्या आवडी-निवडी भिन्न असतात. नाटकाच्या दर्शनाने वेगवेगळी अभिरुची असणाऱ्या सर्व प्रकारच्या लोकांना आनंद दिला पाहिजे याची भरतमुनींना जाणीव आहे. नाट्यशास्त्राच्या सत्ताविसाव्या अध्यायात त्यांनी या गोष्टीची दखल घेतलेली आहे. तरुणांना प्रणय आवडतो. विद्वानांना नाटकात 'तत्त्वदर्शन' घडावे असे वाटते. धनार्थी लोकांना संपत्तीच्या गोष्टी रुचतात. विरक्तांना मोक्षविषयक गोष्टी हव्याशा वाटतात. वृद्धांना पुराणकथा व धर्मविचार आवडतो. धाडसी लोकांना वीर व बीभत्स रसांचे आकर्षण असते. त्यांना लढाई, मारामाऱ्या किंवा रक्तपात पाहायला आवडतो. स्त्रिया व लहान मुलांना हास्यरस आवडतो. रंगभूषा, देखावे, सजावट पाहायला आवडते. सारांश नाटक जर लोकप्रिय व्हावयाचे असेल तर त्यात बहुजनांची आवड लक्षात घ्यायला हवी. प्रारंभीच्या अवतरणातील 'नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य' या ओळीचे मर्म आता ध्यानात येईल.

आनंद हेच नाटकाचे मुख्य उद्दिष्ट असल्याने त्यात बाधा किंवा विघ्न येईल अशा गोष्टी नाटकात येता कामा नयेत हे ओघाने आलेच. नाट्यशास्त्राच्या बाविसाव्या अध्यायात त्यांनी रंगभूमीवर कोणत्या गोष्टी दाखवू नयेत हे विस्ताराने

सांगितलेले आहे. रंगभूमीवर पात्राची निद्रा, स्त्रियांचे सौंदर्यप्रसाधन, चुंबनालिंगनादी कामूक प्रेमचाळे, स्नान, भोजन इत्यादी गोष्टी दाखवू नयेत. सारांश प्रेक्षकांना ज्याची लाज वाटेल अशी दृश्ये दाखविण्यास भरतांनी मनाई केली आहे. त्यामुळे रसभंग होण्याची भीती असते. नाटक पाहण्यास कुटुंबातील लहान, थोर, मध्यम, पुरुष तसेच मुले, सुना, बहिणी अशी मंडळी आलेली असतात. त्यांना नाटक पाहताना कोणत्याही प्रकारचा संकोच वाटू नये, यावर भरतमुनींचा कटाक्ष आहे. औचित्याचे हे बंधन नाटककाराने अवश्य पाळले पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

* * *

संस्कृत नाटकाची रचना कशा प्रकारे करण्यात येते हे समजण्यासाठी त्याची १) वस्तू म्हणजे कथानक (Plot) (२) नेता म्हणजे नाटकीय पात्रे व (३) रस ही तीन अंगे विचारात घ्यावी लागतात.

(१) वस्तू : कथानक हे ऐतिहासिक, काल्पनिक अथवा मिश्र असते. प्राचीन नाट्यविचारात कथानकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ॲरिस्टॉटलनेही plot (ग्रीक शब्द Muthos) ला महत्त्व दिलेले आहे. कथावस्तूचा आरंभापासून अखेरपर्यंत जो पद्धतशीर विकास होतो, त्याचा विचार येथे करावयाचा आहे.

कथावस्तूच्या (१) बीज (२) बिंदू (३) पताका (म्ह. उपकथानक) (४) प्रकरी (म्ह. लहान-मोठे प्रसंग) व (५) कार्य, अशा पाच अर्थप्रकृती म्हणजे अंगभूत तत्त्वे आहेत. या अर्थप्रकृतीच्या (१) आरंभ (२) यत्न (३) प्राप्त्याशा - फळ प्राप्त होईल अशी आशा वाटणे (४) नियताप्ती व (५) फलागम या पाच अवस्था आहेत.

(१) आरंभ म्हणजे सुरुवात. यात कथेला अथवा नाटकाच्या अंतिम उद्दिष्टाला प्रारंभ होतो. (२) यत्न म्हणजे इष्टप्राप्तीच्या दिशेने करण्यात येणारा प्रयत्न (३) प्राप्त्याशा म्हणजे आशा व निराशा यांच्यातील संघर्षामुळे होणारी दोलायमान अवस्था (४) नियताप्ती म्हणजे सारे अडथळे दूर होऊन फलप्राप्ती होण्याची चिन्हे दिसू लागणे. आणि (५) फलागम म्हणजे इष्ट गोष्टीची प्रत्यक्ष प्राप्ती होणे.

प्रो. डाऊडन यांनी शेक्सपिअरच्या नाट्यकथेचे विश्लेषण करताना (१) The beginning (प्रारंभ) (२) Rising Action - (कार्याकडे वाटचाल) (३) Climax (शिखरावस्था) (४) Falling Action (उतार) व (५)

Denouement (निष्कर्ष अथवा फलित) असे पाच टप्पे कल्पिलेले आहेत. एरवी पाश्चात्त्य काव्यशास्त्रात आरंभ, मध्य व अंत अशा तीनच अवस्था मानलेल्या आहेत.

पाच अर्थप्रकृती व पाच अवस्था या ज्या ठिकाणी परस्परांस जोडलेल्या असतात त्या ठिकाणास संधी असे नाव आहे. मुख, प्रतिमुख, गर्भ, विमर्श व निर्वहण असे पाच संधी सांगितलेले आहेत. याचे थोडक्यात स्पष्टीकरण याप्रमाणे -

**(१) मुखसंधी :** मुखसंधीत अनेक अर्थ व रसांचे व्यंजक असलेले बीज हे अर्थप्रकृतीच्या आरंभ नामक दशेशी संयोग पावलेले असते. मालती-माधव नाटकात त्या उभयतांचे प्रेम सफल होते हे कार्य मानले तर त्या दोघांच्या वडिलांनी आपल्या विद्यार्थिदशेत असताना आपल्या मुलांमध्ये विवाहसंबंध जुळवण्याची प्रतिज्ञा केली होती. तिचा कामंदकीने केलेला निर्देश हे त्या कार्याचे बीज आहे. पहिल्या दोन अंकांत या संधीचा विस्तार केलेला दिसून येईल.

**(२) प्रतिमुखसंधी :** मुखसंधीमध्ये ज्याचा प्रारंभ झालेला आहे त्याचा अंकूर या संधीमध्ये कळत न कळत विकसित होतो. रत्नावली नाटकाच्या दुसऱ्या अंकात वत्सराज उदयन व सागरिका यांच्या प्रेमाचा अंकुर विकसित झालेला आहे. यात बिंदू आणि प्रयत्न यांचा सहभाग असतो.

**(३) गर्भसंधी :** या संधीत पताका व प्राप्त्याशा यांचा सहभाग असतो. यात कथारूप अंकुराची कधी वाढ होताना दिसते तरी कधी ती थांबली आहे असे वाटते. वर दिलेले रत्नावली नाटकाचे उदाहरणच पुढे चालवायचे म्हटल्यास दुसऱ्या अंकात उदयन व रत्नावली यांचे प्रेम वाढीस लागलेले दिसते; पण त्याच वेळी वासवदत्ता आल्याने त्यास प्रतिबंध होतो. तिसऱ्या अंकात विदुषक येऊन राजाला सागरिकेच्या प्रेमाची वार्ता सांगतो. तेव्हा प्रेमाचा विकास होतो पण वासवदत्तेस ही बातमी समजल्याने पुन्हा त्यास खीळ बसते. अशा प्रकारे यात दोलायमान स्थिती दिसून येते.

**(४) विमर्शसंधी :** या संधीत प्रकरी व नियताप्ती यांचा सहभाग असतो. या संधीविषयी 'साहित्यदर्पणा'त विश्वनाथ सांगतो की, प्रमुख उद्दिष्टाची जरी चांगली प्रगती होत असली तरी शापादी विघ्नामुळे ती एकदम कुंठित होते. 'अभिज्ञानशाकुंतल'च्या चौथ्या अंकात शकुंतला सासरी जावयास निघते तेव्हा आता इष्टफलाची प्राप्ती होणार असे वाटून अनसूया निःश्वास टाकते. दुर्वासाच्या

शापाच्या प्रभावाने व शकुंतलेच्या बोटातील अंगठी हरवल्यामुळे सदर फलप्राप्ती सातव्या अंकापर्यंत लांबते.

**(५) निर्वहणसंधी :** आलेला अडथळा किंवा विघ्न हे पूर्णपणे दूर होऊन नायकास फलप्राप्ती होते. त्यास 'निर्वहण' असे म्हटलेले आहे. नाटकाच्या प्रवासातला हा अंतिम टप्पा होय. प्रत्यक्ष फलप्राप्ती झाल्याने येथे नाटकाची समाप्ती होते. वेणीसंहार नाटकाच्या सहाव्या अंकात चार्वाकाने एकच गोंधळ उडवलेला असता कंचुकी भीमसेन आल्याची वार्ता सांगतो. त्या वेळी द्रौपदीच्या केशसंयमनाचे उद्दिष्ट खऱ्या अर्थाने पूर्ण होते. भीमाने तिचे केस बांधताच नाटक समाप्त होते.

या संधीची जी उपांगे आहेत त्यांना संध्यंगे असे म्हणतात. संधी व संध्यंगे यांच्या अवलोकनामुळे कथानकाचा प्रवास कसा घडतो याची स्पष्ट कल्पना येते. आता नाटकात ही सर्व उपांगे बोट ठेवून दाखवता येतीलच असे नाही. काही वेळा त्यांचा क्रम मागे-पुढे होताना दिसतो, तर काही वेळा एखादे उपांग मिळत नाही. संस्कृत नाटकाच्या टीकाकारांनी ही स्थळे टिपण्याचा चांगला प्रयत्न केलेला आहे. विशेषत: त्रिपुरारी व नान्यदेव (मालतीमाधव), राघवभट्ट (अभिज्ञान शाकुंतल), वीरराघव (उत्तररामचरित), रंगनाथ (विक्रमोर्वशीय) यांच्या टीका या दृष्टीने वाचनीय आहेत.

त्याचप्रमाणे कथाविषय हा सूच्य व दृश्य अशा दोन प्रकारांत विभागलेला असतो. त्यापैकी सूचिताचे प्रकार याप्रमाणे -

**(अ) विष्कंभ :** होऊन गेलेल्या अथवा पुढे होणाऱ्या घटनांची सूचना, तसेच अनावश्यक व प्रत्यक्ष दाखविण्याइतक्या महत्त्वाच्या नसलेल्या प्रसंगाचे कथन अशा गौण प्रवेशात सांगितलेले असते. असा प्रवेश कोणत्याही अंकाच्या सुरवातीस घालण्यात येतो. प्रवेशात संभाषण करणाऱ्या पात्रांचा दर्जा व भाषा यावरून याचे शुद्ध व मिश्र असे दोन प्रकार केलेले आहेत. शुद्ध व मिश्र विष्कंभकात मध्यम व गौण दर्जाची पात्रे असून ती संस्कृत व प्राकृत भाषात बोलतात आणि जर सर्व पात्रे गौण असतील तर ती प्राकृत भाषेत बोलतात. या प्रवेशास प्रवेशक असे स्वतंत्र नाव आहे.

**(ब) चूलिका :** यात पडद्याच्या आत असलेल्या व्यक्तीच्या बोलण्यातून काही गोष्टी सांगण्यात येतात. पडद्यात कधी गोंगाट किंवा कलकलाट होतो. उदा. मुद्राराक्षसाच्या पहिल्या अंकात जीवसिद्धीची करण्यात आलेली हकालपट्टी

किंवा त्यानंतर लगेच शकटदासाचे वधस्तंभाकडे गमन या घटना पडद्याआडूनच सांगितलेल्या आहेत.

**(क) अंकमुख :** एका अंकाच्या शेवटी असलेली पात्रेच जेव्हा पुढील अंकातील प्रसंग चालू करतात तेव्हा त्यास अंकमुख अथवा अंकास्य असे म्हणतात. उदा. मालविकाग्निमित्र नाटकात पहिल्या अंकाच्या अखेरीस गणदास हा राजाला मालविकेचे नृत्य पाहण्याची विनंती करतो आणि दुसऱ्या अंकात नृत्याचा कार्यक्रम सुरू होतो. अथवा मृच्छकटिकाच्या नवव्या अंकाच्या शेवटी चारुदत्ताला फाशीची शिक्षा देण्यात येते व दहाव्या अंकात लगेच त्याला फासावर चढविण्याची तयारी करणारे मांग येतात.

अंकावताराणतही हीच कल्पना असते मात्र यात दोन्ही अंकातील स्थल व काल कायम असतात. म्हणजे मागील अंकातील प्रसंगच पुढील अंकात चालू असलेला दिसतो. 'मालती-माधवाच्या' तिसऱ्या अंकाच्या अखेरीस जखमी झालेल्या मकरंदाला पाहून माधवही मूर्च्छित होतो तर चौथ्या अंकाच्या प्रारंभी मदयंतिका व मालती त्याच ठिकाणी दोघांना सावध करीत असल्याचे दृश्य दिसते. साहित्यदर्पणात अंकास्य व अंकावतार या दोन्हीत भेद मानलेला नाही.

**पताकास्थानक :** नाटकाचे कथानक वाटचाल करीत असता मध्येच एखाद्या वेळी पुढे घडणाऱ्या घटनांची सूचना दिलेली आढळते. नाट्यशास्त्रात या प्रकारास पताकास्थानक असे म्हटलेले आहे. सैन्य येत असल्याचे जसे त्याच्या निशाणावरून उमगते तसे कथानक पुढे कोणते वळण घेणार आहे याची कल्पना या पताकेवरून येते. याचे अनपेक्षित इष्टप्राप्ती, श्लिष्ट अर्थाने भावी प्रसंगाची सूचना, निराळ्या अर्थाने भावी घटनेची सूचना व भिन्न अर्थाची सूचना असे चार प्रकार केलेले आहेत. पण धनंजयाच्या 'दशारूपा'त या चार प्रकारांचे एकीकरण केलेले आहे.

**प्रस्तावना :** तसेच नाटक सुरू होण्याच्या अगोदर जो प्रास्ताविक भाग असतो त्यात नाटकाच्या प्रारंभाची अथवा पात्राची सूचना दिलेली असते. त्यावरून प्रस्तावनेचे (१) प्रयोगातिशय (२) प्रवृत्तक (३) अवगलित (उदा. अभिज्ञानशाकुंतलाची प्रस्तावना) (४) कथोद्धात (वेणीसंहार) व (५) उद्घात्यक (मुद्राराक्षस) असे भाग पडतात. वस्तूचा इतका विचार पुरे.

**(२) नेता** - यात नायक-नायिका, इतर प्रमुख व गौण पात्रे यांचा विचार प्रस्तुत होतो. नायक अथवा नेता ही काव्य नाटकातील प्रधान व्यक्ती असून

कार्याचे फलित - म्ह. राज्याची प्राप्ती, परमुलखावर विजय, नायिकेची प्राप्ती, प्रतिज्ञापूर्ती - हे त्यालाच प्राप्त होते. नेता हा उत्तम गुणांनी युक्त म्हणजे विनम्र, गोड स्वभावाचा, त्यागी, कर्तव्यदक्ष, संभाषणचतुर, तसेच कुलीन, रूपसंपन्न, पराक्रमी, तरुण व बुद्धिमान असतो. 'मालती-माधवातील माधव, शाकुंतलातील दुष्यंत अथवा रत्नावलीतील उदयन हे नायक या गुणांनी युक्त आहेत.

नायकाचे धीरोदात्त, धीरोद्धत, धीरललित व धीरशांत असे चार प्रकार सांगितलेले आहेत. त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे -

**(अ) धीरोदात्त** : या प्रकारचा नायक विशाल अंत:करणाचा, गंभीर, क्षमाशील, त्यागी, स्वत:ची प्रशंसा न करणारा, तसेच दृढनिश्चयी असतो. श्रीहर्षाच्या नागानंद नाटकातील जीमूतवाहन हा या प्रकारचे उत्तम उदाहरण आहे. त्याला राज्यकारभार करण्यापेक्षा आईवडिलांची सेवा करण्यातच आनंद वाटतो. मृच्छकटिकातील चारुदत्तासही काही बाबतीत धीरोदात्त म्हणता येईल.

**(ब) धीरोद्धत** - हा गर्विष्ठ, मत्सरयुक्त, अहंकारी तसेच सामर्थ्यसंपन्न असतो. 'वेणीसंहारा'तील भीम हा खऱ्या अर्थाने धीरोद्धत आहे. भीमाला आपल्या सामर्थ्याचा यथार्थ अभिमान आहे. कौरवांविषयी चीड आहे व युधिष्ठिराच्या कचखाऊ वृत्तीबद्दल संतापाची भावना आहे.

**(क) धीरललित** - या प्रकारचा नायक रसिक व विलासी असतो. तो राजा असल्यास मंत्र्यावर कारभार सोपवून प्रणयाचे खेळ खेळतो. स्वप्नवासवदत्त, प्रियदर्शिका, रत्नावली नाटकातील उदयन हा या प्रकारात मोडतो. 'मालविकाग्निमित्राचा नायक अग्निमित्र हा त्यास तरुण वयाचा मुलगा असूनही तरुण नायिकेबरोबर बिनदिक्कत प्रेमाचे चाळे करतो. अविमारक, चारुदत्त अथवा माधव हे प्रेमिक असले तरी सुखासीन व लंपट नाहीत हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

**(ड) धीरशांत** - धनंजयाने याचे लक्षण सांगितलेले नाही. 'भावप्रकाशा'त शारदातनयाने मात्र हा क्लेश सहन करणारा, विवेचक व धैर्यवान असतो' असे म्हटले आहे. हे गुण मृच्छकटिकातील चारुदत्ताच्या ठिकाणी दिसून येतात.

नायकाचा शृंगाररसाच्या दृष्टीने विचार केल्यास वरील प्रत्येक प्रकारच्या नायकाचे दक्षिण, अनुकूल, धृष्ट व शठ असे चार प्रकार होतात.

**(१) दक्षिण** - या प्रकारच्या नायकाचे अनेक स्त्रियांवर प्रेम असते. तो नवीन स्त्रीवर जरी प्रेम करीत असला तरी पहिल्या पत्नीशी त्याची वागणूक

दाक्षिण्याची असते. उदा. विक्रमोर्वशीयातील पुरुरवा आपल्या औशीनरी या ज्येष्ठ पत्नीशी दाक्षिण्याने वागतो.

**(२) अनुकूल** - या प्रकारचा नायक एकाच स्त्रीवर मनापासून प्रेम करतो. भवभूतीचे माधव व राम हे दोन्ही नायक या प्रकारचे आहेत. हेमचंद्राने आपल्या 'काव्यानुशासना'त अनुकूल पुरुषाचे उदाहरण म्हणून 'उत्तररामचरिता'तील 'इयं गेहे लक्ष्मीः' (उ. रा. च. १.३८) हा श्लोक उद्‌धृत केला आहे.

**(३) धृष्ट** - या प्रकारच्या नायकाचे वर्तन 'दक्षिण' नायकाच्या बरोबर उलट असते. हा पत्नीला न कळत दुसऱ्या स्त्रीवर प्रेम करतो. रात्रभर दुसरीकडे मौज करून तो पहाटे घरी येतो. पत्नीने त्याची चोरी पकडली तरी त्याला त्याची शरम वाटत नाही. तो तिची दुरुत्तरे सहन करतो. वेळप्रसंगी खोटे बोलण्यासही मागे पुढे पाहात नाही. मालविकाग्निमित्रात इरावतीने अग्निमित्राला दोन वेळा मुद्देमालासकट पकडलेले आहे. तो तिची क्षमा मागतो. पाया पडतो. नाटकापेक्षा काव्यात याची उदाहरणे सापडतात. जयदेवाच्या गीतगोविंदात (सर्ग १०) असा प्रसंग रेखाटलेला आहे. अमरुशतकातही असे वर्णन आढळते. याला धृष्ट अथवा शठ हे नाव शोभणारे आहे.

**(४) शठ** - या प्रकारचा नायक 'शठ' किंवा लबाड असतो. तो पत्नीवर प्रेम करतो पण इतर स्त्रियांवर चोरून प्रेम करतो. पण आपले खरे प्रेम तुझ्यावरच आहे अशी पत्नीजवळ बतावणी करतो. अग्निमित्र, पुरुरवा हे कालिदासाचे नायक तसेच प्रियदर्शिका व रत्नावली नाटकातील उदयन हे थोडेफार शठ या प्रकारात मोडतात.

यातील प्रत्येक नायकाचे पुन्हा उत्तम, मध्यम व अधम असे तीन प्रकार सांगितलेले आहेत. त्यामुळे नायकाचे एकूण अठ्ठेचाळीस प्रकार (४ x ४ x ३ = ४८) होतात. शृंगारी नायकाच्या ठिकाणी शोभा, विलास, माधुर्य, गांभीर्य, धैर्य, तेज, लालित्य व औदार्य असे आठ गुण असतात. यांना सात्त्विक गुण असे म्हटलेले आहे.

एवंविध नायकास त्याच्या प्रेमप्रकरणात पीठमर्द, विट, विदूषक व चेट हे मदत करतात. 'मालती-माधवा'तील मकरंदास पीठमर्द व कलहंसास चेट असे म्हणता येईल. 'मालविकाग्निमित्रा'तील विदूषक मात्र राजास सर्वतोप्रकारे मदत करतो. विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक या नाटकांत विदूषकाकडून नायकास काही मदत होत नाही. उलट त्यांच्या अजागळपणामुळे नायक अडचणीत सापडतो.

मालती-माधवात कामंदकी ही माधवास मदत करते. ती स्वत:ला नि:सृष्टार्था दूती असे म्हणवते.

नायकास पेचात पकडणारा अथवा त्याच्या इष्टपूर्तीत विघ्न आणणारा तो प्रतिनायक अथवा खलनायक होय. प्रतिमा व अभिषेक या भासाच्या नाटकातील रावण, वेणीसंहारातील दुर्योधन, मृच्छकटिकातील शकार व मालती-माधवातील अघोरघंट व कपालकुंडला ही खलपात्रे आहेत. माधवाच्या प्रेम-प्रकरणात त्याचा खरा प्रतिस्पर्धी नंदन हा आहे; पण नाटककाराने त्याला रंगभूमीवर न आणल्याने त्याचा विरोध नावापुरताच राहिला आहे. भरतांनी खलनायकाची लक्षणे नायकाच्या अगदी विरुद्ध अशी दिली आहेत. तथापि नाटककारांनी खलपात्राच्या ठिकाणी गुण दाखविले आहेत. उदा. भासाने रूढार्थाने दुष्ट मानलेल्या दुर्योधन, कैकेयी, कंस या पात्रांची उजळ बाजू दर्शविली आहे. दुसरे असे की खलपात्रास अगदी दुर्गुणाचा पुतळा बनवण्यापेक्षा त्याच्याही अंगी एखादा लोकोत्तर गुण दर्शविल्यास संघर्षास उठाव येतो.

नायकास शोभेल अशीच नायिका नाट्यशास्त्रास अभिप्रेत आहे. तिचे स्वीया, परकीया व सामान्या असे तीन प्रकार सांगितलेले आहेत. स्वीया म्हणजे पत्नी. ही नायकावर मनापासून प्रेम करणारी असून स्वभावाने सरळ व गृहकृत्यात निपुण असते. स्वप्न वासवदत्ता नाटकातील वासवदत्ता, विक्रमोर्वशीयातील औशीनरी, उत्तररामचरितातील सीता अथवा एकच प्यालयातील सिंधू या खऱ्या आर्य स्त्रिया आहेत.

परकीया म्हणजे परस्त्री. हिचे (१) दुसऱ्याची पत्नी व (२) अविवाहित कन्या असे दोन प्रकार आहेत. यापैकी पित्याच्या घरी राहणारी अविवाहित कन्या हीच शास्त्रकारांना नायिका म्हणून अभिप्रेत आहे. त्यामुळे बालविधवा ही करुणेचा विषय असली तरी तिचा नायिकेत समावेश केलेला नाही. तसेच दुसऱ्याची पत्नी हीदेखील नायिका मानली जात नाही, असा स्पष्ट अभिप्राय हेमचंद्राने व्यक्त केला आहे.

यावरून एखाद्याची पत्नी नायकाच्या प्रेमाचा विषय होऊ शकत नाही. शास्त्रकारांचा हा विचार अत्यंत मोलाचा आहे. गीतगोविंदातील राधा ही वास्तविक पाहता दुसऱ्याची पत्नी आहे. पण जयदेवाने तिला नवोढाच मानलेले आहे. तिच्या पतीचा पुसटसाही उल्लेख केला नाही. संस्कृत काव्य-नाटकातील वातावरण अत्यंत उदात्त असण्याचे हे महत्त्वाचे कारण आहे.

सामान्या म्हणजे गणिका होय. ही नायकाच्या प्रेमाचा विषय होऊ शकते. विक्रमोर्वशीयातील उर्वशी ही स्वर्गातील वेश्या आहे. मृच्छकटिकातील वसंतसेना किंवा संशयकल्लोळातील रेवती या गणिका आहेत. अशा गणिकांचा नायकाशी विवाह झालेला दाखविण्यात संस्कृत नाटककारांनी धाडसच प्रकट केलेले आहे. कारण हिंदू समाजात परवा परवापर्यंत गणिकेचे स्थान निंद्यच मानले जात होते. गणिकेचे लक्षण सांगताना हेमचंद्राने 'धनाच्या लोभाने कोणावरही कृत्रिम प्रेम करणारी' असे तिचे वैशिष्ट्य सांगितले आहे. पण हे लक्षण वसंतसेनेला लागू होत नाही. ती गुणलोभी असून दरिद्री बनलेल्या चारुदत्तावर निस्सीम प्रेम करणारी आहे.

'साहित्य-दर्पणा'त नायिकेचे एकंदर ३८४ प्रकार सांगितलेले आहेत. त्यांच्या तपशिलात न शिरता स्थूलमानाने पाहिले तर स्वीया नायिकेचे वयावरून १) मुग्धा (२) मध्यमा व (३) प्रौढा असे तीन प्रकार केलेले दिसतात. 'स्वप्न' नाटकातील पद्मावती, 'मालविके'तील मालविका, रत्नावलीतील सागरिका, या मुग्धा म्हणजे कोवळ्या वयाच्या आहेत, तर वासवदत्ता, औशीनरी, वसंतसेना या मध्यमा आहेत. 'मालविके'तील धारिणी, 'उत्तररामा'तील सीता या प्रौढा आहेत असे म्हणता येईल.

नायिकेला अनेक प्रकारच्या स्त्रिया साह्य करतात. तिची बालमैत्रीण, सखी, नटी, धात्रेयी, शेजारीण, संन्यासिनी वगैरे. मालती-माधवात लवंगिका ही मालतीची धात्रेयी (म्ह. दाईची मुलगी) व बालमैत्रीण आहे. नाटकाची सूत्रसंचालिका कामंदकी ही संन्यासिनी आहे. बकुलावलिका, चित्रलेखा, अनसूया, प्रियंवदा, सुसंगता या नायिकांच्या सख्या आहेत. प्रियदर्शिकेतील सांकृत्यायनी, मालविकेतील पारिव्राजिका व मालती-माधवातील कामंदकी या संन्यासिनी आहेत. कामंदकीची शिष्या सौदामिनी ही योगिनी आहे. ती मालतीला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढते.

दूतीचे मुख्य काम नायिकेचा निरोप नायकाकडे पोहोचता करणे, त्याचा निरोप घेऊन येणे, उभयतांच्या भेटीची जागा व वेळ ठरवणे, संकेतस्थळी नायकास घेऊन येणे हे असते. मालती-माधव नाटकात कामंदकी हीच मुख्य दूती आहे. ती आपल्या शिष्यिणीमार्फत नायक व नायिका या दोघांनाही साहाय्य करते. वात्स्यायनाच्या कामसूत्रात दूतीने पार पाडण्याची कर्मे सांगितली आहेत. भवभूती वगैरे नाटककारांनी त्याचाच उपयोग करून घेतलेला आहे.

संस्कृत नाट्यसृष्टीत आढळणाऱ्या पात्रांचे स्वरूप वरीलप्रमाणे आहे. शकार (मृच्छकटिक), चाणक्य व राक्षस (मुद्राराक्षस), परशुराम (महावीरचरित), माल्यवान (महावीरचरित व बालरामायण), कामंदकी (मालती-माधव), जनक, अरुंधती व कौसल्या (उत्तर रामचरित), अश्वत्थामा व कर्ण (वेणीसंहार) यांसारखी प्रभावी पात्रे स्वतंत्रपणे आपला ठसा उमटवणारी आहेत. ही पात्रे वगळता संस्कृत नाटकातील पात्रांचा गोतावळा हा वर दिल्याप्रमाणे आहे.

**(३) रस :** आता ज्याच्या ओढीने वाचक-प्रेक्षक नाटकाकडे आकृष्ट होतात त्या नाट्यार्थाचे - रसाचे - स्वरूप समजल्याखेरीज नाटकाचे स्वरूप नीट लक्षात येणार नाही. भारतीय विचारसरणीनुसार मनुष्य जे काही पाहतो, ऐकतो अथवा अनुभवतो त्याचा ठसा त्याच्या अन्तःकरणावर उमटतो. यालाच संस्कार असे म्हणतात. तो अनुभव नष्ट झाला तरी संस्कार कायम राहतो. हा संस्कारयोग्य सामग्रीच्या योगे उद्‌बुद्ध (म्ह. जागृत) होऊ शकतो. असे हे संस्कार असंख्य आहेत. यांनाच भाव असे नाव आहे. यातील काही भाव स्थिर तर काही अल्पकाळ टिकणारे असतात. त्यांनाच स्थायी व व्यभिचारी अशी नावे दिलेली आहेत.

भरतमुनींना 'भाव' या पदाने लौकिक व्यवहारातील भाव अभिप्रेत नाहीत. त्यांना नाट्यानुकूल भाव अभिप्रेत आहेत. त्यांनी मनोव्यापाराचे शास्त्रीय विवेचन केलेले नाही. नाट्यविषयक आवश्यक अशी सामग्री आपल्या समोर मांडलेली आहे. त्यांच्या मते नाट्यभाव हे कवीच्या अंतर्गत वृत्तीचे भावन करतात म्हणजे तिला आस्वाद्य बनवतात. सदर वृत्तीस काव्यार्थ (म्ह. कवीस अभिप्रेत असणारा अर्थ) असे नाव आहे. कवीच्या मनात स्फुरणारा, रसपदवीस प्राप्त झालेला स्थायीभावच काव्याच्या वाचनाने अथवा नाट्यप्रयोगाच्या दर्शनाने रसिकाच्या हृदयात जागृत होतो. त्यामुळे तो नाट्य-विषयाशी तद्रूप होतो.

भरतांनी आपल्या प्रसिद्ध 'रससूत्रा'त 'विभाव, अनुभाव व व्यभिचारी भाव यांच्या संयोगाने रस निष्पन्न होतो' असे म्हटलेले आहे. यातील विभाव या पहिल्या पदाचा अर्थ कारण, निमित्त अथवा हेतू असा होतो. नाटकीय पात्रे व त्यांच्या भोवतीचे वातावरण यांचा समावेश विभावात होतो. विवेचनाच्या सोयीसाठी विभावाचे आलंबन व उद्दीपन असे दोन प्रकार उत्तरकालीन लेखकांनी केलेले आहेत. आलंबन विभावात नायक व नायिका यांचा, तर उद्दीपन विभावात एकांत, उद्यान, चंद्रप्रकाश इत्यादी सामग्रीचा समावेश होतो.

विभावाच्या योगे घडून येणाऱ्या परिणामाचे अथवा कार्याचे अनुमान अनुभावांच्या योगे केले जाते. नटाच्या अभिनयावरून प्रेक्षकांना रसाची प्रतीती येते. उदा. वेणीसंहाराच्या तिसऱ्या अंकात आपला घोर अपमान करणाऱ्या कर्णावर अश्वत्थामा चाल करून जातो. त्याचे काम करणारा नट आपले डोळे लाल करून, तलवार उगारून, आवाज चढवून आपला क्रोध प्रकट करतो. वाङ्मयात हे कार्य वर्णनाच्या योगे साधलेले असते.

प्रीती, भीती किंवा शोक या भावना स्थिर आहेत पण मत्सर, निराशा, चपलता, आवेग अथवा हर्ष या भावना क्षणकाल टिकणाऱ्या आहेत. तेव्हा वाचक-प्रेक्षकांना रस कसा अनुभवता येतो, हे पाहू. शृंगाराचे उदाहरण घेतल्यास यात रति हा स्थायी भाव असून याचे काव्य-नाटकातील रूपांतर म्हणजे शृंगार होय. स्त्री-पुरुषातील परस्पर प्रीती ही त्यांच्या हावभावावरून ध्यानात येते. 'मालती-माधव'च्या पहिल्या अंकात माधव बकुळीच्या झाडाखाली माळ गुंफत बसला आहे व मालती त्याच्याकडे टक लावून पाहात आहे. हे दृश्य प्रत्यक्ष पाहिल्यावर अथवा नाटकातील वर्णन वाचल्यावर त्यांच्या परस्पर प्रीतीचे सहज अनुमान होते. येथे मालती व माधव हे आलंबन विभाव असून उद्यान, मदनोत्सवाचे वातावरण, सख्यांचे चतुर संभाषण हे उद्दीपन विभाव आहेत. मालतीचे कटाक्ष, बाहूंच्या हालचाली हे अनुभाव आहेत. रोमांच, स्वेद वगैरे व्यभिचारी भाव आहेत. या सर्वांचे जेव्हा काव्यात अथवा नाटकात दर्शन होते तेव्हा रसिकास शृंगार रस प्रतीत होतो. आता विभावादीच्या संयोगाने रसनिष्पत्ती होते या विधानाचा अर्थ ध्यानात येईल.

मम्मटाच्या मते नाटकात आठच रस असून नववा शांत रस हा काव्यात आढळतो. भरताच्या नाट्यशास्त्रातही आरंभी आठच रस होते. शांत या नवव्या रसाची भर उद्भटाने घातली असे म्हणतात. स्थायी भाव व रस हे परस्परापासून भिन्न आहेत. दंडीसारखे प्राचीन काव्य मीमांसक उपचित झालेला स्थायी म्हणजे रस असे मानत असत. पण ते मत कोणी मानीत नाही. स्थायी भाव व रस यात अंशात्मक फरक नसून गुणात्मक फरक आहे.

नाट्यप्रयोगाच्या अवलोकनाने रसिकाच्या मनामध्ये अननुभूत अशी वृत्ती निष्पन्न होते. तिच्या चर्वणेने-म्हणजे ती वारंवार मनात घोळवल्याने त्याला अलौकिक अशा आनंदाचा अनुभव येऊ लागतो. त्या वेळी तो आपले वैयक्तिक सुखदु:ख पार विसरतो. या उपजत स्थायीलाच रस अशी संज्ञा आहे. रस हा

स्थायी भावाहून स्वरूपत: भिन्न असला तरी उपचाराने त्यालाच रस असे म्हटले जाते.

रसिकास रसाचा अनुभव कसा येतो हे थोडे आणखी स्पष्ट केले पाहिजे. काव्य-नाटकात विभावादीचे साधारणीकरण होते. आपण जेव्हा एखादे नाटक प्रयोगरूपाने पाहतो अथवा त्याचे वाचन करतो त्या वेळी आपल्या मनातून विशिष्ट पात्रे, प्रसंग यांची जाणीव नाहीशी होते. ही जाणीव नष्ट होण्यास नाट्यप्रयोगात नेपथ्य, संगीत या गोष्टी मदत करतात तर नाटक वाचत असता गुण, अलंकार रीती हे काम पार पाडतात. आपल्या मनातील आपपर भेदही नाहीसा होतो. त्यामुळे आपण पटकन त्या पात्रांशी समरस होतो. ही वृत्ती जोपर्यंत उत्पन्न होत नाही, तोपर्यंत रसाचा अनुभव येत नाही.

विभावादींचे अशा प्रकारे साधारणीकरण झाल्यावर नाटकातील सारा प्रसंग प्रेक्षकांशी सुसंवाद साधू लागतो. सर्वांना एकाच प्रकारची अनुभूती येऊ लागते म्हणजे सर्व जण एकाच वेळी हसतात किंवा डोळे पुसू लागतात. याचे कारण रसिकांच्या अंत:करणात वासनारूपाने राहणारा भाव व नटांनी आपल्या अभिनयाने साकारलेला भाव हा एकच असतो.

रस हा चर्वणेच्या योगे आस्वाद्य होतो. चर्वणेचा विषय होणे हा रसाचा अत्यंत महत्त्वाचा धर्म आहे. चर्वणा म्हणजे आस्वाद होय. एखादा आंबट गोड पदार्थ जिभेवर चांगला घोळवल्यावर त्याची चव नीट समजते. चर्वणेतही हीच कल्पना अनुस्यूत आहे. यासाठीच मम्मटाने रसाला 'चर्व्यमाण' असे विशेषण दिले आहे. चर्वणेच्या योगे रसास्वादाचा अनुभव येऊ लागताच रसिकाला अवर्णनीय आनंद होऊ लागतो. 'काव्यप्रकाशा'वरील 'उद्योत' नामक टीकेत नागेशभट्ट सांगतो की 'रस जणू प्रत्येक अवयवावर अमृताचा शिडकावा करतो.' यावरून रसाचा आस्वाद सुखदायक असतो, असेच त्याला सूचित करावयाचे आहे.

आता विभावादिकांच्या योगे रस निष्पन्न होतो, असे जे म्हटले आहे ते उपचाराने, परमार्थाने नव्हे. निष्पत्ती ही रसाची होत नसून चर्वणेची होते. चर्वणा हीच प्रधान असल्याने तिच्या अनुषंगाने रसाची निष्पत्ती होते असे म्हटलेले आहे. असे एकंदर मत अभिनवगुप्ताचार्यांनी मांडलेले आहे व मम्मट, विश्वनाथ व जगन्नाथ यांसारख्या मान्यवर पंडितांनी त्याचा स्वीकार केलेला आहे.

* * *

वरील तीन घटकांप्रमाणेच आणखी दोन महत्त्वाच्या घटकांचा विचार करायला हवा. त्यातील पहिला घटक म्हणजे नाटकाला जोडलेली प्रस्तावना हा होय. प्रस्तावनेत नाटकाचे, नाटककाराचे नाव व इतर आनुषंगिक माहिती सांगितलेली असते. याला भासाची नाटके अपवाद आहेत. भासाने आपल्या कोणत्याही नाटकाच्या प्रस्तावनेत स्वत:चे व नाटकाचे नाव सांगितलेले नाही. प्रारंभी एक अथवा अनेक देवतांच्या स्तुतीपर श्लोक असतात. या श्लोकांना नांदी असे म्हणतात. नन्द म्हणजे आनंदित करणे या धातूपासून नांदी हा शब्द बनलेला आहे. नांदीत इष्ट देवतेला आवाहन केलेले असते. आरंभिलेले कार्य - म्ह. नाटकाची रचना/नाट्यप्रयोग - हे निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी तिची योजना केलेली असते.

प्रस्तावनेच्या पूर्वी रंगभूमीवर जो मोठा धार्मिक विधी केला जाई त्याला पूर्वरंग असे नाव आहे. आरंभिलेले कार्य निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी नटमंडळींकडून नाट्यांगाच्या स्वरूपात केलेले देवतापूजन एवढा अर्थ प्राप्त होतो. यात मंगलगीत, तालवाद्य, नृत्य, पाठ्य यांचा समावेश असतो. हे कार्य पार पाडणाऱ्या व्यक्तीस सूत्रधार असे म्हणतात.

नांदी हे पूर्वरंगाचे शेवटचे अंग आहे. पूर्वरंगाची पहिली नऊ अंगे पडद्याआड पार पाडली जातात. पूर्वरंगाचा शेवट व प्रस्तावनेचा प्रारंभ हा नांदीश्लोकाने होतो. उत्तरकालात पूर्वरंगाचा संक्षेप होऊ लागला पण नांदी मात्र शिल्लक राहिली. आणखी एक गमतीची गोष्ट अशी की, नांदीश्लोकानंतर सूत्रधाराच्या तोंडी 'अलमति विस्तरेण।' असे वाक्य बहुतेक नाटकात आढळते. विस्ताराचा जो हा उल्लेख आहे तो पूर्वरंगास अनुलक्षून आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

नांदी ही काव्यार्थ सूचक असते या समजुतीने टीकाकार नांदीश्लोकातून कथानकास जुळेल असा दुसरा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतात. शाकुंतलाच्या नांदीत शंकराच्या अष्टधा प्रकृतीचे वर्णन आहे. पंच महाभूते, चंद्र, सूर्य व यजमान अशा त्या आठ प्रकृती आहेत. राघवभट्ट या टीकाकाराने यातून विधात्याची पहिली निर्मिती जे पाणी, त्याचा अर्थ पहिली शकुंतला असा केला आहे. मग यजमान म्हणजे कण्व, चंद्र-सूर्य याचा अर्थ अनसूया व प्रियंवदा या तिच्या मैत्रिणी. आहुतीचे सेवन करणाऱ्या अग्नीच्या वर्णनातून त्याने शकुंतलेच्या गर्भधारणेचा निर्देश केलेला आहे. हा अर्थ कालिदासास अभिप्रेत असेल असे वाटत नाही. तेव्हा अशा प्रकारे अर्थ शोधण्याचा प्रयत्न म्हणजे सुताने स्वर्गाला

जाण्याचाच प्रकार आहे. भासांने आपल्या काही नांदीश्लोकात नाटकातील पात्रांची नावे गुंफण्याचा प्रयत्न केला आहे.

नाटकाची - नाट्यप्रयोगाची - सर्व जबाबदारी ज्याच्यावर सोपवलेली असते त्याला सूत्रधार अशी संज्ञा आहे. नाट्यप्रयोगाची सारी सूत्रेच तो जणू सांभाळत असतो. त्यामुळे त्याला दिलेले नाव अत्यंत समर्पक आहे. डॉ. पिशेल यांच्या मते प्राचीन भारतात कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करणारे लोक होते, ते दोऱ्यांच्या साहाय्याने बाहुल्या नाचवून प्रेक्षकांचे मनोरंजन करीत. या लोकांना 'सूत्रधार' असे म्हणत असत. कालांतराने हा शब्द नाट्यप्रयोग सादर करणाऱ्या व्यवस्थापकास (Stage-Manager) लावण्यात येऊ लागला.

सूत्रधाराकडे प्रेक्षकांचे स्वागत करणे, सादर करण्यात येणाऱ्या नाटकाचा, नाटककाराचा थोडक्यात परिचय करून देणे, क्वचित प्रसंगी नटीला प्रेक्षकांची करमणूक करण्यासाठी गाणे म्हणावयास सांगणे इत्यादी कामे असतात. ही कामे तो प्रत्यक्ष रंगभूमीवर करतो. पण त्याहीपेक्षा प्रयोग व्यवस्थित बसवणे ही त्याची कामगिरी सर्वात महत्त्वाची असते. यासाठी योग्य नाटकाची निवड करणे, अनुरूप नटांना गोळा करणे, त्यांना कामे वाटून देणे, नाटकाची संहिता पढवणे, संवाद म्हणून घेणे, त्यास सजावटीची जोड देणे, अनुरूप पोशाख व अलंकार तयार करून घेणे आणि आयत्या वेळी काही अडचण आली तर तिचे निवारण करणे अशा अनेक कामांशी त्यांचा संबंध येतो. या कामात त्याला परिपार्श्वक, नटी, विदूषक हे मदत करतात.

कालिदासाने शाकुंतलाच्या प्रस्तावनेत 'अभिरूप भूयिष्ठ परिषदे'चा उल्लेख केलेला आहे. मालती-माधवात त्या ऐवजी विद्वत् परिषद असा शब्द योजला आहे. गावातील विद्वान, रसिक व प्रतिष्ठित लोकांचे असे मंडळ असावे. ही मंडळी नाटकाचा प्रयोग व्यवस्थितपणे सादर होतो की नाही याची कसून पाहणी करीत. नाटकाची निवड करणे, प्रयोगाची परीक्षा करणे, उत्तम प्रयोगांना प्रशस्तीपत्र देणे ही कामे त्यांच्याकडे असत. भासावरील विवेचनात भासाने नाट्यस्पर्धेत भाग घेऊन अनेक बक्षिसे मिळवल्याचा उल्लेख आला आहे. त्यांवरून नाट्यस्पर्धांचेही आयोजन या परिषदेकडून केले जात असावे.

प्रस्तावनेत काही महत्त्वाचे निर्देशही आढळतात. उदा. मालती-माधवाच्या प्रस्तावनेत पुरुष स्त्रियांच्या भूमिका करीत असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. स्वत: सूत्रधार हा नाटकातील कामंदकीची व नट हा मालतीची सखी अवलोकिता

हिची भूमिका करणार असल्याचे सांगितले आहे. या पूर्वीच्या कोणत्याही नाटककाराने या प्रथेचा उल्लेख केलेला नाही. तेव्हा हा निर्देश महत्त्वाचा मानावयास हवा.

नाटकातील संवाद हाही महत्त्वाचा घटक आहे. हे गद्यपद्यात्मक असतात. सर्वसाधारण प्रसंगी गद्याची योजना करण्यात येते. याउलट जेथे काव्यमयता, उत्कट भावना अथवा प्रभावी विचार मांडायचा असतो तेथे पद्याचा आश्रय करण्यात येतो. याचा अर्थ महत्त्वपूर्ण भाग गद्यात असत नाही, असे नाही. शाकुंतलाच्या पाचव्या अंकातील राजा आणि शकुंतला यांच्यातील संघर्ष, मुद्राराक्षसामधील चाणक्य व चंद्रगुप्तामधील कृतक कलह (म्ह. कलहाचे नाटक) तसेच वेणीसंहारातील अश्वत्थामा व कर्ण यांचे भांडण हे महत्त्वाचे प्रसंग गद्यातच आहेत. कित्येकदा सामान्य गोष्टीही पद्यात सांगितलेल्या असतात. शेक्सपिअरच्या नाटकात ज्याप्रमाणे ब्लँक व्हर्स (Blank Verse) व गद्य यांची योजना असते तसाच प्रकार संस्कृत नाटकांत आढळतो.

संस्कृत नाटकांचे वैशिष्ट्य म्हणजे यातील संवाद हे संस्कृत व प्राकृत अशा दोन भाषात असतात. संस्कृतात कोणी बोलावे व प्राकृत भाषेचा आश्रय कोणी करावा याविषयी नाट्यशास्त्रात स्पष्ट निर्देश आहेत. देव, मुनी, राजा, पंडित, अमात्य त्याचप्रमाणे प्रधान पुरुष पात्रांच्या तोंडी संस्कृत भाषा असते तर स्त्रिया (यात नायिकेचाही समावेश होतो). लहान मुले, गौण पात्रे, दास, दासी यांच्या तोंडी प्राकृत भाषा घातलेली असते. राजाचा मित्र विदूषक हादेखील प्राकृतातच बोलतो. स्त्रियांच्या बाबतीत योगिनी अथवा संन्यासिनी या संस्कृतात बोलतात. पंडिता कौशिकी, सांकृत्यायनी, कामंदकी, कपालकुंडला, सौदामिनी तसेच उत्तररामचरितातील अरुंधती, आत्रेयी, वनदेवता या स्त्रिया संस्कृतात बोलताना दिसतात. क्वचित स्त्रियांच्या बोलण्यात उत्कट विचार आला तर तो संस्कृतात सांगण्यात येतो. त्यापूर्वी 'संस्कृतमाश्रित्य' अशी नाट्यसूचना दिलेली आढळते. मालती-माधवात मालतीच्या व लवंगिकेच्या तोंडी संस्कृत श्लोक घातलेला आहे.

भासाच्या नाटकातील गद्य सोपे, आटोपशीर व बोली भाषेस जवळचे आहे. श्लोकसंख्या फारशी नाही. कालिदासाच्या नाटकातही गद्य-पद्याचा उत्तम समन्वय आहे; पण यानंतर नाटकातील काव्य हे नाट्यावर कुरघोडी करू लागले व श्लोकांची संख्या वाढू लागली. सहाव्या सातव्या शतकात गद्यालाही बहर

आला. समासप्रचूर गद्य संस्कृताप्रमाणे प्राकृतातही शिरले. मालती-माधवात लवंगिका व मदयंतिका यांच्या तोंडी तर वेणीसंहारात सुंदरकाच्या तोंडी प्रदीर्घ व समासांनी गच्च भरलेले प्राकृत गद्य आढळते. अलिकडील संस्कृत नाटकांच्या काही आवृत्त्यांमध्ये प्राकृत भाषणे गाळून त्यांची केवळ संस्कृत छाया दिलेली असते. हा प्रकार अनिष्ट आहे. मूळ प्राकृत भाषण देऊन त्याचे संस्कृत रूपांतर कंसात देणे, हेच योग्य आहे.

संस्कृत नाटकात स्वगत भाषणे आहेत. यात पात्र आपले मनोगत व्यक्त करते. मुद्राराक्षसाच्या सहाव्या अंकात राक्षसाचे दीर्घ स्वगत आहे. एखादे पात्र फक्त शेजारच्या पात्रालाच उद्देशून बोलते त्यास जनांतिक असे नाव आहे. मराठी नाटकातही हा प्रकार 'एकीकडे' अशी नाट्यसूचना देऊन दर्शविलेला असतो. काही वेळा रंगभूमीवरील पात्र पडद्यामागील पात्राशी बोलते, मात्र मागील पात्राचे भाषण त्यालाच ऐकू येते असे समजावयाचे असते. रंगभूमीवरील पात्र 'काय म्हणतोस?' असे म्हणून मागच्या पात्राचे म्हणणे स्पष्ट करते या प्रकारास 'आकाशभाषित' असे नाव आहे.

नाटकातील पद्यश्लोक म्हणजे गाणी नव्हेत. नाटकात हे श्लोक चालीवर, तालासुरावर म्हटले जातात. क्वचित त्यास हलक्या संगीताचीही जोड दिली जात असावी. पण ते श्लोक गायनासाठी घातलेले नाहीत. जेथे गाणे अभिप्रेत असते तेथे 'गायति' अशी सूचना स्पष्ट दिलेली असते. हे मुद्दाम सांगण्याचे कारण म्हणजे कै. अण्णासाहेब किर्लोस्करांनी जेव्हा अभिज्ञान शाकुंतलाचे मराठीत भाषांतर केले, तेव्हा मुळातील प्रत्येक श्लोकासाठी त्यांनी एक पद तयार केले. ही पदे नाटकात विस्ताराने गायली जाऊ लागली. पुढे देवलांनीही मृच्छकटिक व विक्रमोर्वशीय यांच्या रूपांतरात हाच प्रकार केला. त्यामुळे संगीत नाटक हा स्वतंत्र प्रकारच मराठी रंगभूमीवर आला. 'गायति' अशी सूचना असलेली पदे प्राकृतात आहेत. शाकुंतलात नटीच्या तर 'मालविके'त नायिकेच्या नृत्यप्रसंगी प्राकृत गीत आले आहे. विक्रमोर्वशीयाच्या चौथ्या अंकात पुरुरव्याच्या तोंडी प्राकृत पदे आहेत.

* * *

'नाटकां'चे स्वरूप नीट ध्यानात येण्यासाठी त्यांच्या वर्गीकरणावर एक नजर टाकली पाहिजे. भरताच्या नाट्यशास्त्रात नाटकास रूपक अशी संज्ञा योजून त्याचे दहा प्रकार सांगितले आहेत -

"नाटकं सप्रकरणमङ्को व्यायोग एव च।
भाण: समवकारश्च वीथी प्रहसनं डिम:॥ अ. २०.२
ईहामृगश्च विज्ञेयो दशमो नाट्यलक्षणे । अ. २०.३ (पूर्वार्ध)
- (भरत नाट्यशास्त्र)

**(१) नाटक :** हाच रूपकाचा सर्वात महत्त्वाचा प्रकार आहे. त्यामुळे या सर्व प्रकारांना साधारणपणे 'नाटक' असेच संबोधले जाते. यातील नाटकाचे स्वरूप समजले म्हणजे इतर प्रकारांचे स्वरूप समजण्यास अडचण पडत नाही. नाटकाचे सविस्तर लक्षण 'साहित्यदर्पणात' पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

"नाटकं ख्यातवृत्तं स्यात्पञ्चसन्धिसमन्वितम् ।
विलासद्ध्यादि गुणवद्युक्तं नानाविभूतिभि: ॥७॥
सुखदु:ख समुद्भूति नानारसनिरन्तरम् ।
पञ्चादिका दशपरास्तप्राङ्का: परिकीर्तिता: ॥८॥
प्रख्यातवंशो राजर्षिर्धीरोदात्त: प्रतापवान् ।
दिव्योऽथ दिव्यादिव्यो वा गुणवान्नायको मत: ॥९॥
एक एव भवेदङ्गी श्रृङ्गारो वीर एव वा ।
अङ्गमन्ये रसा:सर्वे कार्यो निर्वहणेऽद्भुत: ॥१०॥
चत्वार: पञ्च वा मुख्या: कार्यव्यापृत पूरुषा: ।
गोपुच्छाग्रसमानं तु बन्धनं तस्य कीर्तितम् ॥११॥"
- (साहित्यदर्पण : परिच्छेद ६)

म्हणजे नाटकाचे संविधानक हे प्रसिद्ध असून त्यात विलास, समृद्धी इत्यादी गुणांचे वर्णन असते. मुख-प्रतिमुखादि पाच संधी असतात. यातील सुख-दु:खाची कारणे स्पष्ट असतात. अनेक रसांची योजना केलेली असते. यातील अंकांची संख्या पाचापासून दहापर्यंत असते. नाटकाचा नायक हा प्रख्यात वंशातील असतो. तो धीरोदात्त तसाच शूर असतो. तो श्रीकृष्णासारखा दिव्य अथवा रामासारखा दिव्यादिव्य गुणांनी युक्त असतो. नाटकात शृंगार अथवा वीर हा एकच रस प्रधान असावा लागतो. इतर रस त्याचे सहायक म्हणून येतात. नाटकात चार किंवा पाच पात्रांना प्राधान्य असते. नाटकाची एकंदर रचना गाईच्या शेपटीच्या अग्राप्रमाणे म्हणजे निमूळती टोकदार असते. याचा अर्थ मुख्य उद्दिष्टावर नजर ठेवूनच त्यातील सर्व प्रकारांची मांडणी केलेली असते. भासाची अविमारक, प्रतिमा, स्वप्नवासवदत्त, कालिदासाची मालविकाग्निमित्र

व अभिज्ञान शाकुंतल, विशाखदत्ताचे मुद्राराक्षस, श्रीहर्षाचे नागानंद, भवभूतीची महावीर चरित व उत्तररामचरित, मुरारीचे अनर्घराघव, राजशेखराचे बालरामायण, भट्टनारायणाचे वेणीसंहार ही सारी नाटकेच आहेत.

**(२) प्रकरण** : नाटकाची वर दिलेली सारी वैशिष्ट्ये प्रकरणातही आढळतात. पण प्रकरणाची म्हणून काही खास वैशिष्ट्ये असतात. यातील कथानक हे कविकल्पित अथवा स्वतंत्र असते. ते इतिहासातून अथवा पुराणातून घेतलेले नसते. मुख्य म्हणजे ते सामान्य व्यक्तीच्या जीवनाशी निगडित असते. दुसरे म्हणजे मुख्य कथानकास दुसऱ्या उपकथानकाची जोड दिलेली असते. यात शृंगाररसास प्राधान्य असते. प्रकरण हे बहुधा दशांकी असते.

संस्कृत वाङमयात मृच्छकटिक व मालती-माधव ही दोनच प्रसिद्ध प्रकरणे आहेत. नायिकेच्या दर्जावरून याचे शुद्ध व संकीर्ण असे दोन प्रकार केलेले आहेत. 'मालती-माधवा'ची नायिका कुलीन असल्याने ते 'शुद्ध' प्रकाराचे प्रकरण आहे तर 'मृच्छकटिक'ची नायिका ही गणिका असल्याने ते 'संकीर्ण' या प्रकाराचे आहे.

**(३) अंक** : याला 'उत्सृष्टिकांक' असे दुसरे नाव आहे. हेमचंद्राने या शब्दाचे स्पष्टीकरण ज्यांची सृष्टी म्हणजे पती अथवा घरातील कर्ता पुरुष, हा नष्ट झाल्याने स्त्रियांचा शोक अनावर होतो, त्या शोकाचे वर्णन 'अंका'मध्ये असते. भासाचे 'उरुभंग' हे याचे उत्तम उदाहरण आहे. धनंजयाच्या मतानुसार यातील कथानक प्रख्यात असून कवीने याचा विस्तार आपल्या पद्धतीने केलेला असतो. यात मुख व निर्वहण असे दोनच संधी असतात. ही सारी वैशिष्ट्ये उरुभंगास चांगली लागू होतात. असे असूनही डॉ. कीथ यांनी याचा उल्लेख का केला नाही, हे समजत नाही. विश्वनाथाने 'उत्सृष्टिकांका' चे उदाहरण म्हणून 'शर्मिष्ठा-ययाती' या रूपकाचा उल्लेख केला आहे.

**(४) व्यायोग** : याची कथावस्तू प्रसिद्ध असते. यात शृंगार, हास्य व शांत हे तीन रस वगळता इतर सहा रस आढळतात. स्त्रीपात्रे थोडी असतात. याचा विशेष म्हणजे यात होणारे युद्ध हे स्त्रीच्या प्राप्तीसाठी असत नाही. याचा नायक देव, राजा किंवा ऋषी असतो. यातील घटना ही एक दिवसात पूर्ण होणारी असते. यात मुख, प्रतिमुख व निर्वहण असे तीनच संधी असतात. भासाचे 'मध्यम व्यायोग' हे या प्रकाराचे उत्तम उदाहरण आहे. साहित्यदर्पणात 'सौगंधिकाहरण' नामक व्यायोगाचा उल्लेख केला आहे.

**(५) भाण :** हा प्रकार भरतमुनींनी सांगितला असला तरी याची उदाहरणे प्राचीन वाङ्मयात मिळत नाहीत. धनंजयाच्या दशरूपकात याचे स्वरूप स्पष्ट केले आहे. यात विद्वान व चतुर असा विट रंगभूमीवर एकटाच बोलत असतो. तो स्वतःच्या अथवा दुसऱ्यास आलेल्या अनुभवाचे वर्णन करतो. याची रचना प्रायः 'आकाशभाषिता'सारखी असते. विटाच्या प्रश्नास पडद्यामागून कोणी तरी उत्तर देत आहे, अशी यात कल्पना करावी लागते. यात एकच अंक असतो व शृंगार अथवा वीर रसास प्राधान्य असते. अभिनवगुप्ताने यात हास्यरसाचाही समावेश केला आहे. 'साहित्यदर्पणात लीला-मधुकर' नामक भाणाचा उल्लेख केला आहे.

डॉ. रामदेवशरण अग्रवाल व डॉ. मोतीचंद्र यांनी चार भाणांचे एकत्रित संपादन केलेले आहे. ते चार भाण म्हणजे (१) वररुचीचे उभयाभिसारिका (२) शूद्रक - पद्मप्राभृतिक (३) ईश्वरदत्त - धूर्तविटसंवाद (४) शामीलक - पादताडितक. या चारही भाणांची रचना त्यांच्या मते इ.स.च्या पाचव्या शतकापूर्वी झालेली आहे. सदर भाणांमध्ये वेश्या-वस्तीचे वातावरण आहे. उत्तान शृंगार, रांगडी भाषा, अश्लीलता व उथळपणा सर्वत्र भरलेला आहे. त्यामुळे शिष्ट संस्कृत साहित्यशास्त्रात या भाणांचा उल्लेख आला नसावा. श्री. आनंद साधले यांनी या चार भाणांचे 'चतुर्भाणी - बावन्नखणी' या नावाने सरस भाषांतर केले आहे व त्यास प्रा. नरहर कुरुंदकरांची चिकित्सक प्रस्तावना आहे.

**(६) समवकार :** समवकारात तीन अंक असतात. विमर्श सोडून बाकीचे चार संधी असतात. कथानक देवासुरांच्या आख्यानावर आधारलेले असते. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे बारा नायक असतात व त्यांना मिळणारी फळेही वेगवेगळी असतात. यात वीररसास प्राधान्य असते. भासाच्या 'पंचरात्र' या रूपकास ही लक्षणे बहुतांशी लागू होतात.

हा शब्द सम् + अव + कृ (८ उ.प.) यापासून बनलेला आहे. मुख्य म्हणजे यात शत्रूने आक्रमण केल्यामुळे नगरजन भयभीत होऊन पळून गेल्याचे वर्णन असते. आक्रमणाप्रमाणे आग लागणे किंवा पूर येणे हीही भयाची कारणे असतात. 'साहित्यदर्पणात' समवकाराचे उदाहरण म्हणून 'समुद्रमन्थना'चा उल्लेख केला आहे. वत्सराजाचे 'समुद्रमंथन' नामक रूपक उपलब्ध आहे.

**(७) वीथी :** यात एकच अंक असून शृंगाररसास प्राधान्य असते. मुख व निर्वहण असे दोनच संधी असतात. अभिनवगुप्त सांगतो की, वीथी ही

सर्वरसप्रधान असून संक्षिप्त असते. वीथी म्हणजे पंक्ती किंवा मार्ग होय. यात आकाशभाषितांचा उपयोग केलेला असतो. 'भावप्रकाशात बकुलवीथी व इंदुलेखा ही वीथीची उदाहरणे दिली आहेत. तर साहित्यदर्पणात 'मालविका' नामक वीथीचा उल्लेख केला आहे. मालती-माधवाच्या पहिल्या अंकास 'बकुलवीथी' असे नाव असल्याचा डॉ. कीथ यांनी उल्लेख केला आहे.

**(८) प्रहसन :** धनंजयाने प्रहसनाचे शुद्ध, वैकृत व संकर असे तीन प्रकार सांगितले आहेत. 'शुद्ध' या प्रकाराच्या प्रहसनात बौद्ध, जैन, ब्राह्मण, चेट, चेटी, विट या पात्रांचा भरणा असतो. विशेष म्हणजे यात हास्यरसाला प्राधान्य असते. 'वैकृत' प्रकारच्या प्रहसनात कामी पुरुष, दूत, कंचुकी, नपुंसक व तपस्वी यांसारखी पात्रे असतात. 'संकीर्ण' या प्रकारात धूर्तांचा भरणा असतो. 'साहित्यदर्पणा'मध्ये शुद्ध प्रहसनाचे उदाहरण म्हणून 'कंदर्पकेली'चा उल्लेख केला आहे. तर संकीर्ण या प्रकाराची 'लटक-मेलक' व 'धूर्त-चरित' ही उदाहरणे दिली आहेत. महेंद्र विक्रमाचे (इ.स.६५०) 'मत्तविलास' हे संस्कृत वाङ्मयातील उत्तम प्रहसन आहे.

प्रख्यात फ्रेंच नाटककार मोलिअर (इ.स.१६२२ ते १६७२) हा 'प्रहसनकार' म्हणूनच प्रसिद्ध आहे. त्याची 'अल् बूर्ज्वा जांतिल आम' (मराठी रूपांतर- रावबहादूर पर्वत्या) 'ल मेदिसी माल्ग्रे लुई' (मारून मुटकून वैद्यबोवा - अनु. हरिभाऊ आपटे), 'ल तार्त्यू फ (अनु. शांता वैद्य), दाँ जुआँ (न भयं न लज्जा - अनुवादक - माधुरी पुरंदरे) ही उत्कृष्ट प्रहसने जगप्रसिद्ध आहेत. श्री. रा.ग.गडकऱ्यांचे 'वेड्यांचा बाजार' हे नाटक प्रहसनातच मोडणारे आहे. देवलांचे 'संशयकल्लोळ' व आचार्य अत्र्यांचे 'कवडीचुंबक' ही विनोदरम्य नाटके ही मोलियरच्या 'गानारेल' व 'लाव्हार' या प्रहसनांची स्वैर रूपांतरे आहेत. असो. प्रहसनांचा विषय म्हणजे दुष्ट किंवा चमत्कारिक पुरुषाचे निंद्य कृत्य सांगणे हा असतो. त्यातूनच त्याची टिंगल केली जाते.

**(९) डिम :** या नाट्यप्रकारात चार अंक असून रौद्र रसास प्राधान्य असते. विष्कंभक आणि प्रवेशक यांचा अभाव असतो. विविध प्रकारचे सोळा नायक असतात. भरतमुनींनी 'त्रिपुरदाह' नामक डिमाचा उल्लेख केला आहे. वत्सराजानेही 'त्रिपुरदाह' नामक चार अंकी नाटक लिहिले आहे. यात शंकराने त्रिपुरासुरांच्या नगरींचे दहन केल्याची कथा आहे. हे नाटकही डिमाचे उदाहरण म्हणून मानता येईल. अभिनवगुप्ताने डिम, डिम्ब व विद्रव अशी नावे सांगितली

आहेत. 'साहित्यदर्पणा'त 'त्रिपुरदाह' हेच डिमाचे उदाहरण मानले आहे. शारदातनयाने 'वृत्रोद्धरण' व 'तारकोद्धरण' अशी डिमाची दोन उदाहरणे दिली आहेत. याव्यतिरिक्त घन:शाम वेंकटवरदाचे 'कृष्णविजय' व रामाचे 'मन्मथोन्मथन' असे काही डिम लिहिण्यात आले आहेत.

**(१०) ईहामृग :** या नाट्यप्रकाराच्या स्वरूपाबद्दल मतभेद आहेत. विश्वनाथ सांगतो की याची कथा मिश्रित म्हणजे थोडी ऐतिहासिक व थोडी कल्पित अशी असते. यात चार अंक असून मुख, प्रतिमुख व निर्वहण असे तीनच संधी असतात. यातील नायक व प्रतिनायक हे दोघेही धीरोद्धत पुरुष असतात. प्रतिनायक हा एखाद्या दिव्य स्त्रीचे अपहरण करतो व तिच्याशी बळजबरीने शृंगार करू पाहतो. नायक त्याच्यावर आक्रमण करतो पण काही तरी निमित्त होऊन युद्ध होत नाही. 'साहित्यदर्पणात' 'कुसुम शेखर विजयादि:' हे रूपक ईहामृगाचे उदाहरण म्हणून दिले आहे. 'ईहा-मृग' या शब्दात ईहा आणि मृग असे दोन शब्द आहेत. अप्राप्य गोष्टीच्या म्हणजे स्त्रीच्या प्राप्तीचा प्रयत्न हा याचा अर्थ असावा.

रूपकाच्या या प्रकाराप्रमाणे उपरूपकाचेही प्रकार संभवतात. उपरूपक हा थोडा गौण प्रकार आहे. याचे नाटिका, त्रोटक, सदृक इत्यादी अठरा प्रकार साहित्यदर्पणात सांगितलेले आहेत. यापैकी वर दिलेल्या तीन प्रकारांचे स्वरूप याप्रमाणे -

**(१) नाटिका :** नाटिकेचे कथानक कविकल्पित असते. यात स्त्रियांची संख्या अधिक असते. हिचा नायक धीरललित प्रकृतीचा राजा असतो. त्याच्या अंत:पुरात आलेली नवीन कन्या ही नायिका असते. राजा तिच्याशी चोरट्या प्रेमाचे खेळ खेळतो. राणीला प्रथम त्यांच्यातील प्रेमाची कल्पना नसते. पण संशय आल्यावर ती विरोध करते. श्रीहर्षाची प्रियदर्शिका व रत्नावली, राजशेखराची विद्धशालभंजिका, विल्हणाची कर्णसुंदरी, मधुरादासाची वृषभानुजा या नाटिका आहेत. या सर्वावर कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रा'ची छाप पडलेली आहे.

**(२) त्रोटक :** यात पाच, सात, आठ किंवा नऊ अंक असतात. याचे वैशिष्ट्य म्हणजे यातील प्रत्येक अंकात विदूषकाची उपस्थिती असते. त्रोटकातील इतर सर्व वातावरण नाटिकेचे असते. कालिदासाचे 'विक्रमोर्वशीय' हे याचे उत्तम उदाहरण आहे.

**(३) सट्टक :** याची सर्व रचना व मांडणी नाटिकेप्रमाणे असते पण हे पूर्ण प्राकृत भाषेत असते. यात विष्कंभक वा प्रवेशक यांचा अभाव असतो. अंकांना जवनिका असे नाव असते. राजशेखराचे 'कप्पूर मज्जरी' हे सट्टकाचे उत्तम उदाहरण आहे. सट्टकाची रचना राजशेखरानेच केली असावी. घन:शामाची 'आनन्दमज्जरी' मार्कंडेयाची 'विलासवती' व विश्वेश्वराची 'शृंगारमज्जरी' अशी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी सट्टके उपलब्ध आहेत. सट्टकाच्या एकंदर स्वरूपावरून त्याचे लोकनाट्याशी साम्य असलेले दिसून येते.

* * *

नाटकांचे नाटक-प्रकरणादी रूढ प्रकाराच्या आधारे केलेले वर्गीकरण अथवा अंकाच्या संख्येवरून किंवा पौराणिक, ऐतिहासिक अशा स्थूल विभागणीच्या आधारे केलेले वर्गीकरण हे नाटकांच्या सूक्ष्म अभ्यासास उपयोगी पडत नाही. यावर तोड म्हणून डॉ. गो. के. भटांनी विषयांच्या आधारे पाच किंवा सहा प्रकारात त्यांचे आधुनिक वर्गीकरण केले आहे, ते अधिक समंजस आहे.

**(१) प्रणयप्रधान सुखात्म नाटके** - राजा हाच समाजाचा नेता असल्यामुळे अथवा नाटककार राजदरबारी आश्रयाला असल्यामुळे राजा हाच बहुधा नाटकाचा नायक असे. त्याच्या अंत:पुरातील प्रेमप्रकरणावर आधारलेली अनेक नाटके संस्कृत वाङ्मयात आढळतात. कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र' हे या प्रकारचे पहिले नाटक होय. याचेच प्राय: अनुकरण करून श्रीहर्षाच्या प्रियदर्शिका व रत्नावली या दोन नाटिका, विल्हणाची कर्णसुंदरी, राजशेखराची विद्धशालभंजिका व कर्पूरमंजरी हे प्राकृत सट्टक यांची रचना करण्यात आली आहे.

अशा या हलक्या-फुलक्या प्रणयप्रधान नाटकांची दोन वैशिष्ट्ये या ठिकाणी नमूद करावयाची आहेत (१) राजाचे सौजन्य (२) अंत:पुरात आलेल्या तरुण मुलीच्या रहस्याचा उलगडा.

राजा अंत:पुरात आलेल्या तरुणीशी प्रेमचाळे करतो व थोरली राणी त्यांच्या प्रेमास विरोध करते. तसे पाहिले तर राणीच्या विरोधाला काय अर्थ होता? एक तर राजा सर्वसत्ताधारी होता त्यामुळे त्याच्या इच्छेविरुद्ध कोणी जाऊ शकत नव्हते. दुसरे म्हणजे बहुपत्नीकत्वाची चाल असल्याने राजाने नवी बायको केली तर गैर काही नव्हते. पण राजाच्या ठिकाणी सौजन्य व स्त्रीदाक्षिण्य दर्शवून नाटककारांनी कथावस्तूत रंग भरला आहे. राजा आपले प्रेम राणीपासून लपवू

पाहतो, प्रेम करताना सापडला तर तो तिची क्षमा मागतो, ती फारच रागावली असल्यास तिच्या पायावर डोके टेकवतो; पण आपला अधिकार कधीही गाजवत नाही.

अखेरीस काही तरी निमित्ताने राण्या आपला विरोध मागे घेतात व राजाचा मार्ग मोकळा होतो. या कामी नायिकेच्या सख्या, विदूषक व इतर मंडळी राजाला मदत करतात. विदूषक राजाची जी थट्टा करतो त्याला तोड नाही. त्याचे मार्मिक विनोद हे राजाच्या स्त्रीलंपटपणावर ओढलेले ताशेरेच आहेत.

आता अंत:पुरात नव्याने आलेली तरुण मुलगी कोण आहे व ती तेथे कशी आली यासंबंधीचे रहस्य शेवटपर्यंत उलगडत नाही. ती राजकन्या आहे व विपरीत परिस्थितीमुळे किंवा काही काळापर्यंत भोगाव्या लागणाऱ्या शापामुळे ती दासी बनली आहे. अर्थात ती तरुण आणि सुंदर असल्यामुळेच राजाच्या प्रेमाचा विषय झालेली आहे. तिच्या रहस्याशी राजाच्या प्रेमाचा काहीही संबंध नाही. मग ती राजघराण्यातील मुलगी आहे हे सांगण्याची नाटककाराला का गरज भासावी, हा विचारणीय प्रश्न आहे.

राजाचे नायिकेवरील प्रेम हे चार घटका मौज करण्यासारखे उथळ व हिणकस नाही, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. राजा जेव्हा एखाद्या अनोळखी नव्या स्त्रीच्या प्रेमात पडतो तेव्हा तिला प्राप्त करून घेणे, तिच्याशी विवाह करणे हेच त्याचे उद्दिष्ट असते. अगदी गणिकेवर प्रेम करणारा चारुदत्तदेखील तिला विवाह करून घरात आणतो. आता राजा ज्या स्त्रीशी विवाह करणार तिचे कुळ-शील प्रारंभी जरी अज्ञात असले तरी ती थोर कुळातील आहे, हे दर्शविणे क्रमप्राप्त होते, तत्कालीन वर्णाश्रमधर्माच्या रक्षणासाठी ते आवश्यकही होते. ती स्त्री अंत:पुरात दाखल होण्याची काही निमित्ते दाखवून राजाची निवड ही यथोचित आहे, हे सांगण्याचे त्यांनी श्रेय मिळवले आहे. असो. कालिदासाचे मालविकाग्निमित्र हे या प्रकारचे पहिले नाटक आहे. नंतरची वर उल्लेखलेली नाटके ही त्याची सही सही अनुकरणे आहेत.

**(२) वास्तववादी प्रणयप्रधान नाटके** - राजा किंवा राजपुत्र यांना नायक म्हणून सर्वत्र चित्रित केले जात असे. अशा स्थितीत सामान्य पुरुषास नायक बनविण्याचे प्रयत्न झालेले आहेत. भासाचे अविमारक व चारुदत्त, शूद्रकाचे मृच्छकटिक व भवभूतीचे मालती-माधव ही याची उदाहरणे म्हणून सांगता येतील. अविमारक हा मूळचा राजपुत्र असला तरी शापामुळे चांडाळ वस्तीत

राहणारा सामान्य तरुण आहे. चारुदत्त हा विवाहित व्यापारी आहे, तर माधव हा अमात्यांचा मुलगा आहे.

कुरंगी ही राजकन्या, तिला हत्तीच्या तावडीतून सोडवणाऱ्या अविमारकावर लुब्ध झालेली आहे. 'चारुदत्त' तसेच मृच्छकटिकाची नायिका वसंतसेना ही गणिका आहे. मालती व माधव हे परस्परावर अनुरक्त आहेत.

यांच्या मीलनात येणारे अडथळेही वेगवेगळे आहेत. अविमारक हा शापाच्या अंमलाखाली असल्याने चांडाळत्व हे त्याच्या विवाहाच्या आड आले आहे. मृच्छकटिकामध्ये शकार हा राजश्यालक वसंतसेनेवर लुब्ध आहे व तो त्या दोघांच्या मार्गातील अडसर आहे. 'मालती-माधवा'त मालतीच्या बापाने, मुलीचे लग्न राजाचा नर्मसचिव नंदन याच्याशी ठरवले आहे. मृच्छकटिक व मालती-माधव या दोन्ही नाटकांत नायक-नायिकांचे मीलन झाल्यानंतर आकस्मिक संकट येऊन त्यांची ताटातूट झालेली आहे. सारांश, या सामाजिक नाटकातला संघर्ष व्यापक असल्याने कथावस्तूतही विविधता आली आहे.

यातील 'चारुदत्त' हे चार अंकापर्यंतच उपलब्ध आहे. अविमारकाची कथा एकेरी आहे. म्हणजे तिला उपकथानकाची जोड नाही. त्यामुळे ही दोन्ही नाटके आहेत. मृच्छकटिक व मालती-माधव ही दोन्ही प्रकरणे आहेत. दुर्दैवाने सामाजिक नाटकांचा हा बंध प्रकरणापुरता मर्यादित राहिला व प्रकरणे ही हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच अस्तित्वात आली.

**(३) पुनर्मीलनाची नाटके** - वर दर्शविलेल्या दोन्ही प्रकारातील नाटके ही सुखात्म आहेत. म्हणजे त्यातील वातावरण आनंदी तसेच खेळकर आहे. त्यात संकटे आलेली नाहीत असे नाही. मालतीचे दोन वेळा अपहरण झालेले असून ती मरता मरता वाचलेली आहे. मृच्छकटिकातील वसंतसेनेवरही प्राणघातक हल्ला झालेला आहे. पण ही संकटे आली तरी थोड्या काळाने दूर झालेली आहेत. पण आता जो प्रकार आपण पाहणार आहोत त्यातील नाटके ही गंभीर स्वरूपाची आहेत.

भासाचे स्वप्नवासवदत्त, कालिदासाची विक्रमोर्वशीय व अभिज्ञान शाकुंतल व भवभूतीचे उत्तररामचरित ही नाटके या प्रकारात मोडतात. या नाटकांचे वैशिष्ट्य म्हणजे यातील नायक-नायिकांची ताटातूट ही मीलनानंतर झालेली आहे. वासवदत्ता व सीता यांचे विवाह नाटक सुरू होण्यापूर्वी झालेले आहेत. पुरुरवा व उर्वशी आणि दुष्यंत व शकुंतला यांचे मीलन नाटकाच्या मध्यावर झालेले आहे. त्यानंतर त्यांची ताटातूट झालेली आहे.

मात्र नायक-नायिकांच्या ताटातुटीची कारणे वेगवेगळी आहेत. उदयनाचे गेलेले राज्य परत मिळविण्यासाठी वासवदत्ता यौगंधरायणाच्या कटात सामील होते. ती जळून मेली अशी खोटीच बातमी उठवण्यात येते. उत्तररामचरितात सीता रावणाच्या घरी राहिली म्हणून लोकात तिच्या चारित्र्याविषयी चर्चा होऊ लागते. त्यामुळे प्रजाहितदक्ष राम तिचा त्याग करतो. विक्रमोर्वशीय व शाकुंतल या दोन्ही नाटकांत शापामुळे दोघांची ताटातूट होते. वर पाहिल्याप्रमाणे मालती-माधव व मृच्छकटिक या दोन्ही प्रकरणातही मीलनानंतर ताटातूट झालेली आहे. त्यामुळे त्यांचाही या प्रकारात समावेश करण्यास हरकत नाही.

या प्रकारच्या नाटकात ओढवलेली संकटे साधीसुधी नाहीत. ती त्यांच्या प्राणाशी बेतणारी आहेत. शिवाय त्यांचा कालावधीही जास्त आहे. उत्तर रामचरितात त्यांच्या विरहाचा कालावधी बारा वर्षांचा आहे. शाकुंतलात तो सहा वर्षांचा आहे. वासवदत्तेला फार काळ विरह सोसावा लागलेला नाही. पण तिला उदयनाचे पद्मावतीशी झालेले लग्न पाहावे लागते. मालती-माधव व मृच्छकटिक यातील विरहाचा प्रत्यक्ष काळ त्या मानाने थोडा असला तरी तो भयावह आहे. कारण मालती व वसंतसेना या दोघी मृत्यूच्या तावडीतून कशाबशा वाचलेल्या आहेत. सारांश, या नाटकातील दुःखाचे प्रसंग गडद आहेत. त्यातून ही पात्रे तावून सुलाखून बाहेर पडलेली आहेत. केवळ त्यांचे नशीब बलवत्तर म्हणूनच त्यांचे अखेरीस मीलन झालेले आहे. शोकात्मिकेशी नाते सांगणाऱ्या या गंभीर नाटकांचा दर्जा फार मोठा आहे, हे सांगायला नको. या संदर्भात डॉ. भट लिहितात -

"संस्कृत नाट्यसृष्टीतल्या महान नाटकांचा उल्लेख करताना या चार नाटकांचे नाव आपल्याला घ्यावे लागेल. हे लक्षात घेतले म्हणजे या पुनर्मीलनाच्या नाटकांनी कलेची केवढी उंची व जीवनानुभवाची केवढी खोली गाठली आहे याची कल्पना येईल."

- (संस्कृत नाट्यसृष्टी - पृष्ठ ८१)

**(४) चरित्रात्मक नाटके** - साधारण दर्जा असलेल्या या प्रकारच्या नाटकांची संख्या मुबलक आहे. वीरांचे चरित्र गाणे हाच यातील उद्देश आहे. हा उद्देश स्तुत्य असला तरी चरित्रामागे नाट्य फरफटत गेले आहे, हे नाकारता येत नाही. अश्वघोषाचे शारीपुत्रप्रकरण, भासाचे अभिषेक व बालचरित, भवभूतीचे महावीरचरित, राजशेखराचे बालरामायण व बालभारत (किंवा प्रचंड

पांडव) मुरारीचे अनर्घराघव, जयदेवाचे प्रसन्नराघव, दामोदर मिश्र अथवा मधुसूदनाचे 'हनुमन्नाटक' ही या प्रकारात मोडणारी नाटके आहेत. लेखकांचा भर रामाच्या चरित्रावर विशेष आहे. चरित्र-नायकाच्या जीवनातले महत्त्वाचे प्रसंग एकापुढे एक असे मांडण्यापलीकडे या नाटकात विशेष काही सापडणार नाही.

भासाचे 'मध्यम-व्यायोग' हे एकांकी नाटक, उदयनाच्या चरित्रावर आधारलेले प्रतिज्ञा-यौगंधरायण हे नाटक अथवा शृंगार व वीर हे दोन्ही रस असलेले श्रीहर्षाचे नागानंद नाटक हीही वीररसात्मक नाटकांच्या सदरात येणारी आहेत. भासाच्या 'पंचरात्र' व 'प्रतिमा' या दोन नाटकांची रचना थोडी निराळी आहे. त्यात केवळ चरित्राऐवजी रचनेचे स्वातंत्र्य घेतलेले आहे. 'पंचरात्रा'त भासाने महाभारतातील कथाच बदलली आहे. 'प्रतिमा' नाटकात कैकेयीच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा दिलेला आहे. त्या दृष्टीने जरी ही नाटके वेगळी वाटली तरी त्यांना 'वीररसात्मक' म्हणायला हरकत नाही. मात्र ती चरित्रात्मक नाहीत. भट्ट नारायणाचे 'वेणीसंहार' हे चरित्रात्मक असले तरी त्यानेही रचनेचे स्वातंत्र्य घेतलेले आहे.

**(५) राजकारणावर आधारलेली नाटके** - राजकारण हाच संपूर्ण विषय असलेले एकच नाटक संस्कृत वाङ्मयात आहे, ते म्हणजे विशाखदत्ताचे 'मुद्राराक्षस' होय. यात शृंगाररसास संपूर्ण फाटा दिलेला आहे. सर्व नाटकात एकच स्त्रीपात्र आहे व तेही गौण आहे. चंदनदास व्यापाऱ्याच्या पत्नीचे नाटकाच्या शेवटच्या अंकात थोडा वेळ आगमन होते. वीररसासही येथे गौण स्थान मिळाले आहे. सारे नाटक राजकारण व राजकीय डावपेच, कटकारस्थाने यांनीच भरलेले आहे. असे असूनही ते यत्किंचितही रटाळ अथवा कंटाळवाणे झालेले नाही.

भासाच्या 'दूतवाक्य' व 'दूत-घटोत्कच' या दोन्ही एकांकिका अनुक्रमे कृष्णाच्या व घटोत्कचाच्या शिष्टाई प्रसंगावर आधारलेल्या आहेत. यांपैकी 'कृष्णशिष्टाई'ला महाभारताचा आधार आहे. घटोत्कचाची शिष्टाई मात्र नाटककाराच्या कल्पनेतून उद्भवलेली आहे. या दोन्ही एकांकिका राजकारण, चर्चा, प्रश्नोत्तरे यांनी व्यापलेल्या आहेत.

**(६) रूपकात्मक नाटके** - धर्माचा अथवा तात्त्विक विचाराचा प्रचार करण्याच्या उद्देशाने क्वचित रूपकात्मक रचना करण्यात येते. अकराव्या शतकात

होऊन गेलेल्या कृष्णमिश्र या नाटककाराचे 'प्रबोध चंद्रोदय' हे याचे एकमेव असे उत्कृष्ट उदाहरण आहे. यातील पात्रांची नावेही विषयाला धरून आहेत. पुरुष आणि माया या जोडप्यास मनस हा पुत्र झाला. मनसला मोह व विवेक अशी दोन मुले झाली.

अशा प्रकारे तत्त्वविचाराला प्राधान्य देणारी नाटके संस्कृत वाङ्मयात मुळीच आढळत नाहीत. अश्वघोषाने अशा प्रकारचे नाटक लिहिले असावे असे म्हणतात. त्याच्या त्रुटित रूपकात कीर्ती, धृती व बुद्धी अशी नावे आहेत. नवव्या शतकात होऊन गेलेल्या जयंत या नैयायिकाने 'आगमडम्बर' नावाचे रूपकात्मक नाटक लिहिले आहे पण ते अद्याप प्रकाशित झालेले नाही.

हास्यरसाला प्राधान्य देऊन भाण व प्रहसने रचण्यात आली. भाणापेक्षा प्रहसनात हास्याला अधिक अवसर आहे. यांची रचना दहाव्या अकराव्या शतकात झाली आहे. महेंद्र विक्रमाचे मत्तविलसित व भगवदज्जुकीय ही प्रहसने यापेक्षा अगोदर लिहिलेली आहेत. दुसऱ्या प्रहसनात यमदूताच्या चुकीमुळे योग्याचा आत्मा वेश्येच्या शरीरात व तिचा आत्मा योग्याच्या शरीरात ठेवला जातो. त्यामुळे जो गोंधळ उडतो त्याला तोड नाही.


प्रहसनात सामाजिक व्यंगांचा उपहास अपेक्षित होता पण त्याऐवजी त्यात ग्राम्य व अश्लील गोष्टी शिरल्या. त्यामुळे त्यांची सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात आली. मराठीत तमाशा ज्याप्रमाणे ग्रामीण लोकांच्या पुरता मर्यादित राहिला तीच तऱ्हा प्रहसन व भाण यांची झाली.

* * *

अशा प्रकारे संस्कृत नाटकाचे सर्वसाधारण स्वरूप अवलोकन केल्यानंतर आता नाटकाचा प्रत्यक्ष प्रयोग जेथे सादर केला जातो, त्या नाट्यगृहाची म्हणजे रंगमंच, नेपथ्यगृह व प्रेक्षागार यांची थोडक्यात माहिती घेणे अगत्याचे ठरेल.

भरतमुनीच्या नाट्यशास्त्रात (१) विकृष्ट (२) चतुरस्र व (३) त्रस्त अशी तीन प्रकारची नाट्यगृहे सांगितली आहेत. या तीन प्रकारांचे पुन्हा प्रत्येकी ज्येष्ठ, मध्यम आणि कनिष्ठ असे तीन प्रकार केले आहेत. नाटक, प्रकरण, नाटिका सादर करण्यास फार मोठी नाट्यगृहे लागत नाहीत. तेव्हा यातील पहिल्या म्हणजे विकृष्ट या प्रकारच्या तसेच मध्यम आकाराच्या नाट्यगृहाचे स्वरूप खाली स्पष्ट दिले आहे.

विकृष्ट नाट्यगृह (मध्यम)




वर दर्शविलेल्या 'विकृष्ट' या प्रकारच्या नाट्यगृहाची पूर्व-पश्चिम लांबी चौसष्ट हात तर दक्षिणोत्तर लांबी बत्तीस होती. म्हणजे हे आयताकृती होते. याच्या पश्चिमेकडील अर्ध्या भागात नेपथ्यगृह (३२ x १६) होते. याच्या पुढच्या समोरच्या ८ x ३२ या चौकोनाच्या मध्यावर रंगशीर्ष (८ x ८) होते. याच्या दोन्ही बाजूस असलेली (प्रत्येकी १२ x ८) जागा रिकामी होती.

रंगशीर्षाच्या समोर पूर्व दिशेस ८ x ३२ या तेवढ्याच आयताकृती भागात बरोबर मध्यावर १६ x ८ इतक्या क्षेत्रफळाचे इ. रंगपीठ असे व त्याच्या दोन्ही

बाजूस असणाऱ्या ८ x ८ या चौरसांना मत्तवारणी अशी संज्ञा होती. रंगपीठासमोरील ३२ x ४' एवढी जागा मोकळी ठेवण्यात येत होती.

रंगपीठापासून चार हात अंतरावर प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था असे. हे प्रेक्षागृह ३२ X २८ असे किंचित आयताकृती होते. बसण्याची व्यवस्था उतरत्या पद्धतीने केलेली होती. म्हणजे पुढच्या भागापासून मागील प्रवेशद्वारापर्यंत चढ असून त्याची उंची सुमारे दीड हात होती. प्रेक्षागृहात अगदी पहिल्या रांगेत प्राश्निक म्हणजे परीक्षक व नाटकाच्या गुणदोषांचे टिपण करणारे लेखक बसत.

नेपथ्यगृह व रंगशीर्ष यांच्यामध्ये भिंत होती. तिच्यात रंगशीर्षाच्या दोन्ही बाजूला दरवाजे होते. या भिंतीजवळ गायक व वादक यांची बसण्याची व्यवस्था होती. रंगशीर्षाच्या उत्तर व दक्षिण दिशांना असणाऱ्या भिंतीतही एकेक दरवाजे होते. नेपथ्यगृहातून वेषभूषा करून पात्रे रंगशीर्षाच्या डाव्या अथवा उजव्या बाजूच्या दरवाजातून प्रवेश करीत असत. रंगशीर्षाचा भाग हा नेपथ्यगृह व रंगपीठ यांच्या पेक्षा उंच होता. रंगशीर्षाच्या दोन्ही बाजूंच्या रिकाम्या जागांचा उपयोग पात्रांना विश्रांती घेता यावी व प्रवेश करण्यापूर्वी ती कोणाच्या नजरेस पडू नयेत यासाठी होता. प्रेक्षागृहाच्या पूर्वेकडील भिंतीत प्रेक्षकांना प्रेक्षागृहात प्रवेश करण्यासाठी एक दरवाजा होता. याप्रमाणे नाट्यगृहात एकंदर पाच दरवाजे होते.

यातील मत्तवारणी या शब्दाचा अर्थ स्पष्ट नाही. प्रो. भानूंनी आपल्या नाट्यशास्त्राच्या मराठी भाषांतरात 'उन्मत्त लोकांस येऊ न देणारे कुंपण' असा अर्थ दिला आहे. तर गोदावरीबाई केतकरांनी 'पण अभिनवगुप्ताच्या नाट्यविवृत्तीवरून पीठाच्या दोन्ही बाजूस चार खांबांवर उभारलेला लहान मनोरा हा अर्थच बरोबर वाटतो.' असे स्पष्ट उद्गार काढले आहेत. याचे इतर काही विद्वानांनी केलेले अर्थ याप्रमाणे -

(१) डॉ. शहा व डॉ. संदेसारा यांनी जैन वाङ्मयातील वर्णनांच्या आधारे 'मत्तवारण' याचा अर्थ वाड्यातील गच्ची किंवा झरोका असा अर्थ दिला आहे. स्त्रिया यामध्ये बसून रस्त्यावरील दृश्ये पाहात असत.

(२) डॉ. दिवेकरांच्या मते मत्तवारणी म्हणजे हत्तींची झुंज दाखविण्यासाठी उभा केलेला मंडप. नाट्यगृहातील रंगपीठाच्या दोन्ही बाजूच्या कक्षांना तीच संज्ञा योजली आहे.

(३) डॉ. सुब्बाराव यांनी मत्तवारणी म्हणजे मदोन्मत्त हत्तींची रांग असा अर्थ केलेला आहे.

(४) डॉ. पी.एस. शास्त्री यांच्या मते हत्तीच्या विशाल आकृती स्तंभाच्या पीठावर होत्या म्हणून त्या भागाला मत्तवारणी असे म्हटले आहे.

(५) म.म. डॉ. वा. वि. मिराशी यांनी आपल्या 'मत्तवारणी' या स्वतंत्र लेखात 'मत्तानां वारणी मत्तवारणी कक्षा !' असा अर्थ दिला आहे. मत्त म्हणजे बेभान झालेले राक्षस वगैरे. यावरून रंगमंडपाच्या किंवा प्रेक्षागृहाच्या संरक्षणाची ही योजना असावी. ते लिहितात - "रंगपीठाच्या दोन बाजूंनी मदोन्मत्त राक्षसांचा हल्ला होण्याचा संभव होता. त्यांचे निवारण करण्यासाठी त्या दोन बाजूंच्या मत्तवारण्या आरंभी विवक्षित असाव्या. त्या प्रयोजनाला अनुसरून त्या कक्षांची नावे पडली असावी." (संशो. मुक्तावली सर ६ पृष्ठ १०१). तसेच त्यांच्या मते मत्तवारणी व मत्तवारण हे दोन शब्द भिन्न आहेत. नाट्यशास्त्रातील 'मत्तवारणी'चा हत्तीशी काहीही संबंध नाही.

'मत्तवारणी' या शब्दाच्या अर्थाप्रमाणेच मत्तवारणी नेमकी कोठे होती याविषयी वेगवेगळी मते आहेत. अभिनवगुप्ताच्या मते या मत्तवारण्या प्रेक्षागृहाच्या बाहेर दोन्ही बाजूस होत्या. त्या १६ x ८ अशा आयताकृती अथवा ८ x ८ अशा चौरसाकृती असाव्यात. जिज्ञासूंनी रंगभूमीच्या इतर आकृत्यांसाठी व अधिक माहितीसाठी डॉ. भटांचे 'भरतनाट्य मंजरी' (प्रस्तावना) हे इंग्रजी पुस्तक पाहावे.

संस्कृत नाटकाचे स्वरूप स्थूलमानाने ध्यानात येण्यासाठी एवढी माहिती पुरेशी आहे.

# अश्वघोष

अश्वघोषाने स्वत:चा निर्देश 'साकेतक' व 'सुवर्णाक्षीपुत्र' असा केलेला आहे. हा मूळचा ब्राह्मण असून मागाहून बौद्ध झाला. चिनी प्रवाशांच्या वृत्तांतावरून कनिष्काने (इ.स.७८) मगधराजाचा पराभव करून अश्वघोषास पुरुषपुरास आणले व महास्थविर पार्श्व याने त्यास बौद्ध धर्माची दीक्षा दिली. कनिष्क हा कुशाण राजा इ.स.७८ च्या सुमारास होऊन गेल्याने साहजिकच अश्वघोषाचा काळ हा इसवी सनाचे पहिले शतक हा ठरतो.

याच्या नावावर 'सौंदरनन्द' व 'बुद्धचरित' अशी दोन महाकाव्ये. 'शारिपुत्रप्रकरण' हे नवांकी नाटक व इतर दोन रूपके आहेत. तसेच त्याने सूत्रालंकार नामक पुस्तक लिहिले होते ते अनुपलब्ध असले तरी त्याचा तिबेटी भाषेतील अनुवाद मिळाला आहे.

**शारिपुत्रप्रकरण :** यास ''शारद्वतीपुत्रप्रकरण' असेही नाव आहे. हे नवांकी नाटक प्रकरण आहे. यात गौतम बुद्धाने शारिपुत्र व मौद्गल्यायन यांचे मतपरिवर्तन केल्याची कथा आहे. ही कथा महावग्गातही आढळते. सदर नाटक प्रकरण हे अत्यंत त्रुटित स्वरूपात सापडले असल्याने याच्या संपूर्ण रचनेची कल्पना येत नाही. नाट्यशास्त्राच्या नियमानुसार याची मांडणी केलेली आहे. यातील शारिपुत्र हा ब्राह्मण नायक आहे. बुद्ध वगैरे उच्च पात्रे संस्कृतात बोलतात तर विदूषक हा प्राकृतात बोलतो. बुद्ध आणि शारिपुत्र यांचा अखेरचा संवाद लक्षणीय आहे. यात तात्त्विक चर्चा आहे व अखेरीस भरतवाक्य आहे. यावरून इसवी सनाच्या पहिल्या दुसऱ्या शतकात नाट्याची बरीच प्रगती झालेली दिसते.

या नाटक-प्रकरणासोबत दोन त्रुटित रूपके सापडली आहेत. मात्र ती अश्वघोषाची आहेत की नाही याविषयी मतभेद आहेत. यातले पहिले रूपक प्रतीकात्मक आहे. तात बुद्धी, कीर्ती, धृती नामक पात्रे आहेत. स्वत: बुद्धाचाही प्रवेश दर्शविला आहे. अशा प्रकारचे तात्त्विक चर्चा असलेले रूपक कृष्णमिश्राच्या 'प्रबोध चन्द्रोदय' या उत्तरकालीन रूपकाची आठवण करून देते. यातील सर्व पात्रे संस्कृतात बोलतात.

दुसरे रूपक 'मृच्छकटिका'शी साम्य दर्शविणारे आहे. याची नायिका मागधवती ही गणिका आहे. नायकाला 'नायक' असेच म्हटलेले आहे. विदूषकाचे नाव कोमुदगंध असे आहे शकाराशी नाते सांगणारे एक दुष्ट पात्रही आहे. डॉ. कीथ यांच्या मते तो राजपुत्र असावा. विदूषक खादाड आहे. तथापि याचा अत्यल्प भागच उपलब्ध असल्याने त्यांची मांडणी कशी केलेली आहे हे समजत नाही. यातील संस्कृत भाषा शुद्ध नाही. तिच्यात व्याकरणाचे दोष आहेत. यातील प्राकृत भाषा ही मागधीला जवळची आहे. संवाद गद्य व पद्यात आहेत.

# भास

'सूत्रधार कृतारम्भै र्नाटकैर्बहुभूमिकै:।
सपताकैर्यशो लेभे भासो देवकुलैरिव ॥'

- (हर्षचरित - १.१५)

या शब्दांत बाणभट्टाने गौरव केलेल्या भासाची नाट्यसंपदा या शतकाच्या प्रारंभापर्यंत उपलब्धच नव्हती. इ.स.१९१२ मध्ये म.म.श्री. गणपतिशास्त्री यांना त्रिवेंद्रम येथील प्राचीन हस्तलिखितांच्या संग्रहामध्ये ताडपत्रावर मल्याळी लिपीत लिहिलेली काही संस्कृत नाटके सापडली. त्यामध्ये ही नाटके कोणी रचली, याचा उल्लेख नव्हता. परंतु त्यात सापडलेले 'स्वप्नवासवदत्त' हे नाटक भासाने रचलेले आहे, हे ज्ञात असल्याने गणपतिशास्त्रींनी ही सर्व नाटके भासाचीच असली पाहिजेत असे समजून ही प्रसिद्ध केली आणि अभ्यासकांत एकच खळबळ उडाली.

या काळापर्यंत अभ्यासकांना भासाविषयी ढोबळ माहिती होती. 'भासाने अनेक नाटके रचली पण ती टीकाकारांनी आगीत टाकली. परंतु त्यात असलेल्या 'स्वप्नवासवदत्त' या नाटकास अग्नी जाळू शकला नाही' अशी आख्यायिका राजशेखर नावाच्या लेखकाने सांगितली होती. खुद्द कालिदासाने आपल्या 'मालविकाग्निमित्र' या पहिल्या नाटकाच्या प्रस्तावनेत भासाचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. बाणभट्टाने भासाच्या नाटकास... सूत्रधारापासून प्रारंभ होतो, ही माहिती दिली होती. वाक्पति राजाने आपल्या 'गौडवहो'या प्राकृत महाकाव्यात भासाचा 'ज्वलनमित्र' असा उल्लेख केला होता. हा उल्लेख कदाचित राजशेखराने सांगितलेल्या आख्यायिकांशी निगडित असावा. 'प्रसन्न राघव' या

नाटकाचा कर्ता असलेल्या जयदेव कवीने त्याला 'कवितारूपी कामिनीचा 'हास' असे म्हटले आहे. रामचंद्र, गुणचंद्र, शारदातनय व अभिनवगुप्त या साहित्य मीमांसकांनी भासाच्या स्वप्न नाटकाचा उल्लेख केला आहे. त्यातील अवतरणे दिली आहेत.

परंतु भासाची नाटके उपलब्ध झाल्याचा आनंद फार काळ टिकला नाही. 'ही मुळी भासाची मूळ नाटके नव्हेत.' असे प्रतिपादन करणारा एक वर्ग निर्माण झाला. म.म. डॉ. पां.वा.काणे, प्रो. सी. आर. देवधर, म.म. डॉ. वा.वि. मिराशी इत्यादी विद्वानांनी हा प्रश्न मांडला.

यांच्या मते ही नाटके भासाची नव्हेत. एक तर नाटककाराचे नाव कोणत्याही नाटकात दिलेले नाही. दुसरे म्हणजे कालिदास, श्रीहर्ष वगैरे नाटककारांच्या नाटकातील प्रसंगांशी यांचे साम्य आढळते. बाणभट्टाने भासाच्या नाटकाची म्हणून जी वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती या नाटकात क्वचितच आढळतात. नाट्यरचनेत विस्कळितपणा आहे. श्लोकरचना ओबड-धोबड आहे. 'चारुदत्त' नामक चार अंकी नाटकाचे मृच्छकटिकाशी आश्चर्यकारक साम्य आहे. नव्याने सापडलेले 'यज्ञफल' हे नाटक तर चक्क बनावट असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे ही नव्याने सापडलेली नाटके कालिदास - बाणादिकांनी गौरवलेल्या आद्य भासाची नसावीत, असे साहजिकच वाटते आणि म्हणूनच 'चारुदत्त' नाटकाच्या संदर्भात म.म.काणे यांनी काढलेले उद्गार तिखट असले तरी महत्त्वाचे आहेत -

''चारुदत्त या नाटकात फक्त चार अंक आहेत. यातील अनेक श्लोक - विशेषत: त्यातील नायक व सज्जलक (मृच्छकटिकातील शर्विलक) यांचे श्लोक शब्दश: मृच्छकटिकात सापडतात. चारुदत्तात संविधानक अगदी थोडे आहे. एकदम विदूषकाच्याच भाषणाने सुरुवात होते. असल्या भिकार चोपड्यावरून शूद्रकाने आपले अनेक बाबतीत हृदयंगम झालेले 'मृच्छकटिक' रचले असे पंडित गणपतिशास्त्री यांचे म्हणणे आहे. 'यत्ने कृते यदि न सिद्धति कोऽत्र दोष:।' हा भर्तृहरीचा प्रसिद्ध चरण अविमारक नाटकात (३/१२) येतो. (बाकीचे तीन चरण निराळे आहेत.) पंडित गणपतिशास्त्री म्हणणार की, कालिदास, अश्वघोष, भर्तृहरि, शूद्रक इत्यादी नामांकित ग्रंथकार चोर आहेत व त्या तेरा ग्रंथांचा कर्ता काय तो साव आणि सर्वात प्राचीन. 'आम्हाला तर याच्या विपरीत स्थिती वाटते.'

- (कवि भास आणि तद्रचित नाटके)

भास अथवा त्रिवेंद्रम येथे सापडलेल्या नाटकांचा कर्ता हा उचलेगिरी करणारा उत्तरकालीन लेखक आहे, हे म.म. काण्यांचे मत जरी अतिशयोक्त वाटले तरी याबाबत संशयाला निश्चितच जागा आहे. या मताचे मुख्य आधार याप्रमाणे सांगता येतील.

(१) भासाच्या नाटकातील अनेक अवतरणे प्राचीन ग्रंथात दिलेली आहेत; परंतु त्यापैकी एकही अवतरण अथवा श्लोक त्रिवेंद्रम येथील नाटकात आढळत नाही. उदा.-

(अ) 'नाटक लक्षण रत्नकोष' या ग्रंथात 'दरिद्र-चारुदत्त' या नाटकातील म्हणून पुढील श्लोक उद्धृत केला आहे.

''शुष्क द्रुमगतो रौति आदित्यादिमुखं स्थितः।
कथयत्यनिमित्तं मे वायसो ज्ञान पण्डितः॥

हा श्लोक त्रिवेंद्रम येथे सापडलेल्या 'चारुदत्त' या नाटकात सापडत नाही. मात्र हे नाटक संपूर्ण नाही. तेव्हा उर्वरीत भागात हा श्लोक असावा, असा तर्क करणे शक्य आहे. 'मृच्छकटिका'च्या नवव्या अंकात अशा धर्तीचे वर्णन आहे पण हा श्लोक नाही. 'मृच्छकटिक' व प्रस्तुतचे चारुदत्त या नाटकाखेरीज आणखी 'दरिद्र चारुदत्त' नामक नाटक असल्याचे ज्ञात नाही.

(ब) सुभाषितावली मध्ये भासाच्या नावावर पुढील श्लोक दिला आहे.

''बाला च सा विदित पञ्चशरप्रपञ्चा
तन्वी च सा स्तनभरोपचिताङ्गयष्टि ।
लज्जां समुद्वहति सा सुरतावसाने
हा, कापि सा किमिव किं कथयामि तस्याः॥''

- (सुभाषितावली)

हा श्लोक त्रिवेंद्रम येथे मिळालेल्या नाटकात मिळत नाही. डॉ. अ.द.पुसाळकरांच्या मते तो 'अविमारक' नाटकाच्या पाचव्या अंकात असावा. पण तो हस्तलिखित प्रत तयार करणाऱ्या लेखकाच्या चुकीमुळे गळाला असावा.

(क) रामचंद्र आणि गुणचंद्र यांच्या 'नाट्यदर्पण' या ग्रंथात 'यथा भासकृते स्वप्नवासवदत्ते शेफालिका शिलातलमवलोक्य वत्सराज...' इत्यादी मजकुरानंतर खालील श्लोक उद्धृत केला आहे.

''पादाक्रान्तानि पुष्पाणि सोष्मचेदं शिलातलम् ।
नूनं कांचिदिहासीना मां दृष्ट्वा सहसा गता ॥''

(नाट्यदर्पणः)

नव्याने मिळालेल्या 'स्वप्नवासवदत्त' नाटकात हाही श्लोक आढळत नाही. तथापि चौथ्या अंकातील प्रसंग ध्यानात घेतला तर तेथील श्लोक उतरून घ्यावयाचे राहिले असावे असे म्हणण्यास जागा आहे.

(ड) खालील श्लोक सुभाषित-मुक्तावली, सदुक्ति-कर्णामृत आणि शार्ङ्गधर पद्धती या सुभाषित संग्रहात भासाच्या नावावर दिला आहे.

''तीक्ष्णं रविस्तपति नीच इवाचिराढ्य:
शृङ्गं रुरुस्त्यजति मित्रमिवाकृतज्ञ:।
तोयं प्रसीदति मुनेरिव चित्तमन्त:
कामी दरिद्रमिव शोषमुपैति पङ्क:॥''

हाही श्लोक त्रिवेंद्रममध्ये सापडलेल्या नाटकात मिळत नाही. तथापि याची शैली व वर्णनाचे स्वरूप यावरून तो भासाचाच असावा असे मत डॉ. स्वरूप यांनी व्यक्त केले आहे.

(२) प्रा. चिं. रा. देवधर यांनी 'दूतघटोत्कच' व 'ऊरुभङ्ग' या नाटकात कृष्णास आठ भुजा असल्याचा जो उल्लेख आढळतो, त्याकडे लक्ष वेधलेले आहे. ही कल्पना संस्कृत साहित्यात इतरत्र आढळत नाही. 'पंचरात्र' संप्रदायास अनुसरून दक्षिणेत अष्टभुजा असलेल्या विष्णूची उपासना सुरू झाली. अशी मूर्ती कांजिवरम् येथे आहे. तसेच 'मध्यम-व्यायोग' व 'दूतवाक्य' या एकांकिकांच्या मंगलाचरणात विष्णूच्या वामनावतारात वर उचललेल्या पायाचे वर्णन आहे. त्याचे महाबलिपुरम येथील त्रिविक्रमाच्या मूर्तीशी साम्य आहे. दूतवाक्य व बालचरित या नाटकांत विष्णूची सुदर्शनादी आयुधे मनुष्य-रूपाने प्रवेश करतात. हे सारे पुरावे ध्यानात घेता ही नाटके बरीच उत्तरकालीन असावीत, असे एकंदर मत प्रा. देवधरांनी मांडले आहे.

ही नाटके आद्य भासाची नसावीत, असे मानणाऱ्या लोकांचे मत पाहिल्यानंतर 'ही नाटके आद्य भासाचीच आहेत' असे प्रतिपादन करणाऱ्या श्री. गणपती शास्त्री व त्यांचे अनुयायी यांचे म्हणणेही लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी मिळालेल्या नाटकातील समान वैशिष्ट्ये याप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

(१) सर्व नाटकांचा प्रारंभ 'नान्द्यन्ते तत: प्रविशति सूत्रधार:।' या ठराविक सूचनेने झालेला आहे. 'चारुदत्त' नाटक सोडल्यास सूत्रधारच मंगलाचरणाचा श्लोक म्हणतो. या श्लोकात नाटकातील पात्रांची नावे गुंफण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

(२) नाटकाच्या प्रस्तावास प्रस्तावना अथवा आमुख असे रूढ नाव न देता भासाने कर्णभार नाटक वगळता सर्वत्र 'स्थापना' असा शब्द योजला आहे. कर्णभार नाटकात मात्र 'प्रस्तावना' हा शब्द आढळतो. तसेच 'इमां सागर पर्यन्ताम्' हा श्लोक भरतवाक्य म्हणून बहुतेक नाटकाच्या अखेरीस आला आहे. यात हिमालय व विंध्यपर्वत यांच्या दरम्यान राज्य करणाऱ्या 'राजसिंहा' चा जयजयकार केला आहे.

(३) नाट्यविषय कोठूनही घेतलेला असला तरी त्याची मांडणी एका मध्यवर्ती सूत्राभोवती केलेली दिसते. अनेक नाटकात 'गेलेल्या राज्याची पुन्हा होणारी प्राप्ती' हा विषय आलेला दिसतो.

(४) कथावस्तूची मांडणी करताना भासाने मनमुराद स्वातंत्र्य घेतलेले आढळते. 'प्रतिमा' नाटकात त्याने रामायणातील अनेक प्रसंगांना मुरड घातलेली आहे. 'पंचरात्र' नाटकात दुर्योधन पांडवांना अर्धे राज्य द्यावयास तयार होतो, असे त्याने दाखवले आहे. रूढ अर्थाने दुष्ट मानलेली कंस, कैकेयी, दुर्योधन ही पात्रे भासाच्या प्रतिभेने उजळून निघाली आहेत.

(५) भरतमुनींनी घालून दिलेले रंगभूमीविषयक अनेक नियम भासाने झुगारून दिलेले आहेत. रंगभूमीवर युद्ध अथवा मृत्यू दाखवू नये असा नाट्यशास्त्राचा दंडक आहे. परंतु भासाने दशरथ (प्रतिमा), वाली (अभिषेक) व दुर्योधन (उरूभंग) यांचा मृत्यू दाखवला आहे. 'बालचरित' या नाटकात कृष्ण चाणूरास ठार मारतो. कंसावर झडप घालतो. तसेच कालियाला पकडण्यासाठी यमुनेच्या डोहात उतरतो. 'स्वप्नवासवदत्त' या नाटकात पद्मावती चेंडू खेळते. पाचव्या अंकात वासवदत्ता चक्क झोपी जाते. पूजा करण्यासाठी किंवा अश्रूंचे क्षालन करण्यासाठी रंगभूमीवर पाणी आणलेले आहे.

(६) नाट्यरचनेत विलक्षण चातुर्य आढळते. उदा. 'दूतवाक्य' या नाटकात विष्णूचे सुदर्शनचक्र, गदा वगैरे आयुधे पुरुषरूपाने प्रवेश करताना दिसतात. स्वप्न वासवदत्त'मध्ये एक द्विकेंद्री प्रवेश घातलेला आहे. राजा व विदूषक उद्यानात बोलत आहेत. त्याच वेळी वासवदत्ता व पद्मावती यांचे बोलणे आडोशाला राहून ऐकत आहेत. याच नाटकाच्या पाचव्या अंकात 'स्वप्नप्रसंग' आहे. राजा स्वप्नात वासवदत्तेला पाहतो. झोपेत बोलतो व त्याच्या प्रश्नांना वास्तवातील वासवदत्ता उत्तर देते. मध्यम-व्यायोग नाटकात 'मध्यम' या शब्दाचा दुहेरी अर्थाने उपयोग केला आहे. कर्णभार या नाटकात मूळ कथेत नाट्यानुकूल बदल केले आहेत. ही त्याच्या रचनाचातुर्याची उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत.

(७) सर्वात महत्त्वाचे आढळणारे साम्य म्हणजे यातील कोणत्याही नाटकात नाटककाराने आपले नाव, नाटकाचे नाव, तसेच स्वत:विषयीची माहिती दिलेली नाही.

यावरून ही सर्व नाटके एककर्तृक आहेत असे म्हणता येते. यातील 'स्वप्नवासवदत्त' हे नाटक भासाने रचले असल्याचे प्रसिद्ध आहे. तेव्हा ही सर्व नाटके भासाचीच असली पाहिजेत असे म्हणण्यास काही हरकत नाही. आता भासाच्या नावावर सुभाषित संग्रहात अगर इतर ग्रंथात जे श्लोक उद्‌धृत केलेले आहेत ते सदर नाटकात का आढळत नाहीत, या शंकेचे समाधान डॉ. अ. द. पुसाळकरांनी केलेले आहे. एक तर हे संस्कृत लेखक स्मरणाने अवतरणे देतात. त्यामुळे भासाने न लिहिलेले श्लोक त्याच्या नावावर दिले असण्याची शक्यता आहे. एकच श्लोक दोन ग्रंथकारांनी वेगवेगळ्या लेखकांचा म्हणून दाखल केल्याचे आढळते. उदा.

''यदपि विवुधैः सिन्धोरन्तः कथंचिदुपार्जितं
तदपि सकलं चारुस्त्रीणां मुखेषु विलोक्यते ।
सुरसुमनसः श्वासामोदे शशीच कपोलयो -
रमृतमधुरे तिर्यग्भूते विषं च विलोक्यते ॥''

हा श्लोक सदुक्तिकर्णामृत व यशस्तिलक या दोन पुस्तकात भासाच्या नावावर दिला आहे. पण सूक्तिमुक्तावलीत तो भोजदेवाचा आहे असे म्हटले आहे. कवीन्द्र समुच्चयात तो लक्ष्मीधराच्या नावावर दिला आहे. तेव्हा लेखकाच्या प्रमादाने असे काही श्लोक विनाकारण भासाच्या नावावर दिले असल्यास ते प्रस्तुतच्या नाटकात सापडणे अशक्य आहे.

दुसरे असे की नाटकाची प्रत लिहिणाऱ्याच्या चुकीमुळे कित्येक श्लोक उतरण्याचे राहून गेले असावेत. निरनिराळ्या प्रतीत असे कमी जास्त श्लोक झालेले दिसतात. त्यामुळे केवळ श्लोक सापडत नाहीत म्हणून ही भासाची नाटकेच नव्हेत, असे म्हणणे योग्य नाही, असे एकंदर मत पंडित गणपती शास्त्री, डॉ. ए. बी. कीथ व डॉ. अ. द. पुसाळकर यांनी मांडलेले आहे.

वरील दोन्ही मते अतिरिक्त मानून काही अभ्यासकांनी मध्यम मार्ग शोधलेला आहे. त्यांच्या मते पं. गणपती शास्त्रींना सापडलेली नाटके ही भासाची मूळ नाटके नसून त्यांच्या प्रयोगासाठी बनवलेल्या रंगावृत्त्या आहेत. रंगावृत्तीत मूळ नाटकाची काटछाट करण्यात येत असल्याने काही श्लोक मिळाले नाहीत तर त्यात काही आश्चर्य नाही. या रंगावृत्त्या केरळ प्रांतातील चक्यार किंवा शाक्यार

हे नाव असलेल्या नटवर्गाने केल्या असाव्यात असा प्रा. पिशारोटी यांचा अंदाज आहे.

तसेच त्यांच्या मते त्रिवेंद्रम नाटकात आढळणाऱ्या समान गोष्टी ह्या त्यांच्या एककर्तृत्वाच्या निदर्शक नाहीत याउलट केरळ प्रांतातील अनेक वैशिष्ट्ये यात प्रकट झाली आहेत. उदा. प्रस्तावनेला स्थापना म्हणण्याचा प्रघात केरळ प्रांतातच आहे. 'प्रतिमा' नाटकात रामाच्या राज्याभिषेकाच्या वेळी सीता हजर नव्हती, असे भासाने दाखवले आहे. केरळमध्ये राज्याभिषेकास राणीची उपस्थिती आवश्यक मानली जात नाही.

ही नाटके केरळ प्रांतात व तीही नटवर्गाच्या हस्तलिखित संग्रहात सापडलेली आहेत. भारतात इतरत्र कोठेही यांच्या प्रती मिळालेल्या नाहीत ही गोष्ट विसरून चालणार नाही. त्यामुळे या नाटकाचे मूळचे स्वरूप थोडे फार नष्ट झाले असावे. रंगावृत्तीत नाटकाची थोडी फार काटछाट होते पण कलाकृतीच्या गाभ्याला धक्का लावला जात नाही. तेव्हा जरी या रंगावृत्त्या आहेत असे मान्य केले तरी काही बिघडत नाही. उलट इतरत्र दुर्लभ असलेल्या हस्तलिखित प्रती सुरक्षित ठेवल्याबद्दल शाक्यारांना धन्यवाद द्यायला हवेत.

तसेच या संग्रहातील नाटके भासाची नव्हेत तर कोणाची आहेत? ही एककृत आहेत की अनेकांनी रचलेली आहेत? या सर्व रंगावृत्त्या एकाच नटाने तयार केल्या आहेत काय? किंवा ही शाक्यारांनी स्वतःच रचलेली नाटके आहेत? हे व असे अनेक प्रश्न उद्भवण्यासारखे आहेत व त्याची समाधानकारक उत्तरे मिळणे शक्य नाही. शाक्यारानी रंगावृत्ती तयार करताना मूळ नाटके बिघडवली, या समजुतीचे डॉ. गो. के. भटांनी खंडन केले आहे. असा आरोप करणाऱ्या विद्वानांनी आपल्याच प्रांतातील कलावंतावर अन्याय केला आहे, असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे.

त्यात शाक्यार हे नट होते. रचनाकार नव्हते, हे लक्षात घेतले पाहिजे. तेव्हा संग्रहातील नाटके ही त्यांनी रचलेली नाहीत हे सांगायला नको. 'त्रैविक्रम' व 'दामतु' ही दोन नाटके शाक्यारांनी रचलेली आहेत व ती वाङ्मयदृष्ट्या सुमार आहेत तेव्हा गणपती शास्त्रींना उपलब्ध झालेली नाटके ही मूळ भासाचीच आहेत हे मान्य करायला काही हरकत नाही.

* * *

दुर्दैवाने भासाचा कालनिर्णय करणे मोठे जिकिरीचे झाले आहे. म.म. डॉ, पां.वा.काणे व रंगाचार्य रेड्डी यांनी भासाला अनुक्रमे इसवी सनाच्या नवव्या व अकराव्या शतकाच्या अलीकडे ओढले आहे तर डॉ. अ.द. पुसाळकर व पं. गणपती शास्त्री यांनी त्यास इसवी सन पूर्व चौथ्या शतकात नेऊन बसवले आहे. दुसरे मत अत्यंत महत्त्वाचे असल्याने त्याचा कसून परामर्श घेणे आवश्यक आहे. या मताचे प्रमुख आधार असे-

(१) भासाच्या नाटकात आलेले उदयन, प्रद्योत व दर्शक हे राजे इसवी सन पूर्व सहाव्या शतकातील आहेत. भासाच्या लेखनशैलीवरून तो या काळास जवळचा वाटतो. 'प्रतिज्ञा यौगंधरायण' व 'अविमारक' या नाटकात उल्लेखिलेले काशीराज्य हे इसवीसन पूर्व पाचव्या शतकातच नष्ट झाले. 'प्रतिमा' नाटकात देवालयाच्या आवारात वाळू पसरल्याचा उल्लेखही भासाची प्राचीनता दर्शवितो. ती प्रथा प्राचीन असून हिचा निर्देश आपस्तंभाच्या धर्मसूत्रात (इ.स.पूर्व पाचवे शतक) आढळतो.

(२) कौटिल्याच्या अर्थशास्त्रात (अ. १०/३) 'तदिह श्लोकौ भवतः' असे म्हणून दोन श्लोक उद्धृत केले आहेत. त्यातील दुसरा श्लोक भासाच्या प्रतिज्ञा यौगंधरायणात आढळतो. तो श्लोक याप्रमाणे -

"नवं शरावं सलिलैः सुपूर्णं
सुसंस्कृतं दर्भकृतोत्तरीयम् ।
तत्तस्य मा भून्नरकं स गच्छे -
द्यो भर्तृपिण्डस्य कृते च युध्येत् ॥"

(प्रतिज्ञा ४.२)

हा श्लोक कौटिल्याने भासाच्या नाटकातून घेतला असावा. अर्थशास्त्राचा कर्ता कौटिल्य ऊर्फ चाणक्य हा चंद्रगुप्त मौर्याचा सचिव मानल्याने त्याचा काळ इ.स.पूर्व चौथे शतक हा मान्य झाला आहे. साहजिकच भासाचा काळही यावरून निश्चित करता येतो.

(३) भासाच्या 'प्रतिमा' नाटकात रावणाच्या तोंडी अनेक प्राचीन धर्मग्रंथांचा उल्लेख आलेला आहे. यातील मानवीय धर्मशास्त्र हे गौतमाच्या धर्मसूत्राहून प्राचीन आहे. हे इसवी सनपूर्व सहाव्या शतकात तयार झाले आहे. बृहस्पतीचे अर्थशास्त्र हे कौटिल्याच्या अर्थशास्त्राहून प्राचीन आहे. कारण स्वतः कौटिल्यानेच त्याचा उल्लेख केला आहे. मेधातिथीचे न्यायशास्त्र म्हणजे गौतमाची 'न्यायसूत्रे'

होत. म.म.डॉ. काण्यांनी हा मेधातिथी म्हणजे मनुस्मृतीवर टीका लिहिणारा मेधातिथी समजून भासाला नवव्या शतकानंतरचा ठरवले आहे. पण ते बरोबर नाही. न्यायसूत्रकार गौतमाचेच मेधातिथी हे दुसरे नाव होते. तसेच माहेश्वर योगशास्त्र हे पतंजलीच्या 'योगसूत्रां'हून प्राचीन आहे. सारांश, यातील सर्व ग्रंथांचे उल्लेख भासाची प्राचीनता दर्शवितात.

(४) भासाच्या बहुतेक नाटकात खालील श्लोक भरतवाक्य म्हणून आलेला आहे -

'इमां सागरपर्यंन्तां हिमवद्विन्ध्य कुण्डलाम् ।
महीमेकात पत्राङ्कां राजसिंह: प्रशास्तु न: ॥.

सदर श्लोकात हिमालय व विंध्यपर्वत यांच्या दरम्यान असलेल्या एकछत्री साम्राज्याचा उल्लेख केला आहे. असे साम्राज्य नंदाचा पाडाव झाल्यानंतरच अस्तित्वात आले होते. यातील 'राजसिंह' हे पद सम्राट चंद्रगुप्ताचा निर्देश करणारे आहे. चंद्रगुप्ताने नंदाचा तसेच ॲलेक्झांडरचा उत्तराधिपती असलेल्या सेल्युकस निकेटरचा पाडाव करून एकछत्री साम्राज्य निर्माण केले होते. तेव्हा हा त्याचाच उल्लेख मानणे योग्य ठरेल. या पुराव्याने भासाचा काळ थोडा अलीकडे येतो. तरीही त्याचा काळ इ.स. पूर्व चौथे शतक इतका मानण्यात काही अडचण येत नाही.

(५) भासाच्या 'प्रतिज्ञा-यौगंधरायण' या नाटकात खाली दिलेला श्लोक आहे -

"काष्ठादग्निर्जायते मथ्यमाना
र्भूमिस्तोयं खन्यमाना ददाति ।
सोत्साहानां नास्त्यसाध्यं नराणां
मार्गारब्धा: सर्वयत्ना: फलन्ति ॥"

(प्रतिज्ञा - अंक १ श्लोक १८)

सदर श्लोकाचे अश्वघोषाच्या 'बुद्धचरित' या महाकाव्यातील खालील श्लोकाशी आश्चर्यकारक साम्य आढळते. बुद्धचरितातील श्लोक असा -

'काष्ठं हि मथ्नन् लभते हुताशं
भूमिखनन्विन्दति चापि तोयम् ।
निर्बन्धिनं किञ्चन नाप्यसाध्यं
न्यायेन युक्तं च कृतं च सर्वम् ॥

(बुद्ध सर्ग १३ श्लोक ६०)

अश्वघोषाचा काळ इसवीसनाचे पहिले शतक (इ.स.७८) इतका मान्य झालेला आहे. त्याने भासाच्या कल्पनेची उसनवारी केली असे मानल्यास भासाचा काळ त्यापूर्वीचा ठरतो.

(६) याहीपेक्षा महत्त्वाचा पुरावा कालिदासाचा आहे. त्याने 'मालविकाग्निमित्र' नाटकाच्या प्रस्तावनेत भासाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. सूत्रधार म्हणतो -

''प्रथित यशसां भास कविपुत्र सौमिल्लकादीनां प्रबन्धानतिक्रम्य

वर्तमान कवे: कालिदासस्य क्रियायां कथं वा परिषदो बहुमान:।

-(मालविका. प्रस्ता.)

यावरून भास हा कालिदासापूर्वी होऊन गेल्याचे आपोआप सिद्ध होते. खुद्द कालिदासाच्या काळाबद्दल तीव्र मतभेद असले तरी तो इ.स. पूर्व पहिल्या शतकात होऊन गेला, असे मानण्याकडेच विद्वानांचा कल असल्यामुळे भासाचा काळ इ.स.चौथे शतक मानण्यास अडचण येत नाही. तात्पर्य, भास हा कौटिल्य, पतंजली, कालिदास व अश्वघोष या सर्वांपेक्षा अगोदर होऊन गेला हे मान्य केल्यास वरील मत सहज सिद्ध होते.

तसेच, भासाच्या नाटकात आढळणारे 'आर्ष' अपाणिनीय शब्दप्रयोग, अगदी बोलभाषेत शोभावे असे सोपे व सुटसुटीत संवाद, जुन्या चालीरीतींचा उल्लेख, त्याच्या नाटकातील प्राकृत भाषेचे स्वरूप इत्यादीवरूनही भास अत्यंत प्राचीन काळात होऊन गेला, असेच म्हणावे लागते. म.म.पं. गणपती शास्त्री, हरप्रसाद शास्त्री, कै. शि.म.परांजपे व विशेष करून डॉ. अ.द.पुसाळकर यांनी हे मत आग्रहपूर्वक मांडलेले आहे व त्यास डॉ. बलदेवसिंह उपाध्याय, डॉ. गो. के. भट व डॉ. चि. त्र्यं केंधे यांनी दुजोरा दिला आहे.

भासाच्या कालनिर्णय चर्चेतील हे मत अत्यंत महत्त्वाचे असले तरी त्यात अनेक कच्चे दुवे असल्याने ते स्वीकार्य नाही असे माझे मत आहे. यातील आधारांचा क्रमाने विचार करू.

(१) भासाच्या नाटकातील उदयन, दर्शक, प्रद्योत, पालक व गोपालक इत्यादी राजे ऐतिहासिक असून ते इसवी सन पूर्व सहाशेच्या सुमारास होऊन गेले आहेत, ही गोष्ट खरी आहे. तथापि नाटककार भास हा लगेच त्यांच्यानंतर होऊन गेला असे म्हणता येत नाही. उदयनाची कथा अत्यंत लोकप्रिय होती. त्यावर भासाने ज्याप्रमाणे दोन नाटके लिहिली त्याप्रमाणे कालिदासाने त्याचा

मेघदूतात उल्लेख केला. श्रीहर्षासारख्या सातव्या शतकात होऊन गेलेल्या राजानेही उदयनावर 'प्रियदर्शिका' व 'रत्नावली' अशा दोन नाटिका लिहिल्या. सारांश, भास उदयनाच्या काळाच्या अगदी लगतच होऊन गेला असे मानता येत नाही.

(२) प्रतिज्ञा-यौगंधरायण व कौटिलीय अर्थशास्त्र यात आढळणाऱ्या 'नव शरावं' इत्यादी श्लोकाचा एकंदर आशय पाहता भासानेच हा श्लोक अर्थशास्त्रातून अथवा त्यापूर्वीच्या ग्रंथातून घेतला असावा. कौटिल्याने दोन श्लोक उद्धृत केलेले आहेत. वेदवचनाच्या जोडीने उद्धृत केलेला श्लोक हा नाटकातून घेतला असेल असे वाटत नाही. त्यामुळे हा पुरावा सोडून देण्यास हरकत नाही.

(३) 'प्रतिमा' नाटकातील रावणाच्या तोंडचे उद्गारदेखील पुरावा म्हणून ग्राह्य धरता येत नाहीत. त्यात रावण आपण कोणती शास्त्रे अभ्यासली हे सांगत आहे. तो त्रेतायुगातला पुरुष आहे याची भासास जाणीव आहे. त्यामुळे त्याच्या तोंडी कलियुगात लिहिलेल्या 'कौटिलीय अर्थशास्त्रा'चा उल्लेख घालणे हास्यास्पद ठरले असते. तेव्हा कौटिल्याचे अर्थशास्त्र भासाला ठाऊकच नव्हते असे म्हणता येत नाही.

(४) भासाने भरतवाक्यात उल्लेखलेल्या 'राजसिंह' या शब्दाच्या अर्थाबाबत गोंधळाची परिस्थिती आहे. डॉ. पुसाळकरांनी हा सम्राट चंद्रगुप्ताचा उल्लेख मानला आहे. श्री. काशीकर यांच्या मते हा आंध्रभृत्य दुसरा पुळुमायी याचा उल्लेख आहे. प्रो. देवधर व म.म.काणे यांनी तर हा राजसिंह म्हणजे इ.स. च्या आठव्या शतकात होऊन गेलेला दुसरा सिंहवर्मन हा पांड्यराजा मानलेला आहे. कै. ब. रा. हिवरगावकरांना या शब्दाचा 'राजश्रेष्ठ' एवढाच अर्थ घेणे योग्य वाटते. पण भासाने असा मोघम शब्द का वापरावा, याचा उलगडा होत नाही. तेव्हा भरतवाक्याच्या आधारे कवीचा कालनिर्णय करण्यात फारसे हशील नाही, असे दिसून येईल.

(५) व (६) शेवटच्या दोन पुराव्यांबाबत इतकेच म्हणता येईल की भास, अश्वघोष व कालिदास यांच्यात कोण अगोदरचा व कोण नंतरचा हे प्रथम निश्चित केले पाहिजे. पारंपरिक मतानुसार भास (इ.स.पूर्व चौथे शतक), कालिदास (इ.स.पूर्व पहिले शतक) व अश्वघोष (इसवी सनाचे पहिले शतक) असा क्रम ठरतो व पुसाळकरादी विद्वानांनी हाच क्रम ग्राह्य मानलेला आहे. परंतु या तिघांनी योजलेल्या प्राकृत भाषेचा सूक्ष्म अभ्यास करून डॉ. सुकथनकरांनी अश्वघोषाचे प्राकृत हे कालिदासाच्याच नव्हे तर भासाच्या

प्राकृतापेक्षाही जुने आहे, असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे. यावरून अश्वघोष - भास - कालिदास असा क्रम ठरतो. तसेच बुद्धचरित व प्रतिज्ञा नाटकातील साम्य असलेल्या दोन श्लोकांकडे बारकाईने पाहिले तर अश्वघोषाची मांडणी ओबडधोबड वाटते. त्याच्या तुलनेत भासाच्या रचनेत सफाई आढळते. कदाचित भासाने अश्वघोषाची कल्पना घेऊन ती योग्य शब्दात मांडली असावी.

तात्पर्य, वरील मत ग्राह्य होण्यासारखे नाही, हे यावरून स्पष्ट होते. इतर एक दोन मताचा आता विचार करू -

(१) डॉ. बार्नेट यांच्या मते भास हा इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेला. हा केरळ प्रांताचा रहिवासी होता. महेंद्र विक्रमाच्या 'मत्तविलास' या प्रहसनाशी त्रिवेन्द्रम नाटकांचे साम्य आढळते. त्याचप्रमाणे भरतवाक्यात उल्लेखिलेला 'राजसिंह' हा राजा केरळ प्रांतातील असून तो इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेला. या मतास प्रो. देवधर, हिरानंद शास्त्री, प्रो. नेरूरकर व प्रो. पिशारोटी यांनी दुजोरा दिला आहे.

पण या मताचा स्वीकार करता येत नाही. कारण बाणभट्ट (इ.स.सातवे शतक) व खुद्द कालिदास (इ.स.चौथे शतक) यांनी भासाचा नामपूर्वक उल्लेख केला असल्याने त्याचा काळ इतका पुढे ओढता येत नाही. अर्थात वरील अभ्यासक ही नाटके आद्य भासाची आहेत असे मानत नाहीत, हा भाग निराळा.

(२) डॉ. ए.बी. कीथ यांच्या मते भास इ.स.३०० च्या सुमारास होऊन गेला. डॉ. कीथ व डॉ. सुकथनकर यांनी बाह्य पुराव्यापेक्षा अंतर्गत पुराव्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. भासाच्या नाटकातील प्राकृत भाषेचा अभ्यास करून त्याचे प्राकृत कालिदासापेक्षा जुने तर अश्वघोषापेक्षा अर्वाचीन ठरवले आहे.

तसेच स्वप्नवासवदत्त, दूतवाक्य आणि बालचरित या नाटकांच्या आधारे डॉ. कीथ यांनी असा तर्क केला आहे की, भासाचा आश्रयदाता राजा हा काही काळ राज्य केल्यावर पदभ्रष्ट झाला असावा. त्यानंतर पुन्हा प्रयत्न करून त्याने राज्य प्राप्त करून घेतले असावे. ही हकीकत क्षत्रप राजा रुद्रसिंह याच्या बाबतीत जुळते. याने प्रथम इ.स. १८१ ते १८८ पर्यंत राज्य केले. त्यानंतर तो पुन्हा इ.स.१९१ मध्ये राज्यावर आला. या रुद्रसिंहाचा निर्देश भासाने 'राजसिंह' असा केला असावा. डॉ. कीथ यांच्या सदर मतास डॉ. लेस्नी, प्रिंटन, प्रो. बॅनर्जी व डॉ. सुकथनकर यांनी पुष्टी दिली आहे.

वरील मत हे योग्य आहे. या मतास पोषक असे आणखीही दोन-तीन आधार सांगता येतील.

(१) भासाच्या नाटकांपैकी स्वप्नवासवदत्त, प्रतिज्ञा यौगंधरायण व अविमारक यांची कथानके बृहत्कथेवर आधारलेली आहेत. गुणाढ्याची पैशाची भाषेतील बृहत्कथा साधारणपणे इसवी सनाच्या पहिल्या शतकात तयार झाली असावी. तेव्हा भास हा बृहत्कथेच्या काळानंतर होऊन गेला असे मानल्यास त्याचा काळ इसवी सनाचे दुसरे अथवा तिसरे शतक असा ठरतो.

(२) वात्स्यायनाच्या कामसूत्रात भासाच्या 'अविमारका'चा उल्लेख आढळतो. तो असा - 'श्रृण्वत्याचाहल्याऽ विमारक शाकुन्तलादीन्यन्या न्यपि लौकिकानि कथयेत्तद्युक्तानि॥'' (कामसूत्र. ५-४.१४) यातील अहल्येची कथा रामायणात आहे तर शकुंतलेची कथा महाभारतात आहे. पण अविमारकाच्या कथेच्या निर्देशावरून वात्स्यायनास भासाचे नाटकच अभिप्रेत आहे हे उघड आहे. वात्स्यायनाचा काळ आधुनिक अभ्यासकांच्या मते इसवी सनाचे तिसरे शतक हा आहे. प्राचीन इतिहासात पंचवीस-पन्नास वर्षे इकडे तिकडे होतात. तात्पर्य भास हा वात्स्यायनापूर्वी होऊन गेला असावा. त्यामुळे त्याच्या उपरोक्त कालनिर्णयात फारसा फरक पडत नाही.

(३) कालिदासाने 'मालविके'च्या प्रस्तावनेत भास, कविपुत्र व सौमिल्लक अशा प्राचीन नाटककारांचा स्पष्ट नामोल्लेख केला आहे. आता कालिदासास इसवी सनापूर्वी ढकलून भासाचा काळ इ.स.पूर्व चौथे शतक मानणे हे जसे शक्य आहे तसेच कालिदासाला इसवी सनाच्या चौथ्या शतकात आणून भासाला दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकात ठेवणे हेही शक्य आहे. सारांश, कालिदासाच्या कालनिर्णयावरच भासाच्या काळाची भिस्त आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. कालिदासाचा काळ हा इ.स.च्या चौथ्या शतकाची अखेर (इ.स. ३८० ते ४२०) हा आहे; असे प्रस्तुत लेखकाचे मत असल्यामुळे भास हा त्याच्या अगोदर फार तर शंभर वर्षे इतका होऊन गेला असावा. भासाची नाटके कालिदासाच्या काळात रंगभूमीवर गाजत होती. हे ध्यानात घेतल्यास दोघांच्या काळामध्ये फारसे अंतर नसावे असा तर्क होतो.

प्रारंभी उद्धृत केलेली बाणभट्ट कृत भासाची प्रशंसापर उक्ती ही इसवी सनाच्या सातव्या शतकातील आहे. भासाचा गौरवपूर्वक उल्लेख करणारे वाक्पतिराज (इ.स.८५०) राजशेखर (इ.स.९००) व जयदेव (इ.स.१२००)

वगैरे लेखक तर त्यानंतरचे आहेत. यावरून भासाचा काळ फार मागे नेता येईल असे वाटत नाही. सारांश, भासाचा काळ हा इसवी सनाच्या तिसऱ्या शतकाचा उत्तरार्ध इतका मान्य होण्यास हरकत नाही. कै. व. रा. हिवरगावकर व अलीकडे डॉ. रा. शं. वाळिंबे यांनीही हाच काळ मान्य केला आहे.

* * *

भासाविषयी व्यक्तिगत हकीकत काहीच मिळत नाही. त्याने आपले नावदेखील सांगितलेले नाही. इतकेच नव्हे तर दंतकथा किंवा आख्यायिकांचेही अस्तित्व नाही. राजशेखराच्या नावावर असलेल्या 'कविविमर्श' नामक चोपड्यावरून 'भासाचे दुसरे नाव धावक होते. भासाने प्रियदर्शिका, रत्नावली व नागानंद ही (श्रीहर्षाच्या नावावर असलेली) नाटके रचली. त्याने उदात्त रस असलेले 'उदात्तराघव' नामक नाटक रचले. भवभूतीसारख्या नाटककारांनी त्याच्या आधारे आपल्या नाटकांची निर्मिती केली. तसेच नऊ अंक असलेले 'किरणावली' नाटक लिहिले. त्याने रचलेली नाटके टीकाकारांनी त्यांची परीक्षा पाहण्यासाठी अग्नीत टाकली पण अग्नीने त्याचे 'स्वप्नवासवदत्त' हे नाटक जाळले नाही, इत्यादी माहिती मिळते पण ती विश्वसनीय नाही.

त्रिवेंद्रम येथे सापडलेल्या तेरा नाटकांपैकी 'स्वप्न' हे नाटक सोडले तर एकाही नाटकाचा वरील चोपडीत उल्लेख नाही. तसेच इतर कुणीही त्यांचा नामोल्लेख केला नाही. त्या नाटकावर कोणी टीका-टिप्पणी लिहिलेली नाही. त्यामुळे ही नाटके फारच लवकर लुप्त झाली असावीत.

बाणभट्टाने केलेल्या भासाच्या प्रशंसेचा थोडा निराळा अर्थ डॉ. गो.के. भटांनी लावला आहे. त्यांच्या मते भास केवळ नाटककारच नव्हता तर उत्तम नाट्य दिग्दर्शक होता. त्याने अनेक नाट्यस्पर्धांत भाग घेऊन बक्षिसे मिळवली होती. भासाची नाटके वाचल्यानंतर भास हा नाट्यदिग्दर्शक होता हे डॉ. भटांचे म्हणणे योग्य वाटते. कारण भासाने या छोट्या नाटकात अनेक प्रकारचे प्रयोग केले आहेत. नाट्यशास्त्रातील नियम नाट्याच्या आड येतात असे दिसल्यावर त्याने ते झुगारून दिले आहेत. रामायण व महाभारत यातील कथाप्रसंगावर नाटके लिहिताना त्याने भरपूर स्वातंत्र्य घेतले आहे. त्याच्या या बंडखोर वृत्तीमुळेच त्याला टीकाकारांचा रोष पत्करावा लागलेला दिसतो. त्याची नाटके मुद्दाम डावलली गेली असावीत, ती इतकी की त्यांचे नावदेखील शिल्लक राहिले नाही.

त्याच्या नाटकावरून तो उत्तर भारताचा रहिवासी असावा असे दिसते. हिमालय व विंध्य यांच्यामधील परिसर त्याच्या परिचयाचा असावा. उत्तर भारतातील शहरे, पर्वत, नद्या यांची त्याने वर्णने केली आहेत. तसेच अयोध्या, मथुरा या नगरात त्याची वृत्ती रमलेली दिसते. त्या मानाने त्याच्या नाटकात दक्षिणेचे वर्णन आढळत नाही. रामाची कथा सांगत असतानाही त्याने रामेश्वर क्षेत्राचा उल्लेख केला नाही. असे असूनही त्याच्या नाटकांच्या हस्तलिखित प्रती केरळ प्रांतातच मिळाव्यात ही आश्चर्याची गोष्ट आहे.

* * *

भासाच्या तेरा नाटकांचे वर्गीकरण सामान्यत: खालीलप्रमाणे करता येईल.-

**(अ) महाभारतातील कथा** - दूतवाक्य, कर्णभार, दूत-घटोत्कच, उरुभंग, मध्यम-व्यायोग व पंचरात्र ही सहा नाटके महाभारतातील कथाप्रसंगावर आधारलेली आहेत.

**(ब) रामायणातील कथा** - अभिषेक व प्रतिमा, यज्ञफल हे नाटक रामकथेवर आधारलेले आहे पण ते बनावट असल्याचे सिद्ध झाल्याने विचारात घेतलेले नाही.

**(क) कृष्णचरित** - बालचरित या नाटकास हरिवंश पुराणाचा आधार असावा.

**(ड) उदयनाची कथा** - प्रतिज्ञा - यौगंधरायण व स्वप्नवासवदत्त.

**(इ) बृहत्कथा** - अविमारक व चारुदत्त.

नाटकाच्या भाषाशैलीवरून तसेच रचनेतील चातुर्यावरून भासाच्या नाटकांचा क्रम ठरविण्याचा प्रयत्न श्री. ए. पी. अय्यर व डॉ. अ. द. पुसाळकर यांनी केलेला आहे. त्यांपैकी डॉ. पुसाळकरांनी सुचवलेला क्रम अधिक योग्य वाटतो. तो असा - दूतवाक्य, कर्णभार, दूत घटोत्कच, ऊरुभंग, मध्यम-व्यायोग, पंचरात्र, अभिषेक, बालचरित, अविमारक, प्रतिमा, प्रतिज्ञा यौगंधरायण, स्वप्नवासवदत्त व चारुदत्त.

डॉ. पुसाळकरांच्या मते 'चारुदत्त' हे शेवटचे नाटक नाटककाराच्या मृत्यूमुळे अथवा इतर कारणाने अपूर्ण राहिले असावे. नाटकांचा वर दिलेला क्रम पाहता भासाने प्रथम महाभारतातील प्रसंग घेऊन आपल्या नाट्यलेखनाचा श्रीगणेशा केलेला दिसतो. यातील सहा नाटकांपैकी पंचरात्र वगळता इतर नाटके या एकांकिका आहेत. तर आता वर दिलेल्या क्रमानेच सर्व नाटकांचा विचार करू.

## १. दूतवाक्य

कौरव-पांडवात होणारे युद्ध टाळण्यासाठी श्रीकृष्णाने केलेल्या शिष्टाईच्या प्रसंगावर या एकांकिकेची रचना केलेली आहे. नमुची नामक दैत्यास लाथेने आभाळात उडवून देणाऱ्या श्रीकृष्णाच्या चरणकमलास वंदन करून भासाने नाटकास प्रारंभ केला आहे. सूत्रधाराच्या बोलण्यावरून दुर्योधनाने आपल्या अनुयायांची सभा घेण्याचे ठरविले आहे, असे समजते.

दुर्योधन रंगभूमीवर प्रवेश करतो. तो तरुण व सावळ्या रंगाचा आहे. त्याने अंगावर शुभ्र रेशमी शेला पांघरलेला आहे. पांडवांशी युद्ध करण्यासाठी तो उतावीळ झाला आहे. सभेस प्रारंभ होताच शकुनी हा सेनापतिपदासाठी भीष्माचे नाव सुचवतो. दुर्योधनाला ही निवड पसंत पडते. इतक्यात कंचुकी तेथे येतो व पांडवांकडून दूत म्हणून स्वत: पुरुषोत्तम कृष्ण आले असल्याचा निरोप देतो.

श्रीकृष्ण शिष्टाईसाठी येत आहे असे समजताच तो त्यास कैदेत टाकण्याचा बेत आखतो. कारण एकदा कृष्णाला पकडले की पांडवांची सारी विचारशक्तीच नाहीशी होईल, हे त्याला ठाऊक आहे. म्हणून तो सर्व सभाजनांना ताकीद देतो की, कृष्ण सभेत आल्यावर त्यास कोणी उत्थापन देऊ नये. आज्ञाभंग करणाऱ्यास बारा तोळे सोने दंडादाखल द्यावे लागेल.

सभासदांना असे बजावून तो स्वत: द्रौपदी केश-वस्त्रहरणाचे तयार केलेले चित्र पाहात बसतो. त्या चित्रात द्रौपदीची केविलवाणी अवस्था, पांडवांच्या मुद्रेवरील भाव, शकुनीची कावेबाज मुद्रा, भीष्म-द्रोणांची अगतिकता उत्कृष्टपणे दर्शविलेली होती. दुर्योधन त्या चित्राची प्रशंसा करतो.

कृष्ण सभास्थानी प्रविष्ट होताच सभेतील राजे लोकांची एकच धांदल उडते. स्वत: दुर्योधनही गडबडतो व आपोआप अर्धवट का होईना उभा राहतो. कृष्ण दुर्योधनासमोरचे चित्र पाहतो व संतापून ते चित्र दूर करण्यास सांगतो आणि गंमत म्हणजे दुर्योधनही सेवकास ते चित्र घेऊन जाण्यास सांगतो.

मग दुर्योधन श्रीकृष्णास पांडवांचे कुशल विचारतो. त्या विचारण्यातही त्याचा हलकटपणा दिसून येतो. तो युधिष्ठिराचा उल्लेख यमधर्माचा पुत्र, भीमाचा वायुपुत्र व अर्जुनाचा इंद्रपुत्र असा करतो. म्हणजे पांडव हे पंडूचे पुत्र नसून ते जारज आहेत. त्यामुळे ते आपले मुळी बंधूच नाहीत, अशी त्याची भूमिका दिसते.

कृष्णाला दुर्योधनाच्या भाषणातील खोच उमगते पण तो तिकडे दुर्लक्ष करून पांडवाचे क्षेम-कुशल सांगतो व राज्याच्या वाटणीचा प्रस्ताव पुढे करतो. दुर्योधन पुन्हा पांडवांची जातकुळी बाहेर काढतो. मग मात्र कृष्णाला राहवत नाही. मग तो स्पष्ट विचारतो -

"विषयासक्त असलेला विचित्रवीर्य राजा क्षयरोगाने मरण पावल्यानंतर अंबिकेला (म्ह. त्याच्या बायकोला) व्यासमुनींपासून झालेल्या तुझ्या पित्याला, धृतराष्ट्राला राज्याची प्राप्ती कशी झाली?"

- (अंक १ श्लोक २२)

सारांश, वाद वाढविण्यात अर्थ नाही. युधिष्ठिर सामोपचाराने तुमच्याकडे राज्याची वाटणी मागत आहे तरी ती तुम्ही पूर्ण करावी अशी कृष्ण पुन्हा विनंती करतो. पण कृष्णाचा हा प्रस्ताव दुर्योधन सरळ धुडकावून लावतो त्याचे म्हणणे असे की 'शूर लोक राज्य जिंकून घेतात. ते दुसऱ्याची अशी याचना करीत नाहीत. जगात मागून कोणाला काही मिळत नाही. पांडवांना राज्य हवे असेल तर त्यांनी युद्ध करावे व शांतता हवी असेल तर सरळ आश्रमात जाऊन राहावे."

यावर दोघांचा पुष्कळ वाद होतो. कृष्ण त्याला पांडवांच्या पराक्रमाची आठवण करून देतो इतकेच नव्हे तर चित्रसेन नामक गंधर्वाच्या तावडीत दुर्योधन सापडलेला असताना अर्जुनानेच त्याची सुटका केली होती. तर आता दुर्योधनाने मुकाट्याने राज्याचा वाटा द्यावा नाही तर पांडव समुद्रापर्यंत पसरलेले राज्य हिसकावून घेतल्याशिवाय राहणार नाहीत, असे सांगतो.

पण कृष्णाच्या या धमकीस दुर्योधन भीक घालत नाही. तो कृष्णाला स्पष्ट सांगतो की इंद्र व वायू या देवतांनी जरी आपल्यावर प्रहार केला तरीदेखील पित्याने उपभोगलेल्या व स्वत: त्याने प्रयत्नपूर्वक रक्षण केलेल्या राज्यातील गवताची काडीही तो पांडवास देणार नाही. त्याचा हा हटवादीपणा पाहून कृष्णाचाही संयम सुटतो व तो दुर्योधनाला लबाड, कावळा, वाकड्या नजरेचा, वानर अशा शिव्या देतो व त्याच्यामुळे साऱ्या कौरवकुलाचाच नाश होणार आहे, असा निर्वाणीचा इशारा देऊन तो आसनावरून उठतो.

पण दुर्योधन त्याला तसे सोडायला तयार नाही. तो कृष्णाला कैद करण्याचा प्रयत्न करतो. मग कृष्ण विश्वरूप धारण करतो. दुर्योधनाला सभागृहात सगळीकडे कृष्णच दिसू लागतात. कृष्ण मायावी-जादूगार आहे असे त्याला वाटते. तरीही त्याचा ताठा उतरत नाही. कृष्णाला घायाळ करण्याची भाषा करीत तो निघून

जातो. कृष्णाचाही संताप अनावर होतो. पांडवांचे कार्य (म्ह. कौरवांचा नाश) आपण स्वत:च पार पाडण्याचे ठरवून तो सुदर्शन चक्राचे स्मरण करतो.

त्याबरोबर सुदर्शन चक्र व्यक्तिरूपाने प्रवेश करते. कृष्ण त्याला दुर्योधनाचा वध करण्याची आज्ञा करतो परंतु दुर्योधनाचा वध जर अगोदरच झाला तर इतर दुष्टांचा नाश होणार नाही, हे सुदर्शन कृष्णाच्या लक्षात आणून देतो. मग कृष्ण सुदर्शनास परत जावयास सांगतो. तो जायला निघणार इतक्यात कृष्णाची शार्ङ्ग धनुष्य, कौमोदकी गदा, नंद नामक तलवार, पांचजन्य शंख ही आयुधे व्यक्तिरूपाने प्रवेश करतात. शेवटी गरुड येतो. अखेरीस सर्व शस्त्रे निघून गेल्यावर धृतराष्ट्र येतो. तो कृष्णास नमस्कार करून त्याला दुर्योधनाच्या अपराधास क्षमा करण्याची विनंती करतो. परंतु कृष्ण त्याच्याशी विशेष न बोलता त्याचा निरोप घेतो व इथे नाटक समाप्त होते.

भासाची ही पहिली एकांकिका पुष्कळच चांगली आहे. तथापि भासाचा नवशिकेपणा जाणवल्याखेरीज राहात नाही. त्याची काही उदाहरणे याप्रमाणे सांगता येतील.

(१) द्रौपदीवस्त्रहरणाचे चित्र पाहात असता दुर्योधन द्रौपदीस चंद्रकलेची व दु:शासनास राहूची उपमा देतो. उपमा समर्पक असली तरी दुर्योधनाच्या तोंडी घालण्यात नाटककाराने अनौचित्य प्रकट केले आहे.

(२) वादाच्या भरात कृष्ण दुर्योधनास लबाड, कावळा, वाकड्या नजरेचा, वानर अशा शिव्या देतो. इतकेच नव्हे तर दुर्योधनाचा वध करण्यासाठी एकदम सुदर्शनचक्राचे स्मरण करतो. कृष्णाचे हे चित्रण फार उथळ व पोरकट वाटते. वास्तविक पाहता तो युद्धाने होणारा भयंकर अनर्थ टळावा व पांडवांची न्याय्य मागणी दुर्योधनास सांगावी या हेतूने तो आलेला आहे. तेव्हा त्याने हे प्रकरण संयमाने हाताळायला हवे होते.

(३) कृष्णाने सुदर्शनाचे स्मरण करताच ते शस्त्र व्यक्तिरूपाने प्रवेश करते. तत्कालीन प्रेक्षकास ही कल्पना नि:संशय मनोरम वाटली असावी. तथापि सुदर्शनानंतर कृष्णाची इतर आयुधे व गरुड यांचा प्रवेश नाटककाराने कशासाठी दर्शविला आहे हे समजत नाही.

असे काही दोष वगळता हे नाटक उत्कृष्ट वठले आहे. पात्रांची स्वभाववैशिष्ट्ये अत्यंत थोडक्या शब्दांत उभी करण्यात नाटककार यशस्वी झाला आहे. कृष्ण व दुर्योधन यांचा वाद-विवाद थोडा खालच्या पातळीवरचा

वाटला तरी परिणामकारक आहे. हे त्याचे पहिले नाटक असेल तर त्याने सुरुवातीलाच चांगली मजल मारली आहे, असे म्हणता येईल.

## २. कर्णभार

ही अत्यंत प्रभावी एकांकिका आहे. यात कर्णाच्या जीवनाची संध्याकाळ रेखाटलेली आहे. कर्णाची दानशूरवृत्ती, पांडवांबद्दल वाटणारी ओढ व परशुरामाच्या शापाने त्याच्या हृदयाची झालेली कालवाकालव नाटककाराने मनोवेधकपणे चित्रित केली आहे. 'जिकडे अर्जुन असेल तिकडेच माझा रथ हाकून ने' या एकाच वाक्याचा तीनदा उपयोग करून कर्ण हळूहळू मृत्यूला सामोरा जात असल्याचे दर्शविले आहे.

हिरण्यकश्यपूचे वक्षस्थळ आपल्या तीव्र नखांनी विदीर्ण करणाऱ्या नरसिंहास वंदन करून सूत्रधार सभांजनांसमोर येतो. इतक्यात पडद्यात गलका होतो. स्वत: दुर्योधन हा रणभूमीकडे निघाला असल्याचे सांगून सूत्रधार निघून जातो.

नंतर कर्ण व शल्य प्रवेश करतात. कर्णाचा चेहरा ढगाआड दडलेल्या सूर्याप्रमाणे निस्तेज दिसत आहे. तो शल्याला आपला रथ अर्जुनाचा रथ जेथे असेल तेथे नेण्यास सांगतो. तो मनोमन खिन्न झालेला आहे. पांडव आपले भाऊ आहेत, ही जाणीव त्याला व्यथित करीत आहे. मग तो आपण परशुरामाकडून अस्त्रविद्या कशी प्राप्त करून घेतली याची हकीकत शल्याला सांगतो. आपण ब्राह्मण आहोत असे खोटेच सांगून कर्णाने विद्या संपादन केली होती. पण एकदा परशुराम कर्णाच्या मांडीवर डोके ठेवून झोपी गेला असता भुंग्याने कर्णाच्या मांडीला दंश केला. गुरूची झोपमोड होऊ नये म्हणून कर्णाने ती वेदना सहन केली. जाग आल्यावर परशुरामांनी कर्णाची रक्तबंबाळ मांडी पाहिली. हा ब्राह्मण असणे शक्य नाही असे जाणून त्यांनी 'आयत्या वेळी तुझी अस्त्रे विफल होतील' असा कर्णास शाप दिला.

या शापाचे स्मरण होताच कर्ण हताश होतो. त्याला आपली अस्त्रे निर्बल झाल्याचे जाणवते. तो युद्धाला अथवा मृत्यूला भीत नाही. युद्धात मरण आले तर स्वर्ग मिळतो व यश मिळाले तर पृथ्वीचे राज्य प्राप्त होते हे त्यास ठाऊक आहे. त्याला एकदम उत्साह येतो. धर्मराजास बंदिवान करावे व अर्जुनावर बाणांचा वर्षाव करून त्याला जमिनीवर लोळवावे व त्या योगे कौरवांच्या

विजयाचा मार्ग सोपा करावा अशी ईर्षा उत्पन्न होऊन तो शल्याला अर्जुनाच्या रथाकडे आपला रथ नेण्यास सांगतो.

त्याच वेळी इंद्र ब्राह्मणाचा वेष धारण करून त्या ठिकाणी येतो. याचक भेटल्याने कर्णाला आनंद होतो. तो ब्राह्मणाला वंदन करतो. त्या वेळी कर्णाला काय आशीर्वाद द्यावा असा इंद्राला पेच पडतो. तो कर्णाला 'दीर्घायु हो' असे म्हणत नाही. मग कर्ण त्यास शिंगांना सोन्याचे आवरण असलेल्या हजार दुभत्या गायी, सूर्याच्या घोड्याशी स्पर्धा करणशरे कांबोज कुलातील उत्कृष्ट हजार घोडे किंवा पर्वताप्रमाणे अजस्र असणारे एक हजार हत्ती देऊ करतो, परंतु इंद्राला असले काही नको असते. मग कर्ण आपले मस्तक तोडून देण्याची तयारी दर्शवितो तरीही इंद्र नकार देतो. शेवटी तो जेव्हा त्याच्या शरीराचे जन्मापासून संरक्षण करणारी कवच व कुंडले देऊ करतो तेव्हा मात्र इंद्र एखाद्या भिकाऱ्याप्रमाणे आनंदित होऊन 'दे-दे' असे म्हणतो.

कर्णाला त्याचा कावा उमगतो. अनेक कारस्थाने करण्यात कुशल असलेल्या कृष्णाची ही युक्ती असावी अशी शंका त्याच्या मनाला चाटून जाते. तो कवच आणि कुंडले द्यावयास तयार झालेला पाहून शल्य त्याला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा 'हे सर्व वस्तुजात हे क्षणभंगूर असून यज्ञात दिलेली आहुती व दिलेले दान एवढ्याच गोष्टी शाश्वत राहतात' असे तो शल्यास सांगतो व इंद्राला संतुष्ट करतो.

इंद्र निघून जातो. अर्जुनाला युद्धात जय मिळावा यासाठी सर्व देवांनी कर्णाकडून कवच-कुंडले काढून घेण्याचा कट शिजवलेला असतो. कर्ण त्यांच्या जाळ्यात पूर्ण फसलेला आहे. परंतु आपली फसवणूक झाली आहे, असे कर्णास मुळीच वाटत नाही. उलट इंद्राला संतुष्ट करून आपण त्याचीच फजिती केली आहे अशी त्याची भूमिका आहे.

थोड्या वेळाने एक देवदूत येतो. तो सांगतो की कवच-कुंडले हिरावून घेतल्याबद्दल इंद्राला आता पश्चात्ताप झालेला आहे. त्याची भरपाई म्हणून त्याने एक अमोघ शक्ती कर्णाला देऊ केली आहे. तिच्या योगे कर्णाला पांडवांपैकी एकाचा वध करता येईल. पण एकदा दान दिल्यानंतर त्याच्या मोबदल्यात काही स्वीकारणे कर्णाला पसंत पडत नाही. परंतु ब्राह्मणाचे वचन मोडायचे नाही म्हणून तो त्या शक्तीचा स्वीकार करतो.

दोघे पुन्हा रथात बसतात. इतक्यात प्रलयकाळच्या वेळी खवळलेल्या समुद्राच्या गर्जनेप्रमाणे त्याला शंखाचा आवाज ऐकू येतो. तो अर्जुनाच्या शंखाचा आवाज ओळखतो. धर्मराजाच्या पराभवाने चवताळलेला अर्जुन आता आपले सामर्थ्य पणाला लावून लढणार याबाबत कर्णाला आता शंका उरत नाही. तो अर्जुनाच्या रथाकडे आपला रथ नेण्याची शल्याला विनंती करतो आणि भरतवाक्याबरोबर नाटक समाप्त होते.

ही एकांकिका लिहिताना भासाने महाभारतातील कथानकात लक्षणीय बदल केले आहेत. परशुरामाने कर्णाला दिलेला शाप व इंद्राने ब्राह्मण रूपाने येऊन कवच-कुंडलांचे मागितलेले दान हे दोन प्रसंग महाभारतात दोन वेगळ्या पर्वात आले आहेत; पण नाटककाराने ते येथे सलगपणे मांडलेले आहेत. तसेच महाभारतातील शल्य हा कर्णाची सतत निंदा व मानखंडना करतो पण कर्णभारातील शल्य हा त्याच्याबद्दल सहानुभूती दर्शवितो. इंद्राचे चित्रणही वेधक आहे. भासाने त्याची गणना क्षुद्र पात्रात करून त्याला प्राकृत भाषेत बोलायला लावले आहे. कर्णाच्या दातृत्वाचा गैर-फायदा घेऊन त्याची कवच-कुंडले घेतल्यावर त्याला आपल्या निंद्य कृतीचा पश्चात्ताप झाल्याचे दाखविले आहे. या साऱ्या बाबी किरकोळ वाटल्या तरी फार मोठा परिणाम साधणाऱ्या आहेत.

प्रो. वूल्मर यांच्या मते हे नाटक अपूर्ण आहे. पंडित गणपती शास्त्रींच्या मते यास आणखी एका अंकाची जरुरी आहे. डॉ. अ. द. पुसाळकरांच्या मते हे नाटक पूर्ण आहे आणि त्यांचे हे मत बरोबर आहे. नाटकाचे 'कर्णभार' हे नाव अभ्यासकांना कोड्यात टाकणारे आहे. डॉ. पुसाळकरांनी या नावाचे स्पष्टीकरण या प्रमाणे दिले आहे -

"कर्णयो: भारभूतानि कुण्डलानि दत्त्वा कर्णेनापूर्वा दानशूरता प्रकटीकृता। तामधिकृत्य कृतं नाटकम् ॥"

याचा अर्थ कुंडलांचे शब्दांनी दान केल्यानंतर कर्णाला त्यांचे ओझे वाटू लागले. त्यांचे दान करून त्याने अपूर्व दानशूरता प्रकट केली. कवच-कुंडलाचे दान हे नाटकाचे मुख्य उद्दिष्ट असल्यामुळे दान दिल्यानंतर नाटक समाप्त झाले आहे. इ. परंतु हे स्पष्टीकरण उघड उघड प्रामादिक आहे. कर्णाच्या शरीरावर कुंडले जन्मापासूनच होती. त्यामुळे त्यांचे ओझे व्हायचे कारण नाही. दुसरे म्हणजे इंद्राने ती मागितल्यावर कर्णाने ती लगेच देऊन टाकली आहेत. तेव्हा दरम्यानच्या काळात त्यांचे ओझे झाले अशी कल्पना करण्यात हशील नाही.

शिवाय संस्कृतमध्ये दिलेल्या स्पष्टीकरणात व्याकरणाची चूक आहे. तेथे बहुवचनाऐवजी द्विवचन हवे होते.

डॉ. पुसाळकर आणखी असे सांगतात की या नाटकास 'कवचाङ्क नाटक' असे दुसरे नाव एका हस्तलिखितात दिले आहे. त्यावरून हे नाटक 'उत्सृष्टिकाङ्क' या प्रकारात मोडणारे आहे. तसेच या नाटकाचा उद्देश तत्कालीन राजपुत्रांच्या मनावर औदार्याचे महत्त्व बिंबवणे हा आहे असेही त्यांनी म्हटले आहे. पण खरे सांगायचे म्हणजे यातील एकही विचार नाटकाच्या अंतरंगावर प्रकाश टाकण्यास उपयोगी नाही.

'भार' या शब्दाचा अर्थही काहींनी मासलेवाईक केला आहे. प्रो. जी. सी. झाला यांनी नाटकाच्या नावाचा अर्थ 'Karna's march' म्हणजे 'कर्णाचे संचलन' असा दिला आहे व विशेष म्हणजे प्रा. चिं. रा. देवधरांनी हा अर्थ स्वीकारून त्याचे स्पष्टीकरणही दिले आहे. आपट्यांच्या शब्दकोशात 'भार' या शब्दाचा अर्थ 'लढाईची धामधूम' (The brunt) असा दिला आहे. डॉ. विंटरनिट्झ यांना मात्र हे अर्थ मान्य नसून त्यांनी 'कर्णभार' या शब्दाचा अर्थ 'कर्णापुढील कठीण कार्य' अथवा 'जबाबदारी' असा केला आहे व तो पुष्कळ अंशी बरोबर आहे.

डॉ. गो. के. भटांनी आपल्या 'Bhasa Studies' या पुस्तकातील 'कर्णभारा'वरील निबंधात (१) कर्णभार या शीर्षकाचा अर्थ (२) ही एकांकिका पूर्ण आहे की अपूर्ण? व (३) ही शोकात्मिका आहे काय? या तीन प्रश्नांची चिकित्सा करून महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यांनी शीर्षकातील 'भार' या शब्दाचा अर्थ ओझे (Burden) असा केला आहे. हे ओझे शारीरिक नसून मानसिक आहे. याचा अर्थ कर्ण हा मानसिक ताणाखाली वावरत आहे, असा होतो. भार हा शब्द ओझे या अर्थाने 'स्वप्नवासवदत्त' या नाटकात दोन ठिकाणी आलेला आहे.

ही एकांकिका संपूर्ण आहे. नाटककाराला कर्णाचे समग्र जीवन चित्रित करावयाचे नाही. त्याने त्याच्या जीवनातील मोजकेच प्रसंग वेचून त्याची कलात्मक गुंफण केली आहे व त्यातून कर्णाच्या मनातील द्वंद्वाचा वेध घेतलेला आहे. त्यामुळे ही एकांकिका अपूर्ण मानण्याचे कारण नाही.

'कर्णभार' ही शोकात्मिका (Tragedy) अथवा शोकात्मिकेच्या बरीच जवळ जाणारी कलाकृती आहे असा डॉ. भटांचा दावा आहे. त्यासाठी त्यांनी

ॲरिस्टॉटलने दिलेल्या शोकांतिकेच्या 'लक्षणा' (Definition) ची चर्चा केली आहे. तिच्यातून शोकात्मिकेची अखेर ही दु:खांत असतेच असे नाही व तिच्यात नायकाचा मृत्यू दाखवलाच पाहिजे असेही नाही, असे दोन निष्कर्ष काढलेले आहेत व ते अत्यंत महत्त्वाचे आहेत.

'कर्णभारा'स रूढ अर्थाने शोकात्मिका कितपत मानता येईल हा मतभेदाचा मुद्दा आहे. डॉ. पुसाळकरांना ही शोकात्मिका वाटत नाही. प्रो. वूल्मर व डॉ. सरूप यांना 'ही शोकांतिका आहे' हे मत मान्य आहे. ही एकांकिका इतकी छोटी आहे की त्यात शोकात्मिकेस आवश्यक असलेले घटक प्रभावीपणे येऊ शकले नाहीत. तथापि यात शोकात्मिकेची बीजे आहेत हे मान्य केले पाहिजे. पहिल्या दोन प्रश्नांचा उलगडा डॉ. भटांनी समाधानकारकरीत्या केलेला आहे. त्यांनी या कलाकृतीचे मर्म अचूक हेरलेले आहे व त्या दृष्टीने त्यांनी केलेले सुंदर इंग्रजी भाषेतील विवेचन अत्यंत वाचनीय आहे.

कर्णाच्या शोकात्म जीनवाचे बीज त्याच्या औदार्यात आहे. औदार्य हा गुण खरा पण त्याचा अतिरेक हा घातक ठरतो. त्याप्रमाणे तो ठरलेला आहे. पण केवळ अतिरिक्त औदार्य हे शोकात्मिकेस पुरेसे साहाय्यक ठरणार नाही हे ओळखून नाटककाराने कर्णाच्या मनोवृत्तीत आणखी रंग मिसळले आहेत. पांडव हे आपले भाऊ आहेत हे त्याला युद्धापूर्वीच समजले आहे. या विचाराने त्याचे मूळचे उदासीन मन पुरते व्यथित झाले आहे.

कर्णाचे औदार्य व इंद्राची स्वार्थी वृत्ती यांची झटापट भासाने विलक्षण चातुर्याने रेखाटलेली आहे. कवच-कुंडलांचे दान करण्यात आपण आपला मृत्यू ओढवून घेत आहोत, याची कर्णाला पुरती जाणीव आहे. तसेच हें कपटजाल आहे याचीही त्याला कल्पना आहे. पण इंद्रावर नैतिक विजय मिळवण्याच्या अट्टहासापोटी त्याने आपल्या जीविताची फिकीर केली नाही.

भासाने इंद्राचे चित्रण मात्र विकृत केले आहे. त्याची हावरट वृत्ती, पक्षपाती वर्तन व प्राकृत-भाषण हे सारे त्याच्यासारख्या देवेंद्राला शोभणारे नाही. तथापि त्यालाही आपल्या वर्तनाचा पश्चात्ताप होतो व तो आपण होऊन शक्ती पाठवून देतो. पण कर्ण मात्र पूर्ण नि:स्वार्थी आहे. तो कवच-कुंडलांच्या मोबदल्यात काही मागत तर नाहीच पण इंद्राने आपणहून पाठवलेल्या शक्तीचाही तो स्वीकार करण्यास तयार होत नाही.

शल्याच्या स्वभावचित्रणात भासाने केलेला बदल नि:संशय कलात्मक आहे. महाभारतातील शल्य हा जाणून बुजून कर्णाचा अपमान व निंदा करतो पण भासाचा शल्य कर्णाला सहानुभूती दाखवतो.

'यत्रासावर्जुनस्तत्रैव चोद्यतां मम रथ:।' हे एकच वाक्य भासाने तीन वेळा वापरलेले आहे. प्रत्येक वेळी हे वाक्य कोणत्या उद्देशाने घातले आहे किंवा या वाक्याने कोणता परिणाम साधला आहे हे तितकेसे स्पष्ट होत नाही. कवच-कुंडलांचे दान दिले इथेच कर्णाचा अंत सूचित झाला आहे. हे मान्य करूनही एक-दोन शंका राहतात. कर्णाला मिळालेल्या शक्तीचा त्यास कोणता उपयोग झाला हे भास आपल्यास सांगत नाही. ही शक्ती त्याने मुद्दाम अर्जुनासाठी राखून ठेवली होती पण ती त्यास नाइलाजाने घटोत्कचावर टाकावी लागली. अशा तऱ्हेने कर्णाचा मृत्यू महाभारतात लांबलेला आहे. म्हणून केवळ अंत सूचित झाला म्हणून ही शोकात्मिका आहे असे म्हणता येत नाही.

अर्थात महाभारताचा संदर्भ बाजूला ठेवला तर अत्यंत प्रभावी शोकात्म एकांकिका निर्माण करण्यात भास यशस्वी झाला आहे, असे म्हणण्यास हरकत नाही.

## ३. दूत-घटोत्कच

'त्रैलोक्यरूप नाटकाचे तंत्र, कथावस्तू, प्रस्तावना व समाप्ती घडवून आणणारा सूत्रधार असलेला विष्णू आपले रक्षण करो' अशी सूत्रधार प्रार्थना करीत आहे. इतक्यात पडद्यामागे गलका ऐकू येतो. त्यावरून असे समजते की कौरव-पांडवांचे युद्ध सुरू झाले आहे. कृष्ण व अर्जुन यांना संशप्तकाच्या सैन्याबरोबरच्या लढाईत गुंतवून कौरवांनी अभिमन्यूस एकटा गाठून ठार केले आहे. प्रेक्षकांना ही हकीकत सांगून सूत्रधार निघून जातो.

धृतराष्ट्र, गांधारी व कौरवांची एकुलती एक मुलगी दु:शला हे प्रवेश करतात. अभिमन्यूचा वध झाल्याचे समजताच धृतराष्ट्र हादरतो. कौरव कुलाचा नाश ओढवला असे त्यास वाटू लागते. दु:शला म्हणते की, ज्या कुणी उत्तरेला (म्ह. अभिमन्यूच्या बायकोला) विधवा केले त्यांनी साऱ्या कौरवांच्या बायकांना वैधव्यच प्रदान केले आहे. अभिमन्यूच्या वधाला जयद्रथ कारणीभूत झाला आहे हे समजल्यावर तर सर्वांच्या दु:खाला पारावार राहात नाही. दु:शला अगदी

वैधव्य प्राप्त झाल्याप्रमाणे शोक करू लागते तर धृतराष्ट्र आपले पुत्र मेले असे समजून तिलांजली द्यायला तयार होतो.

यानंतर दुर्योधन, दु:शासन व शकुनी प्रवेश करतात. अभिमन्यूचा वध झाल्याने दुर्योधन खुशीत आहे. या वधाने कृष्णाचा गर्व उतरला असेल असे त्याला वाटते, तर अभिमन्यूला ठार मारुन आपण भीष्माच्या वधाचा सूड उगवला आहे, असे दु:शासनाचे मत आहे. शकुनी जयद्रथाच्या पराक्रमाची प्रशंसा करतो. धृतराष्ट्रास ही वार्ता सांगून त्यास वंदन करण्याची दुर्योधनाची इच्छा आहे पण शकुनी त्यास अडवतो. त्याला धृतराष्ट्राच्या स्वभावाची पूर्ण कल्पना आहे. पण त्याच्याकडे लक्ष न देता दुर्योधन धृतराष्ट्राला वंदन करतो. मग ते दोघेही नमस्कार करतात; पण धृतराष्ट्र त्यांना आशीर्वाद देत नाही. शंभर भावांत एकुलती एक असलेल्या बहिणीला वैधव्य आणणाऱ्या भावाला कसला आशीर्वाद द्यायचा, असे धृतराष्ट्राचे मत आहे.

अभिमन्यूला एकटे गाठून अनेकांनी मिळून ठार मारले, असे समजताच धृतराष्ट्र, दुर्योधन-शकुनीची निर्भर्त्सना करतो. 'त्यांचे हात तुटून कसे पडले नाहीत' असे तो चिडून उद्गारतो तेव्हा दुर्योधन त्यास समर्पक उत्तर देतो. ''पांडवांनीदेखील कपट योजून (शिखंडीस पुढे उभे करून) भीष्माचा वध केला. त्या वेळी त्यांचे हात तुटून कसे पडले नाहीत?''

यावर धृतराष्ट्र त्यास सांगतो की भीष्म व अभिमन्यू यांच्या वधात फरक आहे. आपणास कोणत्या उपायाने ठार मारावे हे खुद्द भीष्मांनीच पांडवांना सांगितले होते. दुसरे म्हणजे अभिमन्यू हा अर्जुनाचा पहिला मुलगा - कुरुकुलाचा अंकूर होता. त्याचा असा कपटाने वध केल्याचे समजताच अर्जुन साऱ्या कौरवांचे निर्दालन केल्याशिवाय राहणार नाही.

अर्जुनाला तोंड देऊ शकणारे वीर आपल्याही सैन्यात आहेत असे दुर्योधन म्हणतो. त्याने कर्णाचा उल्लेख करताच धृतराष्ट्र त्याच्याबद्दल तुच्छ उद्गार काढतो. त्याच्या मते कर्णाची कवचकुंडले इंद्राने हिरावून नेली आहेत, त्याने कपटाने विद्या प्राप्त करून घेतली आहे. असा कर्ण अर्जुनासमोर टिकाव धरणे शक्य नाही.

शकुनी यावर बोलू लागताच धृतराष्ट्र त्याचीही कानउघाडणी करतो. कुरुकुलाच्या विनाशाला पर्यायाने शकुनी हाच जबाबदार आहे. त्याच्या कपट-द्यूताने चेतवलेला वैराग्नी आता मुलांनाही सोडत नाही. यानंतर दूत येऊन सांगतो की पुत्रवधाच्या शोकाने संतप्त झालेल्या अर्जुनाने प्रतिज्ञा केली आहे की, ज्याने

अभिमन्यूचा घात केला आहे त्याचा व त्याच्या मृत्यूने जे हर्षभरीत झाले आहेत त्यांचा मी उद्या संध्याकाळपर्यंत नि:पात केल्याशिवाय राहणार नाही. अन्यथा गांडीव धनुष्यासहित अग्नीत प्रवेश करून प्राणार्पण करीन.

त्याची प्रतिज्ञा ऐकल्यावर दुर्योधन जयद्रथाला लपवून ठेवायचे ठरवतो पण धृतराष्ट्र त्याला सांगतो की कृष्ण ज्याचा साहाय्यक आहे अशा अर्जुनाचे बाण पृथ्वीच्या पोटात लपलेल्या किंवा आकाशात उडून जाणाऱ्या माणसाचादेखील शोध घेतल्याशिवाय राहणार नाहीत. धृतराष्ट्राचे असले अवसानघातकी व परधार्जिणे बोलणे ऐकून रक्षकासदेखील संताप येतो. धृतराष्ट्राखेरीज दुसऱ्या कोणी असे उद्‌गार काढले असते तर त्याचे प्राण क्षणभरदेखील शिल्लक राहिले नसते.

यानंतर घटोत्कच रंगभूमीवर प्रवेश करतो. कृष्णानेच त्याला निरोप देऊन पाठवलेले असते. तो निरोप असा : एका मुलाचा नाश झाल्यावर अर्जुनाची अशी अवस्था झाली आहे तर शंभर मुलांचा नाश झाल्यावर धृतराष्ट्राची काय अवस्था होईल? तरी दुर्योधनाने ताबडतोब युद्ध थांबवावे नाही तर पुत्रशोकाने भडकलेला हा अग्नी संपूर्ण कौरवांचा नाश केल्याशिवाय राहणार नाही.

घटोत्कच व दुर्योधन यांच्यात बोलाचाली होते. मग दुर्योधन घटोत्कच हा दूताच्या मर्यादेचे उल्लंघन करीत आहे, असा स्पष्ट आरोप करतो. तो जरी राक्षसीचा पुत्र असला तरी कौरवदेखील राक्षसासारखेच भयंकर आहेत असे तो घटोत्कचाला बजावतो. तेव्हा घटोत्कच म्हणतो,

"राक्षसांनी आपल्या भावांना लाखेच्या घरात कोंडून जाळायचा प्रयत्न केला नाही. भावाच्या पत्नीचे केस धरून तिला सभेत ओढत आणले नाही. त्यांनी कधी लहान मुलास युद्धात एकटे गाठून ठार केले नाही. राक्षस दिसायला भयंकर असतील पण ते निर्दय अंत:करणाचे नाहीत."

(अंक १. श्लोक ४७)

त्याचे हे बोलणे ऐकून दुर्योधनाचा संताप अनावर होतो. दोघे हातघाईवर येतात. धृतराष्ट्र दोघांना शांत करतो. अखेरीस दुर्योधन कृष्णाच्या निरोपास उत्तर देतो : 'शब्द वाढविण्यात अर्थ नाही. तुझ्या धमकीचा कौरवांवर काही परिणाम होणार नाही. तू खुशाल पांडवांसमवेत राहा. मी तुला माझ्या बाणांनीच उत्तर देईन.'

त्याचा निर्वाणीचा संदेश ऐकताच घटोत्कच उठतो व धृतराष्ट्राचा निरोप घेऊन निघून जातो आणि भरतवाक्यानंतर नाटक समाप्त होते.

हे एकांकी नाटक म्हणावे तसे चांगले उतरलेले नाही. यातील घटोत्कचाचे दूतकर्म हे स्वाभाविक वाटत नाही. एक तर महाभारतामध्ये त्याने दूतकर्म केल्याचा कोठे उल्लेख नाही. दुसरे म्हणजे एकदा युद्ध जुंपल्यावर व त्यात भीष्म व अभिमन्यूसारख्या अद्वितीय वीरांची आहुती पडल्यावर युद्ध थांबणे अवघडच होते. तसेच पुत्रशोकाने वेडा झालेला अर्जुन सूड घेतल्याशिवाय राहिला नसता. त्यामुळे मध्येच हे युद्ध थांबवण्याचा कृष्णाचा हा उद्देश अनाठायीच होता असे म्हणावे लागते. त्यामुळे हे नाटक मनाची पकड घेऊ शकत नाही.

नाटककाराने धृतराष्ट्राचे चित्रण वेगळ्या रंगात केले आहे. तो सरळ अंत:करणाचा असून त्याला हा आपापसातला झगडा मान्य नाही. कौरवांनी अभिमन्यूला एकटे गाठून कपटाने ठार केल्याचे समजताच तो व्यथित होतो. इतकेच नव्हे तर तो दुर्योधनाची स्पष्ट शब्दांत निर्भर्त्सना करतो. सत्तेपुढे शहाणपण चालत नसल्याने तो अगतिक झाला आहे. पण त्याचे अगदीच धीर सोडून बोलणे खटकल्याशिवाय राहात नाही. त्याचे अवसानघातकी व परधार्जिणे बोलणे ऐकून रक्षकालादेखील संताप येतो. दुःशलेचे बोलणेही याच मासल्याचे आहे. ती तर अगदी नवरा मेल्याप्रमाणेच शोक करायला लागते. असली चित्रे रेखाटून भासाने काय साधले हे समजत नाही.

ही एकांकिका कोणत्या प्रकारात मोडते याबाबत विद्वानांत मतभेद आहेत. डॉ. कीथ यांच्या मते ही 'व्यायोग' या प्रकाराखाली येते तर डॉ. पुसाळकरांना ही 'उत्सृष्टिकांक' या प्रकारची आहे असे वाटते. डॉ. रमाशंकर त्रिपाठींनी दुसऱ्या मतास दुजोरा दिला आहे. पण दोन्ही प्रकाराची लक्षणे हिला लागू होत नाहीत. भरतवाक्याबाबतही घोटाळ्याची स्थिती आहे. प्रचलित श्लोकास भरतवाक्य मानता येत नाही. सारांश, या एकांकिकेत वाखाणण्यासारखा एकही गुण आढळत नाही. 'कर्णभारा'नंतर जर भासाने हिची रचना केली असेल तर त्याची प्रतिभा मंदावली होती असे म्हणावे लागेल.

## ४. ऊरुभङ्ग

या एकांकिकेत दुर्योधनाची अखेर चित्रित केली आहे. कौरव-पांडवांचे युद्ध संपत आलेले आहे. कौरवांच्या पक्षातील एकटा दुर्योधनच काय तो जिवंत राहिला आहे. पांडवांच्या पक्षाचीही बरीच हानी झाली आहे. आता लवकरच

भीम व दुर्योधन यांच्यात गदायुद्ध सुरू होणार आहे. येथे एकांकिकेस प्रारंभ झाला आहे.

आरंभी विष्कंभक घातलेला आहे. यात तीन सैनिक युद्धभूमीचे वर्णन करीत आहेत. त्यावरून रणांगणावर सैनिक, हत्ती व घोडे यांच्या प्रेतांचा खच पडला आहे. रक्ताचे पाट वाहात आहेत. घोडे रिकामे रथ ओढत आहेत. रिकामे हत्ती भटकत आहेत.

मग भीम व दुर्योधन यांचे गदायुद्ध सुरू होते. द्रौपदीच्या अपमानामुळे भीम संतापलेला होता तर इतर सर्व भावांचा नाश झाल्याने दुर्योधन क्रुद्ध झाला होता. दोघे एकमेकांवर गदेचे प्रहार करू लागले. दुर्योधनाच्या प्रहाराने भीमाच्या कपाळावरून रक्त ओघळू लागले. त्याचे दोन्ही खांदे फुटले. रुंद छाती रक्ताने भरून गेली.

भीमाची ताकद अफाट असली तरी दुर्योधन युद्धात तरबेज होता. त्याच्या जबरदस्त प्रहारासरशी भीम जमिनीवर कोसळला. ते पाहून व्यासमुनी चकित झाले. धर्मराजाचा चेहरा काळवंडला. विदुराच्या डोळ्यांत आसवे उभी राहिली. अर्जुनाने आपले गांडीव धनुष्य सरसावले. कृष्ण खिन्न होऊन आकाशाकडे पाहू लागला. गदायुद्ध पाहायला आलेला बलराम मात्र आपल्या शिष्यावर दुर्योधनावर प्रसन्न होऊन नांगर फिरवू लागला.

दुर्योधन खाली पडलेल्या भीमाचा उपहास करू लागला. कृष्णाने आपल्या मांडीवर थाप मारून भीमाला इशारा दिला. भीमाला पुन्हा अवसान आले. पुन्हा दोघांचे युद्ध जुंपले आणि त्यात गदायुद्धाचे नियम मोडून भीमाने दुर्योधनाच्या मांड्यांवर गदेचा प्रहार केला. त्याबरोबर दुर्योधन खाली कोसळला. दुर्योधन खाली पडताच व्यासमुनी एकाएकी अदृश्य झाले. बलरामाचा संताप अनावर झाला. कृष्ण व इतर पांडवांनी हाताचा पिंजरा करून भीमाला बाजूला केले. येथे विष्कंभक समाप्त झाला आहे.

मुख्य प्रवेशात खवळलेला बलराम प्रवेश करतो. तो आपल्या नांगराच्या फाळाने भीमाचे वक्षस्थल फोडण्यास सज्ज झालेला आहे. मांड्या भग्न झालेला दुर्योधन खुरडत रंगभूमीवर येतो व बलरामाचा क्रोध शांत करू लागतो. त्याच्या वृत्तीत पालट झाला आहे. शंभर भावांचा नाश झाल्यावर व स्वत:ची अशी अवस्था झाल्यावर त्याला सूड घेण्याची कल्पना रुचत नाही. भीमाच्या गदारूपी दैवानेच आपला नाश केला याची त्याला जाणीव झाली आहे. तो म्हणतो -

ज्याने इंद्राचा पारिजात वृक्ष व स्वाभिमान हिरावून घेतला, हजारो वर्षे सागराच्या पोटात निद्रा घेतली त्या कृष्णानेच जणू भीमाच्या गदेत प्रवेश केला आणि युद्धाची इच्छा करणाऱ्या मला यमाच्या भेटीला पाठवले.''

(श्लोक ३५)

यानंतर धृतराष्ट्र, गांधारी, दुर्योधनाच्या स्त्रिया व त्याचा लहान मुलगा दुर्जय हे त्या ठिकाणी येतात. आता मात्र दुर्योधनाचे दुःख अनावर होते. गदेच्या प्रहाराने झालेल्या दुःखापेक्षा आपल्या स्त्रियांनी उघड्या माथ्याने रणभूमीवर येऊन शोक करावा, या गोष्टीने त्याचे अंतःकरण पिळवटून येते. धृतराष्ट्र आपल्या मुलाला हाका मारतो. आपल्याला डोळे नाहीत, याचे खरे दुःख या वेळी त्याला होते. गांधारीच्या डोळ्यावरील पट्टी तर सतत ओघळणाऱ्या अश्रुधारांनी भिजून चिंब झाली आहे.

धृतराष्ट्राला पाहताच दुर्योधन वंदन करण्यासाठी उठू लागतो. पण लगेच खाली कोसळतो. त्याचा मुलगा दुर्जय आपल्या बालसुलभ वृत्तीने त्याच्या मांडीवर बसू लागतो. पण त्याचे नेहमीचे आसन आज पुरते भग्न झालेले आहे. शोकावेगाने धृतराष्ट्र खाली पडतो. दुर्योधन त्याची समजूत घालू लागतो. आपल्याला वीरमरण आल्यामुळे शोक करण्याचे कारण नाही असे तो म्हणतो. तसेच तो गांधारीला म्हणतो,

''आई, तुला वंदन करून सांगतो की, जर माझ्या हातून काही पुण्य घडलेले असेल तर पुढील जन्मीदेखील तू माझी आई हो.''

(श्लोक ५०)

नंतर अश्वत्थामा त्या ठिकाणी येतो. दुर्योधनाची अवस्था पाहून त्याला अतीव दुःख होते. तो जवळ जाऊन त्याची विचारपूस करतो व संतप्त होऊन कृष्णासहित पांडवांचा विनाश करण्याचा निर्धार व्यक्त करतो. तेव्हा दुर्योधन त्याला धनुष्याचा त्याग करण्यास सांगतो. दुर्योधनाचे बोलणे ऐकून भीमाच्या गदेच्या प्रहाराने त्याच्या नुसत्या मांड्यांचाच नव्हे तर स्वाभिमानाचाही चुराडा झाला आहे असे अश्वत्थाम्यास वाटते. ही गोष्ट खोटी नाही. अंतसमय जवळ येऊ लागताच दुर्योधनास आपली दुष्कर्मे आठवू लागतात. त्याचे अंतःकरण पश्चात्तापाने पोळू लागते.

तथापि रात्री पांडवांच्या शिबिरावर हल्ला करून त्यांचा घात करण्याचा त्याचा निर्धार कायम आहे. धृतराष्ट्रास ही कपटघाताची कल्पना पसंत पडत नाही.

अश्वत्थामा दुर्जयास जवळ घेतो व "तू आमचा अभिषेकावाचून राजा आहेस" असे म्हणतो. त्याच्या बोलण्याने दुर्योधनाला बरे वाटते. तो आपले प्राण सोडतो. धृतराष्ट्र राज्य सोडून अरण्यात जाण्याचा निश्चय करतो. अश्वत्थामा पांडवांचा नाश करण्यासाठी जावयास निघतो व इथेच नाटक समाप्त होते.

ही एकांकिका 'उत्सृष्टिकांक' या नाट्यप्रकारात मोडते. या शब्दाचे स्पष्टीकरण हेमचंद्राने 'ज्याची सृष्टी म्हणजेच पती अथवा घरातील कर्ता पुरुष मरण पावल्याने स्त्रिया शोक करतात' असे दिले आहे. साहित्यदर्पणात दिलेल्या याच्या लक्षणावरून यात एक अंक असतो. कथा ऐतिहासिक प्रसंगावर आधारलेली असते. करुणरसास प्राधान्य असून स्त्रियांनी केलेला शोक हे याचे वैशिष्ट्य असते. सदर वैशिष्ट्ये थोड्याफार प्रमाणात या एकांकिकेस लागू पडतात.

या नाटकाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे 'ऊरुभंग' ही महत्त्वपूर्ण घटना व तिचा दुर्योधनाच्या अंत:करणावर झालेला परिणाम दर्शविणे हे आहे. त्यामुळे हे नाटक 'दुर्योधनाचे' झाले आहे आणि ते तसे व्हावे या दृष्टीने नाटककाराने जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. एकदा दुर्योधनास नायक मानले म्हणजे त्याचा मृत्यू दर्शविल्यामुळे ही एकांकिका शोकात्मिकेच्या जवळ पोहोचली आहे.

या एकांकिकेवरून दुर्योधनाची अनेक वैशिष्ट्ये लक्षात येतात. गदायुद्धात तो भीमापेक्षा निपुण आहे. त्यामुळे कृष्णाला भीमाला त्याच्या मांड्यांवर प्रहार करण्याची सूचना द्यावी लागते. मुख्य प्रवेशात त्याचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे उजळलेले आहे. त्याचे आईवडील, दोन राण्या व मुलगा त्याचा शोध करीत रंगभूमीवर येतात तेव्हा कारुण्याची परमावधी होते. बलरामाचा राग तोच शांत करतो. आईला "पुढील जन्मी तूच माझी माता हो" असा अंत:करणाला पीळ पाडणारा उद्‌गार काढतो. या सर्वांमधून त्याने दुर्योधनालाच नायकत्व बहाल केलेले दिसून येते.

डॉ. गो. के. भटांच्या मते ही खरी शोकात्मिका (Tragedy) आहे. तथापि त्यांच्या मताशी सहमत होणे कठीण आहे. वास्तविक पाहता शोकात्मिका ही थोर पुरुषाच्या बाबतीत संभवते. भासाने कितीही रंग-सफेदी केली असली तरी दुर्योधन व कर्ण यांना थोर पुरुष मानणे पटणारे नाही. त्यामुळे त्यांच्या मृत्यूने हादरा बसावा असे दु:ख होत नाही. म्हणूनच कर्णभार काय किंवा प्रस्तुतची ऊरुभंग ही एकांकिका काय या शोकात्मिकेच्या कसोटीस उतरत नाहीत, असो.

ऊरुभंगाची शैली समासप्रचुर व प्रसंगी अत्यंत बोजड आहे. त्यावरून हे

भासाचे नाटक नसावे असा काहींचा तर्क आहे. तथापि नाटकाचा 'युद्ध' हा विषय व युद्धाचे निवेदन यामुळे शैली क्लिष्ट झाली असावी. तसेच हे सुरुवातीच्या काळातील नाटक असल्याने तिच्यात सफाई कमी आहे. त्यामुळे हे भासाचे नाटकच नसावे असे म्हणण्यात हशील नाही. एरव्ही भासाच्या नाट्यरचनेची अनेक वैशिष्ट्ये यात आढळतात. जनमानसात दुष्ट ठरलेल्या व्यक्तीच्या अंतरंगावर प्रकाश टाकून त्यातील 'माणूस' शोधणे हे मुख्य वैशिष्ट्य यात आढळत असल्याने ही एकांकिका भासाचीच आहे यात शंका नाही.

## ५. मध्यमव्यायोग

त्रिभुवनावर आक्रमण करणाऱ्या आकाशरूपी सागरावर इंद्रनील मण्याच्या सेतूप्रमाणे शोभणाऱ्या श्रीहरीच्या चरणास वंदन करून भासाने प्रस्तुत एकांकिकेस प्रारंभ केला आहे.

यात केशवदास नावाचा एक ब्राह्मण आपली बायको व तीन मुले यांना घेऊन आपल्या यज्ञबंधू नामक मामाच्या मुलाच्या उपनयनासाठी घोर अरण्यातून निघालेला आहे. पांडवांचा आश्रमही तेथे जवळपास आहे. त्याच वनात भीमाची भूतपूर्व पत्नी हिडिंबा आपल्या घटोत्कच नामक मुलाबरोबर राहात आहे. तिने आपला उपवास सोडण्यासाठी एखादा मनुष्य धरून आणण्यासाठी घटोत्कचास सांगितले आहे. त्यानुसार घटोत्कच ब्राह्मण कुटुंबास अडवतो व आपल्या आईसाठी एका पुत्राची मागणी करतो.

पांडवांचा आश्रम जवळच असल्याने ते आपले रक्षण करतील अशी केशवदासाला आशा वाटत होती. पण त्याचा थोरला मुलगा सांगतो की ते शतकुंभ नामक यज्ञाचा सोहळा पाहण्यासाठी धौम्य ऋषींच्या आश्रमाकडे गेले आहेत. पण त्यांनी आश्रमाचे रक्षण करण्यासाठी भीमास ठेवलेले आहे.

मग केशवदास नाइलाजाने आपल्या मधल्या मुलास देऊ करतो. तो आई-वडिलांना नमस्कार करतो आणि जलाशयावरून पाणी पिऊन येण्याची घटोत्कचास परवानगी मागतो. घटोत्कच त्याला जाऊ देतो. ब्राह्मण व त्याचे कुटुंब शोकाकुल होते. बिचाऱ्या केशवदासाच्या वंशरूप पर्वतास तीन शिखरे होती पण आता मधले शिखर मोडल्याने त्याच्या अंत:करणाला यातना होऊ लागतात.

त्या मधल्या मुलास परत येण्यास उशीर होऊ लागताच घटोत्कच त्यास 'अरे मध्यमा' अशी मोठ्याने हाक मारतो. त्याची आरोळी साऱ्या अरण्यात दणाणते. तो आवाज भीमाच्या कानावर पडतो. अर्जुनाच्या आवाजाचे अनुकरण करणारा स्वर ऐकून तो रोमांचित होतो आणि तो 'कोण हाका मारीत आहे?' असा प्रश्न करीत प्रवेश करतो.

येथे भीमास 'मध्यम' असे म्हटलेले आहे. भीम व घटोत्कच हे पिता-पुत्र एकमेकास पाहतात. घटोत्कचाची सिंहाप्रमाणे ऐट, लाल डोळे, गंभीर आवाज, ससाण्याच्या चोचीसारखे नाक व सोनेरी चमकदार केस पाहून राक्षस स्त्रीच्या पोटी जन्मास आलेला हा मुलगा एखाद्या लोकोत्तर वीराचा असावा असा त्याचा तर्क होतो, तर भीमसेनास पाहून घटोत्कचही चकित होतो.

मग भीम आपण 'मध्यम' असल्याचे सांगतो. त्याचे बोलणे ऐकून तो भीमसेन असावा हे केशवदास ओळखतो. त्याच वेळी त्याचा मध्यम पुत्रही पाणी पिऊन येतो. केशवदास भीमाला आपल्या पुत्राची सुटका करण्याची विनंती करतो. मग भीम घटोत्कचास त्या निरपराध ब्राह्मण-कुटुंबास सोडण्याचा हुकूम देतो पण घटोत्कच त्यास साफ नकार देतो. आपण आपल्या आईच्या आज्ञेनुसार या ब्राह्मणपुत्रास धरले आहे असे सांगतो. मग भीम त्याला त्याच्या आईचे नाव विचारतो. त्याच्या उत्तरावरून त्याची आई म्हणजे आपली पूर्वपत्नी हिडिंबा आहे व हा आपलाच पुत्र आहे हे भीमास समजते. आपल्या पुत्राच्या अनपेक्षित भेटीने भीमाला आनंद होतो पण घटोत्कचास मात्र काही बोध होत नाही.

मग भीम त्या मध्यम ब्राह्मणपुत्राऐवजी आपण स्वतःच घटोत्कचाबरोबर जावयाचे ठरवतो. पण वरकरणी त्यास खिजवतो. दोघे मल्लयुद्ध करू लागतात. घटोत्कच त्यास अवघड पेच घालतो. पुत्राची शक्ती पाहून भीम आनंदित होतो व म्हणतो - 'अरे दुर्योधना, तुझा शत्रुपक्ष वाढत आहे. सांभाळ.' असे म्हणून चटकन आपली सुटका करून घेतो. थोडा वेळ लढाई झाल्यावर भीम त्याच्या बरोबर हिडिंबेकडे जाण्यास निघतो.

घरासमीप येताच घटोत्कच आत जातो व हिडिंबेस घेऊन बाहेर येतो. समोर भीम दिसताच हिडिंबा आनंदित होते आणि घटोत्कचास "मुला, हे तर आपले दैवत आहे." असे सांगून त्यास भीमाला नमस्कार करायला लावते. भीम त्यास आशीर्वाद देतो. केशवदासालाही हा भीमाचा मुलगा असल्याचे समजते. सर्वांचा निरोप घेऊन ते ब्राह्मण-कुटुंब आपल्या पुढील प्रवासास निघते. भीम

हिडिंबेस 'हा काय प्रकार आहे?' असे विचारतो तेव्हा ती त्याच्या कानात काही तरी सांगते आणि ही एकांकिका येथे समाप्त होते.

यातील कथानकावर शुन:शेपाच्या कथेची व महाभारतातील बकासुराच्या आख्यानाची दाट छाया पडलेली आहे. पहिल्या कथेत हरिश्चंद्राचा पुत्र रोहित यास वरुणास देऊ केलेले असते. तो अजीगर्त नायक ब्राह्मणाचा पुत्र शुन:शेप यास खरेदी करतो व आपल्या ऐवजी त्यास वरुणाच्या स्वाधीन करतो. अजीगर्तास तीन मुले असतात. तो द्रव्याच्या लोभाने आपल्या मुलाची विक्री करतो असे दर्शविले आहे. महाभारतातील बकासुराख्यानात बकासुरास रोजच्या आहारासाठी तीस मण तांदळाचा भात, दोन रेडे व एक आख्खा माणूस लागत असे. त्या गावात दररोज एका घरातील मनुष्य पाठवला जाई. एके दिवशी पांडव ज्यांच्या घरी आश्रयास होते त्या घरातील व्यक्तीची पाळी आली तेव्हा कुंतीने भीमास पाठवण्याचे ठरवले, असा कथाभाग आहे.

भासाने दोन कथांचे बेमालूम मिश्रण केले आहे. पण काही चांगले बदलही केले आहेत. शुन:शेपाच्या कथेत अजीगर्त हा द्रव्याच्या लोभाने आपल्या मुलाची विक्री करतो असे दाखवले आहे. पण भासाचा केशवदास हा प्रेमळ आहे. तो नाइलाजापोटी आपल्या मुलास स्वाधीन करतो. तसेच महाभारतात भीम व हिडिंबा यांच्या विवाहाचा उल्लेख आहे. एक पुत्र होईपर्यंतच तिच्याजवळ राहण्याचे भीमाने मान्य केले होते पण त्यानंतर तिची व भीमाची भेट झाल्याचा उल्लेख नाही. पण भासाने येथे उभयतांचे पुनर्मीलन घडवून आणले आहे.

पिता आणि पुत्र यांना परस्परांचे ज्ञान नसल्यामुळे अकस्मात युद्ध होणे, हाही एक विशेष येथे आढळतो. रुस्तुम-सोहराब, अर्जुन-बभ्रुवाहन यांच्या प्रमाणे येथेही भीम व घटोत्कच यांच्यात झटापट झाली आहे. पण भीमास हा आपलाच मुलगा आहे, हे ठाऊक असल्याने येथील लढाई लुटुपुटूची आहे इतकेच.

नाट्यकथेचे पर्यवसान भीम व हिडिंबा यांच्या पुनर्मीलनात झाले आहे. डॉ. ए. बी. कीथ यांच्या मते हिडिंबेनेच भीमाची भेट व्हावी म्हणून घटोत्कचास माणूस आणण्यास सांगितले होते. नाटकाच्या अखेरीस हिडिंबा भीमाच्या कानात 'काही तरी' सांगते. ती सूचना महत्त्वाची मानून हा विचार पुढे आला आहे. डॉ. गो. के. भटांनीही या विचारास पुष्टी दिली आहे. तथापि भासाने हे स्पष्ट केलेले नाही. त्याची सूचना संदिग्ध आहे. एक तर यातील साऱ्या घटना योगायोगाने

घडलेल्या आहेत. एकही घटना पूर्वनियोजित नाही. तर मग हिडिंबेने हा बनाव घडवून आणला हे कसे मान्य होईल?

'मध्यम व्यायोग' या नावाचे औचित्य समजणे फारसे कठीण नाही. यात दोन 'मध्यम' एकत्र आलेले आहेत. तसेच ही 'व्यायोग' या प्रकारची एकांकिका आहे. साहित्यशास्त्रात सांगितलेल्या लक्षणानुसार व्यायोगातील कथा प्रसिद्ध कथानकावर आधारलेली असते. यात एकच अंक असतो. मुख्य म्हणजे यात होणारे युद्ध हे स्त्रीच्या प्राप्तीसाठी असत नाही. धनंजयाच्या मते यात प्रमुख, प्रतिमुख व निर्वहण अशा तीनच संधी असतात. यातील कथानक एकाच दिवसात संपणारे असते. प्रस्तुत एकांकिकेत स्थल, काल आणि क्रिया या तीनही प्रकारचे ऐक्य (Unities) चांगल्या प्रकारे साधलेले आहे. हिच्यात अनेक दुर्मिळ गोष्टींचा संगम झालेला असल्याने ही भासाची सर्वोत्कृष्ट एकांकिका आहे असे म्हणावयास हरकत नाही.

## ६. पंचरात्र

नांदी श्लोकात भगवान श्रीकृष्णाचे वर्णन द्रोण, अर्जुन, भीम, शकुनी, दुर्योधन इत्यादी नाटकातील पात्रांची नावे गुंफून केले आहे. या प्रकारास मुद्रालंकार असे नाव आहे. हे तीन अंकी नाटक आहे. पहिल्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक असून त्यात दुर्योधनाने हस्तिनापुरात यज्ञ आरंभिल्याचे सांगितले आहे. पांडवांच्या अज्ञातवासाची एक वर्षाची मुदत संपत आली आहे.

मुख्य प्रवेशात प्रारंभी भीष्म-द्रोण व नंतर दुर्योधन, कर्ण व शकुनी प्रवेश करतात. आपल्या हातून यज्ञ पार पडल्याने दुर्योधन आनंदित झाला आहे. आपल्या हातून कपट-द्यूताचे जे पातक घडले त्याचेच जणू या यज्ञाने क्षालन झाले, असे त्याला वाटते. तसेच स्वर्ग हा मृत्यूनंतर मिळत नसून तो सत्कृत्यांच्या योगे इहलोकातच अनुभविता येतो, अशी त्याची समजूत आहे.

दुर्योधनभीष्माचार्य व द्रोणाचार्य यांना वंदन करतो. त्या दोघांच्या मनात दुर्योधनाने आता पांडवांना राज्याचा अर्धा वाटा देऊन वैर संपुष्टात आणावे असे आहे. दुर्योधन द्रोणाचार्यांना दक्षिणा मागण्याची विनंती करतो तेव्हा ते म्हणतात -

''निराधार झालेले पांडव बारा वर्षे वनात वणवण भटकत आहेत. आता ते कोठे आहेत हेही समजत नाही. तरी तू राज्याचा वाटा त्यांना देऊन टाकावास. हीच मला भिक्षा घाल व हीच माझी दक्षिणा समज.''

(अंक १ श्लोक ३३)

विश्वासाने गुरुदक्षिणा देऊ इच्छिणाऱ्या दुर्योधनास आचार्यांनी पेचात पकडल्याचे पाहून शकुनीला राग येतो. ही धर्मवंचना आहे असे तो स्पष्ट म्हणतो. भीष्माचार्य द्रोणाची बाजू घेऊन शकुनीचे म्हणणे खोडून काढतात. त्यांच्या मते शकुनीने केलेल्या कारस्थानामुळेच पांडवांना वनवास भोगावा लागत आहे. आचार्यांच्या या विधानाने वादाची ठिणगी पडते. दोन्ही पक्ष भांडू लागतात.

मग दुर्योधन सांगतो की आपण आचार्यांच्या दक्षिणेबाबत शकुनीशी सल्लामसलत करणार आहे. शकुनी दुर्योधनास 'राज्याचा वाटा देऊ नकोस' असा सल्ला देतो आणि ''दुर्योधनाच्या मनात राज्य देण्याची इच्छा असेल तर त्याने आमच्यासारख्याशी सल्लामसलत करण्याची गरज नाही. त्याने अर्धेच का सगळेच राज्य देऊन टाकावे,'' असे स्पष्ट सांगतो.

मग दुर्योधन कर्णाला सल्ला विचारतो. तेव्हा कर्ण त्यास स्पष्ट सांगतो की, 'पांडवांना राज्याचा वाटा द्यावयाचा की नाही याचा निर्णय स्वत: घ्यावयाचा आहे. माझ्यासारख्याचे काम त्याला लढाईत साहाय्य करणे हे आहे. सल्ला देणे नव्हे.' अखेरीस दुर्योधन आचार्यांच्या हातावर दानोदक सोडायचे ठरवतो. तेव्हा शकुनी दुर्योधनाच्या वतीने त्यांना एक अट घालतो. ती अट अशी, 'जर आजपासून 'पाच रात्री' उलटण्याच्या आत तुम्ही पांडवांचा शोध घेतलात तर राज्याचा वाटा दुर्योधन देऊन टाकील.'

शकुनीची अट ऐकून भीष्म-द्रोण बुचकळ्यात पडतात. गेल्या बारा वर्षांत ज्यांचा पत्ता लागला नाही ते आता पाच दिवसात कसे सापडणार होते? पण त्यांच्या सुदैवाने विराट नगरीतून एक दूत येतो. त्याच्या तोंडून असे समजते की विराट नगरीत एका बलशाली पुरुषाने एका रात्रीत शंभर कीचकांचा शस्त्रावाचून वध केला. या दु:खद घटनेमुळे राजा विराट दुर्योधनाच्या यज्ञास उपस्थित राहू शकला नाही. ही बातमी ऐकताच भीष्माचार्य आनंदित होतात. हे कृत्य भीमाचेच असले पाहिजे असा तर्क करून ते द्रोणाचार्यांना शकुनीची अट मान्य करण्यास सांगतात. पांडवांचा पत्ता लागण्याची शक्यता दिसताच द्रोणाचार्य 'पाच रात्री' मध्ये पांडवांना शोधून काढण्याची अट मान्य करतात.

मग भीष्माचार्य विराटनगरीवर आक्रमण करण्याचा प्रस्ताव मांडतात. आचार्य द्रोणांना त्यामागचा हेतू उमगत नाही. तेव्हा भीष्माचार्य त्यांना एका बाजूला घेऊन सांगतात -

''आचार्य, आपली बुद्धी सरळ आहे. पांडव विराटाशी कृतज्ञ आहेत. रथाचा घोर आवाज कानी पडताच ते संतापतील. तेव्हा विराटाच्या गाई हरण करण्याने आम्हास हवे ते फळ लाभणार आहे.''

(अंक १ श्लोक ५५)

विराटावर आक्रमण करण्याचा प्रस्ताव मंजूर होऊन सैन्य सज्ज करण्याचा आदेश देण्यात येतो. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. एक वृद्ध गवळी प्रवेश करतो. राजा विराटाचा जन्मदिवस असल्याने तो गौळीवाड्यास भेट देणार असल्याचे सांगतो. इतक्यात दूरवर धुरळा उडलेला दिसतो. पाठोपाठ शंख-नगारे यांचा आवाज येऊ लागतो. बाणांचा वर्षाव सुरू होतो. पळापळ होऊ लागते. परचक्राची वार्ता सांगण्यासाठी तो वृद्ध गवळी विराटाच्या वाड्याकडे जातो.

मुख्य प्रवेशात जयसेन नामक वीर येऊन कौरवांनी गौळीवाड्यावर हल्ला केल्याची वार्ता विराट राजास सांगतो. मग विराट या बाबतीत हस्तिनापुरात पूर्वी राहात असलेल्या भगवान नामक ब्राह्मणास - म्ह. ब्राह्मणवेषात राहात असलेल्या युधिष्ठिरास विचारतो. ती बातमी ऐकून युधिष्ठिर चिंताग्रस्त होतो. कारण लढाई जर सुरू झाली तर आपले भाऊ तिच्यात भाग घेतल्याशिवाय राहणार नाहीत. मग आपला गौप्यस्फोट झाल्यासारखाच आहे.

भगवान (म्ह. युधिष्ठिर) विचारमग्न झालेला पाहून विराट म्हणतो - ''युधिष्ठिराने दुर्योधनाचा अपराध सहन केला असेल पण मी मात्र त्याला शासन केल्यावाचून राहणार नाही.'' इतर भीष्म-द्रोण इत्यादी आले आहेत असे समजताच भगवानास अचंबा वाटतो. आपल्या अज्ञातवासाची मुदत संपत आल्याची सूचना देण्यासाठी तर ते आले नाहीत ना? अशी त्याला शंका येते.

विराट आपला रथ सज्ज करण्यास सांगतो पण सूत येऊन सांगतो की, कुमार उत्तर तो रथ घेऊन रणभूमीकडे गेला आहे. तसेच बृहन्नला (स्त्री वेषात रहाणारा अर्जुन) त्याचे सारथ्य करीत आहे. नंतर अशी वार्ता येते की कुमार उत्तराचा रथ शत्रूने घेरला तेव्हा तो रस्ता सोडून स्मशानाकडे भरधाव वेगाने दौडत गेला. हे ऐकून अर्जुनाने आपले गांडीव धनुष्य येथे ठेवले असल्याचे भगवानास आठवते. तो विराटास म्हणतो -

"राजा, रथ स्मशानाकडे गेला हा मोठाच शुभशकून झाला असे समज. कारण आता कौरव जेथे उभे आहेत तेथे लवकरच स्मशान झालेले दिसेल."

- (अंक २ श्लोक २०)

पण विराटाचे या बोलण्याने समाधान होत नाही. इतक्यात ताजा समाचार घेऊन आणखी एक वीर येतो. तो सांगतो की धनुष्याचा टणत्कार ऐकून द्रोणाचार्यांनी युद्ध थांबवले. भीष्मांनी बाण सोडण्याचे बंद केले. बाणांच्या वर्षावापुढे कर्णाचेही काही चालले नाही. पण शत्रुपक्षात एकच योद्धा हिरीरीने झुंजत होता आणि तो म्हणजे अभिमन्यू.

इतक्यात विजय मिळवून कुमार उत्तर परत येत असल्याची शुभवार्ता येते. मग विराट युद्धाची प्रत्यक्ष वार्ता ऐकण्यासाठी बृहन्नलेस बोलावून घेतो. ही वार्ता सांगण्यास प्रारंभ करणार इतक्यात स्वयंपाकघरात काम करणाऱ्या बल्लवाने (म्ह. भीमाने) अभिमन्यूस पकडून आणल्याचे समजते. अभिमन्यूचे दर्शन होणार या कल्पनेने भगवान व बृहन्नला हर्षभरीत होतात. विराटाच्या आज्ञेनुसार बृहन्नला अभिमन्यूस घेऊन येतो. आपणास सहजगत्या व पीडा न देता पकडून आणणाऱ्या बल्लवाकडे अभिमन्यू पाहातच राहतो. पण त्याहीपेक्षा बृहन्नल्लेकडे पाहून तो चकित होतो. पार्वतीचा वेष घेऊन शंकराने यावे त्याप्रमाणे बृहन्नलेच्या वेषात अर्जुन शोभत होता.

पण उत्तर रंगभूमीवर येतो. सर्वत्र त्याच्या पराक्रमाची प्रशंसा चाललेली होती. विराटाचीही तशीच समजूत होती. ती खोटी स्तुती त्याला रुचत नाही. तो पुढे येऊन 'हा सर्व पराक्रम धनंजयाचा आहे, आपला नाही' असे विराटास सांगतो. हे युधिष्ठिर, भीमसेन व अर्जुन आहेत. हे समजताचँ विराट चकित होतो. गो-ग्रहणाच्या निमित्ताने आपल्याला पित्याचे व चुलत्याचे दर्शन झाले म्हणून अभिमन्यूला आनंद होतो. मग तो सर्वांना वंदन करतो.

विराटाची कन्या अंत:पुरात स्त्री-वेषात राहात असलेल्या अर्जुनाच्या सहवासात होती. त्यामुळे त्याचे मन साशंक होते. यावर उपाय म्हणून तो उत्तरेस अर्जुनास द्यावयाचे ठरवतो व तशी विनंती करतो. धर्मराजाला ही कल्पना पसंत पडत नाही. पण अर्जुन 'आपण तिचा स्वीकार अभिमन्यूसाठी करीत आहोत' असे सांगून चिंतेचे वातावरण दूर करतो. लगेच विवाहाचे निमंत्रण भीष्माचार्यांकडे पाठविण्यासाठी उत्तराची योजना करण्यात येते. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस सूत येऊन अभिमन्यूला पकडून नेल्याची वार्ता कौरवांना सांगतो. सर्व जण चिंतेत पडतात. कर्ण व दुर्योधन यांना तर हा आपला अपमानच वाटतो. दुर्योधनाच्या मनात पांडवांबद्दल वैराची भावना असली तरी अभिमन्यूवर त्याचे प्रेम होते. तो म्हणतो-

''माझे अभिमन्यूच्या पित्याशी वैर आहे. त्यामुळे त्याला पकडून नेल्याबद्दल सर्व जण मला दोष देणार. खरे म्हणजे तो आता माझा पुत्र प्रथम व पांडवांचा मागाहून असे म्हटले पाहिजे. घराण्यात परस्पर वैर असले तरी मुलांचा यात काही दोष नाही.''

-(अंक ३ श्लोक ४)

तसेच कर्णही असे उद्‌गार काढतो की ''जर आपण अभिमन्यूची सुटका केली नाही तर धनुष्याचा त्याग करून वल्कले धारण केलेली काय वाईट?'' शकुनीला याचे काही वाटत नाही. पण पुढे असे समजते की एका बळकट पुरुषाने पळत येऊन अभिमन्यूचा रथ अडवला. घोड्यांनी कितीही जोर केला तरी रथ जागचा हलला नाही तेव्हा भीष्माचार्य सांगतात की, 'मग हे काम भीमाचेच असले पाहिजे. कारण पूर्वीही त्याने द्रौपदीला पकडून नेणाऱ्या जयद्रथाचा रथ असाच अडवला होता.'

नंतर द्रोणाचार्य सांगतात की रणांगणावर पराक्रम गाजवणारा उत्तर नव्हता तर तो प्रत्यक्ष अर्जुनच होता. म्हणजे पांडवांचा शोध लागला होता. शकुनी व दुर्योधन अस्वस्थ होतात. कारण त्यांना आता राज्याचा अर्धा वाटा द्यावा लागणार होता. मग दुर्योधन म्हणतो की 'युधिष्ठिरास समक्ष पाहिल्याशिवाय मी राज्याचा वाटा देणार नाही.' इतक्यात खुद्द धर्मराजाचा निरोप घेऊन उत्तर येतो. तो सांगतो की उत्तरा व अभिमन्यू यांचा विवाह ठरलेला असून तो कोठे व्हावा याबाबत युधिष्ठिराने विचारणा केली आहे.

अशा रीतीने पाच रात्रीच्या आत पांडवांचा शोध लागल्यामुळे द्रोणाचार्यांनी पैज जिंकली होती. त्यांनी दक्षिणेची मागणी करताच दुर्योधनाचा निरुपाय होतो. आपण पांडवांना राज्याचा वाटा द्यावयास तयार आहोत, असे दुर्योधन घोषित करतो. भरतवाक्य होऊन नाटक समाप्त होते.

नाटकाचे कथानक महाभारतावर आधारलेले असले तरी सारी कथा बदलण्याइतके स्वातंत्र्य नाटककाराने घेतले आहे. द्रोणाचार्यांनी यज्ञाची दक्षिणा म्हणून पांडवांना अर्धे राज्य देण्याची मागणी करणे, दुर्योधन-शकुनी यांनी पाच

रात्रींची अट घालणे, भीमसेनाने अभिमन्यूला रणभूमीवरून पकडून नेणे, इत्यादी प्रसंग भासाने आपल्या प्रतिभेने निर्माण केले आहेत.

यातील व्यक्तिचित्रणे वेधक आहेत. दुर्योधनाचे चित्रण सर्वात उत्तम वठलेले आहे. तो हट्टी व मानी असला तरी गुरुजनांचा आदर करणारा आहे. तो यज्ञ याग करणारा असून आचार्यांची दक्षिणा देण्याविषयी तत्पर आहे. द्रोणाचार्यांनी पेचात धरताच तो शकुनीचा सल्ला घेतो. अर्जुनाशी वैर असले तरी अभिमन्यूवर त्याचे प्रेम आहे. इतकेच नव्हे तर अखेरीस द्रोणाचार्यांनी पैज जिंकताच तो मोठ्या मनाने राज्याचा हिस्सा देण्यास तयार होतो. प्रस्तुत नाटकाचा तोच नायक आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

आचार्य भीष्म व द्रोण यांचीही चित्रे मनोरम आहेत. पांडवांना अर्धे राज्य मिळावे म्हणून ते दोघेही झटतात. आचार्य द्रोण हे सरळ स्वभावाचे आहेत तर भीष्म हे राजनीतीत निपुण आहेत. महाभारतामध्ये भीष्म-द्रोणावर विराटाच्या गाई हरण करण्याच्या दुर्योधनाच्या प्रयत्नास मदत केल्याबद्दल ठपका ठेवलेला आहे; पण भासाने त्या दोघांना दोषमुक्त केले आहे. शकुनीचे चित्रण मुळाबर हुकूम असले तरी त्यालाही पांडवांच्या गुणांबद्दल चाड आहे. कर्णाचे चित्रणही चांगले केले आहे. तो दुर्योधनाच्या पक्षात असला तरी विनयशील व शांत दर्शविला आहे.

कौरवांच्या मानाने पांडवाच्या चित्रणास कमी अवसर मिळाला आहे. त्यात अभिमन्यूचे चित्र चांगले रेखाटले आहे. बाकीच्या व्यक्तिरेखा साधारण आहेत. नाटकाची मांडणी नीट केली आहे. नाटकाची भाषा प्रगल्भ व डौलदार आहे. संवाद खटकेबाज आहेत. भीष्म-द्रोण व शकुनी-दुर्योधन यांच्यांतील शाब्दिक झटापट लक्षणीय आहे. वर्णनात नेमकेपणा आहे. स्त्रीपात्र न आणता किंवा शृंगाराचा आश्रय न करता वाचकांना-प्रेक्षकांना आकृष्ट करण्याचे यात जबरदस्त सामर्थ्य आहे. त्यामुळे या नाटकाची रचना करताना भासाने नाट्यरचनेत बरीच प्रगती केलेली दिसते.

नाट्यशास्त्राच्या परिभाषेत हे 'समवकार' या प्रकारचे नाटक आहे. यात तीन अंक असून विमर्शाखेरीज बाकीचे चार संधी असतात. कथावस्तू देवासुरांच्या आख्यानावर आधारलेली असते. यात वेगवेगळ्या प्रकाराचे बारा नायक असतात व त्यांना मिळणारी फळे निरनिराळी असतात. तसेच वीररसास प्राधान्य असते.

समवकाराची लक्षणे 'पंचरात्रा'स अर्धीमुर्धी लागू होतात. दुर्योधन नायक असला तरी नाट्याचे फळ पांडवांना मिळाले आहे. एक उत्कृष्ट नाटक म्हणून डॉ. बलदेवसिंह उपाध्यायांनी याची जी प्रशंसा केली आहे ती अगदी यथार्थ आहे.

* * *

'महाभारता'वर आधारलेल्या या सहा नाटकांविषयी डॉ. सुकथनकरांनी असे मत मांडले आहे की या पाच एकांकिका स्वतंत्र नसून महाभारताच्या आधारे रचल्या गेलेल्या प्रदीर्घ नाट्यमालेतील हे सुटे अंक असावेत.

या मताची संपूर्ण चर्चा डॉ. गो.के. भटांनी आपल्या 'Bhasa Studies' या इंग्रजी पुस्तकात केलेली आहे. त्यामुळे अधिक विस्तार न करता इतकेच म्हणता येईल की महाभारताच्या कथानकावर अशी एखादी प्रदीर्घ नाट्यमाला तयार झाली असावी ही कल्पनाच अशक्य कोटीतील वाटते.

भासाच्या पाच एकांकिकांकडे नुसती नजर टाकली तरी त्याने कथारचनेत घेतलेले स्वातंत्र्य, मुळातील घटनांचा बदललेला क्रम, नवीन रचून घातलेले प्रसंग, हे लक्ष वेधून येणारे आहेत. जर ही नाटके सलग असती तर त्यात सर्व प्रसंग मुळाप्रमाणेच आले असते. त्यामुळे रचनेत स्वातंत्र्य घेतलेल्या या एकांकिका स्वतंत्र वा स्वयंपूर्ण आहेत, असे मानणेच योग्य आहे.

'मध्यम-व्यायोग' किंवा 'दूत घटोत्कच' या एकांकिका विचारात घेतल्या तर डॉ. सुकथनकरांच्या कल्पनेचे वैयर्थ्य आणखी स्पष्ट होते. भीम आणि हिडिंबा यांची पुनर्भेट झाल्याचा प्रसंग महाभारतात नाही. तसेच घटोत्कचाने दूतकर्म केल्याचाही उल्लेख नाही. मग या एकांकिका साखळीत कशा बसणार? पंचरात्र या नाटकात दुर्योधन पांडवांना अर्धे राज्य द्यावयास तयार झाला आहे. आता त्यामुळे भारतीय युद्ध टळले हे सूचित करणाऱ्या नाटककारानेच इतर चार एकांकिका युद्धाच्या पार्श्वभूमीवरच रचलेल्या आहेत. 'ऊरूभंग' या एकांकिकेमध्ये दुर्योधनाच्या मांड्या मोडणे ही महत्त्वाची घटना विष्कंभकात सांगितली आहे व प्रत्यक्ष नाटकात त्याच्या अंतरंगावर प्रकाश टाकला आहे. सारांश, कथा-प्रसंगात बदल करणे किंवा त्यांचा क्रम बदलणे यात नाटककाराचे नवीन, स्वतंत्र कलाकृती निर्माण करणे हेच उद्दिष्ट आहे. त्यामुळे डॉ. सुकथनकरांच्या मताला अधिक महत्त्व देण्याचे कारण नाही.

## ७. अभिषेक

या सहा अंकी नाटकात वालिवधापासून रावणवधापर्यंतचा कथाभाग आलेला आहे. विराध, खर, दूषण, वाली व अखेरीस रावणाचा नाश करणाऱ्या रामचंद्रास वंदन करून नाटककाराने नाटकास सुरुवात केली आहे. सुरुवातीसच सुग्रीव व राम यांची भेट होते. दोघेही समदुःखी होते तसेच राज्यभ्रष्टही होते. रामाची सीता रावणाने पळवलेली होती तर सुग्रीवाची रुमा वालीच्या अंतःपुरात होती. राम सुग्रीवास मदत करण्याचे आश्वासन देतो. रामाने एकाच बाणात सात तालवृक्ष पाडलेले पाहून सुग्रीवाला त्याच्याविषयी विश्वास वाटतो. मग सुग्रीव त्यांना घेऊन किष्किंधेला येतो व वालीला लढण्याचे आव्हान देतो.

वालीची बायको तारा त्याला जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करते पण त्याचा उपयोग होत नाही. आपल्याला युद्धात कोणी हरवू शकणार नाही असा वालीस गर्व असल्याने तो बाहेर येतो. दोघांचे युद्ध जुंपते. भासाने भरताचा दंडक मोडून दोघांचे रंगभूमीवर बाहुयुद्ध दाखवले आहे. थोड्याच वेळात वालीच्या जोरदार प्रहाराबरोबर सुग्रीव खाली कोसळतो. हनुमान रामाला काकुळतीने विनंती करतो तेव्हा राम पाठीमागून बाण मारून वालीला ठार करतो. बाणावरील रामाचे नाव पाहून वाली त्याला विचारतो-

"आपल्यासारख्या सौम्यरूपधारी व यशास पात्र असलेल्या पुरुषाने कपटाने माझ्यावर प्रहार करून आपल्या अपयशासच जणू अंकुरित केले आहे."

(अभिषेक - अंक १ श्लोक १८)

तेव्हा राम म्हणतो, "तू धाकट्या भावाच्या पत्नीशी रत झाल्याचे पातक केल्याने शासन केले आहे." रामाच्या या बोलण्यावर वाली निरुत्तर होतो. तो रामाची क्षमा मागतो व आपला पुत्र अंगद याचा सांभाळ करण्याची जबाबदारी सुग्रीवावर सोपवतो. राम लक्ष्मणास सुग्रीवास राज्याभिषेक करण्याची आज्ञा करतो (अंक पहिला).

दुसऱ्या अंकात सुग्रीवाच्या आदेशाप्रमाणे मारुती सीतेचा शोध घेण्यासाठी दक्षिण दिशेस जातो. समुद्र ओलांडून तो लंकेत प्रवेश करतो. सर्वत्र शोध केल्यावर अशोकवनात राक्षसिनींच्या पहाऱ्यात असलेली सीता त्याला दिसते. रात्रीच्या वेळी रावण तेथे येतो. मारुती अशोक वृक्षावर लपून बसतो. रावण तिला वश करण्याचा प्रयत्न करतो पण सीता त्याच्याकडे लक्ष देत नाही. रावण

निघून गेल्यावर मारुती तिची भेट घेतो. प्रथम सीतेचा त्याच्यावर विश्वास बसत नाही. मारुती तिला राम व सुग्रीव यांच्या मैत्रीची हकीकत सांगतो तेव्हा तिला हा रामाचाच दूत आहे याची खात्री पटते. तो रामाचा समाचार सांगतो आणि लवकरच राम रावणास ठार मारुन तुझी सुटका करील असे तिला आश्वासन देतो. जाता जाता आपण आल्याचा पुरावा म्हणून सारे प्रमदवन उद्ध्वस्त करतो. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकात एका महाकाय वानराने अशोकवन व इतर उद्याने उद्ध्वस्त केल्याची वार्ता रावणास समजते. तो वानराला पकडण्याचा हुकूम आपला पुत्र अक्षय यास देतो. पण मारुती रावणाचे पाच सेनापती व कुमार अक्षय यांना ठार मारतो. शेवटी इंद्रजित त्याच्यावर आक्रमण करतो तेव्हा मारुती आपण होऊन त्याच्या स्वाधीन होतो. नंतर तो रावणाच्या दरबारात येतो. या वेळी बिभीषणालाही बोलावण्यात येते. मारुती आपण रामचंद्राचे दूत असल्याचे सांगतो. इतकेच नव्हे तर रावणाने सीतेला परत दिले नाही तर राम लंकेवर स्वारी करून रावणाचा नाश करील, अशी धमकीही देतो. तेव्हा रावण खवळतो व मारुतीला ठार मारण्याचा हुकूम करतो. तेव्हा दूताचा वध करणे योग्य नाही असे बिभीषण रावणाला सांगतो. मग रावण मारुतीची शेपटी पेटवण्यास सांगतो. त्यानंतर बिभीषण रावणास उपदेश करू पाहतो तेव्हा रावणाला त्याचाही राग येतो. शत्रूचा पक्ष घेणाऱ्या बिभीषणाला तो हाकलून देतो. तेव्हा तो रामाला शरण जाण्याचे ठरवतो व निघतो. (अंक तिसरा)

मारुतीकडून सीतेचा शोध लागल्यावर राम वानरसेनेला युद्धासाठी सज्ज करतो. मग सारी सेना समुद्र-किनाऱ्यावर येते. या वेळी आकाशमार्गाने बिभीषण तेथे येतो. रावणाचा मनुष्य पाहून सारी वानरसेना घाबरून जाते. पण मारुती बिभीषणाला ओळखतो व तो आपला हितकर्ता आहे असे सांगतो. मग लक्ष्मण त्यास सन्मानपूर्वक रामाकडे घेऊन जातो. राम बिभीषणास आश्रय देतो. समुद्र पार करण्यासाठी समुद्रावर दिव्य अस्त्र टाकून तो कोरडा करण्याचा बिभीषण रामास सल्ला देतो. तेव्हा राम समुद्रावर बाण रोखतो. इतक्यात प्रत्यक्ष वरुण प्रकट होतो व रामाला समुद्रातून जाण्यास मार्ग देतो. त्या मार्गाने सारी सेना लंकेत पोहोचते.

तेथे सुवेल पर्वतावर राम आपले शिबीर उभे करतो. प्रत्यक्ष सैनिकांची गणना केल्यावर दोन सैनिक अधिक आढळतात. नील नामक वानर त्यांना

रामाकडे घेऊन येतो तेव्हा ते रावणाचे हेर असल्याचे बिभीषण ओळखतो. ते शुक व सारण नामक रावणाचे मंत्री असून त्यांना शिक्षा करण्याची बिभीषण रामाला विनंती करतो; पण राम त्यांना आपला संदेश कळविण्यास सांगतो व सोडून देतो. (अंक चौथा)

पाचव्या अंकात युद्धाला प्रारंभ झालेला आहे. रावणाचे मोठमोठे सेनापती तसेच कुंभकर्णही ठार झालेला आहे. आता इंद्रजित लढाईवर गेला आहे. सीतेला वश करण्यासाठी रावण तिच्याकडे जातो. सीता त्याची निर्भर्त्सना करते. त्या वेळी विद्युज्जीव्ह नामक कलाकार राम व लक्ष्मणाची कृत्रिम मुंडकी घेऊन तेथे येतो. इंद्रजिताने या दोघांस ठार मारले आहे असे सांगतो. ही वार्ता ऐकताच सीता मूर्छित होते. शुद्धीवर आल्यावर ती रावणाला आपलाही शिरच्छेद करण्याची विनंती करते. पण त्याच वेळी एक राक्षस तेथे येऊन खुद्द इंद्रजितच मारला गेल्याची वार्ता रावणास सांगतो. रावण तत्काळ मूर्छित पडतो. सावध झाल्यावर या सर्व अनर्थास ही सीता कारणीभूत आहे असे समजून तिलाच ठार मारण्यास उठतो. पण स्त्रीवध हा निषिद्ध आहे असे सांगून एक राक्षस त्यास आवरून धरतो. मग रावण स्वतःच रथावर आरूढ होऊन युद्धाला निघतो. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक आहे. राम आणि रावण यांचे युद्ध जुंपले आहे. तीन विद्याधरांच्या करवी युद्धाचे वर्णन केले आहे. रावणाजवळ रथ आहे. रामाजवळ रथ नाही असे पाहून इंद्र त्याच्यासाठी आपला रथ मातलीबरोबर पाठवून देतो. दोघांचे अभूतपूर्व युद्ध होते. अखेरीस राम ब्रह्मास्त्र टाकून रावणाचा वध करतो. रावणाचा नाश होताच देव आकाशातून पुष्पवृष्टी करतात.

मुख्य प्रवेशात राम बिभीषणास लंकेचा राजा म्हणून घोषित करतो. नंतर सीतेला आणण्यात येते. पण ती रावणाच्या महालात राहिल्याने इक्ष्वाकू कुलास कलंक लागलेला आहे असे सांगून राम तिचा स्वीकार करण्यास संमती देत नाही. पतीच्या मनात आपल्याविषयी संशय असलेला पाहून ती अग्नीत प्रवेश करते. पण स्वतः अग्नी सीतेला घेऊन येतो व तिच्या शुद्ध चारित्र्याची ग्वाही देतो. सर्व जण आश्चर्यचकित होतात. तेव्हा राम म्हणतो 'सीता पवित्र आहे हे मला ठाऊक होते; पण ही अग्निपरीक्षा लोकांची खात्री पटावी म्हणून करण्यात आली.'

लंकेचे राज्य बिभीषणास देण्यात येते. यानंतर रामास राज्याभिषेक करण्यात येतो. त्यास इंद्राच्या आदेशानुसार भरत व शत्रुघ्न उपस्थित राहतात. इतकेच नव्हे तर स्वर्गाहून दशरथादी रामाचे पितरही आशीर्वाद देतात. तेव्हा राम सांगतो की, ज्या माझ्या वडिलांनी राज्याभिषेक पूर्वी रहित केला होता, त्यांनीच तो आता घडवून आणला आहे. या सोहळ्यानंतर भरतवाक्य होऊन नाटक समाप्त होते. (अंक सहावा)

नाटकाचे 'अभिषेक' हे नाव अत्यंत सार्थ आहे. यात एकूण तीन राज्याभिषेकांचा निर्देश आहे. वालीच्या निधनानंतर सुग्रीवास राज्याभिषेक होतो. रावणवधानंतर राम लंकेचे राज्य बिभीषणास प्रदान करतो. म्हणजे दुसरा राज्याभिषेक बिभीषणाला होतो. तिसरा राज्याभिषेक खुद्द रामाला होतो. हा अभिषेक लंकेतच झाला, असे भासाने दाखविले आहे. त्यामुळे नाट्याचा मुख्य विषय 'राज्याभिषेक' हा असल्याने नाटककाराने नाटकाचे नाव 'अभिषेक' असे देण्यात चातुर्य प्रकट केले आहे.

रामायणाच्या कथेत भासाने काही लक्षणीय बदल केले आहेत. उदा. वाल्मीकी रामायणात मारुती अशोकवनात जातो तेव्हा रामाची अंगठी दाखवून तो आपली ओळख पटवतो. पण भासाचा येथील मारुती सीतेशी मधुर संभाषण करूनच तिच्या मनात विश्वास उत्पन्न करतो. सीता समजूतदार असल्याने ती हा रामाचा विश्वासू सेवक आहे हे तत्काळ ओळखते. लंकेवर आक्रमण करण्यासाठी रामाने समुद्रावर सेतू बांधला असे रामायणात सांगितले आहे पण येथे रामाने समुद्रावर बाण रोखताच स्वतः वरुणच प्रकट होऊन समुद्रातून सेनेला मार्ग मोकळा करून देतो. तसेच रामाचा राज्याभिषेक अयोध्येत झाल्याचे रामायणात सांगितले आहे. पण भासाने तो लंकेतच उरकून घेतला आहे. पण त्या राज्याभिषेकास भरत, शत्रुघ्न व इतर प्रजाजन उपस्थित राहतात, असे दर्शविले आहे. इतकेच नव्हे तर आकाशातून देव, ऋषी व दशरथादी पितरही त्यास आशीर्वाद देतात असा हृदयस्पर्शी प्रसंग दर्शविला आहे.

स्वभावचित्रणात मात्र भासाला काही वैशिष्ट्य प्रकट करता आलेले नाही. वाली, रावण, हनुमान व सीता यांची चित्रणे उठावदार झाली आहेत. बाकीची पात्रे मुळाबरहुकूम आहेत. हे नाटक लिहिण्यात नाटककाराचा काही विशेष उद्देश आहे असे दिसत नाही. रामाची कथा सलग व संवादरूपाने सांगणे हा

काही उद्देश म्हणता येत नाही. नाटकाची भाषा सरळ व स्पष्ट आहे. संवाद सुटसुटीत आहेत. यापलीकडे या नाटकात काही सापडत नाही.

## ८. बालचरित

हे कृष्णाचे बालचरित्र सांगणारे नाटक आहे. यात कृष्णजन्मापासून कंसाच्या वधापर्यंतच्या घटना क्रमाने सांगितल्या आहेत. नांदीश्लोकात भगवान कृष्ण हा सत्ययुगात नारायण, त्रेतायुगात विष्णू, द्वापरात राम व कलियुगात दामोदर या नावाने अवतीर्ण झाल्याचे सांगितले आहे. यानंतर सूत्रधार गगनसंचारी नारद कृष्णाच्या दर्शनासाठी आल्याचे सांगून निघून जातो. मग नारदही आपण कृष्णरूपात अवतीर्ण झालेल्या नारायणाचे दर्शन घेण्यासाठी आल्याचे सांगतो व दर्शन घेऊन निघून जातो.

पहिल्या अंकाच्या प्रारंभीच देवकी प्रसूत होते व भगवान विष्णू कृष्णाच्या रूपात पृथ्वीवर अवतीर्ण होतात. पुत्र जन्माला आल्याने देवकीला आनंद झाला असला तरी तिला मनातून कंसाची भीती वाटत आहे. कारण तिचे या पूर्वीचे सहा पुत्र कंसाने ठार मारले आहेत. वसुदेव त्या नवजात बालकास वाचविण्यासाठी त्यास गावाबाहेर न्यावयाचे ठरवतो. त्याला बाहेर नेण्यापूर्वी देवकी डोळे भरून त्यास पाहण्याची इच्छा व्यक्त करते तेव्हा वसुदेव म्हणतो-

''राहूच्या मुखात असलेल्या चंद्राकडे पाहण्याचा काय उपयोग आहे? आता जरी तू त्याला नीट पाहिलेस तरी कंस त्याच्या मृत्यूस कारणीभूत होणार आहे.''

-(बाल. १.११)

तेव्हा देवकी 'तसे मुळीच होणार नाही' अशी आशा प्रकट करते. वसुदेव बालकास घेऊन बाहेर पडतो. बाहेर घनदाट अंधार असतो. इतक्यात त्याला प्रकाश दिसतो. कंसाचा कोणी हस्तक असावा या कल्पनेने वसुदेव भयभीत होतो. पण तो प्रकाश बालकाने दाखविलेला असतो. समोर यमुनानदी दुथडी भरून वाहात असते. पण वसुदेवास त्यातून जाण्यास मार्ग तयार होतो. नदीच्या पलीकडच्या तीरावर हातात जन्माला येताच मरण पावलेली मुलगी घेऊन नंदगोप येतो. नंदाची पत्नी यशोदा हिने त्याच वेळी एका मुलीला जन्म दिलेला असतो. मग दोघांची भेट होते. वसुदेव आपल्या बालकास त्याच्या स्वाधीन करतो. नंदगोपाला कंसाची भीती वाटते पण तरीही तो बालकाचा स्वीकार करतो.

इतक्यात भगवान विष्णूंची पाचही आयुधे - सुदर्शनचक्र, शार्ङ्गधनुष्य, कौमोदकी गदा, शंख व नंदक तलवार व गरुड हे प्रकट होतात व कृष्णाबरोबर आपणही गोकुळात गवळ्यांच्या रूपाने राहण्याचे ठरवतात. नंदगोप वसुदेवाचा निरोप घेऊन जातो. वसुदेवही मुलीला घेऊन मथुरेस येतो. त्याच्या हातात ती मृत मुलगी जिवंत होते. देवकीच्या हातात मुलीला देऊन तो कंसाची फसवणूक करण्याचे ठरवतो. (अंक पहिला)

दुसरा अंक कंसाच्या स्वप्नाने सुरू होतो. चांडाळकन्या त्याच्या राजवाड्यात प्रवेश करतात व त्यास आपल्याशी विवाह करण्यास सांगतात. त्या अदृश्य झाल्यावर चांडाळ वेषधारी शाप प्रवेश करतो व हे निवासस्थान आपले झाल्याचे सांगतो. तो राज्यलक्ष्मीला कंसाचे शरीर सोडण्याची विनंती करतो. प्रारंभी ती नकार देते पण अशी विष्णूची इच्छा आहे असे म्हटल्यावर ती कंसाला सोडून निघून जाते.

कंस जागा होतो. स्वप्नात जे त्याला वादळ, भूकंप, उल्कापात यांसारखी दृष्ये दिसली त्यांचा अर्थ पुरोहितांना विचारतो. ते सांगतात की स्वर्गातील देवाने पृथ्वीवर अवतार घेतल्याची ही सूचना आहे. तेव्हा तो कोणाला मुलगा झाला आहे अशी विचारणा करतो. कंचुकी येऊन सांगतो की देवकी प्रसूत होऊन तिला मुलगी झाली आहे. कंसाचा कंचुकीच्या बोलण्यावर विश्वास बसत नाही. तो खुद्द वसुदेवाला बोलावून घेतो. कारण वसुदेव कधी खोटे बोलत नाही हे त्याला ठाऊक असते. पण वसुदेवही 'मुलगी झाली' असेच सांगतो.

कंस त्या मुलीला ठार मारण्यास उद्युक्त होतो. मुलीवर दया करावी अशी त्यास विनंती करण्यात येते. पण कंस ती झुगारून लावतो. नंदगोपाची मुलगी मरणार याचे वसुदेवाला वाईट वाटते. पण काही चमत्कार होऊन ती मरणार नाही असे त्यास वाटते. तो म्हणतो -

"जन्मत: मरण पावलेली बालिका मुलाच्या प्रभावाने पुन: जिवंत झाली. त्यामुळे ती आतादेखील मरणार नाही."

-(बाल. २.१६)

कंस बालिकेला ठार मारण्यासाठी शिलेवर आपटणार इतक्यात ती आकाशात उडून जाते. हातात त्रिशूल धारण केलेली कात्यायनी आपल्या परिवारासमवेत प्रकट होते. शुंभ, निशुंभ, महिषासुर वगैरे राक्षसांचा वध केल्यानंतर तीने आता कंसाचा विनाश करण्यासाठी वसुदेवाच्या कुळात जन्माला आली आहे व

आपल्या परिवारासहित गोपवेषात राहून कृष्णाच्या बाललीलांचे अवलोकन करणार आहे. (अंक दुसरा)

कृष्णजन्मानंतर गोकुळात सर्वत्र समृद्धी झाली आहे. प्रारंभीच्या प्रवेशकात दायक व वृद्ध गोप यांचा संवाद आहे. गोप सांगतो की कृष्णाने जन्मल्यावर दहाव्या दिवशी पूतना नामक राक्षशिणीला मारले. एक महिन्याचा झाल्यावर त्याने शकटाच्या रूपाने आलेल्या राक्षसाचा नाश केला. तसेच त्याच्या बाललीलांनाही प्रारंभ झाला आहे. यशोदेने त्याला दोरीने उखळाला बांधले असता त्याने यमल व अर्जुन या असुरांना ठार मारले.

नंतर मुख्य प्रवेशात कृष्ण गवळणीबरोबर हल्लीसक नृत्य करतो. इतक्यात तेथे अरिष्ट नावाचा राक्षस बैलाच्या रूपात येतो. आपल्याला पाहून नंदगोपाचा मुलगा घाबरला नाही हे पाहून राक्षसाला आश्चर्य वाटते. मग कृष्ण त्याला एका पायावर उभ्या राहिलेल्या आपल्याला हलवण्याचे आव्हान देतो. त्या प्रयत्नात तो राक्षस मूर्च्छित होतो. सावध झाल्यावर त्याला जाणवते की हे साधे मूल नसून शंकर, इंद्र अथवा स्वत: विष्णू येथे अवतीर्ण झालेला असावा. मग दामोदर त्यास ठार मारतो.

नंतर दामक नावाचा गोप येऊन यमुना नदीत कालिया नागाने उच्छाद मांडल्याचे सांगतो. दामोदर त्या नागाचा नाश करण्यासाठी यमुनानदीच्या काठावर जातो. (अंक तिसरा)

चौथ्या अंकात दामोदर यमुनातीरी येतो. गवळणी त्याला नदीत प्रवेश न करण्याची विनंती करतात; पण तो डोहात उतरतो. थोड्या वेळात धूर दिसू लागतो आणि दामोदर कालियाला पकडून वर आणतो व त्याच्या फण्यावर हल्लीसक नृत्य करू लागतो. नाग शरण येतो व आपण गरुडाच्या भीतीमुळे या डोहाचा आश्रय घेतल्याचे सांगतो. नंतर तो यमुनेतील पाण्यात पसरलेले आपले विष शोषून डोह सोडून बाहेर पडतो. यानंतर एक वीर येऊन सांगतो की मथुरा नगरीत कंसाने धनुर्मख नामक उत्सव सुरू केला आहे व त्या उत्सवासाठी कृष्णाला निमंत्रण दिलेले आहे. तो उत्सव पाहण्यासाठी कृष्ण व संकर्षण (म्ह. बलराम) मथुरेला जावयास निघतात. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या प्रारंभी कंस प्रवेश करतो. त्याला दामोदराने गोकुळात केलेले पराक्रम समजलेले आहेत म्हणून त्याने मुद्दाम त्या दोघांना निमंत्रण दिले असून मल्लांकरवी ठार मारायचे ठरवले आहे. तो दूताला कृष्ण आला काय असे

विचारतो. तेव्हा समजते की दामोदर आणि संकर्षण यांच्या नाशासाठी उत्पलापीड नामक हत्तीची जी कंसाने योजना केली होती त्या हत्तीचा दामोदराने दात उपटून नाश केला आहे. नंतर तो मदनिका नामक कुब्जेला सुंदर शरीर प्रदान करतो. नंतर धनुशाळेत जाऊन धनुष्याचे दोन तुकडे करतो. हे सारे ऐकून कंस घाबरतो.

नंतर दामोदर व संकर्षण कंसाच्या समोर येतात. कंसाने त्या दोघांसाठी चाणूर व मुष्टिक या मल्लांची योजना केलेली असते. दामोदराला समोर पाहताच कंस आश्चर्यचकित होतो. त्याच्या बलशाली शरीराकडे पाहून तो म्हणतो -

''मदोन्मत्त हत्तीप्रमाणे धीरगंभीर व विलासी गती असलेला, मजबूत खांदे, दंड तसेच मांसल विशाल वक्ष:स्थल धारण करणारा हा सावळ्या रंगाचा दामोदर तीनही लोकांचे परिवर्तन करील यात नवल नाही. याचे चरित्र आम्ही ऐकलेले आहे.''

-(अंक ५, श्लोक ८

कंस संकर्षणाचेही वर्णन करतो. नंतर मल्लयुद्धास प्रारंभ होतो. दामोदर चाणूरा व संकर्षण मुष्टिकास ठार मारतो. यानंतर दामोदर सिंहासनावरून कंसाला खाली ओढतो व त्याला ठार मारतो. कंसाचे सैन्य चाल करून येते. संकर्षण त्या सैन्यास थोपवतो. मग वसुदेव प्रवेश करतो. दामोदर व संकर्षण त्यास वंदन करतात. उग्रसेनाची (कंसाच्या पित्याची) बंदिवासातून सुटका होते. देवर्षि नारद येतात व दामोदर रूपी विष्णूला नमस्कार करतात. भरतवाक्याच्या बरोबर नाटक संपते. (अंक पाचवा)

यात कृष्णाचे बालचरित्र आलेले आहे. भगवंताच्या अलौकिक पराक्रमाचे वर्णन करावे हाच भासाचा नाटक लिहिण्यामागचा उद्देश आहे. पण त्यामुळे दामोदराचे चित्रण मात्र सामान्य उतरले आहे. त्याला आपण दैवी अवतार असल्याची जाणीव आहे. त्याने अरिष्ट, कालियानाग, उत्पलापीड हत्ती यांना ठार मारले खरे; पण ते अद्भुत शक्तीच्या जोरावर. डॉ. गो. के. भटांनी म्हटल्याप्रमाणे 'या गोष्टीत दैवी चमत्कार किंवा अबालसदृश पराक्रम आणि अद्भुत शक्तीचे प्रत्यंतर आहे.' त्यामुळे सारे लुटुपुटूचे वाटते. दामोदराच्या चित्रणातील हा दैवी अंश भासाने कोठेही कमी करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यापेक्षा नंदगोप, वसुदेव, वृद्धगोप यांची चित्रणे मनोरम आहेत. यातील कंस तर पुरता ढेपाळलेला आहे. त्याला पडलेले दुष्ट स्वप्न, झालेले अपशकून यांनी तो खचून गेला आहे. दामोदराचे प्रत्यक्ष दर्शन होताच तो दिपून जातो आणि

कृष्णाने त्याच्यावर झडप घालताच कोणताही प्रतिकार न करता तो किडामुंगीप्रमाणे मरून जातो. खलनायकच असा नेभळट असल्यावर संघर्षाला रंग चढला नाही हे सांगण्याची गरज नाही.

यात दर्शविलेले इतर चमत्कार लक्षणीय आहेत. वसुदेवाला यमुनानदीतून मार्ग मिळणे, मृत बालिका जिवंत होणे, कंसाने शिळेवर आपटण्यासाठी घेतलेली बालिका आकाशात उडून कात्यायनी देवी प्रकट होणे, विष्णूची आयुधे प्रकट होणे इ. यातील शेवटचे उदाहरणे सोडले तर बाकी सर्व चमत्कार कथावस्तूला पोषक असेच आहेत. आयुधे व मधुक ऋषीचा शाप ही मनुष्यरूपाने प्रकटली आहेत हे भासाचे खास वैशिष्ट्य आहे. दूतवाक्यातही असाच प्रसंग आहे.

डॉ. गो.के.भटांनी आपल्या 'बालचरिता'वरील निबंधात यातील अनेक वैशिष्ट्यांचा ऊहापोह केलेला आहे. त्यातील अत्यंत महत्त्वाच्या एका वैशिष्ट्याचा येथे उल्लेख करतो. त्यांच्या मते यातील कंसाचे चित्रण मन वेधून घेणारे आहे. नेहमीचा दुष्ट, कपटी, राक्षसी कृत्ये करणारा कंस दृष्टीस पडत नाही. तो नियतीच्या हातातले खेळणे बनलेला आहे. मृत्यूच्या भीतीने हादरून गेला आहे. त्याला पडलेले भयंकर स्वप्न हे याचे उत्तम उदाहरण आहे. त्या स्वप्नाने तो पुरता भेदरतो. पुरोहिताला त्याचा अर्थ विचारतो आणि अर्थ समजल्यावर जास्तच घाबरतो. भासाने कंसाच्या या चित्रणाने आपल्या नाटकास उंची प्राप्त करून दिली आहे इ.

तथापि ही मीमांसा मला तरी पटत नाही. खलपुरुषाचा अहंकार, क्रूरता व मस्तवालपणा जेवढा जास्त तेवढा त्याला नेस्तनाबूत करणाऱ्या नायकाचा पराक्रम डोळ्यात भरतो. रावण, दुर्योधन, कीचक अथवा जरासंध हे दुष्ट अथवा क्रूर असले तरी पुरुषार्थसंपन्न आहेत. सर्वनाश झाला तरी ते नमलेले नाहीत. त्यांच्या तुलनेत हा भासाचा कंस अगदीच मेषपात्र आहे. त्याला ठार मारण्यासाठी देवाला अवतार घेण्याची काय गरज आहे? कंस जर आपल्या मरणानेच नष्ट होत असेल तर त्याला ठार मारण्यात तरी कोणता पुरुषार्थ आहे? तेव्हा कंसाच्या अशा चित्रणाने भासाने काही साध्य केले आहे असे वाटत नाही.

डॉ. राघवन यांच्या मते सदर नाटकात वीर, अद्भुत, रौद्र आणि भयानक या रसांची योजना असली तरी त्या सर्वांचे भक्तिरसात पर्यवसान झाले आहे. तसेच यात कृष्ण व गोपी यांच्या हल्लीसक नृत्याचे वर्णन असले तरी त्यास शृंगाराचा स्पर्श नाही. कृष्णाच्या आयुधांचा मनुष्यरूपातील प्रवेश व कंसाला भयभीत करण्यासाठी 'शाप' या कल्पनेचे मूर्तीकरण या गोष्टी नाट्यतंत्राच्या दृष्टीने लक्षणीय

आहेत. सदर मतातील 'सर्व रसांचे भक्तिरसात पर्यवसान झाले आहे,' हे मत पटणारे नाही. त्यापेक्षा वीररसास प्राधान्य आहे, असे म्हणणे योग्य ठरेल.

सारांश, 'अभिषेक' नाटकाप्रमाणे या नाटकाची ही रचना सरधोपट आहे. काही विशेष गोष्टी सोडल्या तर एकूण नाटक हे दुय्यम दर्जाचेच आहे, असे म्हणावे लागेल. तेव्हा कंसाच्या चित्रणाने भासाने नाटकास उंची प्राप्त करून दिली आहे, हा डॉ. भटांचा दावा टिकणारा नाही.

## ९. अविमारक

हे सहा अंकी नाटक असून याची कथावस्तू लोककथेवर आधारलेली आहे. सौवीर राजपुत्र विष्णुगुप्त तथा अविमारक व कुंतिभोज राजाची कन्या कुरंगी यांच्यातील प्रणय हा नाटकाचा विषय आहे.

कुंतिभोज राजाला सुदर्शना व सुचेतना अशा दोन बहिणी होत्या. त्यांपैकी सुदर्शना ही काशिराजाला दिली होती व सौवीरराजास सुचेतना ही दिलेली होती. सौवीरराज हा महाराणीचा भाऊ होता. कुंतिभोजाची मुलगी कुरंगी ही उपवर झाली होती. काशिराज व सौवीरराज या दोघांनीही आपापल्या मुलासाठी कुरंगीला मागणी घातली होती. त्या दोघांत सौवीरराजा जवळचा असल्याने कुंतिभोजाचा ओढा त्याच्याकडे होता; पण सौवीरराजा आपल्या कुटुंबीयांसह कोठे तरी परांगदा झाला होता. चंडभार्गव नामक ऋषीच्या शापामुळे त्याला वर्षभर चांडाळत्व प्राप्त झाले होते. त्यामुळे तो कुंतिभोजाच्याच राज्यात अंत्यजांच्या वसतीत राहिला होता.

भगवान विष्णूच्या वराह, नृसिंह, वामन, रामचंद्र व कृष्ण या अवतारांस नमन करून भासाने नाटकास प्रारंभ केला आहे. कुंतिभोज राजा आपल्या कन्येच्या विवाहाबाबत चिंतेत आहे. त्या वेळी अमात्य तेथे येऊन सांगतो की कुरंगी उद्यानातून परत येत असता एक मदोन्मत्त हत्ती उधळला. त्याने माहुताला ठार मारले. त्या दंगलीत अनेक लोक मेले. नंतर त्या हत्तीने कुरंगी व तिच्या परिवारावर हल्ला केला. इतक्यात तेथे एक बळकट व सुंदर तरुण आला. त्याने हत्तीचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले त्यामुळे कुरंगीचा बचाव झाला.

अमात्य पुढे सांगतो की, तो तरुण कोण आहे हे विचारले असता त्याने आपण अंत्यज असल्याचे सांगितले. तो तरुण व त्याचे वडील हे अंत्यज वस्तीत

राहतात. यानंतर भूतिक नावाचा दुसरा अमात्य येऊन सांगतो की तो अंत्यज असणे शक्य नाही. काही तरी कारणामुळे तो आपले कुळशील लपवत आहे. कारण,

"तो एखाद्या देवाप्रमाणे स्वरूपसुंदर आहे. बोलणे ब्राह्मणासारखे आहे. त्याचे तेज व बळ हे क्षत्रियाला शोभेल असे आहे व तो कोवळाही आहे. इतके असून जर तो अंत्यजाच्या कुळातील असेल तर आम्ही शास्त्रांचे अध्ययन उगीचच केले असे म्हणावे लागेल."

(अविमारक १.७)

यानंतर कुरंगीसाठी काशिराजाने पाठविलेल्या दूताचा विषय निघतो. सौवीरराजाच्या संदर्भात भूतिक सांगतो की सौवीरराजा व त्याचा मुलगा हे दोघेही कोठे दिसत नाहीत. राज्याचा कारभार मंत्र्यावर सोपवलेला आहे. हे ऐकून कुंतिभोजास आश्चर्य वाटते. काशिराजाकडून आलेल्या दूताचा फक्त आदर करायचा इतकेच तो तूर्त ठरवतो. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. विदूषकाच्या बोलण्यावरून समजते की राजकुमार अविमारक हा कुरंगीचे दर्शन झाल्यापासून सदैव तिच्याच चिंतनात आहे. ऋषीच्या शापामुळे आपल्याला चांडाळाचे जीवन जगावे लागत आहे याचाही त्याला विसर पडलेला आहे. नंतर चंद्रिका नामक चेटी येऊन त्याची मस्करी करते व त्याच्या बोटातली अंगठी घेऊन नाहीशी होते.

मुख्य प्रवेशात अविमारक आपल्या प्रियेचे चिंतन करीत आहे. तिची आठवण त्याची पाठ सोडत नाही. तिच्या रूपलावण्याने व अभिनव यौवनाने त्याला नुसती भुरळ घातलेली आहे. तो म्हणतो -

"ब्रह्मदेवाने तरुणीच्या सौंदर्याचा हा आदर्श नमुना बनविला आहे की तारकाधीश चंद्राच्या कांतीने स्त्रीचे रूप धारण केले आहे? कदाचित लक्ष्मीच सागरात पहुडलेल्या विष्णूला सोडून, त्याच्या भीतीने दुसरे रूप धारण करून राजाच्या घरात राहात असावी."

(अंक २, श्लोक ३)

मग कुरंगीची दाई व दासी अविमारकाच्या घरी येतात. अविमारकाच्या दर्शनाने कुरंगीचीही अवस्था दयनीय झाली आहे. तिला खाणे-पिणे रुचत नाही. ती मैत्रिणीशी बोलत नाही. सारखे दीर्घ निःश्वास टाकते. अविमारकाशी तिची भेट घडवणे हाच यावर उपाय आहे हे ओळखून त्या दोघी येथे आलेल्या आहेत.

आता अविमारक अंत्यज आहे की तो तसा बहाणा करीत आहे, याबद्दल त्यांच्या मनात शंका आहे. या शंकेस उत्तर दैवी वाणीने मिळते "याचे कुल लवकरच समजेल. याचा शेवट चांगला होणार असल्याने ते कार्य अवश्य करा." ही अद्‌भूत वाणी ऐकून दोघींना धीर येतो. मग दाई अविमारकाची भेट घेते. तो कुरंगीसाठी झुरत होता हे स्पष्ट दिसतच होते. मग ती सरळच अविमारकाला अंत:पुरात येण्यास सांगते. तो आनंदित होऊन त्याच रात्री कुरंगीच्या भेटीस येत असल्याचे सांगतो. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकात कुंतिभोज राजाने काशिराजाच्या मुलाला म्हणजे आपल्या भावी जावयाला आपल्याकडे बोलावून घेतले असल्याचे समजते. दासीकडून ही हकीकत समजताच कुरंगी अस्वस्थ होते. ती व दासी राजवाड्याच्या गच्चीवर येतात. तेथे आतल्या महालात शय्या तयार केलेली असते. इतक्यात नलिनिका दासी तेथे येऊन कुमार अविमारक आजच येणार असल्याची सुखद वार्ता सांगते. चोरट्या भेटीच्या कल्पनेने कुरंगी रोमांचित होते पण आपले चारित्र्य कलंकित होणार याचे तिला वाईटही वाटते.

मध्यरात्रीच्या सुमारास अविमारक घराबाहेर पडतो. दोरी व खड्ग घेऊन राजवाड्याकडे जावयास निघतो. तो धाडसी असून त्याचा आपल्या सामर्थ्यावर विश्वासही आहे. छपत छपत तो राजवाड्यापर्यंत येतो. पद्मा, कात्यायनी इत्यादी देवतांचे स्मरण करून दोरखंडाच्या मदतीने गच्चीवर चढतो. त्याला समोर नलिनिका व शिलातलावर झोपी गेलेली कुरंगी दिसते. तो नलिनिकेला खुणावतो व निद्रिस्त राजकुमारीकडे पाहातच राहतो आणि मग तिच्याजवळ बसून तिला स्पर्श करतो. त्याच्या स्पर्शाने ती एकदम जागी होते. अविमारकाला जवळ पाहून घाबरते. दासी तिची समजूत घालते. मग अविमारक कुरंगीला घेऊन आतल्या महालात जातो. (अंक तिसरा)

अशा प्रकारे चोरट्या रतिसुखाचा आस्वाद घेत अविमारक एक वर्षभर अंत:पुरात राहतो. चौथ्या अंकाच्या सुरुवातीच्या प्रवेशकात नलिनिका रडत रडत प्रवेश करते. कुंतिभोजाला अंत:पुरातील हकीकत समजलेली आहे. अविमारक अंत:पुरातून निसटलेला आहे. कुरंगी दु:खाने व भीतीने पुरती बेहोश झाली आहे.

मुख्य प्रवेशात अविमारक प्रवेश करतो. तो स्वत: सुखरूप बाहेर पडला असला तरी कुरंगीची अवस्था काय झाली असेल या कल्पनेने तो हादरून गेला आहे. निराश होऊन तो प्राणत्याग करण्याचे ठरवितो. अरण्यात पेटलेल्या

वणव्यात तो आपले शरीर झोकून देतो. पण अग्नी त्याला जाळत नाही. उलट त्याच्या ज्वाळा अविमारकाला चंदनाच्या उटीप्रमाणे शीतल भासतात. तेव्हा तो पर्वतावर चढून त्यावरून उडी टाकण्याचे ठरवतो. पर्वतावर गेल्यावर त्याला विद्याधराचे जोडपे दिसते. विद्याधर अविमारकाला ओळखतो व त्यास हवे तेव्हा अदृश्य करणारी अंगठी देतो. तों पुनः कुरंगीच्या अंतःपुरात जावयाचे ठरवतो. त्याची आपल्या मित्राशी-विदूषकाशी भेट होते. त्याच्या समवेत तो राजवाड्याकडे जाण्यास निघतो. (अंक चौथा)

पाचव्या अंकात कुरंगीचे दर्शन होते. ती विरहव्यथेने व दुःखाने संतप्त झाली आहे. ती नलिनिकेबरोबर राजवाड्याच्या गच्चीवर येते. त्याच सुमारास अविमारक व विदूषक अदृश्य रूपाने त्या ठिकाणी येतात. त्यांना कुरंगी दिसते. ती दासींना काही तरी सबब सांगून घालवून देते. अविमारकाला आश्चर्य वाटते. कारण ती इकडे तिकडे पाहात होती, निःश्वास टाकीत होती. खरे तर ती गळफास लावून घेण्याच्या तयारीत असते. ती गळ्यात फास अडकवते, इतक्यात ढगांचा गडगडाट झाल्याने घाबरून जाते व "वाचवा वाचवा" असे ओरडते. मग अविमारक प्रकट होऊन तिला अभय देतो. ती त्याला बिलगते. इतक्यात नलिनिका येते. अविमारक व विदूषक यांना पाहून ती चकित होते. मग ती विदूषकाला घेऊन खाली जाते. पाऊस सुरू होतो व अविमारक कुरंगीला घेऊन एकांतात जातो. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. वसुमित्रा, धात्री यांच्या संवादावरून असे समजते की सौवीरराजाचा पुत्र विष्णुसेन ऊर्फ अविमारक याचा पत्ता लागत नाही म्हणून कुरंगीला जयवर्म्यास देणे महाराणीला पसंत नाही. इतक्यात नलिनिका तेथे येऊन नवीनच बातमी सांगते. सौवीर राजाचे मंत्री कुंतिभोजाकडे आले असून सौवीरराजा व त्याचे कुटुंबीय कुंतिभोजाच्या नगरीतच गुप्तपणे राहात आहेत. हे ऐकल्यावर त्यांचा शोध करण्याचे काम चालू झाले आहे.

मुख्य प्रवेशात कुंतिभोज, भूतिक याच्या समवेत सौवीरराजा आलेला आहे. तो सांगतो की कुमार अविमारक नाहीसा झालेला असून वर्षभरात त्याचा काहीच सुगावा लागलेला नाही. यानंतर कुंतिभोज सौवीरराजास गुप्तपणे राहण्याचे कारण विचारतो. तेव्हा सौवीरराजा आपली हकीकत सांगतो. चंद्रभार्गव नावाच्या शीघ्रकोपी संन्याशाच्या शिष्यास एका वाघाने सौवीरराजाच्या प्रदेशात ठार मारले. तेव्हा चंद्रभार्गवांनी सौवीरराजाला व त्याच्या कुटुंबीयास 'चांडाळ व्हा' असा

शाप दिला. सौवीरराजाने विनवणी केल्यावर त्यांनी शापाची मुदत एक वर्षापुरती मर्यादित केली.

सौवीरराजा ही हकीकत सांगत असता नारदमुनी त्या ठिकाणी येतात. अविमारक हा जिवंत असून त्याने कुरंगीशी गांधर्व-विवाह केलेला आहे व तो कुरंगीसमवेत अंत:पुरात आहे, अशी हकीकत सांगतात. सर्व जण चकित होतात. कुंतिभोज राजा लज्जित होतो. नारद मग सुदक्षिणेला बोलावून घेतात. आता कुंतिभोजाने कुरंगीला सुदर्शनेचा पुत्र जयवर्म्यास द्यावयाचे ठरवलेले असते. हा पेच सोडविण्याची कामगिरी नारदमुनींवर येते.

मग ते सुदर्शनेला अविमारक हा तिचाच पुत्र असल्याचे स्मरण करून देतात. सुदर्शनेस अग्नीपासून एक पुत्र झाला होता तोच हा अविमारक. सुदर्शनेची बहीण सुचेतनाही त्याच वेळी प्रसूत झाली होती पण तिचा पुत्र जन्मत:च मरण पावला होता. म्हणून तिने तो बहिणीला देऊन टाकला. सौवीरराजाने त्याचे उत्तम पालन पोषण केले.

आता कुरंगी ही अविमारकाची पत्नी झाली आहे. तशीच ती जयवर्म्यापेक्षा मोठी आहे. तेव्हा कुरंगीची धाकटी बहीण सुमित्रा ही जयवर्म्यास देऊन टाकावी म्हणजे हा सारा पेच सुटेल. नारदाचे सांगणे सुदर्शनेला पटते. एवढ्यात अविमारक व कुरंगी त्या ठिकाणी येतात. नारद त्यांस सुदर्शनेस नमस्कार करण्यास सांगतात. सुचेतनेला सोडून सुदर्शनेला वंदन करण्याच्या आदेशाचे कुंतिभोजास आश्चर्य वाटते. तो नमस्कार करताच सुदर्शना त्यास गाढ मिठी मारते. पुत्रस्नेहाने तिला पान्हा फुटतो. त्यामुळे सुदर्शना ही याची खरी आई असावी व सुचेतना ही उपमाता असावी, असे कुंतिभोजास वाटते.

अशा रीतीने उद्भवलेला कौटुंबिक पेच नारदमुनींच्या मध्यस्थीने सुटतो. सर्वत्र आनंदी आनंद होऊन नाटक समाप्त होते. (अंक सहावा)

* * *

अविमारकाची कथा लोकवाङ्मयातून घेतलेली असावी. बृहत्कथामंजरीतील कथेशी याचे थोडे साम्य आहे. तसेच याचे कथानक 'जातक-कथासंग्रहा'तील 'एळक मारक' याच्या कथेशी जुळणारे आहे. वात्स्यायनाच्या 'कामसूत्रा'त 'शृण्वत्यां चाहल्याविमारक शाकुन्तला दीयन्यात्यपि लौकिकानि च कथयेत्तद्युक्तानि॥' (कामसूत्र ५-४-१४) या सूत्रात अविमारकाचा उल्लेख

आलेला आहे. या सूत्रावरील 'जयमंगला' या टीकेत अविमारक या नावाची व्युत्पत्ती सांगितलेली आहे. तथापि भासाने ही कथा कोठून घेतली हे नीटसे स्पष्ट होत नाही. प्रचलित लोककथेला त्याने नाट्यरूप दिले असावे.

बृहत्कथेतील कथानकात एक चांडाळ तरुण कुरंगी नामक राजकन्येस हत्तीच्या तावडीतून सोडवतो. दोघे एकमेकांवर अनुरक्त होतात पण आपल्या हीन जातीमुळे राजकन्या आपल्याला मिळणार नाही या विचाराने खिन्न होऊन तो आत्महत्येस प्रवृत्त होतो. अग्नी प्रकट होऊन त्यास त्याच्या जन्माचे रहस्य सांगतो. एका ब्राह्मण कुमारिकेस अग्नीपासून दिवस गेले तेव्हा लोकनिंदेच्या भयाने तिने अपत्यास टाकून दिले. एका चांडाळाने त्याचा सांभाळ केला. ही हकीकत समजताच तो कुरंगीच्या पित्याकडे जाऊन कन्येची मागणी करतो व दोघांचे लग्न होते, असा थोडक्यात कथाभाग आहे.

भासाने या कथेत यथोचित बदल केला आहे. नायकाचे चांडाळत्व हे ऋषीच्या शापातून उद्भवल्याचे व ते एक वर्षापुरते असल्याचे दर्शविले आहे. मूळ कथेत नायक हा अग्नीचा पुत्र असल्याचे सांगितले आहे. भासाने हा कथांश तसाच कायम ठेवलेला आहे. त्याच्या स्वभावात दैवी अंश कशासाठी मिसळला आहे हे स्पष्ट नाही.

तथापि कथावस्तूची मांडणी भासाने चतुराईने केली आहे. राजकन्या कुरंगीवर एक हत्ती हल्ला करतो व अविमारक नावाचा स्वरूपसुंदर तरुण तिला हत्तीच्या तावडीतून सोडवतो. हा कथा भाग नाटककाराने निवेदनातून सांगितला आहे. तो तरुण चांडाळ जातीचा असून तो चांडाळ वस्तीत राहात असल्याचे समजते. त्यामुळे सारेच बुचकळ्यात पडतात. तशात राजाचा मेहुणा सौवीरराज हा आपल्या कुटुंबीयांसह आपल्या राज्यातून एकाएकी परागंदा झाल्याची हकीकतही उत्कंठा वाढवणारी आहे.

आता चांडाळ तरुण व राजकन्या यांच्यात प्रथमदर्शनी जडलेल्या प्रेमाची वाटचाल कशी होणार हा एक प्रश्नच होता. ऋषीच्या शापाने हे चांडाळत्व प्राप्त झाले आहे व ते वर्षभरच टिकणारे आहे ही गोष्ट जरी समजली तरी पुढील प्रणय-प्रसंग रंगविण्यासाठी नाटककाराने कुरंगीची उपमाता व दासी यांच्यासमोर हे रहस्य उघड केले आहे व त्यासाठी अशरीरिणी वाणीचा आश्रय घेतला आहे. हा अद्भुताचा वापर खटकण्यासारखा असला तरी तो अपरिहार्य आहे. कारण त्यावाचून त्या दोघींचे शंकानिरसन होण्याचा अन्य मार्गच नव्हता.

यानंतर ठरल्याप्रमाणे राजवाड्याच्या गच्चीवर चढून अविमारक कुरंगीची भेट घेतो. इथपर्यंतचा भाग ठीक आहे; पण चोरट्या रतिसुखाचा आस्वाद घेत तो वर्षभर अंत:पुरातच राहतो, ही गोष्ट पटणारी नाही. भासाने कथानकाची सारी रंगतच घालवून टाकली आहे. वर्षभराचा शापाचा अवधी संपविण्यासाठी योजलेला हा उपाय योग्य नाही. खरे तर नाटकाची सुरुवातच शापाचा अवधी संपत आला असता केली असती तरी काही बिघडले नसते. वैवाहिक सौख्याचा आनंद विवाहापूर्वीच मनमुराद लुटल्यानंतर त्या विवाहात काय स्वारस्य शिल्लक राहणार आहे? तेव्हा भासाने येथे मोठीच रसहानी आणि औचित्यभंग केला आहे यात शंका नाही.

यानंतर कथानक जास्तच घसरणीला लागले आहे. कितीही खबरदारी घेतली तरी अविमारकाची अंत:पुरातील वसती उघडकीस आली. तो कसाबसा राजवाड्यातून निसटला पण त्याला कुरंगीची चिंता वाटू लागली. म्हणून त्याने आत्महत्येचा प्रयत्न केला. अग्नीत प्रवेश करताच अग्नी शीतल झाला. तो अविमारकाला प्रेमाने कुरवाळू लागला. डोंगरावरून उडी टाकताच विद्याधराने त्यास वाचविले व त्यास वाटेल तेव्हा अदृश्य करणारी अंगठी दिली. तिच्या मदतीने तो विदूषकासमवेत गच्चीवर पोहोचला. त्याच वेळी कुरंगी आत्महत्या करण्याच्या तयारीत होती; पण ढग गडगडताच ती घाबरून गेली. अविमारक तिला फासातून मुक्त करतो व पुन्हा दोघे एकांतात शिरतात. नायक-नायिकांचा हा आत्महत्येचा खेळ अगदीच पोरकट आहे. तसेच कथानक पुढे सरकण्यास या अंकांचा काहीच उपयोग होत नाही.

अखेरच्या अंकातला गोंधळ तर निव्वळ अनाकलनीय आहे. तशात पेचप्रसंगाची सोडवणूक करण्यासाठी नारदमुनींना आणण्यात आले आहे. वर्षाची मुदत संपल्यावर सौवीरराजा प्रकट होऊन कुंतिभोजाकडे आलेला आहे. अविमारक वर्षभर बेपत्ता असल्याने तो खिन्न आहे. अविमारकाने कुरंगीशी गांधर्व-विवाह केला आहे व तो अंत:पुरातच आहे हे सांगण्यासाठी नारदमुनींची काही जरुरी नव्हती. पण अविमारक-कुरंगीचा विवाह झाल्याने मुख्य प्रश्न सुटला तरी कौटुंबिक तणाव दूर होणे आवश्यक होते.

सौवीरराजाचा ठावठिकाणा न लागल्याने कुंतिभोजाने कुरंगीस सुदर्शनेचा पुत्र जयवर्मा यास देण्याचे ठरवले होते; पण कुरंगीचे लग्न झाल्याने सुदर्शना व जयवर्मा नाराज होणार होते. वास्तविक पाहता ही अडचण दूर होण्यासारखी

होती. पण भासाने कथानकास अकारण एक वळसा दिला आहे. अविमारक हा सुदर्शनेस अग्नीपासून झालेला पुत्र आहे याची नारद तिला आठवण करून देतात. मूळ कथेतील हा अंश भासाने शाबूत ठेवला खरा; पण प्रश्न असा की नाटककाराने काय साधले? मुळात कोणताही पेचप्रसंग नसताना नारदमुनींना आणण्याची काहीही गरज नव्हती. डॉ. के. ना. वाटवे व डॉ. गो. के. भट या दोघांनीही या बाबतीत भासाला दोष दिला आहे. तथापि कुरंगीच्या व सुदर्शनेच्या शिथिल वर्तनाबद्दल मौन पाळले आहे. सारांश, साधे सरळ कथानक रंगविण्याचे सोडून त्यात अद्भुताचे व अस्वाभाविकतेचे रंग मिसळून भासाने यातील नाट्य मारून टाकले आहे.

नाटकात जमेची बाजूही आहे. या नाटकाने भासाने संस्कृत नाट्यास नवे वळण दिले आहे. नाटकाचा नायक राजा असणे व तो विवाहित असणे ही संस्कृत नाटकांची परंपरा होती. तिला भासाने छेद दिला आहे. अविमारक हा राजपुत्र तरुण, रूपसुंदर व अविवाहित आहे. त्यामुळे नाटकातील प्रणय जिवंत व ताजातवाना वाटतो. तथापि प्रणयाचा विकास टप्प्याटप्प्याने न दाखवता भासाने एकदम गांधर्व-विवाहाची घाई केली आहे.

कथानकाच्या विकासात विविध रसांचे पोषण करण्यात आले आहे. नाटकातील मुख्य रस शृंगार असून त्याच्या संयोग व विप्रलंभ या दोन्ही प्रकारांचे पोषण प्रसंगवशात केलेले आहे. कुरंगीच्या सुटकेत वीररस प्रकट झाला आहे. संतुष्टाच्या विनोदी भाषणातून हास्यरस फुललेला आहे. नायक-नायिकेच्या आत्महत्येचा प्रयत्न पोरकट वाटला तरी त्यात कारुण्य प्रकटले आहे. अद्भुत, भयानक व रौद्र हेही रस डोकावले आहेत.

भासाची भाषा तशी सुबोध आहे. संवादही आकर्षक आहेत. पण का कोणास ठाऊक श्लोकरचना बोजड व क्लिष्ट झाली आहे. एके ठिकाणी तर त्याने दंडक हे प्रदीर्घ वृत्तही योजले आहे. यावरून या नाटकाची रचना करताना भास पुरेसा परिणतप्रज्ञ झालेला नव्हता असे वाटते. तथापि या नाटकाचे एक विशेष महत्त्व आहे, तेही ध्यानात घेतले पाहिजे. स्वप्नवासवदत्त, मालविका, रत्नावली, विद्धशालभंजिका, कर्णसुंदरी या ठराविक नाटकांपेक्षा हे नाटक एकदम वेगळे वाटते. हे प्रकरण नसले तरी प्रकरणाचे अनेक रंग यात उतरले आहेत. नाटकातील अनेक प्रसंगांचे भवभूतीच्या मालती-माधवात अनुकरण केल्याचे दिसून येते. यावरूनही या नाटकाचे 'वेगळेपण' प्रतीत व्हावे.

नाटकातील अविमारक, कुरंगी, कुंतिभोज, सौवीरराजा व कुरंगीची दासी नलिनिका यांची चित्रणे यथातथ्य वठली आहेत. अविमारक हा अग्नीचा पुत्र आहे. त्याचे मूळचे नाव विष्णुगुप्त आहे. त्याने बालपणी अवीचे म्हणजे मेंढ्याचे रूप धारण केलेल्या राक्षसास ठार मारल्याने त्यास 'अविमारक' असे नाव पडले. तो धाडसी व शूर असल्याने माजलेल्या हत्तीवर एकटा चाल करून जातो. तो तरुण, सुंदर, पराक्रमी असा प्रेमिक आहे.

नायिका कुरंगी अप्रतिम सुंदर आहे. नायकाच्या पराक्रमावर ती भाळते. त्याच्या सहवासासाठी तळमळते. संधी प्राप्त होताच गांधर्व-विवाह करून विवाहसौख्य लुटते. दोघांची ताटातूट होताच सरळ आत्महत्येचा मार्ग अवलंबते. ती सरळ, निष्कपट, लाजरी व भित्री आहे. तिच्या स्वभावात कोणतेही ठळक वैशिष्ट्य नाही.

सर्वात अप्रतिम चित्रण संतुष्ट या विदूषकाचे झालेले आहे. डॉ. वाटव्यांनी म्हटल्याप्रमाणे तो संस्कृत नाट्यातील 'आद्य' विदूषक आहे. इतर विदूषकांप्रमाणे तो खादाड व निरक्षर आहे. गळ्यात जानवे आहे म्हणूनच त्याला ब्राह्मण म्हणायचे. तो स्वत:ही म्हणतो - ''जानवे आहे म्हणून मी ब्राह्मण आहे. भगवी वस्त्रे घातली तर संन्यासी होईन व वस्त्र परिधान केले नाही तर दिगंबरपंथी श्रावक बनीन.' 'रामायण' नावाच्या नाट्यशास्त्रातील पाच श्लोक त्याने एका वर्षात पाठ केले आहेत. एवढी त्याची विद्वत्ता आहे.

त्याने मारलेले शेरे अत्यंत मार्मिक आहेत. त्याला पाहिल्यावर नलिनिका 'हा कोण पुरुष?' असे म्हणते तेव्हा विदूषक चटकन उद्धारतो - ''वा: बरोबर ओळखलेस ! राजवाड्याचे हेच वैशिष्ट्य आहे. नाही तर मला पुरुष म्हणून कोणी म्हटले असते? अग मी स्त्री आहे. पुष्करिणी नावाची दासी आहे.'' या विनोदात चावटपणा असला तरी तो विदूषकास शोभणारा आहे.

संतुष्ट नुसता विनोदवीर नाही तर अविमारकाचा जिवलग मित्र आहे. त्याने अविमारकाचा शोध घेण्यासाठी बरीच पायपीट केली आहे. आत्महत्या करताना कुरंगी जेव्हा घाबरते तेव्हा विदूषकाने तिची अशी रेवडी उडवली आहे. की त्याला तोड नाही. तो तसा भोळसर आहे. चंद्रिका ही दासी जाता जाता त्याची खोडी काढते व त्याची अंगठी घेऊन पळून जाते. त्याचे 'मृच्छकटिका'तील मैत्रेयाशी साम्य आहे. दोघेही प्रेमळ, भाबडे व जिव्हाळ्याचे मित्र आहेत.

## १०. प्रतिमा

भासाचे हे सात अंकी नाटक अत्यंत सरस असून भवभूतीच्या तोडीची रचना करण्यात नाटककार यशस्वी झाला आहे. यात रामाच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगापासून रावणवध करून राम परत येईपर्यंतचा कथाभाग सांगितलेला आहे.

प्रभू रामचंद्राला वंदन करून नाटककाराने नाटकास प्रारंभ केला आहे. नांदी श्लोकात सीता, सुमंत्र, सुग्रीव, राम, लक्ष्मण, रावण, बिभीषण आणि भरत या नाटकातील पात्रांची नावे गुंफून मुद्रालंकार साधलेला आहे. प्रस्तावनेत शरद ऋतूचे वर्णन असलेली आर्या घातली आहे.

रामाच्या राज्याभिषेकाची धांदल चालू आहे. सीता आपल्या दालनात बसली आहे. इतक्यात अवदातिका नामक दासी एक वल्कल घेऊन तिच्या जवळ येते. हे वल्कल तिने संगीत शाळेतून चोरून आणलेले आहे. सीता तिला ते वल्कल परत करण्यास सांगते. ती जाऊ लागताच तिला थांबवते व ते वल्कल आपल्या अंगावर घेऊन कसे दिसते ते पाहते.

इतक्यात अभिषेकाची तयारी चालू असता वाजणारा चौघडा एकाएकी थांबतो. अभिषेकाच्या ऐन प्रसंगी मंथरा दशरथाच्या कानात काही तरी येऊन पुटपुटते. त्याबरोबर दशरथ अभिषेक थांबवतो आणि थोड्या वेळात स्वत: रामच सीतेच्या महालात येतो. त्याच्या बोलण्यावरून राज्याभिषेक रहित झाल्याचे समजते. सीतेच्या अंगावर वल्कल पाहिल्यानंतर रामालाही ते परिधान करावेसे वाटते.

इतक्यात कंचुकी घाबऱ्या घाबऱ्या येऊन महाराज दशरथ मूर्च्छित झाल्याचे सांगतो. तो पुढे सांगतो की कैकेयीच्या सांगण्यावरून राज्याभिषेक थांबविण्यात आला. तिने भरताला राज्याभिषेक करण्याची मागणी केली व रामाला चौदा वर्षे वनवासात पाठविण्यास सांगितले. रामाला हे ऐकून काहीच वाटत नाही. पण लक्ष्मण संतापाने धनुष्य सरसावून तेथे येतो. तो रामाला शस्त्र घेऊन या कारस्थानाचा बीमोड करण्याची विनंती करतो. तेव्हा राम म्हणतो -

''दिलेल्या वचनाचे पालन करणाऱ्या वडिलांवर धनुष्य उचलू की आपले धन प्राप्त करून घेणाऱ्या कैकेयी मातेवर बाण टाकू? की निर्दोष असलेल्या भरताला ठार मारू? लक्ष्मणा, या तीन पातकांतील कोणते पाप मी करावे असे तुला वाटते?''

(अंक १, श्लोक २२)

बिचारा लक्ष्मण गप्प बसला. रामाने वल्कले परिधान केली. सीताही त्याच्याबरोबर जाण्यास तयार झाली. रामाने तिची समजूत काढण्यास लक्ष्मणास सांगितले. पण लक्ष्मणाने तिचीच बाजू उचलून धरली. स्वत: लक्ष्मणही वनात जाणार होता. रामाची चरणसेवा हेच त्याचे परम कर्तव्य होते. त्याने वनवासात येण्याचे कष्ट घेऊ नयेत म्हणनू राम व सीता दोघेही प्रयत्न करतात. पण तो ऐकत नाही. जमलेल्या गर्दीला दूर करीत ते तिघे वनवासाला जावयास निघतात. दशरथ शोक अनावर होऊन जमिनीवर लोळू लागतो. (अंक पहिला)

दशरथाची अवस्था केविलवाणी झाली. कौसल्या व सुमित्रा त्याच्याजवळ अहोरात्र बसल्या होत्या. तो वारंवार सीता, राम, लक्ष्मण यांच्या नावाचा जप करीत होता. सारी अयोध्या दु:खात बुडाली होती. हत्ती, घोडे यांसारखे मूक प्राणीही चाऱ्याला तोंड लावत नव्हते. रामाला वनातून परत आणण्यासाठी सुमंत्रास पाठवले होते. तो परत आला पण त्याच्या बरोबर राम आला नाही. सुमंत्र रिकामाच रथ घेऊन आल्याचे समजताच दशरथाच्या जीविताच्या उरल्या सुरल्या अपेक्षा संपुष्टात आल्या. तो खिन्नपणे म्हणतो -

"जर रिकामा रथ परत आला असेल तर माझे सारे मनोरथ भंगले असे म्हटले पाहिजे. कदाचित या दशरथाला घेऊन जाण्यासाठी मृत्यूनेच हा रथ पाठविलेला असावा."

(अंक २, श्लोक ११)

त्याने सुमंत्रास रामाचा समाचार विचारला. पण सुमंत्राजवळ सांगण्यासारखे काय होते? राम शृंगवेरपुरात त्याला भेटले. पण तिघेही रथातून उतरून अयोध्येकडे तोंड करून उभे राहिले. रामाच्या मुखातून शब्द फुटेना. त्याने तोंड फिरवले. तिघे वनाकडे निघाले. ही वार्ता ऐकताच दशरथाला कसे तरी होऊ लागले. त्याला दिलीप, रघू, अज या पितरांचे दर्शन झाले. त्यांना उदक देऊन दशरथाने प्राण सोडले. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. अयोध्यानगरीपासून थोड्या अंतरावर प्रतिमागृह होते. तेथे इक्ष्वाकू वंशातील पूर्वीच्या राजांचे पुतळे तयार करून ठेवले होते. त्या प्रतिमागृहाच्या आवारात साफ-सफाई चाललेली होती. दशरथाचा पुतळा तयार झालेला होता. रामाच्या तीनही माता त्या पुतळ्याचे दर्शन घेण्यासाठी येणार होत्या.

दशरथाच्या मृत्यूची बातमी आजोळी भरताला समजलेली नव्हती. फक्त दशरथ आजारी असल्याचे ठाऊक होते. त्याला अयोध्येस येण्याचा निरोप

मिळताच तो निघाला. वाटेत तो आपल्या पित्याच्या आजाराविषयी चौकशी करीत होता. बिचारा सारथी काय सांगणार ? कारण -

"भरताच्या प्रिय पित्याने प्राण सोडले होते. त्याच्या आईला-कैकेयीला राज्याचा लोभ सुटला होता आणि त्याचा परम प्रिय वडील बंधू रामचंद्र हा वनवासास निघून गेला होता. या तीन भयंकर वार्ता कोण त्याला सांगणार?"

(अंक ३, श्लोक ५)

त्याचा रथ अयोध्येजवळ येताच एक सैनिक त्याला सामोरा जातो व सांगतो की कृत्तिका नक्षत्र संपायला फक्त एक घटका अवकाश आहे. त्यानंतर रोहिणी नक्षत्रास प्रारंभ झाला की, कुमारांनी अयोध्येत प्रवेश करावा.

अयोध्येच्या सीमेवरच प्रतिमागृह होते. सभोवती सुंदर वनश्री होती. तेथे विश्रांती घ्यावी म्हणून भरत उतरला. प्रतिमागृहाच्या मार्गावर वाळू पसरलेली होती. फुलांची तोरणे लावली होती. भरत प्रतिमागृहात शिरला. त्याला तेथे सुंदर पुतळे मांडलेले आढळले. त्याने देवकुलिकाजवळ चौकशी केली तेव्हा ते इक्ष्वाकू वंशातील पूर्वजांचे पुतळे होते. दिलीप, रघू, अज यांचे पुतळे क्रमाने होते. अजाच्या शेजारी चौथा पुतळा होता. तो पाहून भरत चरकला. त्याने सूचक प्रश्न केला, "जिवंत व्यक्तीच्या प्रतिमा बनवतात का?" देवकुलिकाने उत्तर दिले - "नाही. फक्त मरण पावलेल्या व्यक्तींच्याच प्रतिमा करण्यात येतात."

दशरथ मरण पावल्याचे समजताच भरत मूर्च्छित झाला. देवकुलिकाला तो भरत असल्याचे समजले. तो सावध झाल्यावर त्याला सारी हकीकत समजली. तो पुन्हा मूर्च्छित झाला. त्या वेळी सुमंत्र व तीनही राजमाता प्रतिमागृहात आल्या. त्यांच्या आगमनाबरोबर सावध झालेला भरत उठला व त्याने कौसल्या व सुमित्रा यांना वंदन केले. त्याने कैकेयीला वंदन केले नाही. उलट तिची निर्भर्त्सना केली. कौसल्येने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला तेव्हा भरत कैकेयीला म्हणाला,

"राम माझ्या पित्याचा औरस पुत्र नव्हता काय? अग्रक्रमाने तोच राज्याभिषेकास पात्र नव्हता काय? तो आपल्या भावाशी प्रेमाने वागत नव्हता काय? किंवा तो प्रजाजनांना प्रिय नव्हता काय?"

(अंक ३, श्लोक २०)

मग कैकेयी म्हणाली, "बाळा, योग्य वेळी मी तुला या प्रश्नांची उत्तरे देईन." भरत दुःखाने व क्रोधाने बेभान झाला. रामाच्या पश्चात भरतानेच आता प्रजेचा प्रतिपाळ केला पाहिजे, हे सुमंत्राचे सांगणेही त्याला पटले नाही. तो रामाची भेट

घेण्यास आतूर झाला होता. 'आता राज्याभिषेकाचे काय?' या प्रश्नावर तो तिरमिरीने उद्गारला, ''तो अभिषेक या राणीला (म्ह. कैकेयीला) करा. जेथे राम नाही, ती अयोध्या नाही.'' (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. विजया व नंदिनिका या दोन दासींचा संवाद चाललेला आहे. नंदिनिका भरताने कैकेयीचा अपमान केल्याचे सांगते. त्यावर विजयाही कैकेयीची निंदा करते. भरत अयोध्येत न येता रामाची भेट घेण्यासाठी तपोवनात गेल्याचे समजते.

मुख्य प्रवेशात भरत, सुमंत्र व सूत हे तपोवनात येतात. भरत रामाला भेटण्यास अतिशय आतूर झालेला होता. रथ थांबवून ते खाली उतरले. भरताने सुमंत्रास आपण आल्याचे कळविण्यास सांगितले, पण नंतर त्याने स्वतःच आपल्या आगमनाची सूचना दिली.

भरताचा परिचित स्वर कानावर पडताच राम चमकला. कारण भरताचा आवाज अगदी दशरथासारखा होता. राम लक्ष्मणास कोण आहे ते पाहण्यास सांगतो. त्याप्रमाणे लक्ष्मण पुढे आला. समोर त्याला हुबेहूब रामाचीच आकृती दिसली. त्याने भरतास ओळखले. भरताने त्यास वंदन केले. लक्ष्मणाने रामास भरत आल्याचे वर्तमान सांगितले. सीतेने पुढे जाऊन त्याचे स्वागत केले. सीतेलादेखील त्याची आकृती व स्वर अगदी रामासारखा वाटला.

मग राम-भरताची भेट झाली. रामाला दशरथाच्या मृत्यूची वार्ता समजली होती. आपले अश्रुपूर्ण तोंड स्वच्छ करण्यासाठी राम लक्ष्मणास पाणी आणण्यास सांगतो. तेव्हा भरत स्वतः पाणी आणून देतो. भरताने रामाजवळच राहण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा रामाने त्याची समजूत घातली. दशरथाच्या आज्ञेवरूनच रामाने वनवास पत्करला आहे. आता राज्याचे पालन करण्याची जबाबदारी भरतावर आहे व ती त्याने टाकू नये. त्यासाठी रामाने आपली शपथ घातली.

भरताचा निरुपाय झाला. मग भरतानेही काही अटींवर राज्य सांभाळण्याचे कबूल केले. पहिली अट म्हणजे चौदा वर्षांनंतर रामाने भरताकडून राज्याचा स्वीकार करावयाचा. दुसऱ्या अटीने त्याने रामाच्या पादुका नित्य वंदनासाठी मागून घेतल्या. तो म्हणाला -

''आर्य, आपण मला नेहमी वापरत असलेल्या पादुका द्या. मी आपल्याला मस्तक विनम्र करून अभिवादन करतो. आपण वनवासाचा कालावधी पूर्ण करून येईपर्यंत मी त्या पादुकांच्या आज्ञांचे पालन करीन.''

(अंक ४, श्लोक २६)

भरताची विनम्र वृत्ती व उदात्त स्वभाव यांचे रामाला कौतुक वाटले. स्वार्थत्यागाच्या बाबतीत भरताने रामावरही मात केली होती. भरत आता त्या पादुकांवर राज्याभिषेक करणार होता. रामाने सुमंत्रास भरताच्या इच्छा पूर्ण करण्यास सांगितले. तसेच भरतालाही राज्याचे सर्वतोपरी रक्षण करण्याचा उपदेश केला. रामाला वंदन करून भरत परत निघाला. त्याला सोडण्यास राम, लक्ष्मण व सीता आश्रमाच्या दारापर्यंत आले. (अंक चौथा)

दशरथाचे निधन होऊन एक वर्ष होत आले. पित्याचे वर्षश्राद्ध वनात कसे पार पाडता येईल याची रामाला चिंता वाटत होती. इतक्यात त्या ठिकाणी तपस्व्याचा वेष धारण केलेला रावण आला. त्याला खरादी राक्षसांच्या वधाचा सूड घ्यावयाचा होता व रामाला युक्तीने दूर करून सीतेला पळवून न्यावयाचे होते. अतिथी आलेला पाहताच रामाने त्याचे स्वागत केले. मग रावणाने आपला परिचय करून दिला. तो काश्यप गोत्रीय ब्राह्मण असून त्याने वेदांचे सांगोपांग अध्ययन केले आहे. मनूचे धर्मशास्त्र, महेश्वर प्रणीत योगशास्त्र, बृहस्पतीचे अर्थशास्त्र व मेधातिथीचे न्यायशास्त्र यांचा सखोल अभ्यास केला आहे. तसेच प्राचेतसाचे श्राद्धकल्पही अभ्यासले आहे.

श्राद्धाचा विषय निघताच राम आपल्या पित्याचे श्राद्ध करण्याचा मनोदय व्यक्त करतो. त्यासाठी तर्पणाची सामग्री विचारतो. तेव्हा रावण सांगतो की हिमालयाच्या परिसरात 'कांचन-पार्श्व' नामक हरणे आहेत. वैश्वानस, नैमिषी वगैरे ऋषींनी त्यांच्या आहुती देऊन श्राद्धकर्म केले आहे. हे ऐकताच राम त्वरित हिमालयाकडे जाण्यास तयार होतो. त्या वेळी लक्ष्मण आश्रमात नव्हता. तीर्थयात्रेहून परत आलेल्या कुलपतींचे स्वागत करण्यासाठी रामानेच त्याला पाठवले होते. रामाने धनुष्यास बाण लावताच हिमालयावरची ती हरणे एकदम समोर दिसू लागली. रामाचे हे सामर्थ्य पाहून रावणही चकित झाला.

अतिथींची सेवा करण्याची कामगिरी सीतेवर सोपवून राम त्या हरिणाच्या मागे गेला. राम निघून जाताच रावणाने आपले स्वरूप प्रकट केले. सीता घाबरून गेली. रावणाने तिला आपली ओळख दिली. सीता रक्षणासाठी रामाला व लक्ष्मणाला हाका मारू लागली. तेव्हा रावण म्हणाला,

"तू रामाला हाक मार किंवा लक्ष्मणाला हाक मार. वाटल्यास स्वर्गात राहणाऱ्या दशरथ राजाला बोलाव. या दुबळ्या लोकांना बोलावून काय उपयोग आहे? हरिणाची पिले वाघाशी थोडाच संघर्ष करू शकणार आहेत?"

(अंक ५, श्लोक १८)

रावणाचा उद्दामपणा पाहून सीता खवळली. तिने रावणाला शाप देण्याची भीती घातली. पण साक्षात सूर्याचे तेज ज्याला जाळू शकले नाही तो रावण सीतेच्या धमकीला थोडाच घाबरणार होता? त्याने सीतेला पकडले व एकदम आकाशात उड्डाण केले. सीता आक्रोश करू लागली. तो शोक ऐकून जटायू तिच्या मदतीस धावला. त्याने रावणावर हल्ला केला. तेव्हा त्याचा शिरच्छेद करण्यासाठी रावणाने आपले खड्ग उपसले. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक आहे. रावण व जटायू यांच्या युद्धाचे वर्णन दोन तपस्व्यांच्या तोंडी घातलेले आहे. रावणाने पळवलेली सीता भयाने थरथर कापत होती. दशरथाने पूर्वी जटायूवर उपकार केलेला होता. त्याला स्मरून तो रावणाच्या अंगावर धावून गेला. त्याने आपल्या तीक्ष्ण चोचीने रावणावर आघात केले, नखांनी त्याची छाती ओरबाडून काढली. दोघांचे अंतराळात युद्ध जुंपले. क्रुध्द झालेल्या रावणाने आपल्या खड्गाचा त्याच्या पंखावर वार केला. जटायू खाली कोसळला. त्याने आपले प्राण धोक्यात घालून सीतेचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला पण त्याला यश मिळाले नाही. दोघांचे युद्ध पाहणारे तपस्वी खिन्न झाले. पाहिलेला वृत्तांत रामास सांगण्यासाठी निघून गेले.

मुख्य प्रवेश अयोध्येच्या राजवाड्यात सुरू होतो. कंचुकी तेथे आला व त्याने रामाकडे गेलेले सुमंत्र परत आल्याचा निरोप भरतास पाठवला. सुमंत्राची भेट घेण्यासाठी भरत घाईघाईने आला. त्याने वल्कले परिधान केली होती. मस्तकावर जटा धारण केल्या होत्या. त्याची चाल हत्तीप्रमाणे डौलदार होती. सुमंत्राने प्रवेश केला. त्यांची मुद्रा खिन्न दिसत होती. दशरथाचे निधन झालेले होते. रामचंद्राला वनवास भोगावा लागत होता. एवढ्याने भागले नाही. रावणाने सीतेला पळवून नेले होते. हीच वार्ता भरताला कळवण्यासाठी ते आले होते.

ते सांगतात की राम व लक्ष्मण किष्किंधेला गेले होते. तेथे त्यांनी सुग्रीवाची भेट घेतली. सुग्रीवाचे राज्य व पत्नी त्याचा थोरला भाऊ वाली याने हिरावून घेतले होते. त्यामुळे दोघे समदुःखी होते. 'समदुःखी' या शब्दाने भरत चमकतो. तो सुमंत्राना खोदून विचारतो तेव्हा त्याने रावणाने सीतेचे अपहरण केल्याचे वर्तमान भरताला सांगितले. ती वार्ता ऐकताच भरत मूर्च्छित झाला.

सावध झाल्याबरोबर भरत सुमंत्राना घेऊन तडक कैकेयीच्या महालात आला. ती दिसताच रागाने म्हणाला,

"तुझ्या योजनेमुळे राज्याचा त्याग करून जो वनात निघून गेला त्या रामाची पत्नी पळवून नेण्यात आली. तेव्हा तुझ्या मनाप्रमाणे झाले ना?"

(अंक ६, श्लोक १३)

मग कैकेयी आपण रामाला कशासाठी वनात पाठवले त्याचा खुलासा भरतापुढे करते. ती म्हणाली, "भरता, महाराजाना एक शाप मिळाला होता, ही हकीकत तुला माहीत नाही." - मग सुमंत्र भरताला सांगतात, "श्रावणाच्या आईवडिलांनी दशरथाला शाप दिला होता की आमच्याप्रमाणे तुलाही पुत्रशोकाने मृत्यू येईल."

मग कैकेयी पुढे म्हणाली, "ऋषीचा शाप अटळ होता. म्हणून मी रामाला वनात पाठवले. मला राज्याचा लोभ नव्हता. पुत्राचे मरण न होता दशरथाला मृत्यू यावा हा माझा हेतू होता." मग भरत म्हणाला, "मग तू मला का वनवासात पाठवले नाहीस?" यावर ती म्हणाली, "लहानपणापासून तू आजोळी राहात होतास त्यामुळे तुझ्या वियोगाची महाराजांना सवय होती." भरताने पुन्हा विचारले, "यासाठी चौदा वर्षांचा अवधी का सांगितला?" यावर कैकेयीने खुलासा केला, "खरे तर मला चौदा दिवस असे म्हणावयाचे होते पण मनाचा गोंधळ झाल्यामुळे मी चुकून चौदा वर्षे असे म्हणाले."

ही हकीकत वसिष्ठ-वामदेव इत्यादी गुरुजनांनाही ठाऊक होती. त्यामुळे भरताच्या मनातील कैकेयीविषयीचा गैरसमज दूर झाला. तिला उगीचच दूषणे दिल्याबद्दल त्याने कैकेयीची क्षमा मागितली. कैकेयीने त्याला क्षमा केली हे सांगायची जरुरी नाही. मग भरताने आपले सर्व सैन्य घेऊन रामाच्या मदतीला जावयाचे ठरवले. (अंक सहावा)

सातव्या अंकाच्या सुरुवातीस मिश्र विष्कंभक आहे. तापस आणि नंदीलक यांच्या संवादावरून बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी घडल्याचे समजते. रामाने लंकेवर हल्ला करून रावणाचा संपूर्ण निःपात केला आहे. लंकेचे राज्य बिभीषणाला देण्यात आले आहे. अग्निप्रवेश करून सीतेने आपले चारित्र्य शुद्ध असल्याचे सिद्ध केले आहे. ऋक्ष (म्ह. अस्वल), राक्षस व वानर यांच्या समवेत राम, सीता व लक्ष्मण अयोध्येच्या बाहेर असलेल्या तपोवनात आलेले आहेत. कुलपतीने त्यांचे स्वागत केले आहे.

रामाला भेटण्यासाठी भरत, रामाच्या तीनही माता, राजवाड्यातील मंडळी तपोवनात आली. सीता तपस्विनींच्या सहवासात रंगून गेली आहे. भरत व

राजमाता प्रवेश करतात. राम, सीता व लक्ष्मण तिघींना क्रमाने वंदन करतात. त्याप्रमाणे भरतानेही या तिघांना नमस्कार केला. मग शत्रुघ्नानेही रामाला नमस्कार केला. मग तपोवनातच रामाला राज्याभिषेक करण्यात आला.

त्यानंतर बिभीषणही नल, नील, जांबुवंत, सुग्रीव यांच्या समवेत तपोवनात आला व त्याने रामाचे अभिनंदन केले. मग कैकेयीने रामाला अयोध्येमध्येही राज्याभिषेक करण्यात यावा, अशी विनंती केली. रामाने त्यास अनुमती दिली. इतक्यात त्या ठिकाणी पुष्पक विमान प्रकट झाले व सर्व जण त्या विमानात बसून अयोध्येकडे निघाले. भरतवाक्य होऊन नाटक समाप्त झाले. (अंक सातवा)

* * *

नाटकाच्या कथावस्तूवर ओझरती नजर टाकली तर ती रामायणातील अयोध्या व अरण्यकांडातील प्रमुख प्रसंगांवर आधारलेली आहे, हे ध्यानात येते. रामाला होणारा राज्याभिषेक कैकेयीच्या हस्तक्षेपामुळे उधळला जातो. राम सीता व लक्ष्मणासह वनात निघून जातो. रामाच्या विरहाचा धक्का सहन न झाल्याने दशरथ मरण पावतो. ज्या भरतासाठी कैकेयीने सारा बनाव घडवून आणला तो भरत राज्याचा स्वीकार न करता रामाला परत आणण्यासाठी वनात जातो. येताना रामाच्या पादुका आणून रामाच्या नावाने राज्यकारभार करण्याचे ठरवतो. वनात असताना रावण कपट करून सीतेला पळवून नेतो. या साऱ्या घटना रामायणातून घेतलेल्या आहेत. पण त्यांच्या आधारे त्याने एकसंध कलाकृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

नाटककाराची कलादृष्टी ध्यानात येण्यासाठी त्याने कोणत्या गोष्टी नव्याने रचून घातल्या आहेत व त्या कशा महत्त्वपूर्ण आहेत हे पाहिले पाहिजे.

(१) पहिल्या अंकातील वल्कलाचा प्रसंग स्वतंत्र आहे. दासीने चोरलेले वल्कल सहज सीतेकडे येते व ते तिला परिधान करण्याचा मोह होतो. ते ती परिधान करणार इतक्यात राज्याभिषेक रहित झाल्याने राम तिच्या महालात येतो. त्यालाही ते परिधान करण्याची इच्छा होते. या प्रसंगावर पुढील वनगमनाची छाया पडलेली आहे. राम व सीता यांना तीच वल्कले परिधान करून वनात जावे लागते. या दृष्टीने हा प्रसंग समयोचित असल्याचे दिसून येते.

(२) दशरथाच्या मृत्यूची वार्ता आजोळी असलेल्या भरताला समजत नाही. आजोळहून अयोध्येला परत येताना तो सहज प्रतिमागृहात जातो. त्याला तेथे

चार पुतळे दिसतात. चौथा पुतळा दशरथाचा आहे हे समजल्यावर त्याच्या मनात शंकेची पाल चुकचुकते. 'मरण पावलेल्या व्यक्तींचेच पुतळे तयार केले जातात.' हा उद्गार ऐकल्यावर तो मूर्च्छित होतो. पुतळ्याचा प्रसंग दशरथाच्या मृत्यूशी निगडित आहे.

(३) राम-सीता वनवासात असताना सीतेचे हरण करण्याच्या उद्देशाने रावण रामाच्या निवासस्थानी येतो. तो स्वतःची ओळख विद्वान् ब्राह्मण अशी करून देतो. दशरथाच्या मृत्यूस वर्ष होत असल्याने त्याचे यथासांग वर्षश्राद्ध करण्याची रामाची इच्छा आहे. श्राद्धासाठी हिमालयात राहणारी 'कांचनपार्श्व' या प्रकारची हरणे अत्यंत योग्य असल्याचे रावण सांगतो. त्या वेळी आश्रमात लक्ष्मण नसल्याने रामच बाहेर पडतो. राम जाताच रावण सीतेचे हरण करतो. येथे मुळातील प्रसंग बदललेला आहे. सीतेचे अपहरणदेखील दशरथाच्या मृत्यूशी निगडित आहे.

(४) कैकेयीने रामाला वनात का पाठवले? या प्रश्नाचे भासाने दिलेले उत्तर सर्वतोपरी स्वतंत्र आहे. केवळ आपल्या पुत्राला राज्य मिळावे या स्वार्थी हेतूने प्रेरित होऊन तिने दशरथाकडून मिळालेल्या दोन वरांचा उपयोग करून घेतला, असे रामायणात दाखवलेले आहे. पण कैकेयीने रामाचे प्राण वाचवण्यासाठी त्याला वनात पाठवले असे दाखवून नाटककाराने कैकेयीची व्यक्तिरेखा तर उजळली आहेच शिवाय तिचा दशरथाच्या मृत्यूशी संबंध जोडलेला आहे.

(५) रामाच्या वनगमनापासून राज्याभिषेकापर्यंतचा कथाभाग जरी यात आला असला तरी वरील गोष्टीशी संबंध नसलेल्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी नाटककाराने गाळल्या आहेत. अथवा अतिसंक्षेपाने त्यांचा उल्लेख केला आहे. सारांश, रामाला राज्याची प्राप्ती न होणे, दशरथाचा मृत्यू व भरताने विश्वस्त या भूमिकेतून केलेला राज्यकारभार या तीन गोष्टींभोवती कथानक फिरत आहे. अगदी रावणाने सीतेचे केलेले अपहरणदेखील भासाने दशरथाच्या मृत्यूशी जोडलेले आहे.

भासाने या घटनांकडे निराळ्या दृष्टीतून पाहिलेले आहे व त्या एका सूत्रात बांधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुख्य म्हणजे रामापेक्षा भरतावरच नाटककाराने लक्ष केंद्रित केलेले आहे. तेव्हा प्रस्तुत नाटक रचण्यात भासाचा खास उद्देश असा पाहिजे हे उघड आहे. त्याचा तो उद्देश कोणता व तो साध्य करण्यात नाटककारास कितपत यश आले आहे, हे समालोचनामध्ये पाहू.

* * *

रामाच्या वनवासाचा कालावधी चौदा वर्षांचा आहे. तेव्हा या नाटकातील सर्व घटना घडून येण्यास चौदा वर्षे लागलेली आहेत हे उघड आहे. तथापि नाटकात आलेले प्रसंग किती दिवसांच्या अंतराने घडले आहेत ते पाहू -

**अंक पहिला :** रामाचा राज्याभिषेक कोणत्या महिन्यात व कोणत्या तिथीस करण्याचे ठरले होते, याचा नाटकात उल्लेख नाही. वाल्मिकी रामायणात तो चैत्र शुद्ध दशमीस नियुक्त केला होता असे म्हटले आहे. तो राज्याभिषेक त्या दिवशी होऊ शकला नाही. तसेच राम, लक्ष्मण व सीता त्याच दिवशी वनात गेले. यावरून पहिल्या अंकातील हा प्रसंग चैत्र शुद्ध दशमीस घडला असे म्हणण्यास हरकत नाही.

**अंक दुसरा :** रामायणाच्या कथनानुसार राम वनात गेल्यावर सहाव्या दिवशी मध्यरात्री दशरथ मरण पावला. त्या दिवशी बहुधा चैत्री पौर्णिमा असावी.

**अंक तिसरा :** दुसऱ्या व तिसऱ्या अंकाच्या दरम्यान दुसरे पंधरा दिवसाचे अंतर आहे. या अंकात आलेला कृत्तिका नक्षत्राचा उल्लेख महत्त्वाचा आहे. साधारणपणे त्या दिवशी वैशाख शुद्ध प्रतिपदा अथवा द्वितीया असावी. भरत प्रतिमागृहाजवळ आला त्या वेळी कृत्तिका नक्षत्र चालू असल्याचा उल्लेख आहे. ती वेळ दुपारची असावी असे दिसते.

**अंक चौथा :** भरत प्रतिमागृहामधून तडक वनात गेला आहे. तो अयोध्येला गेला नाही. रामायणातील निवेदनानुसार राम त्या वेळी चित्रकूट पर्वतावर राहात होता. अयोध्येपासून चित्रकूटास पोहोचण्यास कमीत कमी दोन दिवस तरी लागले असतील. तेव्हा तिसऱ्या अंकानंतर दोन दिवसांनी या अंकातील घटना घडल्या आहेत. म्हणजे वैशाख शुद्ध तृतीया किंवा चतुर्थी या दिवशी राम आणि भरत यांची भेट झाली असावी.

**अंक पाचवा :** या अंकाच्या अखेरीस रावण सीतेला पळवून नेतो. रामायणाचा संदर्भ पाहिला तर राम वनात गेल्यानंतर तेरा वर्षांनी सीताहरणाचा प्रसंग घडलेला आहे. पुराणातील हकीकतीनुसार माघ वद्य अष्टमीस सीताहरण झाले. 'तिलक' टीकेत ते फाल्गुन शुद्ध अष्टमीस झाल्याचे सांगितले आहे. परंतु नाटककाराने या अंकात रामाच्या तोंडी 'उद्या वडिलांचे वार्षिक श्राद्ध आहे' असे वाक्य घातलेले आहे. त्यामुळे दशरथाच्या श्राद्धतिथीस वरील स्थिती जुळत नाही. दुसरे असे की चौथ्या अंकानंतर तेरा वर्षांनी पाचवा अंक सुरू झाला आहे असे मानण्यास कोणताही आधार नाही. भासाने रामायणाच्या कथेस

मुरड घालून दशरथाच्या वर्षश्राद्धाच्या तिथीच्या आधल्या दिवशी सीताहरण झाल्याचे दर्शविले आहे. तेव्हा श्री. मो.रा.काळे यांचे वरील मत बाजूला सारणे योग्य होईल.

**अंक सहावा :** या अंकाच्या विष्कंभकातील घटना सीताहरणाच्या प्रसंगातील आहे. दोन तपस्वी रावण आणि जटायू यांच्यातील युद्धाचे वर्णन करीत आहेत. पण मुख्य प्रवेशातील घटना मात्र सुमारे चार महिन्यांनी घडली असावी, असे श्री. काळे यांनी म्हटले आहे. याचा अर्थ सीताहरण झाल्यानंतर चार महिन्यांनी भरतास ही हकीकत समजली आहे. हा काळ रामायणाच्या आधारे निश्चित केलेला आहे. सुमंत्र रामाची भेट घेण्यासाठी जनस्थानात गेले पण राम तेथे नसल्याचे समजले. राम त्या वेळी सुग्रीवास साह्य करण्यासाठी किष्किंधेला गेला होता. त्याने वालीचे निर्दालन करून सुग्रीवास गादीवर बसवले. रामायणानुसार तेव्हा पावसाळा चालू होता. पण भास हा नेहमीच रामायणास अनुसरत नाही. तेव्हा हा कालावधी तर्कानेच ठरवायला हवा. त्यामुळे एखादा महिना लोटला असावा असे वाटते.

**अंक सातवा :** या अंकात सारे सुंदरकांड व युद्धकांड गुंडाळून टाकले आहे. त्याप्रमाणे तेरा वर्षांचा कालावधीही येथेच मानावा असे मला वाटते. रावणाच्या वधानंतर राम ताबडतोब अयोध्येच्या सीमेवरील तपोवनात आला आहे. या प्रवासास पंधरा ते तीन आठवडे एवढा काळ लागला असावा. सहाव्या अंकानंतर या अंकातील घटना सुमारे नऊ महिन्यांनी घडल्या आहेत असे श्री. काळ्यांनी म्हटले आहे. ते रामायणातील तिथ्या प्रमाण मानून त्याच प्रस्तुत नाटकाच्या कथावस्तूस लावण्याचा प्रयास करीत आहेत. पण नाटकाच्या संदर्भात त्या तिथ्या जुळत नाहीत.

सारांश एकंदर कालखंड चौदा वर्षांचा असला तरी प्रत्येक दोन अंकाच्या दरम्यान किती कालावधी लोटला असावा हे नाटकाच्या संदर्भात दाखवण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

* * *

या नाटकात राम, सीता, लक्ष्मण, भरत व कैकेयी अशी पाचच पात्रे महत्त्वपूर्ण आहेत. प्रतिनायक असलेल्या रावणाला यात मुळीच वाव मिळालेला नाही. तीच तऱ्हा दशरथाची आहे. अयोध्येचा राजा असूनही तो अगदीच असहाय्य व दीन आहे. राम वनवासाला गेल्याचे समजताच त्याने हाय खाल्ली व त्याची

परिणती त्याच्या मृत्यूत झाली. रामाची आई कौसल्या व लक्ष्मणाची आई सुमित्रा यांची चित्रे अत्यंत फिकट आहेत. तेव्हा वरील पात्रांचा क्रमाने विचार करू या.

**(१) राम :** हा नाटकाचा नायक असला तरी त्याला पुरेसा वाव न दिल्याने त्याचे चित्रण काहीसे फिके उतरले आहे. रामाचा स्वभाव अत्यंत निर्मल व निगर्वी आहे. राज्याभिषेक ऐनवेळी स्थगित झाल्यामुळे त्याला यत्किंचितही दु:ख होत नाही. उलट वडीलच गादीवर राहिल्याने आपल्यावर पडणारी जबाबदारी टळली, म्हणून त्याने सुस्कारा टाकला आहे. नंतर कैकेयीने आपल्या राज्यप्राप्तीला खो घातला हे समजल्यावरही तो तिच्यावर रागावत नाही. भरताला राज्य मिळावे यासाठी तिने कारस्थान केले हे ऐकूनही त्याच्या मनाची शांती ढळत नाही. दशरथाने कैकेयीला दोन वर देऊ केले होते, ही गोष्ट रामाला ठाऊक होती. त्यामुळे जर कैकेयीने भरतासाठी राज्य मागितले असेल तर त्यात गैर असे काही नाही. हे राज्य भरताचे होईल. मग आम्ही त्याची इच्छा धरणे हा अपराध ठरेल, अशी रामाची अत्यंत न्यायी अशी विचारसरणी आहे. कैकेयीने आपल्यावर चौदा वर्षांचा वनवास लादलेला आहे, हे समजल्यावर तो ती पित्याची इच्छा म्हणून तयार होतो. क्रुद्ध झालेल्या लक्ष्मणालाही शांत करतो.

पुढे तिसऱ्या अंकात भरताशी भेट झाल्यानंतरही रामाचे बोलणे अतिशय ऋजुता दर्शविणारे आहे. भरत त्याला अयोध्येस घेऊन जाण्यासाठी आलेला आहे. त्याची समजूत रामाने अत्यंत चातुर्याने घातलेली आहे. त्याचा युक्तिवादही बिनतोड आहे. तो चौदा वर्षांनंतर भरताकडून राज्य परत घेण्याचे वचन देतो व आपल्या पादुकाही भरतास प्रदान करतो. भरतभेटीचा हा प्रसंग अप्रतिम वठलेला आहे. भरताच्या स्वार्थत्यागाने त्याचे चित्र विशेष उजळलेले आहे.

सारांश, रामाच्या ठिकाणी असलेल्या उत्कृष्ट गुणांचा यथातथ्य आविष्कार करण्यात आला आहे. क्वचित एक-दोन गोष्टी खटकतात. उदा. वनात जाताना राम दशरथाची भेट घेण्याचे नाकारतो. तसेच चौथ्या अंकात रावणाशी संभाषण करीत असता त्याच्यावर संपूर्ण विश्वास टाकून व सीतेला एकटी सोडून तो हरणामागे जातो.

**(२) सीता :** सीता ही रामाची दुसरी सावली आहे. ती अतिशय साधी, शांत व मितभाषी आहे. तिचा स्वभाव निष्कपटी आहे. तिच्या मनात दशरथाबद्दल व रामाबद्दल अत्यंत आदरभाव आहे. राम वनात जाणार आहे हे

समजताच तीही त्याच्या पाठोपाठ जाण्याचे ठरवते. राम तिला तिच्या निश्चयापासून परावृत्त करू लागताच तिने केलेला युक्तिवाद पाहण्यासारखा आहे. लक्ष्मणही सीतेची बाजू घेऊन तिचे वर्तन योग्य असल्याचे सांगतो. सीतेच्या ठिकाणी खऱ्या आर्य स्त्रीला साजतील असे गुण आहेत.

**(३) भरत :** भरताची व्यक्तिरेखा सर्वोत्कृष्ट वठलेली आहे. किंबहुना सारे नाटक भरताभोवती फिरत आहे, असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही. भरत लहानपणापासून आजोळी असल्याने त्याला अयोध्येत काय चालले आहे, हे ठाऊक नाही. आपल्या आईच्या कारस्थानामुळे दशरथाचा मृत्यू ओढवला. रामाचा राज्याभिषेक रहित झाला इतकेच नव्हे तर त्याला वनवास पत्करावा लागला. हे समजल्यावर भरताचा संताप अनावर होतो. त्याला आईच्या दुष्कृत्याची लाज वाटते. तिघी राजमाता समोर दिसल्यावर तो कौसल्या व सुमित्रा या दोघींनाच वंदन करतो. कैकेयीस तो आई मानण्यासही तयार नाही.

प्रतिमागृहातून अयोध्येस येण्याऐवजी तो रामाची भेट घेण्यासाठी तडक वनात जातो. रामाला अयोध्येस परत चलण्याचा आग्रह करतो. राम त्याची समजूत घालतो. केवळ रामाच्या शब्दाखातर तो राज्यकारभार करण्यास तयार होतो. त्याला रामाविषयी आदर आहे. खरे तर रामाबरोबर वनात राहण्याची त्याची इच्छा आहे. अखेरी रामाच्या पादुका घेऊन त्यांना तो अभिषेक करण्याचे ठरवतो.

सहाव्या अंकात होणारे त्याचे दर्शन अत्यंत हृद्य आहे. तो रामाच्या नावाने राज्यकारभार करीत आहे. राजवाड्यात राहात असला तरी विरक्तवृत्तीने वावरत आहे. त्याने जटा व वल्कले धारण केली आहेत. रावणाने सीतेचे अपहरण केल्याचे समजताच तो मूर्च्छित होतो. रघुकुलावर आलेल्या या भयंकर संकटास कैकेयीच जबाबदार आहे असे समजून तो कैकेयीची निर्भर्त्सना करतो. त्या वेळी कैकेयी आपण रामाला कशासाठी वनात पाठवले याचा स्पष्ट शब्दांत उलगडा करते. तो ऐकून तो चकित होतो. आपण आपल्या आईला विनाकारण दूषणे दिली याचा त्याला खेद होतो. तो कैकेयीच्या पाया पडतो व तिची क्षमा मागतो. असे भरताचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण नाटककाराने केलेले आहे. त्यामुळे नाटकाचा खरा नायक तोच आहे असे म्हणायला काही हरकत नाही.

**(४) लक्ष्मण :** हा खरोखर रामाचा धाकटा भाऊ शोभण्यासारखा आहे. रामाविषयी याच्या मनात आदरभाव आहे. रामाची आज्ञा पाळणे व त्याची सेवा करणे यावाचून त्याला दुसऱ्या कशात रस नाही; पण रामाला राज्यप्राप्तीपासून

वंचित केल्याबद्दल तो कैकेयीवर संतापतो. राम त्याची समजूत घालतो. राम राजा झाला काय किंवा भरत राजा झाला काय? लक्ष्मणाच्या स्थानात काही फरक पडणार नव्हता. राजाचे रक्षण करणे, हे लक्ष्मणाचे कर्तव्य आहे. तरी रामाला चौदा वर्षांचा वनवास भोगावा लागणार या विचाराने त्याला भोवळ येते. मग तोही रामाबरोबर वनात जाण्याचा निश्चय करतो. लक्ष्मणाची थोडक्यात रेखाटलेली व्यक्तिरेखा चटका लावणारी आहे.

(५) **कैकेयी :** रामायणातील कैकेयी आपल्याला परिचित आहे. दशरथाने दिलेल्या दोन वरांचा फायदा घेऊन ती रामाला वनात पाठवण्याचा व आपल्या पुत्राला राज्य प्राप्त करण्याचा हट्ट पूर्ण करते. ही कैकेयी हट्टी व स्वार्थी आहे. कदाचित मंथरेनेही तिचे कान फुंकले असावेत. पण तिचा स्वार्थीपणा लपत नाही. पण कैकेयीचे हे चित्र भासाने पुरते पालटून टाकले आहे. ती रामाचे प्राण वाचविण्यासाठी त्याला वनात पाठवते. दशरथ हा एवीतेवी पुत्रशोकाने मरणारच होता; पण हा पुत्रशोक पुत्राच्या मृत्यमुळे न उद्भवता त्याला वनात पाठवून उत्पन्न करण्यात तिला यश आले आहे. यामुळे तिची व्यक्तिरेखा एकदम उजळली आहे. दुसरे असे की, कैकेयीने ही योजना वसिष्ठ, वामदेव इत्यादी गुरुजनांच्या सल्ल्यानुसार आखलेली आहे. तिच्या खुलाशामुळे भरताचीही समजूत पटते. असे हे कैकेयीचे चित्रण वाचक-प्रेक्षकांना चकित करणारे व तिच्यातील 'माणूस' शोधणारे आहे.

* * *

समालोचनात प्रामुख्याने दोन-तीन प्रश्नाचा विचार केला आहे.

(१) नाटकाचे नाव 'प्रतिमा' आहे. प्रतिमा म्हणजे पुतळा अथवा मूर्ती होय. हे शीर्षक प्रतिमागृहातील प्रसंगास धरून दिलेले आहे. प्रतिमागृहात दशरथाच्या पूर्वीच्या पिढीतील व्यक्तींचे म्ह. दिलीप, रघु व अज यांचे पुतळे उभे केलेले होते. त्यांच्या शेजारी दशरथाचाही पुतळा होता. त्यावरून भरताला आपल्या पित्याच्या मृत्यूची वार्ता समजली.

प्रतिमेचा आणखी एक अर्थ नाटककाराला अभिप्रेत आहे व तो म्हणजे साम्य. भरताचा आवाज हुबेहूब दशरथासारखा आहे. त्याचा आवाज ऐकल्यावर सुमंत्राला दशरथ बोलल्याचा भास होतो. तसेच चौथ्या अंकात सीता व लक्ष्मण भरताला पाहून चकित होतात कारण भरताची अंगलट व चेहरेपट्टी हुबेहूब रामासारखी आहे. म्हणजे दशरथ, राम व भरत हे एकमेकांच्या प्रतिमा आहेत.

त्यामुळे 'प्रतिमा' ही मध्यवर्ती कल्पना धरून भासाने प्रस्तुत नाटकास 'प्रतिमा' हे नाव दिलेले असावे.

(२) कैकेयीने आपण रामाला का वनात पाठवले याचे जे स्पष्टीकरण दिले आहे त्यासंबंधी येथे विचार करावयाचा आहे. तिच्या स्पष्टीकरणाचे दोन भाग आहेत. (१) पुत्रशोकाने दशरथाचा मृत्यू होणार अशी शापवाणी कैकेयीला फोल ठरवायची आहे. त्यासाठी ती रामाचा राज्याभिषेक अचानक रहित करून त्याला वनात पाठवते हा धक्का दशरथास सहन झाला नाही व तो मृत्युमुखी पडला. रामाचा अथवा इतर मुलांचा मृत्यू टळावा, यासाठी ही कैकेयीची खटपट होती व ती सफल झाली.

(२) कैकेयीच्या मनात रामाला फक्त चौदा दिवसच वनवासात पाठवायचे होते. पण गोंधळून गेल्यामुळे चौदा वर्षे असे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडले.

यातले पहिले कारण बुद्धिगम्य आहे. भासाने डोके लढवून कैकेयीला दोषमुक्त केलेले आहे. शापवाणीला हुलकावणी देण्याचे कैकेयीचे कसब वाखाणण्यासारखे आहे. तिचा युक्तिवाद हा तसा पटण्यासारखा आहे. पण त्यातही शंका घेण्यास वाव आहे. पुत्रशोक म्हणजे पुत्राच्या मृत्यूमुळे होणारा शोक असाच त्याचा अर्थ आहे आणि दशरथाला मिळालेला शाप 'तू आमच्यासारखाच पुत्रशोकाने मरशील' असा आहे. त्यामुळे त्या अर्थाला बगल देणे कितपत योग्य आहे?

दुसरे स्पष्टीकरण तर उघड उघड पोरकट आहे. त्याचे समर्थन डॉ. भटांसारख्या मर्मग्राही पंडिताने करावे, याचे नवल वाटते. रामाला जर चौदाच दिवस वनात पाठवले असते तर तेवढा कालावधी दशरथाने सहज सहन केला असता. कारण याच्यापूर्वी त्याने राम-लक्ष्मणांना विश्वामित्राबरोबर यज्ञाचे रक्षण करण्यासाठी पाठवले होते. दुसरे असे की कैकेयी जर चुकून 'चौदा वर्षे' असे म्हणाली असेल तर ते विधान दुरुस्त करण्यात कोणती अडचण होती? त्यामुळे भरताची समजूत काढण्यासाठी तिने ही मखलाशी तर केली नसेल ना अशी शंका येते.

(३) मागे सांगितल्याप्रमाणे भरत हाच या नाटकाचा नायक आहे. रामाला डावलून भरताभोवती कथावस्तू फिरत ठेवण्यात नाटककाराचा कोणता हेतू आहे, हे स्पष्ट झाल्याशिवाय नाटकाचे मर्म ध्यानात येणार नाही. राम वनात निघून गेला. दशरथ तर मरण पावला. आता राज्याची जबाबदारी कोणी घ्यायची? भरत हाच राज्याचा वारसा होता. पण त्याला राज्याचा लोभ नाही. 'कैकेयीला राज्याभिषेक करा' असे सांगून तो रामाला भेटायला गेला.

पण नाइलाजाने भरतालाच ती जबाबदारी घ्यावी लागली. सारांश, दशरथाचा वारसा त्याच्याकडे चालून आला. रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून तो कारभार पाहू लागला. राम वनात गेल्यानंतर पुढील कथानकाशी नाटककाराला काही कर्तव्य नाही. अपवाद फक्त सीताहरणाचा. सीतेचे हरण हे रघुकुलावरचे संकट होते. म्हणून भरत सैन्य घेऊन रामाच्या मदतीला जाण्याचे ठरवतो. अशा प्रकारे कथावस्तूची सर्व सूत्रे नाटककाराने भरताच्या हाती दिलेली आहेत. आंता भरतापुढे फक्त एकच उद्दिष्ट आहे व ते म्हणजे चौदा वर्षांनंतर राम परत आला की त्याचे राज्य त्याच्या ताब्यात द्यावयाचे व आपण जबाबदारीतून मुक्त व्हायचे. अशा प्रकारे कथानकाचे केंद्र बदलून भासाने नाटकाची रचना केली आहे. त्यामुळे संस्कृत नाट्यसृष्टीत 'प्रतिमा' नाटकाला वरचे स्थान प्राप्त झाले आहे.

## ११. प्रतिज्ञा-यौगंधरायण

नाटकात वत्सदेशाचा राजा 'उदयन' व उज्जयिनीच्या प्रद्योत राजाची कन्या वासवदत्ता यांच्या परस्पर प्रेमाची व पलायनाची कथा आहे. प्रद्योताने कपटयोजना करून उदयनाला पकडले. त्याच्या मनात उदयनालाच आपली कन्या द्यावयाची आहे. त्याच्या योजनेनुसार उदयन व वासवदत्ता एकमेकाच्या प्रेमात पडतात; पण उदयनाचा मंत्री यौगंधरायण उदयनाच्या सुटकेसाठी योजना आखतो. त्यानुसार उदयन व वासवदत्ता पळ काढतात, असा यात एकंदर कथाभाग आहे.

वत्सदेशातील कौशांबी नगरीचा राजा उदयन हा हस्तिविद्येत निपुण होता. तो आपली घोषवती वीणा वाजवून हत्तीला मंत्रमुग्ध करीत असे व नंतर त्यास पकडत असे. एकदा त्याच्या कानावर आले की नागवनामध्ये एक निळ्या रंगाचा हत्ती आहे. हा हत्ती दुर्मिळ असल्याने त्याची शिकार करण्याची त्यास इच्छा होते. पण उदयनाचा विश्वासू मंत्री यौगंधरायण याला असे समजते की यात प्रद्योत राजाचा कुटिल डाव आहे. इतक्यात सेवक हंसक व निर्मुंडक हे येऊन उदयनाला पकडण्यात आल्याची वार्ता सांगतात.

चौकशी केल्यावर हंसक सांगतो की उदयन राजा बरोबर फक्त वीस सैनिक घेऊन वनात गेला. तेथे शालवृक्षाखाली त्याला सजवलेला निळसर रंगाचा हत्ती दिसला. त्याने आपली वीणा बाहेर काढली. पण तो हत्ती कृत्रिम होता. त्याच्या

पोटात सैनिक लपले होते. ते पटापट बाहेर पडले. मग तेथे लढाई झाली. पण शत्रूचे बळ अधिक असल्याने निरुपाय झाला. राजा उदयन लढता लढता थकला व मूर्च्छित पडला. नंतर त्याला बंदिवान करण्यात आले.

हा समाचार ऐकून यौगंधरायण खिन्न झाला. ही बातमी त्याने अंत:पुरात कळवली. एवढ्यात प्रतिहारी राजमातेचा निरोप घेऊन आली. राजमातेने यौगंधरायणाला अशी विनंती केली - 'मुला, तू प्रथम माझ्या मुलाचा सखा आहेस व मागाहून मंत्री आहेस. तरी तू त्याची सुटका कर.' त्याबरोबर हातात पाणी घेऊन यौगंधरायणाने उदयनाची सुटका करण्याची प्रतिज्ञा केली. तो म्हणाला,

''ज्याप्रमाणे राहू चंद्राला ग्रासतो त्याप्रमाणे शत्रूने आमच्या राजाला ग्रासलेले आहे. त्या राजाची मी जर सुटका केली नाही तर मी नावाचा यौगंधरायण नव्हे.''

(अंक १, श्लोक १६)

एवढ्यात विचित्र वेशधारी ब्राह्मण येऊन वस्त्रे टाकून निघून गेला. तेव्हा ही सूचना घेऊन यौगंधरायणाने वेषांतर केले व उदयनाची सुटका करण्यास तो सज्ज झाला. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीस विष्कंभक आहे. यात कंचुकी प्रवेश करतो. त्याला एका गोष्टीचे नवल वाटते की रोज प्रद्योत राजाकडे त्याच्या मुलीला-वासवदत्तेला-मागणी घालण्यासाठी निरनिराळ्या राजाकडून दूत येतात पण राजा कोणाला परत पाठवत नाही किंवा कोणाची मागणी स्वीकारतही नाही. याचे काय कारण असावे? तो असा तर्क करतो की ज्या राजाकडून मागणी यावी असे महासेनाला (म्ह. प्रद्योताला) वाटते, त्या राजाचा दूत अद्याप आला नसावा.

मुख्य प्रवेशात महासेन येतो. विशेष म्हणजे कंचुकी राजाला आपल्या मनातली शंका बोलून दाखवतो. त्यावर राजा गमतीने म्हणतो, ''अरे बादरायणा, वराच्या ठिकाणी जास्तीत जास्त गुण असावेत या इच्छेमुळे तसेच वासवदत्तेवरील उत्कट वात्सल्यामुळे माझ्या मनाचा निर्णय होत नाही.''

मग राजा महाराणी अंगारवतीला बोलावणे पाठवतो. ती येऊन सांगते की वासवदत्तेला आता वीणा वाजवण्याचा छंद जडला असून ती आता त्याचे शिक्षण घेऊ लागली आहे. तेव्हा राजा म्हणतो की ती आता उपवर झालेली

आहे. तेव्हा राणी म्हणते की, ती अजून लहान आहे. असा त्यांचा प्रेमळ संवाद चाललेला असताना राजा तिला ज्यांच्याकडून दूत आले आहेत त्या राजांची नावे सांगतो व तिला यातील कोणता राजा योग्य वाटतो, असे विचारतो.

त्याच वेळी कंचुकी गडबडीने येतो व उद्गारतो - 'वत्सराज.' मग नीट थांबून तो सांगतो की शालंकायन अमात्यांनी वत्सराज उदयनाला पकडले आहे. हे शब्द ऐकताच महासेनाचा आपल्या कानावर विश्वास बसत नाही. तो पुन्हा पुन्हा कंचुकीला विचारतो. वत्सराज प्राप्त झाल्यामुळे त्याला अतोनात आनंद होतो. त्याच्या मनावरचा सारा ताण हलका होतो. यौगंधरायणासारखे मंत्री उदयनाचे रक्षण करीत असताना तो हाती लागणे ही आश्चर्याचीच गोष्ट होती. म्हणून तो म्हणतो -

''कोणी जर मला सांगितले की, तळहाताने मंदार पर्वताला उरफाटे केले आहे, तर त्यावर जसा माझा विश्वास बसणार नाही त्याप्रमाणे 'उदयनाला पकडले आहे' ह्या तुझ्या सांगण्यावर माझा विश्वास बसत नाही. युद्धात केलेले उदयनाचे पराक्रम त्याचे शत्रू अद्याप विसरलेले नाहीत व यौगंधरायणाची कारस्थाने अद्याप आमच्या कानात दुमदुमत आहेत.''

(अंक २, श्लोक ९)

महासेन व अंगारवती या दोघांच्याही मनात उदयनालाच वासवदत्तेला द्यावयाचे आहे. यासाठीच ते दुसऱ्या कोणचाही विचार मनात आणीत नाहीत. अर्थात उदयनाकडून त्यांना प्रस्ताव मिळालेला नाही, हेही खरे आहे. उदयन प्रद्योताला जुमानत नाही. यालाही एक कारण आहे. तो वेदविद्यासंपन्न घराण्यात जन्मलेला आहे. त्याने गांधर्ववेदाचे (म्ह. संगीत शास्त्राचे) अध्ययन केलेले आहे. तसेच तो अत्यंत देखणा आहे व आपल्या प्रजाजनांचाही आवडता आहे. या गोष्टीची खुद्द महासेनाला कल्पना आहे. त्यामुळे तो उदयनाची व्यवस्था एखाद्या राजपुत्रासारखी ठेवण्याचा आदेश देतो.

इतक्यात कंचुकी उदयनाची अत्यंत आवडती अशी घोषवती वीणा महासेनासमोर आणून ठेवतो. महासेन ती उदयनाची वीणा वासवदत्तेच्या स्वाधीन करण्यास सांगतो. मग तो उदयनाची चौकशी करतो तेव्हा उदयनाला जखमा झाल्याचे सांगण्यात येते. त्याबरोबर तो लगेच त्याच्या जखमांवर वैद्यकीय उपचार करण्यास सांगतो. (अंक दुसरा)

यौगंधरायण, सेनापती रुमण्वान व वसंतक हा विदूषक हे राजा उदयनाचे तीनही सहकारी वेष पालटून उज्जयिनीमध्ये आलेले आहेत. त्यांना तेथील अग्निशाळेत गुप्त खलबत करावयाचे आहे. पण तेथे लोक येत जात असल्याने त्यांना एकांत मिळत नव्हता. ते खोटे भांडण करीत दुहेरी अर्थाने बोलत आहेत.

थोड्या वेळाने अग्निशाळा मोकळी झाल्यावर ते एकमेकांना समाचार विचारतात. उदयनाने स्नान करून देवतांना प्रणाम केला असे विदूषकाने सांगितल्यावर यौगंधरायण म्हणतो -

"पूर्वी स्नान करून महाराज देवतांचे अर्चन करू लागताच बाहेर चौघडे वाजत असत पण आता पूजन करताना त्यांच्या हातापायातील बेड्या खळखळ वाजतात."

(अंक ३ श्लोक ४)

मग यौगंधरायण राजाची सुटका करण्यासाठी योजना केली असल्याचे सांगून विदूषकास ती राजाच्या कानावर घालण्यास सांगतो. पण वसंतक गप्प राहतो. कारण या योजनेचा उपयोग होणार नसतो. राजाचे मन प्रद्योताची कन्या वासवदत्ता हिच्यावर जडलेले आहे व तिला सोडून तर तो येऊ शकत नाही. त्याच्या मनात वासवदत्तेला घेऊनच बाहेर पडावयाचे आहे.

यौगंधरायणाला उदयनाचे वागणे पसंत पडत नाही. राजाचे वागणे अगदी हास्यास्पद आहे. हा त्याचा चक्क निर्लज्जपणा आहे. देशकालाचा काही विचार न करताच राजा मदनाच्या जाळ्यात अडकलेला आहे. यावर विदूषकही "आपण राजाला सोडून परत जाऊ या." असे म्हणतो. पण तसे करणेही यौगंधरायणाला योग्य वाटत नाही. मग विदूषकच त्याला 'राजा व वासवदत्ता या दोघांनाही' घेऊन जाण्याची युक्ती शोधण्यास सांगतो. मग यौगंधरायण राजा, वासवदत्ता, घोषवती वीणा व नलगिरी हत्ती या चारही जणांचे अपहरण करण्याची प्रतिज्ञा करतो. (अंक तिसरा)

प्रद्योत राजाचा नलगिरी हत्ती बेफाम झाल्यामुळे त्याला ताळ्यावर आणण्याची कामगिरी उदयनावर सोपवण्यात आली व त्यानिमित्त त्याची सुटका करण्यात आली. त्याच वेळी वासवदत्ता आपल्या भद्रावती या हत्तिणीवर बसून जलक्रीडा करण्यासाठी बाहेर पडली. संधी साधून सर्वजण पळून गेले. तशात भद्रावती या हत्तिणीचा माहूत हा यौगंधरायणाचा गुप्तहेरच होता. त्यामुळे वासवदत्ता जलक्रीडा करण्यास गेली असून ती अद्याप परत आली नाही म्हणून चौकशी करणाऱ्या सेवकाला गात्रसेवक (म्ह. गुप्तहेर) लवकर दाद देत नाही.

इकडे शहरात गोंधळ उडाल्याने सैन्य तयार होते व यौगंधरायण त्या सैन्याला तोंड देतो. इतक्यात एका हत्तीच्या तीक्ष्ण दंतप्रहाराने यौगंधरायणाची तलवार तुटते. तो नि:शस्त्र होताच त्याला पकडण्यात आले. ही हकीकत प्रवेशकात दिलेली आहे.

इकडे शहरात वासवदत्ता पळून गेल्याचे वृत्त पसरताच गोंधळ उडालेला आहे. इतक्यात यौगंधरायणाला तेथे आणण्यात येते. तो आता खुशीत आहे. कारण त्याने उदयनाला व वासवदत्तेला सुखरूपपणे शहराबाहेर काढलेले आहे. तो आता आनंदाने कैदेत जाण्यास तयार आहे. मग त्याला आयुधागारात हलवण्यात येते.

त्या ठिकाणी प्रद्योताचा मंत्री भरत रोहक हा त्याला भेटायला येतो. यौगंधरायणाने राजा व वासवदत्ता या दोघांची सुटका केल्याने राजा प्रद्योत व त्याचे मंत्रिगण हे सारेच खजिल झालेले आहेत. तरी यौगंधरायणाला पाहिल्याबरोबर तो म्हणतो - 'आम्हाला धोका देऊन राजाला हत्तीसकट बाहेर नेलेस याबद्दल कशाला आपली पाठ थोपटून घेत आहेस?' त्याचा हा टोमणा ऐकून यौगंधरायणाला हसू आले. तो म्हणाला -

''मल्लिका व सालवृक्ष यांच्या मधोमध कृत्रिम निळ्या हत्तीला लपवून तुम्ही जो धोका दिलात त्यामुळे बंदीत पडलेल्या आमच्या राजाला हाताची उशी करून झोपण्याची पाळी आली. हत्तींना वश करण्यात तरबेज असलेल्या राजाची घोषवती वीणा तुम्ही हिरावून घेतलीत. हा धोका नव्हता काय? आपण प्रस्तुत केलेल्या मार्गावरून मी वाटचाल केली यात माझा काय दोष आहे?''

(अंक ४, श्लोक १६)

त्या दोघांची बोलाचाली सुरू असताना कंचुकी त्या ठिकाणी आला. त्याने महासेन प्रद्योत यौगंधरायणाला सोन्याचा कलश भेट देणार असल्याचे सांगितले. पण यौगंधरायणाने ती त्याची भेट नाकारली. इतक्यात पडद्यात गोंधळ माजतो. वासवदत्ता उदयनाबरोबर पळून गेल्याचे समजताच तिची आई अंगारवती शोकाकुल झाली. ती आत्महत्या करण्यास तयार झाली. तेव्हा प्रद्योताने तिची कशीबशी समजूत घातली. वासवदत्ता व उदयन यांच्या तसबिरीचे लग्न लावण्याचे ठरते. त्यामुळे आनंदीआनंद झाला, हे ऐकल्यावर यौगंधरायणाने भेटीचा स्वीकार केला व भरतवाक्याबरोबर नाटक समाप्त झाले. (अंक चौथा)

* * *

शतानिकाचा पुत्र उदयन हा वत्सदेशावर राज्य करीत होता. त्याच्या संबंधीची सविस्तर कथा सोमदेवाच्या कथासरिता सागरात आलेली आहे. मूळ बृहत्कथेत असलेल्या सदर कथेच्या आधारे भासाने नाट्यरचना केली आहे. ती कथा 'प्रतिज्ञा यौगंधरायणाच्या' संदर्भात याप्रमाणे सांगता येईल.

उदयन् राज्य करीत असता त्या काळात उज्जयिनीत चंड महासेन ऊर्फ प्रद्योत हा राजा राज्य करीत होता. त्याला वासवदत्ता नावाची सुंदर कन्या होती. त्याच्या मनात उदयनाला आपली कन्या द्यावी असे होते. पण उदयन हा मानी होता. प्रद्योताने दूताकरवी निरोप पाठवला, "माझी कन्या गायन वादन शिकण्यासाठी तुझी शिष्या होऊ इच्छिते तरी तू उज्जयिनीला येऊन तिला शिकव." हा उघड उघड अपमानस्पद निरोप ऐकून उदयनाने त्वरित निरोप पाठवला, "जर तुझ्या कन्येला माझी शिष्या व्हायचे असेल तर तिला कौशांबीस पाठवून द्यावे."

उदयन जरी सर्वगुणसंपन्न असला तरी लहरी होता. त्याचे राज्यकारभारात लक्ष नव्हते. आपला मंत्री यौगंधरायण याच्यावर कारभार सोपवून तो खुशाल शिकारीला जाई. आपली आवडती घोषवती वीणा वाजवी. तिच्या साह्याने मदोन्मत्त हत्तींची शिकार करी. त्याला मदिरेचाही नाद लागला. वासवदत्तेवर मन जडल्याने तो व्याकूळ झाला होता.

तिकडे प्रद्योताने उदयनास पकडण्यासाठी एक कारस्थान रचले. वत्सराजाने पाठवलेला उलट निरोप त्याला मिळाला. त्याने लाकडाचा हत्तीच्याच आकाराचा एक कृत्रिम हत्ती बनवला. त्या हत्तीच्या पोटात सशस्त्र सैनिक बसण्याची व्यवस्था केली. यंत्राच्या आधारे तो हत्ती हालचाल करीत असे. विंध्यारण्यात हिंडणाऱ्या हेरांनी उदयनास हत्तीची माहिती दिली. उदयन त्या हत्तीची शिकार करण्यास तयार झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच मंत्र्यांच्या व ज्योतिषांच्या सल्ल्याचा अनादर करून तो चार रक्षक घेऊन अरण्यात शिरला. वीणा घेऊन त्या भल्या मोठ्या हत्तीसमोर आला. वीणा वाजवून त्यास आकृष्ट करू लागला. इतक्यात हत्तीच्या पोटातून भराभरा सैनिक उतरले. त्यांनी राजाला गराडा देऊन कैद केले. राजा उज्जयिनीत पोहोचला. प्रद्योताने त्याचे स्वागत केले व आपल्या कन्येला गांधर्व विद्या शिकवण्याची विनंती केली. वासवदत्तेला पाहताच उदयनाचा क्रोध मावळला. तो तिला शिकवू लागला. दोघे परस्परांवर लुब्ध झाली.

इकडे राजाला पकडून नेल्याची वार्ता कौशांबीत समजली. यौगंधरायणाने राज्यकारभार सेनापती रुमण्वानाच्या हाती सोपवला. राजाचा मित्र वसंतक (विदूषक) याला बरोबर घेऊन यौगंधरायण विंध्यारण्यात गेला. तेथील शबर राजाकडून मदतीचे आश्वासन घेऊन उज्जयिनीत गेला. उज्जयिनीतील स्मशानात जाऊन त्याने वेताळास प्रसन्न करून घेतले. त्याच्या कृपेने त्या दोघांचे स्वरूप पालटले.

उज्जयिनीच्या रस्त्यावरून लोकांची करमणूक करीत ही जोडी राजवाड्यापर्यंत गेली. वासवदत्तेला त्या जोडीला पाहायचे असल्याने ते दोघे आत शिरले. इतक्यात यौगंधरायणाने उदयनाला खूण केली. तेव्हा हे दोघे कौशांबीचे असून आपली सुटका करण्यासाठी आलेले आहेत, हे राजाने ओळखले. वासवदत्तेला युक्तीने दूर करून यौगंधरायणाने उदयनाला बेड्या तोडण्याची युक्ती सांगितली. वसंतकाने वासवदत्तेची करमणूक करण्यासाठी लोहजंगाची कथा सांगितली.

त्यानंतर एके दिवशी यौगंधरायणाने राजास वासवदत्तेसह पलायन करण्याची सूचना दिली. उदयनाने वासवदत्तेजवळ हा विषय काढला. तीही राजाबरोबर पळून जाण्यास तयार झाली. मग उदयनाने यौगंधरायणाने सांगितलेल्या युक्तिनुसार आपल्या बेड्या तोडल्या. आपली घोषवती वीणा, वासवदत्ता व वसंतक यांच्यासह भद्रावती हत्तिणीवर बसून तो बाहेर पडला. दोघा रक्षकांनी त्यास अडवले; पण त्यांना ठार मारून तो उज्जयिनीबाहेर पडला व वेगाने मार्ग आक्रमू लागला.

महासेनाचा पुत्र पालक हा नलगिरी हत्तीवर बसून त्यांचा पाठलाग करू लागला. त्याने भद्रावती हत्तिणीस गाठले. पण नलगिरीने तिच्यावर आक्रमण केले नाही. वत्सराजाने पालकाशी युद्ध आरंभले पण लवकरच महासेनाचा गोपालक नावाचा दुसरा मुलगा तेथे आला व त्याने भावाला परत नेले. उदयनाचा मार्ग मोकळा झाला. मग यौगंधरायण त्यास भेटला अशा रीतीने सर्वजण कौशांबीस परत आले.

* * *

क्षेमेंद्राच्या बृहत्कथामंजिरीतही याप्रमाणे कथा सांगितली आहेत. क्षेमेंद्राने व सोमदेवाने मूळ कथेत कितपत फेरफार केलेत हे समजण्यास मार्ग नाही. भासाने आपली नाट्यकथा या कथानकावर बेतलेली आहे. किरकोळ फेरफार वगळता भासाने मूळ कथेत बदल केलेले दिसत नाहीत. केलेले बदल याप्रमाणे

(१) मूळ कथेत चंड महासेनाने उदयनाला पाठवलेला निरोप व त्यास उदयनाने दिलेले प्रत्युत्तर नाटकात गाळलेले आहे.

(२) यौगंधरायणाने उज्जयिनीच्या स्मशानातील वेताळाकडून सिद्धी प्राप्त करून घेतल्याची हकीकत गाळली आहे. त्याच्या ऐवजी द्वैपायन व्यासाने त्याला विचित्र वेश दिला, असे दाखवलेले आहे.

(३) मूळ कथेत वासवदत्तेची आई अंगारवती ही आत्महत्येचा प्रयत्न करते हा प्रसंग नाही. भासाने तो नवीन घातलेला आहे. तसेच उदयन व वासवदत्ता यांच्या तसबिरीचा विवाह लावण्याची कल्पनाही नाटककाराचीच आहे.

बाकी कथेचा सर्व सांगाडा मुळाप्रमाणेच आहे.

या नाटकात यौगंधरायण हे एकमेव ठसठशीत व डोळ्यात भरण्यासारखे पात्र आहे. त्यामुळे नाटकाचा नायक तोच आहे. वत्सराज उदयन हा कथानकाच्या दृष्टीने कितीही महत्त्वाचा असला तरी तो पडद्यावर येत नसल्याने गौण ठरला आहे. सेनापती रुमवान व विदूषक वसंतक यांनाही फारसा वाव मिळालेला नाही.

**(१) यौगंधरायण** - हा वत्सराज उदयनाचा प्रधानमंत्री आहे. राजाचा तो अत्यंत विश्वासातील आहे. उदयनाची आई तर यौगंधरायणाला आपला मुलगाच मानते. प्रजेचाही त्याच्यावर विश्वास आहे. विशेष म्हणजे यौगंधरायणाच्या कीर्तीचा डंका शत्रूपर्यंत पोहोचलेला आहे. दुसऱ्या अंकात प्रद्योत दरबारात बसलेला असतां कांचुकीय येऊन शालंकायनाने उदयनास पकडले असल्याची वार्ता सांगतो त्या वेळेस प्रद्योत एकदम उद्‌गारतो - "यौगंधरायण मरण पावला आहे काय?" याचा अर्थ यौगंधरायण जिवंत असता उदयनास पकडणे हे सर्वस्वी अशक्य आहे, हे प्रद्योतासही चांगले ठाऊक होते.

तो वेषांतर करण्यात पटाईत आहे. उदयनाची वासवदत्तेसहित सुटका करण्याची त्याने प्रतिज्ञा केली आहे. त्याने उदयनाची सुटका करण्याची योजना चातुर्याने आखली आहे. वासवदत्तेच्या हत्तिणीचा माहूत त्याच्या कटात सामील झालेला आहे. वत्सराज व वासवदत्ता सुखरूपपणे शहराबाहेर पडले तरी शत्रूशी लढाई करीत यौगंधरायण उज्जयिनीतच थांबलेला आहे. त्याला कैद करण्यात आल्यावर तो आनंदाने तुरुंगात जाण्यास तयार झाला कारण उदयनाची सुटका करण्याचे कर्तव्य त्याने पार पाडले आहे. तो विलक्षण हजरजबाबी आहे. भरत रोहक या प्रद्योताच्या मंत्र्याच्या आरोपास त्याने समर्पक उत्तर दिले आहे.

**(२) उदयन :** वत्सराज उदयन हे विलोभनीय पात्र आहे. हा अत्यंत सुंदर, शूर व कलाप्रेमी असा राजा आहे. प्रजाजन त्याच्यावर अनुरक्त आहेत. त्याचा कट्टर शत्रू उज्जयिनीचा राजा प्रद्योत हाही त्याच्यावर लुब्ध आहे. तो आपली कन्या उदयनास देण्याविषयी आतूर आहे. उदयन गांधर्व विद्येत प्रवीण आहे. तो अत्यंत मानी आहे. धीरललित नायकाचा उत्कृष्ट नमुना आहे.

तथापि कथानकावरून दिसून येणारे त्याचे व्यक्तिमत्त्व फारसे स्पृहणीय नाही. प्रद्योताने उदयनास पकडण्यासाठी एक कारस्थान योजले आहे, हे यौगंधरायणास समजताच त्याने राजाला धोक्याची सूचना दिली होती. पण उदयनाने सल्ला न मानता केवळ वीस सैनिक घेऊन एक दिवस अगोदरच विंध्यारण्यात प्रवेश केला. त्याबरोबर प्रद्योताच्या सैनिकांनी गराडा देऊन त्यास कैद केले. यावरून उदयनास राजकारणाचे ज्ञान बेताचेच होते असे म्हणावे लागते.

यौगंधरायणादी मंत्री त्याच्या सुटकेसाठी योजना आखत असता उदयन हा वासवदत्तेच्या प्रेमात पडल्याची वार्ता विदूषक सांगतो. तसेच उदयन वासवदत्तेला सोडून बाहेर पडणार नसल्याचे समजते. त्याबरोबर यौगंधरायण अक्षरश: वैतागतो. तो राजाच्या वर्तनावर कठोर टीका करतो - "शत्रूंना ही वार्ता समजली तर ते हसतील. खरोखर हा बुद्धीचा निर्लज्जपणा आहे. मित्रांना संताप आणणारी गोष्ट आहे. देशकालाचा अजिबात विचार न करता महाराज प्रणयात गुरफटले आहेत." (पहा - "अहो शत्रुजनापहास्यमभिधानम् । अहो निरपत्रतपा खलु बुद्धेः। अहो सुहृज्जनसन्तापकारणम् । अदेशकाले ललितं कामयते स्वामि।" (अंक तिसरा)

पण तो स्वामिनिष्ठ सेवक आहे. अखेरीस उदयन यौगंधरायणाच्या कटाचा आश्रय करूनच शहराच्या बाहेर पडतो. यावरून उदयनाच्या अंगी स्वत:चे असे कर्तृत्व फारच थोडे आहे. तो सचिवायत्त (म्ह. मंत्र्यावर राज्यकारभार सोपवून सुखोपभोगात रमणारा) राजा आहे. मूळ कथेत तो मदिरासक्त असल्याचा उल्लेख आहे. तो आपल्या इतर गुणांनी अत्यंत लोकप्रिय असला तरी मंत्र्यावाचून त्याचे पान हलत नाही, असेच त्याचे चित्रण आहे.

**(३) महासेन प्रद्योत :** हा अत्यंत सामर्थ्यसंपन्न झाला आहे. त्याची सत्ता सर्वत्र अबाधित आहे. वत्सराज उदयन हाच काय तो त्याला जुमानत नाही. तो उदयनाच्या रूपगुणावर लुब्ध आहे. त्याने आपली कन्या उदयनालाच द्यावयाची हे मनोमन ठरवलेले आहे. म्हणूनच तो कन्येला मागणी घालण्यास येणाऱ्या

दूतांकडे लक्ष देत नाही. तो गुणग्राहक आहे. कपटनीतीतही पारंगत आहे. त्याने मोठ्या शिताफीने उदयनास आपल्या जाळ्यात अडकवलेले आहे. उदयनाचा प्रधानमंत्री यौगंधरायणाविषयी त्याच्या मनात आदराची भावना आहे. बंदीवान झालेल्या उदयनाची व्यवस्था त्याने एखाद्या राजपुत्रासारखी ठेवलेली आहे. त्याच्या अंदाजाप्रमाणे उदयन व वासवदत्ता एकमेकावर लुब्ध होतात. यौगंधरायणाच्या कटानुसार ते दोघे पळून जातात. पण प्रद्योतास याची कल्पना असल्याने तो तिकडे विशेष लक्ष देत नाही. कटाचा सूत्रधार यौगंधरायण तावडीत सापडला तरी प्रद्योत त्याच्याशी सूडबुद्धीने वागत नाही. उलट त्याला एक सोन्याचे भांडे भेट म्हणून पाठवतो. तसेच महाराणी अंगारवतीची समजूत घालण्यासाठी उदयन व वासवदत्ता या दोघांच्या तसबिरीचा विवाह करण्याचे ठरवतो.

यामुळे प्रद्योताचे चित्रण उठावदार झालेले आहे. कथासरित्सागरामध्ये त्याचे नाव चंड महासेन असे दिले आहे. पण नावाप्रमाणे त्याचा स्वभाव उग्र वाटत नाही किंवा नाटककाराने तरी तो तसा दर्शविलेला नाही. उदयनाला पकडल्यापासून तो सौजन्यानेच वागत आलेला आहे. त्यामुळे खुद्द उदयनापेक्षाही प्रद्योताचे चित्रण सरस वठलेले आहे.

**विदूषक-वसंतक व रुमण्वान :** या दोघांना पुरेसा वाव मिळालेला नाही. संस्कृत नाटकातील विदूषक म्हणजे खादाड, अजागळ व धांदरट असा दर्शविलेला असतो पण हा विदूषक त्यास अपवाद आहे. तो हुशार व प्रसंगावधानी आहे. यौगंधरायण व रुमण्वानसारख्या कसलेल्या मुत्सद्यांबरोबर सल्लामसलत करण्याइतपत राजकारणी आहे. डिंडिमाचा वेश घेऊन उन्मत्तकाशी (म्ह. यौगंधरायणाशी) तो लाडवावरून खोटे भांडण करतो व द्व्यर्थी भाषण करतो. राजा वासवदत्तेवर मोहित झाल्याची बातमी तोच प्रथम काढतो. तसेच यौगंधरायणास उदयन व वासवदत्ता या दोघांचीही सुटका करण्याची प्रेरणा देतो. सेनापती रुमण्वान हा बौद्ध श्रमणकाचा वेश घेऊन वावरतो. खरे तर त्याने उदयनास सावधगिरीचा इशारा दिलेला होता. पण राजानेच त्याचा सल्ला जुमानला नाही म्हणून त्याचा नाइलाज झाला.

* * *

समालोचनात तीन-चार महत्त्वाच्या मुद्यांचे विवेचन केले आहे. (१) नाटकाचे नाव 'प्रतिज्ञा-यौगन्धरायण' असे आहे. या यौगंधरायणाने उदयनाची बंदिवासातून

सुटका करण्यासाठी तीन वेळा प्रतिज्ञा केली आहे. या शब्दाचा विग्रह 'प्रतिज्ञाभिः प्रतीतो यौगन्धरायणो यस्मिन् तत् नाटकम् प्रतिज्ञायौगन्धरायणम्।' असा केलेला आहे. या प्रतिज्ञा त्याने योजना आखून पुऱ्या केल्या आहेत. यास 'प्रतिज्ञा' नाटिका असेही म्हटले आहे. यात चार अंक आहेत. एवढी एक गोष्ट सोडली तर नाटिकेचे कोणतेही लक्षण यास लागू पडत नाही. तेव्हा हे चार अंकी नाटकच आहे.

(२) यौगंधरायण हाच नाटकाचा नायक आहे. यास दुसरे गमक म्हणजे नाटकाचे अंतिम फल त्याला प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे ज्यांच्या भोवती सारे कथानक फिरते त्या उदयन व वासवदत्ता या नायक-नायिकांना नाटककाराने रंगभूमीवर आणलेले नाही. त्यामुळे नाटकातील अनेक महत्त्वाच्या घटना निवेदनांद्वारे वाचक-प्रेक्षकांना समजलेल्या आहेत. तरी देखील नाटकाची रंगत कोठेही कमी झालेली नाही.

(३) हे नाटक भासाच्या उत्तम नाटकांपैकी एक आहे. कथावस्तू, स्वभावचित्रण, संवाद व काव्य या चारही बाबतीत हे सरस आहे. नाटकातील संवाद सुबोध व खटकेबाज आहेत. निवेदनावर यात भर असल्याने संवादास अधिक महत्त्व आलेले आहे. यौगंधरायण, वसंतक व रुमण्वान याची तिसऱ्या अंकातील चर्चा व चौथ्या अंकातील यौगंधरायण व प्रद्योताचा मंत्री भरत-रोहक यांच्यातील चकमक ही उत्कृष्ट संवादरचनेची उदाहरणे आहेत.

यातील काव्यरचनाही ओघवती व दर्जेदार आहे. अंकवार गोषवाऱ्यात चार-पाच श्लोकांचे भाषांतर दिले आहे. ते या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. दुसऱ्या अंकात उत्कृष्ट पताकास्थान आहे. प्रद्योत महाराणीला निरनिराळ्या प्रांतांच्या राजांची नावे सांगून त्यातील कोणते नाव वराच्या दृष्टीने योग्य आहे? असा प्रश्न विचारतो. तेव्हा कंचुकी येऊन म्हणतो - "वत्सराज." वास्तविक पाहता त्याला 'वत्सराज कैद झाला' अशी बातमी सांगायची असते. नाटकात उत्तमोत्तम सुभाषिते विखुरलेली आहेत. उदा. 'भूमिर्भर्तारमापन्नं रक्षिता परिरक्षति (१-९)' 'मार्गारब्धाः सर्व यत्नाः फलन्ति।' (१-१८) 'नीते रत्ने भाजने को निरोधः (४-११)' अथवा 'समूलं वृक्षमुत्पाट्य शाखाश्च्छेत्तुं कुतः श्रमः (४-२०) इ.

(४) नाटकात सर्वत्र वीररसास प्राधान्य आहे. कृत्रिम हत्तीच्या मदतीने पहिल्या अंकात उदयनास पकडल्याचा जो वृत्तांत सांगितलेला आहे, त्यात उदयनाच्या पराक्रमाचे वर्णन आहे. यौगंधरायणाची उत्कट स्वामिभक्ती हा तर नाटकाचा

प्राण आहे. आपल्या उतावळ्या व लंपट स्वभावाने उदयनाने दोन वेळा यौगंधरायणाला अडचणीत आणलेले आहे. तरी त्याची स्वामीवरील निष्ठा यत्किंचितही ढळत नाही. उदयन-वासवदत्ता सुखरूपपणे शहराबाहेर पडले तरी यौगंधरायण लढत राहतो. शेवटी तलवार तुटल्याने सापडतो. रुमण्वान व वसंतक हेही राजनीतीत कुशल दर्शविले आहेत. मुद्राराक्षसाचा तेजस्वी अपवाद सोडल्यास सबंध नाटकभर राजनीतीचा प्रभाव असलेले हे एक अजब नाटक आहे.

(५) 'काव्यालंकार'कार भामहाने प्रस्तुत नाटकाचा नामोल्लेख न करता यातील एका प्रसंगावर टीका केलेली आहे. पहिल्या अंकात हंसकाच्या निवेदनात उदयनाच्या अपहरणाचा वृत्तांत आहे. त्यात उदयन मूर्च्छित पडल्यावर शत्रूसैन्यातील सैनिक त्याच्याजवळ गेले व 'याने माझ्या भावाला ठार मारले. याने माझ्या बापाला ठार केले, याने माझ्या मित्राची हत्या केली.' असे म्हणत त्यांनी सूड उगवण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात भामहाची टीका पाहण्यासारखी आहे. तो म्हणतो की, 'शत्रूच्या उद्गारावरून राजाने या साऱ्यांना एका वेळी ठार मारले असे समजण्याचे कारण नाही. अनेक शस्त्रधाऱ्यांनी एकट्या राजावर हल्ला केल्यावर त्यांच्या तावडीतून तो जिवंत कसा राहिला हे समजत नाही. तेव्हा हे सारे असंभवनीय वाटते. तसेच खरा हत्ती व पेंढा भरलेला हत्ती यांच्यातील फरक लहान मुलालादेखील समजतो तो या राजाला उमगलेला नाही.' (पाहा- काव्यालंकार ४-४४ ते ४७) तथापि भामहाची ही टीका अति-चिकित्सकपणाची द्योतक आहे. काव्य-नाटकात अशा गोष्टी घडताना दिसतात. त्यामुळे सदर टीका विचारात घेण्याचे कारण नाही.

(६) नाटकात काही दोषही लपलेले आहेत. एक तर उदयन व वासवदत्ता यांना पडद्यावरच न आणल्यामुळे नाटकातली निम्मी मौज हरपली आहे. त्यामुळे शृंगाररसाला फाटा मिळाला आहे. तिसऱ्या अंकात डिंडिम वेषधारी विदूषक व उन्मत्तक वेषधारी यौगंधरायण यांच्यातील लाडूच्या डब्यावरून झालेला खोटा कलह विनाकारण लांबवलेला आहे. अग्निशाळेत आल्यानंतर त्यांच्या संवादास रंग चढलेला आहे. पण अगोदरचा पाच-सहा पानी संवाद कंटाळवाणा आहे. त्यात द्व्यर्थी भाषणे आहेत पण ती क्लिष्ट आहेत.

हाच प्रकार चौथ्या अंकाच्या प्रवेशकाबाबत घडलेला आहे. भट व मदिरेने झिंगलेला गात्रसेवक यांच्यातील संवाद विनाकारण लांबलेला आहे. शेवटी हा

गात्रसेवक म्हणजे वासवदत्तेच्या हत्तिणीचा माहूत हा यौगंधरायणाचा गुप्तहेर असल्याचे सांगितले आहे. यौगंधरायणाने प्रद्योताच्या खुद्द राजधानीत एवढा गोंधळ घातला तरी प्रद्योत स्वस्थ कसा राहिला आहे? की त्याने याकडे बुध्दयाच दुर्लक्ष केले आहे? यापैकी दुसरा तर्क योग्य वाटतो.

काही झाले तरी नायक-नायिकांना पडद्याआड ठेवण्याचा भासाचा प्रयत्न तितका काही सफल ठरलेला नाही. ही चूक त्याने पुढील 'स्वप्न वासवदत्त' या नाटकात दुरुस्त केलेली दिसते. त्या नाटकाचा सूत्रधार यौगंधरायण असला तरी त्याला त्याने पहिल्या व शेवटच्या अंकातच रंगभूमीवर आणले आहे. मात्र नव्या प्रकारचे नाटक सादर केल्याबद्दल नाटककारास धन्यवाद द्यायला हवेत.

## १२. स्वप्न-वासवदत्त

नाटकाच्या नांदीनंतरच्या पहिल्या श्लोकात नाटककाराने बलरामाच्या तांबूस-गौर व दीर्घ अशा बाहूस वंदन केले आहे व त्यात उदयन, वासवदत्ता, पद्मावती व वसंतक (म्ह. विदूषक) यांची नावे श्लेषाने गुंफून मुद्रालंकार साधलेला आहे. प्रत्यक्ष नाटक सुरू होण्यापूर्वीच्या महत्त्वाच्या घटनांचे निवेदन नाटककाराने पहिल्या अंकात ब्रह्मचाऱ्याच्या तोंडी घातलेले आहे. त्या घटना याप्रमाणे सांगता येतील -

यातील कथाभाग म्हणजे 'प्रतिज्ञा-यौगंधरायण' या नाटकाचा उत्तरार्धच आहे असे म्हणावयास हरकत नाही. वासवदत्तेला घेऊन उदयन कौशांबीला आला व तिच्यावर इतका आसक्त झाला की त्याचे राज्यकारभाराकडे दुर्लक्ष होऊ लागले. उदयनाचा शत्रू आरुणी हा या संधीचा फायदा घेतो. तो कौशांबीवर आक्रमण करून उदयनाला तेथून हुसकून लावतो. उदयन व वासवदत्ता हे लावाणक नामक खेड्यातील वाड्यात राहू लागतात. या वेळी उदयनाचा परम साहाय्यक यौगंधरायण हा गेलेले राज्य परत मिळविण्यासाठी एक कारस्थान आखतो. त्या कारस्थानाचे स्वरूप असे होते :

मगध प्रांताचा राजा दर्शक याला पद्मावती नामक सुस्वरूप व उपवर अशी बहीण होती. पद्मावतीचा विवाह उदयनाशी होणार असे ज्योतिषाने भविष्य वर्तविले होते. तिच्याशी जर उदयनाचे लग्न झाले तर दर्शकाकडून लष्कराची

मदत मिळणार होती. पण उदयनाचे पद्मावतीशी लग्न लावायचे झाल्यास उदयनास वासवदत्तेपासून दूर करणे आवश्यक होते. म्हणून यौगंधरायणाने एक धाडसी कट रचला व त्यात वासवदत्तेला सामील करून घेतले.

उदयन एके दिवशी शिकारीला गेल्यावर यौगंधरायणाने त्या वाड्याला आग लावली व त्या आगीत वासवदत्ता व यौगंधरायण हे जळून मेले अशी अफवा उठवली. वासदत्तेला घेऊन तो एका तपोवनात आला आणि इथेच नाटकास प्रारंभ झालेला आहे.

राजा दर्शक व पद्मावती यांची आई या तपोवनातील आश्रमात राहात होती. त्याच दिवशी पद्मावती आपल्या परिवारासमवेत आईला भेटायला आली होती. त्यामुळे सैनिक सामान्य लोकांना बाजूला होण्यास सांगत होते. आपल्या सारख्या राणीला बाजूला होण्यास सांगितले जाते याचे वासवदत्तेस वाईट वाटते. एवढ्यात पद्मावतीचा कंचुकी येऊन सारी गडबड शांत करतो.

यौगंधरायण व वासवदत्ता या दोघांनी वेषांतर केलेले आहे. वासवदत्तेला कोणाजवळ ठेवावे हा यौगंधरायणापुढील प्रश्न आहे. इतक्यात कंचुकी जाहीर करतो की पद्मावतीची काही दानधर्म करण्याची इच्छा आहे. तरी कोणाला काही मागायचे असल्यास मागून घ्यावे. तेव्हा यौगंधरायण पुढे येऊन सांगतो की, “माझी बहीण आपल्याकडे काही काळ ठेवून घ्यावी. हिचा पती प्रवासाला गेला आहे. आपल्याकडे ती सुरक्षित राहील.” यौगंधरायणाची मागणी पुरी करणे कंचुकीला अडचणीचे वाटते. पण स्वत: पद्मावती ती जबाबदारी स्वीकारते त्यामुळे यौगंधरायणाच्या डोक्यावरचा अर्धा भार कमी होतो. ही पद्मावती कोण आहे, हे त्याला चांगले ठाऊक आहे. वासवदत्तेला पद्मावतीकडे ठेवून तो पुढील कामगिरी पार पाडण्यास रिकामा झाला आहे.

इतक्यात लावाणकाकडून एक ब्रह्मचारी त्या ठिकाणी आला. तो राजगृहास निघाला होता. तो लावाणकात घडलेली भयानक घटना वर्णन करून सांगतो. वासवदत्ता व यौगंधरायण हे आगीत जळून मेले ही वार्ता उदयनाला समजल्यावर त्याने काळजाला पीळ पडण्यासारखा शोक केला. खरे तर त्याने प्राणत्याग करण्याचा प्रयत्न केला पण रुमण्वान मंत्र्याने त्याला आवरून धरले. त्याने अगदी डोळ्यात तेल घालून राजाचे रक्षण केले. हे समजल्यावर वासवदत्तेने सुटकेचा नि:श्वास टाकला. ही हकीकत ऐकणाऱ्या लोकांनाही वाईट वाटले. मग सर्वांचा निरोप घेऊन यौगंधरायण निघून गेला. मग वासवदत्ताही पद्मावतीबरोबर तिच्या निवासस्थानी गेली. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रवेशकात दासी येऊन पद्मावती चेंडूने खेळत असल्याचे सांगते. मुख्य प्रवेशात पद्मावती व वासवदत्ता दिसतात. पद्मावती चेंडू खेळून दमलेली आहे. तिचे हात लालबुंद झाले आहेत. वासवदत्ता तिची थट्टा करते. तिच्या भावासाठी पद्मावतीला मागणी घातलेली असते. त्यामुळे ती पद्मावतीला 'महासेनवधू' असे म्हणते. पण चेटी खुलासा करते की पद्मावती उदयन राजाशी लग्न करू इच्छीत आहे.

एवढ्यात धात्री येऊन सांगते की, पद्मावतीचा उदयनाशी वाङ्निश्चय झाला. ती पुढे सांगते की उदयन वेगळ्या कामासाठी मगधात आलेला होता. त्याचे सुंदर रूप व तरुण वय पाहून दर्शक राजाने त्यास पसंत केले व पद्मावतीसाठी प्रस्ताव केला. हे ऐकत असता वासवदत्तेच्या मनात शंका-कुशंकाचे काहूर उठते. एवढ्याने भागत नाही म्हणून दुसरी चेटी येऊन सांगते की आजच उत्तम नक्षत्र आहे तेव्हा कंकण बांधण्याचा कार्यक्रम करण्याचे ठरले आहे. बिचारी वासवदत्ता मात्र अधिकच व्याकुळ झाली आहे. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी शून्य मन:स्थितीत वासवदत्ता एकटीच प्रवेश करते. उदयनाचे पद्मावतीशी लग्न लागले आहे. अंत:पूर उत्सवाने गजबजले आहे. वासवदत्तेवर मात्र दु:खाचे आकाश कोसळले आहे. तिच्यावर जिवापाड प्रेम करणारा पती आता दुसरीचा झाला होता. वासवदत्तेवर मात्र तोंड दाबून बुक्क्यांचा मार खायची पाळी आली होती.

एवढ्यात एक दासी फुले घेऊन येते व वासवदत्तेला विवाहमाला गुंफण्याची विनंती करते. ती माळ गुंफायचीदेखील तिच्यावरच पाळी येते. ती मनाशी म्हणते, ''ईश्वर खरोखर निर्दय आहे.'' (अकरुणा: खल्वीश्वरा:।) मग ती दासीला जावई कसा आहे?' असे विचारते. तेव्हा दासी म्हणते - 'जावई अतिशय सुंदर आहे. तो जणू धनुष्यबाण नसलेला कामदेवच आहे.'

अशी बोलणी सुरू असता वासवदत्ता माळ गुंफू लागते. त्यात एक वनस्पती 'अविधवाकरण' म्हणून असते. वासवदत्ता ती वनस्पती स्वत:साठी व पद्मावतीसाठी म्हणून विपुल प्रमाणात गुंफते. पण दुसरी 'सपत्नीमर्दन' नावाची वनस्पती मात्र गुंफत नाही. त्याचे कारण ती सांगते की राजाची पहिली बायको मरून गेली आहे. दासी विवाहमाला घेऊन जाते. वासवदत्ता आणखी हताश होते. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या सुरुवातीस प्रवेशक आहे. त्यात विदूषक विचार करीत येतो. दु:खाचे दिवस संपले म्हणून तो आनंदात आहे. त्याची चंगळ चालू आहे. उंची महालात राहायचे व मनमुराद मिठाई खायची. हा त्याचा दिनक्रम आहे. फक्त सोबतीला अप्सरा नव्हत्या इतकेच, नाही तर तो स्वर्गातच राहात होता. पण त्याची पचनशक्ती बिघडली आहे एवढी गोष्ट वाईट आहे.

इतक्यात एक दासी त्याला शोधत येते व 'जावईबापूंचे स्नान झाले का?' असे विचारते. कारण ती फुले व अंगाला लावायची उटी घेऊन येणार आहे. विदूषक तिला राजाचे स्नान झाल्याचे सांगतो.

मुख्य प्रवेशात पद्मावती, वासवदत्ता व दासी या प्रमदवनात येतात. पद्मावतीला शेफालिकेची फुले फुलली आहेत की नाही हे पाहायचे आहे आणि ती फुलली असतील तर ती शोभा उदयनाला दाखवायची आहे. दासी फुले वेचू लागतात व या दोघी ओट्यावर बसतात.

त्या दोघींचे संभाषण चालू असता राजा व विदूषक प्रमदवनाकडे येताना दिसतात. तेव्हा पद्मावती व वासवदत्ता वेलींच्या जाळीत जातात. पद्मावतीच्या रूपगुणाकडे राजाचे मन हळूहळू आकृष्ट होत आहे. आपले मन वासवदत्तेच्या स्मृतीत होरपळत असता पद्मावतीकडे आकृष्ट झाल्याचे पाहून त्याला नवल वाटते. तो म्हणतो -

"मी पूर्वी उज्जयिनीला गेलो असताना वासवदत्तेच्या दर्शनाने मोहित झालो तेव्हा कामदेवाने माझ्यावर पाच बाण सोडले होते. त्या बाणांचे शल्य अद्याप माझ्या हृदयात खुपत आहे. तरीदेखील मी पुन्हा विद्ध झालो आहे. तेव्हा 'पंचबाण' म्हणवणाऱ्या मदनाने हा सहावा बाण कसा सोडला?"

- (अंक ४, श्लोक १)

राजा विदूषकास 'वसंतक' अशी हाक मारतो ती ऐकून वासवदत्तेला आपण उज्जयिनीतच आहोत की काय असे क्षणभर वाटले. राजा पद्मावतीची वाट पाहात शिलातलावर बसतो. एकांत पाहून विदूषक राजाला महत्त्वाचा प्रश्न विचारतो - 'तुला पूर्वीची वासवदत्ता अधिक आवडते की सध्याची पद्मावती?' पद्मावती व वासवदत्ता दोघीही जिवाचा कान करुन या प्रश्नाचे उत्तर ऐकू लागतात. पण राजा उत्तर देण्याची टाळाटाळ करतो. मग विदूषकास 'तू बडबड्या आहेस' असे म्हणतो. ते ऐकताच पद्मावतीला राजाच्या उत्तराचा अंदाज येतो व ती खिन्न होते. तरी विदूषक त्याचा पिच्छा सोडत नाही. तो म्हणतो - "मोकळेपणाने

सांग. दोघींपैकी एक तर मरून गेली आहे आणि दुसरीही जवळ नाही.'' पण मौजेची गोष्ट अशी की दोघीही तेथेच हजर आहेत. शेवटी राजा स्पष्ट शब्दात सांगतो - ''रूप, शील व माधुर्य या गुणामुळे मला पद्मावतीविषयी आदर वाटतो पण वासवदत्तेच्या ठायी जडलेले माझे मन तिला ओढून घेता येत नाही.''

राजाचे उत्तर ऐकून वासवदत्ता मनोमन सुखावते पण पद्मावतीच्या दासीला राजाचा राग येतो. 'त्याला अगदीच दाक्षिण्य नाही' असे ती म्हणते. पण पद्मावती स्वत:च राजाची बाजू घेते. वासवदत्ता पद्मावतीच्या उत्तरामुळे प्रसन्न होते.

मग राजाही विदूषकास 'या दोघी राण्यांमध्ये कोण आवडते?' असा प्रश्न विचारतो व विदूषकाप्रमाणेच त्याचा पिच्छा पुरवतो. तेव्हा विदूषक मोकळ्या मनाने पद्मावतीची प्रशंसा करतो. तेव्हा एकदम अनवधानाने म्हणतो, ''ठीक आहे. वसंतका, हे मी वासवदत्तेला सांगीन.'' विदूषक त्याला वासवदत्ता मरण पावल्याचे लक्षात आणून देतो. त्याबरोबर राजा एकदम खिन्न होतो. तेव्हा पद्मावती म्हणते - ''चांगल्या गोष्टी चालल्या असताना या नतद्रष्टाने त्यात बाधा आणली.'' ('रमणीय: खलु कथा योगो नृशंसेन विसंवादित:।') राजाला शोक अनावर होतो तो म्हणतो -

''खोल रुजलेल्या प्रेमाचा त्याग करणे अत्यंत कष्टकारक आहे. जशी जशी आठवण होते तसे तसे दु:ख नवेपणा धारण करते. येथे अश्रू ढाळूनच मनाला शांतता प्राप्त होते, अशी ही जीवनाची यात्रा आहे.''

(अंक ४ श्लोक ६)

राजाच्या डोळ्यांतून आसवे ओघळू लागतात म्हणून वसंतक पाणी आणण्यासाठी जातो. मग पद्मावती वासवदत्तेच्या अनुमतीने राजाजवळ जाते. विदूषक पाणी घेऊन येतो. पद्मावतीला पाहताच तो गडबडतो. पद्मावती त्याच्याकडून पाणी घेऊन राजाला देते. राजा तोंड स्वच्छ करतो. डोळ्यांतून अश्रू येण्याचे वेगळेच कारण पद्मावतीला सांगतो -

''हे सुंदरी, शरदातील चंद्राप्रमाणे फिकट पिवळ्या असलेल्या व वाऱ्याने उडवलेल्या काश पुष्पाच्या परागामुळे माझ्या डोळ्यांतून अश्रू ओघळले व चेहरा ओला झाला.'' (अंक ४ श्लोक ७)

पद्मावतीला दुखवायचे नाही म्हणून राजाने हे दुसरे कारण सांगितले खरे; पण खरे कारण पद्मावतीला ठाऊक आहे, याची त्याला कल्पना नाही. माध्यान्ह झाल्याने सर्व जण जातात. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या प्रवेशकात पद्मिनिका व मधुकरिका या दोन दासींचा संवाद आहे. त्यावरून पद्मावती डोकेदुखीने आजारी असल्याचे समजते. तिचा बिछाना समुद्रगृहात घातलेला आहे, असे पद्मिनिका सांगते. विदूषक त्या ठिकाणी येतो, त्याला ही वार्ता सांगण्यात येते. तो ती बातमी उदयनाला सांगण्यासाठी जातो.

मुख्य प्रवेशात राजा वासवदत्तेच्या विचारात मग्न आहे. विदूषक तेथे येतो व पद्मावतीच्या डोकेदुखीची वार्ता सांगतो. राजाला वाईट वाटते. पद्मावतीच्या मधुर सहवासामुळे त्याच्या दु:खाला आत्ता कोठे ओहोटी लागली होती. तशात पद्मावती आजारी पडल्याने तो खिन्न होतो. मग तो विदूषकाबरोबर समुद्रगृहाकडे जातो.

राजा समुद्रगृहात येतो. तेथे बिछाना घातलेला होता पण पद्मावती आलेली नव्हती. राजा तिच्या शय्येवर बसून तिची वाट पाहू लागतो. त्याला झोप येऊ लागते. म्हणून विदूषक त्याला गोष्ट सांगू लागतो. त्या गोष्टीत उज्जयिनीचा उल्लेख येताच त्याला तेथील प्रसंगाची आठवण होते. म्हणून विदूषक दुसरी गोष्ट सांगू लागतो. इतक्यात राजाला झोप लागते. हवेत गारठा असल्याने विदूषक राजाची शाल आणण्यासाठी जातो.

इतक्यात वासवदत्ता समुद्रगृहात येते. तिला वार्ता समजताच ती पद्मावतीच्या समाचारास येते. तिला बिछान्यावर कोणी तरी झोपलेले दिसते. तेथे एकच लहानसा दिवा तेवत होता. वासवदत्ता पद्मावतीच्या बिछान्यावर बसते. जरा वेळाने आडवी होते. इतक्यात राजा झोपेत 'हे वासवदत्ते...' अशी हाक मारतो. राजाचा आवाज ऐकताच वासवदत्ता झटकन बिछान्यावरून उठते. राजाने जर आपल्याला पाहिले तर यौगंधरायणाची योजना फिसकटून जाईल अशी तिला भीती वाटते.

राजा तिला पुन्हा हाक मारतो. तेव्हा तो झोपेत बोलत आहे हे तिला उमगते. ती थोडा वेळ तेथे थांबते. राजाच्या झोपेतील भाषणांना ती तुटक उत्तरे देते. जाताना राजाचा बिछान्याखाली आलेला हात बिछान्यावर ठेवते. ती निघून जाताच राजा एकदम उठतो. त्याला वासवदत्ता बाहेर पडताना अर्धवट दिसली आहे. इतक्यात विदूषक शाल घेऊन येतो.

राजा विदूषकाला सांगतो की आपल्याला वासवदत्तेचे दर्शन झाले त्या अर्थी ती जिवंत असली पाहिजे. विदूषक त्याची समजूत घालू लागतो. पण 'वासवदत्ता

मेली' असे स्पष्ट सांगून रुमण्वानाने आपल्याला फसवले असा राजा स्पष्ट आरोप करतो. पण विदूषक त्याला 'ती तुला स्वप्नात दिसली असावी' असे सांगतो तेव्हा राजा म्हणतो -

'हे जर स्वप्न असेल तर जागे न होणे हीच धन्यतेची गोष्ट आहे आणि जर माझ्या मनाला भास झाला असेल तर तो भासच अनंत काळपर्यंत टिकून राहो.''

(अंक ५ श्लोक ९)

पण वासवदत्तेच्या हाताचा जो त्याच्या बाहूला स्पर्श झाला होता त्यामुळे त्याच्यावर रोमांच फुललेले होते ते अजून तसेच होते. यावर काही न बोलता विदूषक त्याला राजवाड्याकडे चलण्यास सांगतो. एवढ्यात कंचुकी प्रवेश करतो व रुमण्वानाने आरुणीवर हल्ला करण्यासाठी सैन्य सज्ज केलेले आहे. दर्शक राजाची मदत आहे, तेव्हा राजाने ताबडतोब युद्धास निघावे, असे सांगतो.

ही उत्साहवर्धक वार्ता ऐकताच राजाची निराशा पळून जाते व तो युद्धास निघतो. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या प्रारंभी मिश्र-विष्कंभक आहे. कंचुकी येऊन प्रतिहारीला (म्ह. द्वाररक्षिकेला) सांगतो की राजा प्रद्योताकडून त्याचा कंचुकी व वसुंधरा नावाची वासवदत्तेची दाई हे आलेले आहेत. पण प्रतिहारी सांगते की, आज उदयन महाराजांना घोषवती वीणेचा आवाज ऐकू आला. त्यांनी वादकाचा शोध घेतला तेव्हा ती वीणा त्याच्याजवळ सापडली. घोषवतीच्या दर्शनाने महाराजांचा शोक उचंबळून आला. त्यामुळे राजाला हा निरोप कसा सांगावा असा तिला प्रश्न पडतो. पण राजा स्वत:च पायऱ्या उतरून येताना दिसल्यावर ती निरोप सांगण्यास जाते.

मुख्य प्रवेशात राजा व विदूषक दिसतात. राजा वीणेला उद्देशून बोलत आहे. ही वीणा अरण्यातील एका झाडाच्या फांदीवर कशी मिळाली याचे राजाला आश्चर्य वाटत आहे. एवढ्यात प्रतिहारी राजाला येऊन निरोप सांगते. वासवदत्तेच्या माहेरची माणसे आल्यामुळे पद्मावतीने त्यांची भेट घ्यावी असे राजाला वाटते व तो पद्मावतीला बोलवणे पाठवतो.

त्याप्रमाणे पद्मावती येते पण वासवदत्तेचे नातेवाईक आले असता आपण राजाजवळ बसणे तिला योग्य वाटत नाही. तर प्रद्योत व महाराणी अंगारवती यांच्या मनाची काय अवस्था झाली असेल याची राजाला कल्पना करवत नाही. तो म्हणतो -

''ते मला काय म्हणतील या भीतीने माझे हृदय कंपित झाले आहे. मी त्यांच्या मुलीचे (म्ह. वासवदत्तेचे) हरण केले पण तिचे रक्षण करू शकलो नाही. पित्याचा रोष ओढवून घेणाऱ्या मुलाप्रमाणे मी भयभीत झालो आहे.''

(अंक ६, श्लोक ४.)

कंचुकी व वसुंधरा प्रवेश करतात. वासवदत्तेच्या निधनाची वार्ता उज्जयिनीत समजलेली आहे. राजा कुशल समाचार विचारतो. मुलीच्या मृत्यूनंतरही प्रद्योताची आपल्यावर पूर्ववत ममता आहे हे पाहून उदयनाला समाधान वाटते. यानंतर कंचुकी महाराणी अंगारवतीचा निरोप सांगते. ती म्हणाली होती - ''आम्ही तुमचा आणि वासवदत्तेचा वाङ्निश्चय केला होता पण विवाह करण्यापूर्वीच तुम्ही पळून गेला. म्हणून आम्ही तुम्हा दोघांच्या तसबिरी रंगवून घेतल्या व त्यांचा विवाह लावला. आता तो चित्रफलक आपल्याकडे पाठवला आहे. तो पाहून समाधान माना.''

पद्मावती वासवदत्तेची तसबीर दाखवण्याची विनंती करते. धात्री तिला तसबीर दाखवते. चित्र पाहिल्याबरोबर अवंतिकेशी साम्य असल्याचे तिच्या ध्यानात येते. ती उदयनाला 'अशी दिसणारी स्त्री इथे राहात आहे.' असे सांगते. ती एका ब्राह्मणाची बहीण असून तिचा नवरा परगावी गेलेला आहे. तसेच ती परपुरुषासमोर येत नाही असे सांगते तेव्हा राजा गप्प बसतो.

एवढ्यात प्रतिहारी येऊन कोणी एक ब्राह्मण आल्याचे सांगते. त्यानंतर यौगंधरायण ब्राह्मणाच्या वेषात दरवाजात येतो व राजाचा जयजयकार करतो. राजाला त्याचा स्वर परिचयाचा वाटतो. राजाच्या सांगण्यारून पद्मावती अवंतिकेला घेऊन येते. तिला पहाताच धात्री चमकते व उद्‌गारते - ''अहो, ही तर राजकुमारी वासवदत्ता !' राजा चकित होतो. यौगंधरायण ती आपली बहीण असल्याचे सांगतो. मग राजा अवंतिकेच्या चेहऱ्यावरचे अवगुंठन दूर करण्यास सांगतो. त्याबरोबर वासवदत्ता व यौगंधरायण प्रकट होतात व राजाची क्षमा मागतात.

राजाच्या मनात यौगंधरायणाविषयी आदराची भावना आहे. कारण पूर्वीही यौगंधरायणानेच राजाला संकटातून सोडवले होते. आताही त्याने कारस्थान करून त्याचे राज्य परत मिळवून दिले आहे. अवंतिका हीच वासवदत्ता आहे हे समजल्यावर पद्मावती तिला वाकून नमस्कार करते. मग यौगंधरायण आपल्या योजनेचा हेतू स्पष्ट करतो. या साऱ्या गोष्टी रुमण्वानासही माहीत होत्या हे समजल्यावर राजाला नवल वाटते.

शेवटी राजा, वासवदत्ता, पद्मावती हे सारेच प्रद्योत व अंगारवती यांना भेटायला जावयाचे ठरवतात. भरतवाक्य होऊन नाटक समाप्त होते. (अंक सहावा)

* * *

कथासरित्सागराच्या 'लावाणक' नामक तिसऱ्या लंबकाच्या दुसऱ्या तरंगामध्ये उदयनाच्या कथेच्या उत्तरार्धास प्रारंभ झाला आहे. कौशांबीस आल्यावर उदयन केवळ सुखोपभोगात मग्न राहिला. महामंत्री यौगंधरायण व रुमण्वान हे दोघे राज्याचा कारभार पाहू लागले. राजा पुन्हा कसा कार्यप्रवण होईल याचा ते विचार करू लागले.

त्या वेळी मगध प्रांतात प्रद्योत नावाचा बलाढ्य राजा राज्य करीत होता. त्याला पद्मावती नावाची अत्यंत रूप-गुण संपन्न अशी कन्या होती. तिला प्राप्त केली असता आपल्याला मगध राजाची मदत मिळेल. यासाठी वासवदत्ता आगीत जळून मेली अशी खोटी बातमी पसरवावी असा यौगंधरायणाचा डाव असतो. पण रुमण्वानास तो पटत नाही. कारण राजाला जर तो धक्का सहन झाला नाही तर भलतेच संकट ओढवण्याची भीती होती. यावर दोघांची खूप सल्ला-मसलत झाली. वासवदत्तेचा भाऊ गोपालक याला बोलावून त्याचे मत घेतले. त्याने आपली संमती दिली.

मग यौगंधरायणाने उदयनास व वासवदत्तेस मगध प्रांतासमीप असलेल्या लावाणक या गावास नेले. कारण तो भाग शिकारीसाठी अत्यंत अनुकूल होता. एकदा राजा शिकारीस गेला असता मंत्र्यांनी वासवदत्तेला आपल्या कटात सामील करून घेतले. राजाच्या भावी उत्कर्षाकडे लक्ष देऊन त्या साध्वीने मोठ्या कष्टाने संमती दिली. मग यौगंधरायणाने वृद्ध ब्राह्मणाचा वेश घेतला तर वसंतक तिरळा बटू बनला. वासवदत्तेला घेऊन ते मगधाला गेले मग रुमण्वानाने अंत:पुरास आग लावली व वासवदत्ता व वसंतक आगीत जळून गेले अशी वार्ता पसरविली.

यौगंधरायण मगधास गेला व त्याने पद्मावतीची भेट घेऊन ही माझी कन्या आहे. हिचा पती व्यसनी असून परप्रांती गेला आहे तेव्हा ही व हिचा भाऊ यांचे आपण रक्षण करावे अशी तिला विनंती केली. पद्मावती जात्या कनवाळू असल्याने वासवदत्तेला घेऊन राजवाड्यात गेली. इकडे वासवदत्तेच्या मृत्यूची वार्ता ऐकताच उदयनाने अपार शोक केला. आत्मघाताचे विचार त्याच्या मनात आले पण त्याने स्वत:च विवेक केला.

गोपालक व यौगंधरायण यांनी पूर्वी ठरल्याप्रमाणे प्रद्योताच्या कन्येस मागणी घातली. उदयनाची पूर्व पत्नी मृत झाल्याचे समजल्यावर प्रद्योताने त्यास संमती दिली. पद्मावतीला आनंद झाला पण वासवदत्ता अक्षरशः दुःखात बुडाली. वसंतकाने तिची समजूत घातली. मग मंत्र्यासमवेत उदयन मगधात आला पद्मावती व उदयन यांचा विवाह झाला. पण राजाच्या हृदयात वासवदत्तेची स्मृती दाटलेली होती.

विवाहानंतर उदयन, पद्मावती, यौगंधरायणादी मंत्री हे सारे लावाणकास आले. पद्मावतीने आपल्या परिवारातून वासवदत्ता व वसंतक यांनाही आणले. लावाणकास आल्यावर वासवदत्तेने गुप्तपणे आपल्या भावाची भेट घेतली. ही हकीकत हेरांनी पद्मावतीच्या कानावर घातली. तिने वासवदत्तेला बोलावणे पाठवले. इकडे पद्मावतीजवळ असलेली न सुकणारी माळ व तिलक पाहून राजाने चौकशी केली तेव्हा अवंतिकेने ती मला दिली आहे असे सांगितले. तेव्हा वासवदत्ता जिवंत असली पाहिजे असे राजाला वाटले व तो ताबडतोब गोपालकाकडे गेला. राजाला पाहताच वासवदत्ता मूर्च्छित पडली. राजालाही मूर्च्छा आली. त्यांना सावध करून यौगंधरायणाने आपली योजना राजाला सांगितली. पद्मावतीही तेथे आली तेव्हा पद्मावतीकडेच वासवदत्ता राहत असल्याचे राजाला समजले व आपल्या दोन राण्यांसह तो आनंदाने कालक्रमणा करू लागला. (लावाणक लंबक तरंग १ व २)

* * *

कथासरित्सागरातील कथा वर अत्यंत संक्षेपाने दिली आहे. त्यावरून भासाच्या नाटकात तिच्यात बराच बदल केलेला दिसून येतो. काही स्थळे खाली दिली आहेत. सोईसाठी या कथेस मूळ कथा असे संबोधलेले आहे.

(१) मूळ कथेत उदयन हा वासवदत्ता, मृगया व मदिरा यांच्यातच गुंतून पडला आहे. तो पुन्हा कार्यप्रवण व्हावा यासाठी मंत्रिगण कटाची योजना करतात असे दाखवले आहे. तर नाटकात शेजारचा राजा आरुणी हा उदयनाचे राज्य जिंकून त्याला हद्दपार करतो म्हणून राज्यप्राप्ती करून घेण्यासाठी यौगंधरायणादी कटाची योजना करतात असे दाखवले आहे.

(२) यौगंधरायणाने पूर्वीच मगधाचा राजा प्रद्योत याच्याकडे पद्मावतीसाठी मागणी घातली होती पण राजा उदयन हा वासवदत्तेच्या ठिकाणी आसक्त

असल्याने पद्मावतीची उपेक्षा होईल या भीतीने प्रद्योताने ती मागणी फेटाळली होती पण भासाने हा प्रसंग गाळलेला आहे.

(३) लावाणकातून वासवदत्ता व वसंतक यांची गुपचूप रवानगी करून रुमण्वान अंत:पुरास आग लावतो व वासवदत्ता व वसंतक हे जळून मेले अशी आवई उठवतो, तर नाटककाराने वसंतकास राजाच्या सोबतीला ठेवलेले आहे व त्याच्या ऐवजी यौगंधरायण मेला असे दाखवले आहे.

(४) रुमण्वान व यौगंधरायणादी मंत्र्यानी आखलेल्या कटामध्ये त्यांनी वासवदत्तेचा भाऊ गोपालक याची मदत घेतली असल्याचे दर्शविले आहे. पण भासाने तसे दर्शविले नाही.

(५) रुमण्वान, यौगंधरायण अथवा गोपालक हे फारसे दु:खी दिसत नाहीत, त्यावरून वासवदत्ता व वसंतक हे मेले नसावेत, अशी उदयनाला शंका येते असे मूळ कथेत म्हटले आहे. पण भासाने याही विचाराला फाटा दिलेला आहे.

यावरून भासाने मूळ कथाभागात केलेले बदल नाट्यदृष्ट्या योग्य असल्याचे दिसून येईल. तसेच पद्मावतीचे तपोवनात आगमन, ब्रह्मचाऱ्याचे लावाणकातील प्रसंगाचे निवेदन, चौथ्या अंकातील द्विकेंद्री प्रवेश, पद्मावतीची शीर्षवेदना, समुद्रगृहातील प्रसंग, घोषवती वीणेची प्राप्ती व वासवदत्तेची ओळख हे सारे प्रसंग नाटककाराने नव्याने रचून घातलेले आहेत व कथावस्तूची रंगत वाढवलेली आहे.

***

या नाटकातील संपूर्ण कथावस्तूस किती दिवस लागले असावेत याचा स्थूलमानाने जरी विचार केला तरी एक महिन्यापेक्षा जास्त दिवस लागलेले नाहीत, असे निश्चितपणे म्हणता येते.

(१) नाटक सुरू होण्यापूर्वी लावाणकात जो आगीचा प्रसंग घडून आला आहे तो साधारण पाच-सहा दिवसांपूर्वी घडला असावा असा अंदाज आहे. पहिल्या अंकातील घटना एका दिवसातच पूर्ण झाली आहे. वेळेचा विचार केल्यास वासवदत्ता व यौगंधरायण सकाळी १०-११ च्या सुमारास तपोवनात आले असावेत. अंकाच्या अखेरी सायंकाळ झाल्याचा उल्लेख आहे. यावरून पहिल्या अंकाचा कालावधी सहा ते सात तासांचा आहे.

(२) पहिल्या व दुसऱ्या अंकाच्या दरम्यान तीन-चार दिवसांचे अंतर मानण्यास हरकत नाही. अंकाच्या सुरुवातीस पद्मावती चेंडूने खेळत असल्याचा

उल्लेख आहे. यावरून ती वेळ सकाळची ७-८ वाजताची असावी. दुसऱ्या अंकातले कथानक एक तासाच्या अवधीचे आहे.

(३) दुसऱ्या व तिसऱ्या अंकातील सर्व घटना एकाच दिवसात घडल्या आहेत, असे मानण्यास आधार आहे. दुसऱ्या अंकाच्या अखेरीस चेटी येऊन सांगते की आज उत्तम नक्षत्र असल्यामुळे विवाहकंकण बांधण्याचे ठरले आहे. तिसऱ्या अंकात वासवदत्तेला विवाहमाळा गुंफण्यास सांगण्यात आले आहे. त्यावरून उदयन व पद्मावती यांचा विवाह त्याच दिवशी झाला असावा.

(४) पहिल्या अंकानंतर सुमारे चार-पाच दिवसांनी चौथ्या अंकास प्रारंभ झाला आहे. लग्नविधी झाल्यावर पाहुणे मंडळी इकडे तिकडे रवाना होऊन राजाला निवांत वेळ मिळण्यास एवढा अवधी लागणार हे स्पष्ट आहे. दुसरे म्हणजे यात विदूषक आपल्याला अजीर्ण झाल्याची तक्रार करीत आहे. चार दिवस मेजवान्या झोडल्यामुळे अजीर्ण झाले नसते तरच नवल. तसेच उदयनाचे स्नान झाले की नाही असे दासी विदूषकास विचारते त्यावरून ती वेळ सकाळी नऊच्या सुमाराची असावी. मुख्य प्रवेशातील प्रमदवनातील घटना दुपारी घडलेली आहे. अंकाच्या अखेरीस तिसरा प्रहर झाल्याचा उल्लेख आहे. तेव्हा हा प्रसंग दुपारी तीन ते चार या वेळेत घडला असावा. म्हणजे या अंकातील घटना सात-आठ तासांत घडलेल्या आहेत.

(५) चौथ्या अंकानंतर लगेच दुसऱ्या दिवशी पाचव्या अंकास सुरुवात झालेली दिसते. कारण प्रवेशकात पद्मावतीच्या शीर्षवेदनेचा उल्लेख आहे. चौथ्या अंकातील राजाचे उत्तर ऐकल्यावर पद्मावतीच्या मनाला अत्यंत वेदना झाल्या व त्याचीच परिणती तिच्या डोकेदुखीत झाली असावी असा तर्क होतो. तर्क म्हणण्याचे कारण नाटककाराने तिच्या डोकेदुखीचे कारण कोठेही सांगितलेले नाही. समुद्रगृहातील प्रसंग सायंकाळच्या सुमारास घडलेला दिसतो. कारण तेथे अंधुक प्रकाश आहे त्यामुळे दरवाजावरील तुटून पडलेली माळ पाहून विदूषकाला सापाचा भास झालेला आहे. तसेच तेथे लहानसा दिवा जळत असल्याचा उल्लेख आहे. गारवाही सुटलेला आहे. त्यावरून ती वेळ सायंकाळी सहाच्या सुमाराची असावी.

(६) सहाव्या अंकात राजा आपल्या कौशांबी येथील राजवाड्यात परत आलेला दिसतो. पाचव्या अंकाच्या अखेरीस राजा आरुणीशी युद्ध करण्यास सज्ज झाल्याचे सांगितले आहे. आरुणीचा पाडाव होऊन उदयनाने आपले राज्य

जिंकून घेतले आहे. पद्मावती-अवंतिका इत्यादि परिवारासह तो कौशांबीस आला आहे. या साऱ्यास कमीत कमी आठ ते दहा दिवस तरी लागले असतील. या अंकातील साऱ्या घटना म्हणजे सुरुवातीस घोषवती वीणा प्राप्त होणे, दरबारात उज्जयिनीचे पाहुणे येणे, यौगंधरायणाचे दरबारात आगमन व वासवदत्तेची ओळख पटणे या साऱ्या घटना एका दिवसात घडलेल्या आहेत.

म्हणजे लावाणकाच्या आगीच्या प्रसंगापासून वासवदत्तेची फिरून प्राप्ती होईपर्यंतच्या घटनांना साधारणपणे चार आठवडे लागले आहेत. सारांश नाटकाचा कालावधी जास्तीत जास्त एक महिन्याचा आहे असे सुरुवातीस म्हटले होते, ते बरोबर आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

* * *

नाटकात उदयन, वासवदत्ता, पद्मावती, यौगंधरायण व विदूषक वसंतक ही पात्रे महत्त्वाची आहेत. त्यांची वैशिष्ट्ये थोडक्यात याप्रमाणे -

**(१) उदयन** : उदयन हा उच्चकुलीन, तरुण, सुंदर व विविध कलांत पारंगत आहे. त्याला मृगयेचा नाद आहे. पण त्याचा नाटकात दिसणारा प्रमुख गुण म्हणजे तो अत्यंत सुस्वरूप व सहृदय आहे. वासवदत्तेवर त्याचे प्राणापलीकडे प्रेम आहे. तिच्या निधनाची वार्ता ऐकूनच त्याला मूर्च्छा येते व त्यानंतर तो आत्मघातासही प्रवृत्त होतो. राजकार्यासाठी तो पद्मावतीशी विवाह करण्यास तयार होतो. तिच्याशी लग्न झाल्यावरही त्याच्या मनातील वासवदत्तेची प्रतिमा फिकी होत नाही. विदूषकाने विचारलेल्या खट्याळ प्रश्नास तो जे उत्तर देतो ते उघड उघड वासवदत्तेला अनुकूल आहे. पण पद्मावतीशीही त्याची वर्तणूक सौजन्याची आहे. तिने वीणावादन शिकण्याविषयी प्रश्न केला असता तो काही न बोलता सुस्कारा टाकतो. वासवदत्तेच्या आठवणीने डोळ्यांत अश्रू आले असता ते परागकण डोळ्यात शिरल्याने आले आहेत असे सांगतो. वासवदत्तेच्या पित्याबद्दल त्याच्या मनात आदराची भावना आहे. त्यांच्या कन्येचे आपण रक्षण करू शकलो नाही ही बोच त्याच्या मनाला लागलेली आहे. मृत पत्नीची स्मृती अखंड जपणाऱ्या प्रिय पतीचे चित्रण नाटककाराने मोठ्या कौशल्याने रेखाटले आहे.

पण एक-दोन गोष्टी खटकल्यावाचून राहात नाहीत. मृगयेच्या व वासवदत्तेच्या मोहात गुंतून त्याने राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करावे व शत्रूकडून पराभूत व्हावे यात त्याचा नाकर्तेपणा दिसतो. तसेच आपले राज्य मिळवण्याचा तो जराही

प्रयत्न करीत नाही. बिचारे यौगंधरायण व रुमण्वान धडपड करून त्याला दर्शकाची मदत मिळवून देतात तेव्हा कोठे हा स्थिर होतो. या गोष्टी त्याच्या नायकत्वाला कमीपणा आणणाऱ्या आहेत.

दुसरे म्हणजे त्याने नवपरिणीत पद्मावतीची घोर उपेक्षा केली आहे. तिचे सौंदर्य, सौजन्य, मृदुस्वभाव यांपैकी कशाचीही त्याने कदर केलेली नाही. तिच्या शीर्षवेदनेची चौकशी करण्यासाठी तो समुद्रगृहात जातो खरा पण एका शब्दानेही तिची चौकशी न करता खुशाल तिच्यां बिछान्यावर झोपी जातो. त्याचे हे वर्तन माणुसकीला शोभणारे नाही. त्यामुळे यानंतरचे पद्मावतीचे सारे आयुष्य उपेक्षेतच जाणार की काय असे वाटू लागते.

**(२) वासवदत्ता :** दुर्दैवी वासवदत्तेचे चित्र यथार्थपणे उभे केले आहे. विवाहानंतर काही काळ सुख तिच्या वाट्याला आले पण उदयनाचे राज्य गेल्यावर तिचे दिवस फिरले. राजाला परत पूर्वीचे वैभव प्राप्त व्हावे या एकमेव उद्देशाने तिने आपल्या जीवनाचा होम केला. ती यौगंधरायणाच्या कटात सामील झाली. जिवंत असूनही तिची मृत व्यक्तीत गणना झाली. यानंतर यौगंधरायण उदयनाचे पद्मावतीशी लग्न लावून देणार आहे, याची तिला मुळीच कल्पना नव्हती. यावरून यौगंधरायणाने तिला कटाची पूर्ण माहिती दिली नव्हती, असे दिसते. त्यामुळे 'देव अतिशय निर्दय आहे.' यासारखे उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडतात. ती अगदी हळवी व उतावीळ आहे. आपल्या भावना तिला अजिबात आवरता येत नाहीत. पद्मावतीचे सेवक रस्त्यावरची गर्दी हटवू लागताच आपण रस्त्यावर आलो आहोत, कोणी आपणास किंमत देत नाहीत, असे वाटून ती दु:खी होते.

पद्मावतीचे निर्व्याज्य सौंदर्य व निष्कपट स्वभाव पाहून वासवदत्तेचे मन कृतज्ञतेने भरून जाते. दोघींमध्ये मैत्रीचे नाते निर्माण होते. पद्मावती तिची सवत झाल्यावरही ती तिच्याबरोबर प्रेमाने वागते. आपल्या सुसंस्कृत वर्तनाने तिने अंत:पुरातील स्त्रीजनात आदराचे स्थान प्राप्त करून घेतले आहे. नाटककाराने तिच्या अंतरंगाचे सूक्ष्म चित्रण केले आहे. ती प्रत्येक अंकात उपस्थित आहे. चौथ्या अंकात राजाचे दर्शन झाल्यापासून तिची कळी खुलली आहे. विदूषकाच्या प्रश्नाला राजाने दिलेले उत्तर ऐकून ती मनोमन सुखावली आहे. स्वप्नदृश्यातील प्रसंगात तर तिला राजाच्या उत्कट प्रीतीचा साक्षात्कार झालेला आहे. अशा तऱ्हेने दुर्धर प्रसंगास तोंड देणाऱ्या अत्यंत सहनशील अशा वासवदत्तेचे चित्र उदयनाप्रमाणेच आपल्याही मनातून पुसले जाणे अशक्य आहे.

**(३) पद्मावती :** पद्मावतीचेही चित्रण वासवदत्तेच्या तोडीस तोड असे झालेले आहे. चौथ्या अंकात विदूषक म्हणतो त्याप्रमाणे 'राणी पद्मावती तरुण, सुंदर, न रागवणारी, अहंकाररहित, मधुर भाषण करणारी व सद्वर्तनी आहे.' पण हे तिच्या वर वर दिसून येणाऱ्या गुणांचे वर्णन आहे. तिचे अंतरंग अत्यंत स्पृहणीय आहे. ती अत्यंत शालीन, विनयी व व्यवहारी आहे. वासवदत्तेच्या माहेरच्या माणसांसमोर उभे राहण्यास तिला संकोच वाटतो. ती सोशिक व शांत स्वभावाची आहे. चौथ्या अंकात राजाने दिलेले उत्तर खरे तर तिच्या जिव्हारी झोंबलेले आहे. पण चकार शब्द न काढता तिने ते सहन केले आहे. साहजिकच तिच्या मनावरचा ताण असह्य झाला व त्याचे रूपांतर तिच्या शीर्षवेदनेत झाले. पाचव्या अंकात तिच्या डोकेदुखीचा गाजावाजाच जास्त झालेला आहे. पण प्रत्यक्षात ती कोठे आहे व ती समुद्रगृहात का गेली नाही, हे कोणालाच ठाऊक नाही. एवढ्या सद्गुणी नवविवाहितेची ही उपेक्षा अक्षम्य आहे.

विवाह झाल्यापासून खरे तर तिचे सौख्यच हरपले आहे. इतका तरुण, सुंदर व सुशील पती मिळूनही ती अभागिनीच राहिली. राजा सदैव वासवदत्तेच्या स्मृतीत हरवलेला. तिने वीणा शिकण्याची इच्छा प्रकट केली तर त्याने नुसता दीर्घ नि:श्वास टाकला. त्याने विदूषकाला दिलेले उत्तर तर तिचा पाणउतारा करणारेच आहे. तसेच डोळ्यांत अश्रू येण्याचे कारण देताना त्याने चांगल्या हेतूने का होईना पण असत्य भाषण केले आहे. अशा पतीचा तिने कसा भरवसा धरावा? त्यामुळे तिचे उर्वरित जीवनही उपेक्षेतच गेले असावे असे वाटते. उदयनाप्रमाणे नाटककारानेही पद्मावतीवर घोर अन्याय केला आहे.

**(४) यौगंधरायण :** प्रत्यक्ष नाटकात यौगंधरायण आपल्याला पहिल्या आणि अखेरच्या म्हणजे सहाव्या अंकातच काय तो दिसतो. त्याची सर्व कामगिरी पडद्याआडची आहे. शत्रूचा पाडाव करून उदयनाला त्याचे पूर्वीचे वैभव प्राप्त करून देणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्यासाठी त्याला उदयन व वासवदत्ता यांची काही काळापुरती ताटातूट करावी लागते. मगधाधिपती दर्शक राजाची बहीण पद्मावती हिच्याशी उदयनाचे लग्न लावण्याचा त्याचा बेत आहे. त्यायोगे दर्शकाकडून लष्करी सहाय्य मिळण्यासारखे होते. वासवदत्तेला उदयनापासून दूर केल्यानंतर तिला सुरक्षित कोठे ठेवायची हीही त्याच्यापुढची समस्या असते. पण पद्मावतीनेच तिची जबाबदारी घेतल्यामुळे त्याच्या मस्तकावरची अर्धी जबाबदारी कमी होते.

त्यानंतर राजाचा पद्मावतीशी विवाह व लष्करी मदत मिळाल्यावर आरुणीवर आक्रमण या साऱ्या गोष्टी त्याच्या योजनेप्रमाणे जुळून येतात. शत्रूचा पाडाव होऊन राजाला कौशांबीमध्ये स्थिर केल्यावर त्याची जबाबदारी संपते. फक्त वासवदत्तेला राजासमोर कशी आणायची हा छोटासा पेच त्याच्यासमोर होता. पण उज्जयिनीतील पाहुण्यांच्या आगमनामुळे तोही सुटला आणि यौगंधरायण आपल्या जबाबदारीतून पूर्ण मोकळा झाला.

त्याचे सारे आयुष्य राजाची चिंता करण्यासाठी आहे. या नाटकात नाटककाराने त्याला बराच काळ पडद्याआडच ठेवले आहे. त्यामुळे त्याच्या स्वभावातील वैशिष्ट्ये स्पष्ट झालेली नाहीत. पण प्रसंगास साजेल असे वर्तन वा भाषण करून आपले काम साधण्याची त्याची हातोटी ध्यानात घेण्यासारखी आहे.

**(५) विदूषक-वसंतक :** राजा व विदूषक हे एकदम चौथ्या अंकातच रंगभूमीवर येत असल्याने वसंतकासही फारसा अवकाश मिळालेला नाही. इतर संस्कृत नाटकातील विदूषकाप्रमाणे हाही खादाड आहे. पण धांदरट अथवा मूर्ख नाही. चार दिवस पक्वान्नावर ताव मारल्यामुळे त्याला अजीर्ण झालेले आहे. त्याने एकच महत्त्वाची कामगिरी केली आहे व ती म्हणजे 'पद्मावती व वासवदत्ता यांपैकी कोण तुला अधिक प्रिय आहे?' असा अत्यंत नाजूक प्रश्न राजाला विचारण्याची. या प्रश्नाच्या उत्तरावर दोन्ही राण्यांचा जीव टांगलेला आहे याची त्याला वा राजाला कल्पना नाही. पण त्या दोघीही त्यांचा हा संवाद ऐकत असतात. 'नाट्यछलितांचे' (Dramatic Irony) हे उत्तम उदाहरण आहे.

पण नंतर राजाने वसंतकाला तसाच प्रश्न विचारल्यावर तो जे उत्तर देतो ते उघड उघड पद्मावतीला अनुकूल आहे. पण राजाने 'हे सर्व मी वासवदत्तेला सांगीन बरं का' असे म्हटल्यावर तो राजाला वासवदत्ता मरण पावल्याची आठवण करून देतो व साऱ्याच रंगाचा बेरंग होतो. तो तसा चतुर व हजरजबाबी आहे. तो पाणी आणण्यासाठी गेला असता अचानक पद्मावती त्याच्या समोर उभी राहते, तेव्हा तो गांगरत नाही. राजाच्या डोळ्यांत अश्रू का आले याचे कारण रचून लगेच सांगतो. तो राजाचा जिव्हाळ्याचा मित्र आहे हे मात्र खरे.

* * *

या नाटकाचे कथानक सरळ आणि साधे आहे. त्यात गुंतागुंत नाही तसेच पात्रांचे स्वभावही स्पष्ट रेखाटले आहेत. राजा व वासवदत्ता यांच्या आंतरिक प्रेमावर हे नाटक आधारले असून याचा रोख अंतरंगावर आहे. त्यामुळे नाटकाला अपेक्षित उंची प्राप्त झालेली आहे. या नाटकाने भासाला थोरवी प्राप्त करून दिली आहे.

(१) उदयन व वासवदत्ता यांच्या दिव्य प्रीतीची प्रचीती आणून देणे हे या नाटकाचे मुख्य उद्दिष्ट आहे. राजा वासवदत्तेच्या प्रेमात गुंतून पडला किंवा त्याने विरचिकेशी चावटपणा केला, याचा अर्थ तो स्त्रीलंपट होता, असा करण्याचे कारण नाही. अनेक स्त्रिया असल्या तरी पुरुषाचा जीव एखाद्या राणीवरच जडतो व ती पट्टराणी होते. वासवदत्तेला हे भाग्य लाभले. तिच्या मृत्यूच्या वार्तेने उदयनाचे भावजीवनच उद्ध्वस्त झाले. त्याच्या जीवनातले सारे रंग उडून गेले. पद्मावतीशी त्याचा नावालाच विवाह झाला. वासवदत्तेच्या स्मृतीने तो जास्तच विव्हळ झाला. याला समान उदाहरण रघुवंशातील अजराजाचे देता येईल. इंदुमतीच्या निधनाने अज पुरता हताश झाला. दशरथ थोडा मोठा होईपर्यंत त्याने प्राण धरून ठेवले. त्यानंतर आत्मसमर्पण केले. वासवदत्ता जिवंत असावी अशी थोडी आशा त्याच्या मनात असावी. स्वप्नदृश्यानंतर त्याची आशा पल्लवित झाली. वासवदत्तेलाही त्याच्या प्रेमाची खात्री पटली. त्यामुळे त्यांच्या अखेरच्या मीलनास रंग चढलेला आहे. हा उद्देश समजला नाही तर नाटकाचे मर्म हाती लागणार नाही.

(२) नायक-नायिकेच्या दिव्य प्रेमाची कहाणी सादर करताना काही त्रुटी राहून गेल्या आहेत. राजा उदयन काही अन्य कामानिमित्त मगधास आला होता, असा दुसऱ्या अंकात उल्लेख आहे. हे अन्य प्रयोजन कोणते ते सांगण्याची भासाला जरुरी वाटत नाही. असा एखादा धागा अंतराळी सोडणे हा दोषच मानला पाहिजे. हाच प्रकार पाचव्या अंकातील पद्मावतीच्या शीर्षवेदनेचा झाला आहे. राजा व वासवदत्ता यांच्या (स्वप्न) भेटीला अवसर देण्यासाठी भासाने हे निमित्त योजले आहे हे उघड आहे. अन्यथा पद्मावतीची अशी उपेक्षा करण्याचे कारण नव्हते.

स्वप्नदृश्यातील विरचितेचा उल्लेख असाच प्रयोजनहीन आहे. 'स्वप्ना'तील वासवदत्ता राजाला अनलंकृत दिसते त्यावरून ती रागावली असावी असे त्याला वाटते आणि तिच्या रागाचे कारण विरचिका हे असावे असा तो तर्क करतो.

कथासरित्सागरात सांगितल्याप्रमाणे राजाने वासवदत्तेला चुकून विरचिकेच्या नावाने हाक मारली. विरचिका ही राजवाड्यातील दासी होती. वासवदत्तेला त्या प्रसंगाचे स्मरण झाले असावे असे राजाला वाटते. पण या उल्लेखाने काही साधले आहे असे वाटत नाही. सहाव्या अंकाच्या सुरुवातीस राजाची घोषवती वीणा सापडल्याचा उल्लेख आहे. ही वीणा केव्हा हरवली व ती नर्मदेच्या काठी कशी गेली? की ती यौगंधरायणानेच लपवून ठेवली होती, याचा नाटककार काही खुलासा करीत नाही. पद्मावतीची शीर्षवेदना वगळता इतर गोष्टी गौण आहेत. पण नाटककाराचे अवधान या बाबतीत सुटल्यासारखे दिसते. म्हणूनच यांना दोष न म्हणता त्रुटी असे संबोधले आहे.

(३) भासाच्या नाटकातील संवाद ही मोठी जमेची बाजू आहे. संवाद हे गद्य-पद्यात असतात. संस्कृत नाटकात गद्यापेक्षा पद्याचे प्रमाण खूप मोठे असते. भवभूती, भट्टनारायण, मुरारी अथवा राजशेखर यांच्या नाटकांवर ओझरती जरी नजर टाकली तरी ही गोष्ट सहज लक्षात येणारी आहे. पण भासाच्या या नाटकात गद्याचे प्रमाण मोठे आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की यातील दुसऱ्या व तिसऱ्या अंकात एकही श्लोक नाही. भासाचे गद्य अगदी सरळ व सुटसुटीत आहे. वाक्ये अतिशय लहान आहेत. त्यात समासांचा प्राय: अभाव आहे. मुख्य म्हणजे त्याची भाषा जिवंत आहे. त्याच्या काळात संस्कृत भाषा प्रचारात असावी असे वाटते. सारांश, प्रभावी गद्य-संवाद हे या नाटकाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

(४) रस परिपोषाच्या दृष्टीने हे नाटक थोडे एकसुरी वाटण्याचा संभव आहे. यात विप्रलंभ शृंगारास प्राधान्य आहे. उदयन व वासवदत्ता या दोघांच्या ताटातुटीवरच हे नाटक आधारले असल्याने दोघांचीही अंत:करणे होरपळत आहेत. अर्थात कारुण्याचाही स्पर्श आहे. विशेषत: उदयनाचे पद्मावतीशी लग्न ठरताच वासवदत्तेला आकाशच फाटल्यासारखे वाटते. ‘खरोखर ईश्वर निर्दय आहे.’ यासारखे वाक्य सहज तिच्या मुखातून बाहेर पडते. पण उदयनाचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यापासून व त्याच्या प्रेमाची खात्री पटल्यावर तिचे दु:ख बरेच कमी होते. वास्तविक पाहता उदयनाला वासवदत्तेच्या प्राप्तीची काहीच आशा नाही. पण तोही आलेल्या प्रसंगात धीराने वागतो. विप्रलंभ शृंगार व थोडा फार करुण रस वगळता इतर रसांना येथे मुळीच अवकाश मिळालेला नाही.

(५) यौगंधरायणाच्या अखंड परिश्रमाला अखेर यश येऊन उदयनाला राज्यप्राप्ती होते. तो कौशांबीत येऊन आपल्या राजवाड्यात सुस्थिर होतो.

योगायोगाने त्याला वासवदत्तेचाही लाभ होतो. शिवाय नवपरिणीत पद्मावतीचाही सहवास आहे. त्यामुळे आनंदी आनंद होतो असे म्हणावयास हरकत नाही. पण मनात शंकेची पाल चुकचुकते. उदयन पुन्हा अंत:पुरात वा मृगयेत गुरफटून राज्याकडे दुर्लक्ष करणार नाही ना? महासेनेच्या कैदेतून सुटका झाल्यानंतरही उदयनाचा पूर्वीचाच खाक्या चालू होता. मंत्र्यांचा सल्ला न ऐकणे, राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करणे अथवा एखाद्या संकटात सापडणे हा त्याचा उद्योगच झाला होता. तेव्हा पुन्हा अशी गोष्ट घडणारच नाही याची काही शाश्वती नाही. अर्थात या नाटकापुरता विचार केल्यास उदयनास पूर्वीचे वैभव पूर्णतया प्राप्त झालेले आहे.

(६) नाटकाचे नाव 'स्वप्न-वासवदत्तम्' असे आहे. याचे स्पष्टीकरण-'स्वप्ने दृष्टा वासवदत्ता, स्वप्नवासवदत्ता।' (मध्यमपद लोपी समास) व त्यानंतर 'स्वप्नवासवदत्ताम् अधिकृत्य कृतं नाटकं स्वप्नवासवदत्तम्।' या साऱ्याचा अर्थ स्वप्नात दिसलेल्या वासवदत्तेच्या कथानकावर रचलेले नाटक म्हणजे स्वप्नवासवदत्त होय. स्वप्नदर्शन हा नाटकातला सर्वात महत्त्वाचा बिंदू आहे व त्यामुळे नाटककाराने 'स्वप्न'चा नाटकाच्या नावात समावेश केला आहे. स्वप्नातल्या वासवदत्तेचे दर्शन व खऱ्या वासवदत्तेचा झालेला स्पर्श यामुळे राजाला वासवदत्ता जिवंत असावी असा विश्वास वाटतो. 'स्वप्ना'सारख्या तरल माध्यमामुळे दोघांच्या मीलनाच्या आशा पल्लवित करणे शक्य झालेले आहे.

## १३. चारुदत्त

त्रिवेंद्रम नाटकांच्या मालिकेत 'चारुदत्त' नावाचे एक चार अंकी अपूर्ण नाटक मिळाले आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे याच्या कथावस्तूचे शूद्रकाच्या 'मृच्छकटिक' नाटकाशी विलक्षण साम्य आहे. मात्र चारुदत्त नाटकाची रचना पाहता त्यात राजकारणाचे उपकथानक नसावेसे वाटते. तेव्हा शूद्रकाने हे अपूर्ण नाटक घेऊन त्यास राज्यक्रांतीच्या उपकथानकाची जोड देऊन त्याचे दशांकी प्रकरणात रूपांतर केले असावे. डॉ. बलदेवसिंह उपाध्यायांच्या मते भासाच्या मृत्यूमुळे हे नाटक अपुरे राहिले असावे.

नांदीनंतर सूत्रधार प्रवेश करतो. पण येथे अंकाच्या प्रारंभी असणारा श्लोकही नाही. सूत्रधार पत्नीच्या उपवासानिमित्त ब्राह्मणाला शोधित आहे. इतक्यात त्याला नायकाचा, आर्य चारुदत्ताचा मित्र मैत्रेय दिसतो. त्याला तो भोजनाचे निमंत्रण देतो. पण मैत्रेय ते नाकारतो. येथे मुख्य नाटकास प्रारंभ झाला आहे.

मैत्रेय ब्राह्मण प्रवेश करतो. त्याला इतरांच्या घरी भोजन करण्याची इच्छा नाही. पूर्वी चारुदत्ताच्या भरभराटीच्या काळात तो सुगंधी पंचपक्वान्नांवर ताव मारीत होता. आता त्याला मिळेल त्या अन्नावर गुजराण करावी लागत आहे. असा विचार करीत असता त्याला घरातल्या देवतांची पूजा करीत असलेला चारुदत्त दिसतो. तो चारुदत्ताजवळ जातो.

चारुदत्त हा एके काळचा धनाढ्य व्यापारी दानधर्मात द्रव्य उधळून आता कंगाल बनलेला आहे. त्याला आपल्या दारिद्र्याचा अत्यंत खेद होत आहे व त्यामुळे त्याची वृत्तीही उदासीन बनलेली आहे आणि त्याचेही म्हणणे खरे आहे. वैभव उपभोगल्यानंतर येणारे दारिद्र्य हे अत्यंत दु:सह असते. दारिद्र्यामुळे त्याचे जिवलग म्हणवणारे सारे मित्र त्याला सोडून गेले आहेत. ही व्यथा त्याला बोचत आहे. तो म्हणतो -

''तसे पाहिले तर संपत्ती निघून गेली याचे मला फारसे दु:ख होत नाही. द्रव्य हे नशिबाप्रमाणे प्राप्त होणारे असते. पण या माझ्या नष्ट वैभवामुळे माझ्या मित्रांची मैत्री शिथिल व्हावी ही गोष्ट माझ्या अंत:करणाचा दाह करीत आहे.''

(अंक १, श्लोक ५)

दारिद्र्यामुळे कोणत्या गोष्टी ओढवतात हे सांगत असताना त्याने ज्या एका गोष्टीचा उल्लेख केला आहे ती महत्त्वाची आहे. दुसऱ्याने केलेल्या पातकाचे खापर त्याच्यावर फोडण्यात येते ही ती गोष्ट होय. हा निर्देश भावी संकटाची सूचना देणारा आहे.

त्यांचा संवाद चालू असताना एकदम रस्त्यावरचे दृश्य दिसू लागते. शकार व त्याचा सहकारी वसंतसेनेचा भर रस्त्यावर पाठलाग करीत आहेत. नायिका ही गणिका आहे व शकार हा राजाचा मेहुणा आहे. तो द्रव्याच्या व सत्तेच्या जोरावर वसंतसेनेला वश करू पाहात आहे. वसंतसेना घाबरलेली आहे. तिच्या दासींची व तिची रस्त्यात चुकामूक झालेली आहे. ती त्यांना हाक मारीत आहे. शकार म्हणतो -

"प्रेतनगरीचा राजा वासुदेव अथवा कुंतीचा पुत्र जनमेजय हे तुझे रक्षण करणार आहेत काय? मी तुझे केस धरून दु:शासनाने जसे सीतेला पळवले, तसे पळवून नेणार आहे."

(अंक १ श्लोक २)

शकाराचा विटही तिला धमकावीत आहे. त्याने अंधाऱ्या रात्री अनन्वित कृत्ये केलेली आहेत. तेव्हा आपण हलकट लोकांच्या तावडीत सापडलो आहोत हे वसंतसेनेच्या ध्यानात येते. विट तर तिला स्पष्ट सांगतो की ती जर शकारास वश झाली नाही तर त्याला नाइलाजाने तिची हत्या करावी लागेल. पण वसंतसेना त्याची पर्वा करीत नाही.

वसंतसेना ही कामदेवाच्या उत्सवापासून चारुदत्तावर लुब्ध झालेली आहे, हे शकाराला ठाऊक आहे. तो बोलता बोलता चारुदत्ताचे घर पलीकडे असल्याचा उल्लेख करतो. ही गोष्ट वसंतसेनेच्या पथ्यावर पडते. ती गुपचुपपणे तिकडे जाऊ लागते. तेव्हा विट तिला पायातील पैंजण व वेणीतला गजरा काढून टाकण्याची सूचना देतो.

इतक्यात चारुदत्ताच्या घराचे मागचे दार उघडले जाते. विदूषकाच्या हातात दिवा आहे. वसंतसेना आपल्या पदराने तो दिवा मालवते व झट्कन आत शिरते. विट चारुदत्ताच्या दासीला पाहतो. शकाराला फसवण्यासाठी तो मुद्दाम दासीला पकडतो. दासी आरडाओरडा करते. विदूषक दिवा घेऊन बाहेर येतो. त्याला पहाताच विट लगेच पवित्रा बदलतो. तो विदूषकाची क्षमा मागतो. शकारही आपण चुकीने दासीला धरल्याचे कबूल करतो. पण वसंतसेना चारुदत्ताच्याच घरात शिरली असावी हे ओळखून तो चारुदत्ताला धमकीवजा निरोप द्यावयास सांगतो व निघून जातो.

आत चारुदत्त वसंतसेनेला दासी समजून प्रश्न करतो तेव्हा ती काही बोलत नाही. मग विदूषक येऊन आपल्या घरात वसंतसेना आली असल्याचे व शकाराने धमकी दिल्याची वार्ता सांगतो. मग वसंतसेना चारुदत्ताची क्षमा मागते. चारुदत्त तिला अभय देतो. मग वसंतसेना सांगते की अंगावरच्या दागिन्यांच्या लोभाने चोर आपला पाठलाग करतात. असे म्हणून ती आपल्या अंगावरचे दागिने उतरून चारुदत्ताकडे ठेवायला देते. चारुदत्त त्या दागिन्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी विदूषक व दासीवर सोपवतो. वसंतसेनेला घरी पोहोचविण्यासाठी स्वत: तिच्या बरोबर बाहेर पडतो. (अंक पहिला)

चारुदत्ताच्या घरून परत आल्यापासून वसंतसेना त्याच्या चिंतनात गढून गेलेली आहे. त्यामुळे दासीने काही सांगितले नसताना ती 'पुढे काय झाले?' असा प्रश्न विचारते यावरून ती प्रेमात पडली असल्याचे दासी ओळखते. मग वसंतसेना आपले चारुदत्तावर प्रेम जडल्याचे सांगते. पण तो 'दरिद्री' असल्याचे दासी सांगते तेव्हा वसंतसेना म्हणते की दरिद्री पुरुषावर प्रेम करणाऱ्या गणिकेला कोणी लोभी म्हणणार नाही. तसेच चारुदत्ताची पुन्हा भेट घेता यावी म्हणून तर तिने आपले दागिने त्याच्याकडे ठेव म्हणून ठेवलेले आहेत.

एवढ्यात एक जुगारी तेथे येतो. तो पूर्वी चारुदत्ताकडे संवाहक (म्ह. अंगमर्दन करणारा) म्हणून काम करीत होता. पण त्याला दारिद्र्य आल्यामुळे तो तेथून बाहेर पडला व जुगारी बनला. आज तो जुगारात हरलेला आहे. आपले देणे चुकवून तो बाहेर पडला आहे. त्याचा पाठलाग होत आहे. चारुदत्ताचा मनुष्य आपल्याला शरण आल्याचे समजताच वसंतसेनेचे मन द्रवते. ती दासीला त्याचे देणे चुकते करण्यास सांगते. संवाहकाला पश्चात्ताप होतो व आपले देणे फिटताच तो संन्यासी होण्याचे ठरवतो.

तो वसंतसेनेच्या घरातून बाहेर पडल्यानंतर वसंतसेनेचा कर्णपूर नावाचा सेवक प्रवेश करतो. त्याने आज मोठाच पराक्रम केलेला आहे. तो सांगतो की राजरस्त्यावरून जात असता एक हत्ती त्या गर्दीत हिंडत होता. एकाएकी त्या हत्तीने काषायवस्त्र परिधान केलेल्या एका संन्याशाला पकडले. (हा संन्यासी म्हणजे नुकताच संन्यास धारण केलेला संवाहक आहे) तेव्हा याने हत्तीच्या सोंडेत सापडलेल्या संन्याशाला हत्तीच्या तावडीतून सोडवले. रस्त्यावरच्या सर्व लोकांनी कर्णपूराचे कौतुक केले पण बक्षीस मात्र कोणी दिले नाही. इतक्यात नगरास भूषण होऊन राहिलेला एक देखणा तरुण त्याच्याजवळ आला. त्याने आपले कान, गळा, मनगट इत्यादी अलंकार घालण्यास योग्य असे अवयव चाचपले; पण ते रिकामे असल्याचे पाहिल्यावर आपल्या अंगावरचा सुगंधी शेला कर्णपूरास बक्षीस दिला.

कर्णपूरास त्या पुरुषाचे नाव ठाऊक नाही; पण वसंतसेना मात्र तो चारुदत्तच असला पाहिजे हे ओळखते. ती आपल्या गच्चीतून त्याला जात असलेला पाहते. त्याच्या उघड्या अंगावर आता फक्त जानवे होते. वसंतसेना तो दूर जाईपर्यंत त्याच्याकडे पाहात राहते. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस चारुदत्त व विदूषक घरी परत येतात. ते दोघे रात्रीच्या वेळी गाणे ऐकायला गेले असल्याने परत येण्यास बरीच रात्र झाली आहे. चारुदत्तास गायकाचे गाणे अत्यंत आवडलेले आहे. तो सांगतो की त्याचा आवाज इतका सुरेल होता की जर तो पडद्याआडून गात असता तर कोणी स्त्रीच गात आहे असे वाटले असते. पण विदूषकाला गाण्याचे काही कौतुक वाटत नाही. एक तर त्याला अजीर्ण झालेले आहे व दुसरे म्हणजे त्याला गाणारा पुरुष आणि विद्या शिकणारी स्त्री हे दोघे अजिबात आवडत नाहीत. असे बोलत ते अंथरुणावर आडवे होतात व थोड्याच वेळात झोपी जातात.

नंतर सज्जलक नावाचा एक तथाकथित चोर बाहेरच्या भिंतीला खिंडार पाडून आत शिरतो. पण आत सारे रिकामे पाहिल्यावर निराश होतो. पण वसंतसेनेच्या दागिन्याचा डबा विदूषकाजवळ असतो. त्याच्या बरळण्यामुळे चोराचे त्या डब्याकडे लक्ष जाते. वास्तविक पाहता हा खरा चोर नाही. याचे वसंतसेनेच्या दासीवर - मदनिकेवर प्रेम आहे. तिची दास्यातून सुटका करण्यासाठी (म्ह. तिच्यासाठी वसंतसेनेला द्रव्य देण्याकरिता) त्याने चोरीचे धाडस करायचे ठरवले आहे. तो वसंतसेनेचे दागिने घेऊन पळून जातो व मग दासी आरडाओरडा करते.

चारुदत्त व विदूषक जागे होतात व त्यांना वसंतसेनेचे दागिने गेल्याचे समजते. चारुदत्त खिन्न होतो. कारण दागिने ही विश्वासाची ठेव होती. ते चोरीत गमावले असे सांगून कोणाचा विश्वास बसला नसता. कारण चारुदत्त दरिद्री होता. चारुदत्ताची पत्नी येऊन कोणाला मारहाण झाली नाही ना अशी चौकशी करते. तेव्हा तिला गणिकेचे दागिने चोरीला गेल्याचे समजते. त्या बरोबर ती आत जाऊन आपल्याजवळची लाख मोलाची माळ आणून देते. त्या दागिन्यांची भरपाई करण्यास सांगते.

तेव्हा विदूषक म्हणतो की एवढ्याशा दागिन्यांच्या मोबदल्यात लक्षावधी रुपयांची माळ कशासाठी द्यावयाची? यावर चारुदत्ताने दिलेले उत्तर अत्यंत हृदयस्पर्शी आहे. तो म्हणतो -

"मित्रा, जो विश्वास मनात धरून त्या गणिकेने आमच्या जवळ ही दागिन्यांची ठेव ठेवली, त्या विश्वासाची ही किंमत आहे आणि ती तिला दिली पाहिजे."

(अंक ३, श्लोक १९)

असे म्हणून चारुदत्त विदूषकास ती माळ वसंतसेनेस देऊन येण्यास सांगतो.(अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या सुरुवातीस वसंतसेना चारुदत्ताची तसबीर रंगवीत आहे. त्या वेळी तिची एक दासी वसंतसेनेच्या आईचा निरोप सांगण्यासाठी येते. दारावर राजशालक शकाराची पालखी आलेली आहे. त्याने वसंतसेनेसाठी दागिने पाठविले आहेत. ते परिधान करून येण्यास सांगितले आहे. वसंतसेना आईचा प्रस्ताव ठोकरते. दासी निघून जाते.

नंतर सज्जलक प्रवेश करतो. तो मदनिकेला दास्यातून सोडविण्यासाठी आलेला आहे. तो तिला हाक मारतो. त्याचा आवाज ऐकून मदनिका बाहेर येते. ती दोघे हलक्या आवाजात बोलत असता वसंतसेना पाहते. तो दागिन्याचे भांडे मदनिकेकडे देतो. मदनिका दागिने पाहते. ते तिला ओळखीचे वाटतात. मग मदनिका त्याला दागिने कोठून आणलेस, असे विचारते तेव्हा तो ते चोरी करून आणल्याचे सांगतो. तसेच आपण ज्याचे घर फोडले ते चारुदत्ताचे घर होते, हे त्याला सकाळी समजलेले आहे. त्याने चारुदत्ताचे नाव सांगताच ती त्याला विचारते की तेथे त्याने कोणाला मारहाण तर केली नाही? त्याने नाही असे म्हटल्यावर दोघी सुटकेचा निःश्वास टाकतात. मग मदनिका त्याला हे दागिने आपल्या मालकिणीचे आहेत असे सांगते. आता त्याने ते दागिने चारुदत्ताने तुम्हाला देण्यास सांगितले आहे असा निरोप देऊन वसंतसेनेस द्यावे असे सांगते. ती आपली भेट कामदेवाच्या मंदिरात घेण्यास सांगते. सज्जलक निघून जातो.

तो गेल्यावर चारुदत्ताकडून रत्नमाला घेऊन विदूषक येतो. वसंतसेना त्याचे स्वागत करते. तो आल्याबरोबर आपण ठेवलेल्या दागिन्यांची किंमत किती आहे? असा प्रश्न विचारतो. तिने उद्देश विचारल्यावर तो म्हणतो, "तुमचे ते दागिने आर्य चारुदत्ताने द्युतात गमावले आहेत. त्यांची भरपाई करण्यासाठी त्यांनी ही मोत्याची माळ पाठवली आहे." त्याचे उत्तर ऐकून वसंतसेना त्याने दिलेली माळ ठेवून घेते व त्याला निरोप देते. आपला काहीच पाहुणचार न करता निरोप दिलेला पाहून विदूषकाला आश्चर्य वाटते व तो निघून जातो.

मग सज्जलक परत येतो. मदनिका त्याची वसंतसेनेशी भेट घडवून आणते. मग ठरल्याप्रमाणे सज्जलक हे दागिने आर्य चारुदत्ताने पाठवले आहेत त्यांचा स्वीकार करा असे म्हणून दागिन्यांचा डबा तिच्या स्वाधीन करतो. तेव्हा वसंतसेना तेच दागिने चारुदत्तास परत देण्यास सांगते. तेव्हा तो नकार देतो. तेव्हा वसंतसेना

- 'तू हे दागिने त्याच्या घरातून चोरले आहेस, हे मला ठाऊक आहे' असे स्पष्ट म्हणते. मग तेच दागिने मदनिकेच्या अंगावर घालून ती तिला दासीपणातून मुक्त करते व गाडी बोलावून दोघांना तिच्यातून जाण्यास सांगते. सज्जलक चकित होतो. त्याला वसंतसेनेचे उपकार कसे फेडावेत हे समजत नाही. मग तो मदनिकेला घेऊन जातो.

ते गेल्यावर वसंतसेना अभिसारिका बनून चारुदत्ताच्या घरी जाण्याचे ठरवते. पण आकाशात एकाएकी ढग आलेले आहेत. वादळ व पाऊस येण्याची शक्यता आहे. ती दासीला आपला निश्चय सांगते. तेव्हा दासी 'हा अमृतांक आहे' असे म्हणते व येथेच नाटक समाप्त झाले आहे. (अंक चौथा)

* * *

चारुदत्त नाटकाच्या कथानकाचे मूळ बृहत्कथेत कोठे मिळत नाही तेव्हा सदर कथानक एखाद्या लोककथेवर आधारलेले असावे असा तर्क होतो. भासाच्याच 'अविमारक' या नाटकाच्या कथावस्तूशी याचे साम्य आहे, असे डॉ. गो. के. भटांनी म्हटले आहे, पण प्रत्यक्ष असे साम्य फारच थोडे आहे. त्यांनी दर्शविलेली साम्यस्थळे याप्रमाणे -

(१) दुसऱ्या अंकातील वसंतसेना व दासी यांचे संभाषण अविमारकाच्या तिसऱ्या अंकातील कुरंगी व तिची दासी यांच्यातील संभाषणाची आठवण करून देते. दोन्ही नायिका आपल्या विचारात गर्क आहेत. दासीच्या बोलण्याकडे त्यांचे लक्ष नाही.

(२) अविमारकांच्या तिसऱ्या अंकातील १९ व्या श्लोकात अविमारक कुरंगीला उद्देशून बोलतो, त्याची छाप चारुदत्ताच्या पहिल्या अंकातील विटाच्या बोलण्यावर पडलेली आहे. या दृष्टीने श्लोक ९ व ११ यांमधील शब्दयोजना पाहण्यासारखी आहे. अविमारक म्हणतो, 'कि कम्पसे पवनवेगहता लतेव' तर विट नवव्या श्लोकात 'व्याघ्रानुसारचकिता हरिणीव यासि' असे म्हणतो तर अकराव्या श्लोकात 'पतगेन्द्रभयाभिभूता' असे म्हणतो.

(३) चारुदत्ताच्या तिसऱ्या अंकात चोरी करताना सज्जलक 'नमःखरपटाय' 'नमो रात्रिगोचरेभ्यो देवेभ्यः' असे देवतांना नमन करतो. तर अविमारकाच्या तिसऱ्या अंकात रात्रीच्या वेळी राजवाड्याच्या गच्चीवर चढताना अविमारक 'नमः प्रजापतये नमः सर्व सिद्धेभ्यः।' असे देवता नमन करतो. दोन्ही ठिकाणी अंधाराचे वातावरण आहे.

ही साम्यस्थळे आहेत. तसेच यात आलेला 'लिम्पतीव तमोऽङ्गानि (चारु. १.१९) हा श्लोक 'बालचरितातही' (बाल. १.१५) आलेला आहे. त्यामुळे चारुदत्ताचे कथानक तसे स्वतंत्रच आहे असे म्हणायला हरकत नाही.

प्रो. सी.व्ही. देवधरांच्या मते 'चारुदत्त' हे नाटक शूद्रकाच्या मृच्छकटिकाची रंगावृत्ती आहे. पहिल्या चार अंकांच्या आधारे भासाने ही सुखात्मिका बनवली आहे व ती पूर्ण आहे. कारण चौथ्या अंकाच्या शेवटी चेटी हे 'अमृतांक' झाले असे म्हणते. प्रो. देवधरांची ही दोन्ही मते पटणारी नाहीत. त्यांचा क्रमाने विचार करू -

(अ) मृच्छकटिकाचे पहिले चार अंक व चारुदत्त हे विचारात घेतले तर भासाने संक्षेपाचा अवलंब केला आहे असे वाटत नाही. त्यामुळे हिला रंगावृत्ती म्हणता येत नाही. कारण रंगावृत्तीत अनावश्यक वर्णनांची व दीर्घ प्रसंगांची काटछाट करण्यात आलेली असते. मृच्छकटिकाच्या काव्यपूर्ण व चमत्कारिक प्रस्तावनेचा भासाच्या नाटकात पत्ताच नाही. तेव्हा वस्तुस्थिती उलट असली पाहिजे. शूद्रकानेच भासाच्या या चार अंकी नाटकास नवीन स्वरूपात सादर केले असावे हे म्हणणे वस्तुस्थितीला धरून आहे.

(ब) आता चारुदत्ताच्या चौथ्या अंकाच्या शेवटी चेटी हे 'अमृतांक' झाले असे म्हणते. त्याचा अर्थ काय व चारुदत्ताच्या काही प्रतीच्या अखेरीस 'अवसितं चारुदत्तम्' किंवा 'समाप्तं चारुदत्तम्' असे शब्द आहेत तेव्हा यांची संगती कशी लावायची असा प्रश्न पडतो. तेव्हा प्रथम प्रस्तुत नाटक पूर्ण झाले आहे की अपूर्ण राहिले आहे या प्रश्नाचा प्रथम निकाल लावला पाहिजे.

चारुदत्त हे नाटक अपूर्ण आहे, असेच म्हणावे लागते. एक तर याच्या शेवटी भरतवाक्य नाही. तसेच नायकाला फळाची प्राप्ती (म्ह. नायिकेची प्राप्ती) झालेली नाही. दुसरे म्हणजे नाटकातील अनेक गोष्टी अधांतरी राहिलेल्या आहेत. त्यातील काही अशा -

(१) पहिल्या अंकाच्या प्रारंभी शकाराने चारुदत्तास दिलेल्या धमकीचे काय झाले? शकार हा खलपुरुष आहे. मूर्ख असला तरी क्रूर आहे. तेव्हा त्याने आपला सूड उगवण्याचा प्रयत्न केला असला पाहिजे.

(२) दुसऱ्या अंकात वसंतसेनेने उपकृत केलेला संवाहक तिच्या उपकाराची परतफेड करण्याचे ठरवतो. तेव्हा त्याला उपकाराची परतफेड करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे.

(३) चौथ्या अंकाच्या शेवटी वसंतसेना चारुदत्ताला भेटायला निघाली आहे. आकाशात अचानक ढग आले आहेत. वादळी पाऊस येण्याची शक्यता आहे. तेव्हा वादळी पावसाचे आगमन व वसंतसेनेचे अभिसरण या दोन गोष्टी दर्शविल्याशिवाय या सूचनेला काही अर्थ नाही.

तेव्हा उपलब्ध 'चारुदत्त' नाटक हे अपूर्ण आहे हे कबूल करणे भाग आहे. आता याचे पुढील अंक गहाळ झाले आहेत की नाटककाराच्या मृत्यूमुळे ते लिहिले गेले नाहीत हे समजण्यास मार्ग नाही. तथापि यातील पहिली गोष्ट शक्य वाटते. संस्कृत वाङ्मयात 'दरिद्र चारुदत्त' नामक नाटकाचा उल्लेख आढळतो. ते नाटक व भासाचे नाटक हे एकच असावे. यात राज्यक्रांतीचे उपकथानक नसावे. वर ज्या तीन गोष्टी अधांतरी राहिलेल्या दर्शविल्या आहेत त्या पुढील तीन अंकांत आल्या असाव्यात अशी माझी तरी समजूत आहे.

हे नाटक अपूर्ण असेल तर 'अमृतांक झाले.' या वाक्याचा अर्थ काय? मदनिकेची 'दासीपणा'तून सुटका झाली व तिचे सज्जलकाशी लग्न झाले ही घटना सर्व दासींना आनंदाची वाटली म्हणून चेटीने हे उद्गार काढले असे काहीसे स्पष्टीकरण डॉ. भटांनी दिलेले आहे पण हे सारे जुळवल्यासारखे वाटते. दुसरे म्हणजे वसंतसेनेच्या कथेला याने गौणत्व येते. तेव्हा हे वाक्य पुरेसे स्पष्ट नाही, हे मानणे योग्य होईल. तसेच 'समाप्तं चारुदत्तम्' यासारख्या सूचना ज्या काही प्रतीत दिसतात त्या हस्तलिखित प्रत तयार करणाऱ्या लेखकाच्या प्रमादामुळे आल्या असाव्यात.

या सर्व चर्चेवरून (१) चारुदत्त हे नाटक मृच्छकटिकाच्या पहिल्या चार अंकांची रंगावृत्ती नाही. (२) सध्या उपलब्ध असलेले चार अंकी 'चारुदत्त' नाटक हे अपूर्ण आहे. (३) उलट शूद्रकानेच या नाटकात यथोचित भर घालून त्यातील त्रुटी वगळून व राज्यक्रांतीच्या उपकथानकाची जोड देऊन सर्वांगसुंदर अशा दहा अंकी प्रकरणाची - मृच्छकटिकाची निर्मिती केली असावी. हे निष्कर्ष मान्य होण्यास अडचण दिसत नाही.

* * *

नाटकाच्या कथावस्तूस नाटक सुरू होण्यापूर्वी प्रारंभ झाला आहे. वसंतसेना व चारुदत्त यांची प्रथमभेट मदन महोत्सवाच्या निमित्ताने कामदेवाच्या मंदिरात झाली आहे. हा मदन महोत्सव चैत्र शुक्ल त्रयोदशीस होत असे. त्यानंतर चैत्र कृष्ण षष्ठीस नाटकास प्रारंभ झालेला आहे. वसंतसेनेने ठेवायला दिलेले दागिने षष्ठी व सप्तमीस रदनिकेने व अष्टमी व नवमीस विदूषकाने सांभाळावयाचे असे

ठरते. तसेच पहिल्या अंकाच्या शेवटी चंद्र उगवल्याचा उल्लेख आहे. त्या वेळी रस्त्यावरील रहदारी थांबलेली आहे. म्हणजे त्या वेळेस रात्रीचे अकरा वाजले असावेत. कृष्णपक्षात चंद्र उशीरा उगवतो त्यामुळे या अनुमानास पुष्टी मिळत आहे.

दुसरा अंक पहिल्या अंकानंतर लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी सुरू झालेला आहे. वसंतसेना सकाळी उशीरा उठलेली आहे व तिचे अद्याप स्नानही झालेले नाही. या अंकात प्रथम संवाहक येतो. वसंतसेना त्याचे देणे चुकते करते. तो जुगाराला कंटाळून बुद्ध-भिक्षू होण्याचे ठरवतो व बाहरे पडतो. नाटकात त्यानंतर लगेच कर्णपूर आलेला दाखवला आहे. पण दरम्यान तीन-चार तास तरी लोटले असावेत. कारण बुद्ध भिक्षूचा वेश धारण करून संवाहक रस्त्यात आला व त्याच्यावर हत्तीने हल्ला चढवला. कर्णपूरकाने चपळाई करून त्याला हत्तीच्या तावडीतून सोडवले. आपल्या पराक्रमाची प्रौढी सांगण्यासाठी तो वसंतसेनेकडे आला आहे.

दुसऱ्या व तिसऱ्या अंकाच्या दरम्यान दहा-बारा दिवसाचे अंतर कल्पिणे क्रमप्राप्त आहे. वसंतसेनेने ठेव म्हणून ठेवलेले दागिने चारुदत्ताच्या घरी काही दिवस राहिलेले आहेत. त्या दिवशी अष्टमी असल्याचा उल्लेख चेटीच्या तोंडी आलेला आहे. त्यामुळे श्री. पु.रा.लेले, डॉ. रायडर तसेच डॉ. वा. गो. परांजपे यांनी पहिल्या अंकानंतर लगेच दोनच दिवसांनी तिसऱ्या अंकातील घटना घडल्या आहेत असे म्हटले आहे. चारुदत्त मध्यरात्री गाणे ऐकून आलेला आहे. त्या वेळी चंद्र अस्तास चाललेला आहे. तेव्हा ही शुक्ल पक्षातील अष्टमी असली पाहिजे हे उघड आहे. पण विदूषकाच्या बोलण्यावरून तो प्रथमच दागिने सांभाळत आहे असे वाटते. असो. तेव्हा ही वैशाख शुक्ल अष्टमी असावी.

चौथ्या अंकात सज्जलक चोरलेले दागिने घेऊन मदनिकेची सुटका करण्यासाठी आलेला आहे. तसेच चोरीस गेलेल्या दागिन्यांची भरपाई करण्यासाठी विदूषक रत्नमाला घेऊन आला आहे. तेव्हा तिसऱ्या अंकानंतर दुसऱ्याच दिवशी चौथ्या अंकास प्रारंभ झाला आहे. सारांश चैत्र शुक्ल त्रयोदशीस कथावस्तूस प्रारंभ झाला आहे व ती वैशाख शुक्ल अष्टमीस पूर्ण झाली आहे. म्हणजेच कथावस्तूचा काळ तीन आठवड्यांचा आहे. मात्र नाटकातील कालावधी दोन आठवड्यांचा आहे.

* * *

नाटकात चारुदत्त, वसंतसेना, मैत्रेय, राजशालक शकार व सज्जलक अशी महत्त्वाची पात्रे आहेत. त्यांची वैशिष्ट्ये थोडक्यात पाहू -

**(१) चारुदत्त** - हा उज्जयिनी नगरीतील एके काळचा धनाढ्य व्यापारी आहे. त्याने आपली सारी संपत्ती दानधर्मात उधळल्यामुळे सांप्रत तो अगदी कफल्लक बनलेला आहे. दुसऱ्या अंकात त्याची प्रशंसा करताना संवाहक म्हणतो, ''चारुदत्त हा सुंदर, अलंकाररहित, मधुर व कोमल स्वभाव असलेला, गर्वरहित, चतुर, सुकुमार, निपुण व लोकप्रिय आहे व दान केल्याचे सांगत नाही. दुसऱ्या कोणी थोडा उपकार केला तरी विसरत नाही पण स्वतः केलेला मोठा उपकार मात्र ध्यानात ठेवीत नाही.'' (अंक दुसरा)

दारिद्र्य आले तरी त्याची रसिकवृत्ती टवटवीत आहे. तसे पाहिले तर चारुदत्ताचे दारिद्र्य व वसंतसेनेचा पेशा या दोन्ही गोष्टी प्रणयास प्रतिकूल आहेत. परंतु पैशाचा लोभ, स्वार्थी वृत्ती व खोटे प्रेम या गणिकेच्या अंगी असणाऱ्या सामान्य गोष्टी वसंतसेनेच्या ठिकाणी मुळीच नाहीत.

चारुदत्त धार्मिक आहे. स्वतःच्या अब्रूला जपणारा आहे. वसंतसेनेचे दागिने चोरीला गेल्याचे समजताच तो त्यांची त्वरित भरपाई करण्याचे ठरवतो व आपल्या पत्नीची रत्नमाला पाठवून देतो. तो संगीताचा शौकीन आहे व अंगावरचा शेला बक्षीस देण्यासारखा दानशूरही आहे.

**(२) वसंतसेना** : ही उज्जयिनीतील तरुण, रूपसंपन्न व कलागुणवती अशी गणिका आहे. आपला पेशा तिला मुळीच पसंत नाही. तिच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या धनिक व अधिकारसंपन्न शकाराला ती झिडकारते. सुंदर, रसिक पण दरिद्री अशा चारुदत्तावर तिचे प्रेम बसलेले आहे. त्याची पुन्हा भेट घेता यावी म्हणून तिने आपले दागिने त्याच्या घरात ठेवले आहेत. रस्त्यावरून जाणाऱ्या चारुदत्ताकडे ती आपल्या गच्चीतून एकटक पाहात राहते. एकांतात त्याची तसबीर काढून आपले मन रमविते. शेवटी वादळी पावसाची चिन्हे दिसत असूनही त्याला भेटायला जायचे ठरविते. ती उदार व समजदार आहे. मदनिकेला ती त्वरित दासीपणातून मुक्त करते. तसेच जुगारी हा पूर्वी चारुदत्ताचा आश्रित होता हे समजताच ताबडतोब त्याचे देणे चुकते करते. अंधाराचा व शकाराच्या बोलण्याचा फायदा घेऊन त्याला चुकवून चारुदत्ताच्या घरात शिरते.

**(३) विदूषक** : हा जन्माने ब्राह्मण आहे पण त्याला विद्येचा गंध नाही. चारुदत्ताचा हा निस्सीम मित्र आहे. त्याच्या वैभवकाळात व संकटकाळात तो

सतत त्याच्याबरोबर राहिलेला आहे. तो चारुदत्ताबरोबर गाणे ऐकायला जातो. वसंतसेनेचे दागिने सांभाळतो. चारुदत्ताने दिलेली पत्नीच्या गळ्यातील रत्नमाला वसंतसेनेकडे पोहोचती करतो. तो जबाबदार व वेळ-प्रसंग पाहून बोलणारा आहे. इतर विदूषकांसारखा खादाड, अजागळ अथवा मूर्ख नाही.

**(४) राजशालक शकार** : हा नाटकातील खलपुरुष आहे. तसेच राजाचा शालक म्हणजे मेहुणा आहे. पण तो अडाणी आहे. संपत्ती व सत्ता यामुळे त्याला मग्रूरी आलेली आहे. याचे समर्पक वर्णन त्याच्या विटानेच केलेले आहे. पहिल्या अंकात तो म्हणतो -

"हा सगळ्या प्रकारचे नाटकी भाषण करणारा आहे. विचार न करताच वाटेल ते बडबडणारा आहे. याचे चालणे वेडेवाकडे आहे, तर भाषणात मूर्खपणा आहे. हा मनुष्याच्या रूपात वावरणारा एक नवा पशू आहे."

(अंक १, श्लोक १६)

त्याचे बोलणे हसू निर्माण करणारे आहे. 'मी कानांनी वास ऐकतो व नाकपुड्यात अंधार भरल्याने मला नीट दिसत नाही.' यात इंद्रिय व त्यांचे अर्थ यांची गफलत केली आहे. एकाच अर्थाचे अनेक शब्द योजण्याची त्याला सवय आहे. तो वसंतसेना समजून चारुदत्ताच्या दासीचे केस धरतो म्हणतो - 'मी या पोरीचे केस, डोक्यावरील केस, केशपाश धरला आहे. तू ओरड, रड किंवा किंचाळ आणि महेश्वर, शंकर वा ईश्वर यांना हाका मार.' (अंक १, श्लोक २३) तसेच तो चुकीचे पौराणिक संदर्भ देतो - 'प्रेतनगरीचा राजा वासुदेव किंवा कुंतीचा पुत्र जनमेजय हे तुझे रक्षण करोत पण मी तुझे केस धरून दु:शासनाने जसे सीतेला पळवले, तसे तुला पळवून नेणार आहे.' (अंक १ श्लोक १२) असे क्रूरता व मूर्खपणा यांचे मिश्रण असलेले हे अजब पात्र आहे.

**(५) सज्जलक** : हा तरुण ब्राह्मण वसंतसेनेच्या दासीचा - मदनिकेचा प्रेमिक आहे. त्याला आपल्या प्रेयसीची दास्यभावातून सुटका करावयाची आहे. त्यासाठी जी किंमत द्यावी लागणार त्यासाठी तो चोरी करण्याचे ठरवतो. त्याला खरे तर चोरी करणे पसंत नाही. चारुदत्ताच्या घराची भिंत फोडून तो आत शिरतो. त्याला वसंतसेनेचे दागिने मिळतात. ते दागिने मदनिका ओळखते. पण वसंतसेना उदारपणे मदनिकेची दासीपणातून सुटका करते व ते दागिने तिला भेट देऊन सज्जलकाच्या स्वाधीन करते. सज्जलक हा या छोट्याशा उपकथानकाचा

नायक आहे. मृच्छकटिकात याचे नाव शर्विलक आहे व तो राज्यक्रांतीच्या कटात सूत्रधार आहे, असे शूद्रकाने दर्शविले आहे.

* * *

(१) 'चारुदत्त' हे भासाचे शेवटचे नाटक आहे. यात नाटककाराचे कलागुण प्रकर्षाने प्रकट झाले आहेत. डॉ. बलदेव सिंह उपाध्यायांनी म्हटल्याप्रमाणे हे नाटक भासाच्या मृत्यूमुळे अपुरे राहिले असण्याची शक्यता आहे. तथापि याचे पुढील अंक गहाळ झाले असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. संस्कृत वाङ्मयात जो दरिद्र चारुदत्त नामक नाटकाचा उल्लेख येतो ते व प्रस्तुतचे 'चारुदत्त' हे नाटक एकच असावे.

(२) या लहानशा (पण अपूर्ण) नाटकात तीन कथासूत्रे आढळतात. पहिले चारुदत्त व वसंतसेना यांच्या प्रणयाचे कथासूत्र. त्यास पहिल्या अंकात चालना मिळाली आहे. दुसरे कथानक संवाहकाचे. जुगारी बनलेल्या या संवाहकावर वसंतसेना उपकार करते. त्याचे देणे चुकते करते. तोही तिच्या उपकारांची परतफेड करण्याचे ठरवतो. बौद्ध क्षपणक बनून तो बाहेर पडताच एक हत्ती त्याच्यावर हल्ला करतो. त्या वेळी वसंतसेनेचा सेवक त्याची सुटका करतो. पण पुढे तो उपकारांची कशी परतफेड करतो हे नाटक अपूर्ण राहिल्याने समजण्यास मार्ग नाही. तिसरे कथानक सज्जलक व मदनिका यांचे. हे कथानक मात्र पूर्ण झालेले आहे. सज्जलकाने चारुदत्ताच्या घरात चोरी केल्यामुळे व चोरलेले दागिने वसंतसेनेचे असल्याने ही दोन कथानके एकजीव झाली आहेत. तसेच जुगारी हा पूर्वी चारुदत्ताचा अंग-मर्दक असल्याने त्याच्याविषयी वसंतसेनेला ममत्व वाटले आहे. अशा तऱ्हेने तीन कथा गुंफून एक चटकदार सुखात्मिका रचण्याचा भासाचा प्रयत्न बराच यशस्वी झाला आहे.

(३) मुख्य म्हणजे चारुदत्त आणि वसंतसेना यांच्या प्रीतीचे कथानक अत्यंत आकर्षक आहे. एका दरिद्री बनलेल्या सुंदर पण विवाहित अशा तरुणावर नगरातील स्वरूपसंपन्न व धनाढ्य अशी गणिका भाळते. हा विषयच खळबळ उडवणारा आहे. तशात शकारासारख्या मानवी पशूचा तिच्यावर डोळा आहे. तेव्हा त्यांच्या प्रणयाची वाटचाल तशी खडतरच आहे. पण स्वत: वसंतसेनाच पुढाकार घेऊन आपले दागिने त्याच्या घरात ठेव म्हणून ठेवते व आपल्या पुढील भेटीची तरतूद करते. पण त्या दागिन्यांची चोरी होऊन चारुदत्ताची अब्रू जाण्याची वेळ येते. अशा वेळी त्याची बायको आपली रत्नमाला त्यास देऊन

त्या संकटाचे निवारण करते. चारुदत्त ती रत्नमाला ताबडतोब वसंतसेनेकडे रवाना करतो. या घटनेमुळे वसंतसेनेच्या मनात चारुदत्ताविषयी जास्तच ओढ निर्माण होऊन ती भर वादळाच्या आणि पावसाच्या रात्री त्याला भेटायला जाण्याचे ठरवते. इथे नाटक संपले असले तरी कथानक संपलेले नाही. त्यांची भेट कशी झाली? शकाराने पहिल्या अंकात दिलेल्या धमकीचे पुढे काय झाले? व संवाहकाने वसंतसेनेच्या उपकारांची परतफेड कशी केली? या तीन प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय हे कथानक पूर्ण होत नाही. मृच्छकटिकात हे सर्व धागेदोरे कौशल्याने पूर्णतेस नेले आहेत शिवाय यास राज्यक्रांतीच्या उपकथानकाची जोडही दिली आहे. पण मृच्छकटिकाचा संदर्भ या ठिकाणी गैरलागू आहे. भासाची मूळ योजना काय होती, या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे.

(४) आता पुढील घटनांविषयी तर्क करायचा म्हटले तर तो असा करता येईल : चौथ्या अंकात सूचित केल्याप्रमाणे वसंतसेना भर पावसात त्याला भेटायला गेली असावी. त्याच्या घराकडून परत येताना वाहनांची अदलाबदल होऊन ती शकाराच्या तावडीत सापडली असावी. ती आपल्याला वश होत नाही असे पाहून त्याने तिला ठार माण्याचा प्रयत्न केला असावा. पण शकाराने तिच्या हत्येचा आळ चारुदत्तावर घातला असावा. पण नायिकेने आयत्या वेळी न्यायालयात उपस्थित होऊन चारुदत्ताची सुटका केली असावी. म्हणजे हे तीनही अपुरे राहिलेले धागे पूर्ततेस जातात. यात एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे व ती म्हणजे सदर नाटकात राज्यक्रांतीचे उपकथानक नसावे. याचे 'नाटक' हे स्वरूप मानले तर याचे जास्तीत जास्त सात अंक असावेत. अर्थात हा निव्वळ तर्क आहे. खरी वस्तुस्थिती अजून तरी अज्ञात आहे.

(५) उपलब्ध 'चारुदत्त' नाटकाची संहिता असमाधानकारक आहे. नाटकात प्रारंभीचा श्लोक नाही. विशेष म्हणजे सूत्रधार हा प्राकृतात बोलतो. दुसऱ्या अंकात एकही श्लोक नाही. यावरून मुळातील नाटकाची काटछाट करून ही संहिता बनलेली असावी अशी शंका आहे.

* * *

भासाच्या या तेरा नाटकांचे एकत्रित समालोचन करण्यापूर्वी त्याच्या नावावर मोडणाऱ्या 'यज्ञफल' या नाटकावर एक नजर टाकणे इष्ट ठरेल. हे नाटक गोंडल रसशाळेचे राजवैद्य श्री. जीवराम कालिदास शास्त्री यांनी इ.स. १९४१ मध्ये प्रकाशित केले. त्याच्या प्रस्तावनेत त्यांनी या नाटकाचे हस्तलिखित कसे प्राप्त

झाले याची हकीकत दिली आहे. यातील दुर्बोध स्थळावर अलमोरा येथील श्री. गोपालदत्त शास्त्री यांनी संस्कृत टिप्पणी लिहिली असून ती सदर प्रतीत समाविष्ट केली आहे. सदर प्रत दुर्लक्ष झाल्यामुळे कृष्णदास अकादमी, वाराणसीने इ.स. १९८८ मध्ये हिचे पुनर्मुद्रण केले. डॉ. सुधाकर मालवीय यांनी या प्रतीचे संपादन केले आहे.

हे नाटक रामायण कथेवर आधारले असून यात सात अंक आहेत. नाटकाचा प्रारंभ 'नान्द्यन्ते ततः प्रविशति सूत्रधारः।' या सूचनेने झालेला आहे. त्याच्यानंतरच्या श्लोकात राम, भरत, लक्ष्मण व शत्रुघ्न या चार भावांची नावे श्लेषाने गुंफून मुद्रालंकार योजला आहे. प्रस्तावनेत नाटकाचे अगर नाटककाराचे नाव दिलेले नाही. प्रस्तावनेच्या ऐवजी 'स्थापना' असा शब्द घातलेला आहे. नाटकाच्या अखेरीस 'भरतवाक्या'मध्ये 'राजसिंहा'चा उल्लेख आहे. भासाच्या नाटकात आढळणारी सारी वैशिष्ट्ये यातही असल्याने सकृतदर्शनी तरी हे नाटक भासाने रचले असावे असे वाटते.

परंतु प्रत्यक्ष नाटक वाचू लागताच भ्रमनिरास होऊ लागतो. नाटकातील प्रसंग, पात्रांनी व्यक्त केलेले विचार पाहिले तर अर्वाचीन काळातील लेखकाने याची रचना करुन ती भासाच्या नावावर खपविली असावी अशी शंका येते. स्वतः डॉ. मालवीय यांनी ही शंका व्यक्त केली आहे. ते प्रस्तावनेत लिहितात, 'किंतु इसमें बहुतसी नवीन बातें हैं जो भासके समयमें नही थीं। .. अतः सम्भव है की 'यज्ञ फल' भासके नाटकोंके अनुकरणपर किसी अन्य परवर्ती नाटककारकी रचना हो।' (यज्ञफल-प्रस्ता.पृष्ठ १)

तथापि डॉ. अ.द. पुसाळकर; श्री. ए. एस. पी. अय्यर, डॉ. गो.के. भट यांनी त्याचा अभ्यास करून ते नाटक भासाचेच आहे असा निष्कर्ष काढला आहे. डॉ. भटांना याची रचना कौशल्यपूर्ण वाटली नसल्याने त्यांनी हे नाटक भासाच्या आरंभाच्या कालखंडातील असावे असे म्हटले आहे तर डॉ. पुसाळकरांना हे भासाच्या परिणतप्रज्ञेचे फळ वाटते. असो.

खरी मौज यानंतर आहे. डॉ. पुसाळकरांचा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर लवकरच म्ह. इ.स. १९४२ मध्ये पं. गोपालदत्त शास्त्रींनी सदर नाटक आपण रचल्याचा गौप्यस्फोट केला. हे नाटक आपण रचल्याच्या तीन खुणा (Keys) ही त्यांनी सांगितल्या त्या याप्रमाणे -

(१) नाटकाला जीवराम कालिदास शास्त्री यांची संस्कृत प्रस्तावना जोडली आहे, त्यातील पहिल्या एकोणीस वाक्यातील प्रत्येकी आठवे अक्षर घेत गे ल्यास 'बलात ग्रंथ लेकर उपोद्घातभी मेरेसेही लिखाया।' असे हिंदी वाक्य तयार होते.

(२) नाटकाच्या पहिल्या अंकातील अठ्ठाविसाव्या श्लोकातील तिसऱ्या व चौथ्या चरणातील पाचवे अक्षर घेत गेले तर 'गोपालस्य' असा शब्द तयार होतो.

(३) दुसऱ्या अंकातील पहिले पाच श्लोक घेऊन प्रत्येक श्लोकाच्या पहिल्या चरणाचे आठवे अक्षर घेत गेले तर 'भा सा नु का रि' असा शब्द तयार होतो.

डॉ. रा. ना. दांडेकरांनी या खुणा पुस्तकाशी ताडून पाहिल्या. त्या तशा आढळल्या तरी त्यांना त्यात काही तथ्य वाटले नाही. डॉ. पुसाळकरांनी याची शहानिशा करण्याचे ठरविले. पण दरम्यान गोपलदत्त शास्त्रीचे निधन झाल्याने प्रश्न तसाच राहिला.

आता प्रत्यक्ष नाटकाकडे वळू. यात रामाच्या जन्मापासून सीतास्वयंवरापर्यंतचा कथाभाग आहे. दुसऱ्या अंकात राज्य कोणाला द्यावयाचे याविषयी चर्चा आहे. एक तर ती चर्चा कथावस्तूच्या दृष्टीने निरुपयोगी आहे. शिवाय ती पोरकटही आहे. तेव्हा हा प्रसंग जरी विचारात घेतला तरी ही भासाची रचना नसावी असे वाटू लागते. प्रारंभी दशरथ म्हणतो - "चारी राजकुमार मोठे झाले आहेत. तेव्हा राज्याचे चार भाग करून एकेक भाग प्रत्येकाला देण्यात यावा." असली भिकार कल्पना दशरथाच्या तोंडी घालून लेखकाने स्वत:चे हसू करून घेतले आहे. कौसल्येला सारे राज्य रामालाच मिळावे असे वाटते. तर सुमित्रा सांगते की राम व भरत या दोघांना अर्धे अर्धे राज्य देण्यात यावे. तर कैकेयी 'ते राज्य रामाला देण्यात यावे. आपण मला पूर्वी दिलेले वचन मोडण्यास हरकत नाही.' असे दशरथास स्पष्ट सांगते. एवढ्यानेच भागले नाही म्हणून राण्या निघून गेल्यावर राजा विदूषकाला म्हणतो - "अरे कुमार हे अजून लहान आहेत व राजकारण हे अनर्थांनी भरलेले असते. तेव्हा मी हे सारे थट्टेत बोललो आहे. ते तू खरे समजू नकोस." (अंक १ श्लोक ४१) असे म्हणताना या श्लोकात शेवटचे दोन चरण 'परिहासविजल्पितं त्विदं परमार्थं न हि मन्यतां वच:।' धडधडीत शाकुंतलातील उचलले आहेत.

श्री. गोपालदत्त शास्त्रींच्या या वाङ्मयीन भामटेगिरीचा म.म. डॉ. वा. वि. मिराशी यांनी खरपूस समाचार घेतलेला आहे. हे एकच पुस्तक बनावट नाही तर राजवैद्य कालिदास शास्त्री यांनी ७४५ श्लोकांची भगवद्‌गीता, समुद्रगुप्ताचे 'कृष्णचरित', पूर्वपाणिनीयम् नामक २४ सूत्रांचा ग्रंथ. अशी तीन पुस्तके १९४१ मध्ये प्रकाशित केली व ती विवाद्य ठरली. याची अधिक माहिती घेण्यासाठी जिज्ञासूंनी संशोधन मुक्तावली - सर दोनमधील 'यज्ञफल नाटकाची समस्या' हा त्यांचा लेख पाहावा.

तेव्हा 'यज्ञफल' हे नाटक भासाचे नव्हे, हे सांगण्याची गरज नाही पण या निमित्ताने या क्षेत्रातील घातक प्रवृत्तीवर प्रकाश पडला आहे. अशा तऱ्हेने अभ्यासकांची दिशाभूल करून श्री. गोपालदत्त शास्त्रींनी काय मिळवले? संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासात संशोधनास भरपूर वाव आहे. त्यास मदत करण्याऐवजी खो घालण्याची प्रवृत्ती खचितच अनिष्ट आहे. ती नजरेस आणावी एवढाच उद्देश आहे.

* * *

भासाच्या या तेरा नाटकांवर ओझरती नजर टाकली तरी काही गोष्टी सहज ध्यानात येण्यासारख्या आहेत.

(१) भासाची नाट्यसंपदा विपुल व विविध प्रकारची आहे. त्याने आपल्या नाटकांची कथाबीजे रामायण, महाभारत, हरिवंशपुराण, बृहत्कथा, पारंपरिक आख्यायिका व लोककथा यांतून घेतलेली आहेत. नुसत्या 'महाभारता'तील कथाविषयावर त्याने पाच एकांकिका (दूतवाक्य, मध्यम व्यायोग, कर्णभार, दूत-घटोत्कच व ऊरुभंग) व पंचरात्र हे तीन अंकी नाटक रचले आहे. रूपकाच्या दहा प्रकारांपैकी व्यायोग (मध्यम व्यायोग), उत्सृष्टिकांक (ऊरुभंग), समवकार (पंचरात्र) या प्रकारांची त्याने रचना केली आहे.

(२) त्याने कथाबीजे जरी उसनी घेतली असली तरी कथावस्तूत भरपूर स्वातंत्र्य घेतलेले आहे. महाभारतावर आधारलेल्या नाटकांचा विचार केला तर दूतवाक्य, दूत-घटोत्कच किंवा मध्यम व्यायोग ही नाटके स्वतंत्र वाटावीत इतकी नाविन्यपूर्ण आहेत. 'पंचरात्र' नाटकात तर दुर्योधन पांडवांना राज्याचा अर्धा वाटा द्यावयास कबूल होतो असे दाखवून महाभारताचा संदर्भच गुंडाळून टाकलेला आहे. अभिषेक व प्रतिमा या रामायणावर आधारलेल्या नाटकांमध्ये 'अभिषेक' नाटक थोडे फार मुळाला धरून आहे. पण 'प्रतिमा' नाटकात त्याने

अनेक नवे प्रसंग घातले आहेत. मुख्य म्हणजे कथावस्तू भरताभोवती फिरत ठेवून त्यालाच जणू नायकत्व बहाल केले आहे. चारुदत्त व अविमारक ही नाटके लोककथांवर आधारलेली असल्याने तशी स्वतंत्रच मानली पाहिजेत. दुर्योधन, हिडिंबा, कैकेयी व कंस ही पात्रे परिचित असली तरी त्यांच्या स्वभावाचे भासाने दर्शविलेले पैलू चकित करणारे आहेत. कंस हा मृत्यूच्या कल्पनेने पार हादरून गेलेला दाखवला आहे, तर भीमाची भेट घेण्यासाठी हिडिंबेने योजलेली युक्ती मती गुंग करणारी आहे. कैकेयी व दुर्योधन या रूढ अर्थाने दुष्ट मानलेल्या व्यक्तिरेखा भासाने उजळण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यातील 'माणूस' शोधलेला आहे. 'His attempts to probe the deepest recess of passion or to explore the ultimates of human character and conduct.' असे इ.एच.जॉन्स्टन यांनी म्हटले आहे ते अत्यंत समर्पक आहे.

(३) भासाची नाटके वाङ्मयीनदृष्ट्या कमी प्रतीची ठरतील पण नाट्यगुणांच्या दृष्टीने ती संपन्न आहेत. भास जसा प्रतिभापूर्ण नाटककार आहे तसाच तो रंगभूमीचा जाणकार आहे. त्याला 'नाटक' म्हणजे काय हे बरोबर समजले आहे. नाटकाची रंगत वाढविण्यासाठी त्याने अनेक क्लृप्त्या योजलेल्या आहेत. उदा. 'स्वप्नवासवदत्त' नाटकातील द्विकेंद्री प्रवेश. यात एकावेळी रंगभूमीवर दोन दृश्ये दिसतात. 'दूतवाक्य' नाटकात त्याने विष्णूच्या आयुधांचा मनुष्यरूपाने प्रवेश दर्शविला आहे. भासाची ही कल्पना मोठी आकर्षक आहे. तसेच त्या नाटकातील कृष्णाने विश्वरुप धारण केल्याचे दृश्य आहे. बालचरित नाटकात कंसाला भयानक स्वप्न पडल्याचा प्रसंग आहे. त्याच्या नाटकात पताकास्थाने व नाट्यछलिते (Dramatic Irony) आढळतात. यांची उदाहरणे मागे दिलेली आहेत.

(४) रंगभूमीवर कोणत्या गोष्टी दाखवू नयेत याविषयी भरतमुनींनी काही सूचना दिल्या आहेत. जसे - रंगभूमीवर पात्राचे शयन, लढाईचा प्रसंग अथवा पात्राचा मृत्यू दाखवू नये असे त्यांनी म्हटले आहे. पण भासाने या सूचना पार धुडकावल्या आहेत. स्वप्नवासवदत्त नाटकाच्या पाचव्या अंकात उदयन झोपी गेलेला दाखवला आहे. मध्यम व्यायोग या एकांकिकेत भीम व घटोत्कच यांच्यातील मल्लयुद्ध दाखवले आहे. 'बालचरित' नाटकात कृष्ण कंसाला रंगभूमीवरच ठार मारतो. तसेच कंस, दुर्योधन व दशरथ यांचे रंगभूमीवर मृत्यू दर्शविले आहेत. विशेष म्हणजे या सूचना डावलल्यामुळे नाटकांची रंगत कमी न होता वाढलेली आहे.

(५) भासाची नाटके जी रंगभूमीवर गाजली ती त्याच्या भाषाशैलीमुळे. त्याची भाषा 'प्रसाद' या गुणाने युक्त आहे. म्हणजे ती सहज समजणारी आहे. ती प्रवाही व नाट्यानुकूल आहे. बोलीभाषेला अगदी जवळची आहे. त्याची वाक्ये अगदी छोटी, सरळ व व्याकरणशुद्ध आहेत. पद्यापेक्षा त्याचा गद्यावर भर आहे. 'प्रसादा'प्रमाणे तिच्यात माधुर्य व ओज हेही गुण आहेत. म्हणजे त्याची भाषा मधुर व तेजस्वीही आहे. तिच्यात अपरिचित शब्द, समासांची दाटी, अलंकारांचा सोस अथवा क्लिष्टता औषधालाही सापडणार नाही. प्रसंगपरत्वे त्याने समासप्रचुर रचनाही केलेली आहे. 'प्रतिज्ञा यौगंधरायण'मध्ये प्रद्योताने जे उदयनाचे वर्णन केले आहे ते समासप्रचुरच आहे. तसेच ऊरुभंगात सैनिकांनी जे रणांगणाचे वर्णन केले आहे ते बाणभट्टाच्या शैलीची आठवण करून देणारे आहे. भासाचे गद्य-संवाद कालिदासासारखे ललित व सफाईदार नसले तरी त्यात एक प्रकारचा खटकेबाजपणा आहे हे कबूल केले पाहिजे.

भासाची पद्यरचनाही सुश्लिष्ट व रसाळ आहे. तिच्यावर रामायण व महाभारताची छाप आहे. त्याने अनुष्टुप छंदाची मोठ्या प्रमाणात योजना केली आहे. त्याच्या तेरा नाटकात मिळून एकंदर १०९२ श्लोक आहेत. त्यातील ४३७ श्लोक अनुष्टुप छंदात आहेत. वसंत-तिलका हे वृत्त त्याच्या आवडीचे दिसते. दंडकासारख्या विशाल वृत्ताचा त्याने क्वचित उपयोग केला आहे. उपमा, उत्प्रेक्षा व अर्थांतरन्यास यांसारख्या ठळक अलंकारांची योजना केली आहे. त्याची वर्णनेही नीटनेटकी व आटोपशीर आहेत.

(६) रस परिपोषाच्या दृष्टीने पाहिले तर वीर व करुण या रसांना प्राधान्य मिळालेले दिसून येईल. त्या मानाने शृंगार रसास गौणस्थान मिळाले आहे. रामायण व महाभारत यांवर आधारलेल्या नाटकात शृंगारास मुळीच अवसर नाही. अविमारक, प्रतिज्ञा व स्वप्न नाटकात शृंगार आलेला आहे. 'बालचरिता' मध्ये अद्‌भूत रस आलेला आहे. प्रतिज्ञा, चारुदत्त मध्ये हास्याला अवसर मिळाला आहे. शकाराच्या निमित्ताने त्याने अजब अशी हास्यकारक मूर्ती निर्मिली आहे. या रसांचा त्याने उत्तम परिपोष केला आहे.

# कालिदास

प्राचीन काळापासून कालिदासाची कीर्ती भारतवर्षात दुमदुमत आहे. इ.स. १७८९ मध्ये विल्यम जोन्स यांनी अभिज्ञान शाकुंतलाचे इंग्रजीत भाषांतर केल्यावर तर त्याचे नाव जगभर पसरले. त्याच्या कलाकृती प्रसिद्ध असल्या तरी खुद्द कालिदासाविषयी अधिकृत अशी कोणतीही माहिती उपलब्ध नाही. त्याने आपल्या नाटकांच्या प्रस्तावनेत नावापलीकडे काहीही सांगितलेले नाही.

अशा स्थितीत त्याच्या नावाभोवती दंतकथांचे जाळे पसरल्यास नवल वाटायला नको. दंतकथा या सर्वस्वी खोट्या असतात असे नाही. परंतु त्यावर विसंबून निर्णय घेणे चुकीचे ठरणारे असते. कालिदासाविषयीच्या आख्यायिका मनोरंजक असल्या तरी ऐतिहासिक दृष्ट्या कुचकामाच्या आहेत. त्याचे चरित्र त्याच्या वाङ्मयातच शोधणे अधिक योग्य होईल.

त्याच्या काव्य-नाटकांचा अभ्यास करीत असता त्याच्या भावजीवनाचे रम्य चित्र डोळ्यापुढे उभे राहते. ब्राह्मणधर्माच्या व मोक्षसिद्धांताच्या उल्लेखावरून तो ब्राह्मणकुलात जन्माला आला असावा. तत्कालीन रीती-रिवाजाप्रमाणे त्याने गुरुगृही राहून विद्याभ्यास केला असावा. त्याचा सांख्यवेदांतादी तत्त्वज्ञान, रामायण-महाभारतादी आर्ष महाकाव्ये, भासाची नाटके, अश्वघोषाचे 'बुद्धचरित' हे महाकाव्य तसेच संगीत, चित्रकला वगैरे ललितकलांशी सूक्ष्म परिचय असलेला दिसतो. तो केवळ पंडितच नव्हता तर रसिक कलावंत होता. त्याच्या आयुष्यातील बराच काळ राजदरबारी गेलेला दिसतो.

उज्जयिनी हे त्याचे निवासस्थान असावे, असे मेघदूतात आलेल्या उज्जयिनीच्या वर्णनावरून वाटते. तो उज्जयिनीचा रहिवासी असला तरी त्याने प्रसंगवशात पूर्ण भारताचा प्रवास केलेला दिसतो. त्याने केलेल्या कोणत्याही प्रदेशाच्या वर्णनात नेमकेपणा व सूक्ष्म-निरीक्षण आढळते. रघुवंशाच्या तेराव्या सर्गातील दक्षिण भारताचे वर्णन अत्यंत वाचनीय आहे. मेघदूतात आलेले रामगिरीपासून थेट अलकानगरीपर्यंतचे वर्णन काव्यमय असूनही बिनचूक आहे.

त्याच्या कौटुंबिक जीवनाबद्दल अंदाज करणे थोडे कठीण आहे. दंतकथांमधून त्याच्या रंगेलपणाचा बराच गवगवा झालेला आहे. पण त्यास फारच थोडा आधार असला पाहिजे. तो शृंगारप्रिय व रसिक असला तरी त्याचे स्त्रीविषयक विचार अत्यंत उदात्त आहेत. कौटुंबिक जीवन सुखी होण्यासाठी पति-पत्नीने एकमेकांच्या इच्छेस मान दिला पाहिजे, असे तो सांगतो. रघुवंशातील अजराजा आपल्या पत्नीस गृहिणी, सल्लागार, एकांतातील मैत्रीण व ललितकलांमधील प्रिय अशी विद्यार्थिनी समजतो. त्याने पार्वती, सीता, सुदक्षिणा, इंदुमती, उर्वशी, शकुंतला व मेघदूतातील यक्षपत्नी यांची उत्कृष्ट चित्रे रेखाटली आहेत.

त्याच्या स्वभावातील वर उल्लेखिलेला पैलू लक्षात घ्यावयास हवा. त्याला शृंगार हा रस अत्यंत प्रिय आहे. त्यामुळे त्याने आपल्या काव्य-नाटकातून शृंगाराची लयलूट केली आहे. नाटकापेक्षा काव्यातून शृंगारवर्णनास अधिक अवकाश मिळालेला आहे. मेघदूतात सर्वत्र शृंगारिक उपमानांचा शिडकावा आहे. स्वत: यक्ष हा बोलून चालून तरुण, अत्यंत विलासी, तशात पत्नीपासून दूर राहावे लागत असल्याने स्त्री-सहवासास अत्यंत आसुसलेला आहे. त्यामुळे त्याला सृष्टीत सगळीकडे शृंगारिक दृश्ये दिसतील यात नवल काय?

कुमारसंभवाच्या तिसऱ्या सर्गात शंकरास काममोहित करण्यासाठी मदन रतीसह हिमालयावर येतो, तेव्हा सारा आसमंत आनंदाने फुलतो. झाडे, वेली, पशु, पक्षी, किन्नर-मिथून वगैरे कसे काम-मोहित होऊन गेले याचे कवीने मनोवेधक चित्रण केले आहे. रघुवंशाच्या कथावस्तूत शृंगारवर्णनास फारसा अवसर नसला तरीदेखील त्याने रघूच्या दिग्विजय-वर्णनात मलय व दर्दुर पर्वतास पृथ्वीच्या स्तनांची व सह्य पर्वतास तिच्या नितंबाची उपमा दिली आहे. एकोणिसाव्या सर्गात अग्निवर्ण राजाचे अनिर्बंध रति-विलास वर्णिलेले आहेत.

शृंगार जरी त्यास प्रिय असला व त्याने काव्य-नाटकातून त्याची उधळमाधळ केली असली तरी त्याचे प्रत्यक्ष जीवन भोगासक्तीने डागळले होते, असे मानणे

योग्य होणार नाही. दंतकथातून त्याची भोगलंपटता अथवा वेश्यानुरक्ती आढळली तरी त्यात सत्याचा अंश फारच थोडा आहे. त्याची स्त्रीसौंदर्याकडे पाहण्याची दृष्टी अभिजात रसिकाची आहे.

स्त्रीप्रेमाप्रमाणे अपत्याविषयी असणारी अनिवार ओढ हा त्याच्या स्वभावात असलेला आणखी एक विशेष आहे. रघुवंशातील दिलीप, दशरथ व शाकुंतलातील दुष्यंत हे राजे सुरुवातीस तरी निपुत्रिक आहेत. मेघदूतातील यक्षासही अपत्य झालेले दिसत नाही. 'कुमारसंभवा'चा विषयच मुळी अपत्यप्राप्ती हा आहे. अपत्यहीनतेचे शल्य स्त्रीपुरुषास कसे बोचत असते हे त्याने शाकुंतलाच्या सहाव्या अंकात दर्शविले आहे. पुढे सातव्या अंकात सहा वर्षांच्या बालकास पाहून दुष्यंत गहिवरतो व त्याच्या मुखातून 'धन्यास्तदङ्गरजसा मलिनी भवन्ति' (अभि. ७.१७) असे उद्‍गार निघतात. विक्रमोर्वशीयातील उर्वशीला आपल्या अपत्याच्या दर्शनाने एकदम पान्हाच फुटतो. यावरून कालिदासाला अपत्य नव्हते की काय अशी शंका येते.

पुत्रप्रेमाप्रमाणे त्याने मित्रप्रेमाचाही गौरव केला आहे. 'कुमारा'च्या चौथ्या सर्गात रती, मदन व वसंतऋतू यांच्यातील गाढ मैत्रीचा निर्देश करीत म्हणते - "अरे मदना, तुझा हा मित्र माधव (म्ह. वसंत) तुझ्या दर्शनासाठी अत्यंत उत्सुक झाला आहे. तरी तू प्रकट होऊन त्याला दर्शन दे. पुरुषांचे स्त्रियावरील प्रेम चंचल असले तरी मित्रावरील प्रेम स्थिर असते." (कुमार. ४.२८)

कौटुंबिक प्रेमाप्रमाणेच त्याचे निसर्गावरील प्रेमही लक्षात घेण्यासारखे आहे. निसर्गावर प्रेम करणे म्हणजे त्याचे तपशीलवार अथवा सूक्ष्म वर्णन करणे नव्हे. त्याची वर्णने बिनचूक तर आहेतच पण कालिदासाच्या काव्य नाटकात निसर्ग हा नायक-नायिकांचा मित्र म्हणून अवतरतो. त्याची शकुंतला ही तर निसर्गकन्याच आहे. ती निसर्गातच वाढलेली आहे. वृक्ष-वेलींवर तिचे जिवापाड प्रेम आहे. म्हणूनच ती सासरी जावयास निघाली असता त्या तिला अलंकार प्रदान करतात. मेघदूतातील यक्षाची तसेच 'कुमारा'तील पार्वतीची विरह-व्याकूळ अवस्था पाहून वेली अश्रू ढाळतात. त्याचे निसर्गवर्णन हे केवळ वर्णन म्हणून येत नाही तर पात्रांच्या मनातील विकारांचे त्यात प्रतिबिंब उमटलेले असते. मदन हिमालयावर येताच वेलींनी वृक्षांना आलिंगन दिले. रमणीच्या लत्ताप्रहारावाचूनच अशोकावर फुले उमलली. आम्रवृक्षावर नवमंजरी फुलल्या असे तो सांगतो. मानवी भाव-भावना निसर्गदृश्यावर संक्रांत करण्याची त्याची हातोटी प्रशंसनीय आहे.

कालिदासाच्या स्वभावात एक प्रकारची प्रसन्नता आहे. तो विद्वान व व्यासंगी असला तरी नम्र व शालीन आहे. अगदी परिणतप्रज्ञ झाल्यानंतर लिहिलेल्या शाकुंतलाच्या प्रस्तावनेत व रघुवंशाच्या प्रारंभी त्याने लीनता व्यक्त केली आहे. त्याची विनोदी वृत्ती तर हरघडी प्रत्ययाला येते. त्याच्या नाटकातील विदूषक हसवतील यात विशेष नाही. परंतु त्याचा विनोद हा विदूषकापुरता मर्यादित नाही. शकुंतलेच्या अनसूया व प्रियंवदा या दोन्ही सख्या विनोदी आहेत. मालविकेची बकुलावलिका ही सखी चांगलीच खटचाळ आहे. विक्रमोर्वशीयातील माणवक हा विदूषक स्वत:च्या खादाडपणावर टीका करतो. 'शाकुंतला'तील कोळी व शिपाई यांचा संवाद नुसताच विनोदीं नाही तर मानवी प्रवृत्तींवर प्रकाश टाकणारा आहे. अग्निमित्राची तरुण राणी इरावती राजाने अपराध केल्यावर चिडून जे उद्गार काढते त्यात अश्लीलतेची छटा असली तरी प्रेक्षकांस हसू लोटते. त्याचा गौतम हा विदूषक सर्वात विनोदी आहे. त्याने अग्निमित्राच्या लंपट वृत्तीवर मारलेले शेरे हे विधायक टीकेचे नमुने आहेत.

काव्यामध्ये विनोदास फारसा अवसर सापडत नाही. मेघदूतात विनोद अथवा विनोदी प्रसंग आढळत नाही. 'कुमारा'तील पार्वतीच्या मैत्रिणी विनोदी आहेत. त्या पार्वतीची थट्टा करतात. पाचव्या सर्गात बटुवेषधारी शंकर स्वत:ची थट्टा करतो. रघुवंशाच्या सहाव्या सर्गात इंदुमतीला नाना प्रांतातून आलेल्या राजांचा परिचय करून देणारी सुनंदा चांगलीच विनोदी आहे. त्याच सर्गात इंदुमतीला पाहून राजे लोकांनी केलेले शृंगार-सूचक चाळे थोडी हीन अभिरुची दर्शवित असले तरी मनोरंजक आहेत.

कालिदासाची वृत्ती सौम्य व शांत आहे. त्याचे जीवन सुबत्तेत गेलेले आहे. राजाश्रय असल्याने त्याची वृत्ती सुखलोलुप व ऐषारामी बनलेली आहे. कौटुंबिक ताणतणाव, आप्तजनांनी केलेली उपेक्षा अथवा समकालीनानी केलेली निंदा-नालस्ती त्याच्या वाट्यास आलेली नाही. त्याची भाषाशैली कोमल, प्रसादगुणाने युक्त, रसाळ व अर्थवाही आहे. त्यावरून त्याच्या आयुष्याचा बराच काळ सुखासमाधानात व शांततेत गेला असावा, असा तर्क होतो.

त्यामुळेच त्याच्या वाङ्मयात दैन्य, दारिद्र्य, दैवाचे क्रूर खेळ, निसर्गाचे रौद्र भीषण स्वरूप, कपटी राजकारण अथवा अत्याचार हे विषय आलेले नाहीत. त्याच्या भाषेतही उत्कटता व भव्यता कमी आहे. रौद्र आणि भयानक रसांचा

तर मागमूसही नाही. भवभूतीप्रमाणे त्याच्या शैलीत बेहोशी अथवा मानवी मनाचा तळ गाठण्याचे सामर्थ्य नाही. त्याने केलेली युद्धाची वर्णनेही प्रभावी वाटत नाहीत. अर्थात हे त्याचे दोष नाहीत.

सारांश, कालिदासाच्या व्यक्तिमत्त्वात विद्वत्ता, सहृदयता, कवित्व, रसिकत्व, प्रसन्नता व विनोदी वृत्ती या दुर्मिळ गुणांचा मनोहर संगम झालेला आहे. तो जसा महाकवी आहे तसाच कुशल नाटककारही आहे. कालिदासाइतकी कीर्ती कोणत्याही संस्कृत कवीला अगर नाटककारालाही लाभलेली नाही. भारताचा 'शेक्सपिअर' म्हणून त्याचा उल्लेख करायला हरकत नाही.

* * *

शेक्सपिअरप्रमाणेच कालिदासाची प्रतिभा ही स्थळाकाळांना ओलांडून जाणारी आहे. त्याच्या वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्यांना तो कोणत्या शतकात होऊन गेला अगर तो कोणत्या प्रांताचा रहिवासी होता याची चौकशी करण्याची यत्किंचितही जरुरी पडत नाही. याचा अर्थ त्याची जरुरी असत नाही असा नाही. कलाकृतीचे मर्म समजण्यासाठी या गोष्टींची आवश्यकता असते. कवी कितीही मोठा असला तरी ज्या काळात तो जन्माला आला, ज्या प्रदेशात व वातावरणात लहानाचा मोठा झाला त्या परिसराचा, संस्कृतीचा त्याच्यावर परिणाम झाल्यावाचून राहात नाही. त्यांच्या खुणा न कळत वाङ्मयातही प्रकट होतात.

कालिदासाचा कालनिर्णय ही संस्कृत वाङमयाच्या इतिहासातील अत्यंत जटिल समस्या आहे. सुदैवाने बरीच मतमतांतरे आता कमी झालेली आहेत. दुसरे असे की कालिदास हे नाव धारण करणारे अनेक कवी असणे शक्य आहे. राजशेखराने 'कालिदासत्रयी' चा उल्लेख केलेला आहे. ऑफ्रेट या संशोधकाने 'कालिदास' हे नाव असलेल्या सहा लेखकांचा उल्लेख केला आहे.

काही स्थूल पुराव्यांच्या आधारे आपण त्याची कालमर्यादा निर्धारित करू शकतो. 'मालविकाग्निमित्र' हे नाटक शुंग राजाच्या इतिहासावर आधारलेले आहे. नाटकाचा नायक अग्निमित्र हा शुंग घराण्याची स्थापना करणाऱ्या सेनापती पुष्यमित्राचा मुलगा आहे. शुंग घराणे इ.स.पूर्व १४० च्या सुमारास अस्तित्वात आले ही कालिदासाच्या काळाची पूर्वमर्यादा ठरते.

बाणभट्टाने (इ.स.६३०) आपल्या 'हर्षचरिता'च्या प्रस्तावनेत कालिदासाचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. तसेच ऐहोळे येथे असलेल्या एका शिलालेखात कालिदास व भारवी या दोघांचा उल्लेख आहे. या लेखाची मिती शक-संवत ५४६ (इ.स.६३४) ही आहे. यावरून कालिदासाच्या काळाची उत्तर मर्यादा ही इसवी सनाचे सातवे शतक ही ठरते. या दोन काळाच्या दरम्यान तो होऊन गेला हे निश्चित आहे. विद्वानांनी या बाबतीत अनेक उपपत्ती सुचवलेल्या आहेत. सध्या दोनच उपपत्ती शिल्लक राहिल्या आहेत. त्यांचा आता विचार करू.

पारंपरिक मतानुसार कालिदास हा 'विक्रम संवत' सुरू करणाऱ्या विक्रमादित्याच्या (इ.स.पूर्व ५६) दरबारात राजकवी होता. त्यावरून कालिदास हा इसवी पूर्व पहिल्या शतकात होऊन गेला असे ठरते. या मताचे प्रमुख पुरावे याप्रमाणे आहेत.

(१) 'प्रबंध' चिंतामणीकार मेघतुंग याच्या सांगण्यावरून गर्दभिल्लाचा पुत्र विक्रमादित्य याने आपल्या नावाने संवत चालू केला. याने शकांचा नाश केल्याने याला 'शकाराति' असे संबोधण्यात येते. कालिदास हा त्याच्या पदरी असल्याने तो इ.स.पूर्व पहिल्या शतकात होऊन गेला.

पण कालिदास विक्रमादित्याच्या पदरी होता यास आधार काय असा प्रश्न पडतो. एक तर कालिदास हा विक्रमादित्याच्या दरबारात होता अशी फार जुनी समजूत आहे व दुसरे असे की, कालिदासाने विक्रमादित्य व त्याचा पिता महेंद्र यांचा श्लेषालंकार योजून उल्लेख केला आहे. पुरुवा व उर्वशी यांची कथा असलेल्या नाटकास त्याने 'विक्रमोर्वशीय' असे नाव दिले आहे. त्या नाटकात 'अनुत्सेक खलु विक्रमालङ्कार' असा पुन्हा विक्रमादित्याचा श्लेषाने उल्लेख आढळतो.

(२) कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र' शुंग घराण्यातील पिता-पुत्रावर आधारले आहे, हे वर दर्शविले आहे. पण कालिदासाला शुंग घराण्यातील व्यक्तींची व घटनांची बारीक सारीक माहिती होती. प्रेक्षकांनाही ती माहिती असल्याने त्याने त्यांचा खुलासा केला नाही. उदा. थोरल्या राणीचा भाऊ वीरसेन हा खालच्या जातीचा आहे. तसेच पुष्यमित्राने अग्निमित्रास पाठवलेल्या पत्रात 'मनातील राग टाकून यज्ञाला उपस्थित राहण्यास' सांगितले आहे. त्या रागाचे कारण कोणते ते सांगितले नाही. तेव्हा तो शुंगकाळानंतर लागलीच होऊन गेला हे उघड आहे.

(३) कालिदासाने भासाचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे. भासाचा काळ श्री. गणपतिशास्त्री वगैरेनी इ.स.पूर्व चौथे शतक असा ठरवला आहे. कालिदास त्याच्यानंतर एक-दोन शतकांनी झाला असे म्हटले तरी वर निश्चित केलेल्या काळास अडचण येत नाही.

(४) प्रख्यात बौद्ध कवी अश्वघोष हा कनिष्काच्या दरबारात होता. (इ.स.७८) त्याच्या काव्याचे कालिदासाच्या काव्याशी आश्चर्य वाटायला लावणारे साम्य आहे. प्रो. नंदर्गीकरांनी दोघांतील साम्यस्थळांची लांबलचक सूची तयार केली आहे. अश्वघोष हा सामान्य कवी असल्याने त्यानेच कालिदासाच्या कल्पनांची उसनवारी केली असावी. तेव्हा कालिदास हा अश्वघोषापूर्वी म्हणजेच इ.स.पूर्व पहिल्या शतकात होऊन गेला.

(५) रघुवंशामध्ये आलेल्या 'अथोरगाख्यस्य पुरस्य' (रघु. ६.५९) या श्लोकात उरगाख्यपुराचा उल्लेख आहे. भारताचार्य चिं.वि.वैद्यांच्या मते उरगपूर म्हणजे उरैयूर होय. ही तेव्हा पांड्यांची राजधानी असली पाहिजे. पुढे तिसऱ्या शतकात मदुरा ही राजधानी झाली. त्यावरूनही कालिदास या काळाच्या पूर्वी होऊन गेल्याचे दिसते.

कालिदासाच्या साहित्यात अनेक अपाणिनीय रूपे आढळतात. त्याने बऱ्याच जुन्या चालींचे उल्लेख केले आहेत. उदा. 'विक्रमोर्वशीय' नाटकात राणीने चंद्राची पूजा केली आहे, राजाच्या अंगरक्षिका यवनी (म्ह. ग्रीक स्त्रिया) आहेत. शाकुंतलात वैखानस व्रताचा उल्लेख आहे. तसेच निपुत्रिकाची संपत्ती जप्त करण्याच्या कायद्याचा उल्लेख आहे. या साऱ्या गोष्टी कालिदासाची प्राचीनता दर्शवितात. ही उपपत्ती अत्यंत महत्त्वाची असून श्री. गणपति शास्त्री, भारताचार्य चिं.वि.वैद्य, प्रो. शि.म.परांजपे, श्री. अ.ज. करंदीकर, डॉ. गो. के. भट, प्राचार्य र. दा. करमरकर इत्यादी विद्वानांनी यास जोरदार पाठिंबा दिला आहे.

दुसऱ्या उपपत्तीनुसार कालिदास हा प्रसिद्ध गुप्त सम्राट द्वितीय चंद्रगुप्त ऊर्फ विक्रमादित्याच्या (इ.स.३८० ते ४१४) दरबारात होता. हीही मतप्रणाली अत्यंत महत्त्वाची आहे. या मताचे काही आधार खाली दिले आहेत -

(१) कालिदासाने मेघदूताची रचना इ.स. ४०० च्या सुमारास केली या निमित्ताने 'दूतकाव्य' हा एक नवा प्रकार उदयाला आला. यानंतर शंभर दीडशे वर्षात पवनदूत, चक्रवाक दूत अशी अनेक काव्ये निर्माण झाली. इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेलेल्या भामहाने या प्रकारावर टीका केली आहे.

सांगण्याचा मुद्दा असा की अनुकरणाची लाट ही पाच पन्नास वर्षात येत असते. त्यामुळे कालिदास इसवी सनाच्या चौथ्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला असे म्हणता येईल.

(२) वात्स्यायन हा 'कामसूत्र' या ग्रंथाचा कर्ता इ.स. ३०० च्या सुमारास होऊन गेला. 'कुमारसंभवा'त झालेली एक लहानशी चूक कामशास्त्रातील वर्णन वाचल्यावर कालिदासाच्या लक्षात आली. रघुवंशात तशा प्रकारच्या वर्णनप्रसंगी त्याने ती चूक दुरुस्त केली. यावरून कालिदास हा वात्स्यायनाच्या काळानंतर म्हणजे इ.स. ३०० नंतर होऊन गेला असे म्हणता येईल.

(३) वाकाटक नृपती प्रवरसेन याने रचलेले 'सेतुबन्ध' हे काव्य कालिदासाने रचले, अशी वदंता आहे. या काव्याचा टीकाकार रामदास याने ही आख्यायिका दिली आहे. हे काव्य कालिदासाने रचले नसले तरी ते रचण्यात त्याने प्रवरसेनाला मदत केली असावी. यावरून कालिदास व प्रवरसेन हे समकालीन असावेत असे म्हणता येते. प्रवरसेन हा पाचव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. कालिदास हा त्याचा ज्येष्ठ समकालीन मानला तर तो चौथ्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला असे म्हणता येते.

(४) चंद्रगुप्ताचा वडीलभाऊ रामगुप्त याच्या पत्नीची म्हणजे ध्रुवस्वामिनीची चंद्रगुप्ताने शत्रूच्या तावडीतून सुटका केली. ह्या प्रसंगाची जणू आठवण कालिदासाने आपल्या विक्रमोर्वशीय नाटकात करून दिली आहे. त्यात पुरुरवा हा राजा उर्वशीची केशी दैत्याच्या तावडीतून सुटका करतो असा प्रसंग घातलेला आहे. नाटकात उर्वशी जशी नायकावर अनुरक्त होते तशी ध्रुवस्वामिनीही चंद्रगुप्तावर अनुरक्त होऊन पुढे त्याची राणी बनली हा इतिहास आहे. यावरून कालिदास हा गुप्तकालात होऊन गेला असे स्पष्ट म्हणता येईल.

(५) क्षेमेंद्राच्या औचित्यविचारचर्चेत 'असफल हसितत्वात्' इत्यादी श्लोक उद्धृत केला असून तो कालिदासाच्या 'कुंतलेश्वर दौत्य' या ग्रंथातील आहे असे क्षेमेंद्राने म्हटले आहे. हे पुस्तक आज उपलब्ध नाही. यातील कुंतलेश म्हणजे प्रवरसेन असावा असे मानले जात असे. पण ते बरोबर नसून कुंतलेश म्हणजे राष्ट्रकुटांचा मूळपुरुष मानांक हा होय, असे म.म.मिराशींनी म्हटले आहे. यावरूनही कालिदास हा गुप्तकाळात होऊन गेला असे म्हणता येते.

या दोन्ही उपपत्त्या आपापल्या परीने तुल्यबळ आहेत. दोन्हीच्या समर्थकांनी प्रतिपक्षाच्या मतावर आक्षेप काढले आहेत. आपल्या मतावर घेण्यात येणाऱ्या

आक्षेपांना उत्तरे दिली आहेत. म.म.डॉ. वा. वि. मिराशी, श्री. अ.ज. करंदीकर, प्रा. कृ. मो. शेंबवणेकर यांनी या वादात हिरीरीने भाग घेतला आहे. प्राचार्य करमरकरांनी तर शुंगकाळात एक व गुप्तकाळात एक असे दोन कालिदास होऊन गेले असावेत असे म्हटले आहे. या संदर्भात डॉ. रवींद्रनाथ खेदाने लिहितात -

"हायरे कबे केटे गेछे, कालिदासेर काल
पंडितेरा विवाद करे लये तारिख साल
हारिये गेछे से - सब अब्द
इति वृत्त आछे स्तब्ध
गेछे यदि आपद गेछे, मिथ्या कोलाहल"

(सेकाल मधून)

दोन्ही उपपत्त्या वाचकांसमोर ठेवलेल्या आहेत. तथापि कालिदास हा गुप्तकाळात होऊन गेला असावा, असे मला वाटते. या बाबतीत माझे निष्कर्ष पुढे दिले आहेत -

(१) कालिदासाचा नामपूर्वक उल्लेख बाणभट्टाच्या श्लोकात व ऐहोळे येथील शिलालेखात केलेला आहे. याच्या पूर्वी त्याचा कोठेही उल्लेख झालेला नाही. तसेच दुसरा उल्लेख भारवीबरोबर आहे. वरील दोन्ही उल्लेख सातव्या शतकातील आहेत. भारवी हा सहाव्या शतकातील कवी आहे. त्यामुळे कालिदास बाणभट्टापूर्वी फार तर दोन शतके अगोदर होऊन गेला असे मानले तर तो चौथ्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला. या मताशी ते जुळणारे आहे.

(२) गुणाढ्याच्या बृहत्कथेनंतर भास व कालिदास होऊन गेले. बृहत्कथेतील कथांचा व रमणीय प्रसंगांचा या दोघांनी उपयोग केलेला आहे. भासदेखील कालिदासापूर्वी एखादे शतक होऊन गेला असावा. कारण कालिदासाच्या काळात भासाची नाटके रंगभूमीवर गाजत होती. बृहत्कथेच्या काळातच हाल सातवाहनाचा 'गाथाकोश' तयार होत असावा. यातील गाथा कालिदासापूर्वी रचण्यात आल्या आहेत.

(३) भासानंतर थोड्याच काळानंतर वात्स्यायनाचे 'कामसूत्र' प्रसिद्ध झाले. या महान ग्रंथाने स्त्री-पुरुषांच्या प्रणयी जीवनाचे दालनच खुले झाले. कालिदासाच्या वाङ्मयात शृंगार रसाची जी लयलूट दिसते, त्याचे हे कारण असावे.

(४) सहाव्या-सातव्या शतकात होऊन गेलेल्या भारवी-माघांची महाकाव्ये तसेच विशाखदत्त, श्रीहर्ष, शूद्रक, भवभूती व भट्ट नारायण यांची नाटके यांच्याशी कालिदासाच्या महाकाव्यांची व नाटकांची तुलना केली तर त्यामध्ये सहा-सातशे वर्षांचे अंतर असेल असे मुळीच वाटत नाही. माझ्या मते हा वाङ्मयीन पुरावा अधिक महत्त्वाचा आहे.

यास्तव कालिदास हा इसवीसन पूर्व पहिल्या शतकात होऊन गेला नसून तो इसवी सनाच्या चौथ्या शतकाअखेरी होऊन गेला असावा असे माझे तरी मत आहे.

## १. मालविकाग्निमित्र

हे नाटक ऐतिहासिक प्रसंगावर आधारले असल्याने तसेच नाटक सुरू होण्यापूर्वी महत्त्वाच्या घटना घडलेल्या असल्याने पूर्वसूत्र लक्षात घ्यावयास हवे. शुंग घराण्याचा संस्थापक सेनापती पुष्यमित्र हा पाटलीपुत्र येथे राज्य करीत असता त्याचा मुलगा अग्निमित्र हा विदिशा येथे राहून कारभार पाहात होता. त्यास धारिणी ही थोरली व इरावती ही धाकटी अशा दोन राण्या होत्या. धारिणीचा मुलगा वसुमित्र हा पुष्यमित्राने अश्वमेध यागाप्रीत्यर्थ सोडलेल्या यज्ञीय अश्वाचे रक्षण करण्यास गेला होता.

शेजारच्या विदर्भराज्यात यज्ञसेन व माधवसेन या चुलत भावात राज्याच्या वाटणीबाबत तंटा चालला होता. यापैकी माधवसेन हा आपल्या बहिणीस मालविकेस-अग्निमित्राला देणार होता. त्यामुळे अग्निमित्राचाही त्याच्याकडे ओढा होता. दरम्यान यज्ञसेनाने माधवसेनावर हल्ला करून त्यास तुरुंगात टाकले. तेव्हा माधवसेनाचा मंत्री असलेल्या सुमतीने मालविका व आपली बहीण कौशिकी यांना विंध्य पर्वतातील चोरवाटेने विदिशेला पोहोचते करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे ते प्रवास करीत असता त्यांच्यावर हल्ला झाला व त्यात सुमती हा मंत्री ठार झाला. मालविका ही अग्निमित्राचा मेहुणा वीरसेन याच्या हाती लागली. त्याने तिला आपल्या बहिणीकडे म्हणजे धारिणीकडे पाठवून दिले. सुमतीची बहीण कौशिकी ही संन्यासिनी बनून धारिणीच्या अंत:पुरात आली.

माधवसेनाची सुटका करण्यासाठी अग्निमित्राने यज्ञसेनास खलिता पाठविलेला आहे. इकडे मालविका नृत्याचार्य गणदासाच्या हाताखाली नृत्याचे शिक्षण घेत

होती. तसेच इरावतीही हरदत्त या आचार्यांच्याकडून नृत्याचे पाठ घेत होती. एकदा मालविकेची तसवीर राजाच्या नजरेला पडली व त्याला तिचे नावही समजले. या ठिकाणी प्रत्यक्ष नाटकास प्रारंभ झालेला आहे.

आपल्या अष्टरूपांनी जगताला व्यापणाऱ्या भगवान शंकरास नमन करून नाटककाराने नाटकास प्रारंभ केला आहे. नाटकाच्या प्रस्तावनेत त्याने आपले व नाटकाचे फक्त नाव सांगितले आहे. तसेच भास, कविपुत्र, सौमिल्लक वगैरे नाटककारांच्या कृतीपुढे आपल्या नाटकाचा कितपत निभाव लागेल अशी शंका बोलून दाखवली आहे.

नाटकाच्या प्रारंभी मिश्रविष्कंभक आहे. त्यात बकुलावलिका ही मालविकेची मैत्रीण आचार्य गणदासास भेटून मालविकेच्या शिक्षणातील प्रगतीची चौकशी करते. तेव्हा गणदास आपल्या शिष्येची प्रशंसा करतो. थोड्याच अवधीत मालविकेने शिक्षणात चांगलीच प्रगती केलेली आहे. मुख्य प्रवेशात राजा अग्निमित्र दरबारात बसलेला आहे. अमात्य त्यास यज्ञसेनाकडून आलेले खलित्याचे उत्तर वाचून दाखवीत आहे. त्यात त्याने 'जर मी माधवसेनाची सुटका करावी असे आपणास वाटत असेल तर आपण माझ्या मेहुण्याची सुटका करावी.' असे कळवलेले असते. यज्ञसेनाची अट ऐकताच अग्निमित्र संतापतो व तो आपल्या सेनापतीस यज्ञसेनावर हल्ला करण्याचा आदेश देतो.

राजा मालविकेस प्रत्यक्ष पाहण्यास उतावीळ झाला आहे व विदूषक गौतम त्यासाठी खटपट करीत आहे. यासाठी त्याने दोन नाट्याचार्यात भांडण लावून दिले आहे. ते दोघे दरबारात येऊन गाऱ्हाणे सांगतात. यावर उपाय म्हणून त्या दोघांच्या शिष्यांची परीक्षा घेण्याचे ठरते. त्यामुळे साहजिकच मालविका राजाच्या नजरेस पडणार होती. राणीला हा साराच प्रकार पसंत नसतो. पण सारी सूत्रे हाती घेऊन पारिव्राजिका कौशिकी हा बनाव घडवून आणते आणि त्यातील अवघड अशा 'छलित' नामक नृत्यप्रकाराची योजना केली जाते व नर्तिकांचे शरीरसौष्ठव नजरेस पडावे यासाठी झिरमिरीत वस्त्रे परिधान करण्यात सांगण्यात येते. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकात मालविकेचे नृत्य अगोदर पाहण्यात यावे असे ठरते. मग मालविका प्रत्यक्ष रंगभूमीवर येते. तिचे सौंदर्य व शरीरसौष्ठव पाहून राजा मंत्रमुग्ध होतो तो म्हणतो -

"हिचे विशाल नेत्र, शारदीय चंद्राप्रमाणे सुंदर मुख, दोन्ही खांद्यापासून खाली वळलेले बाहू, पुष्ट स्तनांच्या योगे भरगच्च दिसणारे वक्षःस्थळ, दोन्ही बाजूंनी घोटल्याप्रमाणे गुळगुळीत पार्श्वभाग, मुठीत मावणारी कमर, अत्यंत पुष्ट जघनस्थळ, किंचित वळलेली पायांची बोटे, तिचे शरीर अगदी नृत्यशिक्षकाच्या मनाप्रमाणे घडविल्यासारखे दिसते."

(अंक २ श्लोक ३)

नंतर तिच्या नृत्यास प्रारंभ होतो. ती अगदी तन्मय होऊन नृत्यप्रयोग सादर करते. शृंगाररसप्रधान गीतातून जणू आपले मनोगतच प्रकट करते. नृत्य संपल्यावर तिने लगेच निघून जाऊ नये म्हणून विदूषक तिला थांबवतो. चावट बोलून तिला हसवतो. राजाला तिचे सौंदर्य मनमुराद पाहायला मिळावे हा त्यात हेतू असतो. मग दुपार झाल्याने इरावतीचा नृत्यप्रयोग दुसऱ्या दिवशी पाहावयाचे ठरते. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. दोन दासींच्या संभाषणावरून इरावतीचा नृत्यप्रयोग झाल्यावर पारिव्राजिकेने दिलेल्या निकालानुसार गणदासाचे पारडे जड झाले. मालविका इरावतीपेक्षा सरस ठरली, असे समजते. उद्यानातील सुवर्णाशोकास फुले येण्यास विलंब लागल्याने स्वतः धारिणी त्याचे दोहदपूरण करणार आहे.

मुख्य प्रवेशात राजा आणि विदूषक प्रवेश करतात. धारिणीने मालविकेला अधिक बंदोबस्तात ठेवले असल्याचे विदूषक सांगतो. तसेच राणी इरावतीने राजासमवेत हिंदोळ्यावर बसण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यानुसार दोघे प्रमदवनात येतात. इतक्यात त्या ठिकाणी मालविका येते. गौतमाच्या व्रात्यपणाने धारिणी झोपाळ्यावरून खाली पडली. त्यामुळे तिने अशोकाचे दोहद पुरवण्याची कामगिरी मालविकेवर सोपविलेली होती. राजा व विदूषक आड उभे राहून तिची स्थिती अवलोकन करतात.

मग मालविकेच्या पायास अळिता लावण्यासाठी बकुलावलिका सामग्री घेऊन येते. ती मालविकेचा पाय अळित्याने रंगवते व त्यावर पैंजण चढवते. त्याच वेळी इरावती व तिची दासी निपुणिका याही त्या ठिकाणी येतात. मालविकेला उद्यानात पाहून त्या चमकतात. इरावतीने मद्य घेतले असल्याने तिला पाय उचलत नाहीत. तरी त्या दोघी झाडाआड उभ्या राहून दोघींचे बोलणे ऐकू लागतात. मग मालविका वृक्षावर लत्ताप्रहार करण्यासाठी उठून उभी राहते.

तिने लत्ताप्रहार करताच विदूषक पुढे होऊन अशोकाचा अपमान केल्याबद्दल तिला खडसावतो. राजाला पाहून मालविका भांबावते. तेव्हा बकुलावलिका 'राणीच्या आदेशामुळेच मालविकेने अशोकास चरणस्पर्श केला.' असे सांगते. दोघी राजाच्या पाया पडतात.

राजा तिला उठवतो व आपलेही मनोरथ पूर्ण करण्याची विनंती करतो. राजाचे उद्‌गार ऐकताच इरावतीचे पित्त खवळते. ती एकदम पुढे होऊन मालविकेस म्हणते - "हो-हो. महाराजांचे मनोरथ पुरव. अशोकाला फुले येतील किंवा न येतील पण त्यांना फुलेच काय पण फळेही येतील." इरावतीच्या आकस्मिक आगमनाने सर्वजण भांबावतात. गौतम राजाला "आता पळ काढा" असा सल्ला देतो. मालविका व तिची सखी तेथून कशाबशा निसटतात. राजा इरावतीची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. इरावती जास्तच चिडते व लघळपणा करणाऱ्या राजावर कमरपट्टा उगारते. राजा तिचे पाय धरतो. इरावती रागारागाने निघून जाते. (अंक तिसरा)

इरावती एवढ्यावरच थांबली नाही. तिने धारिणीकडे तक्रार नेली त्यामुळे धारिणीने मालविकेस व बकुलावलिकेस समुद्रगृहातील तळघरात कोंडून घातले आहे अशी बातमी विदूषक राजाला सांगतो. तसेच राणीजवळ असलेली सर्पमुद्रांकित अंगठी दाखविल्याशिवाय त्यांची सुटका करावयाची नाही असाही तिने आदेश दिला आहे. धारिणीकडून ती आंगठी मिळवण्यासाठी तो एक अजब युक्ती योजतो.

राजा धारिणीच्या दुखावलेल्या पायाची विचारपूस करण्यासाठी तिच्या महालात येतो. थोड्याच वेळात गौतम - विदूषक ओरडत-किंचाळत प्रवेश करतो. आपल्या पायाला सापाने दंश केल्याचे सांगतो. गौतमाच्या जिवावर आलेले संकट पाहून धारिणी घाबरून जाते. गौतमाला अक्षरश: उचलून वैद्याकडे नेण्यात येते. मग वैद्याकडून परस्परच धारिणीला निरोप येतो की सर्पाच्या विषावर मंत्रोपचार करण्यासाठी सर्पमुद्रेची जरूरी आहे. धारिणी चटकन अंगठी काढून देते. गौतमाचा कार्यभाग साधतो व मालविकेची सुटका होते.

मालविका व बकुलावलिका यांना समुद्रगृहातील एका दालनात बसायला सांगून गौतम राजाला तेथे घेऊन जातो. बकुलावलिका दालनाच्या बाहेर थांबते व विदूषक बाहेर बसून डुलक्या घेऊ लागतो. प्रणयी जोडप्यास एकांताचा लाभ होतो. इतक्यात इरावती व निपुणिका समुद्रगृहाकडे येऊ लागतात. विदूषक

दाराशी बसलेला पाहून निपुणिका त्याच्या अंगावर वाकडी काठी टाकते. तो दचकून 'साप-साप' असे ओरडत जागा होतो. त्याच्या ओरड्यामुळे राजा, मालविका, बकुलावलिका सारेच बाहेर येतात.

इरावती तो सारा प्रकार पाहून पुन्हा भडकते. ती राजाला स्पष्ट विचारते - "जोडप्याने दिवसा ठरवलेली गाठभेट निर्विघ्नपणे पार पडली ना?" अग्निमित्र गोंधळतो, तरी प्रसंगावधान राखून उत्तर देतो, "या दोघींची सुटका झाल्यामुळे त्या मला वंदन करण्यास आल्या आहेत." इरावतीला ते पटत नाही. पण राजाची या प्रसंगातून अकल्पितपणे सुटका होते.

धारिणीची धाकटी बहीण वसुलक्ष्मी चेंडूने खेळत असता राजवाड्यातील पिंगल नामक वानराने तिला भयभीत केले. मुलगी अस्वस्थ झाल्याचे समजताच राजा त्वरित अंत:पुराकडे जावयास निघतो. इतक्यात पडद्याआडून आवाज येतो की मालविकेने दोहद पुरवलेल्या अशोकास कळ्या आलेल्या आहेत. हे ऐकताच मालविका व तिची सखी आनंदित होतात. मालविकेच्या नजरेसमोर मधुर स्वप्न तरळू लागते. कारण अशोकास कळ्या आल्यातर मी तुझे मनोरथ पूर्ण करीन असे धारिणीने तिला आश्वासन दिले होते आणि धारिणी आपल्या शब्दाला जागणारी होती. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. मधुरिका व सारसक यांच्या संवादावरून अग्निमित्राच्या सेनापतीने विदर्भावर स्वारी करून यज्ञसेनास पराभूत करून माधवसेनाची सुटका केली आहे असे समजते. मुख्य प्रवेशात राजा व विदूषक हे बोलत आहेत. धारिणीने राजास अशोकास आलेल्या कळ्या पाहावयास बोलावलेले आहे. राजा उद्यानात जातो तेव्हा मालविकाही राणीच्या शेजारीच असते. राणीने तिला वैदर्भी विवाहवेषात नटवलेले आहे.

नंतर कंचुकी येऊन सांगतो की विदर्भराजाने संगीतकलेत निष्णात अशा दोन मुली राजाकडे पाठविलेल्या आहेत. राजाच्या अनुमतीने त्या दोघी त्या ठिकाणी येतात. त्या चटकन मालविकेस हीच माधवसेनाची बहीण असे ओळखतात. ती राजकन्या आहे असे समजताच सर्व जण चकित होतात. तसेच पारिव्राजिका कौशिकी म्हणजे सुमती या मंत्र्याची बहीण आहे, हेही समजते.

आता पारिव्राजिकेने मालविकेस ओळख का दिली नाही किंवा या बाबतीत तिने मौन का पाळले याचे ती स्वत:च कारण सांगते की मालविका लहान असताना एका ज्योतिषाने तिला एक वर्षभर दासीभाव सोसावा लागेल व त्यानंतर

राज्ञीपद प्राप्त होईल असे भविष्य केले होते. त्यामुळे ती योग्य काळाची वाट पाहात होती.

विदर्भाच्या राज्याची व्यवस्था लावण्यासाठी अग्निमित्र ते यज्ञसेन व माधवसेन या दोघात वाटून देतो. त्या दोघांनी वरदा नदीच्या उत्तर व दक्षिण तीरावर स्वतंत्रपणे राज्य करावे असे ठरते. याच वेळी आणखी एक अत्यंत आनंददायक वार्ता येते. अग्निमित्राचा मुलगा वसुमित्र याने सिंधू नदीच्या तीरावर यवनांशी संग्राम करून त्याचा पाडाव केला आहे. तसेच पुष्यमित्राकडून अश्वमेध यज्ञास उपस्थित राहण्याचे निमंत्रणही आलेले आहे. पुत्राच्या पराक्रमाची वार्ता ऐकून धारिणी आनंदित होते व इरावतीच्या संमतीने मालविकेचा हात अग्निमित्राच्या हातात देते. तसेच तिला राज्ञीपदही देते. भरतवाक्य होऊन नाटक संपते. (अंक पाचवा)

* * *

प्रस्तुत नाटक काही ऐतिहासिक घटना व प्रसंग यावर आधारलेले आहे. तसेच गुणाढ्याच्या बृहत्कथेतील बंधुमतीच्या कथेचाही कालिदासाने उपयोग करून घेतला असावा. कथासरित्सागराच्या दुसऱ्या लंबकाच्या सहाव्या तरंगात ही कथा सांगितलेली आहे. ती याप्रमाणे -

उदयन व वासवदत्ता यांचा विवाह झाल्यावर वासवदत्तेचा भाऊ गोपालक याने लढाईत जिंकलेली बंधुमती नामक राजकन्या आपल्या बहिणीकडे पाठवून दिली. वासवदत्तेने तिचे मंजुलिका असे नाव ठेवले. एके दिवशी ती उदयनाच्या दृष्टीस पडली. दोघांचे प्रेम जुळले व त्यांनी गुप्तपणे गांधर्व विवाह केला. उभयतांच्या प्रेमप्रकरणाचा वासवदत्तेला सुगावा लागला. तिने त्याच्यावर पाळत ठेवून त्याला पकडले.

मग उदयनाने वासवदत्तेच्या माहेरहून आलेल्या व अंत:पुरात राहात असलेल्या सांकृत्यायनी नामक संन्यासिनीची भेट घेतली. तिच्या मध्यस्थीने वासवदत्तेची समजूत घालण्यात आली. मग वासवदत्तेने बंधुमतीचा हात राजाच्या हातात दिला.

वरील छोट्याशा कथेतून बंधुमती (मालविका), गोपालक (वीरसेन), वासवदत्ता (धारिणी) व सांकृत्यायनी (पारिव्राजिका कौशिकी) अशी पात्रे घेऊन कालिदासाने कथेची मांडणी केली असून तिला ऐतिहासिक पार्श्वभूमीची जोड दिली आहे. तसेच काही स्वतंत्र प्रसंगांचीही निर्मिती केली आहे. उदा.

दोन नाट्याचार्यातील झगडा, मालविकेने सादर केलेला नृत्यप्रयोग, अशोकाचे दोहदपूरण, विदूषकाने योजलेल्या युक्त्या-धारिणीला झोपाळ्यावरून पाडणे, साप चावल्याचे नाटक करणे इत्यादीच्या साहाय्याने त्याने कथा रोचक बनवली आहे.

'मालविकाग्निमित्र' ही त्याची पहिली कलाकृती आहे. भास, कविपुत्र, सौमिल्लक इत्यादी प्रथितयश नाटककारांच्या कृती प्रेक्षकांच्या नजरेसमोर असताना आपल्या नाटकाचा कितपत निभाव लागेल अशी शंका त्याच्या मनात आहे. उदयनाच्या लोकप्रिय कथानकावर नाटक न लिहिता शुंगकालीन इतिहासावर आधारलेले नाटक लिहिल्याने ते प्रेक्षकांस कितपत पसंत पडेल याबाबतही तो साशंक असावा. बौद्ध धर्माचा पाडाव करून वैदिक धर्माची पुन:स्थापना करणाऱ्या पुष्यमित्राचे त्यास आकर्षण वाटले असावे. परंतु त्याच्यावर नाटक न लिहिता त्याच्या विलासप्रिय मुलावर 'अग्निमित्रावर - नाटक लिहिण्यात त्याचा हेतू रंजनप्रधान सुखात्मिका निर्माण करावी हाच दिसतो.

असे असूनही कित्येक अभ्यासकांनी हे नाटक शुद्ध ऐतिहासिक मानून भलतेच निष्कर्ष काढलेले आहेत. ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकरांच्या मते कालिदासाच्या मनात विदर्भाची टिंगल करून प्रेक्षकांकडून टाळ्या मिळवायच्या होत्या. यासाठीच त्याने धारिणीचा भाऊ हलक्या जातीचा तर दुसरी राणी इरावती ही मद्यपान करणारी असे दाखवलेले आहे. तसेच विदिशा व विदर्भ यांच्यातील तेढ ही शुंगकालातील नसून गुप्तकालातील आहे इ.

कै. शि.म.परांजपे यांच्या मते कालिदासास शुंग घराण्यातील बारीक सारीक गोष्टींची माहिती होती. अग्निमित्राची थोरली राणी धारिणी हिचा भाऊ वीरसेन हा हलक्या जातीचा होता. हा उल्लेख कथानकाच्या दृष्टीने आवश्यक आहे असे नाही. पण तत्कालीन प्रेक्षकांनाही ही गोष्ट ठाऊक असल्याने कालिदासाने याचा खुलासा केला नाही. तसेच इरावती राणी हीही ऐतिहासिकच असली पाहिजे.

तसेच पाचव्या अंकात पुष्यमित्राकडून अग्निमित्रास यज्ञाचे निमंत्रण देणारे पत्र येते. ते पत्र शुद्ध ऐतिहासिक आहे असा श्री. अ.ज. करंदीकरांचा दावा आहे. त्यांचा रोख पत्रातील 'विगतरोषचेतसा' या शब्दावर आहे. या शब्दाचा नाटकातील कोणत्याही घटनेशी संबंध नसतानाही तो योजलेला आहे. त्या अर्थी सदर पत्र हे ऐतिहासिक असावे व कालिदासाने तेच आपल्या नाटकात उतरून घेतलेले आहे.

वास्तविक पाहता या नाटकाचा 'नाटक' म्हणूनच अभ्यास व्हावयास हवा. नाटक वाचल्यानंतर किंवा प्रयोगरूपाने पाहिल्यानंतर यातील इतिहासाऐवजी प्रणयकथेचाच परिणाम शिल्लक रहातो. शुंगकालीन इतिहासातील व्यक्ती व प्रसंग यांना हाताशी धरून जरी याची रचना केलेली असली तरी खऱ्याखुऱ्या अर्थाने हे ऐतिहासिक नाटक नव्हे. त्यामुळे कै. शि.म.परांजपे, डॉ. केतकर व श्री. अ.ज.करंदीकर यांच्या अभ्यासपूर्ण पण एकतर्फी मतांचा स्वीकार करता येत नाही.

* * *

नाटकातील अग्निमित्र, धारिणी, इरावती व गौतम यांची स्वभावचित्रे वेधक उतरली आहेत. राजा अग्निमित्र हा उघड उघड स्त्रीलंपट आहे. त्याचा तरुण मुलगा वसुमित्र हा यवनांशी लढाई करण्याइतका मोठा आहे, यावरून अग्निमित्राचे वय पस्तीस ते चाळीस इतके तरी असले पाहिजे. या वयात तो अंत:पुरातील दासीबरोबर प्रणयाचे चाळे करताना दिसतो. त्यामुळे त्याचे प्रेम हे निव्वळ शारीरिक आहे असे वाटते. असे असूनही प्रा. अरविंद मंगरुळकर व प्रा. हातवळणे या दोघांनी अग्निमित्राच्या प्रणयाचे जे समर्थन केले आहे, ते आश्चर्यकारक आहे. राजकारणाकडे मात्र तो दुर्लक्ष करीत नाही. त्याचे राजनीतीचे ज्ञान सूक्ष्म असून योग्य निर्णय घेण्याची हातोटीही प्रशंसनीय आहे. तथापि प्रत्यक्ष नाटकात तो आपले प्रेमप्रकरण उगाळण्यापलीकडे काही करताना दिसत नाही. त्याला गौतमाच्या मदतीवर सर्वस्वी अवलंबून राहावे लागले आहे. कालिदासाच्या पुरुरवा व दुष्यंत या नायकांच्या मानाने तो अगदीच कमी दर्जाचा वाटतो.

राणी धारिणी ही वयाने प्रौढ आहे. तिचा स्वभाव धीमा आहे. अग्निमित्राच्या लंपट वृत्तीचा तिला चांगला अनुभव आहे. त्यामुळेच ती मालविकेस राजाच्या नजरेस पडू देत नाही. मालविका व इरावती यांच्यातील नृत्यस्पर्धा होऊ नये यासाठी ती खटपट करते पण त्यात तिला यश येत नाही. ती स्वभावाने सरळ व निष्कपटी आहे. इरावतीप्रमाणे तापट व फटकळ नाही. मालविकेला इतके जपणारी धारिणी स्वत:चा पाय दुखावल्यावर अशोकाच्या दोहदपुरणाची कामगिरी इरावती अगर अन्य राणीकडे न सोपवता मालविकेसारख्या दासीकडे कशी सोपवते हे कोडे उलगडत नाही. यावरून तिच्या विरोधाची धार बोथट

झालेली असावी. केवळ इरावतीच्या समजुतीखातर ती मालविकेस तळघरात डांबून ठेवते. मुलगा लढाईत विजयी झाल्याची बातमी ऐकताच तसेच मालविका ही राजकन्या आहे असे समजताच तिचा साराच विरोध मावळतो. ती आपण होऊन मालविकेचा हात राजाच्या हातात देते.

राणी इरावती मात्र तरुण, शीघ्रकोपी व मत्सरी आहे. मालविका येण्यापूर्वी तीच राजावर अधिकार गाजवत असावी. मालविकेने नृत्यस्पर्धेत तिचा पराजय केल्याने ती तिला पाण्यात पहाते. ती सुखलोलुप, मानी व देखणी आहे. प्रमदवनात राजाबरोबर हिंदोळ्यावर झोके घेण्याची इच्छा ती प्रकट करते. त्यानंतर मद्यप्राशन करीत क्रीडा करण्यास येते. राजा मुद्देमालासकट सापडताच तिच्या संतापाला पारावार राहात नाही. ती राजावर कमरपट्टा उगारते, चिडून अश्लिल बोलते. धारिणीला सांगून मालविकेची अंधारकोठडीत रवानगी करते. इतके असले तरी तिची वृत्ती सरळ आहे. राजाचा अपमान केल्याबद्दल तिला वाईट वाटते. राजाच्या तसबिरीसमोर ती क्षमायाचना करण्यासाठी येते. वसुलक्ष्मी घाबरली आहे असे समजताच तीही कावरीबावरी होते. अखेरीस मालविकेच्या विवाहास संमतीही देते. यावरून मालविकेची खरी सवत तीच आहे हे जाणवल्यावाचून राहात नाही.

या नाटकात सर्वात नजरेत भरतो तो गौतम. सर्व संस्कृत नाट्यसृष्टीत गौतमासारखा विदूषक आढळत नाही. तो हुशार, चतुर व हजरजबाबी आहे. राजाचा कामतंत्र सचिवही तोच आहे. त्याचे प्रेमप्रकरण सर्वस्वी त्याच्यावरच अवलंबून आहे. कालिदासाने गौतमाचा विदूषकाचा परिवेष कायम ठेवलेला आहे. खादाडपणा, निरक्षरता या बाबतीत तो इतर विदूषकांसारखाच आहे. नाटकात फक्त एकाच प्रसंगी तो चूक करतो. पहारा करीत असता तो झोपी जातो व झोपेत नको ते बरळतो त्यामुळे राजाचे बिंग बाहेर पडते. गौतम हा प्रतिचाणक्य ठरू नये एवढ्याचसाठी कालिदासाने त्याच्याकडून प्रमाद घडविलेला दिसतो. परंतु राजापेक्षा विदूषक शहाणा दर्शविल्याने राजाची प्रतिमा अगदीच डागाळून जाते. ही गोष्ट लक्षात येताच त्याने पुढील दोन्ही नाटकांत विदूषकास बावळट दाखवण्याचे पसंत केले.

मालविकेची स्वभावरेखा मात्र अगदीच सामान्य वठली आहे. एक सुंदर निर्जीव बाहुली यापलीकडे तिचा कोणताही ठसा उमटत नाही. आपण राजकन्या

असून विजनवासात राहात आहोत याची तिला कोठे खंत वाटलेली दिसत नाही. तिच्या सोबत निम्मा अर्धा प्रवास केलेल्या कौशिकीलाही ती ओळखत नाही याचे आश्चर्य वाटते. पारिव्राजिका कौशिकी ही पहिल्या अंकातच काय ती चमकते. पुढील अंकात तिला वाव मिळालेला नाही. शेवटच्या अंकात ती आपण मौन का पाळले याचा खुलासा करते.

गणदास व हरदत्त या नृत्याचार्यांची जोडी लक्षात राहण्यासारखी आहे. त्यातही गणदासाचे चित्र विशेष स्पष्ट आहे. तो स्वाभिमानी व सरळ मनाचा आहे. त्याला आपल्या कर्तव्याची जाणीव आहे. उदरनिर्वाहासाठी 'अध्यापन करणारे आचार्य हे व्यापारी आहेत.' असे त्याचे स्पष्ट मत आहे. हरदत्ताची व्यक्तिरेखा थोडी फिकट आहे. तोही स्वाभिमानी व ज्ञानाच्या बाबतीत गणदासाच्या बरोबरीचाच आहे. विदूषकाने थोडी कलागत लावताच हे दोघे भांडण करीतच दरबारात येतात. प्रो. टूवाने यांना या जोडगोळीवरून मोलियरच्या 'ल वूर्ज्वा जांतिलाम' या प्रहसनातील दोन शिक्षकांची आठवण झाली आहे. मालविकेची सखी बकुलावलिका ही चतुर व प्रसंगावधानी आहे तर इरावतीची दासी निपुणिका निव्वळ तोंडपुजी आहे.

* * *

'मालविकाग्निमित्र' हे खरोखरच ललितरम्य सुखात्म नाटक आहे. यातील सर्व प्रसंग राजवाड्याच्या परिसरातच घडलेले आहेत. त्यामुळे यात स्थानैक्य (Unity of Place) साधलेले आहे. संपूर्ण नाटकाचा कथाभाग हा एका आठवड्यात पूर्ण झालेला आहे. या दृष्टीने कालैक्य (Unity of time) हेही साधले आहे, असे म्हणावयास हवे. पण पाचव्या अंकातील कौशिकीच्या निवेदनाने या विधानास छेद देतो. मालविकेचा अज्ञातवास हा एक वर्षाने संपणारा आहे. त्यामुळे कथानकाचा कालावधी किमान एक वर्षाचा मानावा लागतो. तसेच यात दुसरे उपकथानक नसल्याने क्रियैक्यही साधलेले आहे. त्यामुळे यात एक प्रकारचा सुटसुटीतपणा आहे. नाटकातील वातावरणही अत्यंत प्रसन्न व खेळकर आहे.

नाटकाची भाषा सरळ, सोपी व लालित्यपूर्ण आहे. नाटकातील संवाद हे काव्यपूर्ण असूनही प्रासादिक आहेत. विदूषकाचे बोलणे मार्मिक व चटकदार आहे. त्याच्या तोंडी अनेक सुभाषितवजा वाक्ये घातलेली आहेत. मालविकेचे बोलणे मृदू व संयत आहे. पण तीही एके ठिकाणी राजाला टोमणा मारायला

कमी करीत नाही. इरावतीचे बोलणे सडेतोड पण फटकळ आहे. राजाचे बोलणे काव्यपूर्ण आहे. नाटकातील श्लोकही प्रासादिक व सुश्लिष्ट आहेत.

या नाटकाने संस्कृत वाङ्मयात प्रणयप्रधान रंजनात्मक नाटकांचा पाया घातला. श्रीहर्षाची प्रियदर्शिका व रत्नावली या नाटिका, राजशेखराचे विद्धशाल भंजिका हे नाटक व कप्पूरमंजरी हे प्राकृत सट्टक यावर या नाटकाची गडद छाप आहे. कालिदासाने आपल्या पहिल्याच नाटकाने आपली नाट्यकुशलता सिद्ध केली आहे.

## २. विक्रमोर्वशीय

नाटकाच्या नांदीश्लोकात भगवान शंकराची स्तुती केल्यानंतर सूत्रधार प्रेक्षकांना आपण कालिदासाचे विक्रमोर्वशीय नामक नाटक सादर करणार असल्याचे सांगतो. तो प्रेक्षकांना नाटक पाहण्याची विनंती करीत असताना पडद्यातून स्त्रीजनांचा आर्त स्वर ऐकू येतो. त्या म्हणतात, ''ज्याला आकाशात संचार करता येतो असे कोणी तरी लवकर धावा.'' हे शब्द ऐकल्यावर सूत्रधारास काय घडले असावे याची कल्पना येते. तो सांगतो की, ''स्वर्गीय अप्सरा उर्वशी कुबेरास नमस्कार करून परत जात असता राक्षसांनी तिला पळवले आहे. त्यामुळे इतर अप्सरा मदतीसाठी हाका मारीत आहेत.'' सूत्रधार निघून जातो व नाटकास प्रारंभ होतो.

मुख्य प्रवेशात सूर्यपूजन करून पुरुरवा तेथे येतो रंभा वगैरे अप्सरा त्यास भेटतात व केशी नामक दैत्याने उर्वशी व तिची सखी चित्रलेखा यांना जबरदस्तीने पळवून नेल्याचे सांगतात. राजा ताबडतोब उर्वशीची सुटका करण्यासाठी आपला रथ पिटाळतो. रंभा, मेनका वगैरे अप्सरा हेमकूट पर्वतावर उतरून त्याची वाट पाहू लागतात.

थोड्याच वेळात पुरुरवा दोघींना आपल्या रथात घालून परत येतो. उर्वशी मूर्च्छित पडलेली असते. चित्रलेखा तिला सावध करण्याचा प्रयत्न करते. हळूहळू ती सावध होते. राजा तिच्या सौंदर्यावर लुब्ध होतो. तो म्हणतो,

''हिची निर्मिती रमणीय कांती असलेल्या चंद्राने केली असावी किंवा शृंगाररस हे एकच स्वरूप असलेल्या मदनाने केली असावी अथवा साक्षात वसंतऋतूच तिच्या निर्मितीस कारण झाला असावा काय? अन्यथा विषयांची गोडी नसलेला

व वेदाभ्यासाने मूढ बनलेला ब्रह्मदेव असे रमणीय रूप कसे बरे उत्पन्न करू शकेल?''                                                            (अंक १ श्लोक ८)

उर्वशी रथातून उतरून आपल्या मैत्रिणींना भेटते. तिच्या मनात राजाबद्दल आकर्षण उत्पन्न होते. मग चित्ररथ गंधर्व स्वत: तेथे येतो व सांगतो की, नारदाकडून इंद्रास समजले की केशी नामक दैत्याने उर्वशीचे हरण केले आहे. तेव्हा इंद्राने ताबडतोब गंधर्वसेनेला आक्रमण करण्याचा आदेश दिला पण दरम्यान राजाने तिची सुटका केल्याचे समजताच तो राजाला भेटायला आलेला आहे.

चित्ररथ राजाला इंद्राची भेट घेण्याची विनंती करतो परंतु राजाला तेवढा वेळ नव्हता. चित्ररथ सर्व अप्सरांना घेऊन स्वर्गलोकी जावयास निघतो. जाताना उर्वशी राजाकडे प्रेमाचा कटाक्ष टाकते. तसेच वेलीत अडकलेली मोत्याची माळ सोडविण्याच्या निमित्ताने मागे थांबते. राजा तिच्या कटाक्षाने विद्ध होतो व आपल्या नगरीस जावयास निघतो. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. राजाने आपले मन उर्वशीनामक अप्सरेवर जडले असल्याची हकीकत विदूषकास गुप्त ठेवण्याविषयी बजावले आहे. पण राणी औशीनरी हिला राजाच्या वर्तनावरून संशय आलेला आहे. तेव्हा ती आपल्या दासीला याबाबतीत चौकशी करण्यासाठी विदूषकाकडे पाठवते. निपुणिका विदूषकास थाप मारते की, राजाने राणीला दुसऱ्याच स्त्रीचे नाव घेऊन हाक मारली. मग विदूषक भोळसटपणाने उर्वशीचे नाव सांगून रिकामा होतो.

मुख्य प्रवेशात राजा मनोविनोदनार्थ प्रमदवनात जातो. तेथे त्याला शुभ शकून होतो. त्यानंतर थोड्याच वेळात राजाला भेटण्यासाठी स्वत: उर्वशीच आपल्या सखीसह विमानमार्गाने तेथे अवतीर्ण होते. तिला तिरस्करिणी विद्या (अदृश्य रूपात रहाण्याची विद्या) अवगत असल्याने ती गुप्तपणे राजा व विदूषक यांचे बोलणे ऐकू लागते.

विदूषक राजाला मदनव्यथेवर उपाय सुचवीत आहे. त्याच्या मते 'राजाने स्वप्नात प्रियेला भेटण्यासाठी निद्रेचा आश्रय करावा किंवा उर्वशीचे चित्र काढून तिचे दर्शन घ्यावे.' त्यांचे बोलणे ऐकून उर्वशीला राजाचे प्रेम आपल्यावर जडल्याचे समजते. मग तीही आपले मनोगत व्यक्त करणारे दोन श्लोक भूर्जपत्रावर लिहून ते राजाच्या दिशेने सोडून देते. राजा ते पत्र वाचतो व विदूषकाजवळ ठेवण्यास देतो.

मग उर्वशी प्रकट होते. दोघांची मने परस्परांच्या सहवासासाठी आसुसलेली असल्याने ती जुळण्यास वेळ लागत नाही. उर्वशी राजाला व विदूषकाला प्रणाम करते. राजा तिच्या हाताला धरून आपल्याजवळ बसवतो. इतक्यात उर्वशीला इंद्राचे बोलावणे येते. भरतमुनींनी अप्सरांच्याकडून एक नाट्यप्रयोग बसवलेला होता तो प्रयोग पाहण्याची लोकपालांनी इच्छा व्यक्त केली. प्रयोगात भाग घेण्यासाठी उर्वशीला निघणे भाग होते. ती दुःखाने राजाचा निरोप घेते व निघून जाते.

विदूषक राजाच्या हातात भूर्जपत्र देऊ पाहतो पण ते त्याच्या हातातून खाली पडून वाऱ्याने दूर जाते व नेमके निपुणिकेसह प्रमदवनात येत असलेल्या राणी औशीनरीच्या हाती लागते. निपुणिका तो मदनलेख राणीला वाचून दाखवते. दोघी प्रमदवनात येतात तेव्हा भूर्जपत्राचा शोध चाललेला दिसतो. राणी स्वतः पुढे होऊन ते भूर्जपत्र राजाकडे देते. राजा राणीला पाहून भांबावतो व खजिल होतो. राणीला तेथे थांबण्यात स्वारस्य वाटत नाही. ती जावयास निघते. राजा तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. तिच्या पायादेखील पडतो. पण ती निघून जाते. राजाला वाईट वाटते. त्याचे उर्वशीवर मन जडलेले असले तरी राणीविषयी त्याच्या मनात आदराची भावना आहे. दुपारची वेळ झाल्याने दोघे स्नान भोजनासाठी उठतात. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक आहे. भरतमुनींचे पल्लव आणि गालव हे दोघे शिष्य प्रवेश करतात. पल्लव सांगतो की स्वर्गात 'लक्ष्मी स्वयंवर' या नाटकाचा प्रयोग झाला. त्यात लक्ष्मीचे काम करणाऱ्या उर्वशीने 'आपले मन पुरुषोत्तमावर जडले आहे' असे म्हणण्याऐवजी 'पुरुरव्यावर' असे म्हणून चूक केली. भरतमुनी तिच्यावर रागावले व त्यांनी 'तुझे स्वर्गातील स्थान नष्ट होईल' असा तिला शाप दिला. पण इंद्राने तिची समजूत घालून तिला पुरुरव्याकडे जाण्यास परवानगी दिली. एक मूल होईपर्यंत उर्वशी राजाजवळ राहू शकणार होती.

मुख्य प्रवेशात कंचुकी संध्यासमयीचे वर्णन करतो. राजा व विदूषक येतात. कंचुकी राजाला राणीचा निरोप सांगतो की मणिहर्म्य प्रासादाच्या गच्चीवरून चंद्रदर्शन चांगले होते तरी चंद्राचा रोहिणीशी समागम होईपर्यंत आपल्या सहवासात राहण्याची राणीची इच्छा आहे. राजा त्यास संमती देतो ब दोघे प्रासादाच्या गच्चीवर येऊन राणीची वाट पाहू लागतात.

चंद्र उगवण्याची वेळ होते. तो उगवल्यावर विदूषकाला 'मोडक्या मोदकाची' आठवण होते. राजा चंद्राला नमस्कार करतो. राणी येण्यास अवकाश असल्याने तो विदूषकाला आपली विरहव्यथा सांगू लागतो. त्या वेळी उर्वशी व चित्रलेखा आकाशमार्गाने येतात. उर्वशी अभिसारिका बनून राजाकडे आलेली असते. तिच्याकडे पाहिल्यावर 'आपण पुरुरवा व्हावे' असे चित्रलेखेलादेखील वाटते. दोघी गच्चीवर उतरतात. उर्वशी प्रकट होणार इतक्यात राणीची पावले वाजतात. दोघी अदृश्यरूपाने तेथे थांबतात.

राणी आपल्या दासीबरोबर पूजासाहित्य घेऊन प्रवेश करते. तिने शुभ्र वस्त्र परिधान केलेले आहे. राणीकडे पाहिल्यानंतर उर्वशीच्या मनात तिच्याबद्दल आदर उत्पन्न होतो. इंद्राची पत्नी शचीइतकीच राणी तेजस्वी आहे. राजा राणीला व्रताचे कारण विचारतो तेव्हा निपुणिका त्याचा उद्देश 'पतीला प्रसन्न करणे हा आहे' असे सांगते. तेव्हा राजा 'मी तुझ्यावर अनुरक्तच आहे' असे तिला सांगतो. त्याचे बोलणे ऐकून चित्रलेखा 'इतर स्त्रीवर प्रेम जडलेले पुरुष बायकोशी अधिक प्रेमाने वागतात.' असा शेरा मारते.

त्यानंतर राणी चंद्राची पूजा करते. विदूषकाला लाडूंचे ताट अर्पण करते आणि राजासमोर हात जोडून म्हणते, ''मी रोहिणी व चंद्र या दिव्य मिथुनास साक्षी ठेवून सांगते की आर्यपुत्रांचे जिच्यावर प्रेम आहे व जी त्यांच्या समागमासाठी उत्सुक आहे, तिच्याशी मी आजपासून प्रेमाने वागेन.'' अशा रीतीने राणी आपण होऊन राजाचा प्रणयाचा मार्ग मोकळा करून देते.

राणी निघून गेल्यावर उर्वशी प्रकट होते व राजाच्या पाठीमागे येऊन त्याचे डोळे झाकते. उर्वशीला राजाच्या स्वाधीन करून व त्यास वंदन करून चित्रलेखा निघून जाते. त्यानंतर राजा उर्वशीला घेऊन वासगृहात प्रवेश करतो. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या सुरुवातीस प्रवेशक घातलेला आहे. चित्रलेखा व सहजन्या यांच्या संवादातून उर्वशीचा वृत्तांत समजतो. विवाहानंतर अमात्यांकडे राज्यकारभार सोपवून राजा उर्वशीसह गंधमादन पर्वतावर क्रीडा करण्यासाठी गेला होता. तेथे मंदाकिनीच्या तीरावर वाळूत खेळत असलेल्या विद्याधर कन्येकडे तो लक्षपूर्वक पाहू लागताच उर्वशीला राग आला. ती रागारागाने राजापासून दूर गेली आणि स्त्रियांना प्रवेश करण्यास निषिद्ध असलेल्या कार्तिकेयाच्या वनात शिरली. त्याबरोबर तिचे वेलीत रूपांतर झाले. राजा तिचा शोध घेत हिंडू लागला.

आता पावसाळ्याचे दिवस आल्याने त्याची अवस्था अधिकच कठीण झालेली आहे.

मुख्य प्रवेशात राजा उर्वशीच्या शोधात भटकत असलेला दिसतो. तो मेघ, लता, वृक्ष, पशू, पक्षी इत्यादिकांना तिची वार्ता विचारतो. हंसाने तिची गती चोरली आहे असे त्याला वाटते. तो भ्रमराला तिची हकीकत विचारतो.

''हे भ्रमरा, मदिराक्षी असलेल्या माझ्या उर्वशीची वार्ता सांग. पण मला वाटते तू त्या चारुगात्रीला पाहिले नसावेस. तिच्या मुखाचा सुगंध जर तू हुंगला असतास तर कमलावर प्रीती केलीच नसतीस.''

(अंक ४ श्लोक २२)

याप्रमाणे भ्रमण करीत असता त्याला एक लाल रंगाचा मणी दिसतो. तो मणी उर्वशीच्या केसात माळण्यासाठी योग्य होता पण तीच आता नाहीशी झाल्यावर त्याचा काय उपयोग आहे असे त्यास वाटते. पण इतक्यात पडद्यातून एका ऋषीचे शब्द ऐकू येतात - ''शैलसुता गौरीच्या चरणास लावलेल्या आळित्यापासून हा मणी उत्पन्न झालेला आहे. प्रियजनाचा हा संगम घडवून आणतो तरी तू तो घे.'' राजा तो मणी उचलून घेतो. इतक्यात त्याचे शेजारी असलेल्या वेलीकडे लक्ष जाते. ती वेली त्याला हुबेहूब स्त्रीसारखी दिसू लागते. तो त्या वेलीला आलिंगन देतो त्याबरोबर त्या वेलीतून उर्वशी प्रकट होते. राजावर रागवल्याबद्दल ती त्याची क्षमा मागते. नंतर ती दोघे मेघावर बसून राजधानीकडे परत येतात. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या सुरुवातीस विदूषक प्रवेश करतो. राजा व त्याचा राणी परिवार गंगा-यमुनेच्या संगमावर स्नान करण्यासाठी आलेला आहे. स्नानोत्तर वस्त्रालंकार परिधान करीत असता एक गिधाड तो संगमनीय मणी लाल भक्ष्य आहे असे समजून पळवून नेते. राजाला हे समजताच तो धनुष्यास बाण लावणार इतक्यात ते गिधाड दृष्टीआड होते. राजा निराश होतो. पण थोड्याच वेळात कंचुकी तो मणी व एक बाण घेऊन येतो. राजा त्या बाणावरील नावाची अक्षरे वाचून चकित होतो तो बाण राजापासून उर्वशीस झालेल्या मुलाचा - कुमार आयूचा असतो.

राजाला मुलगा असल्याचे समजताच विदूषकास आनंद हातो. पण राजा विचारात पडतो. कारण तिच्या सहवासात त्याला तिच्या ठिकाणी गर्भधारणेची काही चिन्हे दिसली नव्हती. दुसरे म्हणजे मुलगा झाल्याची वार्ता उर्वशीने

त्याच्यापासून लपवून कशासाठी ठेवली? तो या विचारात असता एक तापसी हातात धनुष्य घेतलेल्या मुलाला घेऊन येते. ती सांगते की, केवळ राजावरील प्रेमामुळे उर्वशीने अपत्य जन्मास येताच ते तापसीच्या स्वाधीन केले. त्याला महर्षी च्यवनांनी धनुर्विद्या शिकवली आहे. आज सकाळी त्याने मणी नेणाऱ्या गिधाडास पाहिले व बाणाने वेध घेऊन त्यास ठार केले. च्यवन ऋषींनी या बालकास आता राजाकडे पाठवून दिले आहे.

मग उर्वशी तेथे येते. मुलाला पहाताच तिला अक्षरश: पान्हा फुटतो. पण पुत्रस्नेहापेक्षा राजावरील आपले प्रेम आता संपुष्टात येणार या विचाराने तिच्या डोळ्यांतून आसवे ओघळू लागतात. तिच्या दु:खाचे कारण समजताच राजा दु:खी होतो. तो कुमार आयूला राज्याभिषेक करून स्वत: वनात राहण्याचे ठरवतो. इतक्यात नारदमुनी येऊन त्यास इंद्राचा निरोप सांगतात. 'त्रिकालदर्शी मुनींनी आता लवकरच देवासुरात मोठा संग्राम होणार असल्याचे इंद्रास सांगितले आहे. त्यामुळे इंद्रास राजाच्या मदतीची अपेक्षा आहे. त्यामुळे राजाने शस्त्राचा त्याग करू नये. उर्वशी त्याच्याजवळ कायमची राहील.'

हा निरोप ऐकताच सर्वांना आनंद होतो. नारदमुनी अप्सरांना बोलावतात. त्या कुमार आयूस अभिषेक करतात. उर्वशी कुमारास औशीनरीची भेट घेण्यास सांगते. नारदमुनी राजास आणखी काय प्रिय करावे असे विचारतात तेव्हा 'लक्ष्मी व सरस्वतीचा संगम होऊन सज्जनांचा अभ्युदय होवो' असा वर मागतो. या भरतवाक्याने नाटक समाप्त होते. (अंक पाचवा)

* * *

विक्रमोर्वशीय नाटकाचे कथानक वेदातील प्राचीन कथेवर आधारलेले आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात पुरुरवा व उर्वशी यांचा संवाद असलेले सूक्त आढळते. पण त्या सूक्तावरून पूर्ण कथेचा बोध होत नाही. शतपथ ब्राह्मणात या विषयीची सविस्तर कथा आढळते. या कथेनुसार उर्वशी नामक अप्सरा ऐल पुरुरव्याच्या प्रेमात पडली. त्याच्याशी विवाहबद्ध होताना तिने दोन चमत्कारिक अटी घातल्या. तिचे दोन पाळीव मेंढे नेहमी तिच्याजवळ राहतील. दुसरी अट म्हणजे राजाने नग्न असताना तिच्या नजरेस पडू नये. राजाने तिच्या अटी मान्य केल्या.

पुढे चार वर्षांनी उर्वशीला गर्भ राहिला. गंधर्वांनी तिला स्वर्गात नेण्यासाठी युक्ती केली. त्यांनी तिच्या मेंढ्यास पळवून नेले. ते ओरडू लागताच जाग्या

झालेल्या उर्वशीने राजाला त्यांचे रक्षण करण्याची विनंती केली. राजा मग तसाच नग्नावस्थेत बाहेर आला. गंधर्वांनी एकदम विजेचा प्रकाश पाडला. राजा नग्न स्थितीत दिसताच उर्वशी तत्काळ गुप्त झाली.

मग तो तिला शोधत सरोवरानजिक आला. उर्वशी दिसल्यावर त्याने तिची विनवणी केली. तेव्हा ती म्हणाली, "हे पुरुरव्या, तुला माझी प्राप्ती होणार नाही. तू परत जा. तुझ्यापासून जो मला गर्भ राहिलेला आहे त्याची जोपासना देवस्त्रिया करतील. अपत्य होताच मी ते तुझ्याकडे पाठवून देईन." तिच्या बोलण्याने त्याचे समाधान झाले नाही. तो आत्मघाताला प्रवृत्त झालेला पाहून ती पुन्हा म्हणाली, 'स्त्रियांशी सख्य करणे अशक्य आहे. कारण त्यांची अंत:करणे लांडग्याप्रमाणे असतात.' पुढे एक वर्षाने तिला मूल होते. तिच्या विनंतीवरून पुरुरव्यास गंधर्वपद प्राप्त झाले.

आता पुरुरव्यासारख्या मर्त्यलोकावरील पुरुषाशी उर्वशीचा संबंध कसा शक्य झाला याचे थोडेफार स्पष्टीकरण षड्गुरुशिष्याच्या 'वेदार्थदीपिका' नामक टीकेत मिळते. मित्र आणि वरुण या दोन देवता व्रतस्थपणे राहात असता त्यांना एकदा उर्वशीचे दर्शन झाले. ते दोघे कामातूर होऊन स्खलित झाले. त्यांचे वीर्य एका कुंभावर पडले. (त्या पासून वशिष्ठ व अगस्ती हे ऋषी जन्माला आले) मित्र व वरुण या दोघांनी उर्वशीस शाप दिल्याने ती मृत्युलोकात आली.

विष्णुपुराणातील कथा बरीचशी 'शतपथ ब्राह्मणा'तील कथेप्रमाणेच आहे. जो थोडा फरक आहे तो याप्रमाणे - मित्र व वरुण यांच्या शापामुळे उर्वशी मृत्युलोकात आली. तिचे पुरुरव्यावर प्रेम जडले. तिने उपरोक्त दोन अटींवर त्याच्याशी लग्न केले. उर्वशी गेल्यामुळे स्वर्गातील रमणीयता नष्ट झाली. यास्तव गंधर्वांनी युक्ती योजून तिला स्वर्गात नेले. पुढे राजाच्या विनंतीवरून उर्वशीने त्याच्याबरोबर वर्षातून एक रात्र राहण्याचे मान्य केले. त्याच्यापासून उर्वशीला सहा पुत्र झाले. उर्वशी कायमची आपल्या जवळ असू द्यावी अशी त्याने गंधर्वांना विनंती केली. तेव्हा त्यांनी त्याला अग्निस्थाली दिली. पण त्याने ती थाळी अरण्यात फेकून दिली. त्यानंतर त्याला पश्चात्ताप होऊन तो पुन्हा अरण्यात गेला तेव्हा त्याला त्या स्थालीपासून शमी व अश्वत्थ ही दोन झाडे उगवलेली दिसली. त्याने प्रत्येक झाडाची एक एक फांदी घेऊन एकमेकांवर घासली. अग्नी उत्पन्न झाल्यावर त्याने याग केला व त्यायोगे त्यास उर्वशीची प्राप्ती झाली.

कथासरित्सागरातील कथा जरा निराळी आहे. पुरुरवा नावाच्या विष्णुभक्त राजास उर्वशीने नंदनवनात पाहिले व ती त्याच्यावर लुब्ध झाली. तोही तिला पाहून मोहित झाला. विष्णूने त्याची अवस्था पाहून नारदाकरवी इंद्रास उर्वशी पुरुरव्यास देण्याचा निरोप पाठवला. त्याप्रमाणे पुरुरवा तिला घेऊन भूलोकी आला. पुढे स्वर्गात अप्सराचे नृत्य चालले होते. रंभा नृत्य करताना चुकली म्हणून पुरुरवा हसला इतकेच नव्हे तर त्याने नृत्याचार्य तुंबरूचाही अपमान केला तेव्हा त्यांनी 'तुझा उर्वशीशी वियोग होईल' असा शाप दिला. कालांतराने राजाने विष्णूला प्रसन्न केले व उर्वशीची प्राप्ती करून घेतली.

मत्स्यपुराणात दिलेली कथा कालिदासाच्या नाटकाशी बरीच मिळती जुळती आहे. त्यात बृहत्कथा व विक्रमोर्वशीय नाटकातील कथांचे बेमालूम मिश्रण करण्यात आलेले आहे. काही पंडितांनी कालिदासाने आपली कथा 'मत्स्यपुराणा' वरून घेतली असावी असे म्हटले आहे, ते पटणारे नाही. पुराणात वेळोवेळी भर पडलेली आहे. तेव्हा मत्स्यपुराणाच्या कर्त्यानेच कालिदासाच्या नाटकावरून काही भाग पौराणिक कथेत घुसडलेला असावा. हा तर्क अधिक योग्य आहे.

तेव्हा शतपथ ब्राह्मण व विष्णुपुराण यात आलेल्या कथाच कालिदासाच्या नजरेसमोर असाव्यात. त्या कथांच्या आधारे आपली कथावस्तू निर्मिताना त्याने अनेक कलात्मक बदल केलेले आहेत. वरील कथातून त्याने चार महत्त्वाच्या गोष्टी घेतलेल्या आहेत. (१) पुरुरवा व उर्वशी यांचे एकमेकावर जडलेले प्रेम (२) उर्वशीचा झालेला वियोग (३) तिला झालेली संतती व (४) उभयतांचे पुनर्मीलन. पण त्यांची मांडणी करताना कालिदासाने स्वतंत्र प्रसंगांची निर्मिती केली आहे, हे ध्यानात घेतले पाहिजे.

(१) पुरुरवा व उर्वशी यांचे परस्परांवर प्रेम कसे जडले, हे मूळ कथेत दिलेले नाही. पुरुरव्याने केशी नामक दैत्याच्या हातून तिची सुटका केली हा प्रसंग कवीने रचून घातलेला आहे तसेच उर्वशी स्वर्गातून खाली आली याचे कारण भरतांनी तिला शाप दिला असे कालिदासाने कारण दिले आहे. तुंबरूच्या शापाऐवजी भरताच्या शापाची योजना केली आहे. पण हा शाप दोघांच्या पथ्यावरच पडलेला आहे.

(२) पुरुरव्याचा उर्वशीशी जो वियोग होतो, त्याचे कारण वेगळेच कल्पिलेले आहे. उर्वशीने घातलेल्या दोन असभ्य अटींना कालिदासाने पूर्ण फाटा दिला आहे. उर्वशी रागाच्या भरात चुकून कार्तिकेयाच्या वनात गेली व तिचे वेलीत

रूपांतर झाले असा प्रसंग कालिदासाने घातलेला आहे. सदर प्रसंगाची कल्पना त्याला पुरुरव्याच्या जन्मकथेवरून सुचली असावी असा डॉ. र. पं. कंगले यांचा तर्क आहे. तो मान्य करण्यास हरकत नाही.

(३) पुरुरव्यापासून एक मूल होईपर्यंतच उर्वशी त्याच्याजवळ राहू शकत होती. पण त्या अटीचे शब्द 'राजास त्या मुलाचे दर्शन होईपर्यंत' असे असल्याने उर्वशी आपल्याला झालेले मूल च्यवन ऋषींच्या आश्रमात ठेवते. संगमनीय मणीच्या स्पर्शाने उर्वशी लतारूपातून मुक्त होते.

(४) संगमनीय मण्याचे गिधाडाकडून अपहरण, कुमार आयूने तो मणी प्राप्त करून घेणे, कुमाराचे राजास दर्शन. उर्वशीवर वियोगाची आपत्ती व इंद्राचा आलेला निरोप हे सर्व प्रसंग कविनिर्मित आहेत. अशा तऱ्हेने मूळच्या ओबड-धोबड व अस्वाभाविक प्रसंगांनी भरलेल्या कथांतून कालिदासाने सुसंगत व कलापूर्ण कथानकाची निर्मिती केलेली आहे.

* * *

नाटकात पुरुरवा, उर्वशी व औशींनरी ही तीनच पात्रे महत्त्वाची आहेत व कवीने त्यांचे चित्रण काळजीपूर्वक केलेले आहे. राजा पुरुरवा हा अत्यंत शूर, विनयसंपन्न नायक आहे. पहिल्या अंकात तो उर्वशीची त्वरित सुटका करतो. इंद्राविषयी त्याच्या मनात अत्यंत आदर आहे. उर्वशीचे दर्शन होताच तो प्रथमदर्शनीच तिच्या प्रेमात पडतो. एवढा पराक्रमी राजा उर्वशीवर प्रेम बसल्यावर एकदम निष्क्रिय झालेला दिसतो. उर्वशीच आपण होऊन त्याच्याकडे दोन वेळा येते त्यामुळे व राणी औशीनरीने आपला प्रणयास असलेला विरोध सोडून दिल्यामुळे राजाला काहीच करावे लागत नाही.

उर्वशीवर मात्र त्याचे खरे प्रेम आहे. चौथ्या अंकात ती नाहीशी होताच तो अगदी वेडा होऊन जातो. वनातील झाडांना, पशू, पक्षी यांना तिची वार्ता विचारत हिंडू लागतो. शेवटच्या अंकात उर्वशी आपल्याला कायमची दुरावणार हे समजताच तो कुमार आयूस राज्याभिषेक करून वानप्रस्थ आश्रमात जाण्याचे ठरवतो. मात्र उर्वशीवर इतके प्रेम असताना तो विद्याधर कन्येस न्याहाळण्याची चूक कशी करतो, हे समजत नाही. डॉ. भटांनी ती कन्या म्हणजे लहान मुलगी होती. पदरी अपत्य नसल्याने तो तिच्याकडे वात्सल्याने पाहात होता असे काहीसे समर्थन केले आहे पण ते पटणारे नाही.

उर्वशीचे चित्रण कवीने (सामान्यपणे) यथातथ्य केले आहे. ती पुरुरव्यास पाहताच त्याच्या प्रेमात पडते. ती स्वर्वेश्या अथवा गणिका असली तरी कवीने तिचे चित्रण कुलीन युवतीप्रमाणेच केलेले आहे. तिचे पुरुरव्यावर इतके उत्कट प्रेम आहे की लक्ष्मीची भूमिका करीत असताना आपले मन पुरुषोत्तमावर जडले आहे असे म्हणण्याऐवजी 'पुरुरव्यावर' असे चुकून म्हणते व भरतमुनींच्या रोषास पात्र होते. पण हा शाप तिच्या पथ्यावर पडतो व ती राजाजवळ पत्नीप्रमाणे राहू लागते.

राजापासून गर्भ राहताच ती त्याबाबत गुप्तता पाळते व झालेला मुलगा च्यवन ऋषींच्या आश्रमात ठेवते. अन्यथा अपत्याचे राजाला दर्शन होताच उर्वशीस स्वर्गात परत जावे लागले असते. म्हणून पतिप्रेमापोटी ती अपत्यालाही दूर ठेवते. राजाशी विहार करताना त्याने विद्याधरकन्येकडे पाहिले या गोष्टीचा तिला अत्यंत राग येतो व ती दूर निघून जाते. हा तिचा मत्सरही प्रेमापोटीच उद्भवलेला आहे. लतारूपातून सुटका होताच ती राजाची क्षमा मागते. पाचव्या अंगात संगमनीय मणी हरवल्यामुळे गोंधळ उडतो. त्या मण्याच्या निमित्ताने कुमार आयूचे राजाला दर्शन होते. तेव्हा पुत्राच्या दर्शनाने आनंदित होण्याऐवजी राजाची आपली कायमची ताटातूट होणार या विचाराने तिच्या डोळ्यातून आसवे ओघळू लागतात. अर्थात इंद्राच्या कृपेने तिच्यावरचे संकट टळते हा भाग निराळा.

यावरून तिचे राजावरील प्रेम उत्कट असले तरी शारीरिक आहे, असा आरोप करता येणे शक्य आहे. तिला मुलाच्या विषयी यत्किंचितही ममता वाटत नाही. त्यापेक्षा पतिप्रेमाचीच मातब्बरी अधिक वाटते, हे खोटे नाही. पण भोगमूलक असले तरी तिचे प्रेम खरे आहे. हीही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. ती स्वर्गीय स्त्री आहे. त्यातून नृत्यांगना आहे. त्यामुळे प्रगल्भ व धीट आहे. प्रणयपूर्तीबाबत तीच सक्रिय झालेली आहे. ती मनाने सरळ आहे. औशीनरीला पाहिल्याबरोबर तिच्याविषयी तिच्या मनात आदर उत्पन्न होतो. खोटेपणा व निर्दयता हे अवगुण मूळ कथेतील उर्वशीच्या अंगी आहेत. पण कालिदासाने उर्वशीस सुसंस्कृत बनवले आहे.

एवढे दोघांचे एकमेकांवर प्रेम असूनही त्यांचे लग्न झालेले नाही ही गोष्ट विचारात घेण्याजोगी आहे. तिसऱ्या अंकाच्या शेवटी ती येते ती सरळ राजाची पत्नी झाल्याप्रमाणे राहू लागते हे थोडे खटकते. प्राचार्य करमरकरांनी कालिदासाने अप्सरेला नायिका बनवण्यात धाडस प्रकट केले आहे असे म्हटले आहे. पण

दोघांचा विवाह झालेला दर्शविण्याचे काही त्याला धैर्य झाले नाही. भासाच्या चारुदत्त नाटकात तसेच मृच्छकटिकात गणिका हीच नायिका आहे. चारुदत्ताने तिचा पत्नी म्हणून स्वीकार केला आहे. त्यामुळे वेश्येला नायिका बनविण्यात कालिदासाने विशेष काही केले असे म्हणता येत नाही.

मात्र दोघांच्या विवाहाचा प्रत्यक्ष निर्देश नसला तरी ती पुरुरव्याची सहधर्मचारिणी आहे हे निश्चित. कारण कंचुकीने तिचा उल्लेख 'देवी' असा केलेला आहे. नारदमुनीही त्या दोघांना 'दंपती' मानतात. इंद्राच्या निरोपातही उर्वशी ही 'सहधर्मचारिणी' असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तेव्हा उर्वशी ही लग्न न करता राजा जवळ 'तशीच' राहिली होती असे म्हणता येत नाही.

उर्वशीच्या चित्रणापेक्षा औशीनरीचे थोडक्यात रेखाटलेले व्यक्तिचित्र अधिक चटका लावणारे आहे. उर्वशीइतकेच औशीनरीचेही राजावर उत्कट प्रेम आहे. पण त्यात शालीनता व प्रौढ वयामुळे आलेली समज आहे. राजाचे मन दुसऱ्या स्त्रीवर जडले आहे असे समजताच ती आपला विरोध प्रकट करते. पण इरावतीप्रमाणे संतापाने फणफणत राजाला वाक्ताडन करीत नाही. तिचा विरोध सौम्य स्वरूपाचा आहे. पण त्याचाही तिला पश्चात्ताप होतो. राजाला सुखी करण्यासाठी ती दोघांच्या मार्गातून आपण होऊन बाजूला होते. तिच्या अंगी खऱ्या आर्यस्त्रीचे गुण आहेत. तिचे राजावरील प्रेम त्यागमूलक आहे तर उर्वशीचे प्रेम हे भोगमूलक आहे. हा विरोध लक्षात घेण्यासारखा आहे. तिच्या त्यागामुळे तिच्या चित्रणास उंची प्राप्त झाली आहे. 'मालविकाग्निमित्रा'तील धारिणीपेक्षाही औशीनरीचे चित्रण उठावदार झाले आहे.

राजाचा प्रियमित्र माढव्य अथवा विदूषक याची व्यक्तिरेखा अगदीच सुमार आहे. विदूषक हा खादाड, निरक्षर व मूर्ख असला पाहिजे असा थोडा फार पायंडा पडलेला दिसतो. कालिदासाचा गौतम हा त्यास तेजस्वी अपवाद आहे. पण का कोणास ठाऊक राजाचे चित्रण उठावदार करण्यासाठी कालिदासाने या व पुढे शाकुंतलातील विदूषकाचे परंपरागत स्वरूप कायम ठेवले आहे. माढव्याचे बोलणे चुरचुरीत आहे. तो मार्मिक बोलून हशा पिकवतो. पण तो मुलखाचा अजागळ आहे. निपुणिकेने थाप मारताच तो लगेच फसून उर्वशीचे नाव सांगतो. राजाने त्याच्या हातात दिलेले भूर्जपत्र त्याला नीट सांभाळता येत नाही. राजाबरोबर सतत राहून त्याला धीर देण्याचे व कथानकातील ताण कमी करण्याचे काम करतो यापलीकडे त्याच्यात कोणताही गुण नाही. उर्वशीची सखी चित्रलेखा

हिचेही चित्रण पुसटच झालेले आहे. माढव्याप्रमाणे तीही मार्मिक व समयसूचक उद्‌गार काढते. पण तिसऱ्या अंकाच्या अखेरीस तिची कामगिरी संपल्यावर नाटककाराला तिची आठवणही राहिलेली नाही. औशीनरीची दासी निपुणिका ही चलाख आहे. ती थाप मारून विदूषकाकडून राजाचे रहस्य काढून घेते. उर्वशीचे प्रेमपत्र राणीला वाचून दाखवते.

कुमार आयूचे पाचव्या अंकात दर्शन होते. तो पंधरा-सोळा वर्षांचा तरी असावा. राजाप्रमाणे तोही निर्भय व शूर आहे. एका बाणात तो गिधाडास पाडून संगमनीय मणी हस्तगत करतो. उर्वशी कायमची निघून जाणार या विचाराने दु:खी झालेला राजा कुमारास राज्याभिषेक करून वनात जाण्याचे ठरवतो. पुरुरवा व उर्वशी या दोघांनाही मुलाबद्दल प्रेमाचा उमाळा आलेला नाही, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. नाटकाच्या अखेरीस त्यास यौवराज्याभिषेक झाला असला तरी आई-बापाचे प्रेम काही त्याला लाभलेले नाही.

* * *

'मालविकाग्निमित्रा'शी तुलना करता प्रस्तुत नाटकात संविधानकाच्या रचनेचे चातुर्य कमी आढळते. पहिल्या नाटकात उथळपणा जास्त असला तरी सतत काही घडत राहते. यात घटना कमी आहेत. दुसऱ्या व तिसऱ्या अंकात काही घडत नाही. शिवाय प्रसंगातही तोच तोपणा आलेला आहे. चौथ्या अंकात कथानकाला कलाटणी मिळाली असली तरी अंकभर राजाचा कंटाळवाणा विलाप आहे. अर्थात यातील श्लोक काव्यपूर्ण आहेत. पुरुरव्याचे उर्वशीवरील उत्कट प्रेमही उत्तमपणे व्यक्त झाले आहे. रंगभूमीवरही हा भाग कंटाळवाणा न होण्याची शक्यता आहे. तरी देखील कथानक पुढे सरकण्याच्या दृष्टीने हा अंक निरुपयोगी आहे. पाचव्या अंकात मात्र कथानकाला गती मिळालेली आहे. तेव्हा या नाटकात घटना-प्रसंगांना प्राधान्य नाही हे स्पष्ट आहे. तसेच धारदार संघर्षही नाही. दुसऱ्या अंकात काय ती संघर्षाची ठिणगी पडते. पण राणी औशीनरीने माघार घेतल्याने तीही विझून जाते. त्यामुळे संघर्षासही जवळजवळ स्थान नाही. म्हणून रचनाचातुर्याच्या दृष्टीने हे नाटक कमी दर्जाचे आहे.

नाटकातील अद्‌भुताचे वातावरणही ही कथा तरल बनविण्यास मदत करणारे आहे. उर्वशी ही अप्सरा आहे. तिचा स्वर्ग व पृथ्वी या दोन्हीकडे सहज संचार आहे. पुरुरव्याच्या अंगीही ते सामर्थ्य आहे. शिवाय उर्वशीला 'तिरस्करिणी' विद्या अवगत आहे. त्यामुळे ती मनात येईल तेव्हा अदृश्य होऊ शकते. उर्वशीचे

वेलीत रूपांतर होणे, हा नाटकातील सर्वात अद्भुत प्रसंग आहे. त्याचप्रमाणे गर्भधारणेची चिन्हे दिसू न देता अपत्यास जन्म देणे हीही गोष्ट अद्भुत वाटण्यासारखी आहे. सारांश, या नाटकाचे पाय पृथ्वीवर ठरत नाहीत. शाकुंतलातील हरिणांच्या पायाप्रमाणे ते क्षणमात्रच पृथ्वीवर टेकलेले दिसतात. त्यामुळेच या नाटकात लौकिक घटनांना किंवा तथाकथित संघर्षाला प्राधान्य मिळालेले नाही.

वास्तविक पाहता हे पाच अंकी नाटक आहे. याला 'त्रोटक' या उपरूपकाची लक्षणे लागू होतात यास्तव 'साहित्यदर्पणा'त याचा 'त्रोटक' म्हणून उल्लेख केला आहे. या प्रकारात सात, आठ, नऊ अथवा पाच अंक असतात. यातील पात्रे देवता व मानव ही असतात. मुख्य म्हणजे याच्या प्रत्येक अंकात विदूषक उपस्थित असतो. यातील मुख्य रस शृंगार हा असतो. विक्रमोर्वशीयाच्या पहिल्या व चौथ्या अंकात विदूषक उपस्थित नाही. मात्र इंद्रादी देव, अप्सरा ही पात्रे दैवी आहेत तर पुरुरवा, औशीनरी, विदूषक हे मानव आहेत. सात अंक असलेल्या त्रोटकाचे नाव 'स्तभितरम्भ' असे दिलेले आहे.

नाट्यांतर्गत काळ साधारणपणे सोळा वर्षांचा असावा. प्रा. काळे यांच्या मतानुसार तो तेरा वर्षांचा आहे. पहिल्या तीन अंकांचा काळ जास्तीत जास्त तीन आठवड्यांचा आहे. तसेच चौथ्या व पाचव्या अंकातील घटना लागोपाठ - एक दोन दिवसांच्या अंतराने घडलेल्या आहेत. कुमार आयु किती वर्षांचा आहे हे नाटककाराने सांगितलेले नाही. पण तो वयाने मोठा आहे. धनुर्विद्येत तो निपुण आहे. 'तो ब्रह्मचर्याश्रमातून गृहस्थाश्रमात प्रवेश करण्यास योग्य झालेला आहे.' हे राजाचे पाचव्या अंकातले उद्गार तो सोळा वर्षांचा असावा हे सूचित करतात. तसेच नाटकाच्या अखेरीस त्यास यौवराज्याभिषेकही करण्यात आला आहे. त्यामुळे तिसऱ्या व चौथ्या अंकाच्या दरम्यान सोळा वर्षांचा काळ उलटलेला आहे. त्यामुळे प्राचार्य करमरकर व प्रो. काळे यांनी हे अंतर बारा वर्षांचे मानलेले आहे, ते योग्य वाटत नाही.

जाता जाता एक दोन गोष्टींचा निर्देश करणे आवश्यक वाटते. पाचव्या अंकात पुरुरव्याने नैमिषेय सत्राचा उल्लेख केला आहे. त्या वेळी राजा उर्वशीजवळ नव्हता. त्याआधी त्याला उर्वशीच्या गर्भधारणेची जाणीव झालेली नव्हती. प्रश्न असा आहे की उर्वशीने आपला पुत्र च्यवन ऋषीच्या आश्रमात केव्हा ठेवला? कारण चौथ्या अंकाच्या सुरुवातीस उर्वशी रागारागाने कुमारवनात

गेल्यामुळे तिचे लतेत रूपांतर झाले असे चित्रलेखा सांगते. यावरून त्याच्या अगोदर उर्वशी आश्रमाकडे गेली असावी. त्यामुळे एक मूल झाल्यानंतर उर्वशी गंधमादन पर्वतावर विहार करायला गेली असे म्हणावे लागते. तसेच ती पंधरा-सोळा वर्षे लतेच्या रूपात राहिली होती काय? असा प्रश्न पडतो. कुमार आयूला प्रत्यक्ष रंगभूमीवर आणण्यासाठी व त्याच्या पराक्रमाला अवसर देण्यासाठी कालिदासाने सारी कथा बिघडवून टाकली आहे.

तसेच राजा व विदूषक बोलत असता उर्वशी व चित्रलेखा यांचे तेथे अचानक येणे व त्यांचे बोलणे उर्वशीच्या कानावर पडणे या प्रसंगाची निष्कारण पुनरावृत्ती झाली आहे. मालविकाग्निमित्रातील चुका दुरुस्त करत असताना कवीने अनवधानाने असे प्रमाद केले आहेत. उर्वशीचा दीर्घ विरह व त्यानंतर राजाला पुत्र झाल्याचे समजणे, ह्या घटना पाहिल्या म्हणजे कालिदास शाकुंतलाची तयारी करीत असावा असे वाटते. या नंतर त्याचे सर्वांगसुंदर व संस्कृत नाट्यसृष्टीतील प्रथम क्रमांकाचे जे अभिज्ञान शाकुंतल नाटक त्याचा आता परिचय करून घेऊ.

## ३. अभिज्ञान शाकुंतल

कालिदासाचे 'शाकुंतल' हे सर्वोत्कृष्ट नाटक आहे. याच नाटकाच्या पहिल्या इंग्रजी भाषांतरामुळे साऱ्या जगाला संस्कृत साहित्याचा परिचय झाला. फ्रेंच विद्वान शेझी हे नाटक वाचून आनंदाने वेडा झाला तर गोएथ (Geothe) या जर्मन पंडिताने 'शाकुंतला'ची प्रशंसा करणारी कविता लिहिली. जगातील शंभर उत्कृष्ट पुस्तकात 'शाकुंतला'स स्थान लाभलेले आहे. प्रो. एम.आर. काळे म्हणतात की भारतातील कोणतेही ग्रंथालय शाकुंतलाची प्रत असल्याशिवाय परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही. जगातील पंडितांच्या कौतुकास पात्र झालेले नाटक आपल्या आवडत्या नाटककाराने कालिदासाने लिहिले या गोष्टीचा भारतीयांना जरूर अभिमान वाटतो.

हे नाटक सात अंकी असून यात दुष्यंत व शकुंतला यांच्या प्रणयाची, ताटातुटीची व पुनर्मीलनाची हृदयस्पर्शी कथा आहे. महाभारतात असलेल्या साध्यासुध्या कथेस कालिदासाने नव्या स्वरूपात सादर केले आहे. पुरुवंशातील प्रख्यात राजा दुष्यंत हा या नाटकाचा नायक आहे, तर विश्वामित्र व मेनका

यांच्या संबंधातून जन्माला आलेली व कण्वमुनींनी प्रतिपाळ केलेली शकुंतला ही नायिका आहे.

सृष्टीतील चंद्र-सूर्यादी अष्ट रूपांनी प्रकट होणाऱ्या भगवान शंकरास नमन करून कवीने नाटकास प्रारंभ केला आहे. सूत्रधार आपण कालिदासाने रचलेल्या 'अभिज्ञान शाकुंतला'चा प्रयोग करणार असल्याचे सांगतो. नाटकाचा प्रयोग जरी व्यवस्थित बसविलेला असला तरी तो रसिकांना पसंत पडेल की नाही याची सूत्रधारास चिंता लागलेली आहे. मग तो नटीस समयास उचित असे गीत म्हणण्यास सांगतो. ती ग्रीष्म ऋतूचे वर्णन असलेले गीत म्हणते. तिचे गाणे ऐकत असता सूत्रधार इतका तल्लीन होतो की आपण कोणते नाटक सादर करणार आहोत हेच विसरतो. दुष्यंत राजा रथात बसून शिकारीला निघाला आहे अशी सूचना देऊन तो निघून जातो.

मुख्य प्रवेशात रथात बसलेला राजा एका हरणाचा पाठलाग करताना दिसतो. हरीण भीतीने पुढे पळत आहे. त्याच्या तोंडातून अर्धवट चघळलेले घास पडत आहेत. तो इतक्या वेगाने पळत आहे की त्याचे पाय क्षणभरच भूमीला टेकतात. एरव्ही ते अंतराळीच असल्यासारखे वाटतात. राजा त्या हरणावर बाण टाकणार इतक्यात "हे राजा, हा आश्रमातील हरीण आहे. यास मारू नकोस." असे शब्द ऐकू येतात. राजा सारथ्यास रथ थांबविण्यास सांगतो. आश्रमातील वैखानस नावाचा ऋषिकुमार राजापुढे येतो. राजा आपला बाण पाठीमागे घेतो तेव्हा वैखानस आनंदाने राजाला 'तुला चक्रवर्ती पुत्र होईल' असा आशीर्वाद देतो. जवळच कण्वाचा आश्रम आहे पण 'कुलपती कण्व सोमतीर्थाला गेले आहेत. आश्रमात त्यांची कन्या शकुंतला आहे.' असे समजते. राजा आश्रमास भेट देण्याचे ठरवतो.

आपल्या अनुयायांना बाहेर ठेवून राजा एकटाच आश्रमाकडे जातो. त्याला बागेत शकुंतला व तिच्या दोन मैत्रिणी दिसतात. तो झाडाच्या आड उभा राहून त्यांचे संभाषण ऐकू लागतो. त्या मुली झाडांना पाणी घालत असतात. राजाने अंत:पुरात अनेक सुंदर तरुणी पाहिलेल्या होत्या. पण त्यांच्यापेक्षाही या वनात वाढलेल्या तरुण मुली आकर्षक दिसत होत्या. विशेषत: शकुंतला साध्या वल्कलातही सुंदर दिसत होती. तेव्हा जातीच्या सुंदराला कोणतीही गोष्ट शोभून दिसते, हे तत्त्व राजाला जाणवते.

इतक्यात एक भ्रमर येऊन शकुंतलेच्या मुखाभोवती घोटाळू लागतो. राजाला त्या भ्रमराचा हेवा वाटतो. तो म्हणतो -

"हे भ्रमरा, तू वारंवार तिच्या चंचल व फडफडणाऱ्या नेत्रांना स्पर्श करतोस. तिच्या कानाजवळ जाऊन गुंजारवाच्या मिषाने जणू प्रेमाच्या गोष्टी करतोस. ती आपले दोन्ही हात (अस्वस्थ होऊन) हलवीत असता तिच्या अधरोष्ठाचे आनंददायक चुंबन घेतोस. हे मधुकरा, (तिच्या विषयीच्या) सत्याचा शोध घेणारे आम्ही हतभागी मागे राहिलो, तू मात्र भाग्यवान ठरलास."

(अंक १, श्लोक २१)

भुंगा त्रास देऊ लागताच राजा पुढे होतो. प्रियंवदा त्यास बसण्याची विनंती करते. राजाला पाहून शकुंतलेच्या मनात तपोवनविरोधी भावना उद्भवू लागतात. मग अनसूया राजाची चौकशी करते. राजा आपण दुष्यंताने नियुक्त केलेला अधिकारी आहोत, अशी बतावणी करतो. मग तो आपल्या मनातली शंका बोलून दाखवतो. 'महर्षी कण्व हे नैष्ठिक ब्रह्मचारी आहेत तर मग ही त्यांची कन्या कशी?' यावर अनसूया त्यास ती मेनका व विश्वामित्र यांची कन्या असल्याचे सांगते. मेनकेने तिला टाकून दिल्याने कण्वमुनींनी तिचा सांभाळ केलेला आहे.

मग राजा आडवळणाने शकुंतला विवाह करणार आहे की कायम आश्रमातच राहणार आहे, असा प्रश्न करतो. तेव्हा त्याला कण्वांनी तिला अनुरूप वर पाहून देण्याचे ठरविले आहे, असे प्रियंवदा सांगते. मग शकुंतला जाऊ लागते तेव्हा 'झाडांना पाणी घालताना तू माझे दोन घडे देणे आहेस. ते फेड' असे म्हणून प्रियंवदा तिला मागे फिरवते. मग राजाच 'ती आता पाणी भरून थकलेली दिसते तेव्हा तिचे ऋण मी फेडतो' असे म्हणून आपल्या हातातली अंगठी पुढे करतो. पण आपल्या 'मधुर भाषणाने ती ऋणमुक्त झाली आहे' असे सांगून प्रियंवदा अंगठी देऊन टाकते.

त्यांच्या अशा गोष्टी चालल्या असता पडद्यातून सूचना ऐकू येते की, राजा दुष्यंताने आश्रमास भेट दिली असून सैनिकांच्या दर्शनाने प्राणी त्रस्त झाले आहेत. तसेच एक हत्ती रथाच्या दर्शनाने भेदरून झाडावर सुळे आपटत असता त्याच्या पायात वेली अडकल्याने स्थानबद्ध झाला. त्याच्या दर्शनाने हरणे पळू लागली आहेत व तो हत्ती तपोवनाकडे येत आहे.

असा गोंधळ उडाल्याने राजा त्या तिघींचा निरोप घेतो. त्याही आश्रमाकडे जाऊ लागतात. शकुंतला जाताना पायाला काटा बोचल्याचे निमित्त करून तर नंतर फांदीला वल्कल अडकले म्हणून दुष्यंताकडे वारंवार वळून पाहात निघून जाते. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी विदूषक प्रवेश करतो. राजाच्या शिकारीच्या नादाला तो पार कंटाळलेला आहे. तशात राजाचे शकुंतलेवर प्रेम जडल्याने तो राजधानीकडे जाण्याचे नावही काढीत नाही. नंतर राजा येतो. तो शकुंतलेच्या आठवणीमुळे बेचैन झालेला आहे. विदूषक राजा दिसताच त्याच्या शिकारीच्या नादावर टीका करतो. राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करून राजाने वन्यप्राण्यांमागे हिंडत राहावे, हे विदूषकाला मुळीच पसंत नाही. विदूषकाची टीका ऐकून राजालाही शिकारीला जावेसे वाटत नाही. मग तो सेनापतीला बोलावून एक दिवस शिकार थांबविण्याची आज्ञा देतो.

सेनापती निघून गेल्यावर राजा विदूषकापुढे शकुंतलेच्या सौंदर्याचे वर्णन करतो. तेव्हा 'गोड खजूर खाऊन कंटाळल्यावर एखाद्याला चिंच खायची इच्छा व्हावी त्याप्रमाणे अंत:पुरातील सुंदर स्त्रियांचा उपभोग घेतल्यावर राजाला शकुंतलेची अभिलाषा वाटत आहे.' असा विदूषक टोमणा मारतो. यावर राजा म्हणतो, "तू तिला अजून पाहिली नाहीस म्हणून असे बोलत आहेस." राजाच्या मते शकुंतला म्हणजे -

"कुणीही न हुंगलेले फूल आहे. नखाने न तोडलेला अंकूर आहे, वेज न पाडलेले रत्न आहे, आस्वाद न घेतलेला मध आहे. अखंड अशा पुण्याचे फळ आहे. अशा स्त्रीची योजना कोणत्या पुरुषासाठी विधात्याने केली आहे हे समजत नाही."

(अंक २, श्लोक १०)

राजाला आश्रमात जायचे आहे पण कोणत्या निमित्ताने जावे हे समजत नाही. त्याच वेळी आश्रमातून ऋषिकुमार येतात व राक्षसापासून यज्ञाचे रक्षण करण्यासाठी काही दिवस थांबण्याची राजाला विनंती करतात. राजा या विनंतीचा स्वीकार करतो. ऋषिकुमार गेल्यावर राजधानीकडून एक दूत येतो व राजमातेचा निरोप राजाला सांगतो. 'पुत्रपिंडपालन' नामक व्रतानिमित्त राजाने त्वरित राजधानीला यावे असा तो निरोप असतो. राजा पेचात सापडतो व स्वत:ऐवजी विदूषकास राजधानीस पाठविण्याचे ठरवतो. त्यामुळे विदूषकाच्या मनातील गोष्ट साध्य होते. आता राजधानीत गेल्यावर तो शकुंतलेविषयी अंत:पुरात बोलेल म्हणून राजा त्यास सांगतो की 'शकुंतलेबाबत जे मी तुला सांगितले ते काही खरे नाही. ती सारी थट्टा होती.' भोळ्या विदूषकाला खरे वाटते. तो राजधानीकडे रवाना होतो. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस विष्कंभक आहे. आश्रमातील एक शिष्य दर्भ घेऊन येतो. दुष्यंताच्या निवासामुळे सर्वांना अत्यंत सुरक्षित वाटत आहे. इतक्यात त्याला प्रियंवदा हातातून कोवळी पालवी, कमळाचे देठ व वाळ्याची उटी इत्यादी सामग्री घेऊन जाताना दिसते. ही सामग्री शकुंतलेचा ग्रीष्मसंताप कमी करण्यासाठी नेली जात आहे असे समजते.

मुख्य प्रवेशात राजा विमनस्क स्थितीत दिसतो. तो मालिनी नदीच्या काठावरील लतामंडपाकडे जातो. तेथे त्याला शकुंतला पुष्पशय्येवर पहुडलेली दिसते. तिचीही अवस्था त्याच्याप्रमाणेच बिकट झालेली आहे. त्यांच्या भाषणावरून शकुंतला राजाच्या प्रेमात पडल्याचे समजते. दोघी मैत्रिणी तिला प्रेमपत्र लिहून आपला भाव व्यक्त करण्यास सांगतात. ती पत्र वाचून दाखवताच राजा पुढे होतो. मैत्रिणी त्याला शकुंतलेच्या प्रेमाचा स्वीकार करण्याची विनंती करतात व निघून जातात. एकांतात शकुंतला राजास अविनय न करण्यास बजावते. तो गांधर्व विवाहाचा प्रस्ताव पुढे करतो. तो तिचे चुंबन घेणार इतक्यात गौतमी आत्या तिकडेच येत असल्याची सूचना मिळते. राजा झाडाआड लपतो, शकुंतला गौतमी आत्याबरोबर जाते. राजाही यज्ञाचे रक्षण करण्याच्या कामासाठी निघून जातो. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. अनसूया व प्रियंवदा या शकुंतलेच्या मैत्रिणी फुले गोळा करीत आहेत. त्यांच्या संभाषणावरून दुष्यंत व शकुंतला यांचा गांधर्वविवाह होऊन दुष्यंत आपल्या राजधानीस परत गेला असल्याचे समजते. अनसूयेला राजा शकुंतलेला विसरून जाईल अशी काळजी वाटते तर प्रियंवदेला कण्व ऋषींना हा वृत्तांत समजल्यावर ते काय म्हणतील याची चिंता पडलेली आहे.

इतक्यात पडद्यातून अतिथीचा आवाज येतो. शकुंतला झोपडीजवळच असल्याने त्या दुर्लक्ष करतात पण अतिथीचे शापवचनच त्यांच्या कानावर पडते. तो अतिथी दुसरा तिसरा कोणी नसून शीघ्रसंतापी दुर्वास होता. शकुंतलेने आपली दखल घेतली नाही असे पाहून तो म्हणतो -

"तू ज्यांच्या चिंतनात मग्न राहून माझ्या आगमनाची दखल घेतली नाहीस तो तू जरी त्याला स्मरण करून देण्याचा प्रयत्न केलास तरी, मदिरेने उन्मत्त झालेल्या माणसाला आपले बोलणे जसे स्मरत नाही तसे त्याला तुझे स्मरण राहणार नाही."

(अंक ४, श्लोक १)

ही शापवाणी ऐकताच दोघी हादरतात. मग प्रियंवदा घाईघाईने दुर्वासाच्या पाठोपाठ जाते व शकुंतलेच्या वतीने त्याची क्षमा मागते. दुर्वास मग शांत होऊन उ:शाप देतो की ओळख पटवणारी वस्तू दाखवताच त्याची स्मृती परत येईल. राजाने शकुंतलेला आपले नाव कोरलेली अंगठी दिली असल्याने दोघींना हायसे वाटते. शकुंतलेला मात्र यातील काहीच ठाऊक नाही. त्या दोघीही हे रहस्य आपल्या जवळच ठेवायचे ठरवितात.

मुख्य प्रवेशात या दोघी पुन्हा एकमेकींना भेटतात. राजा राजधानीला जाऊन बरेच दिवस झाले तरी त्याने सांगितल्याप्रमाणे मनुष्य आला नाही. तेव्हा दुर्वासाच्या शापाचा अमल सुरु झाला असावा असे अनसूयेला वाटते. प्रियंवदा तिला आनंदाची वार्ता सांगते. कण्व मुनी प्रवासाहून परत आले. त्यांची व शकुंतलेची भेट झाली. अशरीरीवाणीच्या योगे त्यांना तिचा वृत्तांत समजला. त्यांनी शकुंतलेचे अभिनंदन केले व ते आजच शकुंतलेची सासरी रवानगी करणार आहेत. शकुंतला गरोदर आहे हेही सांगितलेले आहे.

मग शकुंतलेला पाठविण्याची तयारी सुरू होते. तपस्विनी तिला आशीर्वाद देतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आश्रमाच्या परिसरातील झाडेही तिला अमूल्य भेटवस्तू अर्पण करतात. एका वृक्षाने तिच्यासाठी शुभ्र रेशमी वस्त्र दिले तर दुसऱ्याने लाक्षारस म्हणजे अळिता दिला. इतर वृक्षांनी अलंकार प्रदान केले.

मग स्नान आटोपून कण्वमुनी येतात. शकुंतला आज सासरी जाणार म्हणून त्यांना हुरहुर वाटत आहे. शकुंतला त्यांच्या पाया पडते तेव्हा 'तू पतीला प्रिय हो व तुला चक्रवर्ती पुत्र होऊ दे' असा ते आशीर्वाद देतात. त्यानंतर वनातील देवताही तिला आशीर्वाद देतात. ती निघाल्यावर तपोवनातील पशु, पक्षी व्याकूळ होतात. हरणाच्या तोंडातून दर्भाचा घास खाली पडतो. मोरांचे नृत्य थांबते. वेली अश्रू ढाळतात.

हरिणाचे पाडस तिच्या पदराला ओढू लागते. मग कण्वमुनी शकुंतलेला सासरी कसे वागावे याचा थोडक्यात उपदेश करतात -

"वडील मंडळींची सेवा कर. सवतीशी प्रेमाने वाग. पतीने विपरीत आचरण केले तरी रागावू नकोस. सेवकाबरोबर सौम्यपणे व्यवहार कर. वैभवाने गर्विष्ठ बनू नकोस. अशा वागण्यानेच स्त्रिया गृहिणीपदास पोहोचतात. याच्या उलट आचरण करणाऱ्या स्त्रिया कुळास लागलेल्या शापाप्रमाणे असतात."

(अंक ४, श्लोक १८)

मग शकुंतला आपल्या दोन्ही मैत्रिणींना एकदम आलिंगन देते. तेव्हा त्या म्हणतात, "शकुंतले, राजाने तुला ओळखले नाही, तर त्याला त्याचे नाव असलेली ही अंगठी दाखव." त्याबरोबर शकुंतला भयभीत होते. त्या तिची समजूत करतात. शकुंतला गौतमी आत्याबरोबर जावयास निघते. ती गेल्यावर कण्व म्हणतात, "शकुंतलेला सासरी पाठवून मी जबाबदारीतून मुक्त झालो आहे."

"कन्या हे परक्याचे धन आहे. आज तिला तिच्या पतीच्या घरी पाठवल्यामुळे ज्याची ठेव त्याला परत केल्याचे समाधान माझ्या अंतरात्म्यास लाभले आहे." (अंक चौथा)

(अंक ४, श्लोक २२)

पाचव्या अंकाच्या सुरुवातीस राजा व विदूषक प्रवेश करतात. इतक्यात त्यांना संगीतशाळेच्या दिशेने गाण्याचे स्वर ऐकू येतात. हंसपदिका ही राजाची आवडती राणी गीत गात असते. त्या गाण्यात राजा आपल्याला सोडून दुसऱ्या राणीकडे गेल्याबद्दल राजाला टोमणा असतो. तेव्हा राजा तिची समजूत घालण्यासाठी विदूषकाला पाठवून देतो. इतक्यात कण्वमुनींचा संदेश घेऊन ऋषिकुमार बाहेर आले असल्याची वार्ता समजताच तो त्यांची भेट घेण्यासाठी अग्निगृहात जातो.

शार्ङ्गरव, शारद्वत या दोन ऋषिकुमारांसमवेत शकुंतला व गौतमी आत्या त्या ठिकाणी येतात. शार्ङ्गरव कुशल प्रश्नोत्तरे झाल्यावर शकुंतलेचा स्वीकार करण्याची राजाला विनंती करतो. पण राजावर दुर्वासाच्या शापाचा पगडा असल्याने त्याला काहीच आठवत नाही. त्यामुळे तो "काय? मी हिचे पाणिग्रहण केले आहे?" असा सर्वांनाच आश्चर्याचा धक्का देणारा प्रश्न विचारतो.

शकुंतलेच्या मुखावरील अवगुंठण दूर झाल्यावरही त्याला तिची ओळख पटत नाही. तो तिचे अनुपम सौंदर्य पाहून मोहित होतो पण अधर्माचरणाच्या भीतीने तिचा स्वीकार करण्याचे साहस करीत नाही. अखेरचा उपाय म्हणून शकुंतला आपल्या बोटातील अंगठी पुढे करण्याचे ठरवते. पण तिच्या दुर्दैवाने ती अंगठी शचितीर्थात पडलेली असते. मग शकुंतला एकांतातील एक प्रसंग सांगून त्याची खात्री पटविण्याचा प्रयत्न करते. पण राजा तिला लबाड ठरवतो. तीही राजाला अनार्य, ढोंगी म्हणते. अखेरीस ऋषिकुमार शकुंतलेला तेथेच सोडून जावयास निघतात. शार्ङ्गरव शकुंतलेला स्पष्ट बजावतो -

"राजा म्हणतो त्याप्रमाणे तू खरोखरच कुलटा असशील तर तुझ्या पित्याला तुझ्याशी काय कर्तव्य आहे? आणि जर आपण शुद्ध आहोत असे तुला वाटत असेल तर नवऱ्याच्या घरी दासी म्हणून राहणे, हेच तुला योग्य आहे."

(अंक ५, श्लोक २७)

शकुंतलेची अवस्था दयनीय होते, इकडे राजा तिचा स्वीकार करीत नाही व ऋषिकुमार तिला परत घेऊन जात नाहीत. यावर राजाचा पुरोहित एक उपाय सुचवतो. "महाराज, ही प्रसूत होईपर्यंत माझ्या घरी राहील. जर हिला चक्रवर्ती चिन्हांनी युक्त असलेला मुलगा झाला तर आपण तिचा धर्मपत्नी म्हणून स्वीकार करावा, नाही तर तिला पित्याकडे पाठवून द्यावे." शकुंतला रडत रडत त्याच्या मागे जाऊ लागते. इतक्यात आकाशातून एक तेजस्वी आकृती जमिनीवर येते व शकुंतलेला उचलून अंतराळात अदृश्य होते. सर्वांना या घटनेचे नवल वाटते. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या सुरुवातीस प्रवेशक आहे. राजश्यालक व दोन शिपाई एका कोळ्याला पकडून आणतात. त्याच्यावर राजाची अंगठी चोरल्याचा आरोप असतो. त्याच्या जवळ राजाचे नाव कोरलेली अंगठी असते. ती कोठून आली असे विचारल्यावर तो जी हकीकत सांगतो ती विस्मयजनक आहे - तो शक्रघाटावर मासे पकडत होता. एके दिवशी त्याला तांबडा मासा सापडला. तो मासा चिरल्यावर त्याच्या पोटात ही अंगठी सापडली. पण शिपायांना हे काही पटत नाही.

त्याला पकडून राजाकडे आणण्यात येते. राजश्यालक ती अंगठी घेऊन राजाकडे जातो. ती अंगठी दिसताच राजाची स्मृती एकदम परत येते. शकुंतलेचे स्मरण होऊन तो अश्रू ढाळू लागतो. तो लागलीच अंगठीच्या किमतीएवढी रक्कम कोळ्यास बक्षीस देण्यास सांगतो. राजश्यालक बाहेर येऊन कोळ्याला आनंदाची बातमी सांगतो. सर्व जण आनंद साजरा करण्यासाठी दारूच्या गुत्त्याकडे जातात.

मुख्य प्रवेशात आकाशमार्गाने सानुमती नावाची अप्सरा खाली येते. ती दुष्यंताची स्थिती पाहण्यासाठी आलेली आहे. उद्यानात दोन दासी आंब्याचा मोहोर तोडत असतात. त्या वेळी कंचुकी येऊन राजाने शकुंतलेचे स्मरण झाल्याने शोकाकुल होऊन वसंतोत्सवास बंदी घातली आहे असे सांगतो. नंतर राजा व विदूषक प्रवेश करतात. शकुंतलेचा विषय निघताच विदूषक "आपणच ही

सारी थट्टा आहे'' असे मला सांगितलेत असा खुलासा करतो. नंतर राजाने काढलेले शकुंतलेचे चित्र घेऊन दासी उद्यानात येते. शकुंतलेची तसबीर पाहून सानुमतीला आश्चर्य वाटते.

एवढ्यात कामकाजाचे कागद घेऊन राजाचा अमात्य येतो. धनमित्र नावाचा व्यापारी समुद्रप्रवासात जहाज फुटल्याने मरण पावला होता. त्याला काही मूलबाळ नव्हते. त्यामुळे तत्कालीन कायद्याप्रमाणे त्याची सारी संपत्ती सरकारजमा होणार होती. ही हकीकत समजल्यावर राजा व्यथित होतो कारण तो स्वत: अपत्यहीन होता. म्हणून तो धनमित्राच्या बायकांपैकी कोण गरोदर आहे का? याची चौकशी करण्यास सांगतो.

त्याच वेळी विदूषकाच्या ओरडण्याचा आवाज येऊ लागतो. त्याला कोणी अदृश्य राक्षसाने पकडले असावे असे राजाला वाटते. तो धनुष्यास बाण लावतो. इतक्यात इंद्राचा सारथी मातली प्रकट होतो. तो राजाला इंद्राचा निरोप सांगतो. असुरांबरोबरच्या युद्धात इंद्राने दुष्यंताची मदत मागितली होती. त्यासाठी तो आला होता. पण राजा त्या वेळी शोकमग्न होता. त्याला राग आणण्यासाठी म्हणून मातलीने गुप्तरूपात विदूषकाला पकडले व चोप द्यायला सुरुवात केली. राजा राज्याचा कारभार अमात्यावर सोपवून इंद्राला मदत करण्यासाठी स्वर्गलोकी जातो. (अंक सहावा)

सातव्या अंकाच्या सुरुवातीस रथात बसलेले राजा व मातली स्वर्गातून खाली येत आहेत. दुष्यंताने राक्षसांचा नि:पात केल्याने इंद्राने त्याचा गौरव केला. या गोष्टीने राजाला धन्यता वाटते. थोड्याच वेळात त्यांना हेमकूट पर्वत दिसतो. त्या पर्वतावर देवासुरांचे पिता मारीच महर्षी राहात असतात. त्यांना वंदन करण्यासाठी राजा खाली उतरतो. मारीच ऋषींना आपल्या आगमनाची वार्ता कळवण्यासाठी राजा मातलीला पाठवतो.

एवढ्यात त्याला सहा वर्षांचा मुलगा व दोन तापसी दिसतात. मुलगा त्या सिंहाच्या पिलाला तोंड उघडायला सांगतो. तापसीच्या बोलण्यावरून त्या मुलाचे नाव सर्वदमन आहे असे समजते. राजा त्या सुंदर मुलाला पाहून आकृष्ट होतो. त्याच्या मनात आपुलकी निर्माण होते. मुलाने सिंहाच्या पिलाला सोडावे म्हणून तापसी त्याला 'मी दुसरे खेळणे देते' असे म्हणते. तेव्हा तो मुलगा आपला हात पुढे करतो त्या वेळी राजाला त्याच्या हातावर चक्रवर्ती राजपदाची चिन्हे दिसतात. तो चकित होतो.

मग तापसी राजाला हाक मारतात. राजा त्या मुलाला बोलावतो. हा मुलगा पुरुवंशातील असून याची माता पतीने त्याग केल्यामुळे आश्रमात प्रसूत झाली व ती तेथेच राहात आहे, हे राजाला समजते. इतक्यात दुसरी तापसी आश्रमातून मातीचा रंगीत मोर आणते व म्हणते - ''सर्वदमना, शकुंतलावण्य (म्ह. पक्ष्याचे सौंदर्य) पाहा.'' वाक्यातील 'शकुंतला' हे शब्द ऐकताच मुलाला आपली आई आली असे वाटते. तो 'कोठे आहे माझी आई?' असे विचारतो त्यावरून याच्या आईचे नाव शकुंतला आहे, हे राजाला समजते.

इतक्यात तापसीचे लक्ष मुलाच्या मनगटाकडे जाते. मनगटावर ताईत नव्हता. सिंहाबरोबरच्या झटापटीत तो सुटून जमिनीवर पडलेला होता. राजा त्यांना ताईत दाखवतो इतकेच नव्हे तर तो उचलून हातात घेतो. तापसी चकित होतात. त्या ताईताचे वैशिष्ट्य असे होते की तो जर खाली पडला तर त्याने स्वत: किंवा त्याच्या आई-वडिलांनीच तो उचलावयाचा. दुसऱ्याने उचलल्यास त्याचे सापात रूपांतर होई आणि तापसीने तसे घडल्याचे पाहिले होते. हे ऐकल्यावर राजा हर्षभरीत होतो. सर्वदमन हा त्याचाच पुत्र होता. तापसी हा वृत्तांत शकुंतलेला सांगण्यास जातात.

त्यानंतर विरहिणीचे व्रत घेतलेली शकुंतला प्रवेश करते. विरहाने कृश झालेल्या राजाला ती प्रथम ओळखतच नाही. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागतात. राजा तिची क्षमा मागतो. विचित्र मोहामुळे आपण तिला ओळखले नाही असे कबूल करतो. पण खरे कारण त्याला ठाऊक नव्हते. तीही हे आपल्या कृतकर्माचे फळ आहे असे म्हणून त्याला उठवते. मग सर्व जण मारीच ऋषीकडे जातात. मारीच ऋषी दुर्वासाने शकुंतलेस शाप दिल्यामुळे राजाला तिचे विस्मरण झाले होते, असा उलगडा करतात. त्यामुळे उभयतांचे गैरसमज दूर होऊन मीलन होते. मारीच ऋषी दोघांना आशीर्वाद देतात. शेवटी 'भगवान शंकर माझी पुनर्जन्मापासून मुक्तता करो' अशी राजा (तसेच नाटककार) प्रार्थना करतो व नाटक समाप्त होते. (अंक सातवा)

* * *

प्रस्तुत नाटकाची कथावस्तू महाभारताच्या आदिपर्वात आलेल्या शकुंतलाख्यानावर (आदि. अ. ६८ ते ७४) आधारलेले आहे. पुरुवंशातील थोर व महापराक्रमी असा दुष्यंत राजा शिकारीसाठी बाहेर पडला होता. तो कण्वाच्या आश्रमाजवळ आल्यावर त्यांची भेट घेण्यासाठी आत जातो. कण्वमुनी

फळे आणण्यासाठी बाहेर गेले होते. त्यांची मानलेली कन्या शकुंतला आश्रमात होती. तिने राजाचे स्वागत केले. त्या सुंदर मुलीला पाहून राजा तिच्यावर मोहित झाला. मग राजाने तिला विचारल्यावर तिने आपल्या जन्माची कथा सांगितली. ती मेनका व विश्वामित्र यांची कन्या होती. मातापित्यांनी त्याग केल्यामुळे कण्वांनी तिचे संगोपन केले. मग राजा तिला वस्त्रालंकाराचे आमिष दाखवून राणी होण्याची विनंती करतो तेव्हा ती "माझ्या मुलास गादी मिळणार असेल तरच मी तुझ्याशी लग्न करीन." अशी अट घालते. राजा तिची अट मान्य करतो. तिच्या यौवनाचा उपभोग घेतल्यावर 'मी लवकरच तुला नेण्यासाठी मनुष्य पाठवीन' असे वचन देऊन तो तेथून बाहेर पडतो.

काही वेळाने कण्व परत येतात. शकुंतलेला त्यांच्यासमोर जाण्याचा धीर झाला नाही. त्यांनी अंतर्ज्ञानाने सारा प्रकार ओळखला. दुष्यंताने वचन दिल्याप्रमाणे तिला बोलावण्यास कोणाला पाठवले नाही. त्यानंतर तीन वर्षांनी शकुंतला प्रसूत होऊन दिव्य बालकाला जन्म देते. ते बालक सहा वर्षाचे होईपर्यंत आश्रमात राहते. ते वाघसिंहाशी खेळत होते. त्याची धाडसी वृत्ती पाहून त्याला 'सर्वदमन' असे म्हणू लागले. नंतर कण्वांनी शकुंतलेची सासरी रवानगी केली.

शकुंतला आपल्या मुलासमवेत राजाच्या दरबारात हजर होते व मुलाचा स्वीकार करण्याची विनंती करते. राजा तिला ओळखतो पण प्रजाजनांच्या भीतीने तिला ओळख देत नाही. तो 'तिला काही आठवत नाही' असे म्हणतो. तेव्हा शकुंतला खवळते व राजाची कडक शब्दात हजेरी घेते. ती म्हणते -

"राजा, मी तुझ्या घरी चालून आले म्हणून माझा अपमान करू नकोस. भार्यारूपी लक्ष्मीची पूजा न करता एखाद्या हलकट माणसाप्रमाणे माझी उपेक्षा का करतोस? तू जर आपले वचन पूर्ण करणार नाहीस तर तुझे मस्तक शतधा विदीर्ण होऊन त्याचे तुकडे तुकडे होतील..."

"अरेरे... पूर्वी मी काय पातक केले होते की लहानपणी मला माझ्या आईबापांनी टाकून द्यावे आणि तरुणपणात नवऱ्याने माझा त्याग करावा. राजा, मी तुला नको असले तर आश्रमात परत जाते पण या बालकाला तरी टाकू नकोस."

(आदिपर्व अ. ७४)

पण शकुंतलेची कळकळीची विनंती ऐकूनही दुष्यंताचे मन द्रवत नाही. तो शकुंतलेवर खोटे बोलण्याचा आरोप करतो. तिची आई मेनका हिनेही मुलीचा

त्याग केला म्हणून तिला बोल लावतो. तिला हवी तशी दुरुत्तरे करतो. मग शकुंतलाही चिडून राजाला हवे तसे बोलते व जायला निघते. इतक्यात आकाशवाणी होते. "शकुंतलेशी राजाने गांधर्व विवाह केला असून सर्वदमन हा त्याचाच पुत्र आहे." आकाशवाणी ऐकताच राजा एकदम आपली भाषा बदलतो.

तो प्रजाजनांना सांगतो - "या सुंदरीच्या बोलण्यावर जर मी तिचा व मुलाचा स्वीकार केला असता तर आपणा सर्वांच्या मनात शंका आली असती की हा मुलगा 'शुद्ध' नाही. म्हणून मी इतका वेळ कपटनाटक केले होते. आता मी या देवीचा व पुत्राचा स्वीकार करतो."

(कित्ता -)

त्यानंतर तो दुरुत्तरे केल्याबद्दल शकुंतलेचीही क्षमा मागतो. भरताला यौवराज्याभिषेक झाल्याचे सांगून हे कथानक संपवले आहे.

महाभारताप्रमाणे पद्मपुराणातही शकुंतलोपाख्यान आले आहे. पण त्याचे कथानक शाकुंतलाशी अधिक जुळणारे आहे. या कथेत दुर्वासाचा शाप, अंगठीचे कथानक - अंगठी पाण्यात पडणे, ती माशाच्या पोटातून बाहेर येणे व राजाला स्मृती येणे - मारीच ऋषीच्या आश्रमात मीलन होणे, प्रियंवदा व गौतमी ही पात्रे हा सारा कथाभाग आढळतो. यावरून पुराणकर्त्याने शाकुंतल नाटक पुढे ठेवूनच सदर कथा पौराणिक धर्तीवर सांगितली आहे, यात काही संशय नाही. पुराणकर्त्याबद्दल शंका घेण्याचे आणखी एक कारण म्हणजे पद्मपुराणाची जी प्रत पुण्यात छापलेली आहे त्यात हे आख्यान आढळत नाही. त्यामुळे कालिदासाने पद्मपुराणाचा आधार घेऊन आपले नाटक रचले असे म्हणता येणार नाही.

पालिभाषेतील 'कट्टहारि' या बौद्धजातकात शाकुंतलाच्या कथानकाशी साम्य असलेली एक कथा आढळते. ती याप्रमाणे - वाराणसी नगरीचा राजा ब्रह्मदत्त हा अरण्यात फळे व फुले शोधत असता एका सुंदर मुलीला पाहतो. तिच्यावर मोहित होऊन गांधर्वविवाह करतो. तिच्या बोटात अंगठी घालून निघून जातो. जाताना तो सांगतो की 'तुला जर पुत्र झाला तरच तू माझ्याकडे ये. मुलगी झाली तर ही अंगठी विकून मुलीचे पोषण कर.'

पुढे ती प्रसूत होते. बोधिसत्त्व तिच्या पोटी जन्म घेतात. ती मुलाला घेऊन राजाच्या दरबारात येते. राजा मुद्दामच तिला ओळख देत नाही मग ती म्हणते "जर हा खरोखरच या राजाचा पुत्र असेल तर अंतराळात सुरक्षित राहील."

आणि खरोखरच ते मूल कोणत्याही आधारावाचून अंतराळात स्थिर राहते. त्यामुळे आता संशयाला जागा राहात नाही. राजा मुलाचा व त्याच्या आईचा स्वीकार करतो.

* * *

पद्मपुराण व कट्टहारिजातकातील वर दिलेली कथा कालिदासाने आपल्या नाटकासाठी आधार म्हणून घेतले असतील, असे मानण्यात काही हशील नाही. तेव्हा महाभारतातील कथेत त्याने कोणते बदल केले व त्यांचे महत्त्व काय हे आता पाहायला हवे.

(१) 'शाकुंतल' नाटकाची कथावस्तू महाभारतातील 'शकुंतलाख्याना'वर आधारलेली असली तरी बरीचशी स्वतंत्र आहे. महाभारतातील कथा अत्यंत ओबडधोबड आहे. त्यातील दुष्यंत कामूक, स्वार्थी व ढोंगी आहे. तर शकुंतला आपमतलबी व व्यवहारी आहे. कथेत इतरही अस्वाभाविक भाग आढळतो. उदा-शकुंतला तीन वर्षांनी प्रसूत होते. सारांश, मूळ कथानक नाममात्र आधारास घेऊन कालिदासाने नवीनच कलाकृती घडवली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही.

(२) दुर्वासाचा शाप व अंगठीचे उपकथानक हा भाग कालिदासाने स्वतंत्र रचून घातला आहे. कथानकास या घटनांनी विलक्षण चालना मिळाली आहे. खरे तर अंगठीचे प्रयोजन शापाचा प्रभाव नष्ट करणे हे आहे. पण दुर्दैवाने ती शकुंतलेच्या बोटातून गळून पडते व शापाचा कालावधी सात वर्षांपर्यंत ताणला जातो. डॉ. माईणकरांच्या मते कवीने अंगठीची कल्पना रामायणातून घेतली असावी. पण येथे शकुंतलेचे दैवच अंगठीशी बांधलेले आहे. तेव्हा रामायणातील मुद्रिकेपेक्षा येथील अंगठीचे महत्त्व अधिक आहे. यास्तव कवीने नाटकाच्या नावातही तिच्या अभिज्ञान कार्याचाच अर्थ प्रतीत व्हावा अशी योजना केली आहे.

(३) महाभारतातील कण्वमुनी हे फळे आणण्यासाठी आश्रमाच्या बाहेर गेले आहेत. कालिदासाने याऐवजी ते शकुंतलेच्या प्रतिकूल दैवाची शांती करण्यासाठी सोमतीर्थास गेले आहेत असे दर्शविले आहे. तसेच मुळात शकुंतला आश्रमात एकटीच आहे तर नाटकात तिला अनसूया व प्रियंवदा या दोन मैत्रिणी असल्याचे दाखवले आहे. शकुंतलेच्या जन्माची हकीकत तिच्याकडूनच न वदवता ती अनसूयेच्या द्वारा वदवली आहे. यावरून कवीची दृष्टी किती चोखंदळ व औचित्यपूर्ण आहे हे समजून येईल.

(४) राजाच्या दरबारात शकुंतला येताक्षणी राजा तिला ओळखतो पण तो ओळख देत नाही असे मुळात आहे. त्यामुळे साहजिकच दुष्यंताविषयी तिटकारा निर्माण होतो. पण कालिदासाने दुर्वासाच्या शापामुळे राजाची स्मृती नष्ट झाली असे दर्शविल्याने राजावरचा आरोप आपोआप दूर झाला आहे. तसेच शकुंतलेच्या सोबत तिचा सहा वर्षांचा मुलगा न दाखवता कालिदासाने कण्वाने तिची रवानगी गरोदरपणीच केली होती असे दाखवले आहे.

(५) हंसपदिकेने गाईलेले गीत हीही कवीची स्वतंत्र निर्मिती आहे. पाचव्या अंकातील पडद्यामागच्या या गीताने अनेक गोष्टी साधलेल्या आहेत. त्याने दुष्यंताच्या बदललेल्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकलेला आहे. तरुण हंसपदिकेला सोडून राजा प्रौढ वसुमतीकडे राहात आहे, अशी हंसपदिकेची तक्रार आहे. राजाच्या मनावर दुर्वासाच्या शापाचा अंमल चालू झाल्याची ती खूण आहे. तिची समजूत घालण्यासाठी राजाने विदूषकाची योजना केली व त्याचा अडथळा त्यामुळे आपोआप दूर झाला.

* * *

नाटकाच्या एकंदर कथानकास सहा ते साडेसहा वर्षे इतका अवधी लागलेला आहे. कारण शकुंतलेचा मुलगा सहा वर्षांचा झाल्यानंतरच राजाची व तिची भेट झालेली आहे.

नाटकाच्या प्रारंभी ग्रीष्म ऋतू चालू असल्याचा उल्लेख आहे म्हणजे तो ज्येष्ठ महिना होता. दुसऱ्या अंकात 'प्रवृत्तपारण' उपवासाचा उल्लेख आहे. काटयवेम या संस्कृत टीकाकाराचा हवाला देऊन प्रो. काळ्यांनी तो वटसावित्री व्रताचा उल्लेख आहे, असे मानले आहे. पहिल्या अंकानंतर दुसरा अंक दुसऱ्या दिवशी सुरू झाला आहे. दुसऱ्या व तिसऱ्या अंकाच्या दरम्यान पंधरा दिवस लोटले असावेत असे प्रो. काळ्यांनी म्हटले आहे. पण डॉ. कंगल्यांनी तीन-चार दिवसांचा अवधी सांगितला आहे. तोच योग्य वाटतो.

तिसरा अंक व चौथ्या अंकाचा प्रवेशक यात सुमारे आठ दिवसांचे अंतर असावे. दुसऱ्या अंकात यज्ञाचा उल्लेख आहे. तो पूर्ण होईपर्यंत राजा आश्रमात राहणार होता. तो यज्ञ बारा दिवसांचा मानला तर हा काळ जुळण्यासारखा आहे. चौथ्या अंकाच्या प्रवेशकाच्या दिवशी राजा राजधानीस परत गेला आहे व त्याच दिवशी दुर्वासाच्या शापाची घटना घडली आहे. प्रवेशक व मुख्य प्रवेश यात किमान तीन महिन्यांचे तरी अंतर लोटले आहे. कारण मुख्य प्रवेशात शकुंतला गरोदर असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. मुख्य प्रवेशाच्या दिवशी पहाटे

कण्वमुनी आश्रमात आलेले आहेत व त्याच दिवशी शकुंतलेला सासरी पाठवायची तयारी चालली आहे. सासरी जावयाच्या वेळी शकुंतला सहा महिन्यांची गरोदर होती असे प्रो. काळ्यांनी म्हटले आहे ते योग्य वाटत नाही. शकुंतला सकाळी ९ ते १० च्या सुमारास सासरी निघालेली दिसते.

चौथ्या व पाचव्या अंकाच्या दरम्यान चारपाच दिवसांचे अंतर दिसते. कण्वाचा आश्रम हिमालयाच्या पायथ्याशी होता. तेथून हस्तिनापुरास येण्यास चार दिवस सहज लागले असतील. शकुंतला हे अंतर पायी चालत आली की वाहनाची काही व्यवस्था केली होती, हे समजण्यास मार्ग नाही. पाचवा अंक व सहाव्या अंकाचा प्रवेशक यात सहा वर्षांचे अंतर आहे कारण सर्वदमन त्या वेळी सहा वर्षांचा झालेला आहे. माशाच्या पोटात सापडलेली अंगठी नजरेस पडताच राजाची स्मृती परत आली आहे. यानंतर पाच-सहा दिवसांनी मुख्य प्रवेश सुरू झाला आहे. राजाने चार-पाच दिवस विरह यातना सोसलेल्या आहेत. दरम्यान त्याने तिची तसबीरही रंगवली आहे. सहाव्या अंकाच्या शेवटी राजा इंद्राला मदत करण्यासाठी स्वर्गलोकी गमन करतो.

सहाव्या अंकानंतर दुसऱ्याच दिवशी सातव्या अंकास प्रारंभ झाला आहे म्हणजे राजाने गेल्या दिवशीच शत्रूचा पाडाव केला व स्वर्गात एक दिवसाचा पाहुणचार उरकून तो पृथ्वीवर येऊ लागला आहे. त्याच दिवशी त्याची शकुंतला व सर्वदमन यांच्याशी भेट होते. सारांश एकंदर कथानक सुमारे साडेसहा वर्षांच्या आत घडले आहे.

* * *

शाकुंतलाच्या हस्तलिखित प्रती भारताच्या सर्व प्रांतात मिळालेल्या आहेत. त्यांपैकी विद्वानांनी काश्मिरी, बंगाली, देवनागरी व मद्रासी या चार प्रांतांतील प्रती ग्राह्य मानल्या आहेत. त्यातही देवनागरी व बंगाली या प्रती विशेष महत्त्वाच्या आहेत. बंगाली प्रतीत देवनागरी प्रतीपेक्षा अधिक मजकूर आहे. विशेषत: तिसऱ्या अंकातील प्रणय प्रसंग सविस्तर आहे. बंगाली पंडितांच्या मते बंगाली प्रत हीच अस्सल असून इतर प्रतीत रंगभूमीच्या सोयीसाठी काटछाट केलेली आहे. पण हे मत पटणारे नाही. तिसऱ्या अंकातील प्रणयप्रसंग पाहिला तर त्यात आचरटपणा आढळून येतो. त्या दृष्टीने देवनागरी प्रतीतला प्रसंग संयमपूर्ण व कलात्मक आहे. तेव्हा बंगाली प्रत कोणी तरी वाढवून तयार केल्यासारखी वाटते. प्रस्तुत विवेचन हे देवनागरी प्रतीच्या आधारे केलेले आहे.

* * *

कालिदासाने 'विक्रमोर्वशीया'च्या धर्तीवर शाकुंतलदेखील पाच अंकांचेच लिहिले होते. पाचव्या अंकात प्रियंवदा शकुंतलेची आश्रमात विसरून राहिलेली अंगठी घेऊन दरबारात येते. अंगठी पाहताच राजावरील शापाचा अमल दूर होतो व तो शकुंतलेचा स्वीकार करतो, असे कथानक प्रारंभी रचले होते. पण दुष्यंत व शकुंतला यांना त्यांच्या प्रमादांची शिक्षा देणे कवीला आवश्यक वाटले म्हणून त्याने अखेरच्या दोन अंकांची मागाहून रचना केली. असा काहीसा विचार प्राचार्य र. दा. करमरकरांनी मांडलेलं आहे. त्याचा परामर्श घेऊ.

शकुंतलेने वडील माणसांची परवानगी न घेता दुष्यंताशी चोरून लग्न केले ही तिची पहिली चूक, तर दुष्यंताच्या चिंतनात मग्न राहून आलेल्या अतिथीकडे दुर्लक्ष केले ही तिची दुसरी चूक. राजानेही मागचा पुढचा विचार न करता आश्रमात भेटलेल्या मुलीशी लग्न करण्याची घाई केली तसेच तेथे कोणाला न भेटता राजधानीला परतला तेव्हा दोघांनाही शासन करण्यासाठी कवीने वरील मार्गाचा अवलंब केला.

या मतास पाचव्या अंकात थोडासा आधार मिळतो. राजा शकुंतलेला ओळखत नाही तेव्हा शार्ङ्गरव तिला म्हणतो - ''एकांतात रममाण होण्यापूर्वी स्त्रीने जोडीदाराची नीट परीक्षा करावी. ज्याची पूर्ण माहिती नसते त्याची मैत्रीदेखील शत्रुत्व धारण करते.'' (अंक ५, श्लोक २४) या ठिकाणी कवीने आपले विचार प्रकट केले आहेत, असे या पक्षाचे म्हणणे आहे.

येथे पहिला प्रश्न असा विचारता येईल की शकुंतलेने दुष्यंताशी गांधर्व विवाह करण्यात घोडचूक केली, असे कालिदासास खरेच वाटत होते काय? आश्रमातील कोणीही शकुंतलेला दूषण दिलेले नाही. येऊन जाऊन कण्व मुनी काय म्हणतील हीच चिंता होती. पण त्यांनी तर शकुंतलेचे अभिनंदन केले. तेव्हा शकुंतलेने चूक केली असे कालिदासास मुळीच वाटत नाही. शार्ङ्गरवाच्या श्लोकातील अभिप्रायही सर्वसाधारण सावधगिरी बाळगावी इतकाच आहे. तरुण-तरुणीकडून असे प्रकार घडतात तेव्हा शकुंतलेच्या प्रेमाचा बभ्रा आधुनिक टीकाकारांनीच जास्त केला आहे व त्यातूनच प्रणयी जोडप्यास शिक्षा करण्याची कल्पना उद्भवली. सारांश हा टीकाकारांचा कल्पनेचा खेळ आहे. मूळ नाटकात यास मुळीच आधार नाही.

हीच गोष्ट अतिथीकडे केलेल्या दुर्लक्षाची आहे. शकुंतलेचे दुर्वासाकडे दुर्लक्ष झालेले आहे. तिने ते मुद्दाम केलेले नाही. तेव्हा नकळत घडलेल्या प्रमादाबद्दल

शासन करणे कितपत योग्य आहे? सारांश, शकुंतलेला शासन करण्याची व मूळ नाटक पाच अंकी असल्याची कल्पना निव्वळ कपोलकल्पित आहे. तिच्याकडे लक्ष देण्याची गरज नाही.

* * *

डॉ. रवींद्रनाथ टागोरांनी आपल्या 'शाकुंतला'वरील निबंधात दुष्यंत आणि शकुंतला यांचा पहिल्या तीन अंकातील प्रणय वासनामूलक, शारीरिक पातळीवरचा अतएव हिणकस असा ठरवलेला आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास 'In the first act the poet has not concealed the gross earthiness of the fall of Shakuntala, he has clearly shown in the conduct of the hero and heroin alike now much desire contributed to that fall.' (Shakuntala : Its inner Meaning)

जर्मन कवी गटे याने आपल्या कालिदासावरील प्रशस्तीपर कवितेत शाकुंतलाच्या संदर्भात भू व स्वर्ग यांच्या भेटीचा उल्लेख केला आहे. रवींद्रनाथांनी येथील 'भू' हा शब्द विषयवासना, अविचार, पाप अथवा अध:पात यांचा द्योतक मानलेला आहे. त्यांचे हे वासनामूलक प्रेम शुद्ध होण्यासाठी कवीने त्यांना विरहात होरपळत ठेवले. त्यांना शुद्ध प्रीतीची ओळख पटणे, हा स्वर्ग या पदाचा अर्थ आहे. दुर्वासाच्या शापाची योजनाही कवीने याच उद्देशाने केलेली आहे.

म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांनीही असेच उद्धार काढलेले आहेत. ते म्हणतात :- "हा शापप्रसंग घालण्यात कालिदासाचा दुसराही एक हेतू आहे. केवळ बाह्यरूपामुळे उत्पन्न झालेले प्रेम वैषयिक अतएव निकृष्ट दर्जाचे असते. संकटाच्या भट्टीतून तावून-सुलाखून बाहेर पडल्यावर, त्यातील स्वार्थीपणा नष्ट झाल्यावर त्याचे कर्तव्यात रूपांतर होते. अशा निरपेक्ष उदात्त प्रेमाची समाजाच्या धारणेला व अभ्युदयाला अत्यंत आवश्यकता असल्याने कालिदासाने आपल्या इतर ग्रंथांतही त्याची चित्रे रेखाटली आहेत." (कालिदास : चौथी आवृत्ती पृष्ठ २०४)

दुर्वासाच्या शापाचाही टागोरांनी वेगळाच अर्थ लावला आहे. ते सांगतात की, जर दुष्यंताने शकुंतलेचा सरळ स्वीकार केला असता तर काही काळानंतर तिला राजवाड्याच्या कोपऱ्यातच राहावे लागले असते व सारे आयुष्य

हंसपदिकेप्रमाणे उपेक्षेत व निराशेत घालवावे लागले असते. दुर्वासाच्या शापामुळे राजाने निर्दयपणे तिचा त्याग केला ही गोष्ट तिच्या हिताचीच ठरली. विरहामुळे त्याचे हृदय दु:खाने भरून गेले व ते शकुंतलेच्या हृदयाशी जोडले गेले इ.

रवींद्रनाथांनी गटेच्या कवनातील भू आणि स्वर्ग यांचा अर्थ समजून घेतलेला नाही. भू म्हणजे पाप व स्वर्ग म्हणजे पुण्य ही कल्पना त्याला अभिप्रेत असेल असे वाटत नाही. तर 'भू' म्हणजे वास्तव व स्वर्ग म्हणजे आदर्श असे त्याला म्हणावयाचे आहे. या दृष्टीनेच शाकुंतलात या दोन्हीचा संगम झाला आहे, अशी माझी तरी समजूत आहे. त्यामुळे पहिल्या तीन अंकांतील उभयतांचे प्रेम शारीरिक असले तरी ते निंद्य आहे असे कवीने मानलेले नाही. त्यामुळे ते विरहाच्या आचेने शुद्ध झाले हीही कल्पना करण्याचे कारण नाही. त्यामुळे शाकुंतलातील विरह त्या दोघांना शिक्षा करण्यासाठी जसा आलेला नाही तसा शारीरिक प्रेम शुद्ध करण्यासाठीही अवतरलेला नाही.

दुर्वासाच्या शापाबद्दल रवींद्रनाथांची कल्पना थोडीफार बरोबर आहे. पण म्हणून शकुंतलेवर उपकार करण्यासाठी दुर्वासाने तिला शाप दिला, अशी कल्पना करण्यात अर्थ नाही. तर मग कालिदासाने हा प्रसंग नाटकात कशासाठी घातला असा प्रश्न उद्भवतो. पाचव्या अंकात राजा शकुंतलेचा स्वीकार करीत नाही याचे कारण त्याची स्मृती नष्ट झालेली आहे हे सांगण्यात औचित्याचे पालन झालेले आहे. महाभारतातील राजा या प्रसंगी अप्रतिष्ठेच्या भीतीने असत्य भाषण करतो. त्यामुळे तो तिटकाऱ्यास पात्र होतो. आपल्या नायकाविषयी असा तिरस्कार उत्पन्न होऊ नये तसेच त्याचीही बाजू सत्याचीच आहे हे सांगण्यासाठी कालिदासाला शापाची मदत झाली आहे, असे काहींचे मत आहे.

हे मत पुष्कळ अंशी बरोबर आहे. पण दुष्यंताच्या वर्तनाचे समर्थन करणे हा शापप्रसंगाचा हेतू आहे हे म्हणणे पटणारे नाही. राजाने शकुंतलेचा स्वीकार करण्यास जो नकार दिला तो केवळ विस्मरणामुळे नाही. विस्मरण तर होतेच पण शकुंतलेच्या सौंदर्याने मोहित होऊन त्याला तिचा स्वीकार करता आला असता. यास शकुंतलेचीही आडकाठी आली नसती कारण ती आपण होऊन त्याच्या दारी आली होती. पण समोरची स्त्री ही परस्त्री आहे ही त्याची भावना आहे. परस्त्रीगमन म्हणजे धर्माज्ञेचे उल्लंघन आहे ही गोष्ट त्याच्या मनावर बिंबवलेली होती. तिचा स्वीकार न करण्यात त्याने धर्माचेच पालन केले आहे आणि प्रतिहारीने या बाबतीत राजाची प्रशंसा केली आहे. ती म्हणते -

'महाराजांची धर्मावरील निष्ठा धन्य आहे. अन्यथा असे रूपलावण्य अनायासे प्राप्त झाले असता कोण नकार देईल?'' तेव्हा हाच कवीचा उद्देश आहे ! ही गोष्ट स्पष्ट आहे.

* * *

नाटकात दुष्यंत, शकुंतला, कण्वमुनी, अनसूया व प्रियंवदा यांची जोडी, शार्ङ्गरव व शारद्वत हे दोन मुनिकुमार व गौतमी आत्या अशी मोजकीच पात्रे कवीने कौशल्यपूर्वक रेखाटली आहेत.

**(१) दुष्यंत :** नाटकाचा नायक दुष्यंत हा पुरुवंशातील राजा तरुण, सुंदर व पराक्रमी तर आहेच, शिवाय विनयी व सुसंस्कृतही आहे. त्याच्या ठिकाणी रघुवंशातील राजाच्या अंगी शोभणारे सारे गुण आहेत. त्याला अनेक राण्या आहेत पण उदरी संतान नसल्याने तो उदासीन आहे. शकुंतलेच्या दर्शनाने तो मोहित होतो खरा पण तो स्त्रीलंपट नाही. तिच्याशी विवाह करण्याच्या उद्देशानेच तो तिची सारी चौकशी करतो. पहिल्या अंकातील त्याचे वर्तन व संभाषण हे अत्यंत प्रौढ व सुसंस्कृत आहे.

तो पराक्रमी आहे. यज्ञाचे रक्षण करण्यास तो एकटा आश्रमात राहतो. त्याच्या धनुष्याच्या दोरीच्या टणत्काराबरोबर संकटे पळून जातात. सातव्या अंकात इंद्राच्या शत्रूचा त्याने एक दिवसातच पाडाव केला आहे. मुख्य म्हणजे तो अत्यंत धर्मपरायण आहे. दारी आलेल्या अनुपम स्त्रीरत्नाचा तो परस्त्री-संसर्गाच्या भीतीने स्वीकार करीत नाही. पण सहाव्या अंकात अंगठीचे दर्शन होताच पश्चात्तापाने त्याचे अंतःकरण विदीर्ण होते. तो कुशल चित्रकारही आहे. त्याने रेखाटलेली शकुंतलेची तसबीर पाहून सानुमतीही चकित होते. म.म.मिराशी यांनी म्हटल्याप्रमाणे - ''पराक्रमी, विनयशील, धार्मिक, प्रेमळ व कर्तव्यतत्पर अशा धीरोदात्त नायकाचे चित्र काढून कालिदासाने आपल्यापुढे आदर्श पुरुष उभा केला आहे.'' (कालिदास पृष्ठ २१५)

**(२) शकुंतला :** 'शकुंतला म्हणजे अनाघ्रात - न हुंगलेले फूल आहे' असे कवीने म्हटले आहे. या एकाच विशेषणाने त्याने तिचे सौंदर्य, कोमलता व निष्कलंक चारित्र्य सूचित केले आहे. मेनकेची कन्या असल्याने तिला दिव्य सौंदर्याचा लाभ झाला आहे. पण तिचे संगोपन कण्वमुनींनी केले आहे, आश्रमाच्या उदात्त वातावरणातच ती लहानाची मोठी झाली आहे. राजाच्या दर्शनाने तिच्या मनात तपोवनाशी विरोधी असणारी प्रणयाची भावना जागृत झाली तरी ती जात्या विनयशील आहे.

तथापि तिचे दैव प्रतिकूल असल्याची कल्पना कवीने पहिल्या अंकात दिली आहे. त्या प्रतिकूल दैवाची शांती करण्यासाठीच कण्वमुनी दूर प्रवासाला गेले आहेत. पण राजाशी प्रणयसंबंध झाल्यावर तिचे दैव फिरते. राजा राजधानीस परत गेल्यादिवशीच दुर्वासासारखा शीघ्रकोपी मुनी आश्रमात येतो व तिचे आपल्याकडे लक्ष नाही असे दिसल्यावर भयंकर शाप्र देऊन चालता होतो. प्रियंवदा त्याची मनधरणी करून उःशाप मिळवते. पण त्याचा फारसा उपयोग होत नाही. राजाने शकुंतलेला भेट दिलेली अंगठीही तिच्या नकळत पाण्यात पडते. दरबारात राजा तिला ओळखत नाही. तेथील मानखंडना तिला असह्य होते. मग मेनकाच तिला स्वर्गभूमीच्या परिसरात घेऊन जाते. मारीच ऋर्षीच्या आश्रमात ती प्रसूत होते. मुलगा सहा वर्षांचा होईपर्यंत तिला राजाचा विरह सहन करावा लागतो. म्हणजे कण्वमुनींनी प्रतिकूल दैवाची शांती केली असली तरी त्याचा चांगलाच फटका बसलेला आहे.

**कण्वमुनी** : मेनकेने टाकून दिलेल्या शकुंतलेचा यांनीच प्रतिपाळ केला आहे. शकुंतला उपवर झालेली आहे. तिला योग्य वरास देण्याचा त्यांचा मानस आहे. शकुंतलेचे दैव प्रतिकूल आहे हे त्यांना अंतर्ज्ञानाने समजले व ते त्याची शांती करण्यासाठी दूरवर गेले. परत आल्यावर त्याच अशरीरीवाणीने शकुंतलेने गांधर्व विवाह केल्याचे व ती गरोदर असल्याचे समजले. त्यांनी तिची सासरी रवानगी करण्याचे ठरविले. ती जाणार या कल्पनेने ते व्याकूळ झाले.त्यांनी तिला आशीर्वाद दिले. ती दिसेनाशी झाली तेव्हा 'परक्याचे धन ज्याचे त्याला दिल्यामुळे मी कृतार्थ झालो.' असे उद्‌गार काढतात. चौथ्या अंकानंतर कवीने त्यांना रंगभूमीवर आणले नाही. कण्वाची व्यक्तिरेखा अत्यंत हृदयस्पर्शी वठली आहे.

अनसूया व प्रियंवदा या मैत्रिणींची जोडी अविस्मरणीय आहे. अनसूया गंभीर स्वभावाची आहे तर प्रियंवदा खट्याळ व मधुर भाषण करण्यात निपूण आहे. शार्ङ्गरव व शारद्वत या दोन ऋषिकुमारांपैकी शार्ङ्गरव हा तापट आहे. तो राजाला जाब विचारतो तसेच शकुंतलेला खडसावतो. शारद्वत विचारी व शांत आहे. दुर्वास ऋषी शीघ्रकोपी व कठोर स्वभावाचे आहेत. मारीच हे शांत व निर्मळ वृत्तीचे आहेत. माढव्य हा राजाचा विदूषक रेमडोक्या आहे. राजाबरोबर शिकारीला जावे लागल्याने तो कंटाळून गेला आहे. राजाने आपल्या शकुंतलेवरील प्रेमाचा वृत्तांत त्याला सांगितलेला आहे. पण 'ती सारी थट्टा

होती' असे राजाने म्हणताच त्याला खरे वाटते. तो तसा हजरजबाबी आहे. पण रूढ विदूषकांपेक्षा फारसा वेगळा नाही. सहा वर्षांचा सर्वदमन हा हूड पण हुषार आहे. गौतमी आत्या अत्यंत कनवाळू असली तरी भोळसट आहे.

* * *

कालिदासाच्या या सर्वोत्कृष्ट कलाकृतीवर अनेक अभ्यासकांनी आपापली मते मांडली आहेत व अनेक वादांना चालना दिलेली आहे. त्या सर्वांचा येथे परामर्ष घेणे शक्य नाही व आवश्यकही नाही. प्रस्तुत समालोचनात ठळक अशा दोन-चार गोष्टींचा विचार केलेला आहे.

(१) अभिज्ञान शाकुंतल हे नाटक कालिदासाच्या परिपक्व प्रतिभेतून साकार झालेले आहे. कुमारसंभव, विक्रमोर्वशीय, मेघदूत या कृतींनंतर कवीने हे नाटक रचले असल्याने लेखनात साहजिकच एक प्रकारची सफाई आलेली आहे. नाटकाची भाषा सुमधुर व आकर्षक आहे. श्लोकरचना सुश्लिष्ट आहे. त्यासाठी योजलेली विविध वृत्ते प्रसंगोचित आहेत. गद्य संवादही प्रासादिक (म्ह. सहज समजणारे) व मनोरम आहेत. मुख्य म्हणजे ते नाट्यानुकूल आहेत. त्यात एक प्रकारचा गोडवा आहे. दुसरे म्हणजे पात्रांच्या तोंडची भाषणे ही त्यांना शोभणारी आहेत. पाचव्या अंकातील राज-पुरोहित चारच ओळी बोलतो पण त्याचे बोलणे व्यासंगी पंडिताला शोभेल असेच आहे. सारांश कथावस्तू, संवाद, स्वभावचित्रणे व नाट्यरचना या सर्वच बाबतीत शाकुंतलाचा दर्जा मोठा आहे म्हणूनच -

"काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्या शकुंतला ।<br>
तत्रापि च चतुर्थोऽङ्को, तत्र श्लोकचतुष्टयम् ॥"

अशी सार्थ प्रशस्ती या नाटकाला लाभली आहे.

(२) कालिदासाच्या पूर्वीच्या दोन नाटकांशी या नाटकाचे साम्य असले तरी हे नाटक अनेक बाबतीत त्यापेक्षा सरस आहे. दुष्यंत शकुंतलेच्या दर्शनाने मोहित होतो. या बाबतीत त्याचे वर्तन अग्निमित्र अथवा पुरुरवा यांच्यासारखे भासते. पण तो स्त्रीलंपट नाही. दुसरे म्हणजे दुष्यंताच्या राण्यांपैकी कुणालाही नाटककाराने रंगभूमीवर आणलेले नाही. त्यामुळे प्रेमप्रकरणात रंगे हाथ पकडले जाण्याची आपत्ती दुष्यंतावर ओढवलेली नाही. तसेच 'मालाविकाग्निमित्रा'तील हुषार विदूषकाने खुद्द राजाला - नायकालाच निष्प्रभ केले होते. त्यामुळे विक्रमोर्वशीयात त्याचे महत्त्व कमी करण्यात आले. शाकुंतलात त्याला आणखी कमी अवसर मिळाला आहे.

(३) या नाटकातील चौथ्या अंकाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. वास्तविक पाहता या अंकात कथावस्तूची थोडीही प्रगती झालेली नाही. मुलगी विवाहानंतर सासरी जावयास निघाली आहे. अशा या अगदी साध्या प्रसंगावर या अद्वितीय अंकाची उभारणी केली आहे. मानलेली मुलगी आज सासरी जाणार या कल्पनेनेच स्थितप्रज्ञ अशा कण्वमहर्षींचे अंत:करण भरून आलेले आहे. शकुंतलेच्या दोन्ही सख्या शोकाकुल झाल्या आहेत. इतकेच नव्हे तर आश्रमातील प्राणीही खिन्न झाले आहेत. याप्रसंगी वनदेवतांनी तिला वस्त्रालंकारांची भेट दिली आहे. शकुंतला पित्याला नमस्कार करते. ते तिला आशीर्वाद देतात. ती सर्वांचा निरोप घेऊन जाऊ लागते. तेव्हा 'कन्या हे परक्याचे धन आहे. ते ज्याचे त्याला देऊन मी आज ऋणमुक्त झालो' असे ते म्हणून ते नि:श्वास टाकतात. साधाच प्रसंग पण नाटककाराने तो कसा जिवंत उभा केला आहे हे समजण्यासाठी तो मुळातूनच वाचायला हवा.

(४) चौथ्या अंकातील एका श्लोकातील निर्देशामुळे कथावस्तूवर निराळाच प्रकाश पडण्याचा संभव आहे. कण्वमहर्षी म्हणतात :-

"मी तुझ्यासाठी जो वर अगोदरच मनात योजला होता, तो शोभणारा पुरुष तुझ्या पूर्वपुण्याईने तुला प्राप्त झाला आहे. तशीच ही नवमल्लिका वेली आम्रवृक्षास बिलगली आहे. त्यामुळे मला तुझी व तिची चिंता उरलेली नाही."

(अंक ४, श्लोक १३)

आता कण्वांनी दुष्यंताला आधीच वर म्हणून नियोजित केले असेल तर कथेचा सारा संदर्भच बदलून जाईल. आपल्या अनुपस्थितीत आपल्या लाडक्या कन्येने गांधर्व विवाह केल्याचे समजताच कण्वांनी तिच्यावर न रागवता तिचे अभिनंदन केले या प्रसंगातून वेगळाच अर्थ निघेल. प्रा. नरहर कुरुंदकरांनी 'हे सारे पूर्वनियोजितच होते' असा एकंदर निष्कर्ष काढला आहे. ते म्हणतात, "कण्व नेहमी म्हणत, ही वनज्योत्स्ना सहकारावृक्षाला देऊन टाकायची आहे आणि शकुंतला राजा दुष्यंताला द्यावयाची आहे. कण्वांची ही इच्छा सर्वांना माहीत होती. दुष्यंताचे नाव घेऊन शकुंतलेच्या मैत्रिणी तिची नेहमी चेष्टा करीत. लहानपणापासून आपण दुष्यंताची आहोत, असे गृहीत धरीत मनाने दुष्यंतावर प्रेम करीत शकुंतला कण्वाच्या आश्रमात वयात आली आहे. कालिदासाने या बाबी ध्यानात याव्यात असे उल्लेख आपल्या नाटकात करून ठेवले आहेत." (मागोवा-पृष्ठ ७०)

तथापि हा विचार अवास्तव व कथावस्तूची सारी रंगत घालवून टाकणारा आहे असे मला वाटते. दुष्यंत हा आपला पती होणार आहे याची शकुंतलेस माहिती होती, असा कोठेही स्पष्ट उल्लेख नाही. वर दिलेल्या श्लोकाचा अर्थ थोडा संदिग्धच आहे. त्यात दुष्यंताचा निर्देश आहे, असे मानले तरी 'कण्व शकुंतलेची स्तुती करीत आहेत' असे संस्कृत टीकाकार राघवभट्ट याने म्हटले आहे. (पाहा - ''शकुन्तला परिगृहीता सेति तस्याः सन्तोषोत्पादनार्थमस्यामिति पूर्वनिर्देशः।'')

या उलट प्राचार्य करमरकरांनी 'कण्वांनी आपल्या भावनांचा आवेग आवरून शकुंतलेच्या गांधर्व-विवाहाला संमती दिली' असे म्हटले आहे. त्यामुळे दुष्यंताशी शकुंतलेचा विवाह व्हावा असे कण्वाच्या मनात होते व तिच्या विवाहामुळे कण्व आनंदित झाले असे कोठे दिसत नाही. तेव्हा प्रा. कुरुंदकरांचा हा विचार बाजूला सारण्यास हरकत नाही.

(५) ज्या अशरीरिणी वाणीने कण्वमुनींना शकुंतलेच्या गांधर्व विवाहाची कल्पना दिली, तिने दुर्वासाच्या भयंकर शापाबाबत काहीच कसे सांगितले नाही? अशरीरिणी वाणीतील अद्भुतता काढून टाकली तर या प्रश्नाची थोडी सोडवणूक होते. म्हणजे आश्रमातील कोणी तरी व्यक्तीने शकुंतलेच्या विवाहाची हकीकत त्यांच्या कानावर घातली असावी. पण दुर्वासाच्या शापाची माहिती अनसूया व प्रियंवदा या दोघींनाच असल्याने ती कण्वमुनींना समजली नसावी.

दुसरे असे की, दुष्यंताने शकुंतलेचा स्वीकार केला नाही ही गोष्ट शार्ङ्गरवाने कण्वांना सांगितली नाही काय? किंवा त्यांना ती अंतर्ज्ञानाने समजली नाही काय? मग सहा वर्षात दुष्यंताची समजावणी करण्याचा त्यांनी काहीच कसा प्रयत्न केला नाही. अनसूया किंवा प्रियंवदा यांच्यापैकी एकीला जरी राजासमोर उभे केले असते तरी राजाची स्मृती ताबडतोब परत आली असती. 'शकुंतलेच्या नशिबात सहा वर्षांचा विरह लिहिलेला असेल तर आपण तरी काय करणार' अशी दैववादी भूमिका त्यांनी घेतली असावी काय? काही झाले तरी या गोष्टी खटकल्यावाचून राहात नाहीत. सहा वर्षांच्या सर्वदमनाला रंगभूमीवर दाखविण्याच्या उद्देशापायी कालिदासाने शकुंतलेवर अन्याय केला आहे, असे मला स्पष्ट म्हणावेसे वाटते.

* * *

अशी ही कालिदासाची नाट्यसृष्टी. त्याच्या तीनही नाटकांचा एकत्रितपणे विचार केला तर काही विशेष गोष्टी ध्यानात येतात.

या तीनही नाटकांचा विषय म्हणजे राजाला नव्या स्त्रीविषयी वाटणारे आकर्षण हा आहे. मालविकाग्निमित्रात अग्निमित्राचे मन त्याच्या अंत:पुरात नव्याने आलेल्या मालविकेने आकर्षून घेतले आहे. उर्वशीला केशी राक्षसाच्या तावडीतून सोडवल्यावर पुरुरव्याचे तिच्यावर मन जडले, तर शिकारीसाठी निघालेल्या दुष्यंताची कण्वाच्या आश्रमात शकुंतलेची भेट झाली आहे.

विक्रमोर्वशीय व अभिज्ञान शाकुंतल या दोन नाटकांत अधिक साम्य आहे. नाटकाच्या मध्यावर नायिकेशी मीलन होणे व त्यानंतर तिची ताटातूट होणे ही गोष्ट दोन्ही नाटकांत समान आहे. शापामुळे नायक-नायिकांचा विरह होणे, हीही गोष्ट समान आहे. विद्याधर कन्येकडे राजाचे लक्ष गेल्यामुळे रागावलेली उर्वशी कुमार कार्तिकेयाच्या वनात शिरली आणि तिचे वेलीत रूपांतर झाले तर दुर्वासाच्या शापामुळे दुष्यंताची स्मृती नष्ट झाली व त्याने शकुंतलेला ओळखले नाही.

उर्वशी व शकुंतला या दोघींनीही पुत्राला जन्म दिला आहे. योगायोगाने किंवा अचानकपणे शापाचा परिणाम दूर होतो व मीलनाचा मार्ग सुकर होतो, हे साम्य दोन्हीकडे दिसते. मण्याचा स्पर्श होताच वेलीरूपात लपलेली उर्वशी प्रकट होते तर माशांच्या पोटात लपलेली अंगठी राजासमोर येताच त्याची स्मृती परत येते. पुरुरवा व दुष्यंत हे दोघेही इंद्राच्या मदतीसाठी स्वर्गात जातात. नाटकाच्या अखेरीस पुत्राची भेट होणे हेही साम्य लक्षणीय आहे. दुष्यंताचा सर्वदमन सहा वर्षांचा आहे तर पुरुरव्याचा आयु हा सोळा वर्षांचा आहे. त्यामुळे शाकुंतलाची रचना करण्यासाठी तयारी म्हणून प्रस्तुत नाटक रचलेले असावे हा अभ्यासकांचा तर्क अगदीच अस्थानी नाही.

या तीनही नाटकांवरून कालिदासाचे नाट्यरचनेतील कौशल्य ध्यानात येते. नाटकाची कथा, संवाद, पात्रांचे स्वभावचित्रण व रसपरिपोष या चारही अंगांत तो निपुण आहे. सुरुवातीस रचलेल्या 'मालविकाग्निमित्र' ह्या नाटकातही त्याचा नवशिकेपणा न जाणवण्याइतकी सफाई आहे. 'शाकुंतला'त हे त्याचे कौशल्य पूर्णत्वास पोहोचलेले आहे.

नाटकांची भाषा नाट्यानुकूल, सुबोध व रसाळ आहे. प्रसाद हा गुण त्याच्या काव्यात सर्वत्र आढळतो. प्रसाद म्हणजे स्पष्टता (Clarity). त्याची भाषा

नुसती सुबोध नाही तर लालित्यपूर्ण आहे. तिच्यात एक प्रकारचा गोडवा व सफाई आहे. मालविकाग्निमित्र वगळता दोन्ही नाटकात प्रसंग व पात्रे मोजकी आहेत. मालिविकाग्निमित्रात मात्र प्रसंगांची रेलचेल आहे. स्वभावचित्रणही नेटके आहे. रसपरिपोषात उत्कटता असली तरी ती संयमित आहे. भवभूती किंवा भट्टनारायणाप्रमाणे त्यात बेहोशी नाही.

कालिदासाने तीनच नाटके लिहिली आहेत. एक तर ही संख्या अगदीच कमी आहे व दुसरे म्हणजे तिच्यात विविधता नाही. नवे विषय नाहीत वा नव्या जाणिवा नाहीत. शकुंतलेवर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन केलेले नाही. सारांश त्याची नाट्यसृष्टी अगदीच लहान आहे.

तथापि 'मालविकाग्निमित्रा'च्या रचनेने त्याने नव्या सुखात्मिकेचा मार्ग खुला केला. विदूषकाकडे सूत्रधारत्व देण्याचा प्रयोग केला. विक्रमोर्वशीयात सर्व अंकभर पुरुरवा विलाप करीत हिंडत असल्याचे दर्शविले. हाही एक प्रयोगच आहे. 'शाकुंतला'त राजदरबारात राजा व शकुंतला यांची खडाजंगी दर्शविली. दोन्ही बाजूला सत्य असले म्हणजे संघर्षाला कशी धार चढते, हेच त्या प्रवेशावरून प्रत्ययास येते. त्यामुळे त्याची नाट्यसृष्टी छोटीशी असली तरी ती बहुमोल आहे हे मान्य केलेच पाहिजे.

# विशाखदत्त

विशाखदत्ताने आपल्या 'मुद्राराक्षस' या नाटकाच्या प्रस्तावनेत आपला नामोल्लेख त्रोटकपणे केला आहे. तो सामंत वटेश्वरदत्ताचा नातू असून 'महाराज' ही पदवी धारण करणाऱ्या पृथूचा अथवा भास्करदत्ताचा मुलगा आहे. त्याच्या नावाचीही विशाखदेव आणि विशाखदत्त अशी दोन रूपे हस्तलिखितात सापडतात. त्याचे घराणे, वंश, जात किंवा गाव याविषयी काहीच सांगता येत नाही.

भरतवाक्यातील 'श्रीमद्‌बन्धुभृत्यश्चिरमवतु महीं पार्थिवश्चन्द्रगुप्तः' या ओळीवरून विशाखदत्त हा चंद्रगुप्त नामक राजाच्या पदरी अथवा समकालीन असावा असा अंदाज करता येतो. मुद्राराक्षसाचा संस्कृत टीकाकार ढुंढिराज याच्या मते मौर्य सम्राट चंद्रगुप्ताचा हा उल्लेख आहे. परंतु हे नाटक मौर्यकालानंतर अनेक शतकांनी रचलेले असल्याने हा दुसऱ्या कोणत्या तरी चंद्रगुप्ताचा उल्लेख असला पाहिजे.

गुप्त घराण्यातील समुद्रगुप्ताचा मुलगा द्वितीय चंद्रगुप्त ऊर्फ विक्रमादित्य याचा उल्लेख असावा, असे श्री. काशीप्रसाद जयस्वाल, प्रो. स्टाईन कोनो, हिलेब्रांट, ट्वाने यांचे मत आहे. याने इसवी सन ३८० ते ४१३ पर्यंत राज्य केले. कालिदास याच्याच पदरी होऊन गेला. प्रो. कोनो सांगतात की विशाखदत्त हा कालिदासाच्या थोडाफार समकालीन पण त्याच्या पेक्षा तरुण असावा. द्वितीय चंद्रगुप्ताने इ.स. ३९५ च्या सुमारास काठेवाडातील शक अथवा सिथियन लोकांचा पाडाव करून तो प्रदेश आपल्या राज्यास जोडला. याला 'शकाराति' असे बिरुद असल्याचा उल्लेख अकराव्या शतकात होऊन गेलेल्या अभिराम नामक कवीने

केला आहे. सारांश विशाखदत्ताचा काळ इसवी सनाच्या पाचव्या शतकाचा प्रारंभ इतका असावा.

दुसरे म्हणजे द्वितीय चंद्रगुप्ताच्या आयुष्यातील एका खळबळजनक वृत्तांतावर विशाखदत्ताने 'देवी-चंद्रगुप्त' नामक नाटक रचल्याचे उघडकीस आले आहे. गुजराथमध्ये या नाटकाचे हस्तलिखित त्रुटित स्वरूपात उपलब्ध झाले असून सदर नाटक विशाखदत्ताने रचले असल्याचा त्यात उल्लेख आहे. या नाटकातील उतारे रामचंद्र व गुणचंद्र यांच्या 'नाट्यदर्पण' या ग्रंथात घेतलेले आहेत.

समुद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर (इ.स.३७५) द्वितीय चंद्रगुप्ताच्या अगोदर त्याचा वडील भाऊ रामगुप्त हा राज्यावर आला होता. एका शक राजाने युद्धात रामगुप्ताचा पाडाव केला इतकेच नव्हे तर त्याला आपली राणी ध्रुवस्वामिनी हिला त्या राजाकडे पाठवण्याची अपमानास्पद अट पत्करावी लागली. तेव्हा चंद्रगुप्ताने स्वत: ध्रुवदेवीचा वेष धारण करून त्या राजाचा काटा काढला. पुढे त्याने थोरल्या भावाला ठार मारून त्याची गादी व राणीही पटकावली. विशाखदत्ताने या कथेवर नाटक रचलेले आहे.

चंद्रगुप्ताने स्वत: आपल्या भावाचा घात केला की रामगुप्त अकाली मरण पावला याबाबत निश्चित काही सांगता येत नाही. डॉ. आळतेकरांनी म्हटल्याप्रमाणे चंद्रगुप्तावर भावाचा खून केल्याचा आळही आला असावा. मात्र त्याने भावजयीशी लग्न केल्याचे कृत्य प्रजेने कसे सहन केले हे मात्र कोडे उलगडत नाही. कदाचित म.म.डॉ.वा. वि. मिराशी यांनी म्हटल्याप्रमाणे गुप्तकाळात हे कृत्य तितकेसे निंद्य मानले जात नसावे. असो.

भरतवाक्यातील 'चंद्रगुप्त' या पाठाऐवजी अवंतिवर्मा, दंतिवर्मा व रंतिवर्मा असे पाठ कित्येक हस्तलिखित प्रतीत आढळले आहेत. यापैकी रंतिवर्मा या नावाच्या राजाचा कोठे शोध लागत नाही. हा हस्तलिखितातील प्रमाद असावा असे प्रो. ध्रुव यांचे मत आहे.

'मुद्राराक्षसा'च्या अत्यंत प्राचीन व विश्वसनीय प्रतीत 'दन्तिवर्मा' हा पाठ आढळत असल्याने तोच पाठ योग्य आहे, असे श्री. रंगास्वामी आयंगार यांचे मत आहे. त्यांच्या मते इसवी सनाच्या आठव्या शतकाच्या मध्यावर होऊन गेलेला पल्लवराजा दंतिवर्मा हाच विशाखदत्ताचा आश्रयदाता असावा.

तथापि या मतावर प्रो. ध्रुव यांनी शंका उपस्थित केल्या आहेत. आठव्या शतकातील पल्लव राजांना म्लेंछ म्हणजे हूण किंवा इतर परकीय आक्रमणांना

तोंड द्यावे लागले होते, असे इतिहासावरून दिसत नाही. तसेच नाटकाच्या भरतवाक्यात विष्णूच्या वराह अवताराचे वर्णन आले आहे. पल्लव राजे हे शिवभक्त होते. त्यांच्या पदरी 'दत्त' घराण्यातील कवी असल्याचे ज्ञात नाही.

श्री. काशीनाथपंत तेलंग यांनी 'पार्थिवोऽवन्तिवर्मा' हा पाठ स्वीकारला आहे. या नावाचे दोन राजे भिन्न काळी व स्थळी होऊन गेले. काश्मीरचा अवंतिवर्मा हा इ.स. ८५७ ते ८८४ या काळात सत्तेवर होता. अवंतिवर्म्याच्या 'शूर' नामक मंत्र्यासमोर २ डिसेंबर, ८६० रोजी प्रस्तुत नाटकाचा प्रयोग झाला, असे विख्यात जर्मन पंडित हर्मान याकोबी यांनी म्हटले आहे. तसेच नाटकाच्या प्रस्तावनेत ज्या चंद्रग्रहणाचा उल्लेख आहे ते त्याच दिवशी होते. डॉ. ए.बी.कीथ यांनी विशाखदत्त हा इसवी सनाच्या नवव्या शतकात होऊन गेला असावा असे मत व्यक्त केले आहे. ते सांगतात की प्रस्तुत नाटकाची रचना रघुवंश, मृच्छकटिक इतकेच नव्हे तर शिशुपालवधानंतर झाली असावी. तसेच विशाखदत्ताने रत्नाकर कवीच्या काव्यातून काही कल्पना उचलल्या आहेत. 'हरविजय' या महाकाव्याचा कर्ता रत्नाकर हा इ. स.८५० च्या सुमारास होऊन गेला. तथापि विशाखदत्ताचा काळ इतका पुढे ओढता येईल असे वाटत नाही.

त्यापेक्षा तो इ.स. ५४३ ते ५५२ च्या दरम्यान होऊन गेलेल्या कनोज येथील मौखरी वंशातील अवंतिवर्म्याच्या पदरी असावा, हे मत अधिक सयुक्तिक वाटते. श्री. तेलंग व प्रो. ध्रुव यांनी हेच मत स्वीकारले आहे हा अवंतिवर्मा स्थाण्वीवर येथून राज्य करणाऱ्या प्रभाकरवर्धनाचा मावस भाऊ होता. प्रभाकरवर्धनाची मुलगी राज्यश्री. (सम्राट हर्षवर्धनाची बहीण) ही अवंतिवर्म्याचा मुलगा ग्रहवर्मा यास दिली होती. अवंतिवर्मा हा इ.स. ६०० च्या सुमारास दिवंगत झाला तेव्हा विशाखदत्त हा इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या मध्यावर होऊन गेला असावा.

आपल्या मतास प्रो. ध्रुव यांनी उपोद्बलक पुरावा सादर केला आहे. भारवीच्या किरातार्जुनीयातील एका श्लोकाशी ('उपजापसहान्विलङ्घयन्' किरात. २-४७) मुद्राराक्षसातील श्लोकाचे ('सद्यःक्रीडारसच्छेद' मुद्रा. ४.१०) विलक्षण साम्य आहे. यावरून विशाखदत्त भारवीनंतर होऊन गेला असे ध्रुव यांनी म्हटले आहे. भारवी हा इ.स. ५०० ते ५२५ च्या सुमारास होऊन गेला असल्याने साहजिकच विशाखदत्त हा इ.स.५५० नंतर केव्हा तरी झाला असावा. याने द्वितीय चंद्रगुप्ताच्या जीवनातील प्रसंगावर जी नाट्यरचना केली आहे, त्यावरूनही या काळास पुष्टी मिळते.

'मुद्राराक्षस' व 'देवी चंद्रगुप्त' (अपूर्ण) या दोन नाटकांव्यतिरिक्त विशाखदत्ताने इतर काही वाङ्मयनिर्मिती केली असावी. डॉ. गो. के. भट सांगतात की भोज आणि अभिनवगुप्त यांनी उदयन आणि पद्मावती यांच्या कथेवर आधारलेल्या 'अभिसारिकावञ्चिक' (किंवा 'अभिसारवञ्चितक') या नाटकाचा उल्लेख केला आहे. सुभाषित संग्रहात विशाखदेवाच्या नावावर काही श्लोक आढळतात. पण प्रामुख्याने दोनच नाटके त्याने लिहिलेली आहेत.

त्याच्या निवासस्थानाबाबत काही सांगता येत नाही. मुद्राराक्षसाच्या प्रस्तावनेतील 'चीयते बालिशस्यापि' (मुद्रा १.३) या श्लोकातील साळीच्या पिकाच्या उल्लेखावरून विशाखदत्त हा बंगालमधील किंवा त्याच्या जवळच्या प्रदेशातील रहिवासी असावा, असा प्रो. शारदारंजन राय यांचा तर्क आहे.

* * *

चाणक्याने इ.स.पूर्व ३२१ मध्ये मगधावरील नंदाची सत्ता उलथून टाकली व चंद्रगुप्त मौर्यास सिंहासनावर बसवले. या घटनेनंतर प्रस्तुत नाटकास प्रारंभ झालेला आहे. तथापि याची कथावस्तू नीट समजण्यासाठी पूर्वीचे धागेदोरे लक्षात घेणे आवश्यक आहे.

इसवी सन पूर्व सहाव्या शतकात उत्तर भारतात सर्वत्र लहान राज्ये पसरलेली होती. यांना गणराज्ये अथवा महाजनपदे अशी संज्ञा होती. 'अंगुत्तरनिकाय' या बौद्धधर्मपर पाली भाषेतील ग्रंथात अशा सोळा गणराज्यांची नावे दिली आहेत. त्यात मगधाचे स्थान महत्त्वाचे आहे. त्या वेळी मगध प्रांतात बिंबिसार हा राजा (इ.स.पूर्व ५४४ ते ४९३) राज्य करीत होता.

यानंतर सुमारे दोनशे वर्षांनी ॲलेक्झांडरने भारताच्या पश्चिम सरहद्दीवर आक्रमण केले. (इ.स.पूर्व ३२६). या काळात मगधावर नंद घराण्याचे राज्य होते. महापद्म हा या घराण्याचा संस्थापक होता, असे पुराणात सांगितले आहे. नंदांची सत्ता प्रबळ होती. त्यांचे राज्य मगधापासून पंजाबपर्यंत पसरले होते. तथापि शेवटचा नंद राजा अतिशय द्रव्यलोभी होता म्हणूनच त्याला धनानंद असे नाव पडले असावे.

या धनानंदाच्या दरबारात चंद्रगुप्त नावाचा युवक होता. हा मुरा नामक शुद्र स्त्रीचा मुलगा होता, असे म्हणतात. यास्तव यास मौर्य असे म्हटले जात असावे. नंदाशी त्याचे न पटल्याने तो तेथून बाहेर पडला. त्याच सुमारास नंदाच्या दरबारात

अपमान झाल्याने संतप्त झालेल्या चाणक्याची व त्याची भेट झाली. ते दोघे वायव्य सरहद्दीवर गेले. त्या वेळी ॲलेक्झांडर तेथे उपस्थित होता. चंद्रगुप्ताने ॲलेक्झांडरची समक्ष भेट घेतली असे म्हणतात.

त्यानंतर ॲलेक्झांडर परत फिरला व इ.स.पूर्व ३२३ मध्ये बाबिलोन मुक्कामी मरण पावला. चंद्रगुप्ताने चाणक्याच्या मदतीने सैन्याची जुळवाजुळव केली व मगधावर स्वारी केली. नंदांचा संपूर्ण नि:पात करून चंद्रगुप्ताने गादी मिळवली. नाटकाच्या संदर्भात पाहिले असता चंद्रगुप्त व चाणक्य यांनी या कामी डोंगरी प्रदेशातील राजा पर्वतेश्वर याची मदत घेतली होती व त्यास मदत करण्याबद्दल अर्धे राज्य देण्याचे कबूल केले होते. परंतु यश मिळाल्यावर पर्वतेश्वराला अर्धे राज्य देणे चाणक्याच्या जिवावर आले. त्याने विषकन्येची योजना करून पर्वतेश्वराचा काटा काढला.

नंदराजाचा 'राक्षस' नावाचा एक अत्यंत विश्वासू प्रधान होता. त्याने नुकतेच राज्यावर आलेल्या चंद्रगुप्ताचा नाश करण्यासाठी विषकन्येची योजना केली होती; पण चाणक्याने तिचाच हुशारीने उपयोग करून घेऊन पर्वतेश्वरास ठार केले. पण शहरात मात्र 'राक्षसाने पर्वतेश्वराचा नाश केला' अशी बातमी पसरविण्याची व्यवस्था केली.

चंद्रगुप्त राजा झाला असला तरी त्याच्या राज्याची घडी अजून व्यवस्थित बसलेली नव्हती. नंदाचे हितचिंतक त्याचा घात करण्यासाठी टपले होते. चंद्रगुप्ताला अद्याप चांगला-विश्वासू प्रधान मिळाला नव्हता. चाणक्य स्वत:च राज्याची धुरा वाहात होता व डोळ्यात तेल घालून चंद्रगुप्ताचे रक्षण करीत होता. त्याच्या मनात राक्षसालाच चंद्रगुप्ताचा प्रधान बनवायचे होते. पण राक्षसाची नंदराजावर व राज्यावर उत्कट निष्ठा होती.

आपल्याविषयी अशी अनिष्ट वार्ता पसरलेली पाहून राक्षस गुप्तपणे राजधानीतून बाहेर पडला. जाताना त्याने आपल्या बायकोस व मुलास चंदनदास नामक व्यापाऱ्याच्या घरी ठेवले होते. चंदनदास राक्षसाचा अत्यंत जिवलग स्नेही होता. चाणक्याने पर्वतेश्वराच्या मुलास - मलयकेतूस 'तुझ्या पित्याचा खून राक्षसाने केला नसून चाणक्याने केला आहे' असे कळवण्याची व्यवस्था केली होती. त्यामुळे तोही राजधानीतून पळून गेला होता. साहजिकच राक्षस व मलयकेतू यांचे सख्य जमले. दोघांनी मिळून सैन्य जमविण्यास प्रारंभ केला. या पार्श्वभूमीवर नाटकाला सुरुवात झाली आहे.

* * *

सूत्रधाराच्या बोलण्यातील चंद्रग्रहणाचा उल्लेख ऐकून 'मी-चाणक्य जिवंत असताना चंद्रगुप्ताला कोण ग्रासू शकणार आहे?' असा तावातावाने सवाल करीत चाणक्य रंगभूमीवर येतो. त्याने नंदाचे साम्राज्य उद्ध्वस्त करून चंद्रगुप्ताला सिंहासनावर बसवलेले आहे. राक्षस आणि मलयकेतू यांनी संगनमत करून चंद्रगुप्तावर आक्रमण करण्याची तयारी केली आहे. ही वार्ता लोकात कशी पसरली याचे त्याला नवल वाटते. या बातमीचे त्याला काही वाटत नाही. त्याच्या मते राक्षसाला पकडल्याशिवाय राजाला स्थिरता प्राप्त होणार नाही. राक्षस हा नंदकुळाशी अत्यंत एकनिष्ठ आहे. नंदवंशातील सर्वार्थसिद्धी नावाचा पुरुष हा तपस्वी असूनसुद्धा चाणक्याने त्याच्यावर मारेकरी घातला आहे. पण नंदवंशातील एखादी व्यक्ती जरी जिवंत असेल तोपर्यंत राक्षसाला चंद्रगुप्ताचा मंत्री बनवणे अशक्य आहे, ही गोष्ट चाणक्याला चांगली ठाऊक आहे.

राक्षसाच्या कारवायांचा बंदोबस्त करण्यासाठी चाणक्याने निरनिराळ्या वेषातील गुप्तहेर योजलेले आहेत. त्याचा इंदुशर्मा नामक ब्राह्मण सहकारी राक्षसाच्या परिजनात शिरलेला आहे आणि विशेष म्हणजे त्याने राक्षसाचा विश्वास संपादन केला आहे. इतक्यात यमपटाचा खेळ दाखवणारा गारुडी चाणक्याकडे येतो. चाणक्याचा शिष्य त्यास ओळखत नाही. तो चाणक्याने नेमलेला निपुणक नामक हेर होता.

या हेराने राजधानीत हिंडून महत्त्वाची माहिती गोळा केलेली आहे. तो सांगतो की, चंद्रगुप्ताचा उत्कर्ष सहन न होणाऱ्या तीन व्यक्ती कुसुमपुरात आहेत. त्यापैकी पहिला क्षपणक जीवसिद्धी. दुसरा कायस्थ शकटदास व तिसरा रत्नांचा व्यापार करणारा चंदनदास. यापैकी जीवसिद्धी हा चाणक्याचा गुप्तहेरच आहे, पण हे निपुणकास ठाऊक नाही.

कायस्थ शकटदासाची चाणक्य फिकीर करीत नाही. पण व्यापारी चंदनदास हा राक्षसाचा जिवलग मित्र होता. त्याच्याच घरी राक्षसाने आपल्या बायकोस व मुलास ठेवले होते. निपुणक खेळ करण्याच्या निमित्ताने व्यापारी चंदनदासाच्या घरासमोर गेला त्यावेळी त्या घरातला चार-पाच वर्षांचा मुलगा (हा राक्षसाचा मुलगा होता) बाहेर आला तेव्हा घरात गोंधळ झाला. एक स्त्री गडबडीने बाहेर आली व तिने त्या मुलाला ओढून चटदिशी घरात नेले. त्या गडबडीत तिच्या बोटातून थोडी सैल असलेली अंगठी खाली पडली व ती हेरास सापडली. ती अंगठी अमात्य राक्षसाची नाममुद्रा होती.

अशा तऱ्हेने राक्षसाची मोहोर असलेली अंगठी ताब्यात आल्याने चाणक्यास खुद्द राक्षसच आपल्या हातात आल्यासारखा आनंद झाला. त्याने हेराला पाठवले. राक्षसाला कचाट्यात पकडण्यासाठी त्याने एक पत्र तयार करण्याचे ठरवले. इतक्यात चंद्रगुप्ताचा निरोप घेऊन प्रतिहारी त्या ठिकाणी येते. ती सांगते की, पर्वतेश्वराने धारण केलेले अलंकार योग्य ब्राह्मणास दान करण्याची चंद्रगुप्ताची इच्छा आहे. चाणक्य त्यास संमती देतो पण त्यासाठी योग्य ब्राह्मण आपण स्वत: पाठवून देणार असल्याचे सांगतो. त्याप्रमाणे ब्राह्मण पाठविण्याची व्यवस्था करतो. तसेच आपण तयार केलेले पत्र शकटदासाच्या हस्ताक्षरात लिहवून घेण्यास सांगतो. त्याप्रमाणे पत्र येताच तो त्यावर राक्षसाची मोहर उठवतो.

तसेच त्यानंतर तो मणिकार श्रेष्ठी (जडजवाहिरांचे व्यापारी) चंदनदास याची भेट घेतो. चंदनदासाने राक्षसाच्या पत्नीस व मुलास आपल्या घरात आश्रय देऊन राष्ट्रद्रोह केलेला आहे. चाणक्य चंदनदासास त्यांना आपल्या स्वाधीन करण्यास सांगतो. चंदनदास साफ कानावर हात ठेवतो. चाणक्य त्यास धमकावतो पण त्याचा काही उपयोग होत नाही. चंदनदास त्यास स्पष्ट सांगतो, ''अमात्य राक्षसाच्या घरातली मंडळी माझ्या घरात असती तरी मी त्यांना आपल्या स्वाधीन केले नसते.'' चंदनदासाचा निर्धार पाहून चाणक्य थक्क होतो. मनात त्याची प्रशंसा करतो; पण वरकरणी त्याची सारी मालमत्ता जप्त करण्याचा व त्यास बायकोमुलासह बंदिखान्यात टाकण्याचा आदेश देतो.

त्यानंतर चाणक्याच्या योजनेप्रमाणे शकटदास वध्यभूमीवरून निसटतो. भागुरायण वगैरे विश्वासू मंडळी पळून जातात. चाणक्याचा शिष्य भांबावून जातो. पण चाणक्य शांत आहे. राक्षस त्याच्या कचाट्यात सापडण्यास फार वेळ लागणार नव्हता. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीस एक गारुडी प्रवेश करतो. वास्तविक पाहता तो विराधगुप्त नावाचा राक्षसाचा गुप्तहेर आहे. पाटलीपुत्रात हिंडून त्याने माहिती गोळा केलेली आहे. ती तो अमात्य राक्षसाच्या कानावर घालण्यासाठी आलेला आहे. राक्षस खिन्न होऊन बसलेला आहे. नंदांचे राज्य उद्ध्वस्त झाले आहे. चंचल राज्यलक्ष्मी नंदांना सोडून चंद्रगुप्तावर भाळलेली आहे. राक्षस चिंताग्रस्त असताना मलयकेतूकडून कंचुकी येतो. मलयकेतूने राक्षसाकडे अलंकार पाठविले असून ते परिधान करण्याची विनंती केली आहे त्याप्रमाणे राक्षस अलंकार परिधान करतो.

मग गारुड्याचा वेष घेतलेला विराधगुप्त त्याची भेट घेतो. राक्षस प्रथम त्यास ओळखत नाही. मग तो कुसुमपुराचा वृत्तांत सांगतो. त्यामध्ये राक्षसाने चंद्रगुप्ताचा नाश करण्यासाठी ज्या ज्या युक्त्या योजल्या होत्या त्या साऱ्या योजना चाणक्याने उधळून लावलेल्या आहेत. जी कमान चंद्रगुप्तावर पाडण्यासाठी उभी केली होती, ती चाणक्याच्या खबरदारीने राक्षसाच्या माणसावर - वर्वरकावर - पडली. चंद्रगुप्तास विष पाजण्यासाठी आलेल्या अभयदत्त वैद्यास चाणक्याने तेच विष पाजून ठार केले. भुयारात लपवलेल्या सैनिकांचा पत्ता लावून त्या शयनगृहासच आग लावली त्यामुळे ते सारे जळून गेले.

अशा प्रकारे चंद्रगुप्ताच्या जीविताला धोका आहे हे ओळखून चाणक्याने संशयित लोकांची धरपकड करण्याचे सत्र सुरू केले आहे. त्याने जीवसिद्धीची धिंड काढून नगराबाहेर हाकलून दिले. त्याच्यावर त्याने पर्वतेश्वराचा खून केल्याचा आरोप ठेवला होता. शकटदास या कायस्थास सुळावर चढवले (सर्वार्थसिद्धीने सुटका केल्याचे विराधगुप्तास ठाऊक नाही) चंदनदासास बंदिवासात टाकले.

विराधगुप्त हा वृत्तांत सांगत असतां खुद्द शकटदास व सिद्धार्थक राक्षसापुढे येऊन उभे राहतात. राक्षस आश्चर्यचकित होतो. सिद्धार्थकाने शकटदासाची सुटका केल्याचे समजताच राक्षस उदारपणे मलयकेतूने त्यास नजर केलेले अलंकार सिद्धार्थकास बक्षीस देऊन टाकतो. त्यानंतर सिद्धार्थक अमात्य राक्षसाची नाममुद्रा असलेली अंगठी त्यास देऊन टाकतो. आपली मुद्रा पाहून राक्षस चपापतो. पण ही अंगठी आपल्याला चंदनदास व्यापाऱ्याच्या घराच्या दाराशी सापडली असे सांगून तो वेळ मारून नेतो. विशेष म्हणजे राक्षसही फारशी चौकशी करीत नाही. सिद्धार्थक आपल्याला बक्षीस मिळालेले अलंकार पेटीत ठेवून त्यावर मोहोर उठवून ती पेटी राक्षसाच्या खजिन्यात ठेवण्याची विनंती करतो. राक्षस ती मान्य करतो.

त्यानंतर विराधगुप्त चाणक्य व चंद्रगुप्त यांच्यात वेबनाव उत्पन्न झाल्याचे सांगतो. मलयकेतू राज्यातून निसटल्यामुळे चंद्रगुप्त चाणक्यावर चिडलेला आहे. राक्षसाला ही बातमी दिलासा देणारी वाटते. तो विराधगुप्तास पुन्हा पाटलीपुत्रास जाऊन भाटाचे सोंग घेतलेल्या स्तवकलशाची भेट घेण्यास सांगतो. त्याच वेळी शकटदासाकडून निरोप येतो की तीन मौल्यवान अलंकार विक्रीसाठी आलेले आहेत. (वास्तविक पाहता ते अलंकार पर्वतेश्वराचे असून चाणक्याने मुद्दामच

राक्षसाकडे पाठवले आहेत.) राक्षस लगेच ते अलंकार खरेदी करण्यास सांगतो. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी कंचुकी प्रवेश करतो. चंद्रगुप्ताने शहरात कौमुदी-महोत्सव साजरा करण्याचा आदेश दिलेला आहे. शहराची शोभा पाहण्यासाठी तो स्वत: राजवाड्याच्या गच्चीवर येणार आहे. पण त्या उत्सवास चाणक्याने बंदी घातल्याची कल्पना कंचुकीस नाही. (चंद्रगुप्ताला हे सारे ठाऊक आहे पण तो कपटनाटकाची बतावणी करीत आहे.) तो चंद्रगुप्ताला गच्चीवर घेऊन जातो. पण शहरात उत्सव सुरू झाल्याची कोणतीही खूण दिसत नव्हती. चौकशी करता चाणक्याने या उत्सवास बंदी घातल्याचे समजते. त्याबरोबर चंद्रगुप्त ताबडतोब चाणक्यास बोलावणे पाठवतो.

चाणक्य आपल्या घरात विचारमग्न स्थितीत बसलेला आहे. चंद्रगुप्ताशी खोटे भांडण करून त्याला आपल्या शत्रूच्या गोटात गोंधळ उडवून द्यावयाचा आहे. इतक्यात कंचुकी त्यास बोलावण्यासाठी येतो. राजाचे बोलावणे येताच चाणक्य कंचुकीवर उगीचच डाफरतो. दोघे चंद्रगुप्ताकडे येतात. चाणक्याचे आगमन होताच चंद्रगुप्त सरळच महोत्सवास बंदी घालण्याचे कारण विचारतो. चाणक्य उडवाउडवी करतो. त्याच वेळी राक्षसाने सूचना दिलेले दोन भाट चंद्रगुप्ताची स्तुती करणारे दोन श्लोक म्हणतात. चंद्रगुप्त चाणक्यास खिजवण्यासाठी दोघा वैतालिकांना प्रत्येकी हजार मोहरा देण्यास सांगतो. चाणक्य त्यासही प्रतिबंध करतो. त्याबरोबर चंद्रगुप्त राज्याचा कारभार आपल्या हाती घेतल्याचे सांगतो.

महोत्सवास बंदी घालण्याचे कारण चाणक्य स्पष्ट करतो. एक तर कौमुदी महोत्सव साजरा करण्यासारखी राज्यात स्थिती नाही. तशात चंद्रगुप्ताच्या पक्षात असलेले भद्रभट, पुरुषदत्त, डिंगरात वगैरे सेनादलाचे प्रमुख फुटून निघून गेले आहेत. तसेच पित्याच्या हत्येने चिडलेला मलयकेतू राक्षसाशी संगनमत करून हल्ला करण्याच्या तयारीत आहे. तेव्हा किल्ल्याची मजबूती करण्याचे सोडून उत्सव साजरा करणे, त्याला योग्य वाटले नाही. पण त्याच्या स्पष्टीकरणाने चंद्रगुप्ताचे समाधान होत नाही. तेव्हा चाणक्य रागारागाने शस्त्र खाली टाकतो व निघून जातो. त्यानंतर चंद्रगुप्त ताबडतोब आपल्या हाती सत्ता घेतल्याचे प्रजाजनात जाहीर करण्यास सांगतो. खोट्या का असेना पण त्या कलहात भाग घेतल्याबद्दल त्याला वाईट वाटते. (अंक तिसरा)

तिसऱ्या अंकानंतर सुमारे पंधरा दिवसांनंतर चौथ्या अंकास प्रारंभ झालेला आहे. राक्षसाने पाठवलेला करभक हा हेर चंद्रगुप्ताने चाणक्यास मंत्रिपदावरून दूर केले आहे, ही बातमी सांगण्यासाठी राक्षसाकडे आलेला आहे. राक्षस चिंताग्रस्त आहे. तो प्रथम करभकास ओळखत नाही. त्याच वेळी मलयकेतू हा राक्षसाची विचारपूस करण्यासाठी आलेला आहे. पण राक्षस मसलत करीत आहे असे दिसताच तो बाहेर थांबूनच त्याचे बोलणे ऐकू लागतो. त्याच्याबरोबर चाणक्याचा हस्तक भागुरायणही आहे. त्याने मलयकेतूचा चांगला विश्वास संपादन केला आहे.

पर्वतेश्वराच्या मृत्यूनंतर आता दहा महिन्यांचा काळ उलटलेला आहे. या अवधीत आपण पित्याच्या हत्येचा सूड घेऊ शकलो नाही, याचे मलयकेतूला दुःख होत आहे. नाही म्हणायला चाणक्याकडील भद्रभट वगैरे राजे त्याच्या आश्रयाला आलेले आहेत. त्यांचा राक्षसावर विश्वास नाही. पण मलयकेतूचा आसरा हवा आहे. यामुळे त्याच्या मनात राक्षसाबद्दल किंतु उत्पन्न झालेला आहे. त्याचे मन राक्षसाविरुद्ध भडकवण्यासाठी भागुरायण तयारच आहे. तो मलयकेतूस सांगतो की राक्षसाचे वैर चाणक्याशी आहे, चंद्रगुप्ताशी नाही. त्यामुळे जर चंद्रगुप्ताने चाणक्यास घालवून दिले तर राक्षस चंद्रगुप्ताशी सख्य करील.

आणि मौज म्हणजे हेर तीच बातमी राक्षसास सांगत आहे. चाणक्याने कौमुदी महोत्सवास प्रतिबंध केल्यामुळे चंद्रगुप्ताने त्याची हकालपट्टी करून राज्याची सर्व धुरा स्वतः सांभाळायचे ठरविले आहे ही बातमी ऐकून राक्षस खूष होतो. त्यामुळे मलयकेतूच्या मनातला संशय दृढ होतो. मग तो राक्षसाची भेट घेतो.

आक्रमणाची सर्व तयारी झालेली असताना राक्षस कसली वाट पाहात आहे? असा प्रश्न मलयकेतू करतो. पण राक्षसही आता वेळ गमावण्यास तयार नाही. चाणक्य मंत्रिपदावरून दूर झाल्यामुळे शत्रुपक्ष कमजोर झालेला आहे. कारण चंद्रगुप्त सर्वस्वी चाणक्यावर अवलंबून होता. मातेचे स्तनपान अकस्मात सुटलेल्या अर्भकाप्रमाणे त्याची स्थिती झालेली आहे. राक्षसास आक्रमण करण्याचा आदेश देऊन मलयकेतू निघून जातो. (अंक चौथा)

चौथ्या अंकानंतर पंधरा दिवस उलटल्यावर पाचव्या अंकास सुरुवात झाली आहे. राक्षस आणि मलयकेतूच्या फौजा आता पाटलीपुत्राजवळ आलेल्या आहेत. अशा वेळी पत्र व दागिन्यांची (राक्षसाची मोहर असलेली) पेटी घेऊन सिद्धार्थक प्रवेश करतो. तो पाटलीपुत्रास जाणार असल्याचे सांगतो. इतक्यात

तेथे क्षपणक येतो. तो सांगतो की पाटलीपुत्र जवळ असल्यामुळे मलयकेतूच्या छावणीतून परवानगी घेतल्याशिवाय कोणाला बाहेर जाता येत नाही. ही परवानगी देण्याचे काम भागुरायणाकडे सोपवलेले आहे.

खरे तर भागुरायणाला आपल्यावर पूर्ण विश्वास टाकलेल्या मलयकेतूविरुद्ध कारस्थाने करणे पसंत नाही. एवढ्यात मलयकेतू त्यास भेटण्यासाठी येतो. पण भागुरायण क्षपणकाशी बोलत असलेला पाहून तेथेच थांबतो. क्षपणकाच्या बोलण्यातून राक्षसानेच विषकन्येची योजना करून पर्वतेश्वराचा घात केला, ही माहिती मलयकेतूच्या कानावर पडते. ती वार्ता ऐकताच त्याचा राक्षसावरील उरला सुरला विश्वास नाहीसा होतो. राक्षस आपल्या नावाप्रमाणे वृत्तीनेही राक्षसच आहे, असे त्यास वाटते. मलयकेतूचा राक्षसावरील संताप पाहून भागुरायण चपापतो. कारण कोणत्याही स्थितीत राक्षसाच्या जीविताला अपाय होता कामा नये, अशी चाणक्याची सक्त ताकीद होती. त्यामुळे तो राक्षसाची बाजू घेऊन मलयकेतूची समजूत घालतो. तो सांगतो की मलयकेतूने नंदराज्याची प्राप्ती होईपर्यंत तरी राक्षसास जवळ ठेवायलाच हवे. मलयकेतूस हा विचार पटतो.

इतक्यात परवाना घेतल्याशिवाय पळून जाणाऱ्या सिद्धार्थकास रक्षक पकडून भागुरायणासमोर आणतात. त्याच्या हातात पत्र असते. तो आपण राक्षसाचा सेवक असून त्याच्या तातडीच्या कामासाठी बाहेर जात असल्याचे सांगतो. त्याच्या हातातील पत्र पाहता त्यावर राक्षसाच्या नावाची मुद्रा असते. ते पत्र मोघम असले तरी चंद्रगुप्ताला उद्देशून आहे, हे सहज समजते. तसेच त्यात तीन अलंकार मिळाल्याचा उल्लेख असतो. नंतर त्याच्या जवळची पेटी उघडून पाहता त्यात अलंकार मिळतात. खरे तर ते अलंकार मलयकेतूने राक्षसास स्वतः घालण्यासाठी दिलेले होते. थोडा दम देताच सदर पत्र अमात्य राक्षसांनी चंद्रगुप्ताकडे देण्यासाठी आपल्याला पाठविले आहे असे तो स्पष्ट सांगतो. तोंडी निरोपात चित्रवर्मा वगैरे पाच राजांची नावे सांगतो.

राक्षसाचे कारस्थान पाहून मलयकेतू थक्क होतो. तो ताबडतोब राक्षसाची भेट घेतो. राक्षस त्या वेळी आक्रमणाचा व्यूह आखत आहे. राजपुत्र मलयकेतू येणार आहे असे समजताच राक्षस खरेदी केलेल्या अलंकारातील एक अलंकार घालतो. भेट होताच मलयकेतू सिद्धार्थकास चंद्रगुप्ताकडे कशासाठी पाठवण्यात येत होते असा सरळ प्रश्न विचारतो. राक्षसाला काहीच माहीत नसल्याने तो गोंधळतो. पण ते पत्र, अलंकार व तोंडी निरोप हे सारे पुरावे मलयकेतू राक्षसाच्या

तोंडावर फेकतो. राक्षस हतबद्ध होतो. हे सारे शत्रूचे कारस्थान आहे, यापलीकडे तो काही बोलू शकत नाही. राक्षसाला शकटदासाचा दाट संशय येतो. तसेच अंगावर घातलेल्या अलंकारानेही राक्षस गोत्यात येतो. पर्वतेश्वराच्या अंगावरचा अलंकार राक्षसाच्या अंगावर पाहताच मलयकेतू जास्तच भावनावश होतो. तो संतापून राक्षसास टाकून बोलतो. आपल्या वडिलांची हत्या त्यानेच केली असा स्पष्ट आरोपही करतो.

त्याचप्रमाणे सिद्धार्थकाने निरोपात सांगितलेल्या चित्रवर्मा वगैरे पाच राजांना ठार मारण्याचा तो हुकूम देतो. राक्षसाला तो चंद्रगुप्ताचा खुशाल आश्रय करण्यास सांगतो. कारण चंद्रगुप्त, चाणक्य व राक्षस हे तिघे मिळून जरी आपल्यावर चालून आले तरी आपण त्याचा नि:पात करू असा त्याला विश्वास वाटतो. तो निघून गेल्यावर राक्षस पुरता निराश होतो. हे सारे सोडून वनात निघून जावे असे त्यास वाटते. पण चंदनदासाचे प्राण धोक्यात आहेत याचे त्याला स्मरण होते. काहीही करून त्याला वाचवायचेच असा तो निश्चय करतो. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या सुरुवातीस प्रवेशक आहे. सिद्धार्थक पाटलीपुत्रात आलेला आहे. त्याची समिद्धार्थक नावाच्या मित्राशी भेट होते. त्यांच्या बोलण्यातून काही गोष्टी समजतात. संतापलेल्या मलयकेतूने राक्षसास हाकलून दिले आहे. तसेच चित्रवर्मा वगैरे पाच राजांची हत्या केली आहे. अमात्य राक्षसही चंदनदासाचा जीव वाचवण्यासाठी पाटलीपुत्रात आलेला आहे. तिकडे भागुरायण, भद्रभट, डिंगरात या चाणक्याच्या हस्तकांनी खुद्द मलयकेतूलाच पकडून ठेवले आहे. इतकेच नव्हे तर स्वत: चाणक्याने सैन्याची एक तुकडी घेऊन मलयकेतूच्या छावणीवर हल्ला चढवला आहे. आता चंदनदासास (खोटेच) फासावर चढविण्याच्या कामावर सिद्धार्थक व समिद्धार्थक या दोघांची योजना केलेली आहे. समिद्धार्थकास हे सारे ऐकून नवल वाटते.

मुख्य प्रवेशात एक पुरुष हातात दोर घेऊन अमात्य राक्षसास शोधत आहे. इतक्यात मुख वस्त्राने झाकून राक्षस सावधपणे जीर्णोद्यानात येतो. तो हताश झालेला आहे. मलयकेतूच्या अविचाराबाबत त्यास वाईट वाटते. तो पुरुष त्याला पाहतो व त्यास दिसेल अशा बेताने आत्महत्या करीत असल्याची बतावणी करतो. राक्षस ताबडतोब पुढे होऊन त्यास थांबवतो व त्याची विचारपूस करतो. तेव्हा तो सांगतो की नगरातील शेठ चंदनदासाचा विष्णुगुप्त हा जिवलग मित्र आहे व तो आपलाही मित्र आहे. आता चंदनदास फासावर जाणार हे समजताच

विष्णुदासाने अग्निप्रवेश करण्याचे ठरविले आहे. तसेच विष्णुगुप्ताच्या मृत्यूची वार्ता येण्याअगोदर हा पुरुषही आत्महत्या करणार आहे.

हे सारे ऐकून राक्षसाचे हृदय गलबलते. कारण तो विष्णुदासास चांगला ओळखत होता. आपणच राक्षस असून चंदनदासास सोडविण्यासाठी आलो असल्याचे तो सांगतो. तो पुरुष त्यास शस्त्र घेऊन जाऊ नका असे सांगतो. त्याप्रमाणे शस्त्र तेथेच टाकून राक्षस वध्यभूमीकडे जातो. (अंक सहावा)

सातव्या अंकात चंदनदास, त्याची पत्नी व मुलगा हे प्रवेश करतात. पाठोपाठ खांद्यावर सूळ घेतलेला चांडाळ येतो. चांडाळाच्या सांगण्याप्रमाणे चंदनदास आपल्या पत्नीला परत जाण्यास सांगतो. तो आपल्या लहान मुलास 'जेथे चाणक्याचे नाव ऐकू येणार नाही' अशा ठिकाणी जाण्यास सांगतो. सूळ उभा राहताच त्याची बायको रडू लागते. तो पत्नीचे सांत्वन करतो. तो मित्रासाठी कर्तव्यपालन करताना मृत्यूस सामोरा जात आहे, त्यामुळे त्याला मुळीच वाईट वाटत नाही.

एवढ्यात गडबडीने अमात्य राक्षस तेथे येतो. त्याला पाहताच चंदनदास चकित होतो.राक्षस ताबडतोब मारेकऱ्यास आपला निरोप चाणक्याकडे पोहोचता करण्यास सांगतो. अमात्य राक्षस हातात सापडल्याचे समजताच चंदनदासाची सुटका होते. एवढ्यात स्वत: चाणक्यच तेथे येतो. राक्षस व चाणक्य याची समोरासमोर भेट होते. चाणक्य आदराने त्यास 'अमात्य' असे संबोधून प्रणाम करतो. राक्षस लज्जित होतो. त्यानंतर चाणक्य हे सर्व कारस्थान आपणच योजले असल्याचे सांगतो व त्या सर्वांचा उद्देश अमात्य राक्षसाने चंद्रगुप्ताचा मुख्य प्रधान व्हावे हा आहे, असे म्हणून तो त्यास चंद्रगुप्तास भेटण्यास सांगतो. पेचात सापडलेल्या राक्षसास काही बोलता येत नाही. तो ओशाळा होऊन चंद्रगुप्तास भेटतो. राजा चंद्रगुप्तही आपल्या भावी प्रधानमंत्र्यास नमस्कार करतो. राक्षस चंद्रगुप्तास आशीर्वाद देतो.

चंदनदास जिवंत सुटावा असे जर राक्षसास वाटत असेल तर त्याने चंद्रगुप्ताचे प्रधानमंत्रिपद स्वीकारावे, असे चाणक्य त्यास स्पष्ट सांगतो. राक्षस नाइलाजाने का होईना चाणक्याच्या प्रस्तावास कबूली देतो. इतक्यात एक पुरुष येऊन सांगतो की भद्रभट, भागुरायण इत्यादिकांनी मलयकेतूस पकडून नगराच्या प्रवेशद्वारात आणलेले आहे. चाणक्य लगेच ह्या प्रकरणाचा निर्णय करण्याची जबाबदारी राक्षसावरच सोपवतो. राक्षस मलयकेतूचे प्राण वाचविण्याची विनंती

करतो. चाणक्य तत्काळ ती विनंती मान्य करतो. इतकेच नव्हे तर त्याचे राज्यही त्यास परत करतो.

तसेच श्रेष्ठी चंदनदासाची सुटका करून त्यास नगरश्रेष्ठी बनवण्यात येते. तुरुंगातील सर्व कैद्यांची सुटका करण्यात येते. आपली प्रतिज्ञा खऱ्या अर्थाने पूर्ण झाली असे म्हणून चाणक्य आपली आजवर मोकळी सोडलेली शेंडी बांधतो. भरतवाक्य होऊन नाटक समाप्त होते. (अंक सातवा)

* * *

विशाखदत्ताने नाटकाची रचना परंपरागत आख्यायिका व त्याला उपलब्ध झालेल्या इतिहासाच्या आधारे केली आहे. यातील चंद्रगुप्त हे पात्र पूर्ण ऐतिहासिक आहे. परंतु अर्थशास्त्र या प्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता विष्णुगुप्त ऊर्फ चाणक्य याच्याविषयी इतिहासाने मौन धारण केले आहे. परंपरागत हकीकतीत मात्र चाणक्याने नंदराज्याचा पाडाव करून चंद्रगुप्ताची सिंहासनावर स्थापन केली, असे म्हटले आहे. विशाखदत्ताने आख्यायिका व दंतकथा यांच्या आधारे व अर्थशास्त्राच्या सूक्ष्म अध्ययनातून प्रतीत होणारे चाणक्याचे व्यक्तिचित्र आपल्या प्रतिभाशक्तीने जिवंत उभे केले आहे.

अमात्य राक्षसाच्या बाबतीत हीच स्थिती आहे. इतिहासात त्याचा नामोल्लेख नाही. परंतु पारंपरिक हकीकतीतही त्याचा जुजबी उल्लेख आहे. राक्षस हा नंदाचा मंत्री होता व त्याने एक कूटप्रश्न सोडवून आपल्या बुद्धीचे प्रदर्शन केले, इतकेच सांगितले आहे. एवढ्या त्रोटक हकीकतीच्या आधारे विशाखदत्ताने त्याचे अत्यंत प्रभावी व जिवंत असे चित्रण केले आहे.

प्रथम परंपरागत हकीकतीवर एक नजर टाकू. मुद्राराक्षसाचा संस्कृत टीकाकार ढुंढिराज याने टीकेच्या प्रारंभी माहिती दिली आहे, ती याप्रमाणे-सर्वार्थसिद्धी नामक नंदराजास सुनंदा आणि मुरा अशा दोन बायका होत्या. त्यापैकी मुरा ही हलक्या कुळातील होती. पण ती राजाची आवडती होती. तिला मौर्य नामक पुत्र झाला. या मौर्य राजास पुढे शंभर पुत्र झाले. त्यापैकी चंद्रगुप्त हा प्रमुख होता.

सर्वार्थसिद्धीच्या दरबारात वक्रनास इत्यादि अनेक मंत्री होते. त्यामध्ये राक्षस नावाचा ब्राह्मण मंत्री विशेष प्रसिद्ध होता. तो राजनीतीत प्रवीण होता. तसेच शूरही होता. राज्याची धुरा तोच सांभाळत होता. एकदा एक ब्राह्मण उद्यानात

दर्भाचे समूळ उच्चाटन करीत असता चंद्रगुप्ताच्या दृष्टीस पडला. दोघांची मैत्री जमली. त्यानंतर चाणक्याचा नंदाच्या दरबारात अपमान झाला. तेव्हा तो संतापला. त्याने आपल्या शेंडीची गाठ सोडली व नंदकुळाचा संपूर्ण नाश करण्याची प्रतिज्ञा केली. चंद्रगुप्तालाही नंदाच्या राज्यात राहणे धोक्याचे वाटत होते. म्हणून तो चाणक्यासमवेत नगराच्या बाहेर पडला.

चाणक्याने इंदुशर्मा नामक ब्राह्मणास क्षपणकाचा वेष देऊन त्यास राक्षसावर बारीक नजर ठेवण्यास सांगितले. त्यानंतर पर्वतक नामक म्लेंच्छ राजाला अर्धे राज्य देण्याचे आमीष दाखवून नंदराजाविरुद्ध चिथावणी दिली. पर्वतकाने चाणक्याच्या मदतीने नंदावर आक्रमण केले. त्या भयंकर युद्धात नंदराजाचा समूळ निःपात झाला. पाटलीपुत्र शहराचा चाणक्याने ताबा घेतला.. चंद्रगुप्त सिंहासनावर बसला. राक्षसाने सर्वार्थसिद्धीस गुप्त मार्गाने शहराबाहेर रवाना केले. पण चाणक्याने त्याचा शोध घेऊन त्यास ठार मारले.

राक्षसाने चंद्रगुप्ताचा नाश करण्यासाठी विषकन्या पाठवली पण चाणक्याने धूर्तपणे तिला पर्वतकाकडे पाठवले. त्यामुळे पर्वतक मरण पावला. पर्वतकाचा मुलगा मलयकेतू हा घाबरला व राज्यातून बाहेर पळाला. चाणक्याने राक्षसानेच मलयकेतूच्या बापाचा घात केला अशी शहरात अफवा पसरविली. राक्षसाने चंद्रगुप्ताचा नाश करण्यासाठी अनेक उपाय योजले; पण चाणक्याने अत्यंत जागरूकपणे प्रत्येक उपाय मोडून काढला. त्यातच पर्वतकाचा भाऊ वैरोचकदेखील कमान अंगावर कोसळून मरण पावला. नंतर निराश होऊन राक्षस राज्यातून बाहेर पडला. मलयकेतूशी त्याने संधान बांधले. सैन्य गोळा करून त्याने चंद्रगुप्तावर आक्रमण करण्याचे ठरवले. अशा प्रकारे धुंडिराजाने ही माहिती नाटकाच्या प्रारंभापर्यंत आणून भिडवली आहे.

पौराणिक कथेनुसार नंदराजे हे शूद्र होते. महानंदी या नंदराजाने एका शूद्र स्त्रीशी विवाह केला होता. तिच्यापासून त्याला महापद्म हा पुत्र झाला. चंद्रगुप्ताची आई मुरा ही शूद्र जातीय होती, असाही उल्लेख आहे. त्यामुळे नाटकात चंद्रगुप्ताला 'वृषल' असे म्हटलेले आहे. धुंडिराजाने दिलेल्या हकीकतीत चंद्रगुप्त हा मौर्य राजाचा पुत्र आहे व मौर्याची आई मुरा ही शूद्रजातीय आहे. ते काहीही असो, चंद्रगुप्त हा हलक्या कुळातील आहे याविषयी या दोन्ही वृत्तांतात एकमत आहे.

बौद्ध परंपरेनुसार मोरिय नामक डोंगरी प्रदेशातील क्षत्रिय घराण्यातील एक वीर पुरुष रणांगणात मरण पावला. त्याची विधवा पत्नी ही नंदाच्या वाड्यात

आश्रयास आली. तिने चंद्रगुप्ताला जन्म दिला. इतर परंपरेनुसार चंद्रगुप्ताचे बालपण धनगर लोकांच्या घरात गेले. थोडक्यात म्हणजे चंद्रगुप्ताचा नंद घराण्याशी काही संबंध असावा असे वाटत नाही. त्याला बदनाम करण्यासाठी या आख्यायिका रचल्या गेल्या असाव्यात असा संशय येतो.

चंद्रगुप्ताचा उल्लेख नाटकात 'वृषल' या शब्दाने केलेला आहे. अमरकोषात 'शूद्राश्चावरवर्णाश्च वृषलाश्च जघन्यजाः' (अमर १९३०) या शब्दाचा अर्थ शूद्र असा दिलेला आहे. श्री. ज. वि. ओकांच्या गीर्वाणलघुकोशात शूद्र, बहिष्कृत, अधार्मिक असे अर्थ दिले आहेत. या शब्दात काही तरी असभ्यार्थ आहे हे निश्चित. पण चाणक्याने सेवकासमोर चंद्रगुप्ताचा 'वृषल' या शब्दाने उल्लेख करावा याचे नवल वाटते. यास्तव श्री. आर. एस. पंडितांनी या शब्दाचा अर्थ 'आवडता', 'लाडका' अथवा 'खोंड' असा कौतुकपर असावा असे मत व्यक्त केले आहे. पण सहाव्या अंकात राक्षसही चंद्रगुप्ताचा 'वृषल' असाच उल्लेख करतो. (पाहा - 'गता छिद्रेण श्रीवृषलमविनीतेव वृषली' अंक ६ श्लोक ६). चंद्रगुप्ताच्या हलक्या कुळाचा त्याने दुसऱ्या अंकात स्पष्ट उल्लेख केला आहे. तेव्हा राक्षस चंद्रगुप्ताचा 'लाडका, आवडता' अशा अर्थाने उल्लेख करतो, असे मानता येणार नाही. असो.

* * *

या नाटकाचा कालावधी साधारण एक वर्षाचा आहे, असे म्हणता येईल. नाटकाच्या तिसऱ्या अंकात कौमुदी-महोत्सवाचा उल्लेख आहे. हा महोत्सव कार्तिक पौर्णिमेस साजरा करण्यात येत असावा. दुसरे असे की, या अंकातील एकविसाव्या श्लोकात विष्णू जागा झाला असून तो शय्या सोडू इच्छित असल्याचे वर्णन आहे. त्यावरून हा कार्तिकी-प्रबोधिनी एकादशीचा उल्लेख आहे. कार्तिकी पौर्णिमेला त्रिपुरी पौर्णिमा असे नाव असून आजही या दिवशी मंदिरावर दिवे पाजळण्यात येतात.

चौथ्या अंकात मलयकेतूच्या तोंडी 'आज वडिलांना जाऊन दहा महिने झाले' असा उल्लेख आहे. तिसऱ्या व चौथ्या अंकाच्या दरम्यान एक महिन्याचे अंतर मानले तर मागील वर्षाच्या फाल्गुन महिन्यात पर्वतेश्वराची हत्या करण्यात आली असे निश्चितपणे म्हणता येते.

नाटकाच्या प्रस्तावनेत चंद्रग्रहणाचा उल्लेख आहे. तेव्हा त्या दिवशी पौर्णिमा होती. ही चैत्री पौर्णिमा असावी असा विद्वानांचा अंदाज आहे. या अंदाजास

थोडा आधार आहे. पहिल्या अंकात चंद्रगुप्त हा पर्वतेश्वराचे पारलौकिक हित साधण्यासाठी त्याचे दागिने ब्राह्मणांना दान देऊ इच्छित आहे, असा उल्लेख आहे. हे बहुधा पर्वतेश्वराचे पहिले मासिक श्राद्ध असावे. तेव्हा यावरूनही ती चैत्री पौर्णिमा होती असे म्हणता येते.

पहिल्या अंकानंतर किमान एक महिन्याने दुसऱ्या अंकास प्रारंभ झालेला असावा. या अंकात (चाणक्याच्या सूचनेवरुन) शकटदासाची सिद्धार्थकाने सुटका केली असून तो त्याच्यासह कुसुमपुरातून राक्षसाकडे रवाना झालेला आहे. चौथ्या अंकातल्या उल्लेखावरून ते अंतर बरेच असून प्रवासही त्रासदायक होता. यामुळे चौथ्या व पाचव्या अंकातल्या घटना मार्गशीर्ष महिन्यात घडल्या असून पुढील दोन अंकांतील घटना महिना अथवा दीड महिन्याच्या अवधीत घडून आल्या आहेत. त्यामुळे पर्वतकाच्या हत्येनंतर एक वर्षाच्या आत नाटकाचे कथानक समाप्त झाले आहे.

* * *

या नाटकात चाणक्य, राक्षस, चंद्रगुप्त, मलयकेतू व चंदनदास अशी पाचच ठळक पात्रे आहेत. मागे पाहिल्याप्रमाणे चाणक्य, चंद्रगुप्त व राक्षस या व्यक्ती ऐतिहासिक असाव्यात. मलयकेतूलाही ऐतिहासिक मानायला हरकत नाही. यांच्याविषयीच्या त्रोटक आख्यायिकांतून नाटककाराने या जिवंत व्यक्तिरेखा साकार केल्या आहेत.

**(१) चाणक्य** : हा चणकऋषींचा पुत्र असून याचे मूळ नाव विष्णुगुप्त होते असे आख्यायिकांवरून दिसते. त्रिकांडशेष कोषात त्याची द्रामिल, वात्स्यायन, पक्षिलस्वामी अशी इतर नावे सांगितली आहेत. पण ती विश्वसनीय नाहीत. स्वतः चाणक्य हा वेदविद्या निपुण असून अर्थशास्त्रात पारंगत होता. या नाटकावर त्याच्या प्रखर बुद्धिमत्तेची, मुत्सद्दीपणाची व दूरदर्शी धोरणाची छाप पडलेली आहे. तो अत्यंत हुशार व कावेबाज असा मुत्सद्दी आहे. चंद्रगुप्ताच्या विरोधकांचा नि:पात करून राज्याची घडी बसवणे व नंदांचा एकनिष्ठ प्रधानमंत्री राक्षसाला प्राप्त करून घेणे, ही दोन उद्दिष्टे चाणक्याच्या नजरेसमोर आहेत. त्यांच्या पूर्ततेसाठी त्याने अनेक योजना आखल्या असून हुशारीच्या जोरावर यशस्वी करून दाखवल्या आहेत.

चाणक्य हा स्वभावाने उग्र, कठोर व तर्ककर्कश आहे. घडणाऱ्या सर्व लहान-सहान प्रसंगांवर त्याची बारीक नजर आहे. विशेषतः चंद्रगुप्ताचे रक्षण तर तो

डोळ्यात तेल घालून करीत आहे. त्याने सर्वत्र हेरांचे जाळे पसरले आहे आणि त्यांच्या मदतीने त्याने राक्षसाने चंद्रगुप्ताच्या नाशासाठी योजलेल्या युक्त्या-प्रयुक्त्या धुळीला मिळवल्या आहेत. तो स्वत: अत्यंत नि:स्पृह आहे. त्याचे घर म्हणजे संन्याशाची मठी आहे. चंद्रगुप्ताला चांगला प्रधान लाभला की तो निवृत्त होणार आहे. तो बोलण्यात चतुर आहे. चंदनदासाला बोलता बोलता त्याने जाळ्यात अडकवलेले आहे; पण तो गुणग्राहीही आहे. राक्षसासाठी चंदनदास आपल्या प्राणाचीही पर्वा करीत नाही, हे पाहिल्यावर तो मनातून त्यास धन्यवाद देतो. चंद्रगुप्ताशी खोटे भांडण करताना तो संतापाचा असा आव आणतो की सारे जण भेदरून जातात. इतकेच नव्हे तर या नाटकाची बतावणी करणाऱ्या चंद्रगुप्तालाही आचार्य खरेच तर रागावले नाहीत ना अशी शंका येते. राक्षसाविषयी त्याच्या मनात आदरभाव आहे. तो कचाट्यात सापडल्यावरदेखील चाणक्य त्यास प्रणाम करतो व अमात्यपद स्वीकारण्याची विनंती करतो.

**(२) राक्षस :** चाणक्याप्रमाणे राक्षसही मुत्सद्दी आहे. कुशल प्रधानमंत्री आहे; पण तो म्हणावा तसा धूर्त व कावेबाज नाही. त्याचा स्वभाव सरळ व दयाळू आहे. तो नंदांच्या राजवटीत प्रधान अमात्य होता. त्यामुळे त्याची नंदांवर असामान्य निष्ठा आहे व ती नंदांचे साम्राज्य उद्‌ध्वस्त झाले तरी कमी झाली नाही. नंदांची सत्ता जाताच राक्षस एकाकी पडला. त्याने राज्यातून पळ काढला. परंतु त्याची बायका-मुले ही चंदनदास श्रेष्ठीच्या घरात राहात आहेत. अपयशामुळे राक्षस खचलेला आहे. असे असूनही त्याने चंद्रगुप्ताचा नाश करण्यासाठी अनेक युक्त्या योजल्या. प्रथम त्याने विषकन्येला चंद्रगुप्ताकडे पाठवले. त्यानंतर चंद्रगुप्त नगरात प्रवेश करीत असता रस्त्यावरील कमान त्याच्या मस्तकावर पाडण्याची योजना आखली. त्यानंतर विषारी औषधे देऊन एका वैद्याला पाठवले. चंद्रगुप्ताच्या शय्यागृहाच्या भिंतीच्या पोकळीत सैनिक लपवले. पण या त्याच्या साऱ्या युक्त्यांचा चाणक्याने छडा लावून त्या उधळून लावल्या.त्यामुळे राक्षस अधिकच हैराण झाला.

तथापी मुत्सद्दी म्हणवणाऱ्या या राजकारणी पुरुषाने गंभीर चुका केल्या आहेत. त्याने आपली नाममुद्रा असलेली अंगठी बायकोजवळ देण्याची घोडचूक केली आहे. त्यानंतर सिद्धार्थकाने अचानकपणे त्याची अंगठी परत केल्यावरदेखील त्याला आपल्या अंगठीचा दुरुपयोग तर झाला नाही ना अशी शंका येत नाही. तेव्हा अंगठीच्या बाबतीत राक्षस अत्यंत बेजबाबदारपणे वागलेला आहे. त्याची

दुसरी घोडचूक म्हणजे चाणक्याने आपल्या हेराकरवी पाठवलेले पर्वतेश्वराचे अलंकार विकत घेतले, ही होय. एक तर अलंकार विकत घेण्याची गरज नव्हती. दुसरे आपण कोणाकडून अलंकार खरेदी करतो आहोत याची त्याने चौकशीही केली नाही आणि तिसरे म्हणजे मलयकेतूने प्रेमाने राक्षसाला दिलेल्या अलंकारांपैकी एक अलंकार त्याने काही एक विचार न करता सिद्धार्थकाला देऊन टाकला आहे. यावरून राक्षस अत्यंत हळवा, भावनाविवश व उतावळा आहे असे वाटल्यावाचून राहात नाही. त्याच्या भोळसट वृत्तीमुळे चाणक्याने योजलेल्या खोड्यात तो अडकतो व चाणक्याने सांगितलेली जबाबदारी स्वीकारण्याशिवाय त्याच्याकडे पर्याय राहात नाही.

त्याची ही वृत्ती त्याच्या राजकारणी अथवा मुत्सद्दी या प्रतिमेशी सर्वस्वी प्रतिकूल आहे म्हणूनच डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी केलेली त्याच्या अपयशाची मीमांसा अत्यंत मार्मिक आहे. ते लिहितात - "दैव राक्षसाला प्रतिकूल होतेच. पण धोरणीपणाच्या व समयसूचकतेच्या अभावामुळे राक्षसाने आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला अशीच त्याच्या अपयशाची मीमांसा करावी लागेल." (मुद्रा. प्रस्ता. पृष्ठ ६४)

चाणक्याचे लखलखीत व्यक्तिमत्त्व सादर करीत असता त्याचा प्रतिस्पर्धी म्हणून उभ्या केलेल्या राक्षसाची व्यक्तिरेखा मात्र नाटककाराने अगदीच दुबळी करून ठेवली आहे. त्यामुळे असा भावविवश व सहजासहजी फसणारा राक्षस चंद्रगुप्ताचा कारभार कसा चालवणार अशी शंका येते. तथापि 'माणूस' म्हणून त्याची उभी केलेली व्यक्तिरेखा 'जिवंत' वाटते. यास्तव 'मुद्राराक्षस' नाटकाचा नायक चाणक्य नसून राक्षसच आहे आणि म्हणूनच नाटकाच्या नावात त्याच्या नावाचा नाटककाराने समावेश केलेला आहे.

**(३) चंद्रगुप्त :** मौर्य घराण्याचा हा संस्थापक राजा. याने नंद साम्राज्याचा पाडाव करून उत्कृष्ट राज्यकारभार केला. नंदांचा पाडाव करण्यासाठी त्याला चाणक्याचे सहाय्य झाले असावे; पण नाटकात मात्र त्याला गौणस्थान देण्यात आले आहे. त्याचे दर्शन काय ते तिसऱ्या व शेवटच्या अंकात होते. अशा राजाला 'सचिवायत्त' राजा म्हणतात. याची आपल्या गुरूवर पूर्ण निष्ठा आहे व त्याचे आदेश तो तंतोतंतपणे पाळत आहे. चंद्रगुप्ताचे राज्याकडे लक्ष नाही, अशी तक्रार खुद्द चाणक्याच्या तोंडी आहे. उभ्या नाटकात चाणक्याने एकच महत्त्वाची कामगिरी त्याच्याकडून करून घेतली आहे व ती म्हणजे खोटे भांडण करण्याची. तिसऱ्या अंकाच्या अखेरीस चाणक्यास मंत्रिपदावरून हाकलून

राज्याचा कारभार आपल्या हाती घेण्याची बतावणी मात्र त्याने चांगल्या रीतीने केली आहे.

दुसरे असे की चाणक्य नोकरा-चाकरासमोर त्याला 'वृषल' असे संबोधताना दिसतो. 'वृषल' या शब्दात मागे दर्शविल्याप्रमाणे असभ्यार्थ आहे. अशा रीतीने चंद्रगुप्ताचा पाणउतारा करण्याचे काय कारण असावे हे उमगत नाही. तेव्हा चंद्रगुप्ताचे महत्त्व कमी करावे हा नाटककाराचाच उद्देश दिसतो. डॉ. वाळिंबे यांनी म्हटल्याप्रमाणे 'राज्यकारभारात आवड नसलेल्या आणि चाणक्याच्या हातातील बाहुले बनलेल्या चंद्रगुप्त मौर्याची द्वितीय चंद्रगुप्ताशी तुलना करण्याचा नाटककाराचा हेतू असावा' असे वाटत नाही. असो.

**(४) मलयकेतू :** मलयकेतू हा पर्वतेश्वराचा मुलगा आहे. म्हणजे चंद्रगुप्ताप्रमाणे हाही तरुण राजपुत्र आहे. पर्वतेश्वराने अर्धे राज्य मिळण्याच्या अटीवर चाणक्याला मदत केली होती. पण चाणक्याने आपले काम झाल्यावर पर्वतेश्वराकडे विषकन्या पाठवून त्याचा काटा काढला. चाणक्याने आपल्या वडिलांचा घात केला हे समजल्यावर मलयकेतूने पळ काढला. त्याची व राक्षसाची मैत्री जुळली. दोघांनी सैन्याची जमवाजमव करून चंद्रगुप्तावर आक्रमण करण्याचे ठरवले.

पण चंद्रगुप्ताची जशी चाणक्यावर निष्ठा होती तशी मलयकेतूची राक्षसावर निष्ठा नव्हती. तो स्वत: भित्रा, उतावळा व संशयी स्वभावाचा होता. त्याला आपल्या पित्याच्या हत्येचा सूड घ्यावयाचा होता. तशात चाणक्याने त्याच्यात व राक्षसात फूट पाडण्यासाठी भागुरायणाची नियुक्ती केली होती. पर्वतकाची हत्या चाणक्याने केली नसून राक्षसानेच केली आहे, अशी सनसनाटी बातमी सांगून भागुरायण त्याच्या मनात राक्षसाबद्दल विष कालवतो. त्याचप्रमाणे राक्षसाच्या मनात चंद्रगुप्ताविषयी ओढ आहे. तसेच चंद्रगुप्त चाणक्याच्या जाचाला कंटाळला आहे. त्याने चाणक्याला मंत्रिपदावरून काढले की राक्षस त्याच्याकडे जाणार आहे हे ऐकल्यावर तर मलयकेतूचे धाबेच दणाणते.

अशा स्थितीत तो राक्षसाला भेटायला गेला असता करभक हा हेर राक्षसास चंद्रगुप्ताने चाणक्याची हकालपट्टी करून राज्याची सूत्रे स्वत:कडे घेतल्याची बातमी सांगत असतो. मलयकेतू हा राजपुत्र असला तरी त्याचे राजकारणाचे ज्ञान व आकलनशक्ती बेताचीच आहे. त्यामुळे भागुरायणाच्या सांगण्यावर त्याचा विश्वास बसतो आणि यानंतर राक्षसाची नाममुद्रा असलेली पेटी घेऊन पळ

काढणारा सिद्धार्थक त्याच्या हाती लागतो. त्याच्याकडे शकटदासाच्या हस्ताक्षरात लिहिलेले पत्र व एक अलंकार सापडतो तेव्हा राक्षस चंद्रगुप्ताशी संधान बांधत असल्याचा पुरावाच मलयकेतूच्या हाती येतो. मलयकेतूने चिडून राक्षसाची हत्या करू नये याचीही भागुरायण खबरदारी घेत आहे. असा हा मलयकेतू अखेरीस चाणक्याच्या सैनिकांकडून कैद होतो.

**(५) चंदनदास :** हा कुसुमपुरातील जड-जवाहिरांचा व्यापारी असून अमात्य राक्षसाचा परममित्र आहे. राक्षसाचा त्याच्यावर विश्वास असल्याने राज्यातून फरारी होण्यापूर्वी राक्षसाने आपले कुटुंब चंदनदासाच्या घरी ठेवले आहे. राजद्रोहाचा धोका पत्करुन चंदनदासाने त्याच्या कुटुंबास आसरा दिला आहे. अर्थात चाणक्याला याचाही सुगावा लागलेला आहे. तो चंदनदासाला बोलावून घेतो व त्याला राक्षसाच्या कुटुंबास स्वाधीन करण्याविषयी दमदाटी करतो. पण चंदनदास त्यास दाद देत नाही. तेव्हा त्याची सारी मालमत्ता जप्त करून तुरुंगात टाकण्यात येते. अखेरीस त्यांना सुळावर देण्याची शिक्षा होते. तरी चंदनदास डगमगत नाही. तो राक्षसासाठी आपले प्राणही देण्यास तयार आहे. चाणक्याची पक्की खात्री आहे की चंदनदासाचे प्राण वाचवण्यासाठी राक्षस धावत आल्याखेरीज राहणार नाही आणि तसेच घडते. राक्षस चाणक्याच्या स्वाधीन होतो व चंदनदासाची ताबडतोब सुटका होते. राक्षस व चंदनदासाची मैत्री हा नाटकातील अत्यंत हृद्य असा भाग आहे.

* * *

या नाटकावर अनीतीचा प्रसार केल्याचा आरोप आहे. विषय राजकारणाशी निगडित असल्याने यात अनेक अपप्रवृत्तींचे दर्शन घडते. चाणक्याने आपले ईप्सित साध्य करण्यासाठी भल्या-बुऱ्या मार्गांचा अवलंब केलेला आहे. निरपराध लोकांची हत्या केली आहे. चंदनदासासारख्या सज्जन माणसांचा विनाकारण छळ केला आहे. यात त्याचा उद्देश चांगला असेल. परंतु चांगल्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी वाईट मार्गाचा अवलंब करणे योग्य आहे का? हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. याच कारणासाठी शिष्टजनांनी या नाटकास नाके मुरडली आहेत.

तथापि या नाटकाकडे नीट पाहिले तर काय दिसते? यातील वातावरण शुद्ध राजकारणाचे आहे. येथे स्वार्थाचा बाजार भरलेला आहे. भलाईने वागून येथे निभाव लागत नाही. म्हणून चाणक्याने न्यायासाठी अन्याय केला. सत्यासाठी

असत्याची कास धरली. प्रसंगच असा होता की याशिवाय दुसरा उपायच नव्हता. ही चाणक्य नीती आहे. ती उग्र असेल, कठोर असेल; पण ती स्वार्थासाठी प्रवृत्त झालेली नाही. तिच्यात भ्रष्टाचाराला स्थान नाही. तेव्हा तिची चार्वाक नीतीशी तुलना होऊ नये.

खुद्द चाणक्याचे चारित्र्य अत्यंत शुद्ध आहे. तो पराकाष्ठेचा नि:स्पृह आहे. एवढ्या मोठ्या साम्राज्याचा महामंत्री असूनही तो साध्या झोपडीत राहतो. चंद्रगुप्ताच्या राज्याची व्यवस्थित घडी बसली की तो राजकारणातून निवृत्त होणार आहे. तेव्हा प्रस्तुत राजकारणात त्याचा यत्किंचितही स्वार्थ नाही.

नंदराजे धनलोभी होते, जुलमी होते, भ्रष्ट होते. त्यांनी चाणक्य व चंद्रगुप्तावर अन्यायही केला होता. तेव्हा अशा उन्मत्त व भ्रष्टाचारी राजाच्या तावडीतून प्रजाजनांची सुटका करण्यासाठी चाणक्याने नंदांचे साम्राज्य उद्ध्वस्त करण्याची प्रतिज्ञा केली होती: केवळ स्वत:च्या अपमानाचा बदला घेण्यासाठी त्याने हे पाऊल उचललेले नव्हते हे लक्षात ठेवले पाहिजे.

केवळ चंद्रगुप्ताची राज्यावर स्थापना करून चाणक्याचे उद्दिष्ट पूर्ण झाले नाही. राक्षसाने चंद्रगुप्ताविरुद्ध चालवलेल्या कारवाया व कारस्थाने यांचा बीमोड करून राज्यात शांतता प्रस्थापित करणे हेही त्याचे कर्तव्यच होते. राक्षस हा नंदराजाचा अमात्य होता व त्याची नंदांवर विलक्षण निष्ठा होती. स्वामिभक्ती हा त्याच्या अंगी असलेला अलौकिक गुण चाणक्याच्या ध्यानात आला होता. त्यामुळे राक्षसालाच जर चंद्रगुप्ताचा प्रधान अमात्य बनवले तर सारा विरोध नष्ट होऊन शांतता प्रस्थापित होणार होती व राज्यालाही उत्कृष्ट प्रधान लाभणार होता. राक्षसाला आपल्याकडे वळवणे ही सोपी गोष्ट नव्हती; पण चाणक्याने त्याला अशा विलक्षण पेचात धरले की त्यामुळे राक्षस नाक मुठीत धरून शरण आला व त्याने चंद्रगुप्ताचे अमात्यपद स्वीकारले. चाणक्याची ही दूरदृष्टी जर लक्षात घेतली तर त्याने अवलंबलेले मार्ग जरी चांगले नव्हते तरी तेच गरजेचे होते असे म्हणावे लागते.

* * *

(१) याच्या कथानकावर नजर टाकताच हे इतिहासावर आधारलेले नाटक आहे. हे लगेच लक्षात येते. यातील चंद्रगुप्त, चाणक्य तसेच राक्षस ही पात्रे ऐतिहासिक आहेत. इतिहासाच्या जोडीला दंतकथा, आख्यायिका व परंपरा

यांचाही लेखकाने उपयोग करून घेतला आहे. 'कौटिलीय अर्थशास्त्र' हा ग्रंथ या नाटकाचा मुख्य आधार आहे. असे असले तरी नाटकाची संपूर्ण रचना, मांडणी, प्रसंगांची जुळवाजुळव व व्यक्तिचित्रण हे पूर्ण काल्पनिक आहे.

हे नाटक पूर्ण राजनीतीपर (Political) आहे हे याचे मोठे वैशिष्ट्य आहे. भासाचे प्रतिज्ञा-यौगंधरायण, कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र' किंवा शूद्रकाचे 'मृच्छकटिक' या नाटकात राजकीय इतिहास असला तरी तेथे प्रणयकथेस प्राधान्य आहे. पण 'मुद्राराक्षस' हे पूर्ण राजकीय नाटक आहे. यात रूढ अर्थाने नायक-नायिका नाहीत. प्रणय आणि शृंगार यास येथे पूर्ण फाटा दिलेला आहे. तसेच हास्य-विनोदासही कोठे अवसर नाही.

चाणक्य ही नाटकातील प्रमुख भूमिका असल्याने सारे नाटक त्याच्या दूरदर्शी धोरणाखाली वाटचाल करीत आहे. त्याच्या योजना पद्धतशीर आखलेल्या आहेत. चंद्रगुप्ताच्या विरोधकांना नष्ट करून राज्याची घडी व्यवस्थित बसवणे व नंदांचा एकनिष्ठ प्रधानमंत्री राक्षस यास आपल्याकडे वळवणे ही नाटकाची दोन उद्दिष्टे आहेत. नाटकाचे कथानक सलग आहे. त्यात उपकथानक व अवांतर प्रसंग नाहीत.

अशा तऱ्हेने उद्दिष्ट राजकीय असल्याने यातील वातावरण राजकारणाने पूर्ण भरलेले आहे. यात युक्त्याप्रयुक्त्या आहेत, डावपेच आहेत, गुप्तहेर, चर्चा, खलबते, वेषांतर, आमीषे यांनी यातले प्रसंग गजबजलेले आहेत. संस्कृत नाटकाच्या एकंदर स्वरूपापेक्षा हे नाटक एकदम निराळे आहे. डॉ. गो. के. भटांनी यास 'चाकोरीबाहेरचे नाटक' असे जे म्हटलेले आहे ते याच अर्थाने.

(२) अशा रीतीने प्रणयकथेचा, शृंगार व हास्यरस यांचा वा इतर रंजक मालमसाल्याचा अभाव असूनही नाटककाराने हे नाटक प्रभावीपणे उभे केलेले आहे. त्याची रंगत कोठेही कमी न होण्याची काळजी घेतलेली आहे. एकापाठोपाठ येणारे प्रसंग इतके विलक्षण आहेत की ते पाहताना अगर वाचताना भान हरपून जाते. यातील संवाद अत्यंत आकर्षक व खटकेबाज आहेत. भाषाशैली सुबोध, प्रौढ व दर्जेदार आहे. श्लोक भारदस्त व ठसठशीत आहेत. नाटकाचा कथाबंध वास्तववाद व बुद्धिचातुर्य यावर आधारलेला असला तरी नाटककाराने आपल्या पांडित्याचे प्रदर्शन कोठेही केलेले नाही. त्याला रस-परिपोषाचा हव्यास नाही. श्लोकांच्या माळा सोडण्याची हौस नाही. काव्याला नाटकावर कोठेही कुरघोडी करू दिलेली नाही. शब्दांची आतषबाजी तर सोडाच

पण निरर्थक अशी एकही ओळ सापडणार नाही. तर्कशुद्ध पायावर रचलेले, पक्की बांधणी असलेले, अत्यंत सुसंगत असे दुसरे संस्कृत नाटक दाखवता येणार नाही.

केवळ संवादातून नाट्य उभे करताना त्यातील वेचक प्रसंग ताकदीने सादर केलेले आहेत. चाणक्याने योजलेल्या डावपेचांचा उलगडा निवेदनाच्या ओघात होत असल्याने कोठेही संदिग्धता नाही. नाटकाची बांधणी हेतुपूर्ण व कलात्मक आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा भक्कम आधार असल्याने नाटकाला अपेक्षित अशी उंची लाभलेली आहे.

(३) यातील पात्रदर्शनातील विविधता ही जाणवण्यासारखी आहे. चाणक्य व राक्षस दोघेही प्रधानामात्य असले तरी त्यांच्या स्वभावात लक्षणीय फरक आहे. चाणक्याच्या वागण्याला कठोर शिस्त आहे. बोलण्याला तलवारीची धार आहे. प्रत्येक गोष्ट पारखून घेण्याची सवय आहे. पण राक्षसाच्या ठिकाणी हे गुण नाहीत. तो सहृदय व दयाळू आहे. नंदराजावर त्याची विलक्षण निष्ठा आहे. अपयशामुळे तो खचलेला आहे. तो स्वप्नाळू व भावविवश आहे. असे असले तरी मलयकेतूसारख्या कर्तृत्वहीन पुरुषास हाताशी धरून तो चाणक्याशी टक्कर देत आहे.

चंद्रगुप्त व मलयकेतू या दोन राजपुत्रांतही फरक आहे. चंद्रगुप्त हुशार व कर्तबगार आहे. आता नाटकात त्याच्या गुणाला फारसा वाव मिळालेला नाही, ही गोष्ट खरी आहे; पण चाणक्यावर त्याची निष्ठा आहे. त्याच्याशी खोटे भांडण करतानाही चंद्रगुप्त व्याकुळ होतो. तर मलयकेतू दुबळा, भेकड व चंचल आहे. पित्याच्या वधाने तो बावचळून गेलेला आहे. त्याला कोठल्याही घटनेचा अन्वयार्थ लागत नाही. भागुरायण जे सांगतो त्यावर तो डोळे मिटून विश्वास टाकतो.

(४) नाटकाचे नाव 'मुद्राराक्षसम्' असे आहे. 'मुद्रया जित: राक्षस: अस्मिन - मुद्राराक्षस:।' व्यधिकरण बहुव्रीही समास. मुद्रा म्हणजे अंगठी किंवा शिक्का. चाणक्याने राक्षसाच्याच शिक्क्याच्या अंगठीचा उपयोग करून त्याला आपल्याकडे वळवून घेतले, असा या नावाचा अर्थ आहे. 'मुद्रा च राक्षस: च' हा विग्रह बरोबर नाही. असो. या नाटकात चाणक्य, चंद्रगुप्त व राक्षस अशा तीन प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. त्यामुळे नाटकाचा नायक कोण? असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. इतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर चंद्रगुप्त हाच नायक

मानावयास हवा कारण तोच सिंहासनाधिष्ठित आहे. चाणक्य त्याचेच संरक्षण करीत आहे. निष्ठावंत अशा राक्षसाची प्राप्तीही चंद्रगुप्तासाठीच आहे. तेव्हा तात्त्विकदृष्ट्या चंद्रगुप्ताला नाटकाचा नायक मानायला हवे.

पण नाटककाराने चंद्रगुप्ताला काहीच वाव दिलेला नाही. तेव्हा नाटकाच्या संदर्भात पाहिले तर तो नायक ठरू शकत नाही. आपल्या डोळ्यासमोर सतत तळपत राहतो, तो चाणक्य. त्याच्या स्वभावातले अनेक पैलू नाटककाराने दर्शविले आहेत. समग्र नाटक चाणक्याच्या तालावर नाचत आहे, असाच जणू भास होतो. चाणक्याने मनात योजलेली दोन्ही उद्दिष्टे नाटकाच्या अखेरीस साध्य होतात तेव्हाच तो आपली मोकळी सोडलेली शेंडी बांधतो. म्हणजे चाणक्यच या नाट्याचा सूत्रधार आहे असे नाटककाराने दर्शविले आहे. तेव्हा त्याला नाटकाचा नायक मानणे फारसे चुकीचे ठरणार नाही.

आता राक्षसाकडे पाहिले तर तो प्रति-नायकाचे काम करीत आहे असे सकृतदर्शनी वाटते. पण तसे नाही. नायक म्हणून राक्षसच नाटककाराला अभिप्रेत आहे. राक्षस हा नंदांचा एकनिष्ठ अमात्य आहे आणि या निष्ठेचे चाणक्याला, त्याच्या कट्टर प्रतिस्पर्ध्याला कौतुक वाटते आहे. प्रधान अमात्य म्हणूनही त्याने आपली कारकीर्द गाजवली असली पाहिजे. त्यामुळे त्याला आपल्या पक्षात ओढणे आवश्यक आहे असे चाणक्याला वाटण्यातच राक्षसाने अर्धी लढाई जिंकलेली आहे. तसेच राक्षस आणि चंदनदास यांच्या मैत्रीलाही नाटककाराने उठाव दिलेला आहे. राक्षसासाठी चंदनदास आपल्या कुटुंबाची, मालमत्तेची किंवा प्राणांचीही पर्वा करीत नाही, असे पाहिल्यावर चाणक्य मनोमन गहिवरला आहे. राक्षसही तेवढ्याच त्वरेने चंदनदासाचे प्राण वाचविण्यासाठी आलेला आहे. त्याच्या रक्षणासाठीच राक्षस सचिवपद स्वीकारण्यास तयार झालेला आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. नाटकाच्या नावातही राक्षसाचा निर्देश आहे. तेव्हा राक्षस हाच प्रस्तुत नाटकाचा नायक आहे. असे म्हणायला हरकत नाही.

(५) अशा या मजबूत व बांधेसूद नाटकातही काही गोष्टी खटकणाऱ्या आहेत. (अ) ज्या अंगठीच्या मदतीने चाणक्याने राक्षसास गोत्यात आणले आहे ती अंगठी चाणक्याला विनासायास मिळाली आहे. पट खेळवणारा चाणक्याचा हेर चंदनदासाच्या घराजवळ जावयास व मुलाला आवरण्याच्या गडबडीत राक्षसाच्या बायकोच्या बोटातील अंगठी ओघळण्यास एकच गाठ पडते. ही अंगठी मिळाली नसती तर चाणक्य काय करणार होता? आता एकदा

अंगठी हातात आल्यावर त्याने मोठ्या हुशारीने तिचा उपयोग करून घेतला आहे ही गोष्ट खरी पण त्यामुळे त्याच्या कर्तृत्वास थोडा कमीपणा आलेला आहे. (ब) राक्षसाने जर घोडचुका केल्या नसत्या तर चाणक्य यशस्वी होऊ शकला नसता. अंगठीच्या बाबतीत तो कसा बेजबाबदार पद्धतीने वागला आहे हे मागे दर्शविले आहे. तीच गोष्ट पर्वतेश्वराचे अलंकार खरेदी करण्याबाबत घडली आहे. एखाद्या गोष्टीचा छडा लावणे, शहानिशा करणे या गोष्टी राक्षसाच्या स्वभावातच नाहीत. त्यामुळे चाणक्याच्या कारस्थानात तो अनायासे फसत गेलेला आहे. तेव्हा चाणक्याने हुशारीने डावपेच आखले आहेत यात शंका नाही; पण त्यास प्रखर विरोध झाला नाही, ही गोष्टही तितकीच खरी. (क) राक्षसाचा लेखनिक शकटदास हाही बेजबाबदारपणे वागलेला आहे. त्याने चाणक्याचे पत्र आपल्या हस्ताक्षरात नकलून देण्यापूर्वी काहीच कसा विचार केला नाही, याचे नवल वाटते. तो राक्षसाचा लेखनिक होता. त्याने आपल्या वरील जबाबदारी ओळखायला हवी होती. सारांश, चाणक्याने फेकलेल्या जाळ्यात या सावजांनी आपण होऊन आपल्या माना अडकवून घेतल्या आहेत. राक्षसाने चाणक्याची एखादी योजना उधळून लावली, असे जर नाटककाराने दर्शविले असते तर नाटकाला मोठा रंग चढला असता. त्यामुळे ही लढत एकतर्फी झाली, असे वाटल्यावाचून राहात नाही.

# श्रीहर्ष

संस्कृत वाङमयाच्या इतिहासात हर्ष नावाचे एकंदर पाच लेखक आढळतात. त्यांपैकी पहिला कनोजचा राजा श्रीहर्षदेव अथवा हर्षवर्धन (इ.स.६२०) होय. दुसरा काश्मीरचा अधिपती व कथासरित्सागर हा ग्रंथ रचणाऱ्या सोमदेवाचा आश्रयदाता. हा अकराव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला. तिसरा 'नैषधीयचरित' या प्रसिद्ध महाकाव्याचा कर्ता. (इ.स.११००) चौथा मुंजराजाचा पिता व शेवटचा काव्यप्रदीप ही 'काव्यप्रकाशा'वर टीका लिहिणाऱ्या गोविंद ठक्कुराचा धाकटा भाऊ होय. हा इसवी सनाच्या सोळाव्या शतकात होऊन गेला. यातील तिसरा व पाचवा हर्ष हे दोघे राजे नाहीत.

प्रो. विल्सन यांच्या मते काश्मीरचा राजा हर्ष हाच रत्नावली वगैरे नाटकांचा कर्ता असावा. परंतु हे मत स्वीकारता येत नाही. कारण दामोदर गुप्ताच्या (इ.स.आठवे शतक) 'कुट्टिनीमत' या काव्यात रत्नावली नाटकातील अवतरणे आली आहेत. हा दामोदरगुप्त काश्मीरचा राजा जयापीड याच्या पदरी होता. तसेच दहाव्या शतकात होऊन गेलेल्या धनंजयाने रचलेल्या 'दशरूप' या ग्रंथावरील धनिकाच्या टीकेत रत्नावलीतील श्लोक उदाहरणादाखल दिलेले आहेत. त्यामुळे अकराव्या शतकात होऊन गेलेल्या काश्मीरच्या राजाकडे रत्नावलीचे कर्तृत्व जाणे शक्य नाही. तेव्हा इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेलेला कनोजचा राजा हर्षवर्धन (इ.स.६०६ ते ६४७) हाच 'रत्नावली' वगैरे नाटकाचा कर्ता असला पाहिजे.

हर्षवर्धन हा या नाटकांचा कर्ता असावा, या म्हणण्यास ऐतिहासिक आधारही आहे. इत्सिंग (इ.स.६७२ ते ६८९) नावाच्या चिनी प्रवाशाने लिहिलेल्या 'बौद्धधर्माचे वृत्त' या ग्रंथात शिलादित्याने (म्ह. हर्षवर्धनाने) बोधिसत्त्व

जीमूतवाहनाच्या गोष्टीचे नाटकात रूपांतर केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यावरून 'नागानंद' या नाटकाची रचना हर्षवर्धनाने केली असल्याचे उघड आहे. प्रियदर्शिका, रत्नावली व नागानंद या तीनही नाटकांचा कर्ता एकच असल्याचे अंतर्गत पुराव्यावरून सिद्ध आहे. त्यामुळे कनोजचा राजा हर्षवर्धन अथवा श्रीहर्षदेव हाच या नाटकांचा कर्ता आहे असे म्हणण्यास हरकत नाही. 'प्रसन्नराघव' या नाटकाचा कर्ता जयदेव (इ.स.१२००) याने श्रीहर्ष हा राजा व कवी होता, असे स्पष्ट म्हटले आहे.

सहाव्या शतकाच्या मध्यावर पुष्पभूतीने स्थाण्वीश्वर येथे 'वर्धन' या राजवंशाची स्थापना केली. या शतकाच्या अखेरीस प्रभाकरवर्धन हा अत्यंत शूर राजा राज्य करीत होता. ह्याच्या राणीचे नाव यशोमती. तिच्यापासून त्याला राज्यवर्धन (इ.स.५८७), हर्षवर्धन (इ.स.५९०) व राज्यश्री अशी तीन मुले झाली. इ.स. ६०४ च्या सुमारास प्रभाकरवर्धनाने दोघा मुलांना हूणांचा बीमोड करण्यासाठी पंजाबात पाठवले. पण लवकरच प्रभाकरवर्धन मरण पावला. इ.स.६०४ मध्ये राज्यवर्धन गादीवर आला.

राज्यश्रीला कनोजच्या ग्रहवर्मा या राजास दिले होते. पण प्रभाकरवर्धनाच्या मृत्यूनंतर दोनच वर्षात कनोजहून बातमी आली की माळव्याचा राजा देवगुप्त याने कनोजवर स्वारी करून ग्रहवर्म्यास ठार मारले व राज्यश्रीस कैदेत टाकले आहे. ही बातमी समजताच राज्यवर्धनाने श्रीहर्षाच्या हाती कारभार सोपवला व माळव्यावर स्वारी केली. देवगुप्तास ठार मारून त्याने ग्रहवर्म्याचा सूड उगवला. पण बंगालचा राजा शशांक याने विश्वासघात करून राज्यवर्धनाचा खून केला. हर्षवर्धन एकाकी पडला. त्याच्यावर स्थाण्वीश्वर व कनोज या दोन्ही राज्यांची जबाबदारी पडली.

त्याने राज्याची सूत्रे हाती घेतली. दरम्यान राज्यश्री तुरुंगातून निसटून विंध्यपर्वतात कोठे नाहीशी झाली होती. त्याच्यापुढे भावाच्या खुनाचा सूड घेणे, राज्यश्रीचा शोध लावणे व शशांकास धडा शिकवणे ही कामे होती. शिवाय प्रबल मध्यवर्ती राज्य स्थापन करून लहान लहान राजांचा बंदोबस्त करणे हेही महत्त्वाचे कार्य होते. त्याने विंध्यपर्वतात बहिणीचा शोध घेतला. तिचा शोध लागला. तिचे मन संसारास विटले होते. तिने संन्यास घेण्याचा मनोदय प्रकट केला. हर्षाने तिची समजूत घालून परत आणले.

ग्रहवर्म्यास मूल नसल्याने कनोजचा राज्यकारभारही तोच पाहू लागला. इ.स.६१२ मध्ये त्याने आपली राजधानी स्थाण्वीश्वरहून कनोजला आणली. राज्याची व्यवस्था लावल्यावर तो साम्राज्यविस्ताराच्या कार्याला लागला. त्याने गुजरात, सौराष्ट्र, माळवा व आसाम हे प्रांत जिंकून आपल्या अमलाखाली आणले. त्याची सत्ता उत्तरेत हिमालयापासून खाली नर्मदेपर्यंत पसरली. त्याने आपल्या उत्तरायुष्यात बौद्ध धर्माचा स्वीकार केला. ह्युएनत्संग भारतात आल्यावर हर्षाने त्याच्या नेतृत्वाखाली कनोज येथे धर्मपरिषद भरवली.

त्याने अहिंसा धर्माचा प्रसार केला. प्राणिहत्येला आळा घातला. मांसाहार निषिद्ध ठरवला. बौद्धविहार तसेच चैत्य व स्तूप उभारले. सार्वजनिक दवाखाने उघडले. धर्मशाळा व पाणपोया बांधल्या. तो दर पाच वर्षांनी आपली सर्व संपत्ती गरिबांना वाटत असे. त्याचा बौद्धधर्माकडील ओढा पाहून एका माथेफिरूने त्याच्यावर सुरीहल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण योगायोगाने हर्ष त्यातून बचावला.

असा हा थोर राजा एकंदर चाळीस वर्षे राज्य करून इ.स. ६४७ मध्ये मरण पावला. त्याला मुलगा नव्हता. त्याने आपली मुलगी सुराष्ट्रातील बलभीचा राजा द्वितीय ध्रुवसेन यास दिली होती. त्याच्या मृत्यूनंतर राज्यास कोणी वारस नसल्याने त्याच्या प्रधानाने गादी बळकावली व 'वर्धन' घराण्याचा शेवट झाला. त्याच्या दरबारात सुप्रसिद्ध गद्यलेखक बाणभट्ट, मयूर, बौद्धधर्मपंडित दिवाकरमित्र हे होते. बाणभट्टाने 'हर्षचरिता'त त्याचे 'अंशात्मक' चरित्र लिहिले आहे. तसेच चिनी प्रवाशांनी जे आपले प्रवासवृत्तांत लिहिले आहेत, त्यावरून हर्षाचे व्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर उभे राहते.

तो उद्योगी, दयाळू व न्यायप्रिय होता. स्वतः कुशल योद्धा व उत्कृष्ट सेनापती होता, तसेच विद्वान् व रसिक होता. कवी व नाटककार होता. त्याने प्रियदर्शिका व रत्नावली या दोन नाटिका, नागानंद हे नाटक, सुप्रभात स्तोत्र व अष्टमहाचैत्यस्तोत्र ही दोन बुद्धस्तुतिपर स्तोत्रे, यांची रचना केली आहे.

* * *

श्रीहर्ष हा स्वतः विद्वान, रसिक व विविध कलांचा आश्रयदाता असला तरी त्याने वरील नाटके दुसऱ्याकडून लिहवून घेऊन स्वतःच्या नावावर कशावरून प्रसिद्ध केली नसावीत, अशी शंका प्रकट करण्यात आली आहे. ही शंका

उद्भवण्यास 'काव्य-प्रकाशा'तील एक विधान व नागोजी भट्ट या संस्कृत टीकाकाराची त्यावरील टिप्पणी कारणीभूत आहे. काव्याची प्रयोजने सांगत असता मम्मटाने 'उत्तम काव्यनिर्मिती केल्याबद्दल धावकास (किंवा पाठभेदानुसार बाणास) श्रीहर्षाकडून भरपूर संपत्ती मिळाली' असे म्हटले आहे. पण नागोजी भट्टाने या विधानाचा भलताच अर्थ दिला आहे. 'धावक (अथवा बाण) या कवीने श्रीहर्षास रत्नावली हे नाटक लिहून दिले व त्या बदल्यात भरपूर संपत्ती मिळवली.' श्रीहर्षाच्या नाट्यकर्तृत्वाबाबत साशंकता निर्माण होण्यास हेच विधान कारणीभूत आहे.

ही शंका दृढ होण्यास दुसराही एक पुरावा हजर आहे. पंडित नारायणशास्त्री यांनी राजशेखराच्या नावावर असलेल्या 'कविविमर्श' या चोपड्यातील काही श्लोक उद्धृत केले आहेत. त्यावरून प्रियदर्शिका-रत्नावली व नागानंद ही नाटके धावक या कवीने रचली आहेत असे दिसून येते. धावकाचेच दुसरे नाव भास असावे. मागे भासाच्या नाटकाच्या संदर्भात सदर श्लोक दिलेले आहेत.

मौजेची गोष्ट अशी की, कै. शि. म. परांजपे यांनीही प्रियदर्शिका वगैरे नाटकांचे कर्तृत्व आद्य भासाकडे दिले आहे. त्यांच्या मते प्रियदर्शिका, रत्नावली या नाटकांची भासाने लिहिलेली हस्तलिखितेच श्रीहर्षाने सुधारून आपल्या नावावर प्रसिद्ध केली असावीत. त्या दृष्टीने त्यांनी सदर नाटकांचे भासाच्या नाटकाशी असलेले साम्य दर्शविले आहे.

तथापि वरील पुरावे व त्यावरून केलेले तर्क हे निराधार आहेत. एक तर धावक नावाचा कोणी कवी इतिहासास ज्ञात नाही. दुसरे म्हणजे राजशेखराच्या नावावर असलेले 'कविविमर्श' नामक चोपडे बनावट आहे, असा स्पष्ट निर्वाळा म.म.डॉ. वा.वि.मिराशी यांनी दिला आहे. सारांश मम्मटाचे विधान, त्यावरील नागोजी भट्टाचे तर्कट व कविविमर्शातील तथाकथित बनावट श्लोक यांचा विचार करता श्रीहर्षाच्या नाट्यकर्तृत्वाबाबत घेण्यात येणारी शंका निरर्थक आहे.

अंतर्गत पुराव्यावरून ही तीनही नाटके एककर्तृक असल्याचे दिसते. प्रियदर्शिका व रत्नावली यांचे भरतवाक्य एकच आहे. 'श्रीहर्षो निपुणः कविः' हा श्लोक तीनही नाटकांच्या प्रस्तावनेत किंचित फरकाने आलेला आहे. विषय, मांडणी, कल्पना व भाषाशैली या दृष्टीने तीनही नाटकांतील साम्य लक्षणीय आहे. सूत्रधाराचे भाषण सगळीकडे सारखेच आहे. तीनही नाटकांत अनेक वाक्ये समान आहेत. नाटकातील काही प्रसंगांवर श्रीहर्षाच्या जीवनातील

प्रसंगांची नकळत छाया पडलेली आहे. विशेषत: 'भगिनीलाभ' व 'भुवनप्राप्ती' हे शब्द ध्यानात घेण्याजोगे आहेत. त्यामुळे श्रीहर्ष हाच या नाटकांचा कर्ता असला पाहिजे, ही गोष्ट स्पष्ट आहे.

## १. प्रियदर्शिका

प्रियदर्शिका ही श्रीहर्षाची पहिली कलाकृती असून ही व पुढील रत्नावली ही नाटिका या वसंतोत्सवाच्या वेळी रंगभूमीवर आल्या आहेत. ही नाटिका उदयनाच्या प्रणयकथेवर आधारलेली आहे. नांदीच्या पहिल्या श्लोकात पार्वती ही विवाहप्रसंगी शंकराचे मुखावलोकन करीत असल्याचे वर्णन आहे तर दुसऱ्या श्लोकात रावणाने कैलासपर्वत उचलण्याचा प्रयत्न केला तेव्हा भयभीत झालेल्या पार्वतीने शंकरास घट्ट मिठी मारल्याचे वर्णन आहे.

नांदीश्लोकानंतर सूत्रधार प्रवेश करतो व नाटिकेचे आणि नाटककाराचे नाव सांगतो. श्रीहर्षासारखा उत्तम नाटककार, आपल्या कामात निष्णात असणारा नटवर्ग, वत्सराजाचे रमणीय चरित्र व रसिक तसेच गुणग्राहक असणारा प्रेक्षकवर्ग या साऱ्यांचा संगम झाल्यावर नाटकाला रंग चढेल यात नवल ते काय?

पहिल्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक आहे. कंचुकी घेऊन सांगतो की, दृढवर्मा नामक राजाने आपली कन्या प्रियदर्शिका हिला वत्सराज उदयनास देण्याचे ठरविले होते. कलिंगचा राजा तिला मागत होता. नकार मिळाल्याने त्याने दृढवर्म्यावर हल्ला केला. त्या गोंधळात कंचुकीने तिला विंध्यकेतूच्या स्वाधीन केले. पण त्यानंतर अज्ञात शत्रूने विंध्यकेतूवर हल्ला करून ठार मारले. तेव्हा प्रियदर्शिका तेथून निसटली पण ती कोठे आहे हे समजत नाही.

कंचुकी यानंतर उदयनाचीही हकीकत सांगतो. राजा उदयनास उज्जयिनीच्या चंड प्रद्योताने कैदेत टाकले होते. तेथे उदयनाचे प्रद्योताची कन्या वासवदत्ता, हिच्यावर प्रेम जडले. तिला घेऊन तो कैदेतून निसटला व राजधानी कौशांबीस परत आला आहे. या ठिकाणी विष्कंभक समाप्त होतो.

मुख्य प्रवेशात राजा विदूषकाबरोबर बोलत आहे. त्या ठिकाणी राजाचा मंत्री रुमण्वान व सेनापती विजयसेन येतात. त्यांच्या बोलण्यावरून वत्सराज उदयनाच्या सैनिकांनीच विंध्यकेतूवर हल्ला केला होता. विंध्यकेतू ठार झाला

असला तरी त्याने पराक्रमाची शर्थ केली होती. त्याच्या अंत:पुरात एक तरुण मुलगी होती. तिला रक्षकांनी पकडली असून ती आता कौशांबीच्या राजवाड्याच्या दरवाजात उभी आहे.

हे ऐकताच राजा त्या मुलीची आपल्या अंत:पुरात राहण्याची व्यवस्था करतो. तिला नृत्य गायनादी कलाही शिकवण्यात याव्यात असे तो सांगतो. राजाच्या आदेशानुसार प्रतिहारी त्या मुलीला - प्रियदर्शिकेला अंत:पुरात घेऊन जाते. राजा आपल्या सेनापतीस कलिंग देशाच्या राजावर आक्रमण करण्याचा हुकूम देतो. (अंक पहिला)

यानंतर सुमारे एक वर्षाने दुसऱ्या अंकास प्रारंभ झालेला आहे. वासवदत्तेने व्रत घेतले असून विदूषकास स्वस्तिवाचनाचे निमंत्रण दिले आहे. पण तो महाब्राह्मण असल्याने त्यास वेदांची संख्याही ठाऊक नाही. राजा धारागृह असलेल्या उद्यानात गेला आहे असे समजताच तोही तिकडे जातो. दोघे उद्यानाची शोभा पाहात असता तेथे प्रियदर्शिका व चेटी येतात. प्रियदर्शिकेने आता आरण्यका असे नाव धारण केले आहे. आपल्याला या ठिकाणी एखाद्या परिजनाप्रमाणे जीवन कंठावे लागत आहे याचे तिला मनस्वी दु:ख झाले आहे. अशा स्थितीत जिवंत राहण्यापेक्षा मरून गेलेले बरे असे तिला वाटते.

राजा उद्यानाची शोभा पाहात आहे. इतक्यात त्याला आरण्यका दिसते. जणू उद्यान देवताच स्त्रीरूपाने अवतीर्ण झाल्याचा त्यास भास होतो -

"मृत्युलोक पाहण्याच्या इच्छेने एखादी नागकन्या तर पाताळातून वर आली नसेल? पण तसे नसावे. मी पाताळ तर पाहिला आहे. तेथे अशी सुंदर मुलगी कोठली असायला? मग चंद्रिका मूर्तरूपाने हिंडत असावी काय? पण दिवसा हे संभवत नाही. हातात कमल धारण केलेली ही स्त्री मूर्तिमंत लक्ष्मीप्रमाणे दिसत आहे."

(अंक २ श्लोक ६)

दोघींच्या बोलण्यावरून राजाला ती मुलगी म्हणजे आपल्या अंत:पुरात ठेवून घेतलेली कन्या आहे, हे लक्षात येते. इतके दिवस या मुलीस लपवून राणीने आपली चांगलीच फसवणूक केली असे त्यास वाटते. ती फुले वेचू लागताच राजा पुढे येतो. इंदिवरिका आली असे वाटून आरण्यका राजालाच बिलगते पण लगेच दूर होते.

विदूषकाच्या बोलण्यावरून साक्षात वत्सराज उदयनच आपल्या समोर उभा आहे हे आरण्यकेला समजते. तिच्या वडिलांनी तिच्यासाठी हाच वर योजलेला होता. ती लाजून चूर होते. इंदिवरिका तेथे येताच राजा व विदूषक बाजूला होतात. दोघी जायला निघतात. आरण्यका जाताना मुद्दाम कदली गृहाकडे वळून वळून पाहते. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस एकपात्री प्रवेशक आहे. मनोरमा येऊन सांगते की, वासवदत्ता राणीने आपल्या गत आयुष्यावर आधारलेले एक नाटक सांकृत्यायनीकडून लिहून घेतले आहे. त्याचा प्रयोग कौमुदी महोत्सवात करण्यात येणार आहे. या नाटकात आरण्यका ही वासवदत्तेची भूमिका करणार असून स्वत: मनोरमा उदयनाची भूमिका घेणार आहे.

मुख्य प्रवेशात आरण्यका कदलीगृहात एकटीच बसलेली आहे. तिचे राजावर प्रेम जडले आहे. मनोरमा त्या ठिकाणी येते. आरण्यका तिच्या जवळ आपले मन मोकळे करते. वासवदत्तेच्या गुणावर लुब्ध असलेला राजा आपल्यासारख्या स्त्रीवर कसे प्रेम करेल, अशी तिला शंका वाटते. तेव्हा मनोरमा तिला म्हणते - "अग वेडे, कमलिनीवर मन जडले असले तरी भ्रमर जेव्हा मालतीला पाहतो तेव्हा उपभोगासाठी लंपट होऊन तिला प्राप्त करून घेतल्याशिवाय रहात नाही."

त्या वेळी विदूषक कदलीगृहात येतो. तो आरण्यकेला शोधत आहे. ती तेथे न दिसल्याने आपल्या नावाप्रमाणे अरण्यात गडप झाली की काय असे त्यास वाटते. त्याच्या बोलण्यावरून राजा उदयन हा आरण्यकेवर लुब्ध झाला आहे, हे समजते. मग मनोरमा पुढे होऊन त्याची भेट घेते. आरण्यकाही राजासाठी झुरत असल्याचे विदूषकास सांगते.

त्या दोघांची भेट घडवून आणण्यासाठी मनोरमा एक धाडसी बेत आखते. ती नाटकात उदयनाची भूमिका करणार होती. त्याऐवजी ती स्वत: राजानेच करावी अशी ती सूचना करते. विदूषकास ही योजना पसंत पडते. तो राजाला घेऊन येण्याचे आश्वासन देऊन निघून जातो. आरण्यका व मनोरमा नाट्यप्रयोग सादर करण्यासाठी नाट्यगृहाकडे जाऊ लागतात.

वासवदत्ता व सांकृत्यायनी नाट्यगृहात येतात. त्यानंतर आरण्यका व मनोरमा याही येतात. वासवदत्ता आरण्यकेला वेषभूषा करण्यास सांगते. यथातथ्य नेपथ्यासाठी आपले अलंकार घालायला देते. थोड्याच वेळात नाटकातील नाट्यप्रयोगास म्हणजे गर्भाङ्कास प्रारंभ होतो.

मदनोद्यानात वासवदत्ता वीणा वाजवत बसली आहे. ती आपल्या नाट्यगुरूची म्ह. उदयनाची वाट पहात आहे. वासवदत्तेची भूमिका आरण्यकेने यथातथ्य वठवली आहे. उदयनाचा प्रवेश होतो. ती भूमिका स्वत: राजानेच केली आहे. खऱ्या वासवदत्तेला ती भूमिका मनोरमेनेच वठवली असे वाटते. उत्कृष्ट अभिनयाबद्दल ती मनोरमेची प्रशंसा करते तेव्हा सांस्कृत्यायनी म्हणते, "खरेच मनोरमेच्या कौशल्यामुळे साक्षात वत्सराजाचे दर्शन घडत आहे." तिच्या बोलण्यातील खोच वासवदत्तेला उमगत नाही.

नाटकातील उदयन वासवदत्तेवर प्रसन्न होऊन आपल्या आसनावरच शेजारी तिला बसवतो. तेव्हा खरी वासवदत्ता चमकते व म्हणते, "आर्य, तुम्ही नाटकात अतिशयोक्ती केलेली आहे. मी त्या वेळी आर्यपुत्रांच्या शेजारी एका आसनावर खेटून बसले नव्हते." तेव्हा "काव्य हे असेच असते." असे सांगून सांकृत्यायनी वेळ मारून नेते.

राजाच्या स्पर्शाने आरण्यका रोमांचित होते. मनोरमेच्या स्पर्शाने आपल्याला अशा भावना का व्हाव्यात हे तिला उमगत नाही. कारण मनोरमेने तिला कटात सामील करून घेतले नव्हते. खऱ्या वासवदत्तेला असले शृंगारप्रचुर नाटक आवडत नाही. "भगवती, तुम्ही नाटक पाहात बसा." असे म्हणून ती प्रेक्षागृहाच्या बाहेर पडते.

तिला बाहेर वसंतक दिसतो. तो बसल्या बसल्या झोपेत बरळतो. त्यावरून वासवदत्तेच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडतो. ती मनोरमेला बाहेर बोलावून खडसावते. त्यानंतर राजा व आरण्यका तेथे येतात. स्वत: राजाच उदयनाची भूमिका करीत असल्याचे समजताच आरण्यका चकित होते व भीतीने थरथर कापू लागते. वासवदत्ता राजाचाही समाचार घेते. सांकृत्यायनी हळूच निसटते. राजा अक्षरश: वासवदत्तेच्या पायावर डोके ठेवून आपली सुटका करून घेतो. बिचारी आरण्यका मात्र वासवदत्तेच्या तावडीत सापडते. (अंक तिसरा)

आरण्यका बंदिवासात पडली आहे. मनोरमा तिची सुटका करण्याचा प्रयत्न करीत आहे. राजा उदयनाला तसा निरोप देण्यासाठी ती विदूषकाला त्याच्याकडे पाठवते. इतक्यात कांचनमाला त्या ठिकाणी येते. तिच्या बोलण्यावरून समजते की वासवदत्तेची आई अंगारवती हिचे पत्र आले आहे. त्या पत्रात एक वर्ष होत आले तरी उदयनाने कलिंगराजाच्या कैदेत पडलेल्या दृढवर्म्याची सुटका करण्याचा प्रयत्न कसा केला नाही, असा बोल लावलेला आहे.

मुख्य प्रवेशात सांकृत्यायनी वासवदत्तेचा राग घालविण्याचा प्रयत्न करीत आहे. "वत्सराज लौकरच दृढवर्म्याची सुटका केल्याशिवाय राहणार नाही." हे तिचे बोलणे वासवदत्तेस पटत नाही. जो खुद्द वासवदत्तेला किंमत देत नाही तो तिच्या माहेरच्या माणसाची काय दखल घेणार आहे?

त्या वेळी राजा व विदूषक बोलत प्रवेश करतात. आरण्यकेची बंदिवासातून सुटका कशी करावी, असा प्रश्न राजा विदूषकालाच विचारतो. यावर त्याने दिलेले उत्तर मासलेवाईक आहे. तो म्हणतो - "अरे तू एवढा पराक्रमी पुरुष आहेस. तुझ्या जवळ हत्ती, घोडे, पायदळ यांनी युक्त सेना आहे. तर सरळ अंत:पुरावर आक्रमण करून आरण्यकेची सुटका कर." राजाला त्याचे उत्तर ऐकून हसू येते. दोघे वासवदत्ता बसली आहे त्या ठिकाणी येतात. ती रुसलेलीच आहे. मग सांकृत्यायनी राजाला वासवदत्तेच्या खेदाचे कारण सांगते. त्यावर राजा आपण यापूर्वीच कलिंगावर हल्ला चढवला असल्याचे सांगतो.

इतक्यात उदयनाचा सेनापती विजयसेन व दृढवर्म्याचा कंचुकी हे येतात. कंचुकी सांगतो की विजयसेनाने कलिंगाच्या राजास ठार मारून दृढवर्म्यास सिंहासनावर बसवले आहे. ही वार्ता ऐकताच वासवदत्ता आनंदित होते. या वेळी विदूषक मार्मिक सूचना करतो की अशा आनंदाच्या प्रसंगी ब्राह्मणाची पूजा व्हावी तसेच सर्व कैद्यांची सुटका करावी. वासवदत्तेची संमती घेऊन सांकृत्यायनी आरण्यकेस घेऊन येण्यास जाते.

कंचुकी सांगतो की दृढवर्म्याच्या मनात आपली कन्या प्रियदर्शिका ही वत्सराजास द्यावयाची होती. पण त्याची इच्छा अपूर्ण राहिली. एक तर उदयनाचा विवाह वासवदत्तेबरोबर झाला व दुसरे म्हणजे प्रियदर्शिका सध्या कोठे तरी बेपत्ता झाली आहे. प्रियदर्शिका ही वासवदत्तेची मावसबहीण होती. ती नाहीशी झाली आहे हे समजताच वासवदत्ता शोकाकूल होते. त्यात भर म्हणून मनोरमा घाबरलेल्या स्थितीत येऊन सांगते की आरण्यकेने मदिरेच्या पेल्यात विष घालून ते प्राशन केले आहे. तिचे प्राण संकटात आहेत.

हे ऐकताच वासवदत्तेचा जीव घाबरा होतो. ती आरण्यकेस ताबडतोब आणण्यास सांगते, कारण राजा उदयनास विष उतरण्याची विद्या अवगत होती. मनोरमा आरण्यकेस तेथे घेऊन येते. वासवदत्ता राजास तिच्यावर उपचार करण्याची विनंती करते. कंचुकी प्रियदर्शिकेस ओळखतो. त्याने चौकशी करताच वासवदत्ता त्यास ही विंध्यकेतूची मुलगी आहे असे सांगते. मग कंचुकी उलगडा

करतो की विंध्यकेतूला मुलगी नव्हती. तेव्हा ती मुलगी म्हणजे प्रियदर्शिका हीच आहे. ती वासवदत्तेची हरवलेली मावसबहीणच होती.

राजा हातात पाणी घेऊन तिच्यावर मंत्र घालतो. तिचे विष उतरू लागते. थोड्या वेळाने ती शुद्धीवर येते. वासवदत्ता आनंदाने तिला मिठी मारते आणि राजाने केलेल्या वैद्यकीय उपचाराचे पारितोषिक म्हणून ती प्रियदर्शिकेचा हात राजाच्या हातात देते. सर्वत्र आनंदी आनंद होतो. भरतवाक्याबरोबर नाटक समाप्त होते.

* * *

प्रियदर्शिका ही नाटिका आहे. हा उपरूपकाचा एक प्रकार आहे. उपरूपकाचे एकंदर अठरा प्रकार सांगितलेले आहेत. नाटिकेचे स्वरूप साहित्यदर्पणात याप्रमाणे सांगितले आहेत : नाटिकेचे कथानक कविकल्पित असते. यात स्त्रियांची संख्या अधिक असते. हिच्यात चार अंक असतात. राजा हा नायक असून तो धीर-ललित स्वभावाचा असतो. अंतःपुरात आलेली नवीन तरुणी ही नायिका असते. राजा तिच्यावर चोरून प्रेम करतो. मुख्य राणीस प्रारंभी त्यांच्या प्रेमाची माहिती नसते पण संशय आल्यावर ती विरोध करते. नायिका ही राजकन्या असते पण काही कारणाने तिला दासीभाव प्राप्त झालेला असतो. यात कौशिकीवृत्तीचा अवलंब केलेला असतो. (सा.व.६.२६९ ते २७२)

श्रीहर्षाची प्रियदर्शिका व रत्नावली, बिल्हणाची कर्णसुंदरी, राजशेखराची विद्धशालभंजिका तसेच मधुरादासाची 'वृषभानुजा' या नाटिका आहेत. प्रियदर्शिकेवर मालविकाग्निमित्राची गडद छाप आहे, हे उघड आहे. बृहत्कथेत 'बंधुमती' नामक बंदिवासात पडलेल्या राजकन्येची कथा आहे. तिचा आधार कालिदासाप्रमाणे श्रीहर्षानेही घेतलेला दिसतो. बंधुमतीची कथा 'मालविकाग्निमित्रा'च्या विवेचनात सांगितलेली आहे.

सदर कथेत श्रीहर्षाने अनेक कलात्मक बदल केले आहेत. उदा. राजा दृढवर्मा याने आपली कन्या प्रियदर्शिका ही उदयनास देण्याचे ठरविलेले होते त्यामुळे प्रियदर्शिकेच्या मनात साहजिकच उदयनाबद्दल कुतूहल निर्माण झाले आहे. कालिदासानेही असाच बदल केला आहे.

वासवदत्तेने आपल्या प्रेम-प्रकरणावर सांकृत्यायनीकडून एक नाटक लिहवून घेतले. ते प्रयोगरूपाने सादर करताना स्वतःची भूमिका प्रियदर्शिकेला करायला

सांगितली. मनोरमा राजाची भूमिका करणार होती पण तिच्या धाडसी उपक्रमामुळे मनोरमेऐवजी स्वत: राजाच रंगभूमीवर आला व कथेस चांगलाच रंग चढला. ही गर्भांकाची कल्पना व त्यातील प्रसंग योजना ही सारी श्रीहर्षाची स्वतंत्र निर्मिती आहे. मालविकाग्निमित्रातील मालविका व इरावती यांच्यातील नृत्यस्पर्धेच्या कल्पनेपेक्षा गर्भांकाची कल्पना अधिक मनोरम आहे. तसेच कालिदासाने मालविकेचे नाव बदललेले नाही. त्याच्या या चुकीची श्रीहर्षाने दुरुस्ती केली आहे. त्याने प्रियदर्शिकेचे नाव आरण्यका असे बदलले आहे. रत्नावलीतही त्याने तिचे 'सागरिका' असे नाव ठेवलेले आहे.

प्रियदर्शिकेची कथावस्तू अगदीच सरधोपट आहे. कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र' नजरेसमोर असूनही श्रीहर्षास आपली कथा आकर्षक बनविता आली नाही. नाटिकेचा शेवटही कलाहीन झालेला आहे. कथावस्तूप्रमाणेच पात्ररेखाटनातही नाटककाराला यश मिळालेले नाही. उदयन, वासवदत्ता, आरण्यका, वसंतक तसेच सांकृत्यायनी यांपैकी कोणाचेही चित्रण उठावदार झालेले नाही.

उदयन हा या नाटिकेचा नायक आहे. प्रस्तावनेतील श्लोकात सांगितल्याप्रमाणे त्याचे चरित्र आकर्षक आहे. त्याच्याविषयी अनेक कथा लोकांत प्रचलित आहेत. नाटिकेत तो धीरललित प्रकृतीचा नायक दर्शविलेला आहे. कथेत त्याच्या पराक्रमास अथवा राजकारणास वाव नसला तरी नाटककाराने त्यास अगदीच निर्जीव बनवला आहे.

प्रियदर्शिका अथवा आरण्यका ही नाटिकेची नायिका आहे. ती 'मुग्धा' व लज्जावती दर्शविलेली आहे. ती इतकी लाजाळू आहे की आपल्या सखीसमोरदेखील ती आपले मनोभाव प्रकट करू शकत नाही. मनोरमाच तर्काने ते जाणून घेते. ती सोशिक व संयमी आहे हे मान्य करूनही तिला आपल्या स्थितीबद्दल वाईट वाटल्याचे दिसत नाही. तिचे चित्रण अगदीच सपाट झाले आहे.

वासवदत्ता ही उज्जयिनीचा राजा महासेन प्रद्योत याची मुलगी व उदयनाची पट्टराणी आहे. तिचे उदयनावर निस्सीम प्रेम आहे. गर्भांकातील अतिशयोक्त प्रसंग वासवदत्ता व उदयन या भूमिकातील अभिनय यायोगे वासवदत्ता संशयात पडते. विदूषकाकडून सत्य समजताच ती आरण्यकेस बंदिवासात टाकते. पण तिने विष प्राशन केल्याचे समजताच ती उदयनाला तिच्यावर उपचार करण्याची

विनंती करते. शेवटी ती दृढवर्म्याची कन्या प्रियदर्शिका आहे हे समजताच ती आनंदाचे तिचा हात उदयनाच्या हातात देते.

वसंतक ऊर्फ विदूषक हा राजाचा मित्र आहे. हा परंपरागत विदूषकाप्रमाणे खादाड, अजागळ व मूर्ख आहे. त्याच्या बरळण्यामुळेच वासवदत्तेला मनोरमेचे कारस्थान समजून येते. सांकृत्यायनीची चित्ररेखा अगदीच सपक झाली आहे. ती आरण्यकेच्या प्रेम-प्रकरणात काहीही मदत करीत नाही. तिने वासवदत्तेच्या पूर्वजीवनावर नाटक लिहून दिले खरे पण ती मनोरमेच्या कारस्थानात सहभागी होती की नाही हे स्पष्ट नाही. 'मालविकाग्निमित्रा'तील पारिव्राजिका कौशिकी ही मालविकेचा राजाशी विवाह व्हावा यासाठी प्रयत्न करताना दिसते. नृत्यस्पर्धा आयोजित करण्यामागील सारी सूत्रे ती कौशल्याने हाताळते पण सांकृत्यायनी काहीच करीत नाही. आरण्यकेची सखी मनोरमा मात्र हिकमती आहे. ती आरण्यकेची व्यथा बिनचूक ताडते. स्वत:ऐवजी राजालाच नाटकात काम करायला लावण्याची युक्ती चालवते. तेव्हा तिचीच कामगिरी स्पृहणीय आहे.

श्रीहर्षाकडून अनवधानाने काही प्रमाद घडले आहेत. उदा. तिसऱ्या अंकात मनोरमा व आरण्यका यांचे संभाषण चालू असता वसंतक त्या ठिकाणी येतो. तो आरण्यकेला शोधीत आहे. त्यावेळी तो म्हणतो - "राजा मदनसंतापाने व्याकुळ झाला असल्याने मी राणी वासवदत्ता व पद्मावती यांच्या महालात आरण्यकेचा शोध केला पण.."

येथे प्रश्न असा पडतो की, उदयनाने पद्मावतीशी विवाह केव्हा केला? प्रस्तुत नाटकात वासवदत्तेशी लग्न झाल्यानंतर वर्षभरातच त्याचा प्रियदर्शिकेशी विवाह झाला आहे. दरम्यान त्यास पद्मावतीशी लग्न करण्यास वेळ नाही. तसेच पद्मावतीशी त्याचे लग्न सुखासुखी झालेले नाही. त्यासाठी यौगंधरायणास अत्यंत प्रयत्न करावे लागले आहेत. वासवदत्तेच्या मृत्यूची खोटी बातमी उठवावी लागली होती. वासवदत्तेला पद्मावतीच्याच राजवाड्यात ठेवावे लागले होते. या घटनांवर आधारलेले 'स्वप्नवासवदत्त' हे सुप्रसिद्ध नाटक श्रीहर्षासमोर होते. त्यामुळे वासवदत्तेच्या जोडीला पद्मावतीचा उल्लेख करून श्रीहर्षाने आपले अज्ञान प्रकट केले आहे. असो.

श्रीहर्षाची भाषाशैली मात्र सुगम व रसाळ आहे. श्लोकांची रचना प्रसाद गुणाने युक्त आहे. गद्य संवादही सुटसुटीत व काव्यपूर्ण आहेत. समास प्रचुरता, क्लिष्टता अथवा दुर्बोधता ही औषधालाही सापडत नाही. आरण्यकेच्या सौंदर्याचे

वर्णन करणारे श्लोक श्रुतिमनोहर आहेत. तेव्हा 'श्रीहर्षो निपुणः कविः' हे प्रस्तावनेतील उद्गार सार्थ आहेत.

स्वतः नाटककाराला आपल्या नाट्यरचनेतील दोषांची जाणीव झाली असावी असे म्हणण्यास जागा आहे. कारण यानंतर त्याने उदयनाच्या कथानकावर अशाच धर्तीच्या 'रत्नावली' या सुप्रसिद्ध नाटिकेची रचना केली आहे. प्रियदर्शिकेतील उणीवा व दोष दूर करण्यात त्याला कितपत यश आले व रत्नावलीस एवढी लोकप्रियता कशी लाभली या प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी त्या नाटकाकडे वळणे इष्ट ठरेल.

## २. रत्नावली

नांदीच्या पहिल्या श्लोकात शिवाच्या मस्तकावर आदराने पुष्पांजली वाहणाऱ्या पार्वतीचे वर्णन आहे. दुसऱ्या श्लोकात शिव आणि पार्वती यांच्या विवाहानंतर झालेल्या पहिल्या भेटीचा प्रसंग रंगवलेला आहे, तर तिसऱ्या श्लोकात शंकराने जेव्हा दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस केला त्या वेळी उडालेल्या गोंधळाचे वर्णन आहे.

नांदीनंतर सूत्रधार प्रवेश करतो व आपल्या पत्नीला बोलावतो. ती चिंताग्रस्त आहे. कारण तिच्या मुलीचा विवाह दूरदेशी होणार असतो. तिचे सांत्वन करताना सूत्रधार म्हणतो की, दैव अनुकूल असले की सर्व अडचणींचा परिहार होतो. मग मिळणारी वस्तू अथवा व्यक्ती ही परक्या प्रदेशात असो समुद्राच्या पोटात असो वा दिशांच्या पलीकडे असो.

सूत्रधाराच्या भाषणास यौगंधरायण पडद्यातून दुजोरा देतो. सूत्रधार निघून जातो व यौगंधरायण रंगभूमीवर येतो. हा कौशांबीचा राजा उदयन याचा मुख्य प्रधान आहे. याच्यावर राज्यकारभार सोपवून उदयन निवांत राहात आहे. तो सांगतो की, सिंहलद्वीपाची राजकन्या रत्नावली हिला त्याने उदयनासाठी मागणी घातली होती. तसेच एका सिद्ध पुरुषाने भविष्य वर्तविले होते की, "रत्नावली ही चक्रवर्ती राजाची राणी होईल." उदयनाच्या साम्राज्याची भरभराट व्हावी हाच मागणी घालण्यामागे यौगंधरायणाचा उद्देश होता. तथापि उदयनाची पत्नी वासवदत्ता ही रत्नावलीच्या वडिलांची भाची असल्यामुळे त्यांनी तिच्या संसारात विघ्न येऊ नये म्हणून या मागणीस नकार दिला होता.

तथापि रत्नावलीची प्राप्ती ही लाभदायक असल्याने यौगंधरायणाने आपला प्रयत्न सोडला नाही. त्याने वासवदत्तेचे मन वळवले. ती लावाणक नामक खेड्यात राहू लागली. मग त्या अरण्यास आग लावली. त्या आगीत वासवदत्ता जळून गेली, अशी अफवा उठवण्यात आली. मग यौगंधरायणाने राजकंचुकी बाभ्रव्यास रत्नावलीला मागणी घालण्यासाठी पाठवले. रत्नावलीच्या पित्याने - विक्रमबाहूने - आपल्या प्रधानाबरोबर रत्नावलीला पाठवून दिले. पण समुद्रात जहाज फुटले. रत्नावली व बाभ्रव्य यांची ताटातूट झाली. ती एका फळीला धरून किनाऱ्याला लागली. कौशांबीच्या एका व्यापाऱ्याने तिला आपल्या जहाजावर घेतले. त्याने तिला यौगंधरायणाकडे पोहोचते केले. त्याने तिला दासीचा वेष देऊन राजवाड्यात पाठवले. तिचे नाव सागरिका असे बदलण्यात आले. हा सारा खटाटोप त्याने स्वत:च्या जबाबदारीवर केलेला असल्याने हे कार्य कसे सिद्धीस जाईल या गोष्टीची त्यास चिंता लागून राहिली आहे. येथे विष्कंभक समाप्त झाला आहे.

कौशांबी नगरीत मदन महोत्सवास प्रारंभ झालेला आहे. मंगलवाद्ये वाजत आहेत. सर्वत्र आनंदाचे, विलासाचे वातावरण पसरले आहे. रस्त्यातील स्त्री-पुरुष वाद्यांच्या तालावर नाचत आहेत. या उत्सवाच्या निमित्ताने वासवदत्ता मदनाची पूजा करणार आहे. त्या प्रसंगी राजाने हजर रहावे, असे त्यास कळवण्यात आले आहे. म्हणून राजा व विदूषक मकरंद उद्यानाकडे येतात. ते उद्यानही वसंताच्या आगमनाने फुलून गेले आहे. पोवळ्यासारखी कांती असलेली लालचुटूक पाने, गुंजारव करणाऱ्या भ्रमरांचे थवे व वाऱ्याने हेलकावणाऱ्या फांद्या यामुळे वृक्ष मद्यप्याप्रमाणे दिसत आहेत.

मग वासवदत्ता, तिच्यामागून पूजेचे साहित्य घेऊन कांचनमाला तेथे येतात. मागून सागरिकाही येते. तिला पाहताच वासवदत्ता चमकते. कारण ती जर राजाच्या दृष्टीस पडली तर राजा मोहित झाल्याखेरीज राहणार नाही, याची तिला कल्पना आहे. यासाठी काही तरी निमित्त काढून ती सागरिकेस परत जाण्यास सांगते.

सागरिकेच्या मनात कौशांबीला मदनाची पूजा कशी करतात हे पाहावयाचे होते. म्हणून ती परत गेल्यासारखे करून सिंधुवार वृक्षाच्या आडोशाला उभी राहते. वासवदत्ता प्रथम मदनाची पूजा करते. उदयन त्या वेळी तिला न्याहाळतो. नुकतेच स्नान केले असल्याने तिची नितळ कांती चमकत होती. त्यानंतर ती

उदयनास पूजा ग्रहण करण्याची विनंती करते. सागरिका राजाकडे पाहते. तिला प्रत्यक्ष मदनच पूजेचा स्वीकार करीत असल्याचा भास होतो. ती आपल्या हातातील फुले उधळते व प्रार्थना करते - ''भगवान मदना, माझा तुला नमस्कार असो. तुझ्या प्रत्यक्ष दर्शनाचे मला फळ मिळू दे.''

इतक्यात संध्याकाळ झाल्याने वैतालिक श्लोक म्हणतात. त्या श्लोकावरुन हा उदयन राजा आहे हे सागरिकेस समजते. आपल्याला ज्या पुरुषाला देऊ केले होते तो हाच उदयन हे लक्षात येताच ती अगदी व्याकुळ होते. पण ती दासी होती. तिच्या हातात काहीच नव्हते. नंतर सर्वजण जायला निघतात. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. सागरिकेची मैत्रीण सुसंगता व दुसरी एक दासी निपुणिका यांचा संवाद चालला आहे. त्यावरून राजाकडे श्रीपर्वतावर राहणारा श्रीखंडदास नामक तपस्वी आला आहे व त्याने हंगाम नसताना देखील वेलींना फुलांचा बहर आणण्याची विद्या राजाला शिकवली आहे. तसेच सागरिका या वेळी चित्रफलक, रंग व कुंचले ही सामग्री घेऊन कदली वनात गेली आहे.

मुख्य प्रवेशात सागरिका चित्रफलकावर राजाचे चित्र रेखाटत आहे. राजाला पाहिल्यापासून ती आतूर बनलेली आहे. सुसंगता तिला शोधत त्या ठिकाणी येते. तसबिरीकडे पाहताच ती चकित होते. ती उदयनावर प्रेम करीत असलेली पाहून ती मनाशी म्हणते - ''शाबास सागरिके, कमळाचा ताटवा सोडून राजहंसी दुसरीकडे कशी जाईल?''

मग ती तसबीर कोणाची आहे असे खट्याळपणे विचारते. तेव्हा सागरिका ती मदनाची तसबीर आहे, असे उत्तर देते. मग सुसंगता चित्रफलक घेऊन राजाच्या शेजारी सागरिकेची प्रतिमा रेखाटते. सागरिका तिला हे कोणाचे चित्र आहे असे विचारते तेव्हा सुसंगता झटकन ते रतीचे चित्र आहे, असे सांगून मोकळी होते. मग सागरिका आपल्या सखीजवळ मनोगत व्यक्त करते. सुसंगता तिला साहाय्य करण्याचे आश्वासन देते. सागरिकेचा मदनसंताप कमी करण्यासाठी ती कमळाची पाने व मृणालतंतू घेऊन येते. यावरून सागरिका राजासाठी अक्षरश: झुरणीला लागली होती, हे लक्षात येते.

त्याच वेळी अश्वशाळेत बांधलेला एक वानर साखळी तोडून मोकळा सुटल्याने राजवाड्यात एकच गोंधळ उडतो. तो उद्यानात शिरल्याचे समजताच सागरिका व सुसंगता तमालवृक्षाच्या आडोशाला जातात. चित्रफलक मात्र तेथेच राहतो.

वानर त्या ठिकाणी येतो व सारिकेच्या पिंजऱ्याचे दार उघडतो. सारिका उडून जाते.

राजा व विदूषक उद्यानाकडे येतात. श्रीखंडदासाने शिकवलेल्या विद्येचा प्रयोग केल्यावर राजाची आवडती नवमल्लिका ही वेल हंगाम नसताना फुलांनी बहरली आहे. तो वेलीकडे पाहात म्हणतो :-

"नुकत्याच जोमाने वाढू लागलेल्या, कळ्यांनी बहरलेल्या, पांडुर दिसणाऱ्या, वायुलहरींनी सतत आंदोलित केल्याने थकून गेलेल्या मदनवृक्षासंनिध असलेल्या या लतेकडे मी पाहिले की राणी वासवदत्तेचे मुख रागाने लाल होईल."

(अंक २ श्लोक ४)

बकुल वृक्षावर सारिका बसलली आहे. तिचा स्वर ऐकून वसंतक घाबरतो. त्याला झाडावर भूत आहे असे वाटते. राजा तिचा स्वर ओळखतो. सारिका सागरिका व सुसंगता यांचे एकांतातील बोलणे उच्चारत आहे. त्यावरून कोणी तरी तरुणी कामातूर झाली आहे, इतकाच राजाला बोध होतो. ते दोघे सारिकेच्या मागोमाग कदलीगृहात येतात. तेथे त्यांना रिकामा पिंजरा व चित्रफलक दिसतो. चित्रातील युवतीशेजारी आपली प्रतिमा रेखाटलेली दिसताच राजा चकित होतो.

राजा व विदूषक यांचे भाषण तेथे आलेल्या सागरिका व सुसंगता यांच्या कानावर पडते. त्या चित्रफलक नेण्यासाठी आलेल्या असतात. राजा सागरिकेला पहातो.

सुसंगतेचे चाहटळ बोलणे ऐकून सागरिका रुष्ट होते. मग राजा तिचा हात हातात घेऊन तिची समजूत घालू लागतो. इतक्यात वासवदत्ता व कांचनमाला तेथे येतात त्या येताना पाहून सुसंगता आपल्या सखीला लपवते. वसंतक चित्रफलक आपल्या काखेत लपवतो.

राजाच्या आवडत्या नवमल्लिकेला फुले आली आहेत असे समजल्यावरून त्या दोघी उद्यानात आल्या आहेत. वासवदत्ता राजाचे अभिनंदन करते. त्या बरोबर विदूषक "आम्ही पैज जिंकली" म्हणून नाचू लागतो. त्यासरशी चित्रफलक खाली पडतो. वासवदत्ता फलकावरील तसबिरी पाहते व काय समजायचे ते समजते. राजा तिची समजूत घालू लागतो. ती आपले डोके दुखत असल्याचे सांगून निघून जाते. राजाही तिच्या पाठोपाठ निघतो. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. वासवदत्तेची मदनिका नामक दासी कांचनमालेला शोधत आहे. दोघींच्या बोलण्यावरून राजा सागरिकेवरील प्रेमाने

विव्हल झालेला आहे. तसेच वासवदत्तेने सागरिकेवर करडी नजर ठेवण्यासाठी सुसंगतेची योजना केली होती व तिला लालूच दाखवण्यासाठी भरजरी वस्त्रांची जोडी बक्षीस दिली होती. आता विदूषक आणि सुसंगता यांनी राजा व सागरिका यांची भेट घडवून आणण्यासाठी एक कट केला आहे. राणीची वस्त्रे परिधान करून सागरिकेने राजाला भेटायचे व सुसंगतेने कांचनमालेचा वेष घ्यायचा. पण या साऱ्या कटाचा कांचनमालेला आगावूच सुगावा लागलेला आहे. ती सागरिकेची खोड मोडण्यासाठी त्याच्या भेटीच्या प्रसंगी खुद्द वासवदत्तेला त्या ठिकाणी आणण्याचे ठरवते.

मुख्य प्रवेशात राजा सागरिकेचे चिंतन करीत आहे. चंचल अशा मनाचा मदनाने कसा वेध घेतला असेल याचे त्याला आश्चर्य वाटते. त्याला दिलासा देण्यासाठी विदूषक येतो. त्याने राजा व सागरिका यांच्या भेटीचा योग जुळवला आहे. तो राजाला योजना सांगतो. राजा त्याच्यावर खूष होतो व त्याला सोन्याचे कडे बक्षीस देतो. विदूषक सागरिकेला आणण्यासाठी जातो. आपल्याला प्रिय पत्नीच्या सहवासापेक्षा नूतन तरुणीचे आकर्षण वाटावे, याचे उदयनास आश्चर्य वाटते. तो म्हणतो -

"नवी प्रिया ही प्रियकराकडे प्रेमभराने पाहात नाही, आलिंगन दिले असता हृदयास वक्षःस्थळ भिडवत नाही. प्रयत्नांनी तिला घट्ट धरले तर 'मी जाते' असे वारंवार म्हणते. तरीदेखील संकतेस्थानी नूतन स्त्री पुरुषाला आपल्या पत्नीपेक्षाही सुखदायक वाटते."

(अंक ३ श्लोक ९)

कांचनमाला सुसंगतेने रचलेला बेत वासवदत्तेला सांगून तिला चित्रशाळेच्या दरवाजानजीक आणते. तोंडावर वस्त्र घेऊन विदूषक येतो. कांचनमाला चुटकी वाजवते. त्याबरोबर वेषांतर करून सागरिका व सुसंगता या आल्या असाव्यात असे त्यास वाटते. तो त्या दोघींना घेऊन लता मंडपाकडे जातो. राजा वासवदत्तेला सागरिका समजून आपली मदनावस्था प्रकट करतो.

राजाचा बेशरमपणा पाहून वासवदत्ता संतापते व आपला बुरखा दूर करते. राजा व विदूषक दोघे गडबडून जातात. राजा राणीची क्षमा मागतो पण वासवदत्ता तेथून रागारागाने निघून जाते. ती गेल्यावर वासवदत्तेचा वेष धारण केलेली सागरिका प्रवेश करते. आपला बेत राणीला समजला तर काय होईल या कल्पनेनेच तिला कापरे भरते. त्यापेक्षा आत्महत्या करणे बरे ! असा विचार करून फांदीला फास अडकवते.

एवढ्यात विदूषक तिला पाहतो. राणी वासवदत्ताच त्राग्याने प्राणत्याग करील असे वाटून तो राजाला हाक मारतो. राजा धावत जाऊन तिच्या गळ्यातील फास काढतो. राजाला पाहताच सागरिका प्रसन्न होते. तोही तिला ओळखतो व आनंदाने मिठी मारतो.

त्याच वेळी वासवदत्ता आणि कांचनमाला तेथे येतात. राजा व सागरिका समोर दिसताच वासवदत्ता चांगलीच खवळते. दोघींच्या समान वेषामुळे आपली फसगत झाली असे राजा सांगतो. पण राणी ऐकत नाही. ती सागरिका व विदूषक या दोघांना कैद करते. दोघांना घेऊन त्या दोघी निघून जातात. राजाला काय करावे हे सुचत नाही. तो वासवदत्तेची समजूत घालण्यासाठी तिच्या महालाकडे जाण्यास निघतो. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या प्रारंभीही प्रवेशक आहे. सुसंगता ही सागरिकेच्या गळ्यातील रत्नमाला घेऊन प्रवेश करते. सागरिकेने तिला ती सत्पात्री ब्राह्मणास देण्यास सांगितलेले आहे. तिला विदूषक दिसतो. सुसंगता त्यास रत्नमाला देतो. राणीने विदूषकाची सुटका केली आहे. तसेच सागरिकेला अंत:पुरातच लपवून ठेवले आहे पण ती उज्जयिनीला गेली आहे अशी बातमी पसरवून दिली आहे. सागरिकेची बहुमोल रत्नमाला पाहून ती मोठ्या घराण्यातील कन्या असावी असे त्याला वाटते.

मुख्य प्रवेशात राजा आपल्या प्रियेच्या चिंतनात मग्न आहे. इतक्यात विदूषक त्याच्याकडे येतो. राजा त्याला सागरिकेची वार्ता विचारतो. विदूषकाचे तोंड उतरलेले दिसताच त्याला सागरिका मरण पावली असावी असे वाटते. तो शोक करू लागतो. विदूषक सागरिका उज्जयिनीला गेल्याचे सांगतो व रत्नमाला राजाकडे देतो. राजा ती विदूषकाच्या गळ्यात घालतो.

द्वारपालिका येऊन रुमण्वानाचा भाचा विजयवर्मा आल्याचे सांगते. विजयवर्मा रुमण्वानाने कोसलेश्वरास ठार मारून विजय संपादन केल्याचे सांगतो. तसेच कोसलेश्वराने मरता मरता कसा प्रखर प्रतिकार केला त्याचे वर्णन करतो. राजा आपल्या शत्रूची मोकळ्या मनाने प्रशंसा करतो. इतक्यात उज्जयिनीहून शंबरसिद्धी नामक जादूगार आल्याचे समजते. राजा त्यास घेऊन येण्यास सांगतो.

जादूगार दरबारात येऊन आपल्या जादूने ब्रह्मा, विष्णू, महेश व इंद्र यांचे दर्शन घडवतो. अप्सरांचे नृत्य दाखवतो. सारे जण चकित होतात. विदूषक हळूच राजाला म्हणतो, "जादूगाराला म्हणावे तुला जर महाराजांना संतुष्ट

करावयाचे असेल तर सागरिकेचे दर्शन घडव.'' द्वारपालिका येऊन यौगंधरायणाचा निरोप सांगते. सिंहल द्वीपाचा राजा विक्रमबाहू (म्ह. रत्नावलीचा पिता) याने आपला मंत्री वसुभूती व बाभ्रव्य नामक कंचुकी यांना पाठवले आहे. तो निरोप ऐकताच राजा जादुगाराचा खेळ थांबवतो व वसुभूतीची भेट घेण्याचे ठरवतो. जादूगार जाता जाता त्यास आणखी एक खेळ दाखविण्याची परवानगी मागतो.

मग वसुभूती व बाभ्रव्य येतात. वसुभूती विदूषकाच्या गळ्यातली रत्नमाला पाहून चपापतो. राजा त्यास सिंहलेश्वराचे कुशल विचारतो. तेव्हा त्यास सिंहलेश्वराची कन्या रत्नावली ही कौशांबीकडे येत असता सागरात बुडाली असे समजते. आपल्या मामेबहिणीच्या मृत्यूची वार्ता ऐकून वासवदत्ता शोक करू लागते. इतक्यात गोंगाट ऐकू येतो. अंत:पुरात आग लागलेली दिसते. सागरिकेच्या जिवाला अपाय होईल या भीतीने राणी राजाला तिची सुटका करण्याची विनंती करते. राजा तडक आगीत शिरून तिची सुटका करतो. सागरिका आनंदाने त्याला बिलगते.

त्याबरोबर आग नाहीशी होते. ती आग म्हणजे जादुगाराचा खेळ होता. वसुभूती सागरिकेला ओळखतो. सागरिका म्हणजे रत्नावली हे समजताच सारेच चकित होतात. रत्नावली मूर्च्छित होते. वासवदत्ता आपल्या बहिणीला सावध करते. तिच्या हातातल्या बेढ्या काढते. ते सारे कारस्थान यौगंधरायणाचे आहे हे समजते आणि त्याच वेळी सर्व खुलासा करण्यासाठी यौगंधरायण रंगभूमीवर येतो. त्याचा खुलासा ऐकून सर्वांना आश्चर्य वाटते. वासदवत्ता मोठ्या आनंदाने आपल्या बहिणीचा हात राजाच्या हातात देते तसेच आपल्या अंगावरील अलंकार तिच्या अंगावर घालते. राजाच्या आनंदाला पारावार रहात नाही. त्याचे सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत. या आनंदातच हा अंक व नाटक पूर्ण होते. (अंक चौथा)

* * *

उदयनाच्या कथेवर श्रीहर्षाने प्रियदर्शिका व रत्नावली अशा दोन नाटिका रचल्या आहेत. बृहत्कथेत उदयनाची कथा आहे. भासाने त्याच्या कथेवर प्रतिज्ञा-यौगंधरायण व स्वप्नवासवदत्त अशी दोन नाटके लिहिली आहेत. त्यापैकी स्वप्नवासवदत्ताचा आधार रत्नावलीच्या संदर्भात विचारणीय आहे. त्याहीपेक्षा कालिदासाच्या मालविकाग्निमित्रास समोर ठेवून या नाटिकेची रचना केलेली

दिसते. शिवाय नाटककाराने आपल्या 'प्रियदर्शिके'तील काही प्रसंगांचीही उसनवारी केली आहे.

या उपलब्ध सामग्रीच्या आधारे रत्नावलीच्या कथानकाची मांडणी केलेली आहे. काही प्रसंगांची उसनवारी केली असली तरी त्याने त्यात यथोचित बदल केले आहेत. काही प्रसंगांची स्वतंत्र निर्मिती केली आहे. उदा. सागरिकेने घेतलेला वासवदत्तेचा वेष, तिचा आत्महत्येचा प्रयत्न, इंद्रजालिकाने लावलेली खोटी आग इ. तसेच प्रसंगांची मांडणी करताना त्याने कौशल्य प्रकट केले आहे.

कथावस्तूत नायिका-सागरिका उदयनास प्रथम पाहते. त्याच्या प्रेमात पडते व विरंगुळ्यासाठी त्याचे फलकावर चित्र रेखाटते. त्यानंतर उदयन तिला पाहतो व मग दोघांचे प्रेम वाढीस लागते. असा थोडासा उलट प्रकार आढळतो. त्यांची परस्पर भेट घडवून आणण्यासाठी नाटककाराने मार्मिक प्रसंगाची योजना केली आहे. त्यांच्या प्रणयाची वाढ होत असता वासवदत्तेचा त्यास विरोध होतो. तसा त्यांच्या प्रणयास रंग चढतो. राजा सागरिकेसह सापडला तरी वासवदत्ता शालीन असल्याने कठोर भाषण करीत नाही. त्यातून उद्भवलेली तिची डोकेदुखी 'स्वप्न' नाटकातील पद्मावतीच्या डोकेंदुखीची आठवण करून देते.

श्रीहर्षाने कथानकाची मांडणी व्यवस्थितपणे केली असली तरी त्यात कच्चे दुवे राहिलेले आहेत. सागरिकेच्या आत्महत्येचा प्रसंग सर्वस्वी कृत्रिम व अनावश्यक आहे. वासवदत्तेचा वेष घेऊन उदयनास भेटण्यास आलेली सागरिका एकदम हताश होऊन आत्महत्येस प्रवृत्त होते हे पटणारे नाही. तिच्या आत्महत्येस नाटककाराने समर्पक कारण दिलेले नाही. तसेच सागरिका आत्महत्येस प्रवृत्त होते तेव्हा सुसंगता कोठे होती हे स्पष्ट नाही. या दोन्ही प्रसंगांच्या अस्वाभाविकतेवर डॉ. के. ना. वाटव्यांनी कडक टीका केली आहे व ती योग्यच म्हणावी लागेल.

तसेच रत्नावली हीच सागरिका आहे असे नाटककाराने सुरुवातीस सांगून टाकल्याने कथेतील गंमतच नाहीशी झाली आहे. मुख्य म्हणजे यात संघर्षाचा अभाव आहे. याला कारण वासवदत्तेच्या विरोधाला कोठे धार चढलेली नाही. नाटकातील उपकथानकाचा मुख्य कथानकाशी काही संबंध नाही. तसेच पात्ररेखाटन व्यवस्थित केले असले तरी मन वेधून घेणारे एकही पात्र आढळत नाही.

सागरिकेने वासवदत्तेचा वेष धारण करण्याची कल्पना नवीन आहे खरी पण तो प्रसंग म्हणावा तसा जमला नाही. मुळात ही कल्पना प्रियदर्शिकेत आहे. तेथे आरण्यका नाटकात वासवदत्तेची भूमिका करण्यासाठी तिची वस्त्रे आपल्या अंगावर चढवते. प्रियदर्शिकेतील हा प्रसंग येथील प्रसंगापेक्षा अधिक 'नाट्यमय' आहे असे मत डॉ. गो.के. भटांनी व्यक्त केले आहे.

नाटकातील काही प्रमाद नाटककाराच्या अनवधानाने शिरले आहेत. उदा. सागरिकेच्या हालचालीवर करडी नजर ठेवण्यासाठी वासवदत्तेने सुसंगतेची योजना केलेली आहे. हा तिचा शुद्ध वेंधळेपणा आहे. सुसंगता सागरिकेची जिवलग मैत्रीण आहे हे तिला ठाऊक असायला हवे.

राजा उदयन हा धीरललित प्रकृतीचा नायक आहे. हा विलासप्रिय व दाक्षिण्य या गुणाने युक्त आहे. याने आपल्या राज्याची जबाबदारी अमात्यावर सोपवलेली आहे. पण सागरिकेच्या प्राप्तीसाठी तो काही करीत नाही. नाही म्हणायला शेवटी कृत्रिम आगीत शिरून सागरिकेला बाहेर आणण्याची कामगिरी करतो. वासवदत्तेवर त्याचे उत्कट प्रेम आहे. पण सागरिकेला पाहिल्यावर तो पाघळतो. राजे लोकांना अनेक स्त्रिया असत त्यामुळे नव्या स्त्रीला अंत:पुरात आणण्यात तो काही गैर करीत नाही. तरी सागरिकेवरील त्याचे प्रेम निव्वळ शारीरिक वाटते.

सागरिका ही अतिशय रूपसंपन्न, अत्यंत लज्जाशील अशी राजकन्या आहे. 'ती ज्याच्याशी विवाह करील तो चक्रवर्ती राजा होईल' असे भविष्य आहे. यास्तव यौगंधरायणाने उदयनासाठी तिला मागणी घातली होती. पण दैवगतीमुळे तिचे जहाज बुडते व ती फळीला लटकून कशीबशी कौशांबीला येऊन पोहोचते. पण दासीपण तिच्या वाट्यास येते. साऱ्या नाटकात ती काही बोलत नाही. आपल्या स्थितीबद्दल विचार करीत नाही. एक सुंदर बाहुली एवढेच तिचे नाटकात अस्तित्व आहे.

वासवदत्ता ही उदयनाची पट्टराणी आहे. तिच्या व उदयनाच्या प्रणयकथा लोकप्रसिद्ध आहेत. भासाने यावरच आपल्या 'प्रतिज्ञा' नाटकाची उभारणी केली आहे. ही राजाच्या उत्कर्षासाठी मोठा त्याग करून सवतीचा मार्ग खुला करते. उदयनाचे तिच्यावर अत्यंत प्रेम असले तरी त्याच्या विलासी वृत्तीची तिला जाणीव आहे. म्हणून ती सागरिकेला राजासमोर येऊ देत नाही. राजा दुसऱ्यांदा तिच्याबरोबर सापडताच ती तिला बंदिखान्यात टाकते. नंतर ती

उज्जयिनीला गेली अशी खोटीच बातमी पसरविते. पण अंत:पुरास आग लागलेली दिसताच तिला वाचवण्याची राजाला विनंती करते. यावरून तिचा विरोध कमी झाल्याचे जाणवते. अखेरीस सागरिका म्हणजेच आपली मामेबहीण रत्नावली आहे हे समजताच ती सागरिकेचा हात राजाच्या हातात देते.

वसंतक ऊर्फ विदूषक हा राजाचा मित्र आहे. हा इतर विदूषकांप्रमाणे खादाड, अजागळ व अवसानघातकी आहे. राजाला त्याची मदत तर होत नाहीच उलट त्याच्या धांदरटपणामुळे चित्रफलक खाली पडतो व राजा आणि सागरिका यांच्यातील प्रणयाचा राणीला सुगावा लागतो. हा दिसायला कुरूप असून त्याचे वानराशी साम्य असल्याचे सागरिकेस जाणवले आहे. तो भित्राही आहे. झाडावर सारिकेचा आवाज ऐकताच तेथे भूत बसले आहे असे त्यास वाटते. अशा प्रकारे विदूषकाचे चित्रण नाटककाराने अगदी सांकेतिकपणे केले आहे. त्याचे नर्म विनोद सुखवणारे आहेत इतकेच.

सागरिकेची सखी सुसंगता ही मात्र चतुर व हजरजबाबी आहे. सागरिकेने उदयनावर प्रेम करावे याचे तिला कौतुक वाटते. राजाची व सागरिकेची एकांत भेट घडवून आणण्यासाठी ती विदूषकाच्या मदतीने धाडसी बेत आखते, पण वेषांतराचा हा बेत सफल होत नाही. मात्र ती ऐनवेळी सागरिकेला सोडून कोठे जाते ते समजत नाही. तिने वासवदत्तेचाही विश्वास संपादन केलेला दिसतो. कारण सागरिकेवर नजर ठेवण्योची कामगिरी ती सुसंगतेवरच सोपवते. ती चित्रकलेत निपुण आहे. राजाच्या शेजारी सागरिकेचे चित्र तीच रेखाटते. नायिकेला प्रणय प्रसंगात मदत करणारी ही पीठमर्दिका आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

यौगंधरायण हा खरे तर नाटकाचा सूत्रधार मानायला हवा. पण तो सर्व नाटकभर पडद्याआडच आहे. वासवदत्तेच्या मृत्यूची खोटी वार्ता पसरविणे व उदयनासाठी रत्नावलीसाठी मागणी घालणे, यापलीकडे त्याने काहीही केले नाही. उदयनाच्या प्रेमप्रकरणाशी त्याचा दुरूनही संबंध नाही. वासवदत्तेची कांचनमाला ही दासी हुशार आहे. तिने सुसंगतेच्या कटाचा भेद केला आहे. वास्तविक पाहता तिच्यावर सागरिकेवर नजर ठेवण्याची कामगिरी सोपवणे योग्य झाले असते. सारांश, यातील एकही पात्र ठसठशीत नाही.

प्रियदर्शिका व रत्नावली या त्याच्या दोन नाटिका अगदी जुळ्या बहिणीप्रमाणे आहेत. दोन्हीत असंख्य साम्यस्थळे आहेत. अनेक वाक्ये, श्लोक, कल्पना

दोन्हीकडे सारख्याच आहेत. त्याने स्वप्न-नाटकाची कथा सोईस्कररीत्या बदलून घेतली आहे. तिच्यात पद्मावतीच्या ऐवजी रत्नावलीची योजना केली आहे. मात्र कथानकाची मांडणी 'मालविकाग्निमित्रा'स समोर ठेवून केली आहे. या दोन नाटकांत देखील अनेक साम्यस्थळे आहेत. ती याप्रमाणे (१) नायकाकडे येताना नायिकेला अपघात होणे (२) नायकाने नायिकेला प्रथम चित्रात पाहणे (३) दोघांच्या प्रेमप्रकरणास थोरल्या राणीने विरोध करणे (४) उद्यानातील वानर मोकळा सुटून त्याने उच्छाद मांडणे (५) थोरल्या राणीने नायिकेला बंदिवासात ठेवणे (६) लता-वेलींना अवेळी मोहोर येणे (७) नायिका दासी नसून राजकन्या आहे ही गोष्ट उघड होणे इ. 'विक्रमोर्वशीया'तील एका प्रसंगाशी साम्य आढळते. पहिल्यात विदूषकाच्या हातातून उर्वशीचे प्रेमपत्र निसटून पडते तर रत्नावलीत त्याच्या काखेतून चित्रफलक खाली पडतो. अशा प्रकारे श्रीहर्षाने भासाची व विशेषत: कालिदासाची नाटके काळजीपूर्वक अभ्यासलेली दिसतात.

तथापि श्रीहर्ष हा निव्वळ उचलेगिरी करणारा नाटककार नाही. त्याने रत्नावली नाटकाची रचना कौशल्यपूर्वक केली आहे. ही नाटिका संस्कृत नाट्यवाङ्मयात अत्यंत लोकप्रिय आहे. याचे कारण हिचे अत्यंत सुटसुटीत स्वरूप, एकेरी कथानक, अत्यंत सुबोध व रसाळ भाषा व शास्त्रशुद्ध मांडणी यात सापडेल. त्याने नाट्यशास्त्रातील विषयांचे अगदी कसोशीने पालन केले आहे. धनंजय, धनिक व विश्वनाथ या नाट्यशास्त्रावर लेखन करणाऱ्या पंडितांनी प्राय: रत्नावलीतील उदाहरणे दिली आहेत. अभिनवगुप्तानेही हर्षाची प्रशंसा केली आहे. दुसरे म्हणजे उदयनाची कथा हेही या नाटकाचे मोठे आकर्षण आहे. प्रियदर्शिकेपेक्षा रत्नावलीतील भाषा रसाळ आहे. त्यामुळे उत्तम नाटिका रचल्याचे श्रेय त्याला द्यावयास हरकत नाही.

## ३. नागानंद

नागानंद हे त्याचे अखेरचे नाटक आहे. नांदीच्या पहिल्या श्लोकात माराच्या (म्ह. हिंदू कल्पनेप्रमाणे साधारणपणे मदनाच्या) स्त्रिया गौतमबुद्धाचे मन चंचल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण त्यांच्या प्रयत्नांना यश न आल्याने त्या चिडलेल्या आहेत तर दुसऱ्या नांदी श्लोकात अशा प्रकारे निश्चल राहिलेल्या बुद्धाकडे सर्व जण कशा प्रकारे पाहात आहेत याचे वर्णन केले आहे.

नांदीनंतर सूत्रधार नटीस हाक मारतो. ती रडत रडतच प्रवेश करते. कारण तिचे सासू-सासरे सूत्रधारावर घर सोपवून अरण्यात निघाले आहेत. ही वार्ता ऐकून सूत्रधार खिन्न होतो. जीमूतवाहनाप्रमाणे आपणही अरण्यात जाऊन आई-वडिलांची भेट घ्यावयाची असे ठरवतो व निघून जातो.

अरण्यात नायक जीमूतवाहन व विदूषक बोलत बसले आहेत. जीमूतवाहन राज्यकारभार सोडून अरण्यात आई-वडिलांची सेवाचाकरी करीत असल्याचे पाहून विदूषकाला आश्चर्य वाटते. अशा वागण्यामुळे राज्यावर शेजारचा राजा आक्रमण करील अशी तो धोक्याची सूचना देतो. पण जीमूतवाहनाच्या मनाची घडणच एकदम वेगळी आहे. तो स्वभावत:च विरक्त आहे. आई-वडिलांवर त्याची उत्कट श्रद्धा आहे. यापुढे त्याला राज्याचीही पर्वा वाटत नाही. तो म्हणतो -

''पित्यासमोर जमिनीवर उभे राहण्यात जे सौख्य आहे ते सिंहासनावर आरूढ होण्यात आहे काय? त्यांचे चरण-संवाहन करण्यात जो आनंद आहे तो राजमंडळाकडून सेवा करून घेण्यात आहे काय? पित्याचे अवशिष्ट असे अन्न ग्रहण करण्यात जे समाधान आहे, ते त्रिभुवनाचा उपभोग घेऊन मिळेल काय? वडिलांचा त्याग करून राज्य करीत राहणे खरोखर क्लेशदायक आहे.''

(अंक १ श्लोक ७)

वडिलांच्या तपाचरणास योग्य अशी जागा निवडण्यासाठी तो मलय पर्वतावर हिंडत आहे. इतक्यात त्याच्या कानावर मधुर गीताचे स्वर पडतात. गौरीच्या मंदिरात नायिका मलयवती वीणेच्या स्वरावर गायन करीत आहे. तिचे अनुपम लावण्य पाहून तो मंत्रमुग्ध होतो. या गोष्टीचे विदूषकास समाधान वाटते.

गाणे संपल्याबरोबर ती सखीबरोबर बोलू लागते. मलयवती सखीस आपल्याला पडलेल्या स्वप्नाची हकीकत सांगते. तिला स्वप्नात साक्षात गौरीचे दर्शन झाले व 'एक चक्रवर्ती विद्याधर तुझे पाणिग्रहण करील' असा गौरीने तिला आशीर्वाद दिला. त्यांचे भाषण ऐकून विदूषक जीमूतवाहनास पुढे होण्यास सांगतो. नायक-नायिकेची दृष्टीभेट होते. तथापि जीमूतवाहन स्वभावत:च विरक्त व भिडस्त असल्याने व मलयवती लज्जाशील असल्याने दोघात संभाषण घडत नाही.

त्या वेळी त्या ठिकाणी तापस येतो. त्याच्या बोलण्यावरून मलयवती ही सिद्धराज मित्रावसू याची बहीण आहे हे समजून येते. तिचा पिता विश्वावसू याच्या मनात तिला जीमूतवाहनास द्यावयाची आहे. जीमूतवाहन हा

मलयपर्वतावर आलेला आहें, असे समजल्यामुळे मित्रावसू त्याचा शोध घेण्यासाठी आलेला आहे. नायक-नायिकेच्या नुसत्या दृष्टभेटीवरच हा अंक संपलेला आहे. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या मुख्य प्रवेशात मलयवती चंदनलतागृहात बसलेली आहे. ती नायकाच्या भेटीसाठी अगदी व्याकूळ झालेली आहे. त्या ठिकाणी नायक व त्याचा मित्र आत्रेय-विदूषक हे येतात. नायकाचीही अवस्था तिच्यासारखीच झालेली आहे. त्याला असे स्वप्न पडलेले असते की त्याची प्रिया चंदनलतागृहात रडत बसलेली आहे. त्यामुळे तिचा क्षेमसमाचार विचारण्यासाठी तो तेथे आलेला आहे. त्याची चाहूल लागताच नायिका व तिची सखी तमालवृक्षाच्या आड लपतात.

जीमूतवाहन विरंगुळ्यासाठी मलयवतीचे चित्र रेखाटतो. पण त्याच्या बोलण्यात स्त्रीचा नामोल्लेख नसल्याने मलयवतीला अन्य स्त्रीच्या प्रेमाची शंका येते. त्याच वेळी तिचा भाऊ मित्रावसू त्या ठिकाणी येते. तेव्हा नायक केळीच्या पानाने मलयवतीचे चित्र झाकतो. मित्रावसू त्यास आपल्या वडिलांनी मलयवतीला द्यावयाचे ठरविले आहे असे सांगतो पण गौरीच्या मंदिरात भेटलेली स्त्री म्हणजेच मलयवती हे जीमूतवाहनास ठाऊक नसल्याने तो त्या विनंतीस नकार देतो. तो नकार ऐकताच मलयवतीच्या मनोरथांचा चक्काचूर होतो. ती बेशुद्ध पडते. सावध झाल्यावरदेखील ती आत्महत्या करण्याचा निश्चय करते.

विदूषक मित्रावसूला जीमूतवाहनाच्या आई-वडिलांची भेट घेण्याची विनंती करतो. तो निघून जातो. मलयवती आपल्या दासीला तो गेला की नाही हे पाहण्यास सांगते. ती गेल्यावर वेलीचा फास गळ्यात अडकवते. पण दासी चतुर असल्याने ती गेल्यासारखे करून परत येते. ती लगेच आरडा-ओरडा करते. त्याबरोबर जीमूतवाहन धावत तेथे येतो व मलयवतीची फासातून सुटका करतो. नंतरच्या संभाषणात सारा गैरसमज दूर होतो. मलयवती म्हणजे गौरीच्या मंदिरात भेटलेली सुंदरी आहे हे समजताच जीमूतवाहन तिच्याशी विवाह करण्यास तयार होतो. लगेच विवाहाची सिद्धता करण्यात येते. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी नायक-नायिकांचा विवाह झालेला आहे व त्याप्रीत्यर्थ झालेल्या मेजवानीने सर्वांची चंगळ उडालेली आहे. विदूषक, विट, चेट, विटाची प्रेयसी नवमालिका यांच्यातील थट्टा-मस्करीला अगदी ऊत आला

आहे. फजिती झालेला विदूषक जीमूतवाहनाजवळ येतो. जीमूतवाहन हा मलयवती व तिचा परिवार यांच्यासह उद्यानाकडे निघालेला आहे. तो नायिकेच्या यौवनाची व सौंदर्याची प्रशंसा करतो. मलयवती त्याच्या मधुर भाषणाने सुखावते. ती सखीला म्हणते - "अग हे केवळ देखणेच नाहीत तर चतुरही आहेत. यांना मधुर भाषण करण्याची कला अवगत आहे." नंतर सर्व जण उद्यानात शिरतात. जीमूतवाहन प्रियेला उद्देशून म्हणतो :

"अगोदरच तुझ्या नाजूक कमरेस तुझ्या पुष्ट वक्षःस्थळांचा भार सहन होत नाही. तर मग त्यात हारांची भर कशासाठी घातली आहेस? तुझ्या उरू-युगलास नितंबांचा भार सोसवत नाही तर पुन्हा त्यावर मेखला कशासाठी बांधली आहेस? चरणांना जघनस्थलांचा भार सहन होत नाही तर त्यावर पैंजण कशासाठी चढवले आहेस? तू तुझ्या सुंदर अवयवांनीच शोभून दिसत आहेस, तर अलंकाराच्या भारांनी शरीरास कष्ट का देत आहेस?"

(अंक ३ श्लोक ६)

हे सारे वर्णन चाललेले असताना मलयवतीचा भाऊ मित्रावसू त्या ठिकाणी येतो. तो सांगतो की शेजारच्या शत्रूने आक्रमण करून जीमूतवाहनाचे राज्य बळकावले आहे. त्या शत्रूचा समाचार घेण्यास तो स्वतः समर्थ आहे. फक्त त्यासाठी नायकाची त्यास अनुमती हवी आहे. स्वभावाने अत्यंत दयाळू असलेल्या जीमूतवाहनास आक्रमण करण्याची कल्पना पसंत पडत नाही. त्याच्या मनावर अहिंसा-विचाराचा विलक्षण पगडा आहे. त्यामुळे तो ती विनंती मान्य करीत नाही. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक आहे. कंचुकी व प्रतिहारी यांच्या संभाषणावरून मलयवतीच्या आईने मुलीसाठी व जावयासाठी लाल रेशमी महावस्त्राची जोडी पाठवून दिली आहे हे समजते. मुख्य प्रवेशात जीमूतवाहन हा मित्रावसूबरोबर समुद्र किनाऱ्यावर हिंडत आहे. तेथे त्याला नागांच्या अस्थींचे पांढरे शुभ्र ढिगारे दिसतात. गरुड दररोज एका नागास ठार मारीत आहे अशी माहिती मित्रावसू सांगतो.

जीमूतवाहनाचे मन द्रवते. आपण नागांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांचे बलिदान करावे अशी कल्पना त्याच्या मनात चमकून जाते. वडिलांचा निरोप आल्याने मित्रावसू निघून जातो. जीमूतवाहनास एका स्त्रीच्या रडण्याचा आवाज ऐकू येतो. त्या पाठोपाठ शंखचूड नामक नाग युवक व त्याची म्हातारी आई हे

प्रवेश करतात. गरुडाचे भक्ष्य होण्याची आज त्याची पाळी आहे. नागराजाचा सेवक त्याला वधशिलेवर उभे करतो व त्याच्या अंगावर लाल वस्त्र घालतो. ते दृश्य पाहताच जीमूतवाहनाच्या ध्यानात सारा प्रकार येतो. तो लगेच पुढे येऊन शंखचूडाऐवजी आपले प्राण देण्याचा निर्धार व्यक्त करतो. तेव्हा ती दोघे चकित होतात. शंखचूडाच्या आईला तर अगदी भडभडून येते. जगावेगळे वर्तन करू पहाणाऱ्या जीमूतवाहनाच्या दर्शनाने शंखचूड अगदी भारावून जातो. कारण कितीही झाले तरी आपले प्राण हे सर्वांनाच प्रिय असतात. तो म्हणतो :-

"आपले प्राण वाचविण्यासाठी विश्वामित्राने चांडाळाचे अनुकरण करून कुत्र्याचे मांस खाल्ले. गौतमाने आपल्यावर उपकार करणाऱ्या नाडीजंघास ठार मारले. हा कश्यपाचा पुत्र गरुड आपल्या प्राणरक्षणासाठी रोज सर्पांना मारून खात आहे. परंतु हा सत्पुरुष दयार्द्र होऊन आपल्या प्राणास तुच्छ मानून दुसऱ्यासाठी त्यांचा त्याग करीत आहे."

(अंक ४ श्लोक १५)

जीमूतवाहनाने आपल्यासाठी मरावे हे शंखचूडास योग्य वाटत नाही. त्याच्यासारख्या साधु-पुरुषाचा घात होऊ नये असे त्यास वाटते. दोघेही आपले प्राण देण्यासाठी वाद घालू लागतात. अखेरीस गरुडास येण्यास अवकाश आहे असे वाटून शंखचूड मृत्यूपूर्वी दक्षिण गोकर्ण मंदिरास प्रदक्षिणा घालण्यासाठी आपल्या आईला घेऊन निघून जातो.

जीमूतवाहनाजवळ लाल वस्त्रे नसतात. योगायोगाने कंचुकी येऊन त्यास लाल महावस्त्रांची जोडी आणून देतो. इतक्यात वादळी वारा सुटतो. गरुडाच्या आगमनाची वेळ झाल्याचे ओळखून तो वध्यशिलेवर आरूढ होतो व लाल वस्त्र अंगावर पांघरतो. त्या वेळी सारे आकाश काळवंडते. समुद्राच्या लाटा जोरजोराने वर उसळू लागतात. नायक प्राणदानाच्या कल्पनेने सुखावतो. ती वध्यशिला त्यास मलयवतीच्या स्पर्शापेक्षा इतकेच नव्हे तर आईच्या मांडीपेक्षाही सुखदायक वाटते.

शिळेवर आपले भक्ष्य दिसताच गरुड त्याच्यावर झडप घालतो. आकाशातून पुष्पवृष्टी होऊ लागते. क्षणभर गरुडही चकित होतो. त्याला वाटते की आपल्या वेगाने उत्पन्न झालेल्या वाऱ्याने पारिजातकाचा वृक्ष हादरला असावा. तसेच प्रलयकाळाची वेळ जवळ आली असे वाटून ढगांचा मंद घोष होत असावा. तो जीमूतवाहनास आकाशमार्गाने नेऊ लागतो. जीमूतवाहन कृतकृत्य होतो. गरुड

मलयपर्वताकडे उड्डाण करू लागतो. या ठिकाणी चौथा अंक समाप्त झाला आहे.

पाचव्या अंकाच्या प्रारंभी जीमूतवाहन समुद्रावरून का परत आला नाही याची सर्वांना चिंता पडलेली आहे. इतक्यात रक्ताने माखलेला एक मणी जीमूतवाहनाच्या वडिलांच्या पायाशी येऊन पडतो. तो मणी गरुडाने मारलेल्या नागाच्या रक्ताने माखला असावा असे त्यांना वाटते.

तोच शंखचूड त्या ठिकाणी येतो आपल्या ऐनवेळी गोकर्णमंदिराच्या प्रदक्षिणेला जाण्याने केवढा अनर्थ झाला आहे, याची त्याला जाणीव होते. तो आपला जीव एका विद्याधरश्रेष्ठाने वाचविल्याचे सांगतो. सर्वांना एकच धक्का बसतो. जीमूतवाहनाचे आईवडील व मलयवती हे मूर्च्छित होतात. सावध झाल्यावर मलयवती सती जाण्याचा निर्धार करते. सांडलेल्या रक्ताच्या अनुरोधाने शंखचूड त्यांना गरुडासमीप घेऊन जातो.

जीमूतवाहन हा गरुडाच्या पुढ्यात रक्तबंबाळ होऊन पडलेला आहे. गरुडाने त्याच्या अंगाचे लचके तोडलेले आहेत. तथापि जीमूतवाहनाच्या चेहऱ्यावर अपूर्व समाधान दिसत आहे. त्यामुळे हा कोणी तरी महापुरुष असावा अशी गरुडाला शंका येते. शंखचूड त्यास सांगतो की हा नाग नसून विद्याधरश्रेष्ठ जीमूतवाहन आहे. तेव्हा गरुडास अत्यंत दु:ख होते. आज जणू आपण बोधिसत्त्वासच ठार मारले. असे त्याला वाटते. मग जीमूतवाहनाचे आईवडील त्या ठिकाणी येतात. गरुड आपल्या पातकाचे प्रायश्चित्त म्हणून समुद्राच्या वडवानलात शिरून प्राणत्याग करण्याचा निर्धार व्यक्त करतो. परंतु जीमूतवाहन त्यास अहिंसेचे पालन करण्याचा उपदेश करतो. तो म्हणतो :

"तू यापुढे दुसऱ्यांच्या प्राणांचा घात करण्याचे सोडून दे. मागील कृत्याविषयी पश्चात्ताप पावून इतरांना अभय दे. सद्गुणांचा असा संचय कर की जेणेकरून इतरांची हत्या करून निर्माण झालेले पाप परिपक्व होणार नाही. उलट सरोवरातील अथांग पाण्यात टाकलेल्या चिमुटभर मिठाप्रमाणे ते आपोआप विरघळून जाईल."

(अंक ५ श्लोक २४)

गरुड आपले वर्तन सुधारण्याचे व अहिंसेचे पालन करण्याचे मान्य करतो. जीमूतवाहन आपले प्राण सोडतो. सर्व जण शोक करू लागतात. गरुड स्वर्गात जाऊन तेथून अमृताची वृष्टी करून जीमूतवाहनास जिवंत करण्याच्या उद्देशाने

उड्डाण करतो. मलयवती गौरीची प्रार्थना करते त्याबरोबर गौरी प्रकट होते. ती पाणी शिंपडून जीमूतवाहनास उठवते. स्वर्गातून अमृताची वृष्टी होऊ लागते. त्या योगे गरुडाने आजवर मारलेले नाग जिवंत होतात. तसेच गौरीच्या आशीर्वादाने जीमूतवाहनास गेलेले राज्यही परत मिळते. त्यामुळे 'सर्वत्र सुख-समृद्धी होवो,' अशी जीमूतवाहन प्रार्थना करतो व नाटक समाप्त होते. (अंक पाचवा)

* * *

प्रस्तुत नाटकाची कथावस्तू बहुतांशी स्वतंत्र आहे. नाटकाच्या प्रस्तावनेत श्रीहर्षाने 'विद्याधरजातककथे'चा उल्लेख केला आहे. परंतु हा ग्रंथ मिळत नाही. बृहत्कथेत जीमूतवाहनाची कथा आलेली आहे. मूळ बृहत्कथा उपलब्ध नसली तरी तिच्या दोन्ही संस्कृत रूपांतरात - क्षेमेंद्राच्या बृहत्कथामंजरी व सोमदेवाच्या कथासरित्सागर - ती सांगितलेली आहे. 'कथासरित्सागरा'च्या नरवाहनदत्तजनन या चौथ्या लंबकाच्या दुसऱ्या तरंगात ही कथा विस्ताराने आली आहे. अर्थात त्यातील फारच थोड्या भागाच्या नाटकातील कथेशी संबंध आहे.

| मूळ कथा | नागानंद |
| --- | --- |
| १) जीमूतवाहनाचा जन्म कल्पवृक्षाच्या कृपेने झाला, असे म्हटले आहे. | १) नाटककाराने हा संदर्भ वगळला आहे. |
| २) नातेवाइकांनी राज्यावर हल्ला केल्यावर त्याची हत्या होऊ नये म्हणून जीमूतवाहन राज्य सोडून वनात जातो. | २) माता-पित्याची सेवा करण्यासाठी तो अरण्यात जातो. |
| ३) मलयवती ही त्याची पूर्वजन्मातील पत्नी असल्यामुळे जीमूतवाहन त्वरित लग्नास तयार होतो. | ३) गैरसमज झाल्याने जीमूतवाहन प्रथम मित्रावसूच्या प्रस्तावास नकार देतो. नंतर त्यास संमती देतो. |

यावरून नाटककाराने मूळ कथेत कसा कलात्मक बदल केला आहे याची कल्पना येते. मूळ तपशिलात केवळ बदलच केलेला नाही, तर काही भाग नव्याने रचून घातलेला आहे. जीमूतवाहनाने विवाहाच्या प्रस्तावास नकार

दिल्यामुळे मलयवती आत्मघातास प्रवृत्त होते. दासीचा आवाज ऐकून जीमूतवाहन स्वतः तिची फासातून सुटका करतो, हा प्रसंग नवीन रचून घातला आहे. तसेच मूळ कथेमध्ये वध्यशिलेवर उभ्या असलेल्या जीमूतवाहनास उचलून नेताना गरुडास विद्याधर व नाग यातील फरक कसा जाणवला नाही असा प्रश्न पडतो. या शंकेला वाव राहू नये यासाठी श्रीहर्षाने नाटकात लालवस्त्रांची योजना केली आहे. नायक-नायिकेची प्रथम भेट, विदूषकाची दासीने केलेली थट्टा, हे प्रसंग स्वतंत्र आहेत. कथावस्तू स्वाभाविक वाटावी याबाबत नाटककाराने शक्य ती काळजी घेतली आहे.

'नायकाने शंखचूडासाठी केलेले बलिदान' हा नाटकाचा मुख्य विषय आहे. गरुडास दररोज एक नाग लागत असे. आज बळी जाण्याची पाळी शंखचूडावर आलेली आहे. परम दयाळू अशा जीमूतवाहनास हा अन्याय पाहावत नाही. तो दयार्द्र बुद्धीने आपले प्राण देण्यास तयार होतो. या कथानकावर महाभारतातील बकासुराख्यानाची छाया पडलेली आहे. बळी जाणारा शंखचूड व त्याची आई हे दोघेही सज्जन आहेत. आपल्या बदली जीमूतवाहनाने मरावे असे शंखचूडास मुळीच वाटत नाही. त्यामुळे अखेरच्या करुण प्रसंगाची उत्कटता वाढलेली आहे.

संस्कृत नाट्यसृष्टीतील ही एक वेगळी उमटून पडणारी कलाकृती आहे. जीमूतवाहन हा नायक म्हणून शोभणारा नाही. तो चांगला राजा नाही की प्रेमिक नाही. त्याला तरुण वयातच वैराग्य प्राप्त झाले आहे. राज्यकारभार करण्याऐवजी तो वानप्रस्थात राहिलेल्या आई-वडिलांची सेवा करतो. त्यातच त्याला आनंद वाटतो. शत्रूने आपल्या राज्यावर हल्ला केल्याचे ऐकूनही त्याला काही वाटत नाही. इतकेच नाही तर शत्रूशी युद्ध करण्याची मित्रावसूची विनंतीही तो धुडकावून लावतो.

या नाटकाचे सरळ दोन भाग होतात. पहिल्या तीन अंकांत नायक-नायिकांचे प्रेम-प्रकरण व विवाह यांचे कथन आहे. तर शेवटच्या दोन अंकात नायकाच्या बलिदानाची कथा आहे. दोन्ही कथांचा परस्परांशी काही संबंध नाही. किंबहुना कथानक असे वळण घेणार याची कोणतीही सूचना पहिल्या भागात दिलेली नाही. त्यामुळे कथानक एकसंध वाटत नाही.

पहिल्या तीन अंकात जी प्रेमकथा आहे ती निर्जीव व कळाहीन आहे. हा विचित्र राजा मलयवतीच्या प्रेमात पडतो. तिच्याशी शृंगारिक भाषण करतो,

विवाह करतो, पण यामध्ये त्याला रस आहे असे दिसत नाही. नव-विवाहित पत्नीशी हितगूज करण्याऐवजी तो समुद्रकिनाऱ्यावर फिरायला जातो. शंखचूडाला वाचविण्यासाठी मागचा पुढचा विचार न करता आत्मबलिदानास सिद्ध होतो. ही अकारण उद्भवलेली करुणा आहे हे मान्य करूनही नायकाचे बलिदान समर्थनीय ठरत नाही. शंखचूड असा कोण लागून गेला होता की त्यासाठी जीमूतवाहनाने आपले प्राण अर्पण करावेत. आपल्या वृद्ध माता-पित्याचा व नवविवाहित मलयवतीचा विचार कसा त्याच्या मनात आला नाही? त्याच्या बलिदानाने असा कोणता प्रश्न सुटणार होता? शंखचूडाचे वर्तनही अनाकलनीय आहे. गरुडाच्या आगमनाची वेळ झाली असताना तो मंदिर-प्रदक्षिणेस का जातो? याचाच अर्थ ही कथा जुळवल्यासारखी वाटते. स्वाभाविक वाटत नाही.

नायक-नायिकेच्या प्रेमप्रकरणाचा प्रवासही असाच निर्जीव आहे. त्यातील अडथळा व त्याचे निराकरण हे तर हास्यास्पद वाटावे इतके पोकळ आहेत. जीमूतवाहन अगदी उतावीळपणे मित्रावसूच्या विनंतीचा अव्हेर करतो. या प्रसंगी नायकापेक्षा विदूषकच अधिक समजूतदारपणे वागतो व बोलतो. मलयवती तर त्याच्याहून उतावळी आहे. त्याचा नकार कानावर पडताच ती लगेच झाडाला फास लावून जीव यायला निघते. सारांश हा साराच प्रसंग अगदी पोरकट वाटण्याइतका सामान्य आहे.

आयुष्याच्या उत्तरकाळात श्रीहर्षाने बौद्ध धर्माचा स्वीकार केलेला होता. त्यामुळे अहिंसा, विरक्ती, त्याग या गुणांची महती सांगण्यासाठी त्याने या नाटकाची रचना केली असावी असे वाटते. खरोखर हा जर त्याचा उद्देश असेल तर पहिल्या तीन अंकातील घटना सर्वस्वी विसंगत आहेत. मात्र शेवटच्या अंकातील नायकाचे बलिदान हे चित्तथरारक आहे. यातील कारुण्य अस्सल आहे. कोणत्याही नाटककाराने नायकाने असे आत्म-समर्पण केल्याचे दर्शविले नाही. या दृष्टीने श्रीहर्षाने एक धाडसी पाऊल टाकले आहे असे म्हणावयास हरकत नाही.

नाटकाचे कथानक साधारणपणे तीन आठवड्यात पूर्ण झाले आहे. दुसऱ्या अंकात शरदातील उन्हाचा उल्लेख आला असल्याने कथा अश्विन महिन्याच्या प्रारंभी सुरू झालेले दिसते. पहिल्या अंकाची सुरुवात सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास झाली आहे. पहिल्या व दुसऱ्या अंकाच्या दरम्यान सुमारे पंधरा दिवसाचे अंतर असावे असा तर्क होतो. कारण नायिकेची दृष्टिभेट झाल्यापासून

जीमूतवाहनाने अनेक रात्री झोपेवाचून तळमळत काढल्याचा उल्लेख 'नीता: किं न निशा:' (अंक २, श्लोक ३) या श्लोकात आलेला आहे. पण दुसऱ्या अंकाच्या प्रवेशकात मलयवती आपल्या भावाची वाट पाहात असल्यांचा उल्लेख आहे, तो कोड्यात टाकणारा आहे. यावरून मित्रावसूने प्रथम जीमूतवाहनाची भेट घेण्याचें ठरविलेले असावे. त्यासाठी मलयपर्वतात तो त्याचा शोध घेत आहे.

तिसऱ्या अंकास सुरुवात होण्याच्या अगोदरच मलयवतीचा विवाह झालेला आहे. तिसऱ्या व चौथ्या अंकाच्या दरम्यान दहा दिवसांचा काळ लोटलेला आहे. कारण चौथ्या अंकाच्या विष्कंभकात विवाहापासून दहा रात्रीच्या आत नवरानवरीसाठी लाल वस्त्रांची जोडी पाठविल्याचा उल्लेख आहे. हा आहेर दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने केलेला दिसतो. चौथ्या व पाचव्या अंकातल्या घटना लागोपाठ घडलेल्या आहेत. तेव्हा नाटकाचा कालावधी जास्तीत जास्त तीन आठवड्यांचा आहे. मलयवतीचा विवाह अश्विन वद्य पंचमीस झालेला असावा.

स्वभाव चित्रांचा विचार करता जीमूतवाहनाचे चित्रण प्रभावी वठलेले आहे. हा विद्याधर राजपुत्र तरुण सुंदर आहे. तो सुशिक्षित व विनम्र आहे. स्वभावतःच विरक्त आहे. त्याची माता-पित्यावरील श्रद्धा व आत्मसर्मपण करण्याची तयारी या दोन गोष्टी प्रकर्षाने दिसून येतात. तो रसिक तसेच मधुर भाषण करण्यात प्रवीण आहे. त्याला राज्यकारभाराची हौस नाही. शत्रूने राज्य जिंकून घेतले तरी फिकीर नाही. त्याच्या अंतःकरणात सर्व प्राणिमात्राविषयी दया आहे. खरे तर याची संतातच गणना करावयास हवी. या संदर्भात पुढील सुभाषित त्यास लागू होणारे आहे.

"न त्वहं कामये राज्यं न स्वर्ग नापुनर्भवम् ।
कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम् ॥"

नायकाच्या मानाने इतरांची चित्रे साधारण उतरली आहेत. नायिका मलयवती ही विश्वावसू या सिद्धराजाची कन्या आहे. ती अतिशय सुंदर असून गौरीची निस्सीम उपासिका आहे. तिचे नायकावर निस्सीम प्रेम आहे. तो मरणाच्या दारी पडलेला दिसताच ती अग्निप्रवेश करण्याचे ठरवते. तथापि तिच्या स्वभावाचे कोणतेही वैशिष्ट्य दिसून येत नाही. शंखचूडाचे चित्रण थोडक्यात पण चांगले उतरले आहे. तो साधा नागयुवक असून वासुकीच्या आदेशानुसार वध्यशिलेसमीप आलेला आहे. त्याला मृत्यूचे भय वाटत नाही. जीमूतवाहन त्याच्यासाठी प्राणार्पण करण्यास तयार होताच तो त्यास विरोध करतो. त्याला

आपल्या शंखपाळ कुळाचा अभिमान आहे. त्याची आपल्या आईवर श्रद्धा आहे. आपल्या मृत्यूनंतर आपल्या मातेची काळजी घेण्याची तो जीमूतवाहनास विनंती करतो. तो ऐनवेळी मंदिर प्रदक्षिणेसाठी का जातो हे समजत नाही. गरुडाने नागाऐवजी विद्याधर युवकाची हत्या केली आहे हे गरुडाच्या तोच ध्यानी आणून देतो.

विदूषक आत्रेयाचे चित्रण सामान्यच आहे. खरे तर कथेच्या संदर्भात आत्रेयास फारच थोडा अवकाश मिळालेला आहे. तो इतर विदूषकांसारखाच कुरूप आहे. तसेच ब्राह्मण असून अडाणी आहे. विट आणि चेटी त्याची हवी तशी थट्टा करतात. तो खादाडही आहे. तथापी तो शहाणा आहे. मित्रावसूला तो जीमूतवाहनाच्या माता-पित्याची भेट घेण्याचा सल्ला देतो. शेवटच्या दोन अंकात त्यास मुळीच वाव नाही.

नाटकात नायकाचे बलिदान असूनही नागानंद ही शोकात्मिका होऊ शकली नाही. कारण जीमूतवाहनाच्या बलिदानास कोणतेही तात्त्विक अधिष्ठान नाही. गरुड व नाग यांच्यातील पिढीजात वैराचा कोणता अर्थ नाटककारास अभिप्रेत आहे हे स्पष्ट नाही. त्याने केवळ भूतदयेने प्रेरित होऊन आत्मबलिदान केले असल्याने यात कारुण्यापलीकडे काहीच हाताला लागत नाही.

नाटकाचा शेवट परंपरेला धरून आनंददायक दाखविला आहे. पण हे पर्यवसान स्वाभाविक वाटत नाही. त्यासाठी नाटककारास अद्‌भूताची कास धरावी लागली आहे. त्यामुळे कथानकातील चैतन्य नाहीसे होऊन त्याला परिकथेचे स्वरूप आले आहे. 'नागानंद' ही महान कलाकृती न ठरण्यामागचे हे महत्त्वाचे कारण असावे, असे मला तरी वाटते.

* * *

श्री हर्षाची नाट्यसंपदा मोठी नाही. तिच्यात विविधता तर मुळीच नाही. त्याच्या पहिल्या दोन नाटिका रंजनप्रधान आहेत. 'नागानंद' हे नाटक मात्र चाकोरीबाहेरचे आहे. त्यावर नाटककाराच्या बौद्धमताची छाप आहे. त्याच्या तीनही नाटकांचा साकल्याने विचार करता त्याची काही वैशिष्ट्ये ध्यानात येतात.

तो कालिदास, शूद्रक अथवा भवभूती यांच्या तोडीचा नाटककार नाही. त्याची नाटके 'स्वतंत्र' नाहीत. त्याने कथा-विषयच उसने घेतले नाहीत तर प्रसंगांची जुळवाजुळव, मांडणी, कल्पना यांचीही उसनवारी केली आहे. भास

व कालिदास यांच्या नाटकातून केलेल्या उसनवारीला अक्षरश: सीमा नाही. 'मालविकाग्निमित्र' व 'स्वप्नवासवदत्त' नाटकातील प्रसंगांची फिरवा-फिरव करूनच त्याने प्रियदर्शिका व रत्नावली यांची रचना केलेली स्पष्ट दिसून येते.

असे असले तरी कवी म्हणून त्याच्याजवळ उत्कृष्ट गुण आहेत. त्याची भाषा सोपी, लालित्यपूर्ण व रसाळ आहे. श्लोकरचनाही प्रासादिक आहे. वर्णने नीट-नेटकी आहेत. संवाद सुबोध व चटकदार आहेत. मात्र त्याला स्वभावचित्रणाची कला अवगत नाही. प्रियदर्शिका, रत्नावली किंवा मलयवती या नायिकांची चित्रणे अत्यंत सपक आहेत. राणी वासवदत्तेने केलेला विरोधही बेतास बात आहे. इरावतीने केलेल्या सणसणीत विरोधाची त्यात मौज नाही.

त्याचे दोन्ही उदयन नेभळट आहेत. ते अग्निमित्राचे भाऊ शोभण्यासारखे आहेत. पण जीमूतवाहन मात्र एकदम वेगळा आहे. त्याला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तीनही नाटकातले विदूषक कुरूप, खादाड व अजागळ आहेत. त्यातल्या त्यात नागानंदातील आत्रेय हा थोडा शहाणा व प्रसंगावधानी आहे. त्याच्या संपूर्ण पात्रसृष्टीत एकही पात्र मनावर ठसण्यासारखे नाही.

श्रीहर्षाला कथानकाची बांधेसूद रचना करणे साधत नाही. कथावस्तूतील ठळक दोषांची चर्चा त्या त्या नाटकाच्या विवेचनात केलेली आहे. विशेष म्हणजे नाटकाचे पर्यवसान करताना त्यास अद्भुताचा आश्रय करावा लागला आहे. रत्नावलीत ऐंद्रजालिकाने कृत्रिम आग लावली आहे, तर नागानंदात साक्षात गौरी प्रसन्न होऊन तिने जीमूतवाहनास जिवंत केले आहे. त्यामुळे सामान्य वाचक प्रेक्षकांना मौज वाटली तरी रसिकांचा विरस होतो, हे विसरून चालणार नाही. सारांश, श्रीहर्ष चांगला नाटककार असला तरी मोठा नाटककार नाही. दुसऱ्या श्रेणीतील नाटककार म्हणूनच त्याची ओळख करून देणे योग्य होईल.

# शूद्रक

शूद्रकाने रचलेल्या 'मृच्छकटिक' नाटकाची प्रस्तावना मोठी विस्मयजनक आहे. ती दुसऱ्या कोणी तरी प्रयोगाच्या वेळी तयार केल्यासारखी वाटते. तिच्यात शूद्रकाविषयीची हकीकत तीन श्लोकांत दिली आहे. ती हकीकत थोडक्यात अशी : शूद्रक राजाची चालण्याची ढब हत्तीसारखी डौलदार होती. डोळे चकोराप्रमाणे असून चेहरा पूर्णचंद्राप्रमाणे होता. तो विद्वान व कवित्वसंपन्न होता. अश्वमेध यज्ञ करून त्याने आपल्या पुत्रास गादीवर बसवले होते. त्याला युद्धाची आवड होती. वेदविद्येची माहिती होती. अशा या शूद्रक राजाने शंभर वर्षे व दहा दिवस इतके आयुष्य भोगून अग्नीत प्रवेश केला. त्यानेच या मृच्छकटिकाची रचना केली इ.

या आश्चर्यकारक वृत्तांतामुळे या नाटकाचा कर्ता कोण आहे व तो केव्हा होऊन गेला, या बाबतीत अभ्यासकांनी अनेक उपपत्ती सुचविल्या आहेत. त्यांपैकी काही उपपत्ती याप्रमाणे -

१) स्कंदपुराणातील कुमारिका खंडात 'कलियुगाची ३२९० वर्षे उलटल्यावर शूद्रक हा राजा होईल' असे म्हटले आहे. त्यानुसार शूद्रक हा इ.स.१९० मध्ये होऊन गेला. कर्नल विल्फोर्ड यांनी या पुराणाच्या आधारे सातवाहनाचा संस्थापक शिमुख हाच शूद्रक आहे असे म्हटले आहे. परंतु हे मत टिकणारे नाही. शूद्रक राजा हा विक्रमादित्याच्या अगोदर सत्तावीस वर्षे होऊन गेला, असे याच पुराणात म्हटले आहे. शिवाय सातवाहनाच्या सत्तेस इ.स.पूर्व २३० मध्ये प्रारंभ झाला आहे व त्यांचा संस्थापक शिमुख अथवा सिंधुक नसून सातवाहन हाच होता.

२) भागवत पुराणात एक शूद्र काण्व राजा सुशर्मा यास ठार मारून पृथ्वीचा भोग घेईल, असा उल्लेख आहे. याच्या आधारे डॉ. रामकृष्ण पंत भांडारकरांनी आंध्रभृत्य शूद्रक राजा इ.स. पूर्व ७३ मध्ये होऊन गेला. असा तर्क केला आहे. पण हे मत कालबाह्य ठरले आहे. सुशर्म्याचा वध इ.स.पूर्व २७ च्या सुमारास झाला आहे आणि सातवाहनाच्या सत्तेस यापूर्वीच प्रारंभ झाला आहे.

३) शूद्रक राजा म्हणजे विक्रमसंवताची स्थापना करणारा उज्जयिनीचा राजा विक्रमादित्य हाच होय, असे एक मत आहे. या मतास थोडासा आधार आहे. दंडीच्या नावावर असलेल्या 'अवंतिसुंदरीकथा' नामक पुस्तकात शूद्रक राजाचे चरित्र आले आहे. कित्येकांच्या मते मृच्छकटिक नाटकातील हकीकत शूद्रकाच्या पूर्वायुष्यातील आहे. यातील बंधुदत्त म्हणजे चारुदत्त असून अखेरीस राजा झालेला आर्यक म्हणजे स्वत: शूद्रकच होय. पण अवंतिसुंदरीकथेतील हकीकत विश्वसनीय नाही. शिवाय स्कंद पुराणाच्या साक्षीवरून शूद्रक व विक्रमादित्य या स्वतंत्र व्यक्ती होत्या त्यामुळे हे मत सोडून द्यावे लागते.

४) प्रो. स्टेन कोनो यांनी इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात होऊन गेलेला आभीर राजपुत्र शिवदत्त (इ.स.२४८-४९) म्हणजे शूद्रक होय असे म्हटले आहे. शिवदत्त अथवा त्याचा पुत्र ईश्वरसेन यांनी आंध्रांचा पाडाव करून चेदिवंशाची स्थापन केली. ही क्रांती मृच्छकटिक नाटकात दर्शविलेली आहे. उज्जयिनीचा राजा प्रद्योत यास गोपाल व पालक अशी दोन मुले होती. मृच्छकटिकात पालक राजास ज्या आर्यकाने हाकून लावले तो गोपालदारक - म्ह. गवळी होता असे म्हटले आहे. डॉ. गो. के. भटांच्या मते तो गोपालाचा मुलगा असावा. मृच्छकटिकात वर्णन केलेली राज्यक्रांती ही चुलता व पुतण्या यांच्यातील वैराची परिणती असावी. आभीरकालीन क्रांती ही इ.स.च्या तिसऱ्या शतकात झाली. प्रो. कोनो यांनी मृच्छकटिकाची भाषा, धार्मिक परिस्थिती ही ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकातली आहे, असे म्हटले आहे. यावरून त्यांच्या मते शूद्रक हा तिसऱ्या शतकात होऊन गेला.

परंतु नाटकातील एकंदर वातावरण पाहता ते उत्तरकालीन असावे. बाणभट्टाने या नाटकाचा उल्लेख केला नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. आता मृच्छकटिकातील क्रांतीची कल्पना शूद्रकास आभीर कालीन राज्यक्रांतीवरून सुचली असावी, हे म्हणणे मान्य होण्यासारखे आहे.

५) प्रो. पिशेल व डॉ. मॅक्डोनेल यांच्या मते मृच्छकटिकाचा कर्ता दंडी हाच होय. दशकुमारचरित व मृच्छकटिक या दोन्हीत कल्पना व विचार यांचे विलक्षण साम्य आहे. 'लिम्पतीव तमोऽङ्गानि' (मृच्छ १.३४) हा श्लोक काव्यादर्शात आला आहे. या नाटकाची रचना करणारा लेखक हा राजा नसून सामान्य कवी होता व तो दाक्षिणात्य होता. तो दाक्षिणात्य असल्याचे अनेक निर्देश नाटकात आढळतात. विंध्यवासिनी दुर्गादेवीस सह्यवासिनी म्हणणे, चंदनकाने सांगितलेली दाक्षिणात्य लोकांची वैशिष्ट्ये, 'कर्णाट कलह,' खुण्टमोडक, वरंडलम्बुक या शब्दांची योजना इ. दंडी हा कांचीचा पल्लव राजा दुसरा नरसिंहवर्मा याच्या पदरी होता. हा राजा इ.स. ६९५ ते ७२२ च्या दरम्यान होऊन गेला. यावरून मृच्छकटिकाचा काळ इ.स. च्या सातव्या शतकाची अखेर इतका ठरतो. प्राचार्य र. दा. करमरकरांनी हे मत उचलून धरले आहे.

हे मत महत्त्वपूर्ण असले तरी स्वीकारणीय वाटत नाही. एक तर दंडीसारखा प्रतिभासंपन्न कवी व साहित्यमीमांसक आपले नाटक शूद्रक राजाच्या नावाने प्रसिद्ध करील, ही कल्पना संभाव्य वाटत नाही. दुसरे म्हणजे भासाच्या 'चारुदत्ता'शी तुलना करता मृच्छकटिकाची परपुष्टता जाणवते. तेव्हा जुन्या नाटकाच्या आधारे तो नाटक लिहील हेही शक्य वाटत नाही.

६) डॉ. सालेतोर यांच्या मते शूद्रक म्हणजे गंग घराण्यातील भू-विक्रम राजाचा धाकटा भाऊ पहिला शिवमार हा होय. हा इ.स. ६७० ते ७२५ च्या दरम्यान होऊन गेला. नाटकाच्या प्रस्तावनेतील शूद्रकाविषयीची माहिती या शिवमार राजाला पुष्कळ अंशी लागू पडते, असे सालेतोर यांनी म्हटले आहे. ते सांगतात की शिवमार व श्रीपुरुष या दोघांनी मिळून मृच्छकटिकाची रचना केली आहे.

अखेरच्या दोन मतांवरून मृच्छकटिकाची रचना इसवी सनाच्या सहाव्या-सातव्या शतकात झाली असावी, असा तर्क प्रस्तुत होतो. भाषेवरून तर हा तर्क अधिकच दृढ होतो. वसंतसेनेच्या वाड्यातील सात चौकांचे वर्णन, पाचव्या अंकातील पावसाचे वर्णन करताना वसंतसेना, चारुदत्त व विट यांनी सोडलेल्या श्लोकांच्या माळा, चारुदत्ताचे दारिद्र्यावरील चऱ्हाट, शर्विलकाने चोरी करण्यापूर्वी केलेले स्कंदादी देवतांचे स्मरण, तसेच त्याने केलेली अनावश्यक स्त्रीनिंदा वगैरेचा विचार केला असता सहजच कादंबरी, हर्षचरित, सुबंधूचा 'वासवदत्ता' हा ग्रंथ, भवभूतीचे मालती-माधव यासारख्या अवास्तव वर्णनांनी

भरलेल्या ग्रंथांची आठवण येते. भास आणि कालिदास यांच्या नाटकाशी तुलना करता मृच्छकटिक किती तरी उत्तरकालीन वाटते. सारांश शूद्रकाचा काळ इसवी सनाच्या सातव्या शतकाचा उत्तरार्ध इतका असावा, असे माझे मत आहे.

शूद्रकाच्या नावावर मृच्छकटिकाखेरीज 'पद्मप्राभृतक' व 'वत्सराजचरित' अशी दोन पुस्तके आढळतात. काहींच्या मते 'कामदत्त' हेही पुस्तक त्यांचेच असावे. यातील 'पद्मप्राभृतक' हे अठ्ठावीस पानांचे प्रहसन आहे. 'मृच्छकटिका'शी तुलना करता ते पुष्कळच खालच्या दर्जाचे वाटते. तेव्हा 'मृच्छकटिक' हे त्याचे खरे नाटक मानण्यास हरकत नाही.

* * *

वसंतसेना ही उज्जयिनी नगरीतील अत्यंत रूपसंपन्न व कलाचतुर अशी गणिका आहे. ती मदन महोत्सवाच्या वेळी काममंदिरात आलेल्या चारुदत्त नामक पुरुषावर प्रथमदर्शनीच अनुरक्त झालेली आहे. चारुदत्त हा मूळचा श्रीमंत व्यापारी होता. ह्याचा आजा विनयदत्त व पिता सागरदत्त यांनी व्यापार-उदीम करून गडगंज संपत्ती संपादन केली होती परंतु चारुदत्ताच्या उदार स्वभावामुळे व त्याने विहार, आराम, देवालये यांना देणग्या दिल्यामुळे त्याची संपत्ती संपुष्टात आली होती.

एका संध्याकाळी वसंतसेना नटून थटून रस्त्याने जात असता राजाचा मेहुणा शकार हा आपल्या साथीदारासह तिचा पाठलाग करू लागतो. शकाराचे नोकर विट व चेट तिचे मन वळविण्याचे प्रयत्न करू लागतात. शकाराच्या बोलण्यावरून वसंतसेनेला चारुदत्ताचे घर जवळच असल्याचे समजते व ती त्या दिशेने झपाट्याने जाऊ लागते.

तिच्या सुदैवाने चारुदत्ताच्या घराचे दार उघडते. चारुदत्ताची दासी रदनिका व विदूषक मैत्रेय हे चौकात बळी ठेवण्यासाठी येतात. त्यांच्या हातातील दिव्यावर फुंकर घालून वसंतसेना दारातून आत शिरते. शकार दाराजवळ येतो व रदनिकेलाच वसंतसेना म्हणून पकडतो. ती ओरडताच विदूषक त्याच्या अंगावर दांडके घेऊन धावतो. ती वसंतसेना नाही हे समजताच शकार खजील होतो. तो चरफडत निघून जातो. जाताना तो चारुदत्तावर याचा सूड उगवण्याची धमकी देतो.

इकडे वसंतसेना घरात चारुदत्तासमोर येते. अंधारात तिला रदनिका समजून चारुदत्त आपला शेला तिच्या अंगावर टाकतो. त्यानंतर त्याला तिची ओळख

पटते. तो चकित होतो. मग वसंतसेना त्यास सांगते की तिच्या अंगावर मौल्यवान दागिने असल्याने तिला त्रास देण्यात येतो. म्हणून ती आपले दागिने चारुदत्ताजवळ ठेव म्हणून ठेवते. तिला घरी पोहचविणे भाग होते. चारुदत्त मग स्वतःच बाहेर पडतो. बाहेर चंद्राचा स्वच्छ प्रकाश पडलेला असतो. या प्रथमभेटीने उभयतांची प्रीती वाढीला लागते. (अंक पहिला)

वसंतसेनेसारखी तरुण सुस्वरूप गणिका एखाद्या धनाढ्य पुरुषाला गाठण्याऐवजी दरिद्री झालेल्या चारुदत्तावर भाळलेली पाहून तिच्या दासीलाही नवल वाटते. त्याच वेळी तेथे संवाहक नावाचा जुगारी येतो. तो पूर्वी चारुदत्ताकडे संवाहक म्हणून काम करीत होता. परंतु चारुदत्ताला दारिद्र्य आल्यावर संवाहकाने त्याची नोकरी सोडली. त्यानंतर तो जुगार खेळू लागला. त्या दिवशी जुगारात तो दहा मोहरा हरला होता. त्या मोहरांसाठी त्याने माथुर व द्युतकर या दोन जुगाऱ्यांकडून मारही खाल्ला होता. असा तो जुगारी आश्रयासाठी वसंतसेनेच्या घरात आला होता.

वसंतसेना त्याची चौकशी करते. तो आर्य चारुदत्ताकडे संवाहनाचे काम करीत होता हे समजल्यावर ती त्याला आसन देते. दासीला त्यास वारा घालण्यास सांगते. चारुदत्ताचे नुसते नाव सांगितल्यावर आपला एवढा आदर झाल्याचे पाहून संवाहकास आश्चर्य वाटते. मग वसंतसेना चेटीला आपले सुवर्णकंकण देऊन जुगाऱ्याचे देणे देऊन टाकण्यास सांगते. त्याप्रमाणे चेटी रस्त्यात उभ्या असलेल्या माथुराला बोलावून ती संवाहकास ऋणमुक्त करते.

संवाहक तिच्या औदार्याने भारावून जातो. तो इतःपर जुगार खेळण्याचे सोडून संन्यासी व्हायचे ठरवतो. तसेच वसंतसेनेने जो आपल्यावर उपकार केलेला आहे, त्याची परतफेड करण्याचा मनोमन निश्चय करतो. तो तिच्या घरातून बाहेर पडून रस्त्यावर येतो. संन्याची वस्त्रे धारण करतो. इतक्यात वसंतसेनेचा खुंटमोडक नावाचा हत्ती साखळ्या तोडून रस्त्यावर येतो व नुकताच यतिवेश धारण केलेल्या संवाहकाला सोंडेत धरून वर उचलतो. सर्वत्र गोंधळ, आरडाओरडा सुरू होतो.

एवढ्यात वसंतसेनेचाच कर्णपूरक नावाचा सेवक पुढे येतो व लोखंडी पहारीच्या मदतीने हत्तीला रोखून संवाहकाची सुटका करतो. सर्वजण त्याचे अभिनंदन करतात. त्या गर्दीत चारुदत्तही उभा असतो. तो कर्णपूरकास काही पारितोषिक द्यावे म्हणून आपले कान, गळा, मनगट इत्यादी स्थाने चाचपतो

परंतु भूषणे घालण्याची सर्व स्थाने रिकामी आढळताच हताश होतो. मग तो आपल्या अंगावरील सुगंधी शेलाच कर्णपूरकास बक्षीस देतो.

कर्णपूरक वसंतसेनेकडे येऊन आपला पराक्रम सांगतो. चारुदत्ताचा शेला पाहून ती आनंदित होते. ती तो शेला त्याच्याकडून मागून घेते. त्या शेल्याच्या मोबदल्यात ती त्यास सुवर्णालंकार देते. पहिल्या अंकात चारुदत्ताने तिच्या अंगावर टाकलेला सुंगधी शेला तो हाच होता. चारुदत्त ज्या रस्त्याने गेला त्या मार्गावर त्याला पाहण्यासाठी ती गच्चीवर जाते. (अंक दुसरा)

वसंतसेनेकडे मदनिका नावाची सुस्वरूप दासी असते. तिचे मन शर्विलक नावाच्या तरुणावर जडले होते. तो राजाविरुद्ध गुप्तपणे चळवळ करणारा क्रांतिकारक होता. त्याला आपल्या प्रेयसीला दास्यातून मुक्त करण्याची इच्छा असते पण त्यासाठी लागणारे द्रव्य जवळ नसते. आपल्या प्रेमासाठी तो चोरीचे साहस करतो.

वसंतसेनेने चारुदत्ताजवळ आपले दागिने ठेव म्हणून ठेवलेले असतात. त्यानंतर एक दोन दिवसात चारुदत्त व मैत्रेय विदूषक हे दोघे रेभिल नामक गवयाचे गाणे ऐकून मध्यरात्री परत येतात व गाढ झोपी जातात. त्या वेळी भिंतीला भगदाड पाडून चोर आत शिरतो. वसंतसेनेचे दागिने चारुदत्ताने विदूषकाकडे सांभाळण्यासाठी दिलेले असतात. शर्विलक जवळ येताच विदूषक झोपेत बरळतो व चोराला चारुदत्त समजून दागिन्याचे भांडे त्याच्याकडे देतो. शर्विलकाचे काम साधते व तो पळून जातो.

तो गेल्यावर रदनिका जागी होते. तिचे ओरडणे ऐकून सर्व जण जागे होतात. चारुदत्ताला वसंतसेनेचे दागिने चोरीला गेल्याचे समजताच तो व्याकुळ होतो. तो भिक्षा मागून वसंतसेनेच्या दागिन्यांची भरपाई करण्याचा निर्धार करतो. परंतु त्याची पत्नी धूता ही आपल्याजवळील रत्नजडित कंठा चारुदत्तास देते. आपल्या बायकोने या वेळी आपल्याला मदत केलेली पाहून चारुदत्ताचे हृदय भरून येते.

दुसऱ्या दिवशी तो कंठा विदूषकाच्या हाती देऊन चारुदत्त त्याला वसंतसेनेच्या घरी पाठवतो व निरोप देतो - "तू जे अलंकार माझ्याजवळ ठेव म्हणून ठेवलेले होतेस ते मी द्यूतात गमावले आहेत. त्यांच्या बदल्यात ही रत्नमाला पाठवलेली आहे. तिचा तू स्वीकार कर." विदूषक तो कंठा घेऊन जाण्याचे कबूल करतो. (अंक तिसरा)

वसंतसेना चारुदत्ताचे चित्र रेखाटून त्याकडे पाहाण्यात तल्लीन झालेली आहे. शेजारी मदनिका बसलेली आहे. इतक्यात एक दासी येऊन निरोप सांगते की राजश्यालक शकाराने पालखी पाठवून तिला बोलावलेले आहे. आईकडून असा निरोप येताच वसंतसेना स्पष्टपणे आईला निरोप सांगते - ''मी जिवंत राहावे अशी तुझी इच्छा असेल तर पुन्हा मला असला निरोप कळवू नकोस.''

मग शर्विलक वसंतसेनेच्या घरी येतो. वसंतसेना मदनिकेला चारुदत्ताची तसबीर आपल्या शय्यागृहात ठेवून तेथील पंखा आणण्यास सांगते. शर्विलक दारात येताच समोरच त्याला मदनिका भेटते. दोघांचे संभाषण सुरू होते. उभयतांचे बोलणे सहजगत्या वसंतसेनेच्या कानावर पडते. शर्विलक आपण प्रेमासाठी चोरी करण्याचे साहस केल्याचे सांगतो. शर्विलकाने चारुदत्ताच्या घरातून दागिने चोरल्याचे समजताच वसंतसेना व मदनिका दोघी घाबरतात. मदनिका आपल्या मालकिणीचे दागिने ओळखते. वसंतसेनेने हे दागिने आपल्या प्रियकराच्या घरी प्रेमाची खूण म्हणून ठेवले असल्याचे सांगते. शर्विलकापुढे पेचप्रसंग उभा रहातो.

या प्रसंगावर मदनिकाच तोड काढते. हे दागिने चारुदत्तानेच वसंतसेनेकडे शर्विलकामार्फत पाठविले आहेत, असे वसंतसेनेला शर्विलकाने सांगायचे. यामुळे तीन गोष्टी साधणार होत्या. चोरीच्या आरोपातून शर्विलक सुटणार होता. चारुदत्तावर दागिने चोरीस गेलेल्यामुळे उद्‌भवणाऱ्या संकटाचा परिहार होणार होता व वसंतसेनेला तिचे दागिने परत मिळणार होते. मदनिकेचा उपाय ऐकून वसंतसेनाही तिची प्रशंसा करते.

मग मदनिका शर्विलकास घेऊन वसंतसेनेकडे जाते. शर्विलक चारुदत्ताचा म्हणून निरोप सांगतो की 'आपले घर जुनाट आहे त्यामुळे दागिन्यांचे रक्षण करणे अवघड जाते. सबब हे परत पाठविले आहेत.' वसंतसेनेला सर्व हकीकत अगोदरच समजली असल्याने ती मदनिकेला दास्यातून मुक्त करते व शर्विलकास तिचा स्वीकार करण्यास सांगते. शर्विलक तिला घेऊन बाहेर पडतो.

इतक्यात त्याच्या कानावर दवंडीचे शब्द पडतात 'आर्यक नावाचा गोपालाचा पुत्र हा राजा होणार असे भविष्य ज्योतिषांनी वर्तवले असल्याने पालक राजाने त्यास कैदेत घातलेले आहे.' शर्विलक हा आर्यकाचा मित्र होता. तेव्हा तो मित्राच्या मदतीला जाण्याचे ठरवितो. तो मदनिकेला चेटामार्फत रेभिलाच्या निवासस्थानाकडे पाठवून देतो.

यानंतर चारुदत्ताकडून रत्नमाला घेऊन विदूषक मैत्रेय वसंतसेनेच्या घरी येतो. वसंतसेना त्यास चारुदत्ताचे कुशल विचारते. तो चारुदत्ताचा निरोप सांगतो. 'वसंतसेनेने जे अलंकार त्याच्याकडे ठेव म्हणून ठेवायला दिले होते, ते त्याने द्यूतामध्ये गमावले असून त्यांची भरपाई करण्यासाठी ही रत्नमाला पाठवून दिली आहे. तिचा स्वीकार करावा.'

दागिने चोराने पळवले असूनसुद्धा चारुदत्त ते आपण द्यूतात गमावले असे सांगतो व त्यांची भरपाई बहुमोल रत्नमाला पाठवून करतो. यावरून वसंतसेनेला त्याच्या थोर अंत:करणाची साक्ष पटते. ती चारुदत्ताने पाठवलेली रत्नमाला ठेवून घेते व सायंकाळी आपण त्यास भेटण्यास येणार आहे, असा निरोप देण्यास सांगते.

भोळ्या मैत्रेयाला तिच्या प्रेमाची कल्पना येत नाही. वसंतसेनेने आपल्याला काही फराळ दिला नाही म्हणून तो रुष्ट झाला आहे. तशात तिने रत्नमाला काही संकोच न करता खुशाल ठेवून घेतली हे पाहून ती अत्यंत लोभी आहे असे त्याला वाटते. तशात ती संध्याकाळी पुन्हा चारुदत्ताला भेटायला येणार आहे. ती बहुधा अधिक द्रव्य मागण्यासाठी येणार असे त्यास वाटते. तो निघून जातो.

वसंतसेना व तिची दासी चारुदत्ताला भेटायला जावयाचे ठरवतात. चेटी वादळी पाऊस होण्याची शक्यता वर्तवते तेव्हा वसंतसेना म्हणते :-

"आकाशात मेघ गोळा होऊ देत. रात्र पडू दे. सतत पाऊस कोसळू दे. माझे मन प्रियकराकडे ओढ घेत असल्याने मी त्यांची पर्वा करीत नाही."

(अंक ४ श्लोक ३३)

पाचव्या अंकाच्या प्रारंभी चारुदत्त घरासमोरच्या अंगणात बसलेला आहे. सायंकाळची वेळ आहे. अजून पावसाला सुरुवात झालेली नाही. पण तो केव्हा कोसळेल याचा नेम नाही. चारुदत्त वसंतसेनेकडे गेलेल्या मैत्रेयाची वाट पाहात आहे. तोच मैत्रेय येतो. तो सांगतो की, वसंतसेनेने रत्नमालेचा स्वीकार केलेला असून ती त्याला स्वत: भेटायला येणार आहे.

वसंतसेना अभिसारिकेच्या वेशात चारुदत्ताकडे यावयास निघालेली आहे. तिने रत्नमाला व दागिने बरोबर घेतलेले आहेत. आकाशात ढग गडगडत आहेत. थोड्याच वेळात पावसाला सुरुवात होते. तिच्या सोबत छत्र धारण केलेला विट आहे. वसंतसेना येताच मैत्रेय तिचे स्वागत करतो. चारुदत्त तिला पाहतो. तिची वस्त्रे भिजलेली दिसताच तो घरातून कोरडी वस्त्रे आणून देण्यास सांगतो.

मग मैत्रेय वसंतसेनेच्या दासीला या पावसाळी वातावरणात येण्याचे प्रयोजन विचारतो. तेव्हा ती सांगते की, आपण दिलेली रत्नमाला तिच्या मालकिणीने आपलीच आहे असे समजून जुगारात घालवली. तिची किंमत काय आहे, हे विचारण्यासाठी ती आलेली आहे. नंतर ती अलंकार दाखवते. सर्वजण चकित होतात.

मग वसंतसेना चारुदत्तास म्हणते की, "आपण रत्नमाला पाठवून माझ्या प्रेमाची परीक्षा केलीत काय?" अर्थात चारुदत्ताचे करणेही योग्यच होते, नाही तर दागिने चोरीला गेले या गोष्टीवर कोणाचा विश्वास बसला असता? दोघांच्या मनातील गैरसमज दूर होतात. वसंतसेना त्याच्या बाहुपाशात शिरते. तिच्या स्पर्शाने आनंदित होऊन चारुदत्त म्हणतो -

"पावसाच्या धारांनी ज्यांची अंगे भिजली आहेत अशा स्त्रिया आपण होऊन ज्यांना आलिंगन देतात, ते पुरुष खरोखर भाग्यवंत आहेत."

(अंक ५ श्लोक ४९)

असे म्हणून तो तिला घेऊन आतल्या खोलीत जातो. (अंक पाचवा)

वसंतसेना अद्यापि निजलेली आहे. सकाळ झाली म्हणून चेटी तिला उठवते. चारुदत्त सकाळी लवकर उठून 'पुष्पकरंडक' नामक उद्यानात गेला आहे. वसंतसेना आपल्याबरोबर घेऊन आलेली रत्नमाला चारुदत्ताच्या पत्नीकडे आदरपूर्वक पाठवते. चारुदत्ताने वसंतसेनेसाठी गाडी पाठवलेली असते. त्याच वेळी चारुदत्ताचा चार-पाच वर्षांचा मुलगा आपल्याला मातीची गाडी नको, सोन्याची हवी म्हणून हट्ट करीत असतो. तेव्हा वसंतसेना अंगावरील अलंकार काढून त्याच्या गाडीत ठेवते व 'सोन्याच्या गाडीने खेळ' म्हणून सांगते.

गाडीत बसण्यासाठी ती बाहेर येते पण रस्त्यावरील रहदारीच्या गोंधळामुळे वसंतसेना चुकून दुसऱ्याच गाडीत बसते. ती गाडी शकाराची असते. त्याच वेळी तुरुंगातून निसटलेला आर्यक लपण्यासाठी चारुदत्ताच्या गाडीत शिरतो. वर्धमानास वसंतसेनाच गाडीत बसली आहे असे वाटते. आर्यक सुटल्याची वार्ता गावात पसरलेली असल्याने रक्षक गाड्यांची तपासणी करीत असतात. चंदनक हा चारुदत्ताच्या गाडीची तपासणी करतो. आर्यक दिसताच तो त्याला अभय देतो. दुसरा रक्षक वीरक यास संशय येतो. दोघांची भांडाभांडी होते. चंदनक वीरकाला ओढून खाली पाडतो. तसेच आर्यकाला तलवार भेट देतो. आर्यक गाडीतून पुढे निघून जातो. (अंक सहावा)

चारुदत्त व मैत्रेय पुष्पकरंडक उद्यानात वसंतसेनेची वाट पाहात बसलेले असतात. वर्धमानक गाडी घेऊन जीर्णोद्यानाजवळ येतो. पण गाडीतून वसंतसेना उतरण्याऐवजी आर्यक उतरतो व चारुदत्ताला शरण जातो. चारुदत्त त्याची प्रेमाने चौकशी करतो. तो आर्यक आहे असे समजताच चारुदत्त त्याच्या एका पायात शिल्लक असलेली बेडी काढण्यास सांगतो. त्याच्या जिवाला सांप्रत धोका आहे हे ओळखून त्याच गाडीतून त्याची सुरक्षित ठिकाणी रवानगी करतो. तो गेल्यावर वसंतसेना का आली नाही, अशी चिंता वाटू लागते. त्याच वेळी त्याचा डावा डोळा फडफडू लागतो. मग तो मैत्रेयास घेऊन उद्यानातून बाहेर पडतो. (अंक सातवा)

भिक्षु झालेला संवाहक आपली वस्त्रे धुण्यासाठी शकाराच्या उद्यानात येतो. इतक्यात राजश्यालक शकार त्या ठिकाणी येतो. तो आपल्या गाडीची वाट पाहतो. संवाहक तेथे दिसताच तो त्याला शिव्या देऊन व धक्के मारून हाकलून देतो. एका भिक्षूने पूर्वी काही आगळिक केली म्हणून शकाराचा भिक्षूवर राग आहे. शकाराची गाडी उद्यानाजवळ येते. तिच्यात वसंतसेना बसलेली असते. गाडीवानाचा आवाज ऐकल्याबरोबर तो वर्धमानक नाही हे तिला समजते व ती घाबरून जाते.

शकार वाहनाचे दार उघडतो आत कोणी तरी स्त्री दिसताच ती कोणी राक्षसी आहे असे वाटून तो घाबरून जातो. वसंतसेना शकाराच्या तावडीत सापडल्याचे पाहून विटाला वाईट वाटते. ती विटाला अभय मागते. विट शकाराला फसवून तिची सुटका करण्याचे ठरवतो. शकार वसंतसेनेचा अनुनय करू लागतो. त्याला पाहताच तिचे पित्त खवळते. ती त्याला लाथेने ठोकरते. शकार चिडतो. तो विटाला वसंतसेनेस ठार मारण्यास सांगतो. पण विट व चेट दोघेही ही गोष्ट साफ नाकारतात. मग तो युक्तीने त्या दोघांना उद्यानाच्या बाहेर घालवतो व ते गेल्यावर वसंतसेनेचा गळा दाबतो. ती बेशुद्ध पडते. ती मरण पावली असे समजून तो तिच्या अंगावर पालापाचोळा पसरतो.

वसंतसेनेच्या हत्येचा आरोप दरिद्री चारुदत्तावर करण्याची त्यास कल्पना सुचते. त्याप्रमाणे तक्रार नोंदवण्यासाठी तो निघून जातो. आपली वस्त्रे वाळविण्यासाठी भिक्षू त्या ठिकाणी येतो. ती पाणी मागते तेव्हा तो आपले ओले वस्त्र तिच्या तोंडावर पिळतो. मग ती वेलीला धरून कशीबशी उभी राहते. संवाहक तिला घेऊन बौद्धविहारात राहात असलेल्या बहिणीकडे जातो. (अंक आठवा)

चारुदत्तावर आरोप दाखल करण्यासाठी शकार न्यायालयात येतो. आपल्या बागेमध्ये कोणी तरी स्त्री मरून पडली असून कोणी तरी तिला धनाच्या लोभाने मारले असावे असे म्हणतो. अधिक चौकशी करता ती स्त्री वसंतसेना आहे असे समजते. मग वसंतसेनेच्या आईला साक्षीसाठी बोलावण्यात येते. ती आपली मुलगी चारुदत्ताच्या घरी गेली असल्याचे सांगते. त्यामुळे आपोआपच चारुदत्ताचे नाव खटल्यात गोवले जाते. न्यायाधीश चारुदत्ताला न्यायालयात हजर होण्यासाठी निरोप पाठवतो.

निरोप मिळताच चारुदत्त न्यायालयाकडे येऊ लागतो. त्याला वाटते आपण आर्यकाला आपल्या गाडीतून सुरक्षित स्थळी पाठवल्याचे पाहिल्यामुळे आपल्याला कचेरीत बोलावले असावे. येताना त्याचा डावा डोळा फडफडू लागतो. वाटेत साप पडलेला दिसतो. ही अशुभ चिन्हे पाहून तो कावराबावरा होतो. तो न्यायालयात येताच न्यायाधीश त्याला आसन देतो. शकार त्यास आक्षेप घेतो, पण गप्प बसतो. नंतर तो चारुदत्ताने दागिन्याच्या लोभाने वसंतसेनेला ठार मारले, असा स्पष्ट आरोप करतो. न्यायाधीश चारुदत्तास 'वसंतसेना कोठे आहे?' असे विचारतो तेव्हा तो 'ती घरी गेली' इतकेच सांगतो.

न्यायाधीशाला चारुदत्ताचे म्हणणे खरे वाटते, कारण त्याच्यासारखा चारित्र्यसंपन्न पुरुष असले कृत्य करणार नाही याची त्याला खात्री आहे. न्यायाधीशाचे बोलणे ऐकून शकार 'हे कामकाज पक्षपाताने करण्यात येत आहे.' असा स्पष्ट आरोप करतो. तेव्हा वसंतसेनेची आई म्हणते :-

''ज्याने आपल्याकडे ठेव म्हणून ठेवलेल्या अलंकाराची चोरी झाल्याबरोबर त्याच्या मोबदल्यात आपल्याकडील बहुमोल अशी रत्नमाला पाठवून दिली, तो धनाच्या लोभाने असे अकार्य कसे करील?''

(अंक ९ श्लोक २२ नंतरचे गद्य)

यानंतर वीरक हा नगररक्षक येतो त्याच्या सांगण्यावरून वसंतसेना चारुदत्ताच्या गाडीतून बागेत गेली होती हेच सिद्ध होते. तसेच वादळाने बागेतले झाड कोसळल्याने त्या खाली एक अज्ञात स्त्री मरण पावल्याचे वृत्तही संशयात भर घालते.

इकडे मैत्रेयाला चारुदत्तास न्यायालयात नेल्याचे समजते. तो बिचारा वसंतसेनेचे दागिने परत करण्यासाठी तिच्या घरीच निघालेला असतो. तो तसाच न्यायालयात येतो. शकाराने चारुदत्तावर निरर्गल आरोप केलेला समजताच त्याचे

पित्तच खवळते. तोही वसंतसेनेच्या आईप्रमाणे चारुदत्ताचे गुणगान करतो. 'ज्या चारुदत्ताने विहार, आराम, देवालये, तलाव, विहिरी यांची स्थापना करुन उज्जायिनी नगरी सुशोभित केली, तो असले दुष्कृत्य कसे करील?'

मग तो शकारावर तोंड टाकतो. त्यास 'उच्छृंखल', 'दागिन्याने सजलेले माकड', 'कुंटिणीचा पुत्र' अशा शिव्या मोजतो. इतकेच नव्हे तर त्याच्या डोक्यावर काठी मारण्यासाठी धावून जातो. दोघांची मारामारी जुंपते. त्या झटापटीत विदूषकाच्या काखोटीतले दागिने खाली पडतात. शकाराला आनंदाची उकळी फुटते. चारुदत्तावर आरोप शाबित होतो. वसंतसेनेची आई त्याची सुटका करण्याचा प्रयत्न करते पण तिच्याकडे कोणी लक्ष देत नाही. त्याला अटक करण्यात येते. त्याला शिक्षा देण्याचा अंतिम अधिकार पालक राजाकडे होता. अधिकरणिक 'चारुदत्तास फासावर देऊ नये. त्यास हद्दपार करावे' अशी शिफारस राजाकडे पाठवतो. पण राजाकडून 'अपराध्यास सुळावर चढवावे' असा निर्णय येतो. सर्वांचा नाइलाज होतो. तो घरी निरोप पाठवतो. फासावर देणाऱ्या चांडाळांना आदेश कळविण्यात येतो. जाताना चारुदत्त पालक राजास "तू पुत्रपौत्रासहित नरकात जाशील" असा तळतळून शाप देतो. (अंक नववा)

दहाव्या अंकाच्या सुरुवातीस चांडाळ चारुदत्ताच्या खांद्यावर वधस्तंभ देऊन त्यास शहरातून चालवत नेत असल्याचे दृश्य दिसते. चौकाचौकात दवंडी देण्यात येते. "सागरदत्ताचा पुत्र चारुदत्त याने शहरातील वसंतसेना नामक गणिकेस दागिन्याच्या लोभाने बाहुपाशात आवळून ठार मारले आहे. त्यामुळे पालकराजाने यास देहदंडाची शिक्षा दिली आहे. जो अशा प्रकारचे इहलोक-परलोकविरोधी कृत्य करेल त्यालाही असेच शासन होईल."

लोकांची गर्दी होते. नगरजन दुःखाने व्याकूळ होतात. त्या गर्दीत मैत्रेय चारुदत्ताच्या मुलाला घेऊन येतो. चारुदत्त मुलाला अखेरचे भेटतो व त्याला आपले यज्ञोपवित देतो. एका वाड्याच्या माडीवर स्थावरकाला स्थानबद्ध करून ठेवलेले असते. तो गच्चीवरून ओरडून लोकांना सांगतो की, वसंतसेनेला चारुदत्ताने मारले नसून शकाराने तिला मारले आहे. पण त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाही. मग तो गवाक्ष मार्गातून खाली रस्त्यात उडी मारतो. चांडाळांना थांबवून पुन्हा तेच सांगतो.

इतक्यात शकार तेथे प्रवेश करतो. नगाऱ्याचा आवाज ऐकल्यावरच त्याला चारुदत्तास सुळावर चढविण्यासाठी नेत असल्याचे समजले आहे. त्याला

अतिशय आनंद झालेला आहे. पण स्थावर व चेट आपले रहस्य उघड करतील अशी त्याला भीती वाटते व ती खरी ठरते. त्यांना सोन्याचे कडे देण्याचे तो प्रलोभन दाखवतो. पण त्याचाही उपयोग होत नाही. मैत्रेय रोहसेनाला घेऊन जातो. चारुदत्त धर्माचे व वसंतसेनेचे स्मरण करून मरायला तयार होतो.

मग स्वत: वसंतसेना व संवाहक भिक्षु त्या ठिकाणी येतात. जिच्या खुनाचा आरोप चारुदत्तावर होता ती वसंतसेनाच जिवंत असल्याने चारुदत्तावरील आरोप आपोआप दूर होतो. शकार घाबरून तेथून पळ काढतो. त्याला शोधण्यासाठी चांडाळही त्याच्या पाठोपाठ जातात. चारुदत्त भिक्षूला ओळखत नाही. तो आपण संवाहक असल्याची त्यास आठवण करून देतो.

पडद्यात गोंगाट होतो व शर्विलक एकाएकी प्रवेश करतो. तो सांगतो की दुष्ट पालकराजाचा वध करून आर्यकाची सिंहासनावर स्थापना करण्यात आली आहे व तो स्वत: चारुदत्ताची सुटका करण्यासाठी आलेला आहे. तो चारुदत्तास प्रणाम करतो. चारुदत्त शर्विलकास ओळखत नाही. तेव्हा शर्विलक आपणच त्याच्या घरी दागिन्यांची चोरी केल्याचे सांगतो. तसेच चारुदत्ताला कुशावतीचे राज्य देण्यात आल्याचे सांगतो. मग शकाराला पकडून आणण्यात येते. तो नाक मुठीत धरून चारुदत्ताला शरण येतो व त्याच्या पाया पडतो. वसंतसेना चारुदत्ताच्या गळ्यातील वध्यमाला शकाराच्या अंगावर फेकते पण चारुदत्त शकाराला क्षमा करतो.

एवढ्यात चारुदत्ताची पत्नी धूता ही अग्नीत प्रवेश करीत असल्याची वार्ता येते. तिला चारुदत्त सुटल्याची वार्ता कळलेली नाही. चारुदत्त धावतच त्या ठिकाणी जातो. तिच्याबरोबर मैत्रेयही प्राण देण्यास तयार झालेला आहे. चारुदत्ताला जिवंत पाहून सर्व जण चकित होतात. वसंतसेना व धूता एकमेकीस आलिंगन देतात. राजाकडून वसंतसेनेस वधूचा मान मिळतो. चारुदत्त तिचा स्वीकार करतो. (अंक दहावा)

* * *

या मुख्य संविधानकास राज्यक्रांतीच्या उपकथानकाची जोड दिलेली आहे. ते थोडक्यात याप्रमाणे : उज्जयिनीत त्या वेळी पालक नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला असे भविष्य समजते की आर्यक नावाचा एक गवळ्याचा मुलगा उज्जयिनीचा राजा होणार आहे. त्यामुळे पालक आर्यकास तुरुंगात टाकतो.

शर्विलक हा त्याचा मित्र असल्याने तो आर्यकास तुरुंगाच्या बाहेर पडण्यास मदत करतो.

आर्यक त्याच्या मदतीने तुरुंग फोडून बाहेर पडतो. ही बातमी फुटताच शहरात दवंडी पिटली जाते व रखवालदार गाड्यांची तपासणी करू लागतात. आर्यक बुरखा घेऊन रस्त्यावर येतो व चारुदत्ताच्या घरासमोर जी गाडी उभी असते तिच्यात बसतो. वास्तविक पाहता ती गाडी वसंतसेनेसाठी तयार केलेली असते. आर्यक त्या गाडीतून सरळ उद्यानात जातो व चारुदत्ताची भेट घेतो. मग चारुदत्त त्याची त्याच गाडीत सुरक्षित स्थळी रवानगी करतो.

नंतर पालकाला पदच्युत करण्याच्या कामात शर्विलकच पुढाकार घेतो. तो पालक राजास ठार मारून आर्यकाची गादीवर स्थापना करतो. चारुदत्ताने केलेल्या साहाय्याचे स्मरण ठेवून आर्यक त्यास कुशावतीचे राज्य बहाल करतो. अशा रीतीने उत्तम स्त्री व राज्य यांची प्राप्ती होऊन चारुदत्त जन्माचा सुखी होतो.

* * *

मृच्छकटिकाची कथावस्तू शूद्रकास बृहत्कथेवरून सुचली असावी, असा प्राचार्य करमरकरांचा तर्क आहे. त्यांच्या मते वसंतसेनेने चारुदत्ताजवळ दागिने ठेव म्हणून ठेवणे, त्या ठेवीची चोरी होणे, चारुदत्तावर त्याचा आळ येणे, माथुरक व संवाहक यांचे रस्त्यावर जुगार खेळणे, मारामारी करणे, शकाराने चारुदत्तास खटल्यात गुंतवणे इत्यादी प्रसंग शूद्रकाने आपल्या प्रतिभेने निर्माण केले आहेत. येथे एक गोष्ट ध्यानात घेणे जरूर आहे ती ही की मृच्छकटिकास भासाच्या चारुदत्ताचा आधार आहे, हे प्राचार्यांना मान्य नाही. परंतु मृच्छकटिक हे 'चारुदत्त'वरून सुधारून वाढवलेले प्रकरण आहे. हे मागे - 'चारुदत्त' नाटकावरील चर्चेत स्पष्ट झाले असल्यामुळे मृच्छकटिकाचा दुसरा आधार शोधण्याची आवश्यकता नाही.

भासाच्या चार अंकी चारुदत्ताचे मृच्छकटिकातील चार अंकांशी विलक्षण साम्य आहे. भासाचे नाटक अपूर्ण असल्याचेही मागे दर्शविले आहे. वसंतसेना-चारुदत्त यांची प्रणयकथा पूर्ण करण्यासाठी व त्यांच्या कथानकास राज्यक्रांतीच्या उपकथानकाची जोड देऊन त्याचे प्रकरणात रूपांतर करण्यासाठी शूद्रकाने मृच्छकटिकाची रचना केलेली दिसते. यासाठी त्याने पहिल्या चार अंकांचेही पुनर्लेखन केले आहे. अशा रीतीने उत्तम कथाबीज असलेले पण अपूर्ण राहिलेले

भासाचे 'चारुदत्त' नाटक शूद्रकाने सर्वार्थाने नव्या स्वरूपात मोठ्या सामर्थ्यानिशी सादर केले आहे. हा त्याचा प्रयत्न इतका यशस्वी झाला की हे संस्कृत नाट्यसृष्टीतील पहिल्या क्रमांकाचे नाटक-प्रकरण म्हणून ओळखले जाऊ लागले.

नाट्यशास्त्राच्या परिभाषेत सांगायचे झाल्यास 'मृच्छकटिक' हे 'प्रकरण' आहे. मागे सांगितलेली नाटकाची बहुतेक सारी वैशिष्ट्ये प्रकरणातही असतात. तथापि प्रकरणाची अशी खास वैशिष्ट्ये भरतमुनींनी नमूद केलेली आहेत. त्यानुसार प्रकरणातील कथानकास पुराण अथवा इतिहास याचा आधार लागत नाही. ते सामान्य माणसाच्या जीवनावर आधारलेले असते. नायिकेच्या दर्जावरून याचे शुद्ध व संकीर्ण असे दोन भेद होतात. भवभूतीच्या 'मालती-माधव' नाटकाची नायिका मालती ही कुलीन स्त्री असल्याने ते 'शुद्ध' या प्रकाराखाली येते तर मृच्छकटिकाची नायिका ही गणिका असल्याने ते संकीर्ण या प्रकारात मोडते.

'साहित्यदर्पण'काराच्या मते प्रकरणाचा नायक हा ब्राह्मण, अमात्य किंवा व्यापारी असतो. चारुदत्त हा ब्राह्मण आहे. माधव हा अमात्याचा मुलगा आहे. तर 'पुष्पभूषित' नामक प्रकरणातील नायक हा व्यापारी आहे. कदाचित ही उदाहरणे डोळ्यासमोर ठेवूनच विश्वनाथाने प्रकरणाची वैशिष्ट्ये सांगितलेली असावीत. प्रकरणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यात दहा अंक असून मुख्य कथानकास उपकथानकाची जोड दिलेली असते.

* * *

संस्कृत नाट्यवाङ्मयात मृच्छकटिकाचे स्थान अजोड आहे. जागतिक कीर्तीचे नाटक म्हणून पाश्चात्य पंडितांनी याची वाखाणणी केली आहे. पाश्चात्य विद्वानांना हे नाटक आवडण्याचे कारण म्हणजे यातील ठसठशीतपणे प्रत्ययाला येणारी वास्तवता हे आहे. शूद्रकाने तत्कालीन समाजाचे निरीक्षण डोळसपणे केले आहे. अगदी बारीक सारीक तपशील सूक्ष्म नजरेने टिपलेला आहे. शकार व त्याच्या सहकाऱ्यांनी भर रस्त्यावर केलेला वसंतसेनेचा पाठलाग, जुगाऱ्यांची मारामारी, शर्विलकाने केलेली घरफोडी, अकाली आलेला वादळी पाऊस, रस्त्यावरील रहदारीच्या गोंधळात वाहनांची झालेली अदलाबदल, वसंतसेनेवर ओढवलेले प्राणसंकट, चारुदत्तावरील खटला व त्याला झालेली फाशीची शिक्षा, स्थावरकाने गच्चीतून रस्त्यावर मारलेली उडी यासारखे निखळ वास्तववादी प्रसंग कोणत्याही संस्कृत नाटकात आढळत नाहीत.

तसेच या नाटकात दुसऱ्याच्या डोळ्यात अक्षरशः धूळ फेकणारा जुगारी आहे. चारुदत्ताचे घर फोडताना शर्विलक आपल्या जानव्याने माप घेतो. तसेच जमिनीवर आपल्या पावलाचा आवाज होऊ नये म्हणून पाणी ओततो. चारुदत्ताच्या जुन्या घराचे दार उघडताना करकरते. अशा प्रकारे वास्तवतेचे अनेक नमुने रेखाटून नाटककाराने मानवी जीवनाचा जणू छेद घेतला आहे.

नाटकातील वर्णने अत्यंत आकर्षक आहेत. भासाचे अनेक ओबड धोबड श्लोक शूद्रकाने सुधारले आहेत. काही गाळले असून पुष्कळ श्लोक नव्याने रचून घातले आहेत. त्यात क्वचित पाल्हाळ असला तरी श्लोकातील कल्पना मार्मिक व काव्यपूर्ण आहे. शूद्रकाची गद्य भाषणे नीटनेटकी, जोरदार आहेत. संवाद भासासारखे बोलीभाषेत नसले तरी नाट्यपूर्ण आहेत. कालिदासाशी तुलना करता शूद्रकात लालित्य व सफाई कमी आहे. यातील वर्णने चांगली असली तरी त्यात रसोत्कटता कमी आहे. भवभूती व भट्टनारायण रसनिर्मितीत व अंत:करणातील उत्कट भाव साकारण्यात अधिक निपुण आहेत.

चारुदत्त, वसंतसेना, शकार व मैत्रेय ही यातील ठळक पात्रे असून त्यांचे चित्रण उत्कृष्ट साधलेले आहे. चारुदत्त उदार, दिलदार व रसिक प्रेमिक आहे. तो दारिद्र्याने खचल्याने थोडाफार उदासीन आहे. त्याचे औदार्य वाखाणण्यासारखे आहे. त्याने आपली सारी संपत्ती दानधर्मात व देवळे, तलाव, धर्मशाळा बांधण्यात खर्च केली आहे. तो धर्मपरायण असा संसारी गृहस्थ आहे. त्याला धूता नावाची पत्नी व रोहसेन नावाचा चार-पाच वर्षांचा मुलगा आहे.

वसंतसेना व्यवसायाने गणिका असली तरी वृत्तीने कुलीन स्त्री आहे. तिचे चारुदत्तावर प्रेम आहे. दरिद्री विवाहित पुरुषावर मनोभावे प्रेम करणारी ही अजब गणिका आहे. राजश्यालक शकार हा तिच्या मागे लागलेला आहे. तिला संपत्तीचे आकर्षण नाही. ती स्वत: हत्ती पोसण्याइतकी गडगंज आहे.

नायक-नायिकांच्या पेक्षा शकाराचे पात्र अधिक डोळ्यात भरणारे आहे. हे खरोखरीच अजब असे पात्र आहे. दुष्टपणा, अडाणीपणा व सत्तेची धुंदी यातून त्याचे पशुतुल्य व्यक्तिमत्त्व साकारले आहे. त्याची पाशवी वृत्ती व मग्रूर भाषा ही शिसारी आणणारी आहे. पण त्याची रांगडी भाषा अडाणीपणाने हास्यप्रचूर बनली आहे. शकाराची तुलना शेक्सपिअरच्या 'फाल्स्टाक' या विनोदी पात्राशी होऊ शकेल. शूद्रकाने विदूषक म्हणून उभा केलेला मैत्रेय हा चारुदत्ताचा जिवलग

स्नेही आहे. तसा तो इतर विदूषकासारखा खादाड, झोपाळू व अजागळ असला तरी सहृदय आहे. त्याने विपत्तिकाळातही चारुदत्ताची साथ सोडलेली नाही. त्याचे बोलणे मार्मिक आहे.

स्थावरक हा शकाराचा सेवक इमानी आहे पण त्याची स्वामिनिष्ठा आंधळी नाही. निरपराध चारुदत्ताला फाशीची शिक्षा होताच तो शकाराची संगत सोडतो व प्राणाची बाजी लावून चारुदत्ताची सुटका करण्यासाठी धडपडतो. त्यासाठी बेड्या तोडून गच्चीतून भर रस्त्यात उडी मारतो. शर्विलक हा प्रेमिक आहे. त्याची प्रेयसी मदनिका ही वसंतसेनेची दासी आहे. तिची दास्यातून मुक्तता करण्यासाठी तो चारुदत्ताच्या घरी चोरी करतो. त्याला वसंतसेनेचेच दागिने मिळतात. प्रेयसीची सुटका करून बाहेर पडताच तो राजकार्यात अडकतो. आर्यकाला गादीवर बसविण्याच्या कारस्थानातील तो प्रमुख सूत्रधार आहे. माथुर, संवाहक व दर्दुरक ह्या जुगाऱ्यांचे चित्रणही वेधक आहे. वसंतसेनेची दासी मदनिका ही चतुर आहे. त्याने चोरलेले दागिने हे वसंतसेनेचे आहेत हे ती लगेच ओळखते.

अशा प्रकारे यातील पात्रे विलक्षण जिवंत वाटतात. वरील पात्रांपैकी येथे चारुदत्त व शकार यांच्या चित्रणाचा थोडा खोलवर परामर्श घ्यावयाचा आहे. चारुदत्त हा एकेकाळचा गर्भश्रीमंत परंतु सध्या धनहीन व मित्रहीन बनलेला दिलदार तरुण आहे. तो विवाहित आहे. त्याला चार-पाच वर्षांचा सुंदर मुलगा आहे. चारुदत्त धार्मिक, सुसंस्कृत पण हळवा आहे. दारिद्र्यामुळे त्याची वृत्ती थोडी चमत्कारिक बनली आहे. तो वारंवार आपल्या नशिबाला बोल लावताना दिसतो. दीनवाणे उद्‌गार काढतो. किरकोळ बाबीही त्याला खिन्न बनवितात.

तो उदार आहे. कलेचा भोक्ता आहे. रूपाने सुंदर आहे. वसंतसेना ही शहरातील विख्यात गणिका त्याच्यावर लुब्ध झालेली आहे. तो गाण्याचा शौकीन आहे. पूजा-बली वगैरे धार्मिक कृत्ये नियमाने पार पाडत असला तरी कर्मठ नाही. तो रसिक आहे. त्याच्या अंगावरील शेल्याचा सुगंध येताच वसंतसेनेला त्याच्या रसिकतेची साक्ष पटलेली आहे. तो प्रेमाला आसुसलेला आहे. गणिकेशी प्रेम करताना तो संकोचत नाही किंवा तिला आपल्या घरात आणताना त्याला त्यात काही गैर वाटत नाही.

मात्र काही ठिकाणी त्याच्या वर्तनाने टीकाकारांना बुचकळ्यात टाकले आहे. शर्विलकाने त्याच्या घरातून वसंतसेनेचे दागिने पळविले असता तो वसंतसेनेकडे

'ते दागिने मी द्यूतात गमावले' असा खोटा निरोप पाठवतो. आता चारुदत्तासारख्या विख्यात श्रेष्ठीचे घर फोडल्याची बातमी नगरभर पसरल्याशिवाय कशी राहील? त्यामुळे त्याने असत्य भाषण का करावे हे समजत नाही.

तसेच नवव्या अंकात त्याच्यावर आरोप दाखल झाल्यावरही चारुदत्त आपला बचाव करीत नाही. वसंतसेनेचे दागिने आपल्याकडे कसे आले हे तो सांगत नाही. मैत्रेय त्याला खरी हकीकत सांगण्याची विनंती करतो. तरीही चारुदत्त आपल्या नशिबाला दोष देण्यापलिकडे काही करीत नाही. तो अत्यंत हळवा व भित्र्या स्वभावाचा आहे हे यावरून दिसून येते.

प्रा. ना. सी. फडक्यांनी 'चारुदत्ता'वर दोन आक्षेप घेतलेले आहेत. त्यापैकी पहिला आक्षेप याप्रमाणे - सर्व टीकाकारांनी चारुदत्ताला धीरोदात्त म्हणून गौरविलेले आहे पण चारुदत्त हा सतत आपल्या दारिद्र्याबद्दल दु:खोद्गार काढताना दिसतो. धीरोदात्त मनुष्य आपले दु:ख सहन करतो. ते वारंवार उगाळत नाही. त्यामुळे तो 'धीरोदात्त' या पदवीला योग्य ठरत नाही.

पहिल्या आक्षेपाविषयी पाहता चारुदत्त हा पिढीजात श्रीमंत होता. तो अत्यंत दानशूर होता. त्याने आपल्या संपत्तीचा विनियोग गावात विहार, आराम, देवालये बांधण्यासाठी तळी, विहिरी खोदण्यासाठी केलेला आहे. तो उज्जयिनी नगरीचे भूषण आहे. वसंतसेनेसकट सर्वजण त्याच्या औदार्याची तारीफ करतात. त्यामुळे त्यास धीरोदात्त किंवा धीर प्रशांत म्हटलेले आहेत. त्याचा दारिद्र्यविषयक विलाप हा स्वत:शी किंवा मैत्रेयासारख्या मित्रापुरता मर्यादित आहे. हातात संपत्ती नसल्याने त्याला पूर्वीसारखा दानधर्म करता येत नाही, हे त्याचे खरे दु:ख आहे.

चारुदत्ताच्या दारिद्र्यावरही प्रा. फडक्यांनी ठपका ठेवलेला आहे. ज्याच्या पत्नीच्या गळ्यात नवलाखाचा कंठा आहे, अशा चारुदत्ताला दरिद्री का म्हणावे, असे त्यांचे म्हणणे आहे. पण हा आरोप टिकणारा नाही. चारुदत्ताच्या पत्नीचा कंठा हे स्त्रीधन आहे. तीन पिढ्यांची गडगंज संपत्ती नांदत असलेल्या घरात आपत्काळी एक-दोन ठळक दागिने आढळले तर त्यात काही गैर नाही.

आता राहिला 'धीरोदात्त' स्वभावाचा विचार. संस्कृत नाट्यशास्त्रात नायकाचे धीरोदात्त, धीरललित व धीरशांत असे चार प्रकार सांगितले आहेत. त्यापैकी धीरोदात्त हा नायक विशाल अंत:करणाचा, गंभीर क्षमाशील, त्यागी असतो. चारुदत्ताच्या ठिकाणी हे सारे गुण आहेत. त्याचा स्वभाव हळवा असल्याने दारिद्र्याविषयी वारंवार खेद प्रकट करतो इतकेच.

सहाव्या अंकातील चारुदत्ताचे वर्तन अस्वाभाविक आणि अतिलंपटपणाचे आहे, हे प्रा. ना.सी.फडक्यांचे मत श्री. श्री. ना. बनहट्टी यांना मान्य असावे असे वाटते. ते लिहितात - ''पण चारुदत्ताच्या या प्रसंगाच्या वर्तनावर ठेवलेला ठपका बरोबर आहे. वसंतसेनेने त्याला लावलेले वेड अनिवार होऊ पाहात आहे, हे दाखविण्याचा नाटककाराचा उद्देश आहे. पुढे सातव्या अंकात याला पुष्टी मिळते. पुष्पकरंडक जीर्णोद्यानात वसंतसेनेच्या भेटीसाठी उतावीळ झालेला चारुदत्त आपणास दिसतो.'' (नाट्याचार्य देवल. पृष्ठ १००-१०१)

चारुदत्त हा स्त्रीलंपट नाही, हे सांगण्याची वास्तविक गरज नाही. दुसरे म्हणजे सुमारे तेराशे-चौदाशे वर्षांपूर्वीचे हे नाटक आहे हे ध्यानात घेऊन टीका करायला हवी. अगदी पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत बहुपत्नीकत्वाची चाल प्रचलित होती. नागरक (म्ह. सुखवस्तू पुरुष) एखाद्या दिवशी बाहेर पडून गणिकांसमवेत आपला दिवस मौजमजा करण्यात घालवीत, असा वात्स्यायनाच्या 'कामसूत्रा'त उल्लेख आहे. तेव्हा चारुदत्ताला लंपट ठरविण्याचे कारण नाही.

या संदर्भात म.म.मिराशी लिहितात - ''वादळानंतरच्या पहाटेस चारुदत्त - पुष्पकरंडक जीर्णोद्यानात तो दिवस मैत्रेय व वसंतसेना यांच्या सहवासात मजेत घालवावा या हेतूने तेथील व्यवस्था करण्यास गेला होता. अशा रीतीने एखादा दिवस मजेत घालवण्यासाठी नागरिक उत्तम वस्त्रालंकार धारण करून घोड्यावर बसून सकाळीच घरून निघत आणि वेश्या, परिचारक इत्यादिकांसह उद्यानात जात. तेथे कोंबडे, बोकड इत्यादिकांच्या टकरा, द्यूत, नाटक प्रयोग, खेळ इत्यादिकात आनंदाने काळ घालवून सायंकाळी घरी परत येत (संशोधन मुक्तावली : सर दुसरा : पृष्ठ १९-२०)

'मृच्छकटिक' नाटकात केवळ चारुदत्त-वसंतसेनेची प्रेमकथाच नाही तर ते राजकीय नाटक आहे. पालक राजाला पदच्युत करून आर्यकाला गादीवर बसविण्यासाठी शर्विलकादींनी कारस्थान रचले होते व त्यात चारुदत्ताचाही सहभाग होता. असे श्री. पु. रा. लेले यांचे मत आहे. चारुदत्ताजवळ तीन पिढ्यांची गडगंज संपत्ती होती; पण त्याच्या हातात कारभार आल्यावर त्याने ती थोड्याच वर्षात संपवली. ही संपत्ती केवळ दानधर्मात संपलेली नाही. तो जुगारी असल्याचा उल्लेख नाही. तेव्हा त्याने पालकाला पदच्युत करण्याच्या कारस्थानात आपल्या देणग्यांचा वर्षाव केला असला पाहिजे, असा श्री. लेले यांचा तर्क आहे.

आचार्य अत्र्यांनीही अशाच अर्थाचे उद्‌गार काढले आहेत. त्यांच्या मते 'मातीचा गाडा' ही नाटकाची मध्यवर्ती कल्पना आहे व त्या शब्दाचा अर्थ 'Struggle for soil' असा होतो, असे सांगून ते लिहितात - "त्याची (म्ह. चारुदत्ताची) निर्धनता ऐतखाऊ कंगालांना वृथा अन्नदान करण्याने आलेली नव्हती तर एका लहान राष्ट्रीय क्रांतीचा झेंडा यशस्वी करण्यासाठी त्याने आपली संपत्ती खर्च केली होती. (कऱ्हेचे पाणी - खंड तिसरा पृ. १२६)

तथापि मूळ नाटकात या तर्काला काही अवसर नाही. चारुदत्ताची संपत्ती दान-धर्मात, लोकोपयोगी कृत्यातच खर्च झालेली आहे. शिवाय त्याचा स्वभाव अत्यंत उदार असल्याने त्याने देणग्यांचीही मुबलक खैरात केली असावी. या त्याच्या बेहिशेबीपणामुळे तो कफल्लक बनलेला आहे. त्याने कारस्थानाच्या कामी द्रव्याची मदत केली असावी असे मुळीच वाटत नाही. एक तर त्याचा सदर कारस्थानाशी दुरूनही संबंध नाही. त्या कटाचा मुख्य सूत्रधार शर्विलक हा चारुदत्ताच्याच वाड्यात शिरून चोरी करतो. म्हणजे त्याला चारुदत्त व त्याचे घरदेखील माहीत नाही. तसेच ज्याच्या सुटकेसाठी हे कारस्थान चाललेले आहे, तो आर्यक सातव्या अंकात चारुदत्तासमोर आला असताही दोघे एकमेकास ओळखत नाहीत.

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी चारुदत्त रेभिल नावाच्या गायकाचे गाणे ऐकून मध्यरात्री परत आला आहे. यावरून रेभिलाच्या घरी कट करणारी मंडळी जमत असावीत असा टीकाकारांनी तर्क केलेला आहे. चारुदत्तला संगीताची आवड आहे. गाणे ऐकून आल्यावर दोन श्लोकात त्याने गाण्याची प्रशंसा केली आहे. यावरून त्याला शास्त्रीय संगीताची जाण होती. त्यामुळे वरील तर्कदेखील बिनबुडाचा आहे. चारुदत्ताची एकंदर स्वभावरेखा याप्रमाणे आहे.

**शकार** - शकार हे या पात्राचे नाव नाही. त्याच्या बोलण्यात 'स' किंवा 'ष' ऐवजी सदैव 'श' येत असल्याने त्याला 'शकार' हे नाव पडले आहे. 'साहित्यदर्पणा'त याचे लक्षण पुढीलप्रमाणे दिले आहे -

"मदमूर्खताभिमानी दुष्कुलतैश्वर्यसंयुक्तः।
सोऽयमनूढा भ्राता राज्ञः श्यालः शकार इत्युक्तः॥

(सा.द.३.४४)

शकार हा मदोन्मत्त, मूर्ख व बढाईखोर असतो. त्याचा जन्म प्रायः हलक्या कुळात झालेला असतो. याची बहीण राजाची रखेली असते. तरी तो स्वतःला

राजाचा मेहुणा समजतो. नाटकात विट त्याला 'काणेली मात' असे संबोधतो. यावरून त्याची आईही व्यभिचारिणी असल्याचे दिसते. शकाराचे व्यक्तिमत्त्व बहुरंगी आहे. तो मदोन्मत्त व महामूर्ख आहे यात काही शंका नाही. त्याची सत्तेची धुंदी चारुदत्ताला धमकी देण्यात तसेच नवव्या अंकात न्यायाधीशाचा हवा तसा उपमर्द करण्यात दिसून येते. तो मूर्ख असला तरी तितकाच कावेबाज व क्रूर आहे. आठव्या अंकात त्याच्या उद्यानात आलेल्या बुद्धभिक्षूला विनाकारण मारतो. वसंतसेनेचा गळा घोटण्यापूर्वी विटाला शिताफीने उद्यानातून घालवतो. तो परत आल्यावर त्याच्यावर प्रहार करून त्यास मूर्च्छित पाडतो.

त्याच्या बोलण्यात मांसाशनाचे उल्लेख आहेत. (अंक ८ : श्लोक २२) तो आपण हिंग-मिरे वगैरेनी युक्त अशी मसाल्याची कोंबडी खाल्ल्याचे सांगतो. (अंक ८.१४) तो शंभर बायकांना ठार मारण्याइतका शूर आहे. पहिल्या अंकात वसंतसेनेचा पाठलाग करीत असता तो तिला जिवानिशी मारण्याची धमकी देतो. तो भेदरटही आहे. पहिल्या अंकात चारुदत्ताच्या वाड्यातील माणसे दिसताच तो घाबरून जातो. तसेच आठव्या अंकात आपल्या वाहनात वसंतसेना बसलेली दिसताच ती कोणी राक्षसी असावी असे वाटून भयभीत होतो.

अशा या चमत्कारिक पुरुषाचे बोलणे हास्यकारक आहे. ते असंबद्ध, अर्थहीन व चुकीच्या पौराणिक संदर्भाने भरलेले आढळते. नाट्यशास्त्रात शकाराचे बोलणे कसे असते सांगितले आहे.

"अपार्थमक्रमं व्यर्थं पुनरुक्तं हतोपमम्।
लोक न्याय विरुद्धस्य शकारवचनं विदुः॥"

(नाट्यशास्त्र)

त्याच्या बोलण्याचे काही मासले याप्रमाणे

**(१) एका शब्दास अनेक प्रतिशब्द** - पहिल्या अंकात तो वसंतसेनेस म्हणतो - 'तू माझा मदन-अनंग-काम वाढवीत आहेस.' तसेच १८ व्या श्लोकात तो तिला म्हणतो - 'का जातेस? का धावतेस? का पळतेस?' पुढे वसंतसेना समजून तो रदनिकेचे - चारुदत्ताच्या दासीचे - केस धरतो व म्हणतो -

"एषासि वासु शिरसि गृहीता, केशेषु-बालेषु-शिरोरूहेषु ।
आक्रोश - विक्रोश - लपाधिचण्डं शम्भुं शिवं शंकरमिश्वरं वा ॥

(अंक १ श्लोक ४१)

तर २३ व्या श्लोकात त्याने वेश्यावाचक दहा शब्द घातलेले आहेत.

**(२) ज्ञानेंद्रिये व विषय यांचा व्यत्यास :** 'कानाला वास येणे' किंवा नाकाने आवाज ऐकणे, अशी उलटापालट त्याच्या बोलण्यात आढळते. अंधारात वसंतसेना दिसेनाशी झाल्यावर तो म्हणतो - 'मला तिच्या गजऱ्याचा सुगंध ऐकू येत आहे पण अंधाराने नाक चोंदल्यामुळे पैंजणांचा आवाज दिसत नाही.' आपल्या वाहनात अकस्मात वसंतसेना दिसताच शकार घाबरून गेल्याचा उल्लेख वर आला आहे. तेव्हा तो म्हणतो "काय कोल्हे आकाशात उड्डाण करीत आहेत. कावळे चालत आहेत. या विटाला ती राक्षसी जोपर्यंत डोळ्याने खात नाही किंवा दातांनी पाहात नाही तो पर्यंत मी पळून जातो."

**(३) चुकीचे पौराणिक संदर्भ** - शकारास पुराणातल्या पात्रांची नावे ठाऊक आहेत. पण तो चुकीचे दाखले देतो - जसे "रामाला भिऊन द्रौपदी जशी पळाली किंवा मारुतीने ज्याप्रमाणे सुभद्रेस पळवले (अंक १.२५) "काय जमदग्नीचा पुत्र भीमसेन किंवा कुंतीचा पुत्र रावण तुला सोडवणार आहे काय?" (अंक १.२९) पहिल्या अंकाच्या ४७ व्या श्लोकात तर अत्यंत विचित्र संदर्भ आहेत. श्वेतकेतू हा पंडूचा मुलगा आहे तर रावण हा राधेला इंद्रापासून झाला. अश्वत्थामा हा कुंतीला रामापासून झाला. इत्यादी.

त्याच्या चमत्कारिक बोलण्याची आणखीही उदाहरणे देता येतील. असे बहुरंगी व्यक्तिमत्त्व असलेले पात्र संस्कृत नाट्यसृष्टीत अजरामर होऊन राहिलेले आहे.

* * *

नाटकाचा एकंदर कालावधी सुमारे तीन आठवड्यांचा आहे. श्री. पु. रा. लेले यांनी हे सारे कथानक 'तीन रात्री व एक दिवस एवढ्या काळात घडले आहे' असे म्हटले आहे; पण ते पटणारे नाही.

(१) श्री. मो. रा. काळे यांच्या मते वसंतसेना आणि चारुदत्त यांची पहिली भेट कामदेवाच्या मंदिरात मदनमहोत्सवाच्या प्रसंगी झाली असावी. हा उत्सव माघ शुक्ल पंचमीस म्ह. वसंतपंचमीस होतो. परंतु याऐवजी तो चैत्र शुक्ल त्रयोदशीस होत असे असे म.म.मिराशी यांनी म्हटले आहे व तेच अधिक बरोबर वाटते. या उत्सवानंतर साधारणपणे एक आठवड्यानंतर म्हणजे चैत्र कृष्ण षष्ठीस नाटकाच्या कथानकास प्रारंभ झाला आहे. या षष्ठीस 'रत्नषष्ठी' असे म्हटलेले आहे.

(२) वसंतसेनेचे दागिने चारुदत्ताच्या घरात सुमारे दोन आठवडे होते. तिसऱ्या अंकात शर्विलक चारुदत्ताच्या घरातील दागिने चोरतो ती घटना वैशाख शुक्ल अष्टमीस घडली असावी. श्री. लेले, डॉ. रायडर तसेच डॉ. वा. गो. परांजपे यांच्या मते पहिल्या अंकाच्या नंतर लगेच दुसऱ्याच रात्री तिसऱ्या अंकातील घटना घडल्या आहेत. पण हे मत प्रामादिक आहे. हे मध्यरात्रीनंतर लवकरच मावळलेल्या चंद्राच्या वर्णनावरून समजण्यासारखे आहे.

(३) यानंतरच्या पुढील अंकातील सर्व घटना चार दिवसांत पूर्ण झालेल्या आहेत. सारांश चैत्र कृष्ण षष्ठीस सुरू झालेले कथानक वैशाख शुक्ल द्वादशीस पूर्ण झालेले आहे म्हणजे कथानकाचा एकंदर कालावधी बावीस दिवसांचा आहे.

* * *

नाटकाचे समालोचन करण्यापूर्वी त्यात आढळलेल्या लहान मोठ्या दोषांवर नजर टाकणे इष्ट ठरेल.

(१) पहिल्या अंकाच्या अखेरीस चारुदत्त वसंतसेनेस घरी पोचते करण्यासाठी बाहेर पडतो. त्या वेळी पडलेल्या टिपूर चांदण्याचे तो एका श्लोकात ('उदयतिहि शशांक: १.५७) वर्णन करतो. तोपर्यंत वसंतसेनेचे घर आलेले सांगितले आहे. वास्तविक पाहता या श्लोकाच्या अखेरीस अंक संपवायला हवा होता. श्री. काळ्यांच्या मते येथील वर्णनपर भाग गहाळ झाला असावा पण उपलब्ध प्रतीवरून असा तर्क करण्यास अवसर मिळत नाही.

(२) दुसऱ्या अंकाच्या अखेरीस संवाहक बुद्ध भिक्षू होण्याचे ठरवतो. तो वाड्यातून बाहेर पडतो न पडतो तोच वसंतसेनेच्या खुंटमोडक नावाच्या हत्तीने बुद्ध भिक्षूला घायाळ केल्याचे समजते. वास्तविक पाहता या दोन घटनात काही वेळाचे अंतर ठेवायला हवे होते. पण असा दोष अनेक संस्कृत नाटकात आढळतो.

(३) पाचव्या अंकातील वादळी पावसाचे वर्णन वास्तविक न वाटता सांकेतिक वाटते. शिवाय ५१ व्या श्लोकात इंद्रधनुष्याचा उल्लेख आला आहे. रात्रीच्या वेळी इंद्रधनुष्याचे दर्शन संभवत नाही याचे कवीला भान राहिलेले नाही.

(४) डॉ. रायडर यांनी सदर 'नाटक अकारण लांबलेले आहे' असा आक्षेप घेतला आहे. हा आक्षेप तसा बरोबर आहे. कारण काही प्रसंगी वर्णने अवास्तव

फुगलेली आहेत. उदा. वसंतसेनेच्या सात चौकी वाड्याचे वर्णन (अंक ४), शर्विलकाने केलेली स्त्री-जातीची अकारण निंदा (अंक ३), वसंतसेना, विट व चारुदत्त यांनी केलेले अकाली पावसाचे प्रदीर्घ वर्णन (अंक ५) हे वर्णन करण्यासाठी कवीने तब्बल २३ श्लोक घातलेले आहेत. तेव्हा या भागास कात्री लावता येण्यासारखी आहे. परंतु डॉ. रायडर यांनी अंक दोन ते पाच या अंकातील कथाभाग कथानकाला पोषक नाही, अशा अर्थाचे जे विधान केले आहे ते पटणारे नाही. दुसरा अंक जरी सोडून दिला तरी तिसऱ्या अंकातील दागिन्याची चोरी, चौथ्या अंकात चारुदत्ताने दागिन्यांच्या मोबदल्यात पाठविलेली रत्नमाला व पाचव्या अंकातील वसंतसेनेचे अभिसरण हे प्रसंग कथानकास पोषक नाहीत असे म्हणता येईल का? तेव्हा सदर आक्षेप प्रामादिक आहे.

(५) सहाव्या अंकाच्या सुरुवातीस चारुदत्त एकटाच उद्यानाकडे का जातो? जर वसंतसेना तिकडे येणारच होती तर तिला घेऊनच तो का गेला नाही? असा श्री. काळ्यांनी दोष दाखविला आहे, पण तो योग्य नाही. एक तर मागे सांगितल्याप्रमाणे तो उद्यानात पूर्वतयारीसाठी गेला होता व दुसरे म्हणजे पूर्वीच्या काळात पुरुष लग्नाच्या बायकोलादेखील बरोबर घेऊन हिंडत नसत त्यामुळे चारुदत्ताने तिला बरोबर नेले नाही, यात गैर काही नाही.

'मृच्छकटिक' ही अजोड कलाकृती आहे. वर दर्शविलेले दोष तसे फारसे महत्त्वाचे नाहीत. खरे तर 'अकारण विस्तार' हाच यातील प्रमुख दोष आहे असे म्हणायला हरकत नाही.

* * *

नाटकाचे समालोचन करताना काही ठळक व महत्त्वाच्या गोष्टीच विचारात घेतलेल्या आहेत.

(१) मृच्छकटिक हे प्रकरण असल्याने यात उपकथानकास अवसर आहे. चारुदत्त-वसंतसेना यांच्या प्रेमकथेच्या जोडीस उज्जयिनीत घडून आलेली राज्यक्रांती हे उपकथानक आहे. काहींच्या मते शर्विलक व मदनिका यांच्या प्रेमाची पूर्ती हे दुसरे उपकथानक आहे. परंतु यास उपकथानक मानण्यापेक्षा मुख्य कथानकातील प्रसंग मानणे योग्य वाटते. यात शर्विलक चारुदत्ताच्या घरातील वसंतसेनेने ठेव म्हणून ठेवलेले दागिने चोरत असल्याने मुख्य कथानक पुढे सरकण्यास मदत झाली आहे. तसेच राज्यक्रांतीच्या कटाचा मुख्य सूत्रधार

शर्विलकच असल्याने उपकथानक कथानकाशी जोडले गेले आहे. शिवाय सहाव्या अंकात चारुदत्त व भावी राजा आर्यक यांची भेट होऊन चारुदत्ताने त्याची सुरक्षित स्थळी रवानगी केली आहे. त्यामुळे दोन्ही कथानके एकजीव झाली आहेत.

(२) उज्जयिनीत पालक राजाची कशी जुलमी राजवट चालू होती तिचे दर्शन पहिल्या अंकातच घडते. राजकीय अधिकारी शकार हा वसंतसेनेचा पाठलाग करताना दिसतो. तिला जिवानिशी मारण्याची धमकी देतो. ती त्याला चुकवून चारुदत्ताच्या घरात शिरली असे समजताच चारुदत्ताला धमकीचा निरोप द्यायला कमी करत नाही. आठव्या अंकात दिवसाढवळ्या तिच्या हत्येचा प्रयत्न होतो. राजश्यालक शकार स्वत:च तिचा गळा घोटतो. बागेत आलेल्या बुद्ध भिक्षूला मारहाण करतो. विटाला बेशुद्ध होईतो मारतो. नवव्या अंकात न्यायाधीशाच्या कामात ढवळाढवळ करतो. त्याचा वाटेल तसा अपमान करतो. भरं न्यायालयात विदूषकाची व त्याची मारामारी जुंपते. यावरून पालकाच्या राज्यात शांतता व सुरक्षितता मुळीच नव्हती असा निष्कर्ष निघतो. तेव्हा अशी राजवट उलथून पडली नसती तरच नवल.

(३) श्री. ना. बनहट्टी यांनी चारुदत्ताने गणिकेशी संबंध ठेवल्याने ती उभयता संकटात सापडली, यावरून गणिकासंबंध निंद्य आहे असे नाटककाराचे मत होते, असा थोडा चमत्कारिक वाटणारा विचार मांडला आहे. ते लिहितात - "पाचव्या अंकात विदूषक स्पष्ट शब्दात गणिकासंबंध अनेक रीतीने निषिद्ध असल्याचे सांगून चारुदत्ताला परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. अशी अनेक सूचक चिन्हे आणि स्पष्ट वर्णने यांच्या योगाने नाटककार शूद्रकाने चारुदत्त-वसंतसेना यांचा संबंध जरी खऱ्या अनुरागावर आधारलेला असला तरी तो चांगला नव्हे असे दर्शविले आहे. नाटकाची ही नैतिक बाजू आहे." (नाट्याचार्य देवल पृष्ठ १०१)

असा निष्कर्ष काढताना त्यांनी विटाच्या व विदूषकाच्या भाषणाची साक्ष काढली आहे. तीच मुळात चिंत्य आहे. वसंतसेना इतर गणिकांसारखी लोभी व धूर्त नाही. ती अत्यंत सोज्वळ अंत:करणाची आहे. तिचे चारुदत्तावर खरोखरच प्रेम आहे. याची त्या दोघांना मुळी जाणीवच नाही. त्या दोघांनी चारुदत्तास सावधगिरीचा इशारा दिला आहे, इतकाच त्याचा अर्थ. खुद्द चारुदत्ताची पत्नीच शेवटी वसंतसेनेला वधू म्हणून घरात घेऊन तिचा यथोचित सम्मान करते.

यावरून शूद्रकाचे मत काय आहे, हे स्पष्ट उमगते. विक्रमोर्वशीयातील नायिका उर्वशीही स्वर्गातली वेश्याच आहे. तिचे आणि पुरुरव्याचे प्रेमदर्शन घडवीत असता कालिदासास दोघांचे लग्न लावण्याचे धाडस झालेले नाही. मुलगा झाल्यावरही ती तशीच राजाजवळ राहते, तेव्हा शूद्रकाचे विचार अधिक प्रगत असल्याचे जाणवते.

# भवभूती

भवभूतीने आपल्या नाटकाच्या प्रस्तावनेत स्वत:विषयी काही माहिती दिली आहे. तिच्यावरून त्याच्या वैयक्तिक जीवनाबद्दल निश्चित काही सांगणे शक्य आहे. भवभूतीच्या पूर्वजाचे कुलनाम 'उदुंबर' हे होते. वास्तविक पाहता हे वृक्षाचे नाव आहे. पण वृक्षावरून गावाचे नाव पडत असे तेव्हा भवभूतीचे पूर्वज हे उदुंबर या गावी राहात असावेत. म.म. डॉ. वा. वि. मिराशी यांच्या मते हे उदुंबर म्हणजे यवतमाळ जिल्ह्यातील पैनगंगेच्या काठावर असलेले उमरखेड हे गाव होय.

त्याचे पूर्वज हे काश्यप गोत्रीय ब्राह्मण होते. ते अग्निहोत्री असून सच्छील व पंक्तिपावन होते. तसेच हे धार्मिक, सोमयाग करणारे व पंचाग्निपूजक होते. पंक्तिपावन म्हणजे चार वेद, सहा वेदांगे यांचे ज्ञान असणारा व दहा पिढ्यांपर्यंत वेदाध्ययन चालू ठेवणारा ब्राह्मण असे मनुस्मृतीत (मनु.३१४) सांगितले आहे.

महाकवी या भवभूतीच्या पाचव्या पूर्वजाने वाजपेय याग केला होता. 'महावीरचरिता' च्या एका प्रतीत याचे नाव 'सिंहभूती' असे दिले आहे. त्याच्या आजोबाचे नाव भट्ट गोपाल असे होते. त्यांनी आपल्या विद्वत्तेने व शुचिर्भूत आचरणाने चांगला नावलौकिक संपादन केला होता. याच्या पित्याचे नाव नीलकंठ व आईचे नाव जतुकर्णी असे होते. त्याने आपल्या गुरूचे नाव ज्ञाननिधी आहे असे म्हटले आहे. भवभूतीचे मूळ नाव श्रीकंठ असून तो भवभूती या नावाने प्रसिद्धीस आला असे जगद्धर, वीर राघव या टीकाकारांनी म्हटले आहे या उलट भवभूती हे त्याचे मूळ नाव असून त्यास 'श्रीकंठ' ही पदवी मिळाली, असा आधुनिक विद्वानांचा तर्क आहे. मला स्वत:ला पहिले मत अधिक सयुक्तिक वाटते.

भवभूतीने आपल्या गुरूच्या हाताखाली व्याकरण, न्याय, मीमांसा, सांख्य, वेदांत, नाट्यशास्त्र, कालिदासादी पूर्वकवींचे वाङ्मय, राजनीती, कामशास्त्र, कापालिक तंत्र इत्यादींचा सखोल अभ्यास केला. त्याच्या विद्वत्तेचा व व्यासंगाचा प्रत्यय त्याच्या नाटकातून येतो.

भवभूतीने आपल्या गावाचे नाव 'पद्मपूर' असे सांगितले आहे. हे गाव विदर्भाच्या दक्षिणेस असावे. डॉ. रामकृष्णपंत भांडारकराच्या मते भवभूतीचे पद्मपूर हे नागपूरच्या परिसरातील चांदा किंवा चंद्रपूरजवळ असावे तर डॉ. मिराशी यांच्या मते भंडारा जिल्ह्यातील आमगावपासून अडीच मैलावर असलेले 'पद्मपूर' हेच भवभूतीचे जन्मगाव असावे. तथापि भवभूतीचे निवासस्थान गोदावरी नदीच्या परिसरात कोठे तरी असावे असे मला वाटते. डॉ. भांडारकरांनीही गोदावरी नदी त्याच्या निवासस्थानाजवळून वहात असावी असा तर्क केला आहे. भवभूतीचे पद्मपूर आज नष्ट झाले असावे किंवा निराळे नाव घेऊन उभे असावे.

याचे कारण असे की गोदावरी नदीचे इतके ठळक उल्लेख त्याच्या तीनही नाटकात आले आहेत की त्यांची उपेक्षा करणे शक्य नाही. उत्तररामचरितात दंडकारण्य, जनस्थान, पंचवटी, क्रौंचपर्वत, जटायू शिखर इत्यादी स्थळांचा आवर्जून उल्लेख आहे. मालती-माधव नाटकात गोदावरीच्या परिसराचा काही. संबंध नसताना भवभूतीला गोदावरीची आठवण झालेली आहे व त्याने नवव्या अंकात सौदामिनीच्या तोंडी तिचा निर्देश केला आहे.

भवभूतीचे जन्मगाव पद्मपूर असले तरी तेथे तो फार काळ राहिलेला दिसत नाही. 'मालती-माधवा'तील माधवाप्रमाणे तोही विद्याभ्यासासाठी पद्मावती नगरीस गेला असावा. ही नगरी त्याच्या पूर्ण परिचयाची दिसते. हिचे सविस्तर वर्णन नाटकात आले आहे. या पद्मावती नगरीचा शोध घेण्याचा प्रयत्न डॉ. जनरल कनिंगहॅम यांनी केला. त्यांच्या मते पद्मावती म्हणजे ग्वाल्हेर संस्थानांतील 'नरवार' हे खेडे असावे. पण त्यांचा हा तर्क थोडा चुकला. ग्वाल्हेर संस्थानचे पुराणवस्तु-संशोधक श्री. मो.वि.गर्दे यांनी पद्मावती म्हणजे नरवार हे खेडे नसून त्याच्याजवळ असलेले पवाया अथवा पद्मपवाया हे खेडे होय, असे सिद्ध केले आहे. हे ग्वाल्हेरच्या दक्षिणेस सुमारे चाळीस मैल अंतरावर आहे.

तो पद्मावतीस विद्याभ्यासासाठी राहिला असला तरी त्याची तीनही नाटके 'कालप्रियनाथा'च्या यात्रेच्या प्रसंगी सादर करण्यात आलेली आहेत. कै. माधव

व्यंकटेश लेले यांनी आपल्या 'मालती-माधव : सार व विचार' या पुस्तकात यमुनानदीच्या काठावर असलेले काल्पी हे शहर कालप्रियनाथाच्या यात्रेचे ठिकाण असावे, असे मत व्यक्त केले आहे. काल्पी येथील सूर्यमंदिराच्या समोर असलेल्या पटांगणात भवभूतीची नाटके प्रथम सादर झाली. सध्याचे काल्पी शहर हेच पूर्वीचे कालप्रियनाथ होय. हे शहर यमुनानदीच्या काठी असून येथे प्राचीन काळी सूर्यमंदिर होते. येथून कनोज हे शहर उत्तरेस सुमारे पंचाहत्तर मैल अंतरावर आहे.

त्याची कीर्ती कनोजचा राजा यशोवर्मा याच्या कानावर गेली व त्याने भवभूतीस आश्रय दिला. गौडवहो या प्राकृत महाकाव्याचा कर्ता वाक्पतिराज हाही त्या वेळी यशोवर्म्याच्या दरबारात होता. भवभूतीस हा राजाश्रय आयुष्याच्या अखेरीस मिळालेला असावा. वाक्पतिराजाने त्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. यावरून भवभूतीला आपल्या आयुष्यात पद्मपूर-पद्मावती-काल्पी व शेवटी कनोज अशी बरीच भटकंती करावी लागली असे दिसते.

* * *

भवभूतीच्या नावावर महावीरचरित, मालती-माधव व उत्तररामचरित अशी तीन नाटके आहेत. त्याने याव्यतिरिक्त काही रचना केली असावी असे म्हणण्यास थोडा आधार आहे. सुभाषित-संग्रहात त्याच्या नावावर काही श्लोक दिलेले आहेत. पण ते वर दिलेल्या कोणत्याही नाटकात सापडत नाहीत. चित्सुखाचार्यांनी आपल्या 'तत्त्वप्रदीपिका' या टीकाग्रंथात भवभूतीने 'नाटक नाटकादि प्रबंध' नामक ग्रंथाची रचना केली, असे म्हटले आहे. पण हा ग्रंथ आज उपलब्ध नाही. तेव्हा वरील तीन नाटके हीच त्याची वाङ्मयसंपत्ती आहे.

त्याच्या तीनही नाटकांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यानंतर भवभूतीबाबत काही महत्त्वाच्या गोष्टी ध्यानात येतात. त्याचे पांडित्य, मनोवृत्ती, रागलोभ, हळवेपणा यांचे दर्शन घडते. थोडक्यात म्हणजे तो कशा प्रकारचा मनुष्य असावा याची कल्पना करता येते. या माहितीच्या आधारे त्याची व्यक्तिरेखा उभी करण्याचा हा प्रयत्न आहे.

त्याचे घराणे वेदविद्यासंपन्न, धर्मनिष्ठ व कर्मनिष्ठ होते. त्याच्या पूर्वजाने वाजपेयासारखा महत्त्वपूर्ण याग केलेला होता. स्वत: भवभूतीने पद्मावतीच्या विद्यापीठात शिक्षण घेतले होते. तो पद-वाक्य-प्रमाणज्ञ म्हणजे व्याकरण-

न्याय-मीमांसा शास्त्रात प्रवीण होता. त्याच्या या गाढ्या विद्वत्तेचा परिणाम त्याच्या जीवनाविषयक दृष्टिकोनावरही झालेला आहे.

त्याची वृत्ती गूढ व गंभीर आहे. तिच्यात थोडा-फार हळवेपणाही आहे. त्याच्या गंभीर वृत्तीचे गमक म्हणजे त्याच्या तीनही नाटकांत विदूषकाचा अभाव आहे. त्याच्यासारख्या वेदविद्यासंपन्न पंडितास खादाड, अजागळ, उथळ मनोवृत्तीचा व वेळी अवेळी आचरट बोलून हशा पिकवणारा विदूषक मानवला नसावा. त्याची तीनही नाटके गंभीर प्रकृतीची आहेत. विशेषत: 'उत्तररामचरित' हे नाटक अत्यंत उच्च दर्जाचे आहे. यातील एकंदर वातावरण उदात्त आहे. मर्यादा पुरुषोत्तम रामचंद्राचे व्यक्तिमत्त्व त्याने सर्व सामर्थ्यानिशी उभे केले आहे. रामाप्रमाणे भवभूतीही पापभीरू, निर्मल अंत:करणाचा, अन्तर्गूढ व घनव्यथ होता, असे म्हटले तर फारसे चुकणार नाही.

एवढी जाडी विद्वत्ता असलेला मनुष्य शास्त्ररचना करण्याचे सोडून नाट्यरचनेकडे कसा वळला याचे आश्चर्य वाटते. त्याची नटवर्गाशी चांगली मैत्री असल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे विद्वत्तेच्या जोरावर नाट्यक्षेत्रात पाऊल टाकण्याचे त्याने धाडस केले असावे. प्रथम त्याने रामाच्या पूर्व आयुष्यावर आधारलेल्या 'महावीरचरित' नाटकाची रचना केली. पण लोकांना तसेच शिष्टजनांना ते नाटक पसंत पडले नाही. कोणी म्हणतात की ते नाटक त्याने अर्ध्यावरच सोडून दिले व पुढे ते विनायक नामक कवीने पूर्ण केले. ते काहीही असो. नाट्यरचना करण्यास केवळ पांडित्य उपयोगी पडत नाही, हे त्याला एक नाटक अपयशी ठरल्यावर उमगले.

यानंतर त्याने 'मालती-माधव' या दशांकी प्रकरणाची रचना केली. या नाटकाच्या प्रस्तावनेत त्याने आपली अवहेलना करणाऱ्या अहंमन्य टीकाकारांची कडक शब्दांत हजेरी घेतली आहे. तो म्हणतो -

''जे कोणी आमच्याविषयी अनादर पसरवीत आहेत. त्यांनी (खूप) समजून राहावे की त्यांच्यासाठी हा आमचा प्रयत्न (म्ह.नाट्यरचना) नाही. माझ्याप्रमाणे मनोधर्म असणारा कोणी तरी जन्माला येईल किंवा कोठे तरी असेल. कारण काल हा अनंत आहे व पृथ्वी विशाल आहे.''

(मालती- माधव १.६)

भवभूतीची वृत्ती गंभीर असली तरी त्याला विनोदाचे सर्वस्वी वावडे होते, असे समजण्याचे कारण नाही. त्याचा विनोद मार्मिक व उच्च दर्जाचा आहे.

उत्तर-रामचरिताच्या पहिल्या अंकात सीता उर्मिलेच्या चित्राकडे बोट दाखवून "भाऊजी, ही हो कोण?" असा लक्ष्मणास मिष्किल प्रश्न विचारते. हा त्याच्या विनोदी वृत्तीचा उत्कृष्ट मासला आहे. तसेच चौथ्या अंकातील लहान मुलांचे बोलणे हास्योत्पादक आहे. आश्रमातील मुलांनी घोडा हा प्राणी पाहिलेला नव्हता त्यामुळे त्यांना तो कसा दिसला व वाटला याचे विनोदी वर्णन कवीने केले आहे.

सहाव्या अंकात राम आल्यानंतर कुश व लव हे रामाला भेटतात तेव्हा संभाषणाच्या ओघात रामायणाचा उल्लेख येतो. आपल्यासमोर राम उभा आहे हे कुशास ठाऊक नसल्याने तो रामायणातील दोन श्लोक त्यालाच ऐकवतो. सारे रामायण पाठ असले तरी राम कोण व सीता कोण हेच माहीत नसल्याने येथे प्रासंगिक विनोद उत्पन्न झाला आहे.

'उत्तर-रामचरिता'च्या मानाने 'मालती-माधवा'तील विनोद अधिक मनमोकळा व अवखळ आहे. पहिल्या अंकात माधव बकुळीच्या झाडाखाली उभा असलेला पाहून मालतीची मैत्रीण आनंदाने टाळ्या वाजवीत म्हणते, "सखे मालती, आनंदाची गोष्ट. हे बघ-इथे कोणी तरी-कोणाचे तरी उभे आहेत." सहाव्या अंकात माधवाचा मित्र मकरंद हा कामंदकीच्या सूचनेवरून मालतीचा वेष घेऊन येतो. तेव्हा माधव विनोदाने म्हणतो, "हा नंदन (मालतीचा नियोजित वर) मोठा पुण्यवान आहे कारण त्याला या 'प्रिये'बरोबर थोडा वेळ तरी प्रेम करायला मिळेल."

सातव्या अंकात हा मकरंद स्त्रीवेषात पलंगावर पडून आपल्या प्रेयसीशी गप्पागोष्टी करीत आहे. हा सारा कथाभाग अत्यंत मनोरंजक असून संवादही विनोदी व चटकदार आहेत.

असे असले तरी भवभूतीची एकूण वृत्ती ही गंभीरच आहे, हे कबूल करणे भाग आहे. या वृत्तीचा उलगडा करता येण्यासारखा आहे. दारिद्र्य व समकालीन टीकाकार (यात नातेवाईकही आले) यांनी केलेल्या अवमानाने तो उद्विग्न झाला असावा. त्याला राजाश्रय मिळालेला नाही. किंवा मिळाला असल्यास आयुष्याच्या अगदी अखेरीस मिळाला असावा. कारण त्याची तीनही नाटके कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगी सादर झालेली आहेत.

तो गंभीर व तापट असला तरी वैफल्याने ग्रासलेला नाही. मित्रपरिवार, नातेवाईक, कौटुंबिक सौख्य या बाबतीत तो समाधानी दिसतो. मैत्री, दांपत्यप्रेम,

पुत्रवात्सल्य यांच्या बाबतीत भवभूतीने काढलेले उद्गार कोणाही कुटुंबवत्सल माणसाच्या हृदयाला भिडतील असे आहेत. पती-पत्नी संबंधाबाबत कामंदकी म्हणते :

"मुलांनो, तुम्ही हे नीट लक्षात ठेवा की स्त्रीला आपला पती व पुरुषाला आपली धर्मपत्नी म्हणजे एक अत्यंत जिव्हाळ्याचा मित्र आहे. सर्व बांधवांची नाती तेथे एकवटलेली असतात. सर्व मनोरथांची त्या ठिकाणी परमावधी होते. तो एक अमोल ठेवा आहे. किंबहुना जीवितसर्वस्व आहे."

(मालती-माधव अंक ६, श्लोक १८)

भवभूतीचा आणखी एक विशेष म्हणजे रूढ धर्माविरुद्ध व सामाजिक चालीरीतीविरुद्ध त्याने नोंदवलेला निषेध हा होय. शूद्र असलेला शंबूक तपाचरण करतो. या त्याच्या पातकाने (?) अयोध्येत अपमृत्यू घडून येतो. प्रस्थापित धर्माचे पालन करण्यासाठी शंबूकास शासन करण्याची जबाबदारी राजा म्हणून रामाच्या अंगावर पडते. कर्तव्यभावनेने तो शस्त्र उगारतो पण त्याचे कोमल अंत:करण दु:खाने भरुन येते तो म्हणतो :

"हे माझ्या उजव्या हाता, मृत झालेल्या ब्राह्मणपुत्रास जीवनप्रदान करण्यासाठी या शूद्र तपस्व्यावर निर्दय शस्त्राचा प्रहार कर. भारावलेल्या गर्भाने कष्टी झालेल्या जानकीचा त्याग करणाऱ्या रामाचाच तू अवयव आहेस. तुला दया कोठून असणार?"

(उत्तररामचरित अंक २ श्लोक १०)

'मालती-माधव' नाटकाने त्याला नाटककार बनवले खरे; पण या क्षेत्रात त्याला बरीच मजल मारायची होती. जीवनातला बरा-वाईट असा बराच अनुभव आल्यावर व वाङ्मयीन सिद्धान्त अंगी मुरल्यावर त्याने 'उत्तररामचरिता'ची रचना केली. ही त्याची तिसरी, अखेरची व सर्वोत्कृष्ट कलाकृती आहे. आता त्याची प्रज्ञा परिपक्व झालेली होती. नाट्यरचनेचे व अपेक्षित परिणाम साधण्याचे रहस्य अवगत झालेले होते. या नाटकाने त्याला भरघोस यश मिळवून दिले व त्याचे नाव भास, कालिदास, विशाखदत्त व शूद्रक या प्रथितयश नाटककारांच्या मालिकेत दिमाखाने मिरवू लागले.

स्त्री-जातीवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्याने या नाटकाची रचना केली आहे. यात रामाच्या उत्तरायुष्यातील कथाभाग आलेला आहे. रामाने राज्याभिषेकानंतर सीतेविषयी काही प्रवाद कानावर आल्याने तिचा त्याग

करण्याचा जो निर्णय घेतला, तो या नाटकाचा विषय आहे. रामाने सीतेचा त्याग केला खरा; पण तो करताना त्याच्या अंतरंगात भावनांचा क्षोभ झाला. त्याचा वेध भवभूतीने समर्थपणे घेतलेला आहे.

तथापि सीतेला पूर्ण न्याय देण्याची त्याने खबरदारी घेतली आहे. त्यासाठी रामायणातील कथानकास डावलून नाटक सुखांत केले आहे. सीतेचा विनाकारण त्याग करणाऱ्या रामाची व त्यास पर्यायाने कारणीभूत झालेल्या प्रजाजनांची कवीने अरुंधतीकडून कान उघडणी केली आहे. तत्पूर्वी तिसऱ्या अंकात 'छाया-प्रवेशा'ची योजना करून रामाला कोणत्या परिस्थितीत आपला त्याग करावा लागला याची सर्व हकीकत सीतेच्या कानावर घातली आहे. त्याचप्रमाणे रामाने आपला त्याग केलेला असला तरी त्याचे आपल्यावरील प्रेम कायम आहे, याची तिला खात्री पटली आहे. अशा तऱ्हेने उभयतांचे मनोमीलन घडविण्याची कामगिरी त्याने चोखपणे पार पाडलेली आहे.

कालिदासाच्या 'अभिज्ञान शाकुंतला'त अखेरीस जरी दुष्यंत व शकुंतला यांचे मीलन झाले असले तरी शकुंतलेवर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करण्याचा कालिदासाने प्रयत्न केला नाही. या पार्श्वभूमीवर भवभूतीची कामगिरी उठून दिसते. तसेच काहींच्या मते भरताच्या दंडकामुळे त्याला नाटक सुखांत करावे लागले. पण ही समजूत चुकीची आहे. त्याने जो सुखात्म शेवट घडवला त्यापाठीमागे भरताच्या आदेशाचे पालन करण्यापेक्षा सीतेला, पर्यायाने स्त्रीजातीला न्याय मिळवून देणे हाच त्याचा उद्देश आहे. या त्याच्या विशेषामुळे साऱ्या संस्कृत नाट्यसृष्टीत त्याचे व्यक्तिमत्त्व वेगळेपणाने उमटून दिसते.

सारांश, भवभूती हा गरीब, स्वाभिमानी, हळव्या अंत:करणाचा, पापभीरू, स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाने व्यथित होणारा, समाजातील जाचक निर्बंधाविरुद्ध निषेध नोंदवणारा सत्त्वशील ब्राह्मण होता. डॉ. बेलवलकरांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास 'एका मध्यम स्थितीतील प्रेमळ, पापभीरू, सत्त्वशील व विद्वान ब्राह्मणाचे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते.' (उत्तर प्रस्तावना पृष्ठ-२१)

* * *

भवभूतीने स्वत:विषयी माहिती सांगितलेली असली तरी तिच्यावरून त्याच्या काळाविषयी काही बोध होत नाही मात्र त्याचा काळ निश्चित करणे फारसे अवघड नाही. तो सातव्या शतकाच्या अखेरीस व आठव्या शतकाच्या पूर्वार्धात

म्हणजे साधारणपणे इ.स.६८० ते ७३० या सुमारास होऊन गेला. त्याच्या कालनिर्णयाचे ठळक आधार पुढीलप्रमाणे -

(१) बाराव्या शतकात होऊन गेलेल्या कल्हणाने आपल्या 'राजतरंगिणी' या इतिहासग्रंथात भवभूती व वाक्पतिराज हे कवी कनोजच्या यशोवर्मा या राजाच्या दरबारी असल्याचा उल्लेख केला आहे. जैन ग्रंथांतील उल्लेखावरून यशोवर्मा हा इ.स.७२५ ते ७५२ या काळात राज्यावर होता. यावरून भवभूती इ.स.च्या आठव्या शतकाच्या पूर्वार्धात असल्याचे निश्चित होते.

(२) वर ज्याचा उल्लेख आला आहे त्या वाक्पतिराजाने आपल्या 'गौडवहो' या प्राकृत महाकाव्यात भवभूतीचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे, नव्हे त्याला अगदी गुरूसारखा मान दिला आहे. सदर काव्याची रचना इ. स. ७४० च्या दरम्यान झाली आहे. भवभूती त्या वेळी जिवंत नसावा, असा म.म. मिराशी यांचा अंदाज आहे. यावरून वरील कालनिर्णयास पुष्टी मिळते.

(३) वामनाने आपल्या 'काव्यालंकार सूत्रवृत्ती' या छोटेखानी ग्रंथात 'महावीर चरिता' तील 'दोर्दण्डायितचन्द्रशेखर धनुः' (म.वी.च. १.५४) व 'उत्तर-राम-चरिता'तील 'इयं गेहे लक्ष्मीः' (उ.रा.च.१.३८) हे दोन श्लोक उद्धृत केले आहेत. वामन हा काश्मीरचा राजा जयापीड याच्या पदरी होता. याने इ.स.७५१ ते ७८२ पर्यंत राज्य केले. तेव्हा भवभूती हा इ.स.७५० पूर्वी होऊन गेला असे खात्रीपूर्वक म्हणता येते.

(४) राजशेखराने (इ.स.८९० ते ९५०) आपल्या बालरामायण या नाटकाच्या प्रस्तावनेत भवभूतीचा स्पष्ट नामोल्लेख केला आहे. इतकेच नव्हे तर आपण गतजन्मी भवभूतीच होतो अशी शेखी मिरवली आहे. राजशेखराचा काल निश्चित असल्याने भवभूतीचा काळ निर्धारीत करता येतो.

(५) बाणभट्टाने आपल्या 'हर्षचरित' या विख्यात गद्यग्रंथाच्या प्रस्तावनेत भास, कालिदास, प्रवरसेन इत्यादी मान्यवर लेखकांचा उल्लेख केला आहे. पण त्यात भवभूतीचा अथवा त्याच्या नाटकाचा नामोल्लेख नाही. आता अनुल्लेख हे प्रमाण ग्राह्य मानले जात नसले तरी भवभूतीच्या काळाची पूर्वमर्यादा ठरविण्यास उपयुक्त आहे. बाणभट्ट हा हर्षवर्धनाच्या (इ.स.६०६ ते ६४७) दरबारात असल्याने इ.स.६५० ही त्याच्या काळाची पूर्वमर्यादा ठरते.

वरील लेखकांव्यतिरिक्त सोमदेव (इ.स.९६०), धनंजय (इ.स.९७४ ते १०००) तसेच भोज (इ.स.१०१०) इत्यादी उत्तरकालीन लेखकांनीही त्याच्या नाटकातील अवतरणे उद्धृत केली आहेत.

* * *

भवभूतीविषयी आवश्यक तेवढी माहिती घेतल्यानंतर आता त्याच्या कलाकृतीकडे वळण्यास हरकत नाही. प्रथम त्याच्या 'महावीरचरित' या पहिल्या नाटकाची ओळख करून घेऊ.

## १. महावीरचरित

नांदीच्या श्लोकात कवीने स्वयंभू, नित्य व क्रमरहित अशा चैतन्यतत्त्वास वंदन करून आपल्या नाटकास प्रारंभ केला आहे. यामध्ये सीता स्वयंवरापासून रावणवधापर्यंतचा कथाभाग आलेला आहे. विश्वामित्रांनी आपल्या यज्ञाच्या रक्षणासाठी जरी रामलक्ष्मणांना तपोवनात आणले असले तरी रामाच्या पराक्रमास जोड देण्यासाठी त्यास अस्त्रविद्या शिकवणे हा त्यांचा हेतू आहे. त्याचप्रमाणे जनकाची कन्या सीता हिची प्राप्ती करून घ्यावयाची होती. त्यासाठी विश्वामित्रांनी जनकास आपल्या यज्ञाचे निमंत्रण दिले होते. जनक जरी स्वत: आला नाही तरी त्याने आपल्या भावास (म्ह. कुशध्वजास) सीता व उर्मिला यांच्यासह तपोवनात पाठविले आहे.

सीतेला पाहताच रामाच्या मनात तिच्याविषयी स्नेह उत्पन्न होतो तर रामाने अहिल्येचा उद्धार केल्याचे समजताच सीतेला त्याच्याविषयी आदर वाटू लागतो. त्याच वेळी रावणाकडून सर्वमाय नामक पुरोहित येतो व तो रावणाने सीतेला मागणी घातली असल्याचे सांगतो. त्याचा निरोप ऐकून लक्ष्मणाला राग येतो पण राम त्यास शांत होण्यास सांगतो.

मग ताटका त्या ठिकाणी येते. तिला पाहून बायका-मुलांची गाळण उडते. विश्वामित्राच्या आदेशानुसार राम तिला ठार मारतो. सर्वमाय या राक्षसास अचंबा वाटतो. विश्वामित्र त्यांना प्राप्त झालेली जृंभकास्त्रे रामास देतात. रामाच्या विनंतीनुसार ती लक्ष्मणासही प्राप्त होतात.

त्यानंतर कुशध्वज सीतेच्या विवाहाचा प्रस्ताव मांडतो. शिवधनुष्य तपोवनात आणण्यात येते. रामाने त्यास प्रत्यंचा लावण्याचा प्रयत्न करताच ते भग्न होते. ठरल्याप्रमाणे सीता व उर्मिला यांची लग्ने होतात. सीता रामाला मिळालेली पाहताच सर्वमाय राक्षस संतापतो. जाताना तो धमकी देतो की ''रावणाने मागणी घातली असताही तुम्ही त्याची विनंती मानली नाहीत. इंद्राच्या अप्सरांप्रमाणे सीतेलाही रावणाच्या बंदिवासात पडावे लागेल.'' (अंक पहिला.)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी मिश्र विष्कंभक आहे. यात माल्यवान व शूर्पणखा यांचा संवाद आहे. रामाने ताटकेचा वध केला तसेच सीताही पटकावली, ही वार्ता ऐकून माल्यवान चिंतेत पडलेला आहे. रामाचे पारिपत्य करण्यासाठी त्याने परशुरामास चिथावणी देणारे पत्र लिहिले आहे.

मुख्य प्रवेशात परशुराम प्रवेश करतो. रामाने शिव-धनुष्याचा भंग केल्याची वार्ता त्यास समजलेली आहे. आपले विद्यागुरू असलेल्या भगवान शंकराच्या धनुष्याचा भंग करणाऱ्या रामाचा त्याला साहजिकच संताप आलेला आहे. परशुराम हा काही साधासुधा योद्धा नव्हता. त्याने रावणावर विजय मिळवणाऱ्या कार्तवीर्य सहस्रार्जुनाचे हजार बाहू आपल्या परशूने खडाखडा तोडले होते. एकवीस वेळा क्षत्रियकुलांचा संहार केला होता. क्रौच पर्वतात छिद्र पाडून हंसांचा मार्ग मोकळा केला होता. इतकेच नव्हे तर गजाननभृंगी इत्यादी शिवगणांनी युक्त असलेल्या षडानन कार्तिकेयाचाही पराभव केला होता.

असा हा परशुराम रामाला हुडकत राजवाड्यात येतो व परिजनांना बाजूला सारून आतल्या महालात जातो. राम त्याला भेटण्यासाठी समोर येतो. सीता घाबरून रामाला बिलगते. परशुरामाविषयी रामाच्या मनात आदराची भावना असते. रामाला पाहून परशुरामही चकित होतो. असा सुंदर राजकुमार आपल्या संतापाला बळी पडणार याचे त्याला वाईट वाटते. दोघे परस्परांची प्रशंसा करतात. इतक्यात अंत:पुरातून रामाचे कंकण सोडण्यासाठी निरोप येतो. तसेच वशिष्ठव विश्वामित्र, परशुरामास बोलावतात. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकात वसिष्ठ व विश्वामित्र परशुरामाचा क्रोध शांत करण्याचा प्रयत्न करतात. परंतु परशुरामाची याबाबतची भूमिका स्पष्ट आहे. तो म्हणतो-

''शत्रूचा समूळ उच्छेद केल्याशिवाय की माझे विद्यागुरू भगवान शंकर व गुरुपत्नी देवी पार्वती यांच्यासमोर कोणत्या तोंडाने जाऊ?''

(अंक ३, श्लोक ६)

सामोपचाराने परशुराम बधत नाही असे पाहून जनकाचा पुरोहित शतानंद खवळतो. तो परशुरामाला इशारा देतो की आपल्या जावयाला (म्ह. रामाला) थोडी जरी इजा झाली तरी राजर्षी जनक महाराजांना ते सहन होणार नाही. शतानंदाची वीरवृत्ती पाहून विश्वामित्र त्याची प्रशंसा करतात तर परशुराम त्याची हेटाळणी करतो.

शतानंद चिडून परशुरामाला - महापातकी, दुर्वृत्त, बीभत्स कर्मे करणारा, पाखंडी, जातिभ्रष्ट अशी दूषणे देतो. परशुरामाने प्रत्यक्ष आपल्या आईस ठार मारले. या गोष्टीचाही निर्देश करतो. ते ऐकून परशुरामही खवळतो. तो शतानंदास 'अहल्यापुत्र' म्हणून हिणवतो. (शतानंद हा अहल्येस इंद्रापासून झालेला मुलगा होता. तो व्यभिचारजन्य संबंधातून जन्माला आलेला आहे असे परशुरामास म्हणावयाचे आहे.) तेव्हा शतानंद रागारागाने त्यास शाप देण्यास उठतो. सर्व जण त्याला कसेबसे शांत करतात.

थोड्या वेळाने राजर्षी जनक त्या ठिकाणी येतो. त्यालाही परशुरामाच्या आततायीपणाचा संताप येतो. दोघांची वादावादी होते. जनक संतापाने आपले धनुष्य सज्ज करतो. तो सर्वांना उद्देशून म्हणतो-

''हे सभाजन हो, परशुराम हा भृगूचा मुलगा आहे. नेहमी तपाचरणात मग्न राहणारा आहे. म्हणून तो आमचा द्वेष करीत असतानाही आजवर आम्ही यास क्षमा केली, पण आता तो आम्हास तुच्छ लेखून अपमान करीत आहे तर याच्यावर धनुष्यच उचलले पाहिजे. दुसरा काही मार्ग नाही.''

(अंक ३ श्लोक २७)

एवढ्यात दशरथ येऊन त्यास थांबवतो. मग दशरथ व परशुराम यांच्यातही वादावादी होते. परशुराम वसिष्ठ व विश्वामित्र यांनाही जुमानीत नाही. विश्वामित्रांचा उजवा हात परशुरामास शाप देण्यासाठी पाणी घेऊ लागतो तर डावा हात धनुष्य उचलण्यासाठी सरसावू लागतो. परंतु शाप व शस्त्र या दोन्हीतही परशुराम निष्णात आहे. तो विश्वामित्रास स्पष्ट सांगतो की तो आपल्या तपस्येने विश्वामित्राचे ब्रह्मतेज जाळून टाकील. इतक्यात स्वतः राम प्रवेश करतो. तो परशुरामाचे आव्हान स्वीकारतो. दोघे युद्ध करण्यासाठी निघून जातात. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या प्रारंभी मिश्र विष्कंभक आहे. विमानातून माल्यवान व शूर्पणखा प्रवेश करतात. त्यांना रामाने परशुरामाचा पराजय केल्याची वार्ता समजलेली आहे. तो शूर्पणखेस सांगतो की, पूर्वी दशरथाने कैकेयीला दोन वर

दिलेले होते. तिची दासी मंथरा ही मिथिलेजवळ आलेली आहे. तर शूर्पणखेने तिच्या शरीरात प्रवेश करावा. त्याचा बेत रामाला दंडकारण्यात आणून विराध वगैरे राक्षसाकडून त्याचा नाश करावयाचा व सीताहरण करायचे.

मात्र रावणाचे राज्य आतून पोखरलेले आहे, याची माल्यवानास जाणीव आहे. रावणाचा भाऊ बिभीषण हा त्याच्या मार्गातला मोठा अडसर आहे. मग शूर्पणखा त्यास विचारते. 'रामाने परशुरामाचा जसा पराभव केला तसा वालीचाही केला तर आपण काय करणार आहोत?' त्यावर माल्यवान हताश होऊन उत्तर देतो, 'मग आम्हा सर्वांचा नाश अटळ आहे.'

यानंतरच्या मुख्य प्रवेशात जनक रामाने परशुरामावर विजय मिळवल्याबाबत दशरथाचे अभिनंदन करतो. परशुरामाचा अहंकार-दर्प आता उतरलेला आहे. तो अरण्यात जाण्यासाठी वसिष्ठ व विश्वामित्र यांची अनुज्ञा घेतो. जाताना आपले धनुष्य देऊन जातो.

दंडकारण्यातील राक्षसांचे निर्दालन करण्यासाठी आपण तेथे जायला हवे, असे रामाला वाटते. एवढ्यात कैकेयीची दासी मंथरा ही तिची भेट घेण्यासाठी तेथे येते व रामाला आपली विनंती दशरथास कळविण्यास सांगते. कैकेयीने मागे दशरथाकडून दोन वर मिळवले होते ते वर आता पदरात पाडून घेण्याची तिची इच्छा आहे. मंथरेच्या शरीरात शिरलेली शूर्पणखा लक्ष्मणाच्या हातात पत्र देते. लक्ष्मण हे पत्र वाचतो -

"एका वराने वत्स भरताला अयोध्येची राज्यलक्ष्मी उपभोगण्यास मिळावी व दुसऱ्या वराने रामाने कालहरण न करता त्वरित दंडकारण्यात जावे. त्या ठिकाणी त्याने वल्कले परिधान करून चौदा वर्षे रहावे तसेच त्याच्याबरोबर परिजनापैकी लक्ष्मण व सीता यांच्या व्यतिरिक्त कोणीही जाऊ नये."

(अंक ४ श्लोक ४१)

अशा रीतीने रामाची दंडकारण्यात जाण्याची इच्छा योगायोगाने पूर्ण होते. परंतु जनक दशरथास रामाला राज्याभिषेक करावा अशी विनंती करतो. दशरथ या गोष्टीस संमती देतो पण राम स्वत:पुढे होऊन दशरथास कैकेयी मातेस दिलेल्या दोन वरांचे स्मरण करून देतो. त्यानंतर तिची इच्छा त्यास ऐकवण्यात येते. ती भयंकर मागणी ऐकताच दशरथ व जनक मूर्च्छितच होतात.

पण वनवासास जाण्याचा रामाचा निर्धार कायम आहे. लक्ष्मण सीतेला बोलावून आणतो. भरत रामाकडून त्याच्या पादुका मागून घेतो. रामचंद्र

वनवासातून परत येईपर्यंत भरत जटाधारण करून व पादुकांवर अभिषेक करीत राज्याचे पालन करण्याचे कबूल करतो. त्यानंतर राम, सीता व लक्ष्मण हे वनवासास जाण्यास निघतात. दशरथ काकुळतीस येऊन रामाला वनात न जाण्याची विनंती करतो. त्याचे प्राण कंठाशी आलेले आहेत. शोक अनावर होऊन तो मूर्च्छित होतो. कैकेयीचा भाऊ युधाजित हा तेथे आलेला असतो. त्यालाही फार दु:ख होते.

लक्ष्मण रामास शृंगवेरपुरात राहणाऱ्या गुहाचा निरोप सांगतो. विराध नामक एका राक्षसाने त्या प्रदेशात धुमाकूळ घातलेला आहे मग राम विराधाचे निर्दालन करण्यासाठी प्रथम चित्रकूटास जाण्याचे ठरवतो. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या सुरुवातीस विष्कंभक आहे. संपाती प्रवेश करतो. गरुडास संपाती व जटायू असे दोन पुत्र आहेत. त्यापैकी संपातीचे पंख जळाले असल्याने तो मलयपर्वतातील एका गुहेत राहात आहे. हा जटायूचा थोरला भाऊ आहे. जटायू त्यास वंदन करण्यासाठी येतो. आल्यानंतर तो राम हा पंचवटीत आला असल्याचे सांगतो. तसेच लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक-कान छाटल्याची व रामाने खर-दूषण यांच्यासह चौदा हजार राक्षसांचा संहार केल्याची हकीकत सांगतो. मग संपाती त्याला राम-लक्ष्मणांची काळजी घ्यावयास सांगतो.

जटायू तेथून पंचवटीत येतो. त्याला सुवर्णमृगाचा पाठलाग करीत राम दूरवर चालल्याचे व लक्ष्मण त्याच्या मागून जात असल्याचे दृष्य दिसते. तसेच रावण संन्याशाच्या वेषात पर्णकुटीत बसलेला दिसतो. पण जरा वेळाने तो एक हजार पिशाचांची मुखे असलेल्या खेचरांच्या रथातून सीतेला पळवून नेताना पाहतो. मग तो रावणास हाक मारून त्यास युद्धाचे आव्हान देतो. येथे विष्कंभक पूर्ण झाला आहे.

मुख्य प्रवेशात राम सीतेचा शोध करीत दु:खाने व्याकुळ झालेला दिसतो. त्याच्या बोलण्यावरून रावणाने जटायूस ठार केल्याचे समजते. राम-लक्ष्मण जटायूचा अग्निसंस्कार करून दंडकारण्याच्या पश्चिम भागाकडे जातात. तेथे त्यांना शबरीचा आर्त स्वर ऐकू येतो. कबंध हा राक्षस शबरीला ओढून नेत असतो. लक्ष्मण त्यास ठार मारून शबरीची सुटका करतो. ती रामाला बिभीषणाचे पत्र देते. त्या पत्रात विभीषण रामाला शरण येण्याची इच्छा व्यक्त करतो.

त्या वेळी कबंधाच्या चितेतून दिव्य पुरुष बाहेर येतो व कबंधाची हत्या करून आपल्याला मुक्त केल्याबद्दल राम-लक्ष्मणाना धन्यवाद देतो. तो पुढे

सांगतो की माल्यवानाने वालीस रामाला ठार करण्याची चिथावणी दिली आहे व रावणाशी मैत्री असल्याने वाली रामाचा नाश करण्यासाठी उद्युक्त झाला आहे. इतक्यात पडद्यातून वालीचे उद्‌गार ऐकू येतात. आकाशमार्गाने येणाऱ्या वालीचे शबरी पुढील शब्दांत वर्णन करते -

"वालीने इंद्राने दिलेली सुंदर सुवर्णकमळांची माळ परिधान केली आहे. याचे शरीर पिवळसर असल्यामुळे सायंकाळच्या प्रकाशाने लाल झालेल्या व विजेशी संयुक्त असलेल्या मेघाप्रमाणे भासत आहे. ज्वालेने वेढलेल्या पर्वतीय पठाराप्रमाणे शोभिवंत दिसणारा हा (वाली) वेगाने येत असता आकाशातील सीमांत रेखेप्रमाणे दिसत आहे."

(अंक ५ श्लोक ४४)

मग वाली प्रवेश करतो. खरे तर त्याला रामाशी झगडा करणे पसंत नाही. सर्व जगताला पूज्य असणारा रामचंद्र अतिथिरूपाने आला असता त्याच्याशी मधुर भाषण करण्याऐवजी त्याला शत्रू मानून ठार मारण्याची आपल्यावर वेळ आली म्हणून तो स्वतःचा धिक्कार करीत आहे. (या ठिकाणी भवभूतीने रचलेले नाटक संपले. अंक ५ श्लोक ४६ नंतरचा भाग विनायक नामक कवीने लिहिलेला आहे.

हेरांनी वालीला अशी बातमी दिली आहे की बिभीषणाने सुग्रीवाला न विचारताच रामाकडे शबरीला पाठवले असून रामाने त्यास लंकेचे राज्य देण्याचे मान्य केले आहे. तो खाली उतरून रामाची भेट घेतो. दोघे युद्ध करण्यासाठी योग्य स्थळी जातात. दोघांचे युद्ध सुरू होते. काही वेळाने रामाचा बाण वालीचे शरीर भेदून दुंदुभि राक्षसाच्या हाडांचा ढिगारा, सात ताल वृक्ष, पर्वत व जमीन यांच्यावर प्रहार करून रामाच्या भात्यात परत येतो. वाली मरताना सुग्रीवास रामाशी मैत्री करण्यास सांगतो. नंतर त्याचे शरीर डोंगरावरून खाली लोटून देण्यात येते. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या प्रारंभी माल्यवान प्रवेश करतो. त्याने आखलेल्या सर्व योजनांचा निकाल लागलेला आहे. रावणाच्या उन्मत्तपणाचा वृक्ष चांगलाच फोफावला असून त्याला लवकरच फळे लागणार आहेत. एवढ्यात त्रिजटा त्याच्याकडे गडबडीने येते व रडू लागते. ती सांगते की, "कोणी एक दुष्ट वानर लंकेत शिरला. त्याने लंकानगरी जाळली. राक्षसांना पळवून लावले. अक्षयकुमार त्याच्याशी लढू लागताच त्यालाही त्या वानराने ठार मारले."

अक्षयकुमार मारला गेल्याचे समजताच माल्यवान खिन्न होतो. हा दुष्ट वानर म्हणजे हनुमानच असावा असा तो तर्क करतो. तो त्रिजटेला धीर देतो. रावणाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवण्यास सांगतो. तसेच तो कुंभकर्णास जागे करण्याचे ठरवतो. त्रिजटा त्यास पुढे सांगते की, रावण राजवाड्याच्या गच्चीवर चढून अशोकवनाकडे पाहात आहे व राणी मंदोदरी त्यास सीतेला सोडून देण्याची विनंती करण्यासाठी गेली आहे. तेथे विष्कंभक समाप्त होतो.

मुख्य प्रवेशात मंदोदरी रावणास वानरांनी समुद्रावर टाकलेले दगड तरंगत असल्याचे सांगते. पण रावणाचा या गोष्टीवर विश्वास बसत नाही. नंतर प्रहस्त नावाचा सेनापती येतो व रामाकडून कोणी अंगद नावाचा दूत आल्याचे सांगतो. अंगदाचा निरोप ऐकून रावण संतापतो व प्रहस्तास त्यास पकडण्याची आज्ञा करतो. पण अंगद त्यास सापडत नाही. तो लीलया तेथून पसार होतो. मग रावण स्वतःच युद्धास निघतो.

राम आणि रावण यांच्या युद्धास प्रारंभ होतो. रामाजवळ रथ नसल्याचे पाहून इंद्र मातलीकडून आपला रथ पाठवून देतो. मग दोघांचे घनघोर युद्ध होते. या युद्धाचे वर्णन इंद्र व चित्ररथ गंधर्व यांच्या संवादात केलेले आहे. अखेरीस लक्ष्मण इंद्रजिताचा व राम रावणाचा वध करतो त्याबरोबर आकाशातून त्यांच्यावर पुष्पवृष्टी होते. (अंक सहावा)

सातव्या अंकाच्या प्रारंभी मिश्र-विष्कंभक घातलेला आहे. त्यात लंका नगरी व अलकानगरी यांचा संवाद आहे. रावणाच्या वधाने लंका शोकाकुल झाली आहे व अलका तिचे सांत्वन करीत आहे. त्या दोघींच्या संवादातून सीतेची अग्निशुद्धी करण्यात आली तसेच बिभीषणास राज्याभिषेक झाल्याचे सांगितलेले आहे. बिभीषण रामास पुष्पक विमान देतो.

मुख्य प्रवेशात राम, सीता, लक्ष्मण, बिभीषण व सुग्रीव हे विमानातून अयोध्याकडे येऊ लागतात. मार्गातील समुद्रावर बांधलेला सेतू, अगस्तीचा आश्रम, पंपासरोवर, सह्याद्री, गंधमादन पर्वत यांचे वर्णन आले आहे. राम येत असल्याची वार्ता हनुमान भरत व शत्रुघ्न यांना सांगतो. ते दोघे सामोरे येतात. रामाच्या तीनही माता, वसिष्ठमुनी व त्यांची पत्नी अरुंधती हे येऊन भेटतात. त्यानंतर विश्वामित्रही येतात. रामाला राज्याभिषेक होतो व नाटक समाप्त होते. (अंक सातवा)

* * *

वाल्मिकी-रामायणाच्या कथानकावर नाट्यरचना करताना भवभूतीने बरेच स्वातंत्र्य घेतलेले आहे. नाटकातील सारे प्रसंग माल्यवानाच्या योजनेने घडून येतात, असे नाटककाराने दाखवलेले आहे. त्यासाठी त्याला रामायणातील कथेत अनेक व महत्त्वपूर्ण बदल करावे लागले आहेत.

नाटकात वीररसास प्राधान्य आहे. त्याच्या जोडीस रौद्र, अद्भुत व बीभत्स हेही रस आलेले आहेत. परशुरामाच्या भाषणात रौद्र रसाच्या छटा आहेत. तर ताटका व कबंध यांच्या वर्णनात बीभत्सरस डोकावला आहे. भवभूतीने रसांचा परिपोष चांगल्या रीतीने केला आहे. भाषेवर त्याचे चांगलेच प्रभुत्व आहे. त्याला शृंगार-विशेषत: विप्रलंभ शृंगार, हास्य या कोमल रसापेक्षा करुण, रौद्र, बीभत्स हे रस चांगले साधतात. त्याची गौडी शैलीही त्यास या कामी उपयोगी पडलेली आहे.

भवभूतीने रामायण कथेत एकसूत्रता आणण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. कैकेयी व मंथरा यांच्या चरित्रावरील कलंक दूर केला आहे. वालीच्या वधाबाबत रामावर घेण्यात येणाऱ्या आक्षेपाचे निराकरण केले आहे. वाली व सुग्रीव यांच्यातील वैर व लढाई यास कवीने फाटा दिला आहे. राम व वाली यांचे रीतसर युद्ध होऊन वाली मारला जातो, असे दर्शविले आहे. रामाचे अरण्यगमन हे मिथिलेतून होते असे त्याने दाखवले आहे.

नाटककाराने हे सारे बदल हेतुपुरस्सर केले आहेत. आपणास कोणता परिणाम साधायचा आहे हे त्याला पूर्ण ठाऊक आहे. पण या प्रयत्नात त्याला यश आले असे म्हणता येत नाही. ज्याच्या हाती भवभूतीने सर्व कथानकाची सूत्रे सोपविलेली आहेत, तो माल्यवान हा मुत्सद्दी वाटत नाही. तो योजना चांगल्या आखतो पण त्याबद्दल अधिक बोलून वाचक-प्रेक्षकांचे कुतूहल नष्ट करतो. मुद्राराक्षसातील राक्षस व माल्यवान यांची तुलना केली तर माल्यवान त्याच्या पासंगासही पुरणार नाही.

माल्यवानाप्रमाणेच इतर पात्रांची चित्रणेही नीट साधलेली नाहीत. खुद्द रामाचे चित्रण व्हावे तसे उठावदार झालेले नाही. त्याच्या ठिकाणी पराक्रमाबरोबर सौजन्यवृत्ती आहे व ती परशुरामाबरोबरच्या संवादात प्रकट झाली आहे. पण त्याचा कोणताच गुण विशेषत्वाने व्यक्त झालेला नाही. रावणाचे चित्रण तर अगदीच कळाहीन आहे. तो परावलंबी व आळशी दाखवलेला आहे. आपल्या पराक्रमाचा त्याला भलताच अभिमान आहे. लंकेवर दारुण संकट आल्यावरही

तो बेफिकीर राहिला आहे. अंगदाशी बोलतानाही तो चिडून बोलतो. लक्ष्मणाचे चित्रण त्या मानाने बरे वठले आहे. लक्ष्मणाच्या स्वभावातली ईर्षा व कडवटपणा भवभूतीने बराच कमी केला आहे. शबरीला कबंधाच्या तावडीतून सोडवताना त्याचा पराक्रम प्रकट झाला आहे. सर्वात चांगले चित्रण परशुरामाचे वठलेले आहे. त्याचा पराक्रम, उत्कट गुरुभक्ती, सडेतोड स्वभाव, उद्दाम वाटावेत असे गर्विष्ठ उद्‌गार, शत्रूचे गुण मान्य करण्याची तयारी व रामाकडून पराभूत झाल्यानंतर त्याची बदललेली मनोवृत्ती हे सारे विशेष भवभूतीने कौशल्याने उभे केले आहेत. स्त्रीपात्रातही कोणी उठावदार नाही. सीता-उर्मिला निव्वळ बाहुल्या वाटाव्यात इतक्या निर्जीव आहेत.

नाटकात इतरही अनेक दोष आहेत. तिसऱ्या अंकातील परशुरामाचे शतानंद, जनक, विश्वामित्र यांच्याशी झालेले वाग्युद्ध निरर्थक आहे. या अंकात कथानकाचा मुळीच विकास झाला नाही. त्या वादाद्वारे भवभूतीने आपल्याला योग, धर्म, मीमांसा ही शास्त्रे अवगत आहेत, हे दर्शविले आहे. अप्रस्तुत प्रसंगाप्रमाणे वर्णनांचा विस्तार हाही दोष आढळतो. यातील वर्णने बोजड व कंटाळवाणी आहेत. ती इतकी लांबलेली आहेत की, दहा अंकी मालती-माधव नाटकापेक्षा सात अंकी महावीरचरितं हे मोठे झाले आहे. सारांश, एखादी गोष्ट थोडक्यात कशी सांगावी ही कला भवभूतीस अद्याप अवगत झालेली नाही.

पाचव्या अंकातील ४६ व्या श्लोकापर्यंतचा भागच भवभूतीच्या हातचा आहे. यानंतर त्याने ते नाटक अपुरे सोडले असा प्रवाद आहे. त्याने रामायणाच्या कथेत केलेले मूलगामी फेरफार तत्कालीन प्रेक्षकांना किंवा टीकाकारांना रुचले नसावेत. म्हणूनही त्याने नाटक अर्ध्यावरच सोडले असावे. यापुढील कथाभाग विनायक नामक कवीने पूर्ण केला आहे. दक्षिण भारतात प्रचलित असलेले दुसरेही हस्तलिखित उपलब्ध आहे. हा उत्तरार्ध सुब्रह्मण्य नामक कवीने रचलेला आहे. तथापी दक्षिणेकडील हस्तलिखिताचा वाङ्मयीन दर्जा कमी प्रतीचा आहे.

* * *

'महावीरचरिता'नंतर लवकरच भवभूतीने 'मालती-माधव' या दहा अंकी नाटकाची किंवा नाट्यशास्त्राच्या भाषेत सांगायचे झाल्यास 'प्रकरणा'ची रचना केली. नांदीच्या पहिल्या श्लोकात कवीने गजाननाची थोडीशी थट्टा केली आहे तर दुसऱ्या श्लोकात शंकराच्या जटाजूटांचे काव्यपूर्ण वर्णन केले आहे.

नांदीश्लोक आटोपल्यानंतर सूत्रधार प्रवेश करतो व उगवत्या सूर्यबिंबास वंदन करतो. तो सांगतो की, ''दक्षिण देशातील भवभूतीनामक कवीने 'मालती-माधव' नामक नाटक रचले आहे. कवी नटवर्गाचा मित्र आहे व त्याने आपली कृती आमच्या स्वाधीन केली आहे.''

पहिल्या अंकाच्या सुरुवातीस मिश्र विष्कंभक आहे. कामंदकी व तिची शिष्या अवलोकिता यांच्या संवादातून मागील कथानक सांगितलेले आहे. विदर्भ देशाचा मंत्री देवरात, पद्मावती नगरीचा अमात्य भूरिवसू व कामंदकी हे लहानपणी एकत्र वाढलेले होते. देवरात व भूरिवसू या दोघांनी आपल्या विद्यार्थिदशेत आपणास होणाऱ्या अपत्यांमध्ये विवाहसंबंध करण्याची प्रतिज्ञा केली होती. त्या वेळी कामंदकी व सौदामिनी उपस्थित होत्या.

त्याप्रमाणे देवराताने आपला पुत्र माधव हा मोठा होताच त्यास आन्वीक्षिकी विद्या शिकण्याच्या निमित्ताने पद्मावतीस पाठवले आहे. भूरिवसूची कन्या मालती हीही उपवर झालेली आहे. त्या दोघांचा विवाह जुळावा यासाठी बौद्धभिक्षुकी कामंदकी स्वत: प्रयत्न करीत आहे.

असे असले तरी त्यांच्या विवाहमार्गात एक अनपेक्षित विघ्न उभे राहते. पद्मावतीच्या राजाचा नंदन नामक सचिव होता. त्याने राजामार्फत मालतीस मागणी घातलेली आहे. भूरिवसूला जरी आपल्या प्रतिज्ञेचे स्मरण असले तरी राजासमोर तो काही बोलू शकत नाही. मकरंद हा माधवाचा जिवलग मित्र असून तोही माधवाबरोबर पद्मावतीस आलेला आहे. कामंदकीच्या मनात नंदनाची बहीण मदयंतिका हिच्याशी त्याचा प्रेमसंबंध जुळावा असे आहे. त्यांच्या प्रेमपूर्तीसाठी तिने बुद्धरक्षिता नामक शिष्येला सूचना दिल्या आहेत.

मुख्य प्रवेशात माधव व मकरंद उद्यानात बोलत बसलेले आहेत. सकाळीच देवालयाच्या परिसरात त्याची व मालतीची नजरभेट झालेली आहे. कामदेवाच्या यात्राप्रसंगी नागरिक उद्यानात जमले होते. माधव बकुलवृक्षाखाली बसून बकुळीची माळ गुंफत होता. इतक्यात मदनाची जणू चालती बोलती विजयपताका असलेली मालती उद्यानात आली. दोघे एकमेकाकडे पाहातच राहिले. तिला पाहताच तीही प्रेमासाठी झुरत असावी असे त्यास वाटले कारण -

''तिचे शरीर चुरडलेल्या कमलनालाप्रमाणे म्लान दिसत होते. सख्यांनी सांगितल्यावरच ती (स्नानादी) कार्ये करण्यास प्रवृत्त होत होती. तिच्या गालाची

शोभा नुकत्याच कापलेल्या हस्तिदंताच्या तुकड्याप्रमाणे मनोहर दिसत होती. तर कांती निष्कलंक चंद्राप्रमाणे सुंदर होती.''

(अंक १ श्लोक २२)

माधवाने हातातील माळ कशीबशी पूर्ण केली. नंतर मालती घरी जावयास निघाली. जाताना तिने त्याच्यावर अमृतमय व विषमय असलेला कटाक्ष टाकला. ती निघून गेली पण तिची सखी लवंगिका मागे थांबली होती. तिने माधवाकडून ताजी गुंफलेली बकुळीची माळ आठवण म्हणून मागून घेतली.

माधव आपल्या मित्रास हा वृत्तांत सांगत असता त्याचा अनुचर कलहंस हा उद्यानात येतो व माधवास चित्रफलक दाखवतो. त्याव्वर माधवाचे सुंदर चित्र रेखाटलेले असते. हे चित्र मालतीने काढले आहे असे समजताच माधवास आनंद होतो. तो लगेच आपल्या चित्राशेजारी मालतीचे चित्र काढतो व खाली एक श्लोकही लिहितो. नंतर माध्यान्ह झाल्याने दोघेही घरी जाण्यासाठी उठतात. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. मालतीच्या दोन मैत्रिणींच्या संभाषणावरून मकरंदाने माधवाकडून ऐकलेला उद्यानातील वृत्तांत कामंदकीच्या कानावर घातल्याचे समजते. तसेच राजाने नंदनाच्या वतीने मालतीस मागणी घालण्याचे ठरविलेले आहे हेही कळते. भगवती कामंदकीच आता यातून मार्ग काढील असा त्यांचा विश्वास आहे.

मुख्य प्रवेशात मालती व लवंगिका गच्चीवर संभाषण करीत आहेत. लवंगिका माधवाकडून आणलेली बकुळीची माळ मालतीच्या हातात देते. त्याचप्रमाणे माधवाकडून परत आलेला चित्रफलक दाखवते. माधवाच्या शेजारी आपले चित्र व त्याखाली लिहिलेला श्लोक पाहून मालती चकित होते. माधवाच्या प्रेमाविषयी आपण विनाकारण शंका घेतल्याबद्दल ती स्वत:ला बोल लावते.

मालती मदनविव्हळ झालेली दिसताच लवंगिका तिला म्हणते :-

''सखे, या जीवलोकात दुर्लभ अशा मनोरथाचे फल म्हणजे प्रियकराशी समागम होय, एवढे आम्हाला ठाऊक आहे.'' याचा अर्थ मालतीने साहस करून गांधर्व-विवाह करावा असा आहे. मालतीला ही सूचना पसंत पडत नाही. ती जात्याच शालीन व सुशील कुमारिका आहे. मदनव्यथा कितीही दु:सह झाली तरी असले साहस करण्याची तिची तयारी नाही. ती म्हणते -

"दररोज रात्री हा पूर्णचंद्र रात्रभर जळत राहो, मदन माझ्या शरीराचा खुशाल दाह करो. पण मला माझे परमपूज्य वडील, सत्कुलोत्पन्न आई व निष्कलंक घराणे हेच प्रिय आहे. त्यापुढे माझा प्रियकर किंवा माझे प्राण यांची मला पर्वा वाटत नाही."

(अंक २ श्लोक २)

मग कामंदकी प्रवेश करते. तिला मालतीच्या भवितव्याची चिंता वाटते. भूरिवसू हा राजनीतीत पारंगत आहे. पण अशा लोकांना आपल्या अपत्याविषयी प्रेम वाटत नाही. अन्यथा त्याने मालतीसाठी नंदनासारखा वृद्ध आणि कुरूप वर पसंत केला नसता. जाता जाता ती माधवाच्या रूपाची व कुलाशीलाची प्रशंसा करते. अशा प्रकारे मालतीच्या मनात प्रियकराविषयी तीव्र अभिलाषा व पर्यायाने नियोजित वराविषयी तिटकारा उत्पन्न करून ती एक प्रकारे दूतीची कामगिरीच पार पाडते. (अंक दुसरा)

दुसऱ्या अंकानंतर काही दिवसांनी तिसऱ्या अंकास प्रारंभ झालेला आहे. सुरुवातीच्या प्रवेशकात अवलोकिता व बुद्धरक्षिता यांच्या संवादावरून कामंदकीने माधवास निरोप पाठविल्याचे समजून येते. कृष्ण चतुर्दशीनिमित्त मालती आपल्या आईबरोबर शंकरपुराजवळ असलेल्या उद्यानात फुले वेचण्यासाठी जाणार आहे. त्या ठिकाणी माधवाने जावे असा निरोप आहे.

मुख्य प्रवेशात कामंदकी प्रवेश करते. मालती व माधव यांची पहिली भेट होऊन आता दीड महिना लोटलेला आहे. दरम्यान मालतीची अवस्था फारच बिकट झालेली आहे. म्हणून कामंदकीने पुन्हा त्या दोघांची भेट घडवून आणण्याचे ठरविले आहे. नंतर मालती, लवंगिका यांच्यासह कामंदकी उद्यानात येते. थोड्या वेळाने माधवही येतो. मालतीचे शब्द कानावर पडताच तो रोमांचित होतो. मग लवंगिका मालतीने आपल्या पदराआड लपवलेली तसबीर कामंदकीस दाखवते. तसेच बकुळीच्या फुलांची माळही दाखवते. आपण गुंफलेली माळ मालतीने घातलेली पाहून माधवाला धन्यता वाटते.

इतक्यात पडद्यातून आरडाओरडा ऐकू येतो. उद्यानातील प्राण्यांच्या पिंजऱ्यातील एक वाघ मोकाट सुटून दिसेल त्याला जखमी करीत आहे अशी वार्ता येते. इतक्यात बुद्धरक्षिका येऊन सांगते की नंदनाची बहीण मदयंतिका ही वाघाच्या तावडीत सापडलेली आहे. हे ऐकताच माधव त्वरित तिची सुटका करण्यासाठी निघतो. दरम्यान मकरंदाने तिला सोडवलेले असते. पण वाघाच्या

हल्ल्याने जखमी होऊन तो खाली पडतो. सर्व जण त्याच्याजवळ येतात. माधवाचे मकरंदावर इतके प्रेम आहे की तो घायाळ झाल्याचे पाहताच माधवालाही मूर्च्छा येते. (अंक तिसरा)

चौथ्या अंकात तेच दृश्य पुढे चालू आहे. माधव व मकरंद हे दोघे मालती व मदयंतिका यांच्या हस्तस्पर्शाने सावध होतात. इतक्यात नंदनाचा सेवक येऊन मदयंतिकेला घरी बोलावल्याचे सांगतो. त्यावरून मालतीचा नंदनाशी विवाह ठरल्याची वार्ता सर्वांना समजते. मालती आपली भावजय होणार याचा मदयंतिकेला आनंद होतो व ती तिला मिठी मारते. कामंदकी वरकरणी आपल्याला आनंद झाल्याचे दर्शविते. मदयंतिका जाताना मकरंदाकडे प्रेमपूर्ण कटाक्ष टाकते व निघून जाते.

ही बातमी ऐकताच माधव अत्यंत निराश होतो. कामंदकी त्याची समजूत घालते. इतकेच नव्हे तर हर प्रयत्न करून उभयतांचे मीलन घडवून आणण्याचे त्यास आश्वासन देते. मालतीचा तर धीरच सुटतो. कामंदकीच्या आश्वासनानंतरही तिची निराशा कमी होत नाही. ती कामंदकीबरोबर निघून जाते. माधव खिन्न होऊन मांसविक्रय करून आपली उपजीविका करण्याचे ठरवतो. तो व मकरंद पारा आणि सिंधू नद्यांच्या संगमावर स्नान करण्यासाठी निघून जातात. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक आहे. अघोरघंट नामक कापालिकाची शिष्या कपालकुंडला आकाशातून जाताना दिसते. पद्मावती नगरीच्या बाहेर स्मशान आहे व त्यात कराला देवीचे मंदिर आहे. या मंदिरात अघोरघंट राहात असून त्याने कपालकुंडलेस पूजेची सामग्री सिद्ध करण्यास सांगितले आहे. मुख्य म्हणजे देवीपुढे बळी देण्यास त्याला एका स्त्री-रत्नाची (म्ह. उत्तम स्त्रीची) जरूर आहे. कपालकुंडलेस माधव हा स्मशानात हिंडत असलेला दिसतो. ती आपल्या कामगिरीवर निघून जाते.

मुख्य प्रवेशात माधव दिसतो. तो मानवी मांसाची विक्री करण्यासाठी स्मशानात आलेला आहे. मालतीची मधुर आकृती त्याच्या नजरेसमोरून हलत नाही. तो पिशाच्यांना नरमांस घेण्याची विनंती करतो. त्याबरोबर मोठा गोंगाट सुरू होतो. भयाण दृष्ये दिसू लागतात. पण एकही पिशाच्च माधवाने आणलेले मांस घेण्यासाठी येत नाही.

इतक्यात त्याला एका स्त्रीची करुण किंकाळी ऐकू येते. तो कराला देवीच्या मंदिरात शिरतो. तेथे त्याला मालतीला बांधून घातलेले दिसते. अघोरघंट व

कपालकुंडला देवीची स्तुती करीत असतात. मालती गच्चीवर निजलेली असताना कपालकुंडलेने तिला उचलून आणलेले असते. अघोरघंट तिच्यावर शस्त्र उगारतो. मरणापूर्वी मालती माधवाचे स्मरण करते. माधव आवेगाने पुढे होऊन त्याच्या हातातील शस्त्र खाली पाडतो. अघोरघंट माधवास 'आधी तुझाच बळी देतो' अशी धमकी देतो. मालती घाबरून माधवाला बिलगते व त्याला झगडा न करण्याची विनंती करते. माधव तिला धीर देतो.

इतक्यात पडद्यातून घोषणा ऐकू येते. मालतीला बळी देण्यासाठी अघोरघंटानेच नेले असावे हा कामंदकीचा कयास खरा ठरतो. तिच्या सूचनेप्रमाणे रक्षकांनी देवळाभोवती वेढा घातलेला आहे. मालतीला रक्षकांच्या स्वाधीन करून माधव अघोरघंटावर धावून जातो. दोघे एकमेकांना आव्हान देत लढू लागतात. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या विष्कंभकात कपालकुंडला संतापाने फणफणत प्रवेश करते. माधवाने तिच्या गुरूचा अघोरघंटाचा वध केला आहे. केवळ स्त्री म्हणूनच माधवाने तिला जिवंत सोडलेले आहे. त्यामुळे ती त्याच्यावर सूड उगवण्याची प्रतिज्ञा करते व निघून जाते.

मुख्य प्रवेशात मालतीचे लग्न ठरलेले आहे. पाहुणे मंडळी येण्यापूर्वी तिने नगरदेवतेचे दर्शन घेऊन यावे अशी कामंदकीची सूचना आहे. तिला या निमित्ताने गावाबाहेर नेऊन मंदिरात थांबलेल्या माधवाशी तिचा गांधर्वविवाह लावायचा अशी कामंदकीची धाडसी योजना आहे. मालती हत्तिणीवर बसून त्या ठिकाणी येते. लवंगिका व ती मंदिराच्या गाभाऱ्यात जातात. तेथे मालती लवंगिकेजवळ आपला प्राणत्याग करण्याचा निश्चय प्रकट करते.

त्या दोघींचे संभाषण माधव व मकरंद यांच्या कानावर पडते. मग लवंगिका माधवास खूण करते. माधव गाभाऱ्यात जातो व लवंगिकेच्या जागी उभा राहतो. मालती आपल्या गळ्यातील बकुळीची माळ लवंगिका समजून माधवाच्या गळ्यात घालू लागते. तोच तिला आपली चूक उमगते. लवंगिका तिला धीर देते. मग कामंदकी तेथे येते. ती मालतीचा हात माधवाच्या हातात देते. दोघांचा गांधर्वविवाह संपन्न होतो. कामंदकीच्या डोळ्यात आनंदाश्रू गोळा होतात. ती माधवास म्हणते,

"माधवा, तुझ्यासारख्या लोकांचे प्रेम अखेरीस मधुर ठरणारे असले तरी, माझ्याविषयी तुझ्या मनात अनेक कारणासाठी जरी आदर असला तरी बाळा,

माझ्या अनुपस्थितीत तू या सुमुखीच्या बाबतीत कोणत्याही कारणाने निष्करुण होऊ नकोस.''

(अंक ६, श्लोक १६)

ती माधवाच्या पाया पडू लागते. माधव तिला आवरतो. राजाकडून वधूसाठी पोशाख व अलंकार आलेले असतात. ते मकरंदाला उपयोगी पडतात. तो वधूचा वेष घेऊन मिरवणुकीबरोबर जातो. माधव मालतीला घेऊन उद्यानाकडे जावयास निघतो. (अंक सहावा)

सातव्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. बुद्धरक्षिता सांगते की मालतीचा वेष धारण केलेल्या मकरंदाचा नंदनाशी विवाह झाला इतकेच नव्हे तर एकांतात नंदन त्याच्याजवळ आला व अनुनय करू लागला. नवरी वश होत नाही असे पाहून त्याने बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मकरंदाने त्यास लाथ मारली. तेव्हा तो चिडला व ''तुझ्यासारख्या कुलटेशी मला कर्तव्य नाही'' असे म्हणून तणतणत निघून गेला.

मुख्य प्रवेशात मकरंद मालतीच्या वेषातच शय्येवर बसून लवंगिकेशी वार्तालाप करीत आहे. मदयंतिका व बुद्धरक्षिता या दोघी नवरीची समजूत घालण्यासाठी येताच, तो पांघरूण घेऊन झोपतो. मदयंतिका नवरीच्या उद्दाम वर्तनाची निंदा करते. तेव्हा लवंगिका तिला खोचून म्हणते -

''तुझ्या भावासारखा चतुर, सुंदर आणि मधुर भाषण करणारा नवरा मिळाला म्हणून मालती त्रस्त झाली आहे.'' बुद्धरक्षिता तटस्थपणे मालती व नंदन या दोघांनाही दोष देते.

मदयंतिकेला आपल्या भावाचे दुर्वर्तन समजल्यावर वाईट वाटते. पण मालतीचे माधवावर प्रेम आहे, ही गोष्ट तिला ठाऊक आहे, पण तिचे म्हणणे असे की विवाह झाल्यावर मालतीने आपले पूर्वीचे प्रेम विसरून नंदनाशी गुण्यागोविंदाने संसार करावा. अशा प्रकारे संवाद चालू असता मकरंदाचा विषय निघतो. प्रियकराचे नाव ऐकताच मदयंतिका एकदम रोमांचित होते. मग मदयंतिका स्वप्नात मकरंदाशी केलेल्या क्रीडेचे वर्णन करते. तोंडावर शेला घेऊन मकरंद तिचे बोलणे ऐकत आहे.

मग बुद्धरक्षिता तिला विश्वासात घेऊन मकरंदाबरोबर पळून जाण्याची सूचना करते. मदयंतिकेची साहस करण्याची तयारी आहे. त्यामुळे मकरंद ताबडतोब स्त्रीवेश टाकून प्रकट होतो. तो मदयंतिकेला घेऊन नंदनाच्या वाड्याच्या बाहेर

पडतो. बाहेर पहारा करणारे रखवालदार झोपेत अथवा दारूत बुडालेले आहेत. (अंक सातवा)

आठव्या अंकाच्या प्रारंभी चारच ओळीचा प्रवेशक आहे. त्यात अवलोकिता ही सायंकाळी स्नान करून उद्यानात बसलेल्या मालती-माधवांची भेट घेण्यास निघाली आहे. मुख्य प्रवेशात माधव मालतीचा अनुनय करीत आहे. मालती आपल्या माता-पित्याच्या व विशेषत: लवंगिकेच्या आठवणीने व्याकूळ झालेली आहे. ती माधवाशी चार शब्द बोललीदेखील नाही.

माधवाला नंदनाच्या घरी काय घडले हे जाणून घेण्याची उत्सुकता आहे. त्यासाठी त्याने कलहंसास पाठवले आहे. इतक्यात अवलोकिता येऊन मकरंद मदयंतिकेस घेऊन बाहेर पडला असल्याचे सांगते. त्यानंतर लवंगिका, मदयंतिका, कलहंस व बुद्धरक्षिता त्या स्थळी येतात व नगरातल्या रक्षकांनी मकरंदास पकडल्याचे सांगतात. माधव ताबडतोब मकरंदाच्या भेटीस जातो.

ही वार्ता कामंदकीच्या कानावर घालण्यासाठी बुद्धरक्षिता व अवलोकिता या दोघी जातात. मालती लवंगिकेस माधवाच्या मागावर पाठवते. एकटी मदयंतिका तिच्या सोबतीस असते. पण थोड्या वेळाने तीही लवंगिका आली का ते पाहण्यासाठी उद्यानाबाहेर येते. उद्यानात मालती एकटीच आहे असे पाहून तिच्या मागावर असलेली कपालकुंडला तिच्यावर झडप घालते. मालती मोठ्याने ओरडून माधवाला हाका मारू लागते. तिला उचलून कपालकुंडला आकाशात झेप घेते. ती आता मालतीला श्रीपर्वतावर नेऊन ठार मारणार आहे.

मदयंतिका उद्यानात परत येते. लवंगिकाही त्वरेने तेथे येते. पण मालती तेथे नसते. दोघी तिला शोधू लागतात. नंतर तेथे कलहंस येतो व सांगतो की महाराज माधव व मकरंद यांच्या शौर्यावर खूष झाले आहेत व त्यांनी झगडा थांबवला आहे. महाराजांनी जातीने त्यांची चौकशी केली असून भूरिवसू व नंदन यांनाही बोलावून घेतले आहे.

कलहंस ही हकीकत सांगत असतानाच माधव व मकरंद प्रवेश करतात. त्या दोघांनी रक्षकांची हाडे चांगलीच मऊ केलेली आहेत. मग त्यांना मालती उद्यानातून नाहीशी झाल्याचे समजते. माधव कावराबावरा होतो. त्याचा डावा डोळा फडफडू लागतो. मालती कदाचित कामंदकीच्या निवासस्थानी गेली असावी, या समजुतीने सर्वजण तिकडे जावयास निघतात. (अंक आठवा)

नवव्या अंकाच्या सुरुवातीस विष्कंभक आहे, यात कामंदकीची योगिनी शिष्या सौदामिनी प्रवेश करते. ती श्रीपर्वताहून आकाश मार्गाने पद्मावतीस आली आहे. तिच्या बोलण्यावरून मालतीची हकीकत समजते. कपालकुंडलेने मालतीस श्रीपर्वतावर नेले. तेथे ती तिला ठार मारणार इतक्यात सौदामिनी तेथे प्रकट होते व मालतीचे प्राण वाचवते. ती माधवास घेऊन जाण्यासाठी पद्मावतीस आलेली आहे.

मुख्य प्रवेशात माधव व मकरंद प्रवेश करतात. माधव दु:खाने पुरता खचून गेलेला आहे. मालती एकाएकी कशी नाहीशी झाली हेच त्याला समजत नाही. त्याचा शोक हृदय पिळवटून टाकणारा आहे. बिचारा मकरंद त्याची समजूत घालण्याचा, त्याचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा निष्फळ प्रयत्न करीत आहे. दोघे डोंगरदऱ्यातून हिंडत आहेत.

त्या वेळी उन्हाळा संपून नुकतीच पावसाळ्यास सुरुवात झालेली होती. पण माधवाचे निसर्गशोभेकडे लक्ष नाही. त्याची अवस्था भ्रमिष्टासारखी झालेली आहे. तो मेघाला प्रश्न विचारतो. नंतर पशुपक्ष्यांना मालतीची वार्ता विचारतो. मालतीच्या प्राप्तीविषयी पूर्ण निराश होऊन तो मूर्च्छित होतो. माधवाची अवस्था पाहून मकरंदास इतके दु:ख होते की तो प्राणत्यागास तयार होतो. तो डोंगराच्या कड्यावरून पाटला नदीत उडी टाकणार इतक्यात सौदामिनी प्रकट होऊन त्यास थांबवते.

मकरंद तिला ओळखत नाही. पण ती त्याला ओळखते. माधवही शुद्धीवर येतो. सौदामिनी त्याच्या ओंजळीत बकुळीची माळ टाकते. मालती जिवंत असल्यांचे समजताच माधव तिला मालतीचा वृत्तांत विचारतो. ती त्यास वृत्तांत सांगते व योगमार्गाने माधवास तिकडे घेऊन जाते. मकरंद ही हकीकत कामंदकीस सांगण्यासाठी निघतो. (अंक नववा)

दहाव्या अंकाच्या सुरुवातीस कामंदकी, मदयंतिका आणि लवंगिका या मालतीचे गुण आठवून शोक करीत आहेत. मालती ही कामंदकीची अत्यंत लाडकी होती. जन्मापासून ती कामंदकीच्याच अंगाखांद्यावर वाढली होती. कामंदकीच्या नजरेपुढे सारा चित्रपटच उभा राहतो. ती म्हणते -

‘‘तिचे स्तनपान सुटल्यापासून मी तिला हस्तीदंताच्या बाहुल्याप्रमाणे खेळवले. चांगली शिकवण दिली. तिचे पोषण केले. त्याचप्रमाणे तिचा उत्तम

वराशी विवाह घडवून आणला. त्यामुळे माझ्या मनात तिच्याविषयी तिच्या प्रत्यक्ष आईपेक्षाही स्नेहभाव अधिक आहे.''

(अंक १० श्लोक ५)

लवंगिका ही मालतीची अत्यंत जिवलग मैत्रीण आहे. तेव्हां तिला शोक अनावर झाला, हे सांगायला नको. विशेष म्हणजे मदयंतिकाही प्राण देण्यास प्रवृत्त होते. या तिघी आता मधुमती नदीच्या प्रवाहात उडी मारणार इतक्यात त्यांचे डोळे दिपतात. योगिनी सौदामिनी प्रकट होते. ती त्यांना आत्मघातापासून परावृत्त करते.

मालतीचा पिता भूरिवसू हा अग्निप्रवेश करण्यास प्रवृत्त झालेला आहे. त्याला खुद्द राजा व नंदन यांनी आवरून धरले आहे. मालती दुरूनच आपल्या वडिलांस हाक मारते व बेशुद्ध पडते. मालती सुखरूप आहे असे दिसताच भूरिवसू राजाबरोबर निघून जातो. कामंदकी मालतीच्या मस्तकाचे अवघ्राण करते. मग सौदामिनी तिला येऊन वंदन करते.

अघोरघंटाच्या वधामुळे संतापलेल्या कपालकुंडलेने मालतीला उचलून नेले होते व सौदामिनीने तिचे प्राण वाचवले असा उलगडा होतो. सौदामिनीच्या उत्कृष्ट कामगिरीवर कामंदकी संतुष्ट होऊन तिची प्रशंसा करते. मग ती माधवाला राजाने लिहिलेले पत्र देते. त्यात राजाने माधवाचे अभिनंदन केलेले असते. तसेच मकरंद व मदयंतिका यांच्या विवाहास परवानगी दिलेली असते. शेवटी अवलोकिता, बुद्धरक्षिता व कलहंस नृत्य करतात व भरतवाक्याबरोबर नाटक समाप्त होते. (अंक दहावा)

* * *

नाट्यशास्त्राच्या परिभाषेत 'मालती-माधव' हे प्रकरण आहे. प्रकरणाचे स्वरूप मागे मृच्छकटिकाच्या विवेचनात स्पष्ट केले आहे. प्रस्तुत प्रकरणाची नायिका ही कुलीन असल्याने हे 'शुद्ध' प्रकारचे प्रकरण आहे. यात मुख्य कथानकाच्या जोडीला मकरंद व मदयंतिका यांचे उप-कथानक आहे. मकरंदानेच मालतीचा वेष घेऊन नंदनाशी विवाह केल्याने दोन्ही कथानके एकजीव झाली आहेत.

मात्र मालती-माधवाची कथावस्तू कविकल्पित नाही. बृहत्कथेतील दोन कथांवर ती आधारलेली आहे. अर्थात भवभूतीने नाटकाच्या प्रकृतीस अनुसरून त्यात उत्कृष्ट व कलात्मक बदल केले आहेत. उदा. मूळ कथेत दोन्ही

ब्राह्मणपुत्रांची भेट अगदी योगायोगाने झालेली आहे. या उलट माधव व मकरंद हे बालपणापासून मित्र असल्याचे दर्शविले आहे. त्यामुळे पुढील घटना सुसंगत बनली आहे. तसेच मूळ कथेतील मदिरावती एकदम उतावीळ होऊन गांधर्व विवाहास तयार होते. पण भवभूतीची मालती शालीन व सुसंस्कृत आहे. प्राण गेला तरी असले साहस करण्यास ती तयार नाही. नायिका सोज्ज्वळ असल्याने सर्वांच्या सहानुभूतीस पात्र ठरलेली आहे. हा बदल अत्यंत उचित व कलात्मक आहे. सारांश, भवभूतीने बृहत्कथेतील दोन कथांच्या आधारे आपल्या नाटकाचे कथानक विणण्याचा प्रयत्न केला आहे व तो बराच यशस्वी झाला आहे.

नाटकाच्या कथानकात काही कच्चे दुवे आढळून येतात. वास्तविक पाहता मालती व माधव यांचा सरळ विवाह होण्यास काही अडचण नव्हती पण नाटककाराने त्यांच्या मार्गात विघ्न उभे केले आहे. राजाचा नर्मसचिव नंदन हा राजामार्फत मालतीस मागणी घालतो व मालतीचा पिता त्यास संमती देतो. पण भवभूतीने नंदन हा उतारवयाचा व कुरूप आहे, असे दर्शविले आहे. विशेष म्हणजे भूरिवसूने आपल्या मुलीचे वय, रूप, मनोभाव, माधवाचे आगमन या कशाचाही विचार न करता लग्नाला मान्यता दिली आहे.

या प्रसंगाची कोंडी फोडण्यासाठी योजलेला मार्गही स्पृहणीय नाही. स्मशानातील प्रसंगाने काय साधले हेच समजत नाही. मूळ कथेत संन्याशाचा वध केल्यानंतर विदूषकाला राजकन्येची प्राप्ती झालेली आहे. पण नाटकात सदर घटनेने कोणताच फरक पडत नाही. तेव्हा कथानकाची सांधेजोड नीट साधली नाही असे म्हणावेसे वाटते.

तसेच नाटकातील कोणता भाग रंगभूमीवर दाखवायचा व कोणता भाग पडद्याआडून निर्दिष्ट करावयाचा याचा विचार नाटककाराला करावा लागतो. भवभूतीने अनेक महत्त्वाचे प्रसंग पडद्याआड घडलेले दाखवले आहेत. उदा. पहिल्या अंकातील बकुलमालेचा प्रसंग वास्तविक पाहता रंगभूमीवर प्रत्यक्ष दाखवायला हवा होता. पण नाटककाराने तो माधवाच्या तोंडून वदवला आहे. त्याने केलेले वर्णन कितीही उठावदार असले तरी प्रत्यक्ष दर्शनाने तो अधिक चांगला वठला असता.

त्याचप्रमाणे भूरिवसूसारखे अत्यंत महत्त्वाचे पात्र भवभूतीने रंगभूमीवरच आणले नाही. तो आपली राजकीय प्रतिष्ठा जपण्यासाठी मित्राला दिलेल्या वचनांचा भंग करतो. पोटच्या पोरीला दुःखाच्या खाईत लोटतो. असे घोर कर्म

करण्यास तो का प्रवृत्त झाला हे सांगण्यासाठी त्याला पडद्यावर आणायला हवे होते. त्याच्या अंत:करणातील खळबळ दाखवायला हवी होती. त्याला पडद्याआड ठेवून नाटककाराने स्वभावदर्शनाची मोठी संधी दवडली आहे.

असे काही दोष वगळता, मालती-माधवाची कथावस्तू उत्तम आहे. नाटकाची भाषा पुष्कळच चांगली आहे. संवादही आकर्षक व खटकेबाज आहेत. एखादा अपवाद सोडला तर कथानकाची सांधेजोड उत्तम आहे. त्याचे भाषेवर व वृत्तावर हुकूमी प्रभुत्व आहे. पद्यरचनेत त्याने सुमारे पंचवीस वृत्तांचा सफाईने वापर केला आहे. कराला देवीच्या तांडवनृत्याचे वर्णन करताना त्याने दंडक नावाचे अतिविशाल वृत्त योजले आहे. शिखरिणी हे त्याचे आवडते वृत्त आहे. या वृत्तात त्याने मुबलक रचना केली आहे. बीभत्स, रौद्र या रसांच्या वर्णनासाठी स्रग्धरा व शार्दूलविक्रीडित ही वृत्ते योजलेली आहेत. त्याची भाषा विविध अलंकारांनी नटलेली आहे. त्याची शैली केवळ भव्य, डौलदार व आलंकारिकच नाही तर तिच्यात मानवी अंतरंगात शिरण्याचे विलक्षण सामर्थ्य आहे. ती उत्कट, बेभान व प्रसंगी वाहावत जाणारी आहे आणि तरीही रसिकांची पकड घेणारी आहे.

नाटकाचा प्रमुख विषय म्हणजे मुलीचा विवाह आईबापांच्या मर्जीनुसार तिच्या प्रियकराशी न होता अन्य पुरुषाशी होणे हा आहे. सदर अनिष्ट विवाह टाळण्यासाठी वधूने प्रियकराबरोबर पळून जाणे, यासारखा उपाय नाटककाराकडून योजण्यात येतो. तथापि भवभूतीने मालतीचा स्वभाव सुशील असल्याचे दर्शवून या प्रकारास जणू विरोध केला आहे. यावरून त्यास प्रेमविवाह अभीष्ट असला तरी गांधर्व-विवाह इष्ट वाटत नसावा.

आता एखाद्या मुलीचा विवाह दुर्दैवाने अनिष्ट वराशी झालाच तर काय करायचे असा प्रश्न मनात येतो. या बाबतीत नाटककाराने आपले विचार मदयंतिकेच्या तोंडून व्यक्त केले आहेत. लग्न झाल्यावर त्या मुलीने आपले पूर्वायुष्य, प्रियकर विसरून जाणे हेच हितावह आहे. प्राप्त झालेल्या पतीशी संसार करणे हेच तिचे कर्तव्य आहे. तथापि इतर गोष्टींच्या वर्णनात हा विषय दृष्टीआड झाला आहे.

एवढी गुणवत्ता असूनही 'मालती-माधव' हे प्रकरण प्रथम दर्जाचे उतरलेले नाही. याला भवभूतीची नाट्यविषयक प्रामादिक धारणा कारणीभूत आहे. रंगभूमीवर काही अचाट, अतर्क्य घडावे, प्रेक्षकांच्या अंगावर शहारे येतील

अशी दृश्ये दिसावीत, उत्कट, प्रभावी भाषाप्रभुत्वाने प्रेक्षक दिपून जावेत असे त्याला वाटले. विस्ताराच्या मोहाला बळी पडून त्याने कथावस्तू खंडित केली आहे, तसेच अस्वाभाविक व अनावश्यक प्रसंगाची गर्दी करून सोडली आहे. याचे ठळक उदाहरण म्हणजे स्मशानाचा प्रवेश होय. 'स्मशानातील प्रसंग हे बांडगुळाप्रमाणे उपरे आहेत.' हे डॉ. भांडारकरांचे मत अगदी योग्य आहे.

संघर्ष हा नाटकाचा प्राण असतो असे म्हणतात. नाटकात संघर्ष आहे. पण तो दुभंगलेला आहे. त्यामुळे त्याला कोठेही धार चढलेली नाही. माधवाचा खरा प्रतिस्पर्धी नंदन आहे. पण माधवाला प्रत्यक्ष झगडा अघोरघंटाशी करावा लागला आहे. नंदनास नाटककाराने अगदीच हास्यास्पद करून सोडले आहे.

नाटकातील स्वभावचित्रण चांगले वठलेले आहे. कामंदकी, माधव, मालती, मकरंद, लवंगिका यांची चित्रणे उत्तम वठलेली आहेत.

**१) कामंदकी :** बौद्ध धर्माची उपासना करणारी कामंदकी ही नाटकातील सर्वात महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. ही भूरिवसू व देवरात यांची बालमैत्रीण आहे. तिच्या समोरच या दोघांनी आपल्या अपत्यांत विवाहसंबंध करण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्या दोघांतील मैत्रीसंबंध टिकून राहावा यासाठी ती मालती-माधवांचा विवाह व्हावा म्हणून मनापासून झटते. त्या कामी ती आपल्या धार्मिक कृत्यांनाही गौणस्थान येते. स्मशानातील प्रसंगानंतर त्या दोघांचा विवाह व्हावा म्हणून ती धाडसी कारस्थान रचते. नगरदेवतेच्या मंदिरात मालती आल्यानंतर ती त्यांचे लग्न लावते. या वेळचे तिचे भाषण अत्यंत हृदयस्पर्शी आहे. अशी प्राणाहून प्रिय असलेली मालती आठव्या अंकाच्या अखेरीस नाहीशी होताच तिचा धीर सुटतो. ती प्राणत्यागास सिद्ध होते.

ती सुशिक्षित, धर्मपरायण व दयाळू अंतःकरणाची आहे. प्रसंगावधानी, तशीच धाडसी आहे. येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाचा तिने अनुकूल कार्यासाठी उपयोग करून घेतला आहे. त्यातच तिचे मोठेपण आहे. नाटकाची सूत्रसंचालिका तीच आहे. मॉरिस विंटरविट्झ यांच्या मते नाटकाची खरी नायिका तीच आहे.

**(२) माधव :** विदर्भाचा अमात्य व भूरिवसूचा बालमित्र असलेल्या देवराताचा हा एकुलता एक मुलगा आहे. हा वयात येताच त्याच्या पित्याने त्यास आन्वीक्षिकी विद्येच्या निमित्ताने मुद्दाम पद्मावतीस पाठवले आहे. त्याच्याबरोबर त्याचा बालमित्र मकरंदही आहे. यात देवराताचा उद्देश भूरिवसूला

त्याच्या पूर्ववयातील प्रतिज्ञेचे स्मरण करून देणे हाच आहे. माधवाने आन्वीक्षिकी विद्या कितपत आत्मसात केली हे समजत नाही. पण तो फुलांची माळ गुंफण्यात, चित्र रेखाटण्यात व काव्यरचना करण्यात निपुण बनला आहे. मालतीला पाहिल्यानंतर तो मदनसंतप्त होतो. त्याचे मुळात सावळे असलेले शरीर फिकट पडते. तो शूर व धाडसी आहे. अघोरघंटास ठार मारून तो मालतीची सुटका करतो, तसेच मकरंदास रक्षकांनी पकडले आहे असे समजल्यावर त्याच्या मदतीस धावून जातो. मालती नाहीशी झाल्यावर तो वेडापिसा होतो. तो नाटकाचा नायक म्हणून अनुरूप आहे. तो तरुण, देखणा व मोहक आहे. तसेच हळवा व उतावळ्या स्वभावाचा आहे. मकरंद बेशुद्ध पडलेला दिसताच त्यालाही दु:खाने भोवळ येते इतके त्याचे अंत:करण कोमल आहे.

**(३) मालती :** पद्मावतीनगरीचा अमात्य भूरिवसू याची ही एकुलती एक मुलगी आहे. ती साधी-भोळी, कुलीन, विनम्र व सच्छील आहे. तिच्या वाड्यासमोरच्या रस्त्यावरून जाणाऱ्या माधवाला ती पाहते व त्याच्या प्रेमात पडते. ही सारी योजना कामंदकीची आहे. लवंगिका ही तिची जिवलग मैत्रीण आहे. मनाला विरंगुळा वाटावा म्हणून ती माधवाचे सुंदर चित्र रेखाटते. आपल्याला वडिलांनी नंदनास द्यावयाचे ठरवले आहे असे समजताच तिला धक्काच बसतो. मात्र माधवाशी गांधर्व-विवाह करण्याची तिची तयारी नाही. माधवावर मात्र तिचे नितांत प्रेम आहे. स्मशानातील प्रसंगात कपालकुंडला तिला बळी जाण्यापूर्वी प्रिय व्यक्तीचे स्मरण करण्यास सांगते तेव्हा तिच्या ओठावर माधवाचेच नाव येते.

स्मशानातील प्रसंगानंतरही तिच्या डोक्यावर भयाची टांगती तलवार होतीच. नंदनाशी लग्न करण्याचा प्रसंग आलाच तर तिने प्राणांचा त्याग करण्याचे ठरवले होते. कामंदकीने आपल्या कटाचा तिला सुगावा लागू दिला नाही. त्यामुळे मंदिराच्या गाभाऱ्यात ती प्राण देण्यास प्रवृत्त होते. पण तिचे संकट पूर्ण टळले होते. कामंदकी दोघांचे लग्न लावते. दोघांचे ईप्सित पूर्ण होते. यापुढे दोन अंक कथानक शिल्लक असले तरी मालतीची स्वभावरेखा पूर्ण झाली आहे.

**(४) मकरंद :** हा माधवाचा बालपणापासूनचा जिवलग मित्र आहे. हे दोघे लहानपणी एके ठिकाणीच वाढले होते. इतकेच नव्हे तर तो माधवाचा दूधभाऊ असल्याचा उल्लेख नवव्या अंकात (अंक ९, श्लोक ४०) आलेला आहे. हा

माधवाबरोबर पद्मावतीस आला आहे. कामंदकीने नंदनाची बहीण मदयंतिका ही त्याच्यासाठी वधू म्हणून ठरवली आहे. तो शस्त्रयुद्धात निपुण आहे. तो मदयंतिकेला वाघाच्या तावडीतून सोडवतो. यानंतरची त्याची कामगिरी म्हणजे मालतीचा वेष धारण करून नंदनाशी विवाहासाठी उभे राहणे. ही कामगिरी तो चोख रीतीने पार पाडतो. त्याच्या सुदैवाने मदयंतिकाही त्याला अनुकूल होते. तिला घेऊन वाड्याच्या बाहेर आल्यावर रक्षक त्यास पकडतात. त्यांच्याशी लढून तो त्यांना जेरीस आणतो.

मकरंद हुषार, शूर व प्रेमळ आहे. माधवाच्या ठिकाणी त्याची अनन्यसाधारण निष्ठा आहे. कामंदकीच्या कारस्थानातली सर्वात महत्त्वाची कामगिरी मकरंदानेच पार पाडलेली आहे. नवव्या अंकात माधव मूर्च्छित होताच त्याला शोक आवरत नाही. माधवाशिवाय जिवंत राहण्याची कल्पनाही त्यास असह्य होते. म्हणून तोही प्राणत्यागास सिद्ध होतो. मकरंदासारखा जिवलग मित्र लाभणे ही भाग्याची गोष्ट आहे.

**(५) लवंगिका :** ही मालतीची अत्यंत जिवलग मैत्रीण आहे. खरे तर ती मालतीच्या दाईची मुलगी आहे. ती मालतीला हर प्रकारे साहाय्य करते. अष्टौप्रहर ती मालतीच्याच सहवासात असते असे म्हणावयास हरकत नाही. ती बोलण्यात अत्यंत चतुर आहे. तिच्या तोंडी अनेक सुंदर वाक्ये घातलेली आहेत. ती उपरोधिक बोलण्यातही पटाईत आहे. सातव्या अंकात मदयंतिका मालतीच्या उद्दाम वर्तनाबद्दल तिचा (म्ह. वधूचा वेष घेतलेल्या मकरंदाचा) अधिक्षेप करते तेव्हा लवंगिका तिला समर्पक उत्तर देते. नंदनाच्या घरात व त्याच्या बहिणीसमोर इतके झणझणीत बोलण्याचे तिचे धाडस पाहून नवल वाटते. मालती नाहीशी होताच तिचे आकाशच फाटते. या प्रसंगी तिने काढलेले उद्गार अंतःकरणाला पीळ पाडणारे आहेत. ती म्हणते – "मदयंतिके, काय करू? माझे प्राण जणू वज्रलेप केल्याप्रमाणे शरीराला घट्ट चिकटले आहेत. ते त्यास सोडायला तयार नाहीत." ती नुसते असे बोलत नाही तर डोंगराच्या कड्यावरून उडी मारण्यास तयार होते. भवभूतीने नायिकेच्या या जिवलग सखीचे मनोरम चित्र रेखाटले आहे.

सिद्धी प्राप्त करून घेण्यासाठी सुंदर स्त्रियांना बळी देणारा अघोरघंट हा निव्वळ दुष्ट व निर्दय आहे. त्याच्या ठिकाणी माणुसकीचा अंशही नाही. कपालकुंडलेचे चित्रण ठसठशीत आहे. ती गुरुनिष्ठ आहे. ती मालतीला उचलून मंदिरात आणते.

गुरूचा शिरच्छेद झाल्यावर सूड उगविण्याची प्रतिज्ञा करते. त्यानुसार तिला दुसऱ्यांदा पळवते. या खेपेस तिचा उद्देश मालतीला ठार मारणे हा असतो. मकरंदाप्रमाणे कपालकुंडलेने महत्त्वाची कामे पार पाडली आहेत.

मालतीचा पिता भूरिवसू, नियोजित वर नंदन व राजा ही पात्रे तशी महत्त्वाची असूनही नाटककाराने पडद्याआड ठेवली आहेत. यांपैकी फक्त भूरिवसूच्या व्यक्तिरेषेवर नजर टाकू. हा पद्मावती नगरीचा अमात्य आहे. पण याच्या ठिकाणी दयामाया अथवा व्यावहारिक शहाणपणही दिसत नाही. माधव पद्मावतीस आलेला आहे हे समजल्यावर तो त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. मालतीचा प्रत्यक्ष पिता असून तो तिला खुशाल दुःखाच्या खाईत लोटतो. तिचे अपहरण होऊन व प्राणसंकटातून ती सुटून घरी आल्यावर हा प्रेमळ (!) पिता तिची विचारपूस करीत नाही. माधवाला भेटून त्यास शाबासकी देत नाही. असा हा रुक्ष व भेंकड पुरुष मालती दुसऱ्यांदा नाहीशी झाल्यावर कन्याप्रेमाचा उमाळा येऊन अग्निप्रवेश करण्यास तयार होतो आणि मालती सुखरूप आहे असे समजल्यावर चक्क निघून जातो. अर्थात हे पडद्याआडचे पात्र आहे. याला पडद्यावर न आणण्यात नाटककाराने फार मोठी चूक केली आहे.

महावीरचरिताशी तुलना करता मालती-माधवाची रचना करण्यात कवीने बरीच प्रगती केलेली दिसते. यातील प्रणयकथा चांगली फुलवलेली आहे. मालती-माधवाच्या प्रथमभेटीपासून विवाह होईतोपर्यंतचे त्यांचे सूक्ष्म मनोभाव त्याने कौशल्याने टिपले आहेत. माधव व मकरंद यांची मैत्री, कामदंकीचा हिकमतीपणा, लवंगिका व अवलोकिता यांची मालतीवरील अजोड माया, मदयंतिकेचा उच्छृंखल पण प्रेमळ स्वभाव, मालतीचा अभिजात कुलीनपणा हे सारे विशेष नाटककाराने अगदी बारकाईने दाखवले आहेत. या नाटकाने त्यास उत्तम नाटककार बनवले. पण ज्या नाटकामुळे तो महान नाटककार बनला त्या 'उत्तररामचरिता'ची आता ओळख करून घेऊ.

## उत्तर-रामचरित

'उत्तरे रामचरिते भवभूतिर्विशिष्यते' अशी रसिकांनी एकमुखाने ग्वाही दिलेली आहे. नांदीत कवीने दैवी वाणी आपल्यावर प्रसन्न व्हावी म्हणून पूर्वसूरींना वंदन केले आहे. सूत्रधार व नट यांच्या संभाषणावरून रामाच्या राज्याभिषेकासाठी

आलेले लंकेतील वानर, राक्षस, ऋषिमुनी हे सर्व परत गेले आहेत, हे समजते. तसेच दशरथाचा जावई ऋष्यशृंग याच्याकडे बारा वर्षे चालणारा यज्ञ सुरू झाल्याने कौसल्या वगैरे राण्या, गुरू वसिष्ठ, अरुंधती हे तिकडे गेले आहेत. जनकही मिथिलेस परत गेला आहे. राजवाड्यात राम, सीता, लक्ष्मण व काही सेवक यांवाचून कोणी नाही. सीतेचे सांत्वन करण्यासाठी राज्यकारभाराचे काम आटोपल्यावर राम अंत:पुरात आलेला आहे. सीता ही रावणाच्या घरी राहिलेली असल्याने लोक तिच्या चारित्र्याविषयी साशंक आहेत, असेही सूत्रधाराने सूचित केले आहे.

राम व सीता बोलत असता ऋष्यशृंगाच्या आश्रमातून वसिष्ठांचा निरोप घेऊन अष्टावक्र येतो. राजमातांनी सीतेचे डोहाळे पूर्ण करण्याचा रामास निरोप दिला आहे. तसेच वसिष्ठांनी त्यास प्रजाहिताविषयी दक्ष राहण्यास सांगितलेले आहे. यावर राम म्हणतो 'प्रेम, दया, सौख्य यांचाच काय पण प्रजाजनांचे हित साधण्यासाठी प्रत्यक्ष सीतेचाही त्याग करण्याची माझी तयारी आहे.'

सीतेची करमणूक करण्यासाठी रामाने आपल्या पूर्वायुष्यातील प्रसंगावर आधारलेली चित्रे काढून घेतलेली आहेत. राम, सीता व लक्ष्मण ती चित्रे पाहू लागतात. रामाच्या विवाहाचा प्रसंग, दशरथ जिवंत असल्याच्या काळातील चित्रे पाहताना राम गहिवरतो. तो म्हणतो -

"त्या वेळी आमचे परमपूज्य वडील जिवंत होते. आम्हा सर्वांचा नुकताच विवाह झालेला होता आणि आमच्या माता आमची सर्वतोपरी काळजी घेत होत्या. ते आमचे दिवस आता निघून गेले."

(अंक १, श्लोक १९)

त्यानंतर लक्ष्मण मंथरेचे चित्र दाखवतो. पण वनवासात जाण्याचा तो अप्रिय प्रसंग टाळून राम वनवासातील प्रसंग पाहू लागतो. मग शूर्पणखेचे चित्र दिसते. सुवर्णमृगाची योजना करून रावणाने कपटाने सीतेचे अपहरण केल्यावर रामाने असा शोक केला की तो ऐकून पाषाणांनाही पाझर फुटला व वज्राचेही हृदय विदीर्ण झाले.

चित्रे पाहताना सीता थकून जाते तेव्हा लक्ष्मण चित्रे दाखवण्याचे थांबतो. ती चित्रे पाहून पुन्हा वनराईत विहार करावा व गंगेच्या पवित्र पाण्यात स्नान करावे अशी सीतेला इच्छा होते. राम लक्ष्मणास रथ सज्ज करण्यास सांगतो.

सीता रामाच्या खांद्यावर डोके ठेवून झोपी जाते. तिला प्रेमाने न्हाहाळत राम स्वत:शी म्हणतो -

"ही जणू घरातील लक्ष्मी आहे. डोळ्यांना आनंदित करणारी अमृताची शलाका आहे. हिचा स्पर्श म्हणजे अंगास लावलेली चंदनाची उटी आहे. गळ्यात घातलेला हिचा हात म्हणजे स्निग्ध व शीतल असा मोत्याचा दुसरा हारच आहे. तिचे काय म्हणून प्रिय नाही? असह्य आहे तो फक्त तिचा विरह -"

(अंक १, श्लोक ३८)

यानंतर दुर्मुख नावाचा हेर येऊन रामास सीतेविषयी पसरलेला लोकप्रवाद सांगतो. तो ऐकताच रामाला मूर्च्छा येते. आपले मन आवरून तो लक्ष्मणास निरोप पाठवतो. दुर्मुख निघून गेल्यावर राम हताश होतो -

"सदैव दु:ख सहन करण्यासाठीच या रामाच्या शरीरात जणू चैतन्य वास करीत आहे. मर्मस्थानी आघात करणारा हा प्राण बाहेर जात नाही. तो वज्राच्या खिळ्याप्रमाणे आत अगदी रुतून बसला आहे."

(अंक १, श्लोक ४७)

जाताना राम सीतेच्या चरणास वंदन करतो. तो गेल्यावर सीता जागी होते. राम आपल्याला एकटीच सोडून गेल्याचे पाहून तिला नवल वाटते. इतक्यात लक्ष्मणाकडून रथ तयार असल्याचा निरोप येतो. मग ती वनविहार करण्यासाठी निघते. (अंक पहिला)

पहिल्या अंकानंतर बारा वर्षे उलटल्यावर दुसऱ्या अंकास प्रारंभ झाला आहे. सुरुवातीस विष्कंभक असून त्यात वाल्मीकीच्या आश्रमातील आत्रेयीनामक विद्यार्थिनी व वनदेवता वासंती यांचा संवाद आहे. त्यांच्या संवादावरून वाल्मीकीच्या आश्रमात दोन मुले आलेली असून त्यांना जन्मत: जृम्भकास्त्रे अवगत आहेत असे समजते. ती मुले अत्यंत हुशार असल्याने त्यांच्याबरोबर अध्ययन करणे आत्रेयीस अवघड होऊ लागले. तसेच वाल्मीकींनी रामायण कथेची रचना केल्याचा ती उल्लेख करते.

नंतर आत्रेयी सीतेविषयी उठलेला प्रवाद, रामाने तिचा केलेला त्याग याविषयीही सांगते. वासंती ही सीतेची पूर्वीची मैत्रीण असल्याने हे सारे ऐकून तिला मूर्च्छाच येते. नंतर रामाने अश्वमेध यज्ञ सुरू केल्याचे समजते. परंतु त्याने विवाह न करता सीतेची सुवर्णप्रतिमा तयार केल्याचे ऐकून ती चकित होते. ती म्हणते -

“वज्राहून कठोर व प्रसंगी फुलापेक्षाही कोमल बनणारी थोर पुरुषाची अंत:करणे कोणाला बरे जाणता येतील?”

(अंक २, श्लोक ७)

आत्रेयी पुढे सांगते की रामाने सोडलेल्या यज्ञीय अश्वाचे रक्षण लक्ष्मणाचा मुलगा चंद्रकेतू करीत आहे. त्याचप्रमाणे शंबूक नावाच्या शूद्राने तपाचरण करण्याचे पातक केल्याने अयोध्येत ब्राह्मणाचा मुलगा अकाली मरण पावला. त्यामुळे शंबुकाचा शिरच्छेद करण्यासाठी राम पंचवटीत आला आहे.

मुख्य प्रवेशात राम पुष्पक विमानातून येतो व शंबुकावर प्रहार करतो. त्याबरोबर त्याचे दिव्य पुरुषात रूपांतर होते. त्याच्या बोलण्यावरून रामास आपण दंडकारण्यात आल्याचे समजते. तेथील पूर्वीची ओळखीची ठिकाणे पाहात असता रामाला सीतेचे स्मरण होते. त्याला अनावर दु:ख होते -

“एखादा तीव्र विषरस इतक्या अवधीनंतर वेगाने शरीरात घुसून सगळीकडे पसरावा अथवा मांसात रुतलेले बाणाचे अग्र धक्का लागल्यावर सलावे किंवा मर्मभागावरील व्रण फुटून वाहू लागावा, त्याप्रमाणे हा माझा तीव्र शोक नव्याने उत्पन्न झाल्याप्रमाणे मला व्यथित करीत आहे.”

(अंक २, श्लोक २६)

त्यानंतर शंबूक परत येऊन रामाला अगस्ती मुनीचा निरोप सांगतो. त्यानुसार राम त्यांची भेट घेण्यासाठी निघतो. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस विष्कंभक असून त्यात तमसा व मुरला या दोन नद्यांचे संभाषण आहे. मुरला ही नदी सांगते की सीतेच्या वियोगाने उद्भवलेल्या दीर्घ शोकामुळे राम अत्यंत क्षीण झाला आहे. त्यामुळे पंचवटीतील ती ती परिचित स्थळे त्याच्या नजरेस पडली तर अनर्थ होण्याची शक्यता आहे. यावर तमसा नदी सांगते की, भागीरथीने यासाठीच गोदावरीच्या भेटीला येताना सीतेलाही आणले आहे.

मुख्य प्रवेशात सीतेचा आवाज ऐकून राम आपले विमान थांबवतो व पंचवटीत उतरतो. पंचवटीचा परिसर नजरेस पडताच तो मूर्च्छित होतो. तमसेच्या विनंतीवरून सीता रामास स्पर्श करून सावध करते. सीता त्या वेळी छाया रूपात असते. त्यामुळे ती रामाला दिसत नाही पण ती मात्र त्यास पाहात असते. रामाने सीतेचा विनाकारण त्याग केल्याने वनदेवता वासंतीच्या मनात क्रोध धुमसत असतो. ती त्याला रागाने विचारते -

"तू माझे जीवित आहेस, माझे दुसरे हृदयच आहेस. माझ्या डोळ्यांना आनंद देणारी चंद्रिका आहेस." इत्यादी शेकडो प्रिय भाषणांनी त्या भोळ्या सीतेस भुलवलेस आणि तिलाच- जाऊ दे. पुढे बोलून तरी काय उपयोग आहे ?

(अंक ३, श्लोक २६)

मग ती रामास सीतेचा त्याग करण्याचे कारण विचारते. राम तिला लोकापवादाचे निमित्त सांगतो. त्यांचा संवाद सीता ऐकत आहे. सीतेचा त्याग करताना झालेला शोक रामाने आपल्या अलोट धैर्यानेच सहन केलेला आहे. रामाला पुन्हा मूर्च्छा येते. सीता पुनः त्याला स्पर्श करते. एकाएकी राम तिचा हात गच्च धरतो. तिच्या अमृतमय स्पर्शाने तो बेभान होतो. सीता आपला हात कसाबसा सोडवून घेते. राम शेवटी वासंतीचा निरोप घेतो. आता सीतेच्या मनातला राग निवळलेला आहे. हृदयातले शल्य दूर झालेले आहे. जाताना तमसा नदी आनंदाने उद्गाराने - 'अहो, काय हे आश्चर्यकारक संविधानक आहे!' (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या प्रारंभी मिश्र विष्कंभक असून त्यात वाल्मीकीच्या आश्रमातील सौधातकी व भांडायन या दोन विद्यार्थ्यांचा संवाद आहे. त्यावरून वसिष्ठ व दशरथाच्या सर्व राण्या वाल्मीकीच्या आश्रमामध्ये आलेल्या आहेत. तसेच राजर्षी जनकही तेथे आलेला आहे, असे समजते. सर्व पाहुणे मंडळी आल्यामुळे आश्रमातील विद्यार्थ्यांना सुटी मिळालेली आहे.

मुख्य प्रवेशात जनक प्रवेश करतो. रामाने सीतेचा त्याग केल्यापासून तो अत्यंत व्यथित झालेला आहे. बारा वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतरही दुःख, संताप त्याचे अंतःकरण एखाद्या करवतीप्रमाणे कापत आहेत. मग अरुंधती कौसल्येस घेऊन त्या ठिकाणी येते. रामाने सीतेचा त्याग केल्यामुळे कौसल्येने त्याचे मुखावलोकनही न करण्याचा निर्धार केलेला आहे. सीतेच्या अग्निपरीक्षेचा विषय निघताच जनक रागारागाने विचारतो, "आमच्या कन्येस शुद्ध करणारा हा अग्नी कोण?" तर अरुंधती म्हणते, "गुणीजनांचे गुण हेच आदराला कारणीभूत होतात. त्यांचे लिंग अथवा वय कोणी विचारात घेत नाहीत."

अरुंधती कौसल्येचे सांत्वन करते. वसिष्ठमुनींनी 'अखेरीस सर्व चांगले होणार आहे,' असा जो आशीर्वाद दिला होता, त्याचे स्मरण करून देते. पडद्यात गलबला होतो. लव आपल्या सवंगड्यांबरोबर खेळत असतो. तो जनकाच्या दृष्टीस पडतो. "हा कोणाचा मुलगा आहे.?" असा तो सहज प्रश्न विचारतो

पण अरुंधती त्या प्रश्नाचे उत्तर देत नाही. लवाला पाहताच जनकास व कौसल्येस राम व सीतेचे स्मरण होते. खुद्द लवाला प्रश्न विचारताच तो 'मी भगवान वाल्मीकींचा मुलगा आहे' असे उत्तर देतो. त्यामुळे सर्वांना हसू लोटते.

रामाने सोडलेला अश्वमेध यज्ञाचा घोडा वाल्मीकीच्या आश्रमाच्या परिसरात त्या वेळी आलेला होता. त्या घोड्याचे रक्षण लक्ष्मणाचा मुलगा चंद्रकेतू हा करीत आहे, हे ऐकताच लव आपले रामायणविषयक ज्ञान प्रकट करतो. वाल्मीकी ऋषींनी रामायण कथा लिहिली असल्याचे लव सांगतो. इतकेच नव्हे तर रामाच्या चरित्रातील उत्तरार्धाला त्यांनी नाटकाचे स्वरूप दिले असून तो भाग भरतमुनींकडे पाठविल्याची हकीकत सांगतो.

इतक्यात आश्रमातील काही मुले त्या ठिकाणी येतात. आश्रमाच्या आवारात घोडा दिसल्यामुळे ती चकित झालेली आहेत. कारण त्यांनी तो प्राणी पूर्वी कधीच पाहिलेला नव्हता. त्यांना केवळ 'अश्व' हा शब्दच ठाऊक होता. ते लवाला घेऊन बाहेर येतात. लव तो अश्वमेध यज्ञाचा घोडा आहे हे ओळखतो. तो घोड्याला अडवतो व आपल्या सहकाऱ्यांना त्या घोड्यास धरून आश्रमातील हरणांच्या सोबतीस नेण्यास सांगतो. तेवढ्यात एक सैनिक येऊन मुलांना दमदाटी करू लागतो. तेव्हा लव त्यालाच धनुष्याचा धाक दाखवतो. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या प्रारंभी लवाचे सैनिकांशी युद्ध जुंपलेले आहे. आपल्या घोड्याला कोणी अडवले आहे हे पाहण्यासाठी चंद्रकेतू तेथे येतो. लव व चंद्रकेतू एकमेकास पाहतात. त्यांना एकमेकाबद्दल स्नेह वाटतो. मग लव जृम्भकास्त्राचा उपयोग करून सर्व सैन्यास निद्राधीन करतो. तेव्हा या मुलास जृम्भकास्त्रे अवगत असल्याचे पाहून सुमंत्र आश्चर्यचकित होतो. कारण ही अस्त्रे फक्त रामालाच प्राप्त झाली आहेत हे त्याला ठाऊक आहे. तेव्हा 'हा रामाचा तर मुलगा नसेल?' अशी शंका त्याला चाटून जाते. लव व चंद्रकेतू यांच्यात बोलाचाली होते. मग रामाचा विषय निघतो. लव प्रथम परशुरामाबद्दल व नंतर खुद्द रामचंद्राबद्दल अनुदार उद्‌गार काढतो. चंद्रकेतूचा संताप अनावर होतो. मग दोघे युद्धभूमीकडे जातात. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या सुरुवातीस शुद्ध विष्कंभक आहे. त्यात विद्याधराचे एक जोडपे आकाशातून लव व चंद्रकेतू यांच्यातील युद्ध पाहात असल्याचे दाखवले आहे. त्यांच्या संवादावरून लव व चंद्रकेतू एकमेकावर अस्त्रांचा मारा करीत असता अयोध्येकडे परत जाणारा राम ते युद्ध पाहतो व ते तो थांबवण्याचा

इशारा देतो. त्याचे विमान खाली उतरते. चंद्रकेतू रामाला वंदन करतो. ही हकीकत समजते. नंतर विद्याधर मिथुन निघून जाते.

मुख्य प्रवेशात चंद्रकेतू रामास लवाची ओळख करून देतो. लवाची मधुर आकृती पाहून रामाला आनंद वाटतो. लवही रामाच्या प्रत्यक्ष दर्शनाने प्रभावित होतो. त्याच्या मनातला सारा विरोध मावळतो. तो म्हणतो -

"याला पाहताच माझा विरोध मावळला. हृदय एक प्रकारच्या आनंदाने भरून गेले, उद्धटपणा कोठच्या कोठे निघून गेला. विनयाने मनाचा ताबा घेतला. याच्या दर्शनाने माझी वृत्ती अशी पराधीन का व्हावी? खरेच. तीर्थक्षेत्राचा व मोठ्या लोकांचा प्रभावच काही विलक्षण असतो.

(अंक ६, श्लोक ११)

लवाला जृम्भकास्त्रे अवगत असल्याचे समजताच रामाला आश्चर्य वाटते. त्यानंतर कुश येतो व रामाला नमस्कार करतो. त्याला आलिंगन देताना 'हा आपला मुलगा असेल काय?' अशी शंका त्याच्या मनात डोकावते. त्या दोन्ही मुलांच्या ठिकाणी त्याला रघुकुलातील कुमारांची अनेक लक्षणे आढळतात. मुख्य म्हणजे त्यांचा तोंडवळा अगदी सीतेच्या चेहऱ्यासारखा आहे. तसेच लव व कुश हे जुळे भाऊ आहेत हे समजल्यावर तो चमकतो. कारण पूर्वी सीतेच्या गरोदरपणी हस्तस्पर्शाच्या योगे तिचा गर्भ द्विधा असावा असे त्याला जाणवले होते.

लव रामाच्या डोळ्यांतील आसवे पाहून गांगरतो. कुश त्याला रामायणाचा संदर्भ सांगतो. रामाने विचारल्यावरून कुश त्याला बालकांडाच्या अखेरचे दोन श्लोक म्हणून दाखवतो. त्यामध्ये सीता व राम यांच्या परस्परावरील उत्कट प्रेमाचा उल्लेख आहे. त्यानंतर लवही राम चित्रकूट पर्वतावर सीतेसमवेत असतानाच्या वेळेचा एक श्लोक म्हणतो. त्या श्लोकाचा मथितार्थ शृंगारिक आहे. पण लव तो श्लोक अगदी निरागसपणे म्हणतो. तो श्लोक ऐकताच रामाला सीतेसमवेत केलेल्या विहाराचे स्मरण होते.

त्यानंतर पडद्यातून शब्द येतात. जनक, वसिष्ठ मुनी व आपल्या तीन माता आश्रमात असल्याचे रामाला समजते. रामाची खंगलेली शरीरयष्टी पाहून जनक व कौसल्या वगैरे मातांना मूर्च्छाच येते. राम अत्यंत व्यथित अंत:करणाने त्यांची भेट घेण्यासाठी आत जातो. (अंक सहावा)

सातव्या अंकात 'गर्भाङ्क' (म्ह. नाटकातील नाटक) आहे. गंगेच्या तीरावर नाट्यप्रयोगाची सारी तयारी झाली आहे. प्रेक्षकात देव, दानव, गंधर्व, मानव हे सारे आहेत. मग सूत्रधार प्रवेश करतो व महर्षी वाल्मीकींनी सादर केलेले नाटक पाहण्याची प्रेक्षकांना विनंती करतो. रामही प्रेक्षकातच बसलेला आहे.

गर्भांकात सीता प्रवेश करते. तिला नुकतीच दोन जुळी मुले झाली आहेत. तिच्या शेजारी गंगा व पृथ्वी या उभ्या आहेत. आपल्याजवळ राम हजर नाही म्हणून सीता व्यथित झालेली आहे. रामाने आपल्या पत्नीचा विनाकारण त्याग केल्याबद्दल पृथ्वी-सीतेची आई-रामावर रागवलेली आहे. सीता आपल्या आईला फिरून आपल्या पोटात जागा देण्याची विनंती करते. तेव्हा पृथ्वी म्हणते :- "तू त्यांचे स्तनपान सुटेपर्यंत सांभाळ कर, त्यानंतर महर्षी वाल्मीकी त्यांचे रक्षण करतील."

येथे गर्भांक समाप्त होतो. याचा अर्थ 'सीता आता जिवंत नाही.' हा अर्थ उमगताच राम मूर्च्छित होतो. पण नंतर वाल्मीकीच्या प्रभावाने गंगा व पृथ्वी सीतेला घेऊन वर येतात असे दृश्य दिसते. सीता प्रवेश करते व अरुंधतीच्या सांगण्यावरून रामाच्या कपाळास स्पर्श करते. त्याबरोबर तो सावध होतो. ज्यांचा रोष पत्करावा लागू नये म्हणून रामाने सीतेचा त्याग केला त्या अयोध्यावासी नगरजनांना उद्देशून अरुंधती म्हणते - "हे पौरजन हो, पृथ्वी आणि गंगा ह्यांनी जिची प्रशंसा करून माझ्याकडे सोपविली आहे ती सीतादेवी आहे. साक्षात अग्नीनेदेखील हिच्या पवित्रतेबद्दल व पातिव्रत्याबद्दल खात्री करून दिलेली होती. ब्रह्मादी देवतांनी हिची स्तुती केली होती. ती यज्ञभूमीतून बाहेर आलेली, सूर्यवंशाची कुलवधू अशी सीता - तिचा स्वीकार करण्याबाबत आपल्याला काय वाटते?"

अरुंधतीने अशा प्रकारे कानउघाडणी केलेले पौरजन सीतेला वंदन करतात. लोकपाल तिच्यावर पुष्पवृष्टी करतात. अरुंधती रामाला सीतेचा स्वीकार करण्याची विनंती करते. राम आनंदाने तिचा स्वीकार करतो. त्यानंतर महर्षी वाल्मीकी, राजर्षी जनक, कौसल्यादी माता, सीतेची नणंद शांता, ऋष्यशृंग या सर्वांची भेट होते. अरुंधती कुश-लवांना आणून त्यांची भेट करवते. या आनंदामध्ये लवणासुराचा पराजय करून शत्रुघ्न परत आला आहे, ही बातमी भर घालते. अखेरीस भरतवाक्य होऊन नाटक समाप्त होते. (अंक सातवा)

* * *

वाल्मीकी रामायणाच्या उत्तरकांडात रामाच्या राज्याभिषेकानंतरचा कथाभाग आलेला आहे. यात एका धोब्याने सीतेच्या चारित्र्याबद्दल आक्षेप घेतल्याचे कानावर आल्यावर रामाने तिचा त्याग केला. सीता तेव्हा गरोदर होती. ती वाल्मीकींच्या आश्रमात प्रसूत झाली. तिला कुश-लव अशी जुळी मुले झाली. रामाचा अश्वमेधाचा घोडा लवाने अडवला. पुढे लव व कुश रामाच्या दरबारात गेले तेथे त्यांनी रामाच्या चरित्राचे गायन केले. मग ती आपलीच मुले आहेत हे समजल्यावर रामाने सीतेला बोलावले. पण लोकांच्या समाधानासाठी पुन्हा दिव्य करण्यास सांगितले. तेव्हा ती दु:ख होऊन भूमीत नाहीशी झाली. त्यानंतर रामानेही आपला अवतार संपवला. असे यातील एकंदर कथासूत्र आहे. त्याच्या आधारे कालिदासाने रघुवंशाच्या चौदाव्या सर्गाची व भवभूतीने प्रस्तुत नाटकाची रचना केली आहे.

भवभूतीने रामायणातील कथेत हेतुपुरस्सर बदल केले आहेत. पहिला बदल म्हणजे रामायणात सीतेला दोष देणारा एकटा धोबी आहे पण 'उत्तर राम-चरिता'त नगरातील लोक सीतेचा स्वीकार केल्याबद्दल रामाला दोष देत आहेत असे दर्शविले आहे. दुसरे म्हणजे हा आरोप जेव्हा रामाच्या कानावर आला तेव्हा राजवाड्यात राम, लक्ष्मण व सीता असे तिघेच होते. इतर सर्व वडीलमंडळी व वसिष्ठमुनी हे द्वादशवर्षीय सत्रासाठी बाहेर गेलेले होते. रामाला मार्गदर्शन करण्यास कोणी नव्हते. तिसरा व महत्त्वाचा बदल म्हणजे भवभूतीने मुळातील शेवट बदलून तो सुखांत केला आहे. तसेच चित्रदर्शन प्रसंग, छाया-सीता संवाद, लव व चंद्रकेतू यांच्यातील युद्ध, रामाला लवाची पुत्र म्हणून ओळख पटणे व अखेरच्या अंकातील गर्भांक प्रवेश हा भाग नव्याने रचून घातला आहे.

रामाच्या आयुष्यातील उत्तरभागाची कथा 'पद्मपुराणा'च्या पाताळ खंडात वात्स्यायन ऋषी व शेषनाग यांच्या संवादात आली आहे. तिचे 'उत्तररामचरिता'शी थोडे साम्य आहे. तथापि इतरत्र सांगितल्याप्रमाणे पद्मपुराणाच्या कर्त्यानेच रामायणाचे उत्तरकांड व उत्तर रामचरित यांच्या आधारे थोडा फेरफार करून कथा सांगितली आहे. ''पद्मपुराणातील ही रामकथा वाचल्यानंतर ती भवभूतीच्या अगोदरची आहे असे वाटत नाही. उलट 'पद्मपुराण' कर्त्याने 'वाल्मीकी-रामायण' आणि भवभूतीचे 'उत्तररामचरित' यांच्यातील काही घटना घेऊन आणि त्यात आपल्या कल्पनेचा मालमसाला घालून ही 'पुरणपोळी' बनवलेली दिसते'' (भवभूती - पृष्ठ २५१-२५२) असे म.म.मिराशी यांनी स्पष्ट म्हटले आहे.

त्यापेक्षा भवभूतीने कालिदासाच्या रघुवंशातील चौदाव्या सर्गातून काही गोष्टी उचललेल्या दिसतात. उदा. पहिल्या अंकातील चित्रदर्शन प्रसंग. रामाने सीतेच्या करमणुकीसाठी आपल्या पूर्वायुष्यातील काही प्रसंगांची चित्रे राजवाड्यातील भिंतीवर रंगवून घेतली, असे भवभूतीने दर्शविले आहे. रामायणात तसा उल्लेख नाही. रघुवंशातील 'तपोर्यथाप्रार्थितमिन्द्रियार्थन्' (रघु. १४.२५) या श्लोकात राजवाड्यातील चित्रांचा उल्लेख आहे. यातील 'चित्रवत्सु' या पदावर 'वनवासवृत्तान्त लेख्यवत्सु' अशी मल्लिनाथाची टीका आहे. यावरून भवभूतीला सदर कल्पना सुचली असावी.

तसेच जृम्भकास्त्राची कल्पनाही रघुवंशातील तत्सदृश अस्त्रांच्या उल्लेखावरून सुचली असावी. 'प्रियंवदप्राप्तमसौ कुमार:' (रघु. ७.६१) या श्लोकात अजाने गंधर्वाकडून प्राप्त झालेल्या अस्त्राने शत्रूच्या सैनिकांना निद्रावश केले असे म्हटले आहे. जृंभकास्त्राचाही तोच परिणाम झालेला दर्शविलेला आहे.

* * *

हे नाटक भवभूतीच्या तीन नाटकांत तर उत्कृष्ट आहेच, शिवाय एकंदर संस्कृत नाट्यसृष्टीतही याचा क्रमांक बराच वर लागण्यासारखा आहे. या नाटकात अनेक नवीन प्रसंग व नवीन पात्रे आली असली तरी त्यांचे प्रयोजन निश्चित आहे. नाटकाच्या मांडणीत त्याचा स्वतंत्र दृष्टिकोन व्यक्त झाला आहे. रामाने सीतेचा विनाकारण त्याग करून तिच्यावर अन्यायच केला, अशी नाटककारांची भूमिका आहे. त्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी त्याने नाट्यरचना केली आहे. हे उद्दिष्ट सतत नजरेपुढे ठेवून - अगदी प्रस्तावनेपासून भरतवाक्यापर्यंत - योजनाबद्ध मांडणी केलेली आहे. तसेच आपल्या उद्दिष्टास अनुसरून रामकथेचा दु:खांत कथाभाग बदलून सुखांत केला आहे.

हा शेवट बदलण्यासाठी त्याने वाल्मीकींनी आपण रचलेल्या रामाच्या उत्तरायुष्यावर नाट्यमय रचना केली व ती प्रयोगरूपाने सादर करण्यासाठी भरतमुनीकडे पाठविली, अशी हकीकत मुद्दाम सांगितली आहे. तिसऱ्या अंकाच्या शेवटी राम व सीता यांचे मनोमीलन, चौथ्या अंकात जनक, कौसल्या इत्यादी वडील मंडळींच्या मनात धुमसणाऱ्या क्रोधाचे शमन व सातव्या अंकात अरुंधतीच्या द्वारे केलेली प्रजाजनांची कानउघाडणी यांच्या योगे प्रारंभी पेरलेल्या बीजाचा पद्धतशीर विकास दर्शविला आहे. नाटकातील विविध दुवे अत्यंत कौशल्याने जोडलेले आहेत. इतकी जाणीवपूर्वक निर्मिती क्वचितच आढळते.

पहिल्या अंकाचे प्रयोजन सीतात्याग हे आहे. रामाने सीतेचा त्याग कोणत्या परिस्थितीत व मन:स्थितीत केला हे भवभूतीने विस्ताराने दर्शविले आहे. लोकप्रवाद हे मुख्य कारण आहेच; पण रामाच्या आदर्श जीवनदृष्टीचाही त्यात सहभाग आहे. प्रजेच्या सुखासाठी आपल्या वैयक्तिक सुखाचाच काय पण प्रत्यक्ष सीतेचाही त्याग करण्याची तयारी त्याने सीतेसमक्ष बोलून दाखविली आहे व सीतेला त्याचा अभिमान वाटलेला आहे. तसेच रामाने तिच्या त्यागाचा निर्णय मनाच्या बेहोषीत घेतला आहे असे कवीने दाखविले आहे. त्याला या बाबतीत मार्गदर्शन करण्यास कोणी वडील माणसे - माता किंवा वसिष्ठमुनी उपस्थित नाहीत.

परंतु सीतेचा त्याग करताना रामाच्या मनाला किती व्यथा झाल्या हेही नाटककाराने स्पष्ट केले आहे. त्यासाठी पहिल्या अंकाच्या अखेरीस रामाच्या तोंडी मोठे स्वगत घातलेले आहे. त्या स्वगतात रामाचे अंतरंग उघड झाले आहे. रामाचे सीतेवर अपरंपार प्रेम आहे व तिच्या चारित्र्याबद्दल त्याच्या मनात शंकेचा लवलेशही नाही. हे भवभूतीने अगदी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. पण तरीदेखील सीतेला विश्वासात न घेण्याची व तिचा त्याग करण्याचा तडकाफडकी निर्णय घेण्याची घोडचूक त्याच्या हातून पडली आहे.

दुसऱ्या अंकापासून या पश्चात्तापदग्ध रामाची मूर्ती आपल्याला शेवटपर्यंत दिसते. त्यागानंतर सीतेची काय अवस्था झाली हे रामाला मुळीच ठाऊक नाही. अरण्यात रानटी श्वापदांनी तिला ठार मारले असावे, अशीच त्याची कल्पना होती. तिसऱ्या अंकापासून सातव्या अंकाच्या अखेरपर्यंत कथानकाचा विकास कसा झाला त्याचे दिग्दर्शन वर केलेले आहे. या रचनेत जशी तर्कशुद्धता आहे तशी नाट्यमयताही आहे.

* * *

उत्तर रामचरिताच्या संविधानकात पं. रंगाचार्य रेड्डी यांनी दोन गंभीर दोष दाखविले आहेत. त्यांचा व म.म.डॉ. वा. वि. मिराशी यांनी त्यांच्या जोडीस दोन-तीन दोष दर्शविले आहेत, त्यांचा परामर्श घेऊ. पं. रेड्डीनी दर्शविलेले दोष याप्रमाणे -

(१) नाटकाच्या कथानकाचा प्रारंभ रामास राज्याभिषेक झाल्यानंतर आठ-पंधरा दिवसांनंतर झालेला आहे. वनवासातून परत आल्यानंतर किती दिवसांनी राज्याभिषेक झाला, हे नाटककाराने सांगितले नाही. तो रामायणाच्या आधारे

पंधरा दिवसांनंतर झाला असे म्हणता येईल पण नाटकाच्या प्रारंभी सीतेला नऊ मास पूर्ण भरल्याचा उल्लेख आहे. इतकेच नव्हे तर लक्ष्मणाने तिला वनात सोडून दिल्यावर ती दुसऱ्याच दिवशी प्रसूत झाल्याचा उल्लेख सातव्या अंकात आहे. तेव्हा हा सात-आठ महिन्यांचा काळ अनर्थकारी ठरणारा आहे. अन्यथा रावणवधानंतर राम बराच काळ लंकेत राहिला होता अशी वृथा कल्पना करावी लागते. तेव्हा सीतेस पूर्णगर्भा दर्शवून नाटककाराने गंभीर प्रमाद केला आहे. त्यामुळे तिच्या शुद्ध चारित्र्यावरच आघात झाला आहे, असे या पहिल्या आक्षेपाचे तात्पर्य आहे.

(२) कवीने नाटकामध्ये जृंभकास्त्राचा वारंवार उल्लेख केला आहे पण त्याचे प्रयोजन स्पष्ट केले नाही. लवकुशांना ही अस्त्रे अवगत आहेत यावरून ते सीतेचे पुत्र आहेत एवढे सिद्ध होते. पण ते सिद्ध करण्याची जरुरीच नाही. ते सीतेचे पुत्र असल्याचा वाद असता तर ते निर्णायक गमक मानता आले असते. दुसरे म्हणजे सीतेचे शुद्ध चारित्र्य दर्शविणे हे कथानकाचे मुख्य उद्दिष्ट, त्या कामी याचा काहीच उपयोग नाही.

म.म.मिराशी यांनी दर्शविलेले दोष याप्रमाणे :

१) आत्रेयी आणि वनदेवता यांचा पूर्वपरिचय नाही. तसेच सीतेची व तिची भेट झालेली नाही. तेव्हा रामाच्या चरित्राची व सीतेच्या रामाने केलेल्या त्यागाची हकीकत तिला दुसऱ्या कोणाकडून तरी समजली असावी. ती हकीकत तिला कशी समजली हे स्पष्ट होणे जरूर होते. तसेच वाल्मीकीच्या आश्रमापासून शेकडो मैलांचा पायी प्रवास करून ती पंचवटीत पोहोचते पण कौसल्यादी राजमाता, वसिष्ठ-अरुंधती हे तेवढ्या काळात वाहनाची मदत असून चौथ्या अंकापर्यंत वाल्मीकीच्या आश्रमात पोहचत नाहीत. तसेच राम विमानाने वाल्मीकीच्या आश्रमाजवळ येतो. त्याच्या पूर्वीच ही वडील मंडळी आलेली आहेत. तेव्हा हाही एक दोषच मानावा लागेल.

(२) कुश व लव हे बाराव्या वर्षी एवढा पराक्रम करतात, हे संभाव्य वाटत नाही. त्याचप्रमाणे अश्वमेधाच्या अश्वाचे रक्षण करण्यासाठी रामाने लक्ष्मणाच्या मुलाची-चंद्रकेतूची-निवड का केली, हे समजत नाही. भरत अथवा लक्ष्मण यांची योजना करणे,त्यास शक्य होते.

पं. रंगाचार्य रेड्डींनी घेतलेल्या दोन आक्षेपातील पहिला साधारणपणे बरोबर आहे. पण हा आरोप अति-चिकित्सक वृत्तीचा वाटतो. सीतेची गर्भभरालस अवस्था कवीने प्रसंगाची उत्कटता वाढविण्यासाठी कल्पिलेली दिसते. पण

त्यामुळे तिच्या चारित्र्यावर आघात होतो ही गोष्ट भवभूतीच्या ध्यानात आलेली नाही. पण वाङ्मयात इतकी चिकित्सा अभिप्रेत नाही. चार-पाच महिन्यांच्या काळाचाच काय तो प्रश्न आहे. तो कोठेही जुळवून घेता येण्यासारखा आहे. कवीचा हा प्रमाद पं. रेड्डींनीच प्रथम नजरेला आणला, याचे श्रेय त्यांना द्यावयास हवे.

दुसरा आक्षेप मात्र फारसा पटणारा नाही. जृंभकास्त्रे ही रामाला विश्वामित्राकडून प्राप्त झाली. (अंक १ श्लोक १५) व रामाने सीतेला 'ही तुझ्या संततीला प्राप्त होतील' असा आशीर्वाद दिला. त्यानुसार लव-कुशांना ती जन्मतः अवगत झाली. पाचव्या अंकात लव चंद्रकेतूशी झालेल्या युद्धात या अस्त्राचा प्रयोग करतो. तेव्हा सुमंत्राच्या मनात शंका तरळते. सहाव्या अंकात रामाला ही हकीकत चंद्रकेतूकडून समजते. तेव्हा त्याच्याही मनात गोंधळ उडतो. लव व कुश ही आपलीच मुले आहेत असे त्याला वाटते व तो मुलांचे वय, आकृती, तोंडवळा, स्वर या बाबतीत साम्य शोधू लागतो. तेव्हा या अस्त्रांच्या प्रमाणाने लव-कुश ही सीतेची मुले आहेत इतकेच नव्हे तर रामाची मुले आहेत, हे सिद्ध झाले आहे. अर्थात् या प्रत्यभिज्ञान प्रसंगावर शाकुंतलातील सातव्या अंकाची गडद छाया आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्यातील 'अपराजिता वनस्पती' हे प्रमाण ज्याप्रमाणे सर्वदमन दुष्यंताचाच पुत्र आहे.' हे निर्णायकरीत्या सिद्ध करते त्याप्रमाणे 'जृंभकास्त्रे' हे प्रमाणही ही मुले रामाचीच आहेत हे सिद्ध करते, असे दाखविण्याचा भवभूतीचा प्रयत्न आहे व त्यावर आक्षेप घेण्यात फारसा अर्थ नाही.

म.म.मिराशींनी घेतलेल्या आक्षेपापैकी पहिल्या आक्षेपात थोडे तथ्य आहे. आत्रेयीला लव-कुशाचा जन्म, रामाने केलेला सीतेचा त्याग, रामाने आरंभिलेला अश्वमेध यज्ञ, पत्नीच्या ठिकाणी सीतेच्या प्रतिमेची केलेली योजना, अश्वमेधाच्या अश्वाच्या रक्षणार्थ लक्ष्मणाचा पुत्र चंद्रकेतू याची केलेली नेमणूक, वाल्मीकींनी केलेली 'रामायण' काव्याची निर्मिती या साऱ्या गोष्टी ठाऊक आहेत. या गोष्टी तिला कोणाकडून समजल्या हे कवीने स्पष्ट केलेले नाही, ही गोष्ट खरी आहे. पण हा काही दोष मानता येणार नाही. यातील काही गोष्टी वाल्मीकींच्या आश्रमात समजल्या असाव्यात व त्यानंतरच्या काही गोष्टी प्रवासात कर्णोपकर्णी समजल्या असाव्यात. अर्थात एखाद्या ओळीत भवभूतीने हा खुलासा केला असता तर बरे झाले असते.

कुश-लव हे बाराव्या वर्षी एवढा पराक्रम करतात. यात संभाव्य न वाटण्यासारखे काय आहे? एक तर ती रामासारख्या अलौकिक विभूतीची मुले आहेत. राम-लक्ष्मणांनीही असा पराक्रम बालपणी केलेला आहे. रामाने अश्वाचे रक्षण करण्याच्या कामावर चंद्रकेतूची का योजना केली? याचे उत्तर देणे कठीण आहे. लक्ष्मण अथवा भरत यांची योजना करायला हवी होती, हे म्हणणे बरोबर आहे. पण चंद्रकेतू व लव यांचा तोंडावळा समान असल्याचे दर्शवून भवभूतीने एकपरी पुढील प्रत्यभिज्ञानाची तयारी केलेली दिसते. असो. इतर बारीक सारीक दोषांचा विचार पुढे समालोचनात करण्यात येईल.

* * *

प्रस्तुत नाटकात राम, सीता, जनक, अरुंधती, कौसल्या, लव, कुश, आत्रेयी, वासंती (वनदेवता), चंद्रकेतू ही ठळक पात्रे आहेत. यांची चित्रणे भवभूतीने यथातथ्य केलेली आहेत. त्यांची वैशिष्ट्ये थोडक्यात पाहू -

**(१) राम** : राम हा आदर्श राजा, पती, संसारी गृहस्थ दर्शविलेला आहे. प्रजेला संतुष्ट ठेवणे हे आपले परमकर्तव्य मानून ते तो कसोशीने पार पाडत आहे. अशा पुरुषावर आपल्या प्राणाहून प्रिय असलेल्या गरोदर पत्नीचा त्याग करण्याची पाळी यावी हा दैवदुर्विलास आहे. त्याच्या होरपळलेल्या अंतःकरणाचे यथार्थ चित्रण तिसऱ्या अंकात दिसून येते. रामाची ही अगतिक स्थिती वसिष्ठ पत्नी अरुंधतीने बिनचूक ताडलेली आहे. सातव्या अंकात गर्भांक नाट्य संपल्यावर ती जमलेल्या प्रजाजनांची जी कान-उघाडणी करते त्यात रामाचा निरपराधीपणाच सिद्ध झालेला आहे. मर्यादा पुरुषोत्तम रामचंद्राचे चित्रण करण्यात भवभूती यशस्वी झाला आहे.

**(२) सीता** : रामाप्रमाणे सीतेचे आयुष्यही दुःखपूर्ण आहे. रामावर तिचे अत्यंत प्रेम आहे. ती त्याच्याबरोबर वनवासात जाते, पण रावणाने पळवल्याने तिच्यावर रामाचा वियोग सोसण्याची पाळी येते. रावणाच्या वधानंतर तिला अग्निदिव्य करावे लागते. राज्याभिषेकानंतर सुख लाभेल असे वाटत असता तिचा विश्वासघात होतो. तिला काहीही कल्पना न देता एकाएकी वनात टाकले जाते. तेही गर्भावस्था अगदी भरास आल्यानंतर. प्रसूती होऊन दोन मुले होतात. निदान त्यांना तरी पितृसुख लाभावे अशी तिची इच्छा असते. विश्वासघाताने तिच्या मनात उठलेला संताप कवीने तिसऱ्या अंकात शमवण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी रामाशी तिचे मीलन झालेले दाखवून तिच्यावरील अन्यायाचे

परिमार्जन केले आहे. तिच्या स्वभावातील इतर पैलू कवीने स्पष्ट केले आहेत. सीता ही आदर्श पत्नी व माता आहे. तिचे वृक्ष-वेलीवर, पाळीव प्राण्यांवर प्रेम आहे. वनदेवता वासंती ही तिची जिवलग मैत्रीण आहे.

**(३) जनक :** जनकाची व्यक्तिरेखा भवभूतीने थोडक्यात पण परिणामकारक रेखाटलेली आहे. तो खरे तर राजर्षी व ब्रह्मज्ञानी आहे. पण अशा संयमी पुरुषासही सीतेच्या त्यागाची वार्ता ऐकून धक्का बसतो. रामाचा त्याला विलक्षण संताप येतो. धनुष्य घेऊन किंवा शाप देऊन त्याचा नाश करण्यासही तो उद्युक्त होतो. पण अरुंधतीच्या समजावणीमुळे शांत होतो. जनक व दशरथ या व्याह्यांमधील संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे असल्याचे भवभूतीने दर्शविलेले आहे. त्या पार्श्वभूमीवर जनकाची ही व्यक्तिरेखा अत्यंत हृदयस्पर्शी वठलेली आहे.

**(४) अरुंधती :** ही पोक्त, चतुर व व्यवहारकुशल आहे. ती परमपूज्य अशा वसिष्ठ मुनींची पत्नी असली तरी स्वतंत्ररीत्या तिची योग्यता मोठी आहे. सर्वांनाच तिच्याबद्दल अत्यंत आदर वाटतो. वास्तविक पाहता कुश व लव हे सीतेचे पुत्र आहेत, हे तिला ठाऊक आहे. पण ती गोष्ट जनक व कौसल्या यांना योग्य वेळ येईपर्यंत समजू देत नाही. रामाची बाजू घेऊन जेव्हा ती प्रजाजनांची कानउघाडणी करते तेव्हा सारेच चकित होतात.

सीतेप्रमाणे कौसल्येचे आयुष्यही दुःखपूर्ण आहे. रामाने सीतेचा त्याग केला हे समजताच ती रामाचे मुखावलोकनही करू इच्छित नाही. इतकेच नव्हे तर अयोध्येला जाण्याचीही तिची इच्छा नाही. लव, चंद्रकेतू व कुश या तीन कुमारांची चित्रणे मनोवेधक आहेत. त्यातल्या त्यात लवाचे चित्रण अधिक आकर्षक आहे. रामाच्या यज्ञाचा घोडा तोच अडवतो. चंद्रकेतूशी युद्ध करतो. जृंभकास्त्राची योजना करून साऱ्या सैनिकांना निद्रिस्त करतो. रामालाही तोच प्रथम भेटतो. 'रामायण' कथेचा नायक म्हणून त्याला रामाची ओळख आहे. स्त्रीपात्रांपैकी वनदेवता वासंतीचे चित्रण उत्तम साधलेले आहे. ती सीतेची वनवासाच्या काळापासूनची मैत्रीण आहे. सीतेचा त्याग केल्याबद्दल ती रामाची चांगलीच खरड काढते. तिसऱ्या अंकातील हा प्रसंग अत्यंत हृद्य आहे.

* * *

या नाटकाचा एकंदर कालावधी एकूण बारा वर्षांचा आहे. पहिल्या अंकात रामाचा राज्याभिषेक झाल्यानंतर कौसल्यादी तीन माता व रघुकुलाचे गुरुजी ब्रह्मर्षी वसिष्ठ हे ऋष्यशृंगाच्या द्वादशवार्षिक सत्रास - म्हणजे बारा वर्षेपर्यंत

चालणाऱ्या यज्ञात उपस्थित राहण्यासाठी गेलेले आहेत. असा उल्लेख आहे. दुसऱ्या अंकाच्या विष्कंभकात आत्रेयी ते द्वादशवार्षिक सत्र नुकतेच संपल्याचे सांगते. म्हणजे पहिल्या व दुसऱ्या अंकाच्या दरम्यान पूर्ण बारा वर्षांचे अंतर आहे. दुसऱ्या अंकापासून सातव्या अंकापर्यंतच्या घटना फार तर तीन चार दिवसात पूर्ण झाल्या आहेत.

पहिल्या दोन अंकादरम्यानचे बारा वर्षांचे अंतर नाटककाराने मोठ्या कौशल्याने भरून काढले आहे व दोन्हीतील प्रसंगांचा सांधा बेमालूम जोडलेला आहे. या प्रदीर्घ काळात ऋष्यशृंगाचे द्वादशवार्षिक सत्र पूर्ण झाले आहे. सीतेने पाळलेले हत्तीचे पिलू मोठे होऊन दुसऱ्या हत्तीवर आक्रमण करण्यास समर्थ झाले आहे. राजर्षी जनकाने राज्याचा त्याग करून वानप्रस्थाश्रम स्वीकारलेला आहे. लवण राक्षसाचा वध करून शत्रुघ्नाने मथुरेस राज्य स्थापन केले आहे. पूर्वीची लहान झाडे मोठी झाली आहेत. पाण्याचे प्रवाह बदललेले आहेत.

दुसऱ्या अंकांत शंबुकाच्या वधाच्या निमित्ताने राम पंचवटीस आलेला आहे. दुसऱ्या अंकाचा पार्श्वभूमीप्रमाणे उपयोग करून भवभूतीने त्याची व छायारूपात असलेल्या सीतेची भेट घडवून आणलेली आहे. रामाने आपला विनाकारण त्याग केला, हे शल्य सीतेच्या उरात बारा वर्षे सलत होते. ते दूर करणे हा या भेटीचा उद्देश आहे. या बारा वर्षांच्या काळात रामाने दुसरा विवाह तर केला नाहीच पण प्रारंभिलेल्या अश्वमेध यज्ञामध्ये सीतेची सुवर्णप्रतिमा तयार करण्यात आली. ही हकीकत मुद्दाम सीतेच्या कानावर घालण्यात आली आहे. निरपराध पत्नीचा त्याग केल्याबद्दल वनदेवता वासंती रामाची कडक शब्दात हजेरी घेते तेव्हा रामाच्या अंत:करणाला झालेल्या व्यथा सीतेला जाणवतात. तिच्या मनातील शल्य दूर होते. तिसऱ्या अंकातील हा प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी आहे. या संदर्भात डॉ. बेलवलकर लिहितात - ‘‘शाकुंतलाच्या चौथ्या अंकाप्रमाणे उत्तर रामचरिताच्या तिसऱ्या अंकाच्या पानावर ज्याच्या डोळ्यांतून टिपे गळली नाहीत असा सहृदय वाचक विरळा.’’ (उ. रा. च. भाषांतर - पृष्ठ १७३)

नाटकाच्या अंतिम उद्दिष्टाच्या दृष्टीने कवीने सर्व मंडळींना वाल्मीकीच्या आश्रमात आणलेले आहे. अर्थात त्याची निमित्ते वेगवेगळी आहेत. रामाने सीतेचा त्याग केला ही वार्ता जेव्हा रामाच्या मातांना समजली तेव्हा त्यांनी रामाचे मुखावलोकन न करण्याचा व अयोध्येत पाऊल न टाकण्याचा निर्धार केला. ऋष्यशृंगाचा यज्ञ आटोपताच ही वडीलधारी मंडळी वाल्मीकीच्या

आश्रमाकडे रवाना झाली. रामाने अश्वमेधाचा सोडलेला घोडा योगायोगाने वाल्मीकीच्या आश्रमाजवळ आला व त्यास लवाने अडवले. लव व चंद्रकेतू यांचे युद्ध जुंपले, ही हकीकत पंचवटीतून अयोध्येकडे जाणाऱ्या रामास समजली तेव्हा तो विमान थांबवून त्या ठिकाणी आला. वाल्मीकींनी रचलेल्या रामचरितावरील नाटकाचा प्रयोग पाहण्यासाठी अयोध्येतील प्रजाजन तेथे उपस्थित झाले.

वडीलमंडळींना लवाचे दर्शन होते व ती बुचकळ्यात पडतात. कारण त्याचा तोंडवळा व स्वर हुबेहूब रामाप्रमाणे होता. येथून प्रत्यभिज्ञानाची तयारी सुरू झालेली आहे. सीता ही जिवंत असावी व लव-कुश ही जुळी मुले तिचीच असावीत अशी पुसट शंका येते. लवाला जृंभकास्त्रे अवगत असलेली दिसताच सुमंत्रही व्याकूळ होतो. लव व कुश हे दोघे जुळे भाऊ आहेत हे समजताच रामाला सीतेचा गर्भ द्विधा असल्याचे स्मरण होते. अखेरीचे मीलन सर्वतोपरी आनंददायक व्हावे यासाठी हे प्रयत्न आहेत.

सातव्या अंकातील गर्भांकाची योजना अत्यंत समर्पक आहे. त्या निमित्ताने जमलेल्या प्रजाजनांची कानउघाडणी करणे अरुंधतीला शक्य झालेले आहे. ज्या प्रजाजनांनी आपल्या लहरीखातर सीतेच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले त्यांना आपल्या चुकीची जाणीव करून दिली आहे आणि त्यांच्या अनुमतीनेच रामाने सीतेचा व दोन पुत्रांचा स्वीकार केला आहे. तिसऱ्या अंकापासूनच्या घटना आणि प्रसंग हे अत्यंत चातुर्याने गुंफलेले आहेत.

उत्तम कथा, प्रसंगांची जुळवाजुळव व रसनिर्माण क्षमता ह्या गोष्टी असल्या तरी त्यांची मांडणी नाट्यदृष्ट्या करणे तितके सोपे नसते. त्यासाठी नाटककाराला नाट्यतंत्र अवगत असावे लागते. 'उत्तर-राम-चरिताची कथावस्तू नाट्यापेक्षा काव्याला अधिक अनुकूल आहे' किंवा 'भवभूतीमधील कवीने त्याच्यातील नाटककारावर कुरघोडी केली आहे.' असे आक्षेप घेण्यात आले आहेत व काही अंशी ते खरे आहेत. पण यातील काही प्रसंग व क्लृप्त्या अत्यंत नाट्यपूर्ण असल्याचेही जाणवते. उदा. पहिल्या अंकातील परिणामकारक विष्कंभक, तसेच शेवटच्या अंकातील नाटकातील नाटक. पात्रांची योजना करताना लव, कुश व चंद्रकेतू यांचे तोंडावळे सारखे असल्याचे म्हटले आहे. नाटकमंडळीत सारखा चेहरा असणारी दोन मुले असावीत. त्यामुळे नाटककाराने तिघांना एकत्र आणलेले नाही.

पात्राच्या अंतरंगावर प्रकाश टाकण्यासाठी त्याने दीर्घ स्वगतांचा उपयोग केला आहे. पहिल्या, दुसऱ्या व सहाव्या अंकातील रामाची दीर्घ स्वगते अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. असे दीर्घ स्वगत मुद्राराक्षसाच्या सहाव्या अंकात राक्षसाच्या तोंडी असल्याचा उल्लेख मागे केला आहे. ही स्वगते शेक्सपिअरच्या शोकनाट्यातील स्वगतांच्या तोडीची आहेत, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. तसेच दोन बटूंच्या निरागस संवादातून कवीने आश्रमातील चालीरीतींवर प्रकाश तर टाकलेला आहेच, शिवाय वसिष्ठादी वडील मंडळी आश्रमात आल्याचा महत्त्वाचा निर्देशही केला आहे.

राम हा अवतारी पुरुष आहे. तसेच भवभूतीचे आराध्य दैवत आहे. तेव्हा रामाच्या चित्रणात काही दैवी अंश उतरला तर त्याचे नवल वाटावयास नको. पौराणिक नाटकात आढळणारी अद्भुतता येथेही दिसते. रामाचा आकाशमार्गाने प्रवास, तिसऱ्या अंकातील सीतेचे छायारूप, जृंभकास्त्रांचा उपयोग, विद्याधर मिथुनाने केलेले युद्धवर्णन व शेवटच्या अंकातील सीतेचे जमिनीतून वर येणे, यात अद्भुताचे रंग मिसळलेले आहेत व पुराणकथा म्हणून ते फारसे खटकत नाहीत.

राम व सीता यांना देवता मानलेले असल्याने त्यांच्या चित्रणात दैवी अंश डोकावणे हे साहजिक असले तरी नाट्यदृष्ट्या ते इष्ट नाही. याची कवीला जाणीव आहे. या दृष्टीने त्याने तो दैवी अंश शक्य तितका कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. सीतेचा त्याग करताना, शंबुकाचा नाइलाजाने वध करताना तसेच तिसऱ्या अंकात सीतेच्या त्यागाने उचंबळलला शोक प्रकट करीत असता रामाचे चित्रण मानवास शोभेल असेच केले आहे.

नाटकातील प्रसंगास उठाव येण्यासाठी नाटककाराने नाट्यात्मक विरोध (Dramatic Irony) चा उपयोग करून घेतलेला आहे. डॉ. भटांनी येथे 'नाट्यछलित' असा समर्पक शब्द योजलेला आहे. या 'छलिता'चा उपयोग पुढील घटनाची अस्फुट सूचना देण्यासाठी करण्यात येतो. उदा. पहिल्या अंकात भित्तिचित्रे पाहात असता राम म्हणतो -

"ही जणू घरातील लक्ष्मी आहे. डोळ्यांना जशी अमृताची शलाका आहे. हिचा स्पर्श चंदनाच्या घनदाट उटीप्रमाणे आहे. हिने माझ्या गळ्यात घातलेला हात मोत्याचा हाराप्रमाणे शीतल व कोमल आहे. हिचे काय म्हणून प्रिय नाही? दु:सह आहे तो फक्त हिचा वियोग !"

(अंक १, श्लोक ३८)

इतक्यात द्वारपालिका येऊन 'महाराज, जवळ आलेला आहे' असे एकदम उद्गारते. तेव्हा जणू रामाचा सीतेशी होणारा वियोग जवळ आला आहे असे वाटून रामाप्रमाणे वाचक-प्रेक्षकांना धक्का बसतो आणि ही भीती खोटी नाही, हे दुर्मुखाच्या आगमनावरून समजते. तेव्हा ही पुढील घटनेची सूचनाच आहे.

* * *

'उत्तर-राम-चरित'तील दोष डोळ्यात भरण्यासारखे आहेत. मागे 'मालती-माधव'च्या समालोचनात 'यास भवभूतीची नाट्यविषयक प्रामादिक धारणा कारणीभूत आहे.' असे विधान केलेले होते. येथेही ते विधान लागू पडते. एक तर भवभूतीच्या ठिकाणी संयमाचा अभाव आहे. तो आपल्या उसळत्या काव्यवृत्तीला आवर घालू शकत नाही. त्यामुळे जेथे एखाद्या श्लोकाने काम भागले असते तेथे तो चार श्लोक घालतो. अर्थात त्याचे श्लोक काव्यपूर्ण, रसाळ, भारदस्त आहेत हे मान्य करूनही इतक्या विस्ताराची गरज होती का असा प्रश्न मनात येतो. उदा. दुसऱ्या अंकात शंबूक रामास जनस्थानाचे वर्णन ऐकवीत आहे. या प्रसंगी शंबूकाच्या तोंडी पाच श्लोक घातलेले आहेत. वास्तविक पाहता रामास शंबुकापेक्षा जनस्थानाची अधिक ओळख आहे. शेवटी राम कंटाळून त्याला 'आता तू जा' असे सांगतो.

सीतेच्या त्यागाने उद्भवलेला शोक रामाच्या हृदयात बारा वर्षे कोंडलेला आहे. पंचवटीच्या दर्शनाने व वासंती वनदेवतेच्या भेटीमुळे तो उचंबळून बाहेर पडलेला आहे; पण त्याचे चित्रण शोक-विलाप, अश्रुपात, मूर्च्छा यांच्या अतिरेकाने केल्याने ते भडक, अनुचित व कंटाळवाणे झाले आहे. या प्रसंगी कालिदासाचे स्मरण झाल्यावाचून राहात नाही. मदनाच्या मृत्यूमुळे शोकाकूल झालेल्या रतीला जेव्हा मदनाचा मित्र वसंत हा भेटावयास येतो तेव्हा रतीचा शोक कसा उसळून बाहेर पडला हे सांगताना कालिदासाने 'स्वजनस्यहि दु:खमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते।' (कुमार ४.२६ - उत्तरार्ध) अशी ओळ घातली आहे. या एका चरणात कालिदासाने जो दु:खाचा परिणाम साधलेला आहे तो साधण्यास भवभूतीला सारा अंक पुरा पडलेला नाही.

आत्मप्रौढी हाही त्याचा दोष जाणवतो. 'उत्तररामा'च्या तिसऱ्या अंकाच्या शेवटी तमसा 'अहो संविधानकम्।' असे उद्धार काढते. भवभूती येथे स्वत:च्या कथानकावर खुश झालेला आहे. म.म.डॉ. पां.वा.काणे या संदर्भात लिहितात

- 'Here भवभूती indirectly suggests that his own skill in arranging the events of his plot is superb.' (U.R.C. Notes page-116) मालती-माधवाच्या पहिल्या अंकात मालती व माधव यांच्या प्रथम भेटीचे वर्णन माधवाच्या तोंडून ऐकल्यानंतर मकरंद उद्‌गारतो - "अहो वैदग्ध्यम्।" (काय हे कथानकातील चातुर्य !)

* * *

भवभूतीच्या लिखाणात दोष असले तरी त्याच्या थोरवीस बाधा येत नाही. भवभूतीच्या ठिकाणी बेहोष वृत्ती आहे. या वृत्तीने त्याला मानवी मनाचा तळ गाठण्याचे सामर्थ्य प्राप्त झालेले आहे. 'आंतरमनातील गूढ भाव हळूवार'पणे टिपावेत ते भवभूतीनेच ('तथाप्यन्तर्मोदः कमपि भवभूतिर्वितनुते।' सुभा.) अशी त्यास सार्थ प्रशस्ती लाभलेली आहे.

भवभूतीचे जाणवणारे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या तीनही नाटकांचे नायक एकपत्नीक आहेत. स्त्रियांची परवशता त्याच्या मनाला सदोदित बोचत होती. पुरुषाला अनेक स्त्रिया असणे हा समाजातील 'पुरुषसत्ता न्याय' होता. पातिव्रत्य पालनाची जबाबदारी फक्त स्त्रीवर होती. आता स्त्रीला खऱ्या अर्थाने न्याय द्यावयाचा असेल तर तेथे एकपत्नी पुरुषच नायक म्हणून उभा करायला हवा. मालती-माधवाचा नायक उपवधू तरुण दाखविल्याने आपोआपच हा प्रश्न सुटला. इतर दोन नाटकांत रामच नायक असल्याने हा प्रश्न उपस्थित झाला नाही.

'रामाने प्रजाजनांच्या लहरीस अनुसरून सीतेचा त्याग केला.' ही 'उत्तर-राम-चरिता'तील प्रमुख घटना आहे. या घटनेकडे भवभूती कोणत्या दृष्टीने पाहतो हे लक्षात घेतले पाहिजे. राम हा जसा प्रेमळ पती आहे तसाच आदर्श राजा आहे. तो नुकताच राज्यावर आलेला आहे. याचा अर्थ त्याला राज्यकारभाराचा पुरता अनुभव नाही. रघुकुलाच्या आदर्शास चिकटून राहण्याची त्यास ओढ आहे. शिवाय त्याला अनुभवाच्या चार गोष्टी सांगणारी, योग्य सल्ला देणारी वडील माणंसेही राजवाड्यात उपस्थित नाहीत. अशा परिस्थितीत पापभीरू रामाने सीतेचा त्याग केलेला आहे. त्याच्या दुभंगलेल्या मनःस्थितीचे उत्कृष्ट चित्रण पहिल्या अंकाच्या अखेरीस केलेले आहे.

रामाने सीतेचा त्याग नाइलाजापोटी केला असला तरी रामाची चूक त्याच्या पदरात घालण्यास भवभूती कचरलेला नाही. सीतेचा असा तडकाफडकी त्याग करण्यात त्याने अक्षम्य चूक केली असाच भवभूतीचा अभिप्राय आहे. मुख्य

म्हणजे रामाने प्रजाजनांच्या मताला वाजवीपेक्षा जास्त किंमत दिली. प्रजा ही चुकणार नाही हा त्याचा विश्वास चुकीचा ठरला. त्यांच्या लहरीसाठी निरपराध सीतेला घोर अरण्यात सोडून देण्याचा अपराध त्याच्या हातून घडला.

रामाच्या या चुकीवर नाटककाराने तीन प्रकारांनी ताशेरे ओढलेले आहेत. पहिला प्रकार म्हणजे राम आपल्या वर्तनाबद्दल स्वत:ला बोल लावीत आहे. पहिल्या अंकातील 'शैशवात्प्रभृति' (१.४५) या श्लोकात राम स्वत:ची तुलना 'आपण पाळलेल्या मैनेची मान मुरगाळणाऱ्या खाटकाशी' करीत आहे. दुसऱ्या प्रकारात वासंतीने रामाची केलेली कठोर निर्भर्त्सना मोडते. सीता निरपराध आहे हे ठाऊक असून तिचा त्याग करणाऱ्या रामाने तिच्यावर घोर अन्याय केला, असा ती स्पष्ट आरोप करते. तिसरा प्रकार म्हणजे कौसल्यादी रामाच्या मातांनी व जनकाने रामाचा केलेला अप्रत्यक्ष धिक्कार. रामाच्या माता रामाचे तोंड न पाहण्याचा व अयोध्येत पाऊल न टाकण्याचा निश्चय करतात. जनकही रामाचा स्पष्ट शब्दांत निषेध करतो. इतकेच नव्हे तर लवाच्या तोंडीही रामाच्या चरित्रातील दोष घालण्यात आले आहेत.

रामापेक्षा प्रजाजनांनीच सीतेवर अन्याय केलेला आहे. त्यांची कानउघाडणी होणे आवश्यक होते. आपल्या लहरी बेछुट बोलण्याचा केवढा भयंकर परिणाम झाला यांची त्यांना जाणीव करून देणे जरुरीचे होते. ते काम सातव्या अंकात अरुंधतीने पार पाडले आहे. प्रजाजनांना सीतेच्या निष्कलंक चारित्र्याची जाणीव झाल्यावर व त्यांनी आपले म्हणणे मागे घेतल्यावरच रामाने सीतेचा स्वीकार केलेला आहे. अशा प्रकारे यातील समस्येचा समाधानकारक उलगडा झाल्यामुळे उत्तररामचरिताला संस्कृत नाट्यसृष्टीत एक वेगळेच स्थान प्राप्त झाले आहे.

* * *

भवभूतीची तीनही नाटके विचारात घेतली असता त्यातील काही विशेष ध्यानात येतात. त्याची तीनही नाटके कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगी सादर करण्यात आली आहेत. सर्व नाटकांचे नायक एकपत्नीक आहेत. त्यांच्यातील विशेष साम्य म्हणजे प्रत्येक नाटकात सारखा तोंडवळा असलेली दोन पात्रे आहेत. 'महावीर-चरितांत' राम व लक्ष्मण, मालती-माधवात मालती व मकरंद आणि उत्तररामचरितात तर कुश, लव आणि चंद्रकेतू या तिघांचा तोंडवळा सारखा आहे. आता नाटक मंडळीत सारख्या चेहऱ्याची तीन मुले असणे शक्य नसल्याने नाटककाराने तिघांना एका वेळी रंगभूमीवर आणलेले नाही.

त्याच्या तीनही नाटकातील वातावरण उदात्त-स्वरूपाचे आहे. त्यातल्या त्यात उत्तररामचरितातील वातावरण अगदी वरच्या दर्जाचे आहे. यातील अनेक प्रवेश अगस्तीच्या आश्रमाच्या परिसरात, पंचवटीत तसेच वाल्मीकीच्या आश्रमात घडून आलेले आहेत. रामासारखे उदात्त पात्र त्याने सामर्थ्यानिशी उभे केले आहे. त्याच्या नाटकात संविधानकापेक्षा स्वभावचित्रणास अधिक महत्त्व दिलेले आढळते. महावीर चरितातील परशुराम, मालती-माधवातील कामंदकी, उत्तररामचरितातील राम, कौसल्या, जनक, सीता, वनदेवता, वासंती, चंद्रकेतू, लव यांची चित्रणे मनोवेधक आहेत.

त्याने केलेली निसर्गदृश्यांची वर्णने भव्य व रौद्र स्वरूपाची आहेत. गोदावरीच्या तीरावरील सृष्टिसौंदर्य त्याच्या पूर्ण परिचयाचे आहे. 'महावीरचरिता'तील पुढे दिलेल्या श्लोकात वालीच्या तोंडी भव्योत्कट कल्पना घातलेली दिसून येईल.

"या ब्रह्मांडरूपी वृक्षाला महान फाटे फुटल्याने सातव्या समुद्राच्या पाण्याचा पूर वाहू लागला आहे. त्याच्या त्रिभुवनरूपी गाठी सैल झाल्या आहेत, पातळरूपी मूळ उपटून गेले आहे, सूर्य आणि चंद्र हे पुष्पगुच्छ दूर फेकले गेले आहेत. तारारूपी फुले खाली ओघळत आहेत. अशा ब्रह्मांडवृक्षाला मी गदागदा हलवू शकतो, पण रामाविषयी मला तीव्र खेद वाटत आहे."

(महावीर अंक ५, श्लोक ५)

त्याचे निरीक्षण सूक्ष्म आहे. वर्ण्यवस्तूचे सारे तपशील तो बारकाईने पुरवतो. 'उत्तररामचरिता'तील सीतेच्या मोराच्या नृत्याचे वर्णन करताना राम म्हणतो -

"नाचताना तू जेव्हा जेव्हा गिरकी घेत होतास तेव्हा तेव्हा सीताही आपली दृष्टी मंडलाकार फिरवीत असे. त्यासमयी तिच्या भिवयांच्या मार्मिक हालचालीमुळे तिच्या डोळ्यांस विलक्षण अशी शोभा प्राप्त होत होती. अशा प्रकारे आपल्या हातांनी ताल धरून ती तुला नृत्य करण्यास शिकवीत होती. तेव्हाची बाळा, तुझी मूर्ती अद्याप माझ्या अंत:करणात उभी आहे."

(उत्तरराम. अंक ३, श्लोक २०)

मालती-माधवाच्या दुसऱ्या अंकात कामदंकीने केलेले मालतीच्या संकल्पनिर्मित समागमाचे वर्णन प्रत्ययकारी आहे.

"हिच्या साडीची गाठ शिथिल झाली आहे. अधर कंप पावत आहेत. बाहूंना ग्लानी आली आहे. शरीरावर घर्मबिंदू दिसत आहेत. डोळे स्निग्ध, मधुर

व आकुंचित झाले आहेत. शरीर स्तब्ध झाले असून वक्ष:स्थळांस कंप सुटला आहे. गालावर रोमांच फुलले आहेत. ही वारंवार मूर्च्छित होऊन पुन:पुन: सावध होत आहे.''

(मालती. अंक २, श्लोक ५)

नाटकातील वातावरणास साजेल अशा प्रकारे रसालंकारांची योजना करण्यात भवभूती वाकबगार आहे. 'उत्तररामचरिता'त लोकांच्या सीताविषयक प्रवादाला त्याने कुत्र्याच्या विषाची उपमा दिली आहे, तर रामाच्या दु:खाला औषधीच्या पुटपाकाची उपमा योजलेली आहे. दोन्ही उपमा अत्यंत उचित व समर्पक अशाच आहेत.

संस्कृत साहित्यकारांनी त्याच्या कृतीतील काही दोषांचा निर्देश केला आहे. उदा. 'त्वं न: पूज्यतम:' (म.वी.च.२.५०) या श्लोकात हेमचंद्राने अकांडच्छेदाचा (Anti Climax) दोष दाखवला आहे. शतानंद व जनक यांच्या संवादातून वीररसाची कमान वर चढत असता एकदम कंचुकी प्रवेश करतो व 'आज रामाचे कंकण-मोचन' करणार असल्याची वार्ता सांगून त्या रसाचा भंग करतो. मम्मटाने त्याच नाटकातल्या 'न त्रस्तं यदि नाम' (अंक २, श्लोक २८) या श्लोकातील 'भवानी-पते:' या पदात 'विरुद्धमतिकृत' हा दोष दर्शविलेला आहे. भव म्हणजे शंकर. त्याची पत्नी ती भवानी आणि तिचा पती म्ह. पुन्हा शंकर असा हा आडवळणी शब्द आहे. मम्मटाच्या मते येथे 'पार्वतीचा शंकराहून दुसरा कोणी तरी पती' असा भलताच अर्थ प्रतीत होतो. पण मला स्वत:ला प्रस्तुत पदात दोषास्पद असे काही वाटत नाही. कारण भवानी अथवा मृडानी ही नावे व्यवहारात पार्वती-वाचकच मानली जातात. भवभूतीप्रमाणे भारवी, दंडी, बाणभट्ट यांनीही या शब्दाची योजना केलेली आहे. तेव्हा प्रस्तुत पदातून काही विपरीत अर्थाचा बोध होतो, असे मानण्याचे कारण नाही. क्षेमेंद्राने 'उत्तररामचरिता'तील 'वृद्धास्ते न विचारणीय चरिता:' (अंक ५ श्लोक ३४) या श्लोकात लवासारख्या गौणपात्राने नायकाचे दोष दाखवल्याने वीररसाचा भंग झाला आहे, असे म्हटले आहे, तर मम्मटाने काव्यप्रकाशात 'जगति जयिनस्ते ते भावा:' (मा.मा.१.३९) या श्लोकात व्याहतार्थत्व हा दोष दर्शविला आहे. तथापि हे दोष फारसे बोचणारे नसल्याने विचारात घेण्याची जरुरी नाही.

पाल्हाळ अथवा अकारण विस्तार हा दोष विशेषेकरून आढळतो. यास संयमाच्या अभावाप्रमाणे तारतम्याचा अभाव हेही कारण आहे. उत्तर-

रामचरिताच्या दुसऱ्या अंकातील शंबुकाची बडबड रामाप्रमाणेच वाचक, प्रेक्षकांनाही कंटाळवाणी वाटते. तसेच तिसऱ्या अंकातील राम व सीता यांचे वारंवार मूर्च्छित होणे हे खटकणारे आहे. महावीरचरिताच्या तिसऱ्या अंकातील परशुरामाचे शतानंद, जनक, विश्वामित्र यांच्याशी झालेले वाग्युद्ध म्हणजे अस्थानी पांडित्यप्रदर्शन आहे. मालती-माधवाच्या नवव्या अंकातील माधवाचा शोक अत्यंत कंटाळवाणा आहे.

भवभूतीच्या लिखाणात क्वचित अश्लीलताही आढळते. मालती-माधवाच्या सातव्या अंकात मदयंतिका आपल्या स्वप्नसमागमाचे वर्णन करते. त्यात उत्तान शृंगार आहे. अर्थात हे वर्णन प्राकृतातील दीर्घ समासाच्या गर्दीत लपलेले आहे. मात्र या वर्णनानंतर लवंगिका तिला जो प्रश्न विचारते तो मात्र पूर्ण अश्लील आहे. 'उत्तररामचरिता'तील 'किमपि किमपि मन्दम' (अंक १ श्लोक २७) या श्लोकात अश्लीलता नसली तरी त्यात शृंगाराच्या सीमा ओलांडलेल्या आहेत. वीरराघव या संस्कृत टीकाकाराने या श्लोकात कामशास्त्रात सागितलेली धैनुक-पुरुषायितादि संभोगासने सूचित होतात, असे म्हटले आहे.

आपले श्लोक-श्लोकार्ध आवृत्त करण्याचा दोष त्याच्या लेखनात मोठ्या प्रमाणात आढळतो. उदा. 'दहति कुहर भाजाम्' हा श्लोक महावीर चरित (अंक ५-४१) मालती-माधव (अंक ९.६) व उत्तररामचरित (अंक ३.२१) तीनही नाटकांत आला आहे. 'चूडाचुम्बितकङ्कपत्र' (महावीर अंक १.१८) हा रामलक्ष्मणाचे वर्णन असलेला श्लोकच 'उत्तररामचरिता'त (अंक ४.२०) लवकुशाचे वर्णन करण्यासाठी घातलेला आहे. पण रामलक्ष्मणांचे वय व लव-कुशांचे वय यांच्यातली तफावत भवभूतीने लक्षात घेतलेली दिसत नाही.

तसेच 'न किंचिदपि कुर्वाण:' हा उत्तर रामचरिताच्या दुसऱ्या अंकात (अंक २.१९) आलेला श्लोकच भवभूतीने सहाव्या अंकात पुन्हा घातला आहे. यातील अप्रयोजकतेवर टीका करताना डॉ. बेलवलकर म्हणतात, "हा श्लोक मागे दुसऱ्या अंकात रामाने सीतेसंबंधाने म्हटला आहे तोच श्लोक विद्याधर-विद्याधरीसारख्या रंगेल जोडप्याने वापरावा यात औचित्याची बरीच हानी झाली आहे." (उ.नि. पृष्ठ २२७) अशा प्रकारे समान येणारे श्लोक व श्लोकार्ध यांची संख्या साठावर जात असल्याचे प्रा. तोडरमल यांनी दाखवले आहे. तसेच एका श्लोकातील निरनिराळे चरण भिन्न पात्रांनी म्हणण्याचा अप्रयोजकपणा महावीरचरितातील 'त्वं न पूज्यतमोऽतिथिर्यदि' (म.वी.च.२.५०) या श्लोकात

दिसतो. याचे पहिले दोन चरण पुरोहित शतानंदाने, तिसरा जनकाने तर शेवटचा कंचुकीने म्हटलेला आहे.

असे काही दोष त्याच्या कृतीत आढळत असले तरी ते त्याच्या थोरवीला बाध आणीत नाहीत. संस्कृत नाट्यसृष्टीत भवभूतीचे स्थान अजोड आहे असेच म्हटले पाहिजे. मला तर भवभूतीची नाटके वाचताना गडकऱ्यांच्या नाटकांची आठवण येते. तीच अलौकिक बुद्धिमत्ता, दिव्य प्रतिभेची झळाळी, वाचक-प्रेक्षकांना चकित करण्याची हौस, स्वतंत्र अशी भाषाशैली व सर्वस्वी अनोखी बेहोषी या गोष्टी दोघांच्या नाटकात आढळतात. तेव्हा भवभूतीस संस्कृत भाषेतील 'गडकरी' असे म्हणावयास हरकत नाही.

# धीरनाग

धीरनाग अथवा दिङ्नाग याने रचलेले 'कुन्दमाला' हे नाटक बराच काळ उपलब्ध नव्हते. रामकृष्णकवी व रामनाथशास्त्री यांनी इ.स.१९२३ मध्ये ते प्रसिद्ध केले. याच्या लेखकाच्या नावाबद्दल मतभेद आहेत. अनेक अभ्यासकांच्या मते याचा लेखक दिङ्नाग हा आहे. पण प्रो. पी.एस. शास्त्री, प्रो. सुब्रह्मण्यम ऐयर, डॉ. सुशील कुमार दे. व. संस्कृत वाङ्मयाचे इतिहास लेखक श्री. कृष्णमाचारिपय यांनी 'धीरनाग' हे नाव निश्चित केले आहे. म.म.मिराशी यांनीही यास पाठिंबा दिला आहे. प्रस्तुत लेखकाच्या मते हेच नाव योग्य आहे.

'उत्तररामचरित' व कुन्दमाला या दोन्हींचे कथानक थोडे फार सारखेच असल्यामुळे भवभूती व धीरनाग यांच्यात कोण अगोदर होऊन गेला याविषयी मतभेद आहेत. दिङ्नाग हे नाव मानणारे विद्वान त्यास इ.स.पाचव्या शतकात होऊन गेलेला विख्यात बौद्ध पंडित समजतात. त्यामुळे साहजिकच तो भवभूतीहून प्राचीन ठरतो. पण त्या दिङ्नाग पंडिताने नाटक रचल्याचे प्रसिद्ध नाही. तेव्हा ते मत सोडून दिले पाहिजे.

दुसरे असे की या नाटकाचा कर्ता बौद्ध नाही. 'कुन्दमाला' नाटकाच्या नांदीत गजाननास वंदन केले आहे. दुसऱ्या श्लोकात भगवान शंकराच्या जटाजूटांचे वर्णन आहे. उत्तररामचरित व कुंदमाला या दोन्हीतील साम्यस्थळे विचारात घेऊन डॉ. कालीकुमार दत्त यांनी भवभूतीने कुन्दमालेचे अनुकरण केले असा निर्णय घेतला व पुढे त्यास प्रसिद्ध इतिहाससंशोधक डॉ. ह. द. सांकलिया यांनी पुष्टी दिली आहे. पण म.म.मिराशी यांनी धीरनागाचे कल्पनादारिद्र्य स्पष्ट करून त्यानेच भवभूतीची उसनवारी केली आहे असे

आपले स्पष्ट मत व्यक्त केले आहे व त्याचा काळ इ.स.चे आठवे शतक ते अकरावे शतक यांच्या दरम्यान असावा. असे म्हटले आहे. वाचकांनी सविस्तर माहितीसाठी त्यांच्या 'भवभूती' या ग्रंथाची २८३ ते २९३ ही पाने पाहावीत.

* * *

'कुन्दमाला' नाटकात सहा अंक आहेत. गजाननास व शिवशंकरास वंदन करून कवीने नाटकास प्रारंभ केला आहे. सुरुवातीस लक्ष्मण व सीता हे रथात बसून गंगेच्या तीरावर येतात. तेथे उतरल्यावर तो रामाने तिचा त्याग केला आहे अशी कटू वार्ता सांगतो. नंतर वनदेवतांना आवाहन करून सीतादेवीचे रक्षण करण्याची प्रार्थना करतो. तो निघून गेल्यावर सीतेला शोक अनावर होतो. तिचा आक्रोश कानावर पडताच वाल्मीकीचे शिष्य ती हकीकत वाल्मीकीच्या कानावर घालतात. मग वाल्मीकी तिला आपल्या आश्रमात घेऊन जातात. जाताना सीता गंगेला नवस बोलते ''माझी प्रसूती सुखरूप झाली तर मी दररोज तुला कुंदपुष्पांची माळ अर्पण करीन.' (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेश आहे. त्यात सीतेची सखी वेदवती व एक ऋषिकन्या यांचा संवाद आहे. त्यावरून सीतेला कुश आणि लव अशी दोन मुले झाली तसेच रामाच्या अश्वमेध यज्ञाची नैमिषारण्यात तयारी सुरू आहे. मुख्य प्रवेशात सीता वेदवतीला बोलावते. तेव्हा वेदवती अश्वमेध यज्ञाचा विषय काढते. यज्ञदीक्षेच्या वेळी रामाला दुसऱ्या स्त्रीशी विवाह करावा लागेल असे म्हणते. तेव्हा सीता आपला रामाच्या कृत्यावर हक्क नाही असे सांगते. अश्वमेधाचे निमंत्रण वाल्मीकींना देण्यासाठी रामाचा दूत आश्रमाकडे येत असल्याची घोषणा होते. खरे तर सीता आपल्या जीविताविषयी निराश झालेली आहे. मुलांचे संगोपन वेदवती व वाल्मीकी यांच्यावर सोपवून देहत्याग करण्याचा तिचा मानस आहे. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकात सुरुवातीला एक तापस प्रवेश करतो. तो प्रवासाने अत्यंत थकलेला आहे. तळपायांना फोड आले असल्याने त्याला एक पाऊलही चालवत नाही. त्याच्या बोलण्यावरून सीता लव-कुशांना घेऊन नैमिषारण्यात आल्याचे समजते. तोही तिकडेच चालला आहे. मुख्य प्रवेशात राम-लक्ष्मण दिसतात. सीतेच्या स्मरणाने राम अगदी व्याकुळ झालेला आहे. लक्ष्मण त्याला धीर देऊन सावरत आहे. इतक्यात गोमतीनदीच्या प्रवाहातून कुंदपुष्पांची माळ वाहात येताना दिसते. ती अत्यंत सुंदर माळ पाहून ती सीतेनेच गुंफली असावी असे

त्याला वाटते. रामाला वाळूत पावले दिसतात. सीता तेथे आलेली आहे. ती रामाला पाहते. त्याची दीन अवस्था पाहून तिच्या डोळ्यांत आसवे उभी राहतात. इतक्यात एक ऋषी येऊन रामाला सांगतो की वाल्मीकी त्याची वाट पाहात आहेत. राम-लक्ष्मण वाल्मीकीच्या आश्रमाकडे जातात. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या सुरुवातीस विष्कंभक आहे. त्यात यज्ञवती व वेदवती यांचा संवाद आहे. रामाच्या मनात सीतेविषयी अद्याप प्रेम आहे का हे पाहण्यासाठी तिलोत्तमा ही अप्सरा रामाकडे जाणार होती. पण विदूषकाने त्यांचे बोलणे ऐकल्यामुळे वेदवती तिलोत्तमेस तसे न करण्यास सांगायला जाते. मुख्य प्रवेशात सीता व यज्ञवती येतात. सीतेला पूर्वी वनवासात असताना एका वनदेवतेने शुभ्र वल्कल दिले होते. ते तिने धारण केले होते. तसेच आश्रमातील मोठ्या विहिरीवर स्त्रिया वावरत असताना वाल्मीकीच्या प्रभावाने त्या पुरुषांना दिसत नसतात. वाल्मीकीचा शिष्य रामाला परिसर दाखवण्यासाठी तेथे येतो. तेव्हा रामाला विहिरीत सीतेचे प्रतिबिंब दिसते. सीता न दिसल्याने तो एकदम मूर्च्छित होऊन पडतो. त्याला सावध करण्यासाठी सीता आलिंगन देते. सावध झाल्यावर त्याला सीतेचे फक्त उत्तरीय दिसते. ते तो ओढून घेतो व आपले उत्तरीय टाकून देतो. सीता ते उचलून घेते. इतक्यात विदूषक येतो व तिलोत्तमा ही अप्सरा सीतेचे रूप घेऊन येणार असल्याचे सांगतो. तेव्हा आपण पाहिलेले प्रतिबिंब सीतेचे नसून त्या अप्सरेचे असावे असे रामाला वाटते. (अंक चौथा)

पाचव्या अंकात विदूषक कौशिक हा लवकुशांना घेऊन येतो. ते रामायण पाठ म्हणण्यात कुशल आहेत असे सांगतो. त्या दोघांना पाहिल्यावर रामाचे अंतःकरण भरून येते. ती मुलेही रामाच्या दर्शनाने कावरीबावरी होतात. राम त्यांना आपल्या मांडीवर बसवतो. तेव्हा विदूषक सांगतो की रघुकुलातील व्यक्तीव्यतिरिक्त असे कोणी या सिंहासनावर बसले तर त्याच्या मस्तकाच्या चिंधड्या होतात, असे त्याने ऐकले आहे. त्या मुलांचे वय, वर्ण, आकृती वगैरे पाहून रामाला ती आपलीच मुले असावीत, अशी शंका येते. मग राम आपल्या परिवारासह त्या मुलांचे 'गीतरामायण' ऐकण्याचे ठरवतो. (अंक पाचवा)

सहाव्या अंकात लव-कुश राम-लक्ष्मण, त्यांच्या माता व इतर परिवारासमोर रामायणकथा सादर करतात. त्या कथेत सीतेला लक्ष्मणाने वनात आणून सोडले. इथपर्यंतचा कथाभाग असतो. तेवढा भाग म्हणून ते थांबतात. पण त्याच्या पुढील भागाचीही रचना वाल्मीकींनी केलेली असते. वाल्मीकीचा शिष्य कण हा पुढे येऊन त्या पुढील भाग म्हणून दाखवतो. त्यात सीता वाल्मीकींच्या

आश्रमात प्रसूत झाली व तिला कुश व लव असे दोन पुत्र झाले. हा कथाभाग ऐकताच राम, लक्ष्मण, कुश व लव हे मूर्च्छित होतात.

एवढ्यात सीतेला घेऊन स्वत: वाल्मीकी तेथे येतात. रामाला सावध करून ते सीतेचा विनाकारण त्याग केल्याबद्दल रामाला नावे ठेवतात. सीता आपल्या पातिव्रत्याबाबत शपथेचा उच्चार करते तेव्हा प्रचंड ध्वनी निनादतो व स्वत: पृथ्वीदेवता पाताळातून वर येते व सीतेच्या शुद्धतेची ग्वाही देते. सर्व जण सीतेच्या शुद्धतेबाबत नि:शंक होतात. राम सीतेचा हात हातात घेऊन तिचा स्वीकार करतो. वाल्मीकीच्या आज्ञेवरून कुशाला साम्राज्याचा प्रमुख म्हणून अभिषेक करण्यात येतो. अखेरीस भरतवाक्य होऊन नाटक समाप्त होते. (अंक सहावा)

* * *

धीरनागाने रामाच्या उत्तरायुष्यावर नाट्यरचना करताना वाल्मीकी रामायणापेक्षा भवभूतीच्या उत्तररामचरिताचाच अधिक आधार घेतलेला दिसतो. त्याचप्रमाणे शाकुंतल व मृच्छकटिक यातील प्रसंगांचीही थोडीफार उसनवारी केलेली आहे. या नाटकाची वैशिष्ट्ये थोडक्यात याप्रमाणे -

(१) नाटककाराने नाटकास 'कुन्दमाला' असे नाव दिले आहे. ही कल्पना त्याला मालती-माधवातील बकुलमालेवरून सुचली असावी. पण भवभूतीने त्या कल्पनेचा जसा कलात्मक उपयोग करून घेतला आहे तसा धीरनागाने सदर कल्पनेचा काहीच उपयोग करुन घेतला नाही. गोमती नदीतून वाहात आलेली कुंदमाला पाहून रामाला ती सीतेनेच गुंफली असावी असे वाटते. सारांश, कुंदमाला या शीर्षकाने काहीच साधलेले नाही.

(२) दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीला राम विदूषकाला म्हणतो "मी सीतेचा त्याग केला तेव्हा तू मला का अडवले नाहीस?" शाकुंतलाच्या सहाव्या अंकात दुष्यंताने असाच प्रश्न विदूषकास विचारलेला आहे. अर्थात विदूषकाने अडवले असते तर रामाने सीतेचा त्याग केला नसता, असे थोडेच आहे? त्यामुळे हा प्रश्न निरर्थक आहे.

(३) तसेच पाचव्या अंकात कुश-लव रामाच्या मांडीवर बसले असता विदूषक एकदम सांगतो की 'रघुकुलाव्यतिरिक्त कोणी या सिंहासनावर बसेल त्याच्या मस्तकाचे तुकडे होतील' हा प्रसंगही नाटककाराने शाकुंतलाच्या सातव्या अंकातून उसना घेतलेला दिसतो. तेथे सर्वदमनाचा जमिनीवर पडलेला ताईत

दुष्यंत उचलू लागतो. तेव्हा तापसी त्याला सांगतात की 'हा मुलगा, याची आई किंवा वडील यांच्याखेरीज दुसऱ्या कोणी ताईत उचलला तर तो साप होऊन दंश करतो.'

(४) उत्तररामचरितातील अनेक प्रसंगांची उसनवारी केलेली दिसून येते. सीता रामाला न दिसणे, राम मूर्च्छित पडल्यावर सीतेने त्याला स्पर्श करून सावध करणे, नाटकाचा शेवट सुखांत करणे इ. पण भवभूतीने सीतेवरील अन्यायाचे परिमार्जन करणे, हा उदात्त हेतू नजरेपुढे ठेवला आहे. तसा धीरनागाने कोणताही हेतू समोर ठेवल्याचे दिसत नाही. त्यामुळे उत्तररामचरिताच्या तुलनेत हे नाटक अगदी कमी प्रतीचे वाटते.

(५) सीतेचे उत्तरीय ओढून घेऊन राम आपले उत्तरीय खाली टाकतो. असा चौथ्या अंकात प्रसंग आहे. सीता रामाचे उत्तरीय उचलून घेते पण ते सुगंधित केलेले नव्हते. यावरून सीतेला रामाच्या विरक्त राहणीची कल्पना येते. या प्रसंगाचे मृच्छकटिकातील सुगंधी शेल्याशी साम्य आहे. चारुदत्ताचा शेला जेव्हा वसंतसेनेच्या हाती येतो तेव्हा त्याच्या सुगंधावरून चारुदत्त रसिक असल्याची खात्री पटते. असो.

# भट्टनारायण

बंगालमधील क्षितीश वंशावलिचरित्र, वंगराज घटक, राजावलि इत्यादी ग्रंथांत भट्टनारायणाविषयी थोडी हकीकत मिळते. त्यानुसार भट्टनारायण हा शांडिल्यगोत्री ब्राह्मण असून कनोजचा रहिवासी होता. बंगालच्या आदिसूर राजाच्या निमंत्रणावरून कनोज येथील पाच ब्राह्मण कुटुंबांनी स्थलांतर केले, त्यात भट्टनारायणाचे कुटुंब हे अग्रेसर होते. तेथे स्थायिक झाल्यावर भट्टनारायणास काही गावे बक्षीस अथवा नाममात्र किमतीत मिळाली. त्यात पुढे भर पडली व भट्टनारायण हा राजा झाला आणि त्याच्या वंशात बंगालमधील पुढे प्रसिद्धीस आलेल्या टागोर घराण्याचा उदय झाला असे म्हणतात. पण या समजूतीस ठाकुराच्या वंशावळीचा पाठिंबा मिळत नाही. कनोजी ब्राह्मण हे सारस्वत होते नंतर ते गौड सारस्वत बनले.

वेणीसंहाराच्या प्रस्तावनेत 'कवेर्मृगराजलक्ष्मण: भट्टनारायणस्य' असे शब्द आहेत. त्यावरून त्याला 'सिंह' अशी पदवी मिळालेली दिसते. पण याच बिरुदामुळे तो क्षत्रिय असावा असा काहींनी तर्क केला आहे. पण 'मृगराज' या शब्दावरून असा तर्क करण्यात हशील नाही. कारण भट्ट नारायण ब्राह्मण असल्याचे भरघोस पुरावे खुद्द नाटकातच आढळतात.

कनोजच्या ब्राह्मण कुटुंबांनी स्थलांतर का केले याबद्दलही अनेक मते आहेत. आदिसूर हा राजा शूद्र होता व त्याला यज्ञ करावयाचा होता. त्यास बंगाली ब्राह्मण तयार झाले नाहीत म्हणून त्याने कनोजहून ब्राह्मणांना बोलावून घेतले, हे एक कारण सांगितले जाते. तसेच कनोजमध्ये ब्राह्मणांचा छळ होऊ लागला

म्हणून तेथील ब्राह्मणांनी स्थलांतर केले, असे एक कारण डॉ. भटांनी उल्लेखिलेले आहे, ते अधिक योग्य वाटते.

भट्ट-नारायणाचा काळ निश्चित करणे फारसे कठीण नाही. बाणभट्टाने हर्षचरिताच्या प्रस्तावनेत भास, कालिदास, प्रवरसेन, सुबंधु वगैरे अनेक नामवंत लेखकांचा तसेच कलाकृतींचा जो उल्लेख केला आहे, त्यात भट्टनारायणाचे नाव नाही.तेव्हा तो बाणानंतरच होऊन गेला असावा. बाणभट्ट हा सातव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. ही त्याच्या काळाची पूर्वमर्यादा मानण्यास हरकत नाही.

भट्टनारायणाच्या नाटकातील अवतरणे वामन (इ.स.७५०), आनंदवर्धन (इ.स.८५०), मम्मट (इ.स.११००) व विश्वनाथ (इ.स.१३५०) यांच्या ग्रंथात आढळतात. यांपैकी वामन हा पहिला लेखक असल्यामुळे भट्टनारायण हा सातव्या शतकाच्या अखेरीस किंवा आठव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला असे निश्चितपणे म्हणता येते.

इतर पुराव्यांवरूनही या मतास दुजोरा मिळतो. आदिसूर अथवा आदित्यसेन हा बंगालमधील सेन राजवंशाचा मूळ पुरुष मानला जातो. हे घराणे बंगालमध्ये इ.स. ६५० पासून ११०० पर्यंत राज्य करीत होते. आदित्य सेन हा इ.स.६५० च्या सुमारास राज्य करीत होता असे कॅनिंगहॅमने शिलालेखाच्या आधारे दाखवून दिले आहे. तसेच ह्युएनत्संग सांगतो की नेपाळचा राजा अंशुवर्मा याची भोगवती नामक बहीण शूरसेन राजाला दिली होती. अभ्यासकांच्या मते हा शूरसेन म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून बंगालचा आदिसूर अथवा आदित्यसेन हाच होय. नेपाळचा अंशुवर्मा हा राजा इ.स.६४४ ते ६५२ या दरम्यान राज्य करीत होता.

भट्टनारायणाच्या भाषाशैलीवरूनही तो सातव्या-आठव्या शतकात होऊन गेला असावा. बाणभट्ट व दंडी यांच्या प्रभावामुळे समासप्रचुर गद्य वाङ्मयाला चांगलाच बहर आलेला होता. वेणीसंहारात भानुमती व सुंदरक यांच्या प्राकृत भाषणातही भट्टनारायणाने दीर्घ समासांची योजना केली आहे. असाच प्रकार भवभूतीच्या मालती-माधवातही आढळतो. भवभूती व भट्टनारायण हे दोघे थोडेफार समकालीन असावेत. त्यातही भवभूती हा ज्येष्ठ असावा. भवभूतीचा काळ इ.स.७०० व ७३० इतका मान्य झाला आहे.तेव्हा भट्टनारायण साधारणपणे इ.स.७२५ ते ७५० या कालावधीत होऊन गेला असावा.

भट्टनारायणाचे 'वेणीसंहार' हे एकच नाटक प्रसिद्ध आहे. याव्यतिरिक्त त्याने इतर लेखन केलेले दिसते. दंडीच्या 'दशकुमारचरित' या ग्रंथाच्या प्रारंभी जो

प्रास्ताविक भाग आहे, त्यास 'पूर्वपीठिका' असे नाव आहे. या पूर्वपीठिकेचे दोन लेखक असून त्यांपैकी एक भट्टनारायण असावा. सुभाषितावलीत भट्टनारायणाच्या नावावर सात श्लोक दिलेले आहेत. त्यातील 'उत्तिष्ठत्या रतान्ते' हा श्लोक वेणीसंहाराच्या काही प्रतीत नांदीश्लोक म्हणून दिलेला आहे. परंतु त्यातील उत्तान शृंगारवर्णन पाहता तो प्रक्षिप्त वाटतो.

शार्ङ्गधर पद्धतीत सहा श्लोक नारायण भट्टाचे म्हणून दिले आहेत. कदाचित भट्टनारायणाचा उल्लेख नारायण भट्ट असा होत असावा. तसेच त्याने आणखी दोन श्लोक निशानारायणाचे म्हणून दिले आहेत. त्यापैकी 'उत्तिष्ठत्या रतान्ते' हा एक श्लोक आहे. हस्तलिखिताच्या यादीत भट्टनारायणाच्या नावावर 'जानकी परिणय' म्हणून नाटक दिले आहे पण ते उपलब्ध नाही. तेव्हा 'वेणीसंहार' नाटक ही एकच त्याची खरी व प्रमुख कलाकृती आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

* * *

या नाटकात कृष्णाच्या शिष्टाईपासून दुर्योधनाच्या वधापर्यंतचा कथाभाग आलेला आहे. नांदीश्लोकानंतर सूत्रधाराच्या बोलण्याचा दुसरा अर्थ घेऊन त्याला शिव्या घालत भीम प्रवेश करतो. त्याच्याबरोबर सहदेव आहे. कौरवांविरुद्ध युद्धाची ललकारी देण्याऐवजी युधिष्ठिराने तहासाठी बोलणी करावीत, याची भीमाला चीड आलेली आहे. युधिष्ठिर केवळ पाच गावांवर संतुष्ट आहे व त्याची मागणी कौरवांपुढे ठेवण्यासाठी कृष्ण शिष्टाईला गेलेला आहे हे ऐकून तर त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली आहे. तो युधिष्ठिर व इतर पांडवांशी संबंध तोडायला तयार झाला आहे. तो सहदेवाला आपली विनंती 'राजाला' कळविण्यास सांगतो -

"तुमची आज्ञा मोडण्याच्या पातकात मी बुडून गेलो तरी हरकत नाही. मर्यादेत राहणाऱ्या तुम्ही भावंडांनी माझी निंदा केली तरी मला तिची फिकीर नाही. क्रोधाने संतप्त होऊन कौरवांच्या रक्ताने माखलेली गदा फिरवत असता आजचा एक दिवस तरी तुम्ही माझे वडील भाऊ नाही आणि मी तुमचा आज्ञाधारक (बंधू) नाही."

(वेणी. १.१२)

भीमाचे बोलणे रंगभूमीवर येत असलेल्या द्रौपदीच्या कानावर पडते व ती सुखावते. द्रौपदीला पाहताच भीमाचा संताप आणखी उफाळतो. दुर्योधनाची

पत्नी भानुमती हिने द्रौपदीचा अपमान केल्याने ती अधिकच उद्विग्न झाली आहे. ती हकीकत ऐकल्यावर भीम तिला आश्वासन देतो की दुर्योधनाच्या मांड्या फोडून त्याच्या रक्ताने माखलेल्या हाताने तो तिची वेणी लवकरच बांधणार आहे.

इतक्यात दुंदुभीचा आवाज येऊ लागतो. कंचुकी गडबडीने येऊन सांगतो की तहाच्या वाटाघाटी फिसकटल्या आहेत. श्रीकृष्ण परत आला असून युधिष्ठिराने कौरवांविरुद्ध युद्धाची घोषणा केली आहे. ही वार्ता ऐकताच भीमाला आनंद होतो व या रणरूपी यज्ञात ऋत्विजाची भूमिका करण्यास उत्सुक होतो. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक आहे. कंचुकी येऊन सांगतो त्यावरून भारतीय युद्धास प्रारंभ झाला आहे. भीष्म शरपंजरी पडलेले आहेत. द्रोण, कर्ण व जयद्रथ यांनी अभिमन्यूस चक्रव्यूहात कोंडून ठार केले आहे. बाहेर युद्ध भडकलेले असतानाही दुर्योधनास अंत:पुरात विहार करण्याची इच्छा आहे. त्याची पत्नी बालोद्यानात आहे. ही वार्ता दुर्योधनास कळविण्यास तो निघून जातो.

मुख्य प्रवेशात भानुमती, तिची मैत्रीण व दासी या प्रवेश करतात. भानुमतीस अत्यंत अशुभ असे स्वप्न पडले असून ती ते मैत्रिणीस सांगत आहे. अशा वेळी दुर्योधन उद्यानात आलेला आहे. भानुमती काही तरी सांगत असलेली पाहून तो दूर उभा राहून तिचे बोलणे ऐकत आहे.

भानुमतीच्या स्वप्नात एक मुंगुस आले होते व त्याने शंभर सापांचा फडशा पाडलेला होता. ते मुंगुस तिच्या पाठोपाठ मांडवात शिरले व त्याने तिची काचोळी खेचली. मुंगुस या अर्थी 'नकुल' हा शब्द आल्याने दुर्योधन हादरतो. आपली पत्नी नकुलाबरोबर प्रीतीचे चाळे करते व ते मैत्रिणीना सांगत आहे हे पाहून त्याच्या मनावरचा ताबा उडतो. तो पुढे होऊन तिच्यावर प्रहार करणार इतक्यात 'त्यानंतर त्या स्वप्नातून जागी झाले' हे तिचे उद्गार कानावर पडताच तो शरमिंदा होऊन तेथेच थांबतो.

हे स्वप्न खरोखरच 'अशुभ' आहे हे तिच्या मैत्रिणीही मान्य करतात. दुर्योधनालाही ते स्वप्न अशुभाची सूचना देणारे आहे असे वाटते. कारण मुंगुसाने मारलेले शंभर सर्प ही कल्पना शंभर कौरवांच्या विनाशाचीच सूचना देणारी आहे. पण तो ही गोष्ट मनावर घेत नाही. भानुमती सूर्याची पूजा करू लागताच

दुर्योधन पुढे होऊन तिला कामूक स्पर्श करतो. तिच्याशी लाडीगोडीने बोलू लागतो.

इतक्यात सभोवताली प्रचंड वादळ उठते. धुळीचे लोट वर उसळतात. झाडे एकमेकावर घासून पेट घेऊ लागतात. तेव्हा दुर्योधन भानुमतीला घट्ट धरून लाकडी क्रीडापर्वतावरील आडोशाच्या जागी नेतो. पण तेथे बसण्यासाठी शिलातलाखेरीज दुसरे काही नाही. तेव्हा दुर्योधन निर्लज्जपणे तिला आपल्या मांडीवर बसण्यास सांगतो. इतक्यात कंचुकी तेथे धावत पळत येतो व वादळी वाऱ्याने दुर्योधनाच्या रथावरील पताका मोडली असल्याचे सांगतो. दुर्योधनाच्या बोलण्यातील 'मांडी' हा शब्द व कंचुकीचा 'मोडली' हा शब्द एकत्र आल्याने 'मांडी मोडली' असा अशुभ अर्थ सुचून तो चरकतो. या दुश्चिन्हाची शांती करण्याचा निरोप भानुमती त्यास देते व कंचुकी निघून जातो.

इतक्यात दुर्योधनाची बहीण दुःशला व जयद्रथाची आई महादेवी या दोघी तेथे येतात. दुःशला ही जयद्रथाची पत्नी होती. अर्जुनाने सायंकाळ होण्याच्या आत जयद्रथाचा वध करण्याची प्रतिज्ञा केल्याचे ऐकून त्या दोघी घाबरलेल्या आहेत. पण पांडवांनी आजवर अशाच पोकळ प्रतिज्ञा केलेल्या आहेत असे सांगून दुर्योधन त्या दोघींना धीर देतो व स्वतः त्याचे रक्षण करण्यास उद्युक्त होतो. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. यात वसागंधानामक राक्षसी व तिचा पती रुधिरप्रिय यांचा संवाद आहे. रणांगणावर रक्तमांसाचा नुसता चिखल झाल्याने या जोडप्याची चंगळ चाललेली आहे. हे युद्ध शंभर वर्षे चालावे अशी त्यांची इच्छा आहे. त्यांच्या बोलण्यावरून अर्जुनाने जयद्रथाला ठार मारले आहे. पण पांडवांकडील घटोत्कचाचाही नाश झाला आहे. सुभद्रा व हिडिंबा या दोघींना सारखेच दुःख झाले आहे.

हिडिंबेने रुधिरप्रियाला भीमसेनाच्या मागोमाग सावलीप्रमाणे राहण्यास सांगितलेले आहे. कारण भीमाने दुःशासनाचे रक्त प्राशन करण्याची प्रतिज्ञा केली आहे. ती वेळ येताच रुधिरप्रिय भीमाच्या शरीरात शिरून स्वतः रक्त प्राशन करणार आहे.

इतक्यात पडद्यामागे प्रचंड आरडा-ओरडा होतो. शस्त्रांचा त्याग करून द्रोणाचार्य रणांगणावर स्वस्थ बसले असता धृष्टद्युम्नाने त्यांचे केस धरून मुंडके उडवले आहे. वसागंधेला द्रोणाचार्यांचे रक्त प्राशन करण्याची इच्छा होते पण

'ब्राह्मणांचे रक्त प्राशन केले तर आपला घसा भाजेल' असे सांगून रुधिरप्रिय तिला परावृत्त करतो. अश्वत्थामा हातात तलवार घेऊन येत असलेला दिसताच दोघे घाईघाईने निघून जातात.

मुख्य प्रवेशात अश्वत्थामा प्रवेश करतो. त्याला पित्याच्या हत्येची वार्ता नाही. त्याला कौरवांचे सैन्य सैरावैरा पळत असल्याचे दिसते. कर्णासारख्या रणधुरंधरानेही युद्धाकडे पाठ फिरवलेली पाहून त्याला नवल वाटते. तो क्षत्रिय राजांना उद्देशून म्हणतो.

"जर समरांगण सोडल्यावर मृत्यूचे भय (उरणार) नसेल तर तेथून दुसरीकडे जाणे योग्य होईल. पण मनुष्यप्राण्यास जर मरण अटळ आहे तर तुम्ही आपले यश मलीन का करता?"

(अंक ३, श्लोक ६)

आपले वडील द्रोणाचार्य हे रणाची धुरा सांभाळत असताना वीरांनी असा पळ का काढावा तेच त्याला समजत नाही. नंतर सूत येऊन त्यास द्रोणाचार्यांची हत्या झाल्याचे सांगतो. ती वार्ता ऐकताच तो मूर्च्छित पडतो. कृपाचार्य येऊन त्याचे सांत्वन करतात. पित्याच्या हत्येला एका परीने आपणच कारणीभूत झाल्याचे समजताच अश्वत्थाम्याचा शोक अनावर होतो व तो प्राणत्याग करण्याचे ठरवतो. पण धृष्टद्युम्नाने केलेले अपमानास्पद कृत्य समजताच तो संतप्त होतो.

त्या वेळी दुर्योधन व कर्ण प्रवेश करतात. कर्णाच्या मनात द्रोणाचार्यांविषयी द्वेषभावना असल्याने तो त्यांच्याविषयी दुर्योधनाच्या मनात भलतेसलते भरवून देतो व हलक्या कानाच्या दुर्योधनाला ते खरे वाटते. ते दोघे अश्वत्थाम्यास भेटतात तेव्हा कृपाचार्य दुर्योधनास अश्वत्थाम्यास सेनापतिपदाचा अभिषेक करण्याची विनंती करतो. पण आपण पूर्वी कर्णाला शब्द दिला असल्याचे दुर्योधन सांगतो. पण कर्ण उघड उघड अश्वत्थाम्याचा अधिक्षेप करतो. 'ज्याच्याजवळ शस्त्र आहे त्याने समरांगणात उतरावे. उगीच बडबड करू नये' असे म्हणतो. तेव्हा अश्वत्थामा व कर्ण यांच्यात भांडण जुंपते.

अश्वत्थामा कर्णाला लाथ मारण्यासाठी धावून जातो. कृपाचार्य व दुर्योधन त्यास आवरतात. मग कर्णही संतापाने तलवार उपसतो. व "तू जातीने ब्राह्मण आहेस म्हणून मी तुला ठार मारत नाही. पण माझ्यावर उचलेला पाय तोडून टाकतो." यावर अश्वत्थामा आपले जानवे तोडतो. "मी जातीचा त्याग केला आहे. तू शस्त्र उचल. मी आजच अर्जुनाची प्रतिज्ञा पूर्ण करतो." आणि दोघे एकमेकांवर धावून जातात. दुर्योधन व कृपाचार्य त्यांना आवरतात.

मग अश्वत्थामा 'कर्ण जिवंत असेपर्यंत आपण शस्त्र हातात धरणार नाही.' असे म्हणून शस्त्राचा त्याग करतो. कर्ण पुन्हा त्यास हिणवतो. पण त्याच्या कसोटीची वेळ येते. कारण त्या वेळी भीमाने दु:शासनास पकडले आहे व तो त्याचे वक्षस्थळ फोडून रक्त प्राशन करणार आहे.

ही वार्ता ऐकताच अश्वत्थामा कर्णाला डिवचतो. मग कर्ण दु:शासनाची सुटका करण्यासाठी त्वरेने जातो. दुर्योधनही त्याच्या पाठोपाठ जातो. कर्ण व दुर्योधन दु:शासनाची सुटका करण्यास आलेले दिसताच अर्जुन भीमाच्या मदतीला धावून येतो व त्या दोघांवर बाणांचा वर्षाव करू लागतो. आपण शस्त्रत्याग केल्याचा अश्वत्थाम्यास पश्चात्ताप होतो. तो प्रतिज्ञा मोडून शस्त्र हातात घेणार इतक्यात दैवी वाणी त्यास परावृत्त करते. अश्वत्थाम्याचा निरुपाय होतो. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या प्रारंभी सारथी दुर्योधनाला रथातून नेत आहे. दु:शासनाच्या वधाने दुर्योधन मूर्च्छित झालेला आहे. रणभूमीवर भीमाने धुमाकूळ घातलेला आहे. दु:शासनाच्या रक्ताने त्याचे शरीर माखलेले आहे. त्याचे भयंकर रूप पाहून सैनिक पळू लागले आहेत. सूत मग दुर्योधनास सुरक्षित ठिकाणी हलविण्याचे ठरवतो. मग दुर्योधन सावध होतो. दु:शासनाची आठवण करून तो शोक करू लागतो. "सर्व भावांचा नाश झाल्यावर जगण्यात तरी काय अर्थ आहे. मरण यावे पण ते भीमाच्या हातून नको," असे हृदयद्रावक उद्गार तो काढतो.

रणांगणावर दुर्योधनाचा शोध करीत सुंदरक प्रवेश करतो. अकरा अक्षौहिणी सैन्याचा मालक असलेल्या, भीष्म-द्रोणादी सेनाप्रमुखांचा पोषणकर्ता असलेल्या दुर्योधनाचा शोध करण्याची पाळी यावी याचे सुंदरकास वाईट वाटते. पण हे सर्व कौरवांनी लावलेल्या विषवृक्षाचेच फळ आहे असा विचार करीत हिंडत असता त्याला दुर्योधनाचा मोडलेला रथ व जमिनीवरच बसलेला दुर्योधन दिसतो.

दुर्योधन सुंदरकास युद्धाची वार्ता विचारतो तेव्हा तो सांगतो की दु:शासनाचा वध झाल्यावर कर्णाने भीमावर हल्ला चढवला. तेव्हा भावाच्या मदतीस अर्जुन धावून आला. ते पाहून कर्णाचा पुत्र वृषसेन वडिलांच्या मदतीस आला आणि मग खरे युद्ध अर्जुन व वृषसेन यांच्यातच जुंपले. अर्जुनाने वृषसेनावर भयंकर शक्ती फेकली. ती पाहून खुद्द कर्णाच्या डोळ्यांतून आसवे ओघळली. पण वृषसेनाने आपल्या बाणाने त्या शक्तीचे तीन तुकडे केले. कुमाराचे कौशल्य पाहून भीम व कर्ण हे आपले युद्ध थांबवून दोघांतील झुंज पाहू लागले.

खवळलेल्या अर्जुनाने मग असे उद्गार काढले की 'माझ्या अभिमन्यूला माझ्या गैरहजेरीत अनेक महारथींनी एकत्र येऊन मारले; पण मी आता कर्णासमोर या वृषसेनाची फक्त आठवण मागे ठेवतो.' आणि त्याने असा भयंकर शरवर्षाव सुरू केला की कोणाला काहीच दिसेना आणि कौरवसेनेतून 'वृषसेन मेला-मेला' अशी आरोळी उठली.

वृषसेन ठार झाल्याची वार्ता ऐकून दुर्योधन शोकाकुल होतो. मग तो सुंदरकास कर्णाची वार्ता विचारतो. तेव्हा सुंदरक कर्णाने आपल्या रक्ताने लिहिलेले पत्रच दुर्योधनाला देतो. त्या पत्रात कर्णाने आपली अगतिकता प्रकट केली होती. अर्जुनाबरोबर पुन्हा युद्ध करण्याची त्याची इच्छा आहे. हे समजल्यावर दुर्योधन कर्णाबरोबरच आपले काय व्हायचे ते होऊ दे असे ठरवून सूताला रथ सज्ज करण्यास सांगतो. सुंदरक दुर्योधनाचा निरोप कर्णास देण्यासाठी निघून जातो. इतक्यात सूत येऊन सांगतो की धृतराष्ट्र, गांधारी व संजय दुर्योधनास भेटण्यासाठी येत आहेत. दुर्योधन नाइलाजाने तेथे थांबतो. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या सुरुवातीस धृतराष्ट्र, गांधारी व संजय दुर्योधनासमीप येतात. धृतराष्ट्र, दुर्योधनास पांडवांशी तह करून आपला जीव वाचविण्यास सांगतो. पण दुर्योधनास ते पटत नाही. शंभर भाऊ मेल्यावर त्यालाही जगायची इच्छा नाही. दुर्योधनाचे उद्गार ऐकल्याबरोबर गांधारीला 'आपण शंभर मुलांना नव्हे तर शंभर दुःखांना जन्म दिला' असे वाटते.

इतक्यात अत्यंत अशुभ वार्ता येते. शल्य रिकाम्या रथात बसून परत चाललेला आहे. कर्णाचा वध झाला हे समजताच दुर्योधन मूर्च्छित होतो आणि मग तो स्वतःच युद्धास उतरणार असल्याचे सांगतो. पण त्याच वेळी दुर्योधनाचा शोध घेत भीम व अर्जुन त्या ठिकाणी येतात. धृतराष्ट्र व गांधारीला पाहून ते थबकतात पण त्यांना वंदन करण्यासाठी पुढे येतात. पण त्यांना वंदन करतानाही भीम आपण दुःशासनास तर अर्जुन आपण कर्णास ठार मारल्याचे सांगतो.

त्यामुळे भीम व दुर्योधन यांच्यात भांडण जुंपते. दोघे एकमेकाला ठार मारण्याची भाषा बोलू लागतात. पण संध्याकाळ झाल्याने युधिष्ठिराने युद्ध थांबल्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे भीम व अर्जुन निघून जातात. ते गेल्यावर अश्वत्थामा प्रवेश करतो. पण दुर्योधनाच्या मनात त्याच्याविषयी तिटकारा आहे तो त्यास म्हणतो -

"अंगराज कर्णाच्या मृत्यूनंतर आपण आता लढणार आहात तर आता माझ्यादेखील मरणाची वाट पाहा. कर्ण काय किंवा सुयोधन काय? दोघे एकच आहेत."

(अंक ५, श्लोक ३९)

कर्णाच्या विषयी दुर्योधन अद्याप पक्षपात करीत असल्याचे पाहून अश्वत्थामा रागारागाने निघून जातो. धृतराष्ट्राला ही गोष्ट रुचत नाही. अश्वत्थाम्यासारख्या तेजस्वी पुरुषाचा दुर्योधनाने असा अपमान करायला नको होता असे त्याला वाटते. त्यामुळे आता खरेच भरतकुलाचा नाश होणार याबद्दल त्याला शंका राहात नाही. म्हणून तो संजयामार्फत अश्वत्थाम्यास 'राग न धरण्याचा' निरोप पाठवतो. दुर्योधन सूतास रथ तयार करण्यास सांगतो. (अंक पाचवा)

सहावा अंक पांडवांच्या शिबिरात उघडतो व प्रथमच युधिष्ठिराचे दर्शन होते. विजय अगदी दृष्टिपथात आलेला असताना भीमाने विनाकारण घाई करुन दुर्योधनाला सूर्योदयाच्या आता ठार करण्याची प्रतिज्ञा केली आहे आणि दुर्योधनाचा तर काही ठावठिकाणा नाही.त्यामुळे युधिष्ठिर व द्रौपदी हे काळजीत पडले आहेत. युधिष्ठिराने हेरांना दुर्योधनाचा कसून तपास करण्याच्या सूचना दिल्या आहेत. इतक्यात पांचालक नामक दूत येऊन सांगतो की दुर्योधनाचा शोध लागलेला असून भीम व दुर्योधन यांचे गदायुद्ध सुरू झाले आहे.

खरे तर दुर्योधनास जलस्तंभनी विद्या अवगत असल्याने तो सरोवरात लपून बसला होता. कृष्णाने तसा अंदाज वर्तविताच भीमाने पाण्यात उतरून ते सरोवर ढवळून काढले. त्याबरोबर संतप्त झालेला दुर्योधन वर आला. त्याला पाहून भीमाने 'आम्हा पाच पांडवांपैकी तू कोणाशीही लढ' असे उदार मनाने सांगितले पण दुर्योधनाने भीमावरच राग असल्याने त्याच्याशीच लढण्याचे ठरवले. युद्ध सुरू होताच कृष्णाने धर्मास निरोप पाठवून उत्सव साजरा करण्यास सांगितले आहे.

आता खुद्द कृष्णाचा असा निरोप आल्यावर युधिष्ठिर विजयोत्सव साजरा करण्याचा कंचुकीस आदेश देतो. भीमाने दुर्योधनास दाखविलेल्या औदार्याचे द्रौपदीस नवल वाटले. कारण 'दुर्योधनाने जर नकुल किंवा सहदेवाशी लढण्याचे ठरवले असते तर घात झाला असता.' असे ती उद्‌गार काढते. पण युधिष्ठिरास तसे वाटत नाही. दुर्योधन हा भीमाशीच लढणार याची त्यास खात्री होती.

इतक्यात पडद्यात कोणी तरी तहानेने व्याकूळ झाल्याने 'पाणी द्या.' असे उद्‌गार ऐकू येतात. मुनीचा वेष धारण केलेला चार्वाक नावाचा राक्षस प्रवेश करतो. त्याला आसनावर बसवून थंड पाण्याची झारी देण्यात येते. पण क्षत्रियांच्या कुळात युद्धामुळे कोणी मरण पावत असल्याने तो पाणी पिण्याचे नाकारतो.

त्याचा वृत्तांत विचारताच तो सांगतो की युद्धे पाहण्याचे कुतूहल असल्याने तो स्यमंतपंचक प्रदेशात हिंडत होता. त्याने दुर्योधन व अर्जुन यांचे गदायुद्ध सुरू झाल्याचे पाहिले पण ते पाहायचे सोडून तो इकडे आलेला आहे. त्याचे बोलणे ऐकून सारे हादरतात. मग युधिष्ठिर त्याला पुन्हा विचारतो तेव्हा समजते की भीम व दुर्योधनाच्या युद्धसमाप्तीनंतर अर्जुनाचे व दुर्योधनाचे युद्ध जुंपले आहे.

याचा अर्थ भीम या युद्धात मरण पावला असाच होता. द्रौपदी व युधिष्ठिर या वार्तेने मूर्च्छित पडतात. सावध झाल्यावर तो चार्वाकास ती हकीकत सविस्तर सांगण्याची विनंती करतो. तेव्हा तो सांगतो की भीम व दुर्योधनाचे गदायुद्ध सुरू असता बलरामाने आपल्या शिष्यास-दुर्योधनास खुणेने इशारा केला आणि दुर्योधनाने दु:शासनाच्या वधाचा सूड घेतला.

हे ऐकताच सर्वत्र हाहाकार उडतो. युधिष्ठिर व द्रौपदी विलाप करू लागतात. दोघेही प्राणत्यागास सिद्ध होतात. द्रौपदी चिता पेटवण्याचा आदेश देते. भीमाला भेटायला ती उतावीळ झाली आहे. गोंधळाचा फायदा घेऊन चार्वाक घाईघाईने निघून जातो. द्रौपदी व युधिष्ठिर अखेरची निरवानिरव करू लागतात. युधिष्ठिर आपल्या पितरांना अखेरचे जलतर्पण करतो.

इतक्यात पडद्यात गोंगाट ऐकू येतो. कंचुकी घाईघाईने येऊन सांगतो की रक्ताने माखलेला व हातातली गदा गरगर फिरवणारा दुर्योधन इकडेच येत आहे. हे ऐकताच अर्जुनाचाही घात झाला असे समजून द्रौपदी व युधिष्ठिर दोघेही मूर्च्छित पडतात. युधिष्ठिर सावध होऊन दुर्योधनाला धडा शिकवण्यासाठी धनुष्यबाण आणण्यास सांगतो. इतक्यात भीम प्रवेश करतो.

चार्वाकाने सांगितलेल्या बातमीने सर्व जण इतके गोंधळलेले असतात की भीमाला समोर पाहूनही कोणी त्याला ओळखत नाही. युधिष्ठिर तर त्यास दुर्योधन समजून त्याच्या अंगावर धावून जातो. कंचुकी मात्र त्यास ओळखतो. भीमसेन युधिष्ठिराच्या पायावर डोके ठेवतो. युधिष्ठिर गोंधळून जातो. मग त्याला भीमाची

ओळख पटते. सर्वत्र आनंदीआनंद होतो. भीम द्रौपदीची वेणी बांधण्यास उतावीळ झाला आहे. तो वेणी बांधू लागताच कृष्ण व अर्जुन प्रवेश करतात.

कृष्ण सांगतो की दुर्योधनाचा मित्र चार्वाक राक्षसाने खोटी बातमी दिल्याचे समजताच तो अर्जुनास घेऊन घाईघाईने आला आहे. हे सगळे चार्वाकाचे कारस्थान असल्याचे उलगडा होतो. भरतवाक्य होऊन नाटक संपते.

* * *

'वेणीसंहारा'च्या कथावस्तूस महाभारतातील उद्योगपर्वापासून तो शांतिपर्वापर्यंतच्या कथानकाचा आधार आहे. उद्योगपर्वाच्या १५० व्या अध्यायात श्रीकृष्ण युधिष्ठिरास वाटाघाटी फिसकटल्याचे सांगून युद्धाची तयारी करण्याचा सल्ला देतो. तेथून युद्धास प्रारंभ होतो. शल्यपर्वाच्या अठ्ठावन्नाव्या अध्यायात भीमाने दुर्योधनाचा वध केला आहे. शांतिपर्वात युधिष्ठिरास राज्याभिषेक झाला आहे.

महाभारतातील कथानकात भट्टनारायणाने नाट्यानुकूल अनेक बदल केले आहेत. पहिला मुख्य बदल म्हणजे भीमाने दुर्योधन व दुःशासन यांच्या वधाच्या प्रतिज्ञेस नाटककाराने दुःशासनाचे रक्त प्राशन करणे व दुर्योधनाच्या रक्ताने माखलेल्या हाताने द्रौपदीची वेणी घालणे, यांची जोड दिली आहे. त्यामुळे केस मोकळे सोडलेली द्रौपदी नाटकभर वावरताना दिसते.

भानुमती (दुर्योधनाची पत्नी) व दुर्योधन यांच्यातील प्रणयप्रसंग हा पूर्ण स्वतंत्र आहे. महाभारतात दुर्योधनाच्या पत्नीचा उल्लेख नाही. तिसरा अंक कर्ण व अश्वत्थामा यांच्या कलहाने व्यापलेला आहे. महाभारतात कृप व कर्ण यांचा कलह दर्शविला आहे. पण नाटककराने तो अश्वत्थामा व कर्ण यांच्यात व द्रोणाचार्यांच्या वधानंतर घडून आला असे दाखवले आहे. पाचव्या अंकातील धृतराष्ट्र व गांधारी यांनी दुर्योधनाची घेतलेली भेट व त्याच वेळी भीम व दुर्योधन यांच्यात झालेली बोलाचाली हा प्रसंग नाटककाराने स्वतंत्र निर्मिला आहे. तसेच सहाव्या अंकात चार्वाकाने उडवलेल्या गोंधळासही महाभारतात आधार नाही.

* * *

'वेणीसंहार' या नाटकाचा प्रतिपाद्य विषय कोणता हे समजण्यासाठी आपल्याला नाटककाराने हा शब्द नेमका कोणत्या अर्थाने योजलेला आहे हे पाहिले पाहिजे. संम्+हृ (१ प.प.) गोळा करणे, एकत्र करणे असा अर्थ आहे.

द्रौपदीच्या मोकळ्या सुटलेल्या केसांची वेणी बांधणे, हा या नाटकाचा मुख्य विषय आहे. शेवटी भीम तिची वेणी बांधतो, असाच उल्लेख आहे. पण ही वेणी कौरवकुलाचा संपूर्ण उच्छेद झाल्यावरच बांधायची आहे हे सांगण्यासाठी 'दुर्योधनाच्या रक्ताने माखलेल्या हातांनी' हे शब्द महत्त्वाचे आहेत. दुःशासनाचे वक्ष:स्थल फाडून रक्त प्राशन करणे व दुर्योधनाच्या मांड्या फोडून त्याच्या रक्ताने हात धुणे या दोन्ही प्रतिज्ञा भीमाने नाटकात पूर्ण केल्या आहेत.

'वेणीसंहार' या शब्दाचा दुसरा अर्थ 'वेणी'साठी झालेला प्रचंड संहार असा होतो. 'संहार' या शब्दाचा विनाश, हत्याकांड हाच अर्थ विशेष प्रसिद्ध आहे. या युद्धात उभयपक्षांची अपरिमित हानी झाली. कौरवांचा तर सर्वनाश झालाच पण पांडवांना जबर हादरा बसला. घटोत्कच व अभिमन्यू हे नव्या पिढीतील दमदार वीर कामास आले. अश्वत्थाम्याच्या अघोरी कृत्याने द्रौपदीचे पाचही पुत्र नष्ट पावले. पाच पांडवच काय ते जिवंत राहिले, असे म्हणण्यास हरकत नाही. युद्ध टाळण्यासाठी स्वत: श्रीकृष्णाने प्रयत्न केला पण तो वाया गेला. युद्धाने झालेल्या प्रचंड हानीचे दर्शन घडवावे, हा लेखकाचा उद्देश नसेलच असे म्हणवत नाही. नाटकाच्या प्रस्तावनेत सूत्रधाराने हा कलह सामोपचाराने मिटावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे ती उगीच नाही. सारांश, 'वेणीसंहार' या शब्दाचे हे दोन अर्थ विचारात घेता नाटकाचे नाव अत्यंत समर्पक आहे.

सदर नाटक अत्यंत लोकप्रिय आहे. या नाटकाने भट्टनारायणास चांगले यश मिळवून दिले आहे. हे नाटक प्रथम दर्जाचे नसले तरी याची रचना नाट्यशास्त्राच्या नियमांस धरून झालेली आहे. नाट्यशास्त्रावर लेखन करणाऱ्या धनंजय, धनिक, रामचंद्र व गुणचंद्र तसेच विश्वनाथ यांनी नाट्यचर्चेच्या प्रसंगी प्राय: वेणीसंहारातील अवतरणे दिली आहेत. याचाच अर्थ हे नाटक जसे लोकप्रिय आहे तसेच भरतप्रणीत नाट्यशास्त्रातील नियमांचे काटेकोरपणे पालन करणारे आहे असा होतो.

योग्य कथेची निवड हे याच्या लोकप्रियतेचे प्रमुख कारण आहे. स्वत: नाटककारासही याची जाणीव असावी. म्हणूनच त्याने प्रस्तावनेत 'तदत्र कविपरिश्रमानुरोधाद्वा, उदात्तकथावस्तुगौरवाद्वा, नवनाटकदर्शन कुतूहलाद्वा' असे उद्गार काढलेले आहेत. अर्थात मूळ कथावस्तू उत्तम असली तरी ती नाट्यरूपाने सादर करण्याचे कौशल्यही असावे लागते. 'वेणीसंहार' च्या यशाच्या वाट्यात उदात्त कथावस्तूप्रमाणे नाट्यरचनेतील कौशल्याचाही तितकाच सहभाग आहे.

मूळ कथावस्तूत नाटकाच्या सोयीसाठी काही बदल करावे लागतात. काही प्रसंग गाळावे लागतात. काहींना मुरड घालावी लागते तर काही प्रसंग नव्याने रचून घालावे लागतात. यापैकी शेवटच्या प्रकारात नाटककाराचे कौशल्य पणास लागते. नवीन काही प्रसंग याप्रमाणे (१) दु:शासनाने वेणी खेचल्याने द्रौपदीचे केस मोकळे सुटले पण तिने ते त्यानंतर बांधलेच नाहीत, असा काही महाभारतात उल्लेख नाही. पण भट्टारायणाने मात्र तिचे केस तसेच मोकळे आहेत असे दर्शविले आहे. दुर्योधनाच्या रक्ताने माखलेल्या हातांनी भीम तिचे मोकळे केस बांधणार होता. मुद्राराक्षसात आपली प्रतिज्ञा पूर्ण होईपर्यंत चाणक्याने आपली शेंडी बांधली नाही, असे दर्शविले आहे. कदाचित भट्टनारायणास सदर कल्पना मुद्राराक्षसावरून सुचलेली असावी. (२) दुसऱ्या अंकातील दुर्योधन व भानुमती यांच्यातील प्रेमप्रसंग हा सर्वस्वी नवीन आहे. महाभारतात दुर्योधनाच्या पत्नीचे नावही दिले नाही तसेच तिचे स्वप्नकथन हेही मुळात नाही. (३) तिसऱ्या अंकातील अश्वत्थामा व कर्ण यांच्यातील कलह हाही स्वतंत्रच म्हणावा लागेल. महाभारतात कृपाचार्य आणि कर्ण यांच्यात कलह झाल्याचा उल्लेख आहे. येथे द्रोणवधाच्या पार्श्वभूमीवर हा संघर्ष दर्शविल्याने त्यास उठाव आलेला आहे. शिवाय त्या दोघातील भांडणास नाटककाराने ब्राह्मण-क्षत्रिय द्वेषाची जोड दिल्याने त्यास चांगलाच रंग चढला आहे. (४) शेवटच्या अंकातील चार्वाकाने उडवलेल्या गोंधळास महाभारतात मुळीच आधार नाही.

भीम, द्रौपदी, दुर्योधन, भानुमती, अश्वत्थामा, कर्ण, युधिष्ठिर इत्यादी प्रमुख पात्रांची चित्रणे ठसठशीत वठलेली आहेत.

**(१) भीम** : हा रांगडा शिपाई गडी आहे. त्याची वृत्ती रोखठोक आहे. वनवासाची मुदत पूर्ण झाल्यामुळे तो कौरवांचा नि:पात करण्यास व आपली प्रतिज्ञा पूर्ण करण्यास उतावीळ झाला आहे. पण युधिष्ठिराने केवळ पाच गावांच्या मोबदल्यात तह करण्याचे ठरवताच भीमाला संताप येतो व तो युधिष्ठिराविरूद्ध बंड करण्याची भाषा बोलू लागतो. कौरवांनी विशेषत: भीमाशीच निर्घृण वर्तन केले आहे. धृतराष्ट्राविषयीही त्याला आदर वाटत नाही. तो खरा वीर आहे म्हणूनच वाटाघाटी फिसकटून जेव्हा युद्धाची घोषणा होते तेव्हा रणयज्ञ सुरू झाला असे म्हणून तो आपला आनंद व्यक्त करतो. भीमाची व्यक्तिरेखा पहिल्या अंकातच ठसठशीतपणे रेखाटली आहे. पण पुढे त्यास वाव मिळालेला नाही.

**(२) द्रौपदी** : द्रौपदीचे चित्रण मुळाबरहुकूम आहे. पहिल्या अंकात भानुमतीने (म्ह. दुर्योधनाच्या पत्नीने) तिचा अप्रत्यक्ष अपमान केल्याचे सांगून

नाटककराने तिच्याविषयी सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तिचे भीमावर प्राणापलीकडे प्रेम आहे. एकटा भीमच आपल्या अपमानाचा सूड घेईल, असा तिला भरवसा आहे. धर्मराजाविषयी तिला निव्वळ आदर आहे. अर्जुनाविषयी ती काही बोलत नाही. पण नकुल-सहदेवांच्या पराक्रमाविषयी ती शंका व्यक्त करते. त्यामुळे तिचा खरा हीरो भीमच आहे आणि भीमही नाटकाच्या अखेरीस तिची वेणी घालून आपली प्रतिज्ञा व द्रौपदीची कामना पूर्ण करतो. द्रौपदीचे त्याच्यावर इतके प्रेम आहे की त्याच्या खोट्या मृत्यूच्या वार्तेने ती बेशुद्ध पडते व शुद्धीवर आल्यावर प्राणत्याग करण्याचा निश्चय करते.

नाटककाराने तिचा एवढाच गुण ठळकपणे दर्शविला आहे. तिला नाटकात वावही कमी आहे. ती पहिल्या व शेवटच्या अंकात काय ती दिसते. त्यामुळे तिचे चित्रण सरधोपट झालेले आहे.

**(३) दुर्योधन :** नाटककाराने दुर्योधनाचे चित्रण विस्ताराने केले आहे. त्यामुळे त्याच्या स्वभावातील अनेक पैलू स्पष्ट झालेले आहेत. मुळातील (म्ह. महाभारतातील) दुर्योधनाप्रमाणे हा कपटी, अहंकारी व दुष्ट तर आहेच पण बढाईखोर, संशयी व भोगलंपटही दर्शविला आहे. भानुमतीविषयी तो अकारण संशय घेतो. बाहेर युद्ध भडकलेले असताना त्याला पत्नीबरोबर प्रेमचाळे करावेसे वाटतात.

तो हलक्या कानाचाही आहे. द्रोणाचार्यांविषयी कर्ण जे बोलतो ते सारे त्याला खरे वाटते. कर्णावर मात्र त्याचे खरे प्रेम आहे. त्याने स्वतःच म्हटल्याप्रमाणे 'कर्ण व दुर्योधन हे वेगळे नाहीत.' माता-पित्यावर त्याचे उत्कट प्रेम आहे. युधिष्ठिराशी संधी करण्याचा धृतराष्ट्राचा सल्ला तो धुडकावून लावतो. दुःशासन व कर्ण यांच्या मृत्यूनंतर त्याला जगावेसे वाटत नाही. एका दृष्टीने नाटकाचा नायक वाटावा इतके दुर्योधनाचे चित्रण उठावदार झाले आहे. मात्र त्याला भोगलंपट व हलक्या कानाचा दाखवून नाटककाराने त्याची व्यक्तिरेखा विनाकारण दूषित केली आहे.

**(४) अश्वत्थामा :** द्रोणाचार्यांच्या या पुत्राचे चित्रण उत्कृष्ट वठले आहे. सगळा तिसरा अंक एकट्या अश्वत्थाम्याने उचलून धरला आहे. त्याचा पित्याच्या पराक्रमावर नितांत विश्वास आहे. त्यांना पराभूत करणारा कोणीही वीर नाही याची त्याला खात्री आहे. पण द्रोणाचार्यांची कपटाने हत्या करण्यात आली

आहे व तिला आपणच अप्रत्यक्षपणे कारणीभूत आहोत हे समजताच तो व्यथित होतो. द्रोणाचार्यांच्या मारेकऱ्यांचा सूड उगवण्याचा तो निर्धार व्यक्त करतो. त्या वेळी कर्ण विनाकारण त्याला डिवचतो. मग ते दोघे अक्षरशः हमरीतुमरीवर येतात. युद्ध चालू असताना या दोन प्रमुख महावीरांत मारामारी जुंपावी हे एक प्रकारे दुश्चिन्हच होते. अखेरीस तो कर्ण जिवंत असेपर्यंत हातात शस्त्र न धरण्याची प्रतिज्ञा करतो. दुर्योधनही त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत नाही. ज्या कर्णावर दुर्योधनाचा इतका विश्वास होता तो कर्णही भीमाच्या तावडीतील दुःशासनास सोडवू शकत नाही.

**(५) कर्ण :** अश्वत्थाम्याचे उजळ चित्रण करीत असता नाटककाराने कर्णावर मात्र उघड उघड अन्याय केला आहे. वास्तविक पाहता कर्ण हा धीरोदात्त, उदार असा वीर-पुरुष आहे. पण नाटककराने त्याला द्रोणाचा विद्वेषी व चहाडखोर बनवले आहे. अश्वत्थामा ब्राह्मण असल्याने नाटककाराने कर्णाचे असे विकृत चित्रण केले आहे, असा स्पष्ट आरोप प्राचार्य गजेंद्रगडकरांनी केला आहे तो योग्य आहे. साऱ्या नाटकात एकच चमकदार श्लोक त्यांच्या तोंडी आहे व तो म्हणजे 'जन्माला येणे दैवाच्या हातात असले तरी पराक्रम करणे हे माझ्या हातात आहे.' (अंक ३, श्लोक ३७)

**(६) युधिष्ठिर :** खरे तर नाटकाचा नायक 'युधिष्ठिर' आहे असे मानायला हवे. कारण नाटकाचे अंतिम फल - म्ह. राज्यप्राप्ती - त्याला मिळाले आहे. महाभारतानुसार तो सत्यवचनी, उदार, मितभाषी व संयमी आहे. पण त्याचे उठावदार अथवा यथातथ्य चित्रण करण्यात नाटककाराला यश आले नाही. त्याने युधिष्ठिराला कमालीचा भोळसट बनविला आहे. तसे पाहिले तर भारतीय युद्धात युधिष्ठिराची कामगिरी नगण्य आहे. नाटकात तो फक्त शेवटच्या अंकात दिसतो. पण चार्वाकाच्या सांगण्यावर तो डोळे झाकून विश्वास ठेवतो, हे पटणारे नाही. इतकेच नाही तर कोणतीही चौकशी न करता प्राणत्यागाला सिद्ध होतो. यात त्याचा तर अजागळपणा सिद्ध होतोच पण नाटककाराच्याही मर्यादा उघड होतात. अखेरच्या अंकातला गोंधळ हा अनाठायी आहे. युधिष्ठिराचे असले भोंगळ चित्रण करून नाटककाराने त्याच्यावर अन्याय केला आहे.

**(७) भानुमती :** दुर्योधनाची पत्नी भानुमती हे नाटककाराने निर्मिलेले स्वतंत्र पात्र आहे. महाभारतात दुर्योधनाच्या पत्नीचे नाव दिलेले नाही. खरे तर नाटकाची नायिका शोभावी असे तिचे सोज्वळ चित्रण केले आहे. ती तरुण, रूपसुंदर,

शालीन व सुसंस्कृत आहे. अशुभ स्वप्न पडल्याने ती पुरती भेदरून गेलेली आहे. यामुळे तिने द्रौपदीचा अपमान केला हे पहिल्या अंकातले निवेदन खरे वाटत नाही. तसेच सहदेव म्हणतो त्याप्रमाणे दुर्योधनाच्या सहवासामुळे तिचे अंत:करण विषारी झालेले दिसत नाही.

याखेरीज धृतराष्ट्र, गांधारी, द्रौपदीची दासी बुद्धिमतिका, सहाव्या अंकात गोंधळ उडवून देणारा दुर्योधनाचा राक्षसमित्र चार्वाक, राक्षस रुधिरप्रिय व त्याची बायको वसागंधा यांची चित्रणे चटकदार आहेत.

* * *

'वेणीसंहार' हे अत्यंत लोकप्रिय व रंगभूमीवर हमखास रंगणारे यशस्वी नाटक आहे. यात भरपूर प्रसंग व नाट्य आहे. या दृष्टीने याची ठळक वैशिष्ट्ये पाहू -

(१) नाटकाच्या पहिल्या अंकातच भीम वाचक-प्रेक्षकांची मने वेधून घेतो. युधिष्ठिराने युद्धाची ललकारी देण्याऐवजी तहाच्या वाटाघाटी कराव्यात याची भीमास चीड आलेली आहे व तो उघड उघड बंडाची भाषा करीत आहे. त्याच्या संतापात द्रौपदीच्या झालेल्या ताज्या अपमानाच्या समाचाराची भर पडते. आता पुढे काय होणार याची उत्कंठा वाढत असतानाच वाटाघाटी फिसकटल्याची वार्ता येते व नाटकाला एकदम कलाटणी मिळते.

(२) नाटकाचा तिसरा अंक सर्वात उत्कृष्ट वठला आहे. द्रोणाचार्यांची कपटाने हत्या झालेली आहे. शोकाने व संतापाने थरथरणारा अश्वत्थामा रंगभूमीवर येतो. कर्ण त्याला उगीचच डिवचतो. दोघे हमरी-तुमरीवर येतात. खरे तर या दोघांतील भांडण वैयक्तिक हितसंबंधातून उद्भवले असले तरी कौरवांचा पक्ष आतून कसा पोखरलेला आहे, हेच यावरून दिसून येते. या निमित्ताने नाटककाराने ब्राह्मण-क्षत्रियवादाला तोंड फोडले आहे. धृष्टद्युम्नाने द्रोणाचार्यांची केलेली हत्या हे 'वेणीसंहारा'चे दुसरे निमित्त आहे. या अंकात नाटककाराने जिवंत नाट्य उभे केले आहे. प्रमुख पात्रातील कलहाची कल्पना बहुतेक मुद्राराक्षसातील चाणक्य-चंद्रगुप्त यांच्यातील (कृतक) कलहावरून सुचली असावी.

(३) सहावा अंकही उत्कंठावर्धक आहे. दुर्योधनाचा शोध लागल्यावर लौकरच भीम विजयी होऊन परत येणार याची सर्वांना खात्री असते. इतकेच नव्हे तर खुद्द श्रीकृष्णानेही 'विजयोत्सव साजरा करण्याचा' निरोप पाठविलेला

आहे. अशा स्थितीत नाटककाराने कथावस्तूस एकदम कलाटणी दिली आहे. भीमाच्या नाशाची वार्ता सांगत चार्वाक रंगभूमीवर येतो व सर्वत्र शोककळा पसरते. युधिष्ठिर व द्रौपदी यांच्या भोळसटपणाने जास्तच हलकल्लोळ होतो. तथापि ही कलाटणी यशस्वी ठरलेली नाही.

(४) भट्टनारायणाची शैली रसानुकूल आहे. त्याने वीर, शृंगार, करुण, रौद्र व बीभत्स या रसांचा उत्कृष्ट परिपोष केला आहे. कोणताही प्रसंग ठसठशीतपणे उभा करण्याची त्याची हातोटी प्रशंसनीय आहे. वृत्तयोजनाही समर्पक आहे. उदा. 'तथाभूतांदृष्ट्रा' (अंक १, श्लोक ११) 'मथ्नामिकौरवशतं' (अंक १, श्लोक १५) 'यो यः शस्त्रं बिभर्ति' (अंक ३, श्लोक ३२) ही सुश्लिष्ट श्लोकरचनेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. शेवटचा श्लोक समासरहित ओजो गुणाचे उत्तम उदाहरण म्हणून ध्वन्यालोकात उद्धृत केला आहे. तसेच गद्य संवादही अत्यंत परिणामकारक आहेत. विशेषतः तिसऱ्या अंकातील अश्वत्थामा व कर्ण यांचा कलह सर्व सामर्थ्यानिशी उभा केला आहे.

तथापि यातील उणीवा व दोष चांगलेच खटकणारे आहेत.

(१) प्रो. विल्सन यांच्या मते 'वेणीसंहारा'ची रचना ठिसूळ आहे. याचे मुख्य कारण म्हणजे ही कथावस्तू नाटकापेक्षा काव्यास अधिक अनुकूल आहे. महाभारतातील प्रचंड आवाका असलेल्या कथानकास नाट्याच्या चौकटीत बंदिस्त करणे तसे कठीणच आहे. या नाटकातील सुटे प्रसंग जरी उत्तम वठलेले असले तरी ते सारे प्रसंग एकसंध होऊन अंतिम उद्दिष्टांकडे वाटचाल करणारे झाले नाहीत. प्रसंगांची सांधेजोड चांगली असूनही प्रमाणबद्धतेचा अभाव जाणवणारा आहे. शेवटच्या अंकातील चार्वाकाचा प्रसंग हा गरज नसताना उद्भवलेला आहे व त्याचा विस्तारही कंटाळवाणा आहे. तसेच अनेक प्रसंग महत्त्वाचे असूनही नाटककाराला ते पडद्याआडच घडल्याचे सांगावे लागले आहे.

(२) या नाटकाचा नायक कोण ? हा प्रश्न नाटककाराच्या सदोष व्यक्तिचित्रणातून उभा राहिलेला आहे. दुर्योधन हाच या नाटकाचा नायक असावा असे वाटण्याइतपत त्याचे सविस्तर चित्रण केले आहे. पण दुर्योधन मुळात खलपुरुष आहे ही गोष्ट नाटककाराच्या पथ्यावर पडलेली आहे. परंपरेने युधिष्ठिराला नायक मानलेले आहे. नाट्याचे अंतिम फल - राज्याची प्राप्ती - त्यालाच प्राप्त झाले आहे. पण त्याचे चित्रण इतके नेभळे झाले आहे की त्यास

कोणी नायक मानण्यास तयार नाही. भीम हाच या नाटकाचा खरा नायक आहे. नाटककारासही हीच गोष्ट अभिप्रेत आहे. पण त्याचे चित्रण जितके प्रभावी व्हावयास पाहिजे तितके झालेले नाही. पहिल्या अंकातच काय तो त्याला वाव मिळालेला आहे. त्यानंतर तो एकदम पाचव्या व शेवटच्या अंकात दिसतो. त्यामुळे नायकापेक्षा दुर्योधन, कर्ण, अश्वत्थामा हीच पात्रे प्रकर्षाने चमकतात.

(३) पाचव्या अंकात हटवादी दुर्योधन व त्याचे असहाय माता-पिता यांच्यातील संवाद अत्यंत हृदयस्पर्शी आहेत. पण त्या ठिकाणी भीमार्जुनांना आणून नाटककाराने रंगाचा बेरंग केला आहे. त्यांचे आदरहीन व बढाईखोर बोलणेही घृणास्पद वाटते. या पार्श्वभूमीवर दुर्योधनाचे चित्रण सरस वठले आहे. तसेच अश्वत्थाम्याचा प्रवेशही औचित्यहीन आहे. कर्णाच्या वधानंतर झालेले त्याचे आगमन दुर्योधनाप्रमाणेच वाचक-प्रेक्षकांनाही खटकते. त्यामुळे 'कर्णाच्या मृत्यूची वाट पाहिलीस आता माझ्याही मरणाची वाट पाहा' हे दुर्योधनाचे उद्गार बाणेदारच नाहीत तर अत्यंत समयोचित आहेत.

(४) चौथ्या अंकातील रणभूमीवरील भीषण दृश्याचे सुंदरकाच्या तोंडी घातलेले वर्णन अतिशय कंटाळवाणे उतरले आहे. प्राकृतातील हे समासप्रचुर गद्य अत्यंत क्लिष्ट आहे. तसेच यातील 'कृतमनुमतं दृष्ट्वा' (अंक ३, श्लोक २४) हा श्लोक मम्मटाने रौद्ररसाचे उदाहरण म्हणून घेतला असला तरी त्यात 'रौद्ररस प्रकट करण्याची क्षमता नाही' अशी टीका जगन्नाथाने केली आहे. येथे योजलेले 'हरिणी' हे वृत्त देखील रौद्ररसास अत्यंत प्रतिकूल आहे.

(५) भट्टनारायणाने दुसऱ्या अंकात वर्णन केलेला अनाठायी शृंगार हा आधुनिकाप्रमाणे प्राचीन रसिकांनाही रुचलेला नाही. विश्वनाथाने साहित्यदर्पणात याविषयी नापसंती व्यक्त केली आहे. (पाहा - 'अकाण्डेप्रथनं यथा - वेणीसंहारे द्वितीयेऽङ्के प्रवर्तमानानेकवीरसंक्षये काले दुर्योधनस्य भानुमत्या सह शृंगारप्रथनम्।'' (सा. द. परि. ७)

# आठव्या-नवव्या शतकातील नाटककार

## यशोवर्मा

भूवभूती-भट्टनारायणानंतर म्हणजे आठव्या किंवा नवव्या शतकात होऊन गेलेल्या फारच थोड्या नाटककारांबद्दल माहिती उपलब्ध आहे. कल्हणाच्या 'राजतरंगिणी' या इतिहासपर ग्रंथात कनोजचा राजा यशोवर्मा हा स्वतः कवी असून भवभूती व वाक्पतिराज यांचा आश्रयदाता होता असे म्हटले आहे -

"कविर्वाक्पति राजश्री भवभूत्यादि सेवितः।
जितो ययौ यशोवर्मा तद्गुण-स्तुतिबन्दिताम् ॥"

(राजतरंगिणी ४-१४४)

याने 'रामाभ्युदय' नामक नाटक रचले होते असे म्हणतात. पण ते आज उपलब्ध नाही. 'ध्वन्यालोक'कार आनंदवर्धन, 'दशरूपक' या ग्रंथाचा टीकाकार धनिक व 'साहित्यदर्पण'कार विश्वनाथ यांनी प्रस्तुत नाटकातील काही श्लोक उद्धृत केले आहेत. यावरून व्ही. राघवन यांनी माहिती गोळा केली आहे. त्यांच्या मते या नाटकात सहा अंक असून रामाच्या पंचवटीतील निवासापासून त्याच्या राज्याभिषेकापर्यंतची कथा आहे. प्रारंभी सूत्रधार म्हणतो -

"औचित्यं वचसां प्रकृत्यनुगतं सर्वत्र पात्रोचिता
पुष्टिस्स्वाबसरें रसस्य च कथामार्गे न चातिक्रमः।
शुद्धिः प्रस्तुत संविधानक विधौ प्रौढिश्च शब्दार्थयो -
र्विद्धद्भिः परिभाव्यतामवहितैरेतावदेवास्तु नः॥

या श्लोकातील 'कथामार्गेच नातिक्रमः' या ओळीवरून नाटककाराने मूळ कथेत महत्त्वाचे बदल केले नसावेत असे दिसते. म.म. मिराशी सांगतात की "आपला आश्रित भवभूती याच्या नाटकातील संविधानकात रामायणकथेतील अनेक फरक त्याला संमत झाले नसावे." (भवभूती पृष्ठ ३५०)

आनंद-वर्धनाच्या ध्वन्यालोकात उपमागर्भ व्यतिरेकाचे उदाहरण म्हणून 'आक्रन्दाः स्तनितैः' हा श्लोक उद्धृत केला आहे. पद्य. सुभाषितावलीत हा श्लोक आनंदवर्धनाच्या नावावर दिलेला आहे. परंतु सूक्तिमुक्तावलीत यशोधर्म्याच्या नावावर हा व 'यत्वन्नेत्रसमानकान्ति' असे दोन श्लोक दिले आहेत. त्यामुळे हा श्लोक त्याचाच असावा -

"आक्रन्दाः स्तनितैर्विलोचनजलान्यश्रान्तधाराम्बुभि -
स्तद्विच्छेदभुवश्च शोकशिखिनस्तुल्यास्तडि द्विभ्रमैः।
अन्तर्मे दयितामुखं तव शशी वृत्तिः समाप्यावयो -
स्तत्किं मामनिशं सखे जलधर त्वं दग्धुमेबोद्यतः॥"

यात नायक व मेघ यांच्यातील साम्य दर्शविले आहे. येथे केवळ साम्याच्या आधारे उपमा ध्वनित झाली आहे. येथे श्लेष नसताही व्यतिरेक अलंकाराची सूचना दिली आहे.

दुसरा श्लोक साहित्यदर्पणात 'काव्यर्लिंग' या अलंकाराचे उदाहरण म्हणून दिलेला आहे -

"यत्वन्नेत्रसमानकान्तिसलिले मग्नं तदिन्दीवरं
मेघैरन्तरितः प्रिये तव मुखच्छायानुकारी शशी।
येऽपि त्वद्गमनानुसारिगतयस्ते राजहंसा गता-
स्त्वत्सादृश्य विनोदमात्रमपि मे दैवेन न क्षम्यते ॥"

"तुझ्याशी सदृश असलेल्या गोष्टीमध्ये आपले मन रमवावे म्हटले, तर तेही दैवाला सहन होत नाही" या उद्गारात करुणरसाचा उत्कृष्ट परिपोष झाला आहे.

* * *

शिवस्वामी (इ.स.८२०) 'कप्फिणाभ्युदय' ह्या महाकाव्याचा कर्ता शिवस्वामी राजा अवंतिवर्म्याच्या दरबारात होता. आनंदवर्धन व रत्नाकर हेही त्याच्या पदरी होते, असे राजतरंगिणीत म्हटले आहे.

"मुक्ताकणः शिवस्वामी कविरानन्दवर्धनः।
प्रथां रत्नाकरश्चागात्साम्राज्येऽवन्तिवर्मणः॥"

(राजतरंगिणी ५.३९)

शिवस्वामीने अनेक नाटके, नाटिका वा प्रकरणे रचली होती पण ती आज उपलब्ध नाहीत. त्यातील श्लोकही कोठे उद्धृत केलेले नाहीत.

## अनंगहर्ष मातृराज

याने 'तापसवत्सराज' नावाचे उदयनाच्या कथेवर नाटक रचले होते. वासवदत्तेच्या विरहाने व्याकुळ होऊन वत्सराजाने संन्यास घेतला. जिवाला कंटाळून अखेरीस प्रयागक्षेत्रात तो जीव देण्यास गेला. तेथे त्याची वासवदत्तेची गाठ पडली. यौगंधरायण वत्सराजाचे गेलेले राज्य मिळवण्यासाठी राजाचे पद्मावतीशी लग्न लावतो, असा यात कथाभाग आहे. यातील कथा भासाच्या 'स्वप्नवासवदत्त' नाटकावर बेतलेली आहे. डॉ. कीथ सांगतात की नाटककाराने श्रीहर्षाच्या रत्नावली नाटकाचा उपयोग करून घेतला आहे. मातृराजाच्या वडिलांचे नाव नरेंद्रवर्धन असे होते.

## मायुराज

हा कलचुरी वंशातील एखादा राजा असावा. याने 'उदात्तराघव' नामक नाटक रचले होते. पण ते आज उपलब्ध नाही. 'दशरूपा'वरील धनिकाच्या टीकेत यातील काही श्लोक उद्धृत केले आहेत. यावरून त्याने रामाच्या कथानकातील पूर्वभागावर रचना केली असावी. हा भवभूतीनंतर होऊन गेला. भवभूतीप्रमाणे यानेही रामकथेत लक्षणीय बदल केले आहेत. उदा. मायावी मृगाच्या प्रसंगात त्याने बदल केला आहे. कपटी मृगाला मारण्यासाठी प्रथम लक्ष्मण जातो. त्या वेळी तो मायावी ''रामभद्रा रक्षण कर'' असे मोठ्याने ओरडतो. परंतु रामाचा त्याच्या आरोळीवर विश्वास बसत नाही. कारण लक्ष्मणाच्या पराक्रमावर त्याचा दृढ विश्वास आहे. तो स्वत:शी म्हणतो -

''वत्सस्याभयवारिधेः प्रतिभयं मन्ये कथं राक्षसा -
त्प्रस्तश्चैष मुनिर्विरौति मनसश्चास्त्येव मे सम्भ्रमः ।
मा हासीर्जनकात्मजामिति मुहुः स्नेहाद्गुरुर्याचते
न स्थातुं न च गन्तुमाकुलमतेर्मूढस्य मे निश्चयः॥

(दशरुपक. - ४.२८ वरील टीका)

यात रामाची दोलायमान स्थिती उत्कृष्टपणे चितारली आहे. रामाने वालीचा जो कपटाने वध केला तो प्रसंग मायुराजाने आपल्या नाटकात वगळला आहे, असे दशरूपकाच्या टीकेत म्हटले आहे. मायुराजाविषयी राजशेखर म्हणतो -

'मायुराजसमो नान्यो जज्ञे कलचुरिः कविः।

उदन्वतः समुत्थस्थुः कति वां तुहिनांशवः॥''

मायुराजासारखा दुसरा कवी कलचुरीवंशात झाला नाही अशी राजशेखराने त्याची प्रशंसा केली आहे.

रामाच्या जीवनातील उत्तरभागावर 'छलितराम' नावाचे नाटक याच सुमारास लिहिले गेले होते पण ते आज उपलब्ध नाही व त्याच्या लेखकाचेही नाव मिळत नाही. यातील काही श्लोक 'दशरूपका'वरील धनिकाच्या टीकेत आले आहेत. व्ही. राघवन यांच्या 'Some Old Lost Rama Plays' या पुस्तकात या नाटकाविषयी माहिती एकत्र केलेली आहे ती सारांशाने याप्रमाणे.

या नाटकात सहा अंक असून रामाच्या राज्याभिषेकापासून सीतेच्या पुनःप्राप्तीपर्यंतचा कथा-भाग आलेला आहे. लवणासुराच्या दोन हेरांनी कैकेयी व मंथरा यांची रूपे घेऊन रामाला सीतेविषयी खोटा जनापवाद सांगून त्याची फसवणूक केली. या प्रसंगावरील नाटकाला 'छलितराम' (फसवला गेलेला राम) असे समर्पक नाव दिलेले आहे. धनिकाने यातील पुढील श्लोक दिला आहे -

''येनावृत्य मुखानि साम पठतामत्यन्तमायासितं

बाल्ये येन हृताक्षसूत्रवलय प्रत्यर्पणैःक्रीडितम् ।

युष्माकं हृदयं स एष विशिखैरापूरितांसस्थलो

मूर्च्छाघोरतमःप्रवेशविवशो बद्ध्वालवो नीयते ॥ (दश. १.४५ टीका)

लवाने रामाच्या अश्वमेधाचा घोडा अडवल्यावर त्याचे सैनिकांशी युद्ध जुंपले. रामाच्या सैनिकांनी लवाला पकडून अयोध्येला नेले, या प्रसंगीचा हा श्लोक आहे. यात लवाला मूर्च्छा आली असून तशा स्थितीतच त्याला चालवत नेत आहेत, असे वर्णन आहे.

तसेच लवाशी बोलताना सीता चुकून राम त्यांचा पिता असल्याचा उल्लेख करते. यावर लवाने प्रश्न करताच ती 'राम हा सर्व पृथ्वीचाच पिता आहे' असे सांगून आपली बाजू सावरते. दशरूपकाच्या तिसऱ्या प्रकाशात 'अवस्यंदित' या प्रकाराचे उदाहरण म्हणून 'छलितरामा'तील उपरोक्त संवाद उद्धृत केला

आहे. 'अवस्यंदिता'मध्ये अज्ञात गोष्टीची सूचना दिलेली असते. (पाहा. दशरूपक ३.१९ वरील धनिकाची टीका)

भवभूतीचे उत्तररामचरित व धीरनागाच्या कुंदमाला या नाटकातील प्रसंगांच्या आधारे प्रस्तुत नाटकाची रचना केली असावी असे वाटते. रामायणातील मूळ कथाप्रसंगात बदल करण्याचे नाटककाराचे कौशल्य वरील उदाहरणांवरून दिसून येते.

## शक्तिभद्र

शक्तिभद्र हा दक्षिणापथातील नाटककार आहे. नाटकाच्या प्रस्तावनेत नटी दक्षिणेतील कवीने नाटक रचले, या गोष्टीविषयी आश्चर्य प्रकट करते. यावरून त्याच्यापूर्वी दक्षिणेत नाटके लिहिले जात नव्हती, असा बोध होतो. शक्तिभद्राने 'आश्चर्यचूडामणि' या नावाचे नाटक लिहिले आहे. शक्तिभद्र हा कोण, कुठला? तो कोणाच्या आश्रयास होता, या विषयी काही माहिती मिळत नाही. हे नाटक केरळात मिळालेले आहे. प्रस्तावनेत त्याने 'उन्माद वासवदत्त' व इतर काव्ये रचली असल्याचा उल्लेख आहे. पण ती उपलब्ध नाहीत. प्रस्तुत नाटकात सात अंक असून रामाच्या वनवासापासून तो त्याच्या राज्याभिषेकापर्यंतचा कथाभाग आलेला आहे. या नाटकाचे 'आश्चर्यचूडामणि' असे थोडे चमत्कारिक नाव आहे. ऋर्षीनी सीतेला एक मणी दिलेला असून तो मस्तकावर घातला की ती राक्षसास ओळखत असे, असे त्या मणीचे सामर्थ्य होते. शक्तिभद्र हा भवभूतीनंतर लौकरच होऊन गेला असावा.

राम वनवासात असताना राहण्यासाठी लक्ष्मणाच्या हातून पर्णकुटी तयार करीत असता रावणाची बहीण शूर्पणखा ही सुंदर स्त्रीचा वेश घेऊन तेथे येते. ती रामाला आपला स्वीकार करण्याची विनंती करते. राम पर्णकुटी तयार झाल्यावर तिचा विचार करण्याचे आश्वासन देतो. मग राम व सीता यांचा प्रवेश दर्शविला आहे. लक्ष्मण वनवासास कारणीभूत झालेल्या कैकेयीची निंदा करतो पण राम तिची बाजू घेऊन तिचा निरपराधपणा सिद्ध करू पाहतो. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकात पर्णकुटी तयार झाल्यावर शूर्पणखा पुन्हा रामाकडे येते व त्याला भुलवू पाहते. तेव्हा राम आपण विवाहित असल्याचे सांगून तिला

लक्ष्मणाकडे पाठवतो. लक्ष्मण तिचा स्वीकार करत नाही. मग ती आपले भयंकर रूप प्रकट करते व लक्ष्मणाला पकडून आकाशात झेप घेते. मग लक्ष्मण तिचे नाक व कान छाटून तिला विद्रूप करतो. मग ती खर व दूषण या राक्षसांकडे तक्रार सांगण्यासाठी जाते. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस मारीच सोनेरी हरणाचे रूप घेऊन येतो. रामाला ऋषीकडून अंगठी, कवच व आश्चर्यकारक मणी असे अलंकार मिळाले आहेत. राम तो मणी सीतेच्या केशपाशात घालतो. सीता सुवर्णमृगाला पाहते व रामाला तो पकडून आणण्यास सांगते. थोड्या वेळाने 'लक्ष्मणा धाव' असा आवाज ऐकू येतो. तेव्हा सीता लक्ष्मणास जाण्यास सांगते. तो 'ही सगळी राक्षसांची माया आहे.' असे सांगून तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. पण त्याचा परिणाम उलट होतो. सीता त्याच्या हेतूविषयी संशय व्यक्त करून त्याची निंदा करते. निरुपायाने लक्ष्मण निघून जातो. मग रावण व त्याचा सारथी हे राम-लक्ष्मणाचा वेश धारण करून सीतेकडे येतात. सीतेला रथात बसवून ते निघून जातात.

इकडे राम मारिचाला मूर्च्छित करून परत येऊ लागतो. तेव्हा शूर्पणखा त्याला सीतेचे रूप घेऊन भेटते. रामाच्या मदतीला जाणाऱ्या लक्ष्मणाला जखमी मारीच रामाच्या रूपात भेटतो. त्यानंतर शूर्पणखाच रामाला खऱ्या सीतेचा वृत्तांत सांगते. मग राम तिच्या मार्फतच रावणाला आपला निरोप पाठवतो. (अंक तिसरा)

सीता, रामरूपधारी रावण व लक्ष्मणाचे रूप घेतलेला सूत हे रानातून जात असतात. रथाच्या वेगामुळे सीतेचे केस विस्कटतात. ते बांधण्याचे निमित्त करून रावण तिला स्पर्श करतो. चूडामणीच्या प्रभावाने रावणाचे खरे रूप प्रकट होते. रावणाला पाहून सीता आक्रोश करू लागते. तेवढ्यात जटायू पक्षी तिच्या मदतीस येतो. पण त्याचे काही चालत नाही. रावण आपल्या खड्गाने त्याचे पंख तोडून त्याला घायाळ करतो. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक आहे. त्यात मंदोदरी व तिची चेटी बोलत आहेत. त्यांच्या संवादावरून रावणाने सीतेला अशोकवनात ठेवले असल्याचे समजते. तसेच मंदोदरी आपल्याला पडलेल्या वाईट स्वप्नाची हकीकत सांगते. मुख्य प्रवेशात रावण व त्याचा मंत्री येतात. रावण सीतेच्या सहवासासाठी

तळमळत आहे. मंत्री रावणाला हितकर गोष्टी सांगून परस्त्रीच्या मोहापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. पण रावण त्याचे काही एक न ऐकता सीतेचा अनुनय करू लागतो. पण सीता त्याला रागारागाने बाजूला सारते. (अंक पाचवा)

सहाव्या अंकात मारुती अशोकवनात येऊन सीतेची भेट घेतो. आपण रामाकडूनच आलो आहो याची खूण पटवण्यासाठी तो रामाची अंगठी दाखवतो. तो तिला रामाची सर्व हकीकत सांगतो व त्याचा निरोप सांगतो. सीता त्याला आपल्याजवळचा आश्चर्य चूडामणी रामाला देण्यासाठी काढून देते. (अंक सहावा)

सातव्या अंकाच्या प्रारंभी विद्याधराचे जोडपे प्रवेश करते. त्यांच्या बोलण्यावरून राम व रावण यांच्यात घनघोर युद्ध होऊन त्यात रावण ठार झाल्याचे समजते. मुख्य प्रवेशात राम बिभीषणाला लंकेचे राज्य देतो व सुग्रीवाला सीतेला घेऊन येण्यास सांगतो. मग सीता चांगली वस्त्रे परिधान करून व गळ्यात फुलांचा हार घालून रामाला भेटायला येते. तिला पाहून राम टोचून म्हणतो -

"ही वक्ष:स्थळांना हरिचंदनाची उटी लावलेली, केसात सुगंधी फुलांचे गजरे घातलेली, अरुणप्रभेप्रमाणे लालसर वस्त्रे परिधान केलेली ही पतिव्रता विरह व्रताचे पालन करीत आहे."

(अंक ७ श्लोक )

केवळ रामच नव्हे तर लक्ष्मण, सुग्रीव, मारुती हे सारेच सीतेच्या विरोधात बोलू लागतात. राम तर तिला चक्क पुंश्चली (म्ह. वेश्या) असे संबोधतो. लक्ष्मण वगैरे रामाला सीतेस शासन करावयास सांगतात. तेव्हा सीता अग्निप्रवेश करून आपली शुद्धता सिद्ध करण्याचे ठरवते. ती अग्नीतून सुखरूप बाहेर येताच सर्वांना आश्चर्य वाटते. राम सीतेचा स्वीकार करतो. देवर्षी नारद येऊन रामाला दशरथादी पितरांचे व देवतांचे दर्शन घडवतात. मग सर्व जण पुष्पक विमानात बसून अयोध्येकडे निघतात. भरतवाक्याबरोबर नाटक समाप्त होते. (अंक सातवा)

या नाटकात अनेक अस्वाभाविक व न पटणारे प्रसंग घातलेले आहेत. तिसऱ्या अंकात वेषांतराच्या कल्पनेचा उबग येण्याइतका अतिरेक केला आहे. सर्वात चीड आणणारा प्रसंग म्हणजे रामाने सीतेचा केलेला घोर अपमान हा आहे. रामाची दुरुत्तरे ऐकून सीतेला राग येत नाही याचेही नवल वाटते. सारांश शक्तिभद्राच्या ठिकाणी प्रसंगाची निवड करण्याचे तारतम्य नाही. तसेच मूळ प्रसंगात केलेले बदलही स्पृहणीय नाहीत.

दुसरे म्हणजे शक्तिभद्राने माघ, भवभूती व भट्टनारायण यांच्या कृतीतून अनेक प्रसंगांची उसनवारी केली आहे. उदा. 'रक्षोवधाद्विरत' (आश्चर्य ६.२१) या श्लोकावर वेणीसंहारातील 'चञ्चद्भुजभ्रमित' (वेणी १.२१) या श्लोकाची छाप आहे. मंदोदरीला पडलेले स्वप्न हे वेणीसंहारातील भानुमतीला पडलेल्या स्वप्नाची आठवण करून देते. 'आयातं मामपरिचितया' या श्लोकावर 'उत्तररामचरिता'तील 'अस्मिन्नेवलतागृहे' (उत्तर. ३.३७) दाट छाया पडलेली आहे. त्याने 'महावीरचरिता'तील काही प्रसंगांची उसनवारी केली आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रस्तुत नाटकाद्वारे कवीला काय सांगायचे आहे याचा बोध होत नाही. तेव्हा 'रामचरितावरील एक सामान्य नाटक' एवढीच या नाटकाची योग्यता आहे.

# मुरारी

मुरारीने आपल्या 'अनर्घराघव' नाटकाच्या प्रस्तावनेत स्वत:विषयी अत्यंत त्रोटक माहिती दिली आहे. त्याव्यतिरिक्त काही माहिती उपलब्ध नाही. हा मौद्गल्य गोत्रातील ब्राह्मण असून श्रीवर्धमान व तंतुमती यांचा मुलगा होता. तो स्वतःला 'बालवाल्मीकी' असे म्हणवतो. सूत्रधार सांगतो की, दुसऱ्या प्रांतातून आलेल्या कलहकंदल नामक नटाने रौद्र, बीभत्स व अद्भुत रसाने भरलेल्या नाटकांचा प्रयोग करून रसिकांना उबग आणलेला आहे. ही टीका भवभूतीच्या 'महावीरचरित' व 'मालतीमाधव' या नाटकांना अनुलक्षून असावी. अर्थात मुरारीच्या नाटकातही ताडकावधाच्या प्रसंगी बीभत्सरसाचे वर्णन आले आहे.

प्रस्तुत नाटकाचे नाव 'अनर्घराघव' असे आहे. अनर्घ म्हणजे पूज्य व राघव म्हणजे रघुकुलोत्पन्न रामचंद्र. या नाटकात रामलक्ष्मण यज्ञाच्या रक्षणासाठी विश्वामित्राबरोबर वनात जातात. येथपासून रावणवधानंतर रामाला राज्याभिषेक होईपर्यंतचा कथाभाग आलेला आहे. हे प्रभू रामचंद्रांच्या जीवनावरील सात अंकी नाटक रुचिपतिदत्ताच्या संस्कृत टीकेसह निर्णयसागर मुद्रणालयाने प्रसिद्ध केले आहे. या नाटकावर रुचिपतीव्यतिरिक्त पूर्ण सरस्वती, हरिहर, मानविक्रम, धर्मानन्द, वरदपुत्रकृष्ण, लक्ष्मीधर, विष्णुपंडित व जीवानंद अशा आठ लेखकांच्या संस्कृत टीका आहेत.

मुरारीच्या नाटकात भवभूतीच्या 'महावीरचरिता'चे अनुकरंण आहे. यावरून तो भवभूतीनंतर होऊन गेलेला दिसतो. तसेच इ.स.८५५ ते ८८४ च्या दरम्यान होऊन गेलेल्या रत्नाकर कवीने आपल्या 'हरविजय' या महाकाव्यात 'अङ्कोत्थ नाटक इवोत्तम नायकस्य नाशं कविर्व्यधित यस्य मुराररित्थम् ।' (हर. ३८.६७) या श्लोकात मुरारीचा श्लेषात्मक निर्देश केला आहे. यावरून तो रत्नाकरापूर्वी

होऊन गेला असावा. आचार्य श्री रामचंद्र मिश्र सांगतात की मुरारी हा अनंतहर्ष राजाचा समकालीन होता. यावरून तो इ.स.च्या आठव्या शतकाच्या अखेरीस व नवव्या शतकाच्या प्रारंभी होऊन गेला असे म्हणण्यास हरकत नाही.

मुरारी कवीची प्रशंसा करणारे जे दोन-चार श्लोक आढळतात त्यातील एकात भवभूतीची उघड उघड निंदा केली आहे -

''मुरारिपदचिन्तायां भवभूतेस्तु का कथा।
भवभूतिं परित्यज्य मुरारिमुररी कुरू ॥''

या श्लोकावरून त्याच्या समकालीन पंडितांनी त्याला भवभूतीपेक्षा सरस ठरवलेले दिसते. पण आजच्या रसिकानी व पंडितांनी मुरारीलाच बाजूला सारून भवभूतीचा अंगीकार केलेला आहे. सदर नाटकाच्या प्रस्तावनेत 'यान्ति न्यायप्रवृत्तस्य' हे प्रसिद्ध सुभाषित आढळते. तसेच काही प्रतीत 'देवी वाचमुपासते' हा प्रसिद्ध श्लोक दिसतो पण तो प्रक्षिप्त समजून टीकाकारांनी गाळलेला आहे. प्रस्तावनेवरून त्याने याव्यतिरिक्त काही रचना केली असल्याचे दिसत नाही.

पहिल्या अंकात राम-लक्ष्मणांना यज्ञाच्या रक्षणार्थ घेऊन जाण्यासाठी विश्वामित्राचे आगमन झालेले आहे. मुले अद्याप लहान असल्यामुळे दशरथ त्यांना पाठविण्यास तयार नाही. तेव्हा विश्वामित्र त्यास म्हणतो -''अरे राम अजून लहान आहे ही तुझी समजूत चुकीची आहे. लहानसा सूर्य आकाशात दाटलेला अंधार दूर करतो.'' विश्वामित्राच्या बोलण्यावर काय बोलावे हे दशरथाला सुचत नाही. तो वामदेवांचा सल्ला घेतो. वामदेव रामाला यज्ञाचे रक्षण करण्यासाठी पाठविण्यास संमती देतात. मग रामलक्ष्मण प्रवेश करतात. दशरथ त्यांना विश्वामित्रांना प्रणाम करावयास सांगतो. त्याप्रमाणे ते वंदन करतात. रामाला पाहताच भगवान विष्णू हे चार मुलांच्या रूपात प्रकट झाल्याचे जाणवते. दशरथ वामदेवाकरवी रामलक्ष्मणांना विश्वामित्राच्या स्वाधीन करतो. विश्वामित्र मुलांना घेऊन निघून जातात. दशरथ खिन्न होतो व कौसल्येचे सांत्वन करण्यासाठी निघतो. या अंकास 'मुनींद्रसंवाद' असे नाव आहे. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक असून त्यात शुनःक्षेप व पशु मेढ्रु या विश्वामित्रांच्या दोन शिष्यांत संवाद चाललेला आहे. त्यांच्या संवादावरून वाली, रावण, राक्षस, जाम्बवान, हनुमान व ताडकाराक्षसी यांची माहिती मिळते. यात ताडकेच्या अंगात दहा हजार हत्तींचे बळ असल्याचे सांगितले आहे. म्हणूनच

विश्वामित्राने यज्ञाच्या रक्षणासाठी रामलक्ष्मणांना आणलेले आहे. विश्वामित्रांनी रामाला अनेक मंत्र व अस्त्रे दिल्याचा उल्लेख आहे.

मुख्य प्रवेशात राम व लक्ष्मण प्रवेश करतात. विश्वामित्राच्या आश्रमाचे व तेथील यज्ञीय वातावरणाचे वर्णन केले आहे. सायंकाळी विश्वामित्र येतात. यज्ञ पार पडल्याने ते संतुष्ट आहेत. आता लवकरच ताडका राक्षसीचा वध होणार आणि जनकसुतेची रामाला प्राप्ती होणार आहे. एवढे झाले म्हणजेच विश्वामित्राच्या मनाला शांती मिळणार आहे.

एवढ्यात पडद्यात गोंगाट होतो. ताडकेच्या आगमनाची सूचना मिळते. ती अंतराळात एखाद्या गिधाडाप्रमाणे संचार करीत आहे. ताडकेबरोबरच सुबाहु व मारीच हे राक्षस आलेले अहेत. आकाशातून एकाएकी रक्ताचा वर्षाव होऊन यज्ञकुंडे भरून जात आहेत. ताडका आली आहे असे समजताच विश्वामित्र रामाला धनुष्य सज्ज करण्यास सांगतात. पण रामाला स्त्रीचा वध करण्याची लाज वाटते. तो स्वत:शी म्हणतो -

''गुरूंनी आदेश दिला असल्यामुळे या स्त्रीवधामुळे अधर्म घडला असे म्हणता येणार नाही. आता लाज वाटते खरी पण डोळे मिटून हे कृत्य केले तर तीही नाहीशी होईल. पण मी स्त्रीवध केला असे येथील प्रजाजन बोलत राहतील व ज्ञानदृष्टीने सर्व गोष्टी जाणणारे माझे गुरू वसिष्ठ हे लज्जित होतील.''

(अंक २, श्लोक ५९ व ६०)

पण राक्षसांची गर्जना ऐकताच तो आपले धनुष्य सज्ज करतो व काही वेळातच मारीच, सुबाहु व ताडका हे मरून पडतात. रामाच्या मनातली खंत जात नाही. त्यामुळे विजयी होऊनही तो विश्वामित्राकडे येत नाही. शेवटी खाली मान घालून तो विश्वामित्रांना नमस्कार करतो. मग जनकराजाचा विषय निघतो.रामाला मिथिलानगरी ऐकून माहीत होती. जनकाची कन्या सीता हिचे स्वयंवर होते. म्हणून सर्व जण मिथिलेकडे जावयास निघतात. या अंकास 'कौमारविक्रम' असे नाव आहे. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी मिश्रविष्कंभक आहे. त्यात कंचुकी व सीतेची सखी कलहंसिका यांचा संवाद आहे. सीता उपवर झालेली आहे. लंकेचा राजा रावण हा तिला वरण्यास उत्सुक झाला आहे. तसेच विश्वामित्र हे राम-लक्ष्मणांना घेऊन मिथिलेला आलेले आहेत. दशरथाला चार मुले आहेत त्याप्रमाणे जनकाच्या घरातही चार कन्या आहेत, असे कलहंसिका म्हणते व भावी संबंध

सूचित करते. पण सीतेला मागणी घालण्यासाठी रावणाचा पुरोहित आलेला आहे. सीतेला जिंकण्यासाठी शिवधनुष्यास दोरी लावण्याचा पण असल्याचा कंचुकी उल्लेख करतो.

मुख्य प्रवेशात जनक, विश्वामित्र, शतानंद, राम व लक्ष्मण जनकाच्या दरबारात बसलेले आहेत. जनक विश्वामित्रांचे स्वागत करतो. दोघे एकमेकांची प्रशंसा करतात. मग विश्वामित्र जनकाने लावलेल्या पणाचा उल्लेख करतो. मग शतानंद राम-लक्ष्मणाकडे पाहून "ही कोणाची मुले आहेत?" असा प्रश्न विचारतो. विश्वामित्र त्याला 'ही दशरथाची मुले आहेत व हा थोरला राम आहे.' असे स्पष्ट करतो. ताडकेसह इतर राक्षसांचा नाश करणाऱ्या तरुण रामचंद्राला पाहून जनकाला कौतुक वाटते. तसेच रामलक्ष्मणांना पाहिल्यावर शतानंदाच्या मनात सीता व उर्मिला यांचा विचार येतो. सीतेच्या विवाहासाठी अवघड पण लावल्याचा जनकाला खेद होतो. तो म्हणतो -

"एक तर शंकराचे धनुष्य रामाला दोरी लावण्यासारखे हलके झाले पाहिजे किंवा त्यावर दोरी लावण्याची माझी अट तरी शिथिल केली पाहिजे."

(अंक ३, श्लोक २७)

इतक्यात रावणाचा पुरोहित शौष्कल प्रवेश करतो. तो राम-लक्ष्मणाना पाहून उद्विग्न होतो. कारण रामानेच ताडकेला मारले हे त्याला ठाऊक होते. कुशल प्रश्न झाल्यावर शौष्कल आपण कोणत्या कामासाठी आलो आहोत हे सांगतो. तो रावणासाठी सीतेला मागणी घालायला आलेला आहे. शतानंद त्याला जनकाने लावलेल्या पणाची हकीकत सांगतो. शौष्कल रावणाच्या पराक्रमाची प्रौढी गातो. रावण असले कृत्य करण्यास तयार होणार नाही असे सांगतो. तेव्हा शतानंद त्याला स्पष्ट बजावतो -

"महाक्षत्रियाच्या वंशात जन्माला आलेल्या जनकराजाची ही दृढ अशी प्रतिज्ञा आहे. जर रावण धनुष्यावर दोरी चढवणार नाही तर मग आमचे उत्तर काय आहे हे आपल्याला सहज समजण्यासारखे आहे."

(अंक ३, श्लोक ४७)

मग शतानंद रामाला धनुष्यावर दोरी चढवण्यास सांगतो. शौष्कल व शतानंद यांच्यात बोलाचाली होते. राम धनुष्याला दोरी लावतो त्याबरोबर ब्रह्मांडास कानठळ्या बसवणारा आवाज करीत हे धनुष्य मोडून पडते. जनक आनंदाने सीतेला रामास देण्याचे घोषित करतो. रामाबरोबर लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांचे

विवाहही जनकाच्या घरातील चार कन्यांबरोबर निश्चित होतात. शौष्कलाचा चडफडाट होतो. तो धमकी देऊन निघून जातो. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या प्रारंभी माल्यवान प्रवेश करतो. हा रावणाच्या मातेचा चुलता असून रावणाचा मंत्रीही आहे. त्याला रामाने सीतेला प्राप्त करून घेतल्याची वार्ता समजली आहे. रामाने ताडका, सुबाहू व मारीच यांना मारल्याचेही समजले होते. मानव जातीत असे शौर्य प्रकटलेले पाहून तो उदास बनलेला आहे. ब्रह्मदेव प्रसन्न झाला असताना रावणाने त्याच्याकडे मानवापासूनही अभय मागायला हवे होते, असे त्याला वाटते. रावण आता सीतेचे बलात्काराने हरण करण्यास उद्युक्त व्हावा ही गोष्ट त्याला पसंत पडत नाही.

इतक्यात शूर्पणखा तेथे येते. सीतेचे हरण करण्यासाठी तिला अयोध्येतून बाहेर काढणे आवश्यक होते. तेव्हा रामाला काही तरी करून वनात आणल्याने ते काम सिद्धीस जाणार होते. यास्तव माल्यवान तिला मिथिलेस आलेल्या मंथरा या कैकेयीच्या दासीच्या शरीरात प्रवेश करण्यास सांगतो. तेव्हा शूर्पणखा मिथिलेत परशुराम आला असल्याचे सांगते व तो रामाने शिवधनुष्याचा भंग केल्याने क्रुद्ध झाला आहे असेही सांगते. पण परशुरामाचेही रामासमोर काही चालणार नाही, असे माल्यवानास वाटते. कारण -

''सर्व क्षत्रिय वर्गास न आटोपणारे, सर्व देवांच्या अंशापासून बनलेले ते धनुष्य खंडित करून रामाने जणू त्रैलोक्यच जिंकले आहे.''

(अंक ४, श्लोक १६)

माल्यवान व शूर्पणखा हे दोघे निघून जातात.

मिश्र विष्कंभकानंतरच्या मुख्य प्रवेशात परशुराम येतो. तो संतप्त होऊन रामाला शोधत आहे. इतक्यात राम त्याच्यासमोर येऊन उभा राहतो व त्याचे स्वागत करतो. रावणाला पराभूत करणाऱ्या कार्तवीर्य सहस्रार्जुनाचे हजारो बाहू तोडणाऱ्या परशुरामास पाहून त्याला कौतुक वाटते. रामाला पाहून परशुरामही चकित होतो. मग दोघात बोलाचाली होते. मग राम त्याला स्पष्ट बजावतो की त्याने एकवीस वेळा क्षत्रियांना जिंकले ही वार्ता आपण ऐकलेली आहे. त्याच्या बाहूत किती सामर्थ्य आहे हे आपण पाहणार असून केवळ शिवधनुष्याचा भंग करून आपले समाधान झाले नाही. पुढे तो असेही सांगतो की, परशुरामाच्या यशाची पताका आता जीर्ण झाली आहे.

मग दोघे लढाईसाठी मैदानावर जातात. परशुराम रामाला वैष्णव धनुष्य देऊन त्यावर दोरी चढवण्यास सांगतो. राम धनुष्यावर दोरी चढवणार आहे ही

वार्ता सीतेला समजताच तो आता दुसऱ्या स्त्रीसाठी प्रयत्न करीत आहे की काय असे सीतेला वाटते. त्या युद्धात राम विजयी होतो. राम विजयी झाल्याचे समजताच दशरथ आनंदित होतो व लगेच त्याला राज्याभिषेक करण्याचे ठरवतो. पण कैकेयीकडून एक पत्र घेऊन मंथरा येते. त्यात कैकेयीने दशरथाने मागे दिलेल्या दोन वरांचे स्मरण देऊन एका वराने रामाला चौदा वर्षे वनवास व दुसऱ्या वराने भरताला राज्याभिषेक करण्याची मागणी केली होती. ही मागणी ऐकताच दशरथ व जनक दोघेही मूर्च्छित होतात. राम, लक्ष्मण व सीता वनात जातात. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या सुरुवातीस विष्कंभक आहे त्यात जांबवंत व श्रवणा तापसी यांचा संवाद आहे. त्यातून राम लक्ष्मण व सीता यांच्यासह वनात आला आहे. तिकडे दशरथाचे निधन झाले आहे ही वार्ता भरताने रामाला सांगितली. भरत रामाच्या पादुका घेऊन परत गेला आहे. रामावर मोहित झालेल्या शूर्पणखेचे नाक व कान छेदून लक्ष्मणाने तिला विद्रूप केले आहे अशी हकीकत समजते.

जाम्बवानाची जटायूशी भेट होते. जटायूला मारीच व रावण वेष पालटून वनात हिंडत असताना दिसले आहेत. तो आता रामाला भेटायला उत्सुक झालेला आहे. राम सोनेरी हरणाचा पाठलाग करीत दूर गेला आहे व लक्ष्मणही त्याच्या मागे चाललेला आहे. अशा स्थितीत कोणी एक संन्यासी रामाच्या झोपडीकडे चाललेला त्याला दिसतो. तो रावण असल्याचे सुग्रीव ओळखतो. इतक्यात रावण सीतेला आपल्या रथात घालून जाताना दिसतो. जटायू चिडून रावणाला अडवण्याचे ठरवतो.

या विष्कंभकानंतर मुख्य प्रवेशात लक्ष्मण येतो. रावणाने सीतेचे अपहरण केले आहे व त्यात अडथळा आणणाऱ्या जटायूलाही ठार केले आहे. लक्ष्मणाच्या नंतर शोकाकुल झालेला राम रंगभूमीवर येतो. लक्ष्मण त्याचे सांत्वन करू लागतो. इतक्यात गुहाला एका मस्तकरहित राक्षसाने पकडल्याने त्याची किंचाळी ऐकू येते. लक्ष्मण पुढे जाऊन त्याची दनु नामक कबंधापासून सुटका करतो. मग गुह येऊन रामाला सीतेची ओढणी देतो. ती मारुतीने त्याला आणून दिलेली होती. राम सुग्रीव व हनुमान यांना भेटण्यास उत्सुक होतो.

वालीसारख्या महापराक्रमी वीराशी सख्य करण्याऐवजी राम सुग्रीवाशी मैत्री का करू इच्छित आहे याचे लक्ष्मणाला आश्चर्य वाटते. म्हणून तो रामाला प्रश्न विचारतो. तेव्हा राम खुलासा करतो की, वालीला आमच्या मदतीची गरज

नसल्यामुळे तो आमच्याशी मैत्री करणार नाही. त्यामुळे सुग्रीवाला रामाचा निरोप कळवण्यात येतो.

इतक्यात पडद्यातून वालीची गर्जना ऐकू येते. राक्षसांच्या अस्थींचा बनवलेला क्रीडापर्वत कोसळल्यामुळे वाली संतापला आहे. आपल्याबरोबर लढण्यास कोण उत्सुक आहे असे विचारत तो प्रवेश करतो. रामाशी परिचय होताच दोघे एकमेकांची प्रशंसा करतात. पण दोघात युद्ध अटळ असते. ज्याने परशुरामाला पराभूत केले त्या रामाशी दोन हात करण्यास वालीचे हात शिवशिवत असतात. मग राम वालीला शस्त्र धारण करण्यास सांगतो. पण वानर हे शस्त्रांनी लढत नाहीत तर आपले हात, मुठी व नखांनी लढतात असे वाली सांगतो.

मग दोघे लढण्यासाठी योग्य भूमीकडे जातात. वाली रामावर सातताल वृक्ष एकदम भिरकावतो तेव्हा राम आपला बाण सोडतो. तो बाण सात वृक्षांचे तुकडे करून, वालीला ठार मारून पुन्हा रामाच्या भात्यात येऊन बसतो. त्याबरोबर पडद्यात मंगल-वाद्ये वाजू लागतात. सुग्रीवाला राज्याभिषेक करण्यात येतो. स्वत: राम सुग्रीवाच्या गळ्यात सुवर्णकमळांची माळ घालतो.

राजा झाल्याबरोबर सुग्रीव सीतेचा शोध घेण्यासाठी मारुतीला पाठवण्याचा व वालीचा पुत्र अंगदाला यौवराज्याभिषेक करण्याचा मनोदय व्यक्त करतो. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक असून त्यात माल्यवान व सारण यांच्या संवादातून अनेक घटनांची सूचना मिळते. प्रारंभीच हनुमानाने लंकेला लावलेल्या आगीचे वर्णन आहे. य:कश्चित वानराने येऊन रावणाच्या नगरीत एवढा हलकल्लोळ उडवावा याचे माल्यवानाला मोठे नवल वाटते. त्याने रामाच्या सैन्यात पाठवलेल्या सारण व शुक या हेरांपैकी प्रथम सारण येतो व रामाने बिभीषणास अभिषेक केल्याची वार्ता सांगतो. बिभीषणाने शत्रूला जाऊन मिळावे, हे रावणाच्या राज्यावर आलेले संकटच होते. पण त्यात बिभीषणाचाही दोष नव्हता. त्याने रावणाला 'रामाची सीता परत कर' असा सल्ला दिला व त्यामुळे चिडलेल्या रावणाने त्याची हकालपट्टी केली होती.

सारण पुढे सांगतो की रामाने सागरावर सेतू बांधण्यास प्रारंभ केला असून ते काम वेगाने सुरू आहे. सारण माल्यवानास सुग्रीवापासून अंगदास फोडण्याचा सल्ला देतो. रावणाकडून जर अंगदास काही आमिष दाखवले गेले तर ही गोष्ट शक्य होईल असे सारणाला वाटते. पण माल्यवान ती सूचना फेटाळून

लावतो. पण राम आणि वानर हे सेतू बांधत आहेत याचे त्याला नवल वाटते. तो म्हणतो -

"य:कश्चित माणसे जर समुद्र पार करू लागली तर रावणाच्या आजवरच्या कीर्तीचा अंत जवळ आला, असे म्हटले पाहिजे."

(अंक ६, श्लोक १०)

वालीच्या मृत्यूमुळे निर्भय बनलेल्या सुग्रीवाने रामाला साह्य केल्याने रामाचा पक्ष मजबूत झालेला आहे. त्यामुळे अद्याप जरी लंकेवर आक्रमण झाले नाही तरी ते होण्यास आता वेळ लागणार नाही हे माल्यवान ओळखतो. इतक्यात त्याचा शुक हा दुसरा गुप्तहेर गडबडीने येऊन सांगतो की रामाने लंकेला वेढा दिला असून प्रहस्त, धूम्राक्ष, महोदर इत्यादी सेनापतींना ठार मारले आहे. आता रावण काय करीत आहे असे विचारल्यावर शुक सांगतो -

"राम-लक्ष्मण हे समुद्रपार करून सुवेल पर्वतापर्यंत आलेले आहेत, हे ऐकल्यावर रावणाने आपल्या वीस हातांपैकी दहा हातांनी गर्वाने आपल्या धनुष्याची दोरी ओढून टणत्कार केला. आपल्या तलवारी पुसल्या. पण त्याचे उरलेले हात मात्र समोर ठेवलेल्या सीतेच्या चित्रफलकावर तिच्या वक्ष:स्थलावर नाजूक वेलीबुट्टी कशी चितारता येईल याचा अभ्यास करीत होते."

(अंक ६, श्लोक १७)

रावणाची ही बेफिकीरी व मूर्खपणा पाहून माल्यवान सुन्न होतो. एवढ्यात लढाई सुरू झाल्याची वार्ता येते. कुंभकर्ण व इंद्रजित युद्धाला निघाले असल्याचे समजते. माल्यवान आता निराश झालेला आहे. आता रावणाच्या सैन्याची काही धडगत नाही असेच त्याला वाटते. इतक्यात रामाने कुंभकर्णास ठार केल्याची बातमी पडद्यातून समजते. पाठोपाठ इंद्रजितही लक्ष्मणाकडून ठार झाला आहे. त्यानंतर आपला सारा शोक व संताप आवरून रावण स्वत: लढाईला निघाला आहे.

या विष्कंभकानंतर मुख्य प्रवेशात दोन विद्याधर आकाशात संचार करताना दिसतात. ते राम व रावण यांच्यातील युद्ध पाहण्यासाठी आले आहेत. रावणाच्या भीतीने देवांनी मात्र आकाशात दाटी केलेली नाही. इतक्यात हातातल्या चंद्रहास खड्गाकडे एकटक पहात, क्रोधाने सारे डोळे लालबुंद झालेला रावण रणांगणाकडे आला आहे. त्याला पाहूनच भीती वाटते. त्याला पाहून वानरही भीतीने मागे सरकले आहेत. वानर व राक्षस यांच्यात धुमश्चक्री सुरू झालेली आहे. रावणाच्या

बाणांनी वानरराज सुग्रीव जखमी झाला तरी तो वानरांना धीर देऊ लागला आहे. वानरांनी फेकलेल्या वृक्षांचा अथवा पर्वतशिखरांचा रावणावर काहीच परिणाम होत नाही. त्यानंतर रावण व सुग्रीव यांच्यात भयंकर मल्लयुद्ध जुंपले पण सुग्रीव थकताच रावणाने त्याला सोडून दिले.

राम मात्र शांतपणे त्या दोघांची लढाई पाहात आहे व रावणाच्या कौशल्याची प्रशंसा करीत आहे. रामाला पाहून रत्नचूड विद्याधर आनंदित झाला आहे. इतक्यात इंद्राने पाठवलेला रथ रामाजवळ आलेला आहे. आणि मग राम आणि रावण यांच्यात बोलाचाली सुरू झाली आणि रावणाने चिडून बाणांचा वर्षाव सुरू केला व रामाने प्रत्युत्तर दिले. जे कार्य रावण वीस हातांनी करीत होता तेच कार्य राम दोन हातांनी करीत होता. दोघे तुल्यबळ होते. त्या दोघांचे भयंकर युद्ध पाहून त्याचे वर्णन करणारे विद्याधर थक्क झाले.

मग राम व रावण दोघेही अस्त्रांचे मंत्र जपू लागले. त्या अस्त्रांची काटाकाटी सुरू झाली. अखेर रामाने योजलेल्या अस्त्राने रावणाची मस्तके तुटून गेली व रावणाचे शरीर जमिनीवर पडले. त्याच्या शरीराच्या ओझ्याने पृथ्वी खाली दबली गेली. साऱ्या देवांची कैदेतून सुटका झाली आणि त्यांनी विजयी रामावर पुष्पवृष्टी केली. (अंक सहावा)

रावणाच्या कैदेतून बाहेर आलेल्या सीतेने आपल्या शुद्धीसाठी अग्नीत प्रवेश केला व ती बाहेर आली. त्यानंतर राम, सीता, लक्ष्मण, बिभीषण व सुग्रीव अयोध्येस जाण्यासाठी पुष्पक विमानात बसले. त्यांना खाली लंकानगरी दिसू लागली. रणभूमीवर हजारो राक्षसांची प्रेते पडलेली होती. सुवेल पर्वताच्या पठारावर लक्ष्मण व इंद्रजित यांचे युद्ध झाले होते. तेव्हा मूर्च्छित पडलेल्या लक्ष्मणासाठी हनुमान द्रोणागिरी पर्वत घेऊन आल्याचा उल्लेख रामाच्या बोलण्यात आलेला आहे. रामाने बांधलेला सेतू विमानातून दिसत होता.

यानंतर त्याला प्रथम हिमालय पर्वत दिसतो मग सुमेरू पर्वताचे दर्शन होते. त्यानंतर अमरावतीमध्ये ऐरावत संचार करताना दिसतो. वालीचा विषय निघताच राम सांगतो की रावणाला मारणे शक्य व्हावे म्हणून प्रथम वालीला ठार केले. मग विमान चंद्रलोकाकडे वळते. नंतर मलयपर्वत, दंडकारण्य, प्रस्रवणपर्वत, गोदावरी नदी, माल्यवान पर्वत, विदर्भाची राजधानी कुंडिनपूर, कांचीनगरी, उज्जयिनी, कलचुरी राजांची राजधानी माहिष्मती, गंगानदी, वाराणसी, मिथिला, चंपा, प्रयागक्षेत्र व तेथील गंगा व यमुना यांचा संगम ही दृश्ये पाहात असता

विमान एकदम पश्चिमेकडे वळते. शरयू नदी व अयोध्या नगरी दिसू लागते. तेथे वसिष्ठ मुनी, भरत, शत्रुघ्न हे रामाची वाट पाहात आहेत.

सर्व विमानातून खाली उतरतात. वसिष्ठ मुनी रामाच्या रावणावरील विजयाप्रीत्यर्थ त्याचे अभिनंदन करतात. सीता व राम वसिष्ठांच्या पाया पडतात. इंद्रजितावर विजय मिळवणाऱ्या लक्ष्मणास वसिष्ठ मुनी आशीर्वाद देतात. राम-भरताची भेट होते. त्यानंतर रामाला राज्याभिषेक होतो. नंतर भरतवाक्य होऊन नाटक समाप्त होते. (अंक सातवा)

* * *

नाटकाची कथावस्तू रामायणातून घेतलेली आहे. मुरारीने रामाची कथा बहुतांशी आहे तशीच सादर केली आहे. नाही म्हणायला सीतास्वयंवरास रावण आलेला नाही. तसेच राम व वाली यांचे युद्ध दाखवले आहे, यासारखे बदल केलेले आहेत. रामायणाखेरीज त्याने इतर कलाकृतीतील कल्पना घेतल्या आहेत. उदा. सातव्या अंकात राम,सीता,लक्ष्मण हे पुष्पक विमानात बसून अयोध्येला येतात. त्या वेळी राम सीतेला विविध दृश्ये दर्शवितो. ही रघुवंशाच्या तेराव्या सर्गात आलेली कल्पना मुरारीने उचलली आहे. तसेच त्याने भवभूतीचे अनेक स्थळी अनुकरण केले आहे. उत्तररामचरित व महावीरचरितातील अनेक वाक्ये थोड्या फार फरकाने 'अनर्घ राघवात' आढळतात.

* * *

यात राम, लक्ष्मण, विश्वामित्र, जनक, सीता, परशुराम, माल्यवान व रावण अशी प्रमुख पात्रे आहेत. ही पात्रे सरधोपट आहेत. यात कवीला कोणतेही वैशिष्ट्य प्रकट करता आलेली नाही.

**१) राम** :-रामाचे पात्र कवीने काळजीपूर्वक रेखाटले आहे. त्याचे अनेक गुण त्याने दर्शविले आहेत. रामाचा स्वभाव अत्यंत विनम्र व निष्कपट आहे. ताडकेसारखी राक्षसी चाल करून आली असता राम शस्त्र उचलत नाही. विश्वामित्राच्या सांगण्यावरून तो ताडकेचा वध करतो. पण स्त्रीवर शस्त्र चालवल्याबद्दल त्याला मनोमन वाईट वाटते. तसेच शिवधनुष्याचा भंग केल्याने चिडलेला परशुराम रामाला बोल लावतो तेव्हा राम त्याच्याशी सौजन्यानेच वागतो. पण त्याचा (म्ह. परशुरामाचा) दरारा संपलेला आहे, असे स्पष्ट सांगतो. परशुराम पराभूत झाल्यावरही तो त्याच्याशी विनम्र भावाने वागतो.

राम दृढनिश्चयी व पराक्रमी आहे. इतरांच्या हृदयाचा थरकाप उडवणारे शिवधनुष्य तो लीलया उभे करतो. त्याला दोर लावण्याच्या प्रयत्नात ते भंगते हा भाग निराळा. सहस्रार्जुनाचा नि:पात करणाऱ्या परशुरामास तो पराभूत करतो व अखेरीस त्रैलोक्यविजयी रावणाचा वध करतो.

**(२) लक्ष्मण :** लक्ष्मणाला यात फारसा अवसर मिळालेला नाही. तो रामाचा एकनिष्ठ सेवक आहे. वनवासात तर तो त्याची अगदी सावली होऊन राहिलेला आहे. परशुरामाच्या कुत्सित बोलण्याने वनवासात राम जरी शांत राहिला तरी लक्ष्मणाचा पारा चढतो. प्रख्यातकीर्ती इंद्रजिताचा वध करून तो रामास मोठीच मदत करतो.

**(३) विश्वामित्र :** हे रामास प्रेरणा देणारे ऋषी आहेत. राक्षस यज्ञकर्मात अडथळा आणतात यास्तव त्या यागविधींचे रक्षण करण्यासाठी विश्वामित्र दशरथाकडे राम-लक्ष्मणांना पाठविण्याची याचना करतात. ताडकेचा वध करण्यास रामास प्रवृत्त करतात. तसेच सीतास्वयंवरासाठी रामाला मिथिलेत घेऊन जातात. विश्वामित्रांचे योगदान तिसऱ्या अंकाच्या शेवटी समाप्त झाले आहे.

**(४) सीता :** सीतेलाही यामध्ये काही वाव नाही. रामाने धनुर्भंग केल्यावर ती त्याच्या गळ्यात माळ घालते आणि नंतर रामाच्या मागोमाग वनवासात जाते. तेथे रावण येऊन तिचे अपहरण करतो. रावणाच्या कैदखान्यात ती सुटका होण्याची वाट पाहात बसते. सुटका झाल्याबरोबर तिला अग्निदिव्य करावे लागते व नंतर ती रामाबरोबर अयोध्येस परत येते. हा सारा कथाभाग कवीने निवेदनातून व्यक्त केलेला आहे. मुरारीने सीतेला फारच थोडा वेळ रंगभूमीवर आणलेले आहे.

**(५) परशुराम :** परशुराम हा शिवभक्त व क्षत्रियद्वेष्टा आहे. त्याने एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केलेली होती व या गोष्टीचा त्याला नितांत अभिमान आहे. रामाने शिवधनुष्याचा भंग केल्याचे समजताच तो क्रोधाविष्ट होतो. जनकाच्या राजसभेत तो साऱ्यांचा अपमान करतो. राम त्याच्याशी सौजन्याने वागतो पण रामाला तो तुच्छ लेखतो. मग राम त्याला उत्तर देतो. दोघे लढण्यासाठी मैदानात जातात. परशुराम पराभूत होतो. परशुरामाच्या चित्रणात आत्मप्रौढीचा दोष आहे. त्याला नाटकात वाव नसला तरी ही व्यक्तिरेखा चमकदार झाली आहे.

(६) **माल्यवान :** हा रावणाच्या आईचा चुलता व राज्याचा मंत्री आहे. तो सतत रावणाच्या भविष्याची चिंता करतो. तो राजनीतीत निपुण आहे. रावणाने सीतेचे अपहरण केल्यापासून तो रावणावर नाराज आहे. नाटकात तो शूर्पणखेला मंथरेच्या शरीरात प्रवेश करण्यापलीकडे फारशी सल्लामसलत करताना दिसत नाही. मारुतीने लंकेस आग लावल्यावर व त्यानंतर रामाने सेतू बांधून लंकेवर हल्ला केल्यावर तो रावणाच्या भवितव्यताबद्दल पूर्ण निराश होतो. संकट इतके जवळ येऊन ठेपल्यावरदेखील रावणाची बेफिकीरी पाहून तो हताश होतो. त्यानंतर होईल ते पाहात राहण्यापलीकडे त्याच्या हातात काही राहात नाही. माल्यवानाची व्यक्तिरेखा फारच दुबळी वठली आहे. महावीरचरितातील माल्यवान याच्यापेक्षा हुशार व कावेबाज आहे.

(७) **रावण :** रावण हा नाटकाचा खलनायक असला तरी त्याचे चित्रण अत्यंत सुमार झालेले आहे. रामायणातील कथनानुसार हा अत्यंत पराक्रमी, निस्सीम शिवभक्त, अत्यंत ताठर व अहंकारी आहे. पण ही प्रतिमा मुरारीला साकार करता आलेली नाही. त्याचा रावण मूर्ख व बेफिकीर आहे. सीतेच्या भोगासाठी लंपट आहे. रावण सीतास्वयंवरास स्वत: येत नाही. त्याला धनुष्याला दोरी लावण्याची अट अपमानास्पद वाटते. त्याऐवजी तो सीतेला पळवून नेतो. बिभीषणाने 'सीतेला रामाकडे परत पाठव' असा सल्ला दिल्यावर तो बिभीषणासच हाकलून देतो. धनुर्भंग, परशुरामाचा पराभव, वालीचा वध या गोष्टी ऐकूनही त्याला रामाच्या पराक्रमाची कल्पना येत नाही. लंकेवर हल्ला झाला तरी तो सीतेच्या चित्रफलकापुढून हलायला तयार नाही. वेळी अवेळी बढाया मारणारा रावण प्रभावी वाटत नाही.

'अनर्घराघवा'त एकंदर तीस पात्रे आहेत. वाली, सुग्रीव, बिभीषण, जनक, शतानंद इत्यादी पात्रे फारच थोडा वेळ रंगभूमीवर आलेली आहेत. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे हनुमानासारखे अत्यंत महत्त्वाचे पात्र मुरारीने रंगभूमीवर आणलेले नाही. त्यामुळे लंकादहनासारखा प्रसंग निवेदनाद्वारे व्यक्त केला आहे.

* * *

(१) रामचरितावरील आणखी एक नाटक यापलीकडे 'अनर्घराघवा'स महत्त्व नाही. नाटकाच्या प्रस्तावनेत मुरारीने 'कलहकन्दल नामक नटाने रौद्र, बीभत्स, भयानक व अद्भुत रसाने भरलेले एक नाटक सादर करून लोकांना उबग आणला

आहे.'' असा ताशेरा मारलेला आहे. पण स्वत: अस्वाभाविक प्रसंगांनी भरलेले व अवास्तव वर्णनाने फुगलेले भलेमोठे नाटक सादर केले आहे. याच्या विस्ताराची दोन उदाहरणे देतो. यातील सहाव्या अंकाचा विष्कंभक तब्बल दहा पानांचा आहे व यात बावीस श्लोक आहेत. एवढा मोठा विष्कंभक दुसऱ्या कोठल्याही नाटकात नाही. तसेच सातव्या अंकात कथानक रेसभरही पुढे सरकत नाही. पण असे असून या अंकात दीडशे श्लोक आहेत. नाटकात एकंदर पाचशे चाळीस श्लोक आहेत. मुरारीला अनावश्यक विस्तार करण्याची हौस आहे. अतिशयोक्ती व संयमाचा अभाव यामुळे नाटक कमालीचे कंटाळवाणे झाले आहे.

(२) मुरारी हा अगोदर पंडित व नंतर कवी आहे. त्याचे वेदवाङ्मय, मीमांसा, न्याय, व्याकरण व राजनीती यावर प्रभुत्व आहे. जनकाच्या राजसभेतील जनक, विश्वामित्र, परशुराम व शतानंद यांच्यातील वादप्रसंगात त्याचे पांडित्य प्रकट झालेले आहे. त्याचे इतिहास-पुराणाचे ज्ञान सखोल आहे. भाषेवर चांगले प्रभुत्व आहे. त्याने एकंदर सोळा वृत्तांचा वापर केला आहे. तथापि श्लोकरचनेत प्रसादगुणांचा अभाव आहे. त्याच्या कल्पना क्लिष्ट आहेत, तसेच अपरिचित शब्दही बरेच आढळतात.

त्याच्या पांडित्यपूर्ण नाटकात रमणीय कल्पना असलेले चांगले श्लोकही आढळतात. वानगीसाठी त्यातील दोन-तीन श्लोकांचा खाली उल्लेख केला आहे.

(अ) पहिल्या अंकात विश्वामित्राने आपल्या यज्ञाच्या रक्षणासाठी दशरथाकडे राम-लक्ष्मणाची मागणी केली आहे. मुले अद्याप लहान असल्याने त्यांना युद्धावर पाठवायचे दशरथाच्या अगदी जिवावर येते. पण तो मनाशी विचार करतो -

''यज्ञाच्या रक्षणासाठी या दशरथाकडे याचना करून जर विश्वामित्र ऋषी विन्मुख परत गेले व त्यांनी आपल्या तपश्चर्येचा काही अंश खर्ची घालून यज्ञास प्रारंभ केला तर रघुवंशाची आजवरची कीर्ती नष्ट झाल्याखेरीज राहणार नाही.''

(अंक १, श्लोक ४५)

(ब) जनकाच्या राजदरबारात रामाने शिवधनुष्याचा भंग केला. ही गोष्ट रावणाचा दूत शौष्कल याने पाहिली आहे. आता रामाला सीतेची प्राप्ती होणार हे पाहताच त्याचा संताप उफाळून वर येतो. तो रामाला धमकी देतो -

"अप्सरांनी चवरीने घातलेल्या वाऱ्याने चहूकडे सुगंध दरवळत असलेल्या रावणाच्या अंत:करणात सीतेची स्थापना झालेली आहे. तेव्हा हे रामा, तू (धनुर्भंग केल्याच्या) यशावरच संतुष्ट होऊन परत जा. सीतेशी विवाह करण्याच्या फंदात पडू नकोस."

(अंक ३, श्लोक ६१)

(क) सातव्या अंकात पुष्पक विमानात बसून राम-सीता वगैरे अयोध्येस परत येत असता राम सीतेच्या मुखाचे वर्णन करीत आहे. कवी सांगतो -

"हे सीते, ब्रह्मदेवाने चंद्राबरोबर तुझ्या मुखाची तुलना करण्यासाठी तराजूच्या पारड्यात ठेवले. चंद्राचे पारडे कमी भरताच ती उणीव भरून काढण्यासाठी या तारकांची योजना केली."

(अंक ७, श्लोक ८१)

(३) आणखी एक जाचणारी गोष्ट म्हणजे मुरारीच्या ठिकाणी विवेचक शक्तीचा संपूर्ण अभाव आहे. लंकेपासून अयोध्येपर्यंतच्या मार्गाचे वर्णन करताना त्याने भौगोलिक क्रमास अक्षरश: धाब्यावर बसवले आहे. इतकेच नव्हे अमरावती, चंद्रलोक, सुमेरु, हिमालय यांचेही वर्णन त्यात घातलेले आहे.

मुरारीवर टीका करताना म.म.डॉ. वा. वि. मिराशी लिहितात - "पण त्याच्या (म्ह. मुरारीच्या) नाटकात भवभूतीच्या सारखा प्रसाद गुण नाही. कल्पनाही अनेक ठिकाणी ओढून ताणून आणलेल्या दिसतात. उदाहरणार्थ, विष्णूचे 'स्वयं देवो लक्ष्मीस्तनकलशवारी गजपति:॥' (अंक १ श्लोक ५२) हे वर्णन पाहा. या विष्णूचे 'लक्ष्मीच्या कलशासारख्या स्तनांनी बांधलेला हत्ती' असे वर्णन केले आहे. त्यात क्लिष्टता आहे. अशा निष्कृष्ट कवीला प्राचीन परंपरेच्या पंडितांनी भवभूती पेक्षा श्रेष्ठ मानावे, हा दैव दुर्विलास होय!" (भवभूति : पृष्ठ ३६१-३६२)

# राजशेखर

भवभूतीप्रमाणे राजशेखरानेही स्वत: विषयीची भरपूर माहिती सांगितलेली आहे. याचे पूर्वज महाराष्ट्रीय होते. अकालजलद नामक पुरुषापासून चौथ्या पिढीत राजशेखर होऊन गेला. अकालजलद हा मोठा कवी असून त्याला 'महाराष्ट्र-चूडामणी' अशी पदवी मिळालेली होती. याच्या अगोदर या वंशात तरल आणि कविराज हे कवी होऊन गेले. यांनी रचलेले श्लोक सुभाषित-संग्रहात आढळतात. राजशेखराच्या आजोबाचे नाव सुरानंद असावे असे काहींचे मत आहे. याला 'चेदिमंडलमंडन' अशी पदवी होती. प्रा. दि.मो.हातवळण्यांच्या मते तो राजशेखराचा धाकटा चुलता असावा. याची मते राजशेखराने आपल्या 'काव्यमीमांसा' या ग्रंथात नमूद केली आहेत.

राजशेखराच्या पित्याचे नाव दर्दुक किंवा दुहिक असे होते. हा महेंद्रपाल राजाचा मंत्री असावा. 'उना' शिलालेखात याचे नाव धीदूक असे दिलेले आहे. महेंद्रपालाचा पिता भोज याच्या दरबारातही दुहिकाने चाकरी केली असावी. याच्या मातेचे नाव शीलावती असल्याचे त्यानेच नमूद केले आहे. त्याने 'चाहुमाण' कुलातील अवंतिसुंदरी नामक विदुषीबरोबर विवाह केला होता. ती व्युत्पन्न व विद्याविभूषित होती. तिची काव्यविषयक मते राजशेखराने उद्धृत केली आहेत. प्राकृत भाषांतही ती निपुण असावी. कारण राजशेखराच्या 'कर्पूर मंजरी' या सट्टकाचा प्रयोग तिनेच सादर केलेला आहे.

राजशेखर हा स्वत:स 'यायावरीय' म्हणवतो. आपल्या 'बालरामायण' या नाटकात (बाल. १.१३) व काव्यमीमांसा या ग्रंथात (काव्य. अ.१) त्याने तसा स्पष्ट उल्लेख केला आहे. 'यायावर' हा गृहस्थाश्रमी ब्राह्मणांचा वर्ग असून ते उपजीविकेसाठी ठिकठिकाणी हिंडत असत. बौधायन धर्मसूत्रात या शब्दाची

व्युत्पत्ती 'वृत्या वरया यातीति यायावरत्वम्।' यायावर हे स्वतःस सूर्यवंशी समजतात.

त्याचा जन्म बहुधा महाराष्ट्रातील 'वत्सगुल्म' (आजचे नाव वाशीम) येथे झाला असावा. त्याने विदर्भ व कुंतल प्रांतांचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. तो काव्यमीमांसेत सांगतो की साहित्यवधूने काव्यपुरुषाचे मन आकृष्ट केले व त्या दोघांचा विवाह वत्सगुल्म येथे झाला. विदर्भास तर तो 'सरस्वती जन्मभू' असे संबोधितो. त्याच्या 'कर्पूरमंजरी' या सट्टकाची नायिका ही कुंतलप्रांताची राजकन्या आहे. या दोन्ही प्रांतांविषयी त्याला विलक्षण ओढ आहे. डॉ. मनमोहन घोष इत्यादी विद्वानांच्या मते मध्य प्रांत हा राजशेखराचे जन्मस्थान म्हणून मानण्यात यावा. कारण याने मध्य प्रदेश, पांचाल, कान्यकुब्ज इत्यादी प्रांतांची वर्णने केली आहेत. तसेच त्याच्या प्राकृतावरही शौरसेनीचा विशेष प्रभाव दिसून येतो. स्वतः राजशेखराने आपल्या जन्मभूमीचा निर्देश केलेला नाही. तथापि त्याची विदर्भ प्रांताविषयीची आत्मीयता ध्यानात घेता तो महाराष्ट्रीय असावा, याविषयी शंका वाटत नाही.

राजशेखर हा कान्यकुब्ज नरेशांचा उपाध्याय अथवा कुलगुरू होता. त्यामुळे त्याच्या ब्राह्मणत्वाबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. तथापि अशा उपाध्यायाने क्षत्रिय राजकन्येशी विवाह केल्याबद्दल अनेकांना आश्चर्य वाटले आहे. म्हणून राजशेखर क्षत्रिय असावा असेही काहींनी म्हटले आहे. पण या मतात तथ्य नाही. त्या काळी अनुलोम विवाह प्रचलित होते व धर्माचीही फारशी आडकाठी नव्हती. तेव्हा राजशेखर ब्राह्मण होता, हे मत योग्य आहे.

तो अत्यंत प्रतिभासंपन्न कवी आहे. व्युत्पन्न असा काव्यमीमांसक आहे. संस्कृत-प्राकृत भाषावर त्याचे प्रभुत्व आहे. त्याने विविध शास्त्रांचा अभ्यास केलेला आहे. त्याचे इतिहास-पुराणाचे ज्ञानही अचंबा वाटायला लावणारे आहे. त्याची 'कविराज' ही पदवी अत्यंत सार्थ आहे. त्याने विपुल लिखाण केले आहे. बालरामायण, बालभारत ही नाटके, कर्पूरमंजरी हे सट्टक, विद्धशालभंजिका ही नाटिका व काव्यमीमांसा हा साहित्यशास्त्रावरील उत्कृष्ट पण अपूर्ण राहिलेला ग्रंथ ही त्याची प्रमुख रचना असावी व त्यांचा क्रमही वर दिल्याप्रमाणेच असावा.

हेमचंद्राने त्याच्या 'हरविलास' या काव्याचा नामपूर्वक उल्लेख करून त्यातील दोन श्लोक उद्धृत केले आहेत. तसेच तेराव्या शतकात होऊन गेलेल्या उज्ज्वलदत्त या वैयाकरणाने यातील एक श्लोक उद्धृत केला आहे. स्वतः राजशेखरानेच

आपल्या काव्यमीमांसेच्या १७ व्या व १८ व्या अध्यायात देश-कालाची माहिती देत असता अधिक माहितीसाठी आपला 'भुवनकोश' हा ग्रंथ पाहावा, असे म्हटले आहे. तथापि म.म. डॉ. वा.वि.मिराशी यांच्या मते हा स्वतंत्र ग्रंथ नसून काव्यमीमांसेचाच अखेरचा अध्याय असावा. आपल्या 'बालरामायण' या नाटकाच्या प्रस्तावनेत त्याने षट्-प्रबंधाचा उल्लेख केला आहे. 'भुवनकोश' व 'षट्प्रबंध' हे दोन्ही ग्रंथ आज उपलब्ध नाहीत त्यामुळे त्यांच्याविषयी काही सांगता येत नाही.

कृष्णम्माचार्यांनी आपल्या 'अभिजात संस्कृत वाङमयाचा इतिहास' या इंग्रजी ग्रंथात राजशेखराने 'रत्नमंजरी' नामक नाटिका व 'अष्टपत्रदलकमल' अशी दोन पुस्तके रचली होती, असे म्हटले आहे. पण तीही उपलब्ध नाहीत. कवि-विमर्श नावाचे एक चोपडे राजशेखराच्या नावावर नमूद आहे. यात प्रियदर्शिका, रत्नावली व नागानंद ही नाटके भासाची असल्याचा उल्लेख आहे. 'श्रीहर्षा'वरील विवेचनात या मताचा मागे परामर्श घेतलेला आहे. हे चोपडे लिहिणारा राजशेखर अर्थात प्रस्तुत राजशेखराहून भिन्न आहे. सुभाषितावलि, शाङ्‌र्गधर पद्धती, सदुक्तिकर्णामृत इत्यादी सुभाषित संग्रहात राजशेखराच्या नावावर अनेक श्लोक आढळतात. पण ते त्याच्या उपलब्ध कृतीत मिळत नाहीत. एकतर ते त्याच्या अनुपलब्ध कृतीतील असतील किंवा दुसऱ्या राजशेखर नामक कवीचे असतील असे म्हणता येईल. तेव्हा तर नमूद केलेली पाच पुस्तके हीच राजशेखराची ग्रंथसंपदा आहे, असे म्हणण्यास हरकत नाही.

* * *

राजशेखराचा कालनिर्णय करणे फारसे कठीण नाही. पूर्वी याच्या कालाविषयी अनेक मते होती. श्री. आनंदराम बरुआ यांनी राजशेखरास शंकराचार्यांच्या समकालीन मानून त्याचा काळ इसवी सनाचे सातवे शतक असा निश्चित केला होता. क्षीरस्वामीच्या अमरकोशावरील टीकेत विद्धशालभंजिकेतील एक श्लोक दिसताच डॉ. पीटरसन व डॉ. कनिंगहॅम यांनी हा क्षीरस्वामी जयापीडाचा गुरू समजून राजशेखर इ.स. ७५० च्या अगोदर होऊन गेला असा निर्णय केला. ही एक तऱ्हा तर प्रो. मॅक्समुल्लर यांनी राजशेखराने 'प्रबंधकोश' रचला आहे या समजुतीने त्याला तेराव्या शतकात ढकलले आहे. पण ही सगळी मते आता गतार्थ झाली आहेत.

त्याचा आश्रयदाता महेंद्रपाल (इ.स.८९० ते ९१०) हा आपला पिता भोज अथवा मिहीरभोज याच्या मृत्यूनंतर गादीवर आला. याच्या आईचे नाव

चंद्रभट्टारिका देवी होते. महेंद्रपालाची राजधानी कान्यकुब्ज अथवा कनोज ही होती. राजशेखर हा याच्या आश्रयास असला तरी त्याचा गुरू होता. राजशेखराने आपल्या बालरामायण व कर्पूरमंजरीमध्ये महेंद्रपालाचा उल्लेख निर्भरराज (किंवा निर्भयराज) असा केला आहे. डॉ. बी. एन. पुरी यांच्या मते महेंद्रपाल इ.स.९१० च्या सुमारास मरण पावला त्यानंतर महीपाल अथवा क्षितिपाल हा गादीवर आला. राजशेखराने याचा आपल्या 'बालभारत' या नाटकात स्पष्ट नामोल्लेख केला आहे. महीपाल हा इ.स.९३१ पर्यंत राज्यावर होता. राजशेखर हा या दोन्ही राजांच्या आश्रयास असल्याने तो इ.स. ८६० ते ९३० च्या दरम्यान होऊन गेला असे निश्चितपणे म्हणता येते. या कालनिर्णयास पुष्टी देणारी प्रमाणे खाली दिली आहेत.

(१) 'दशरूपक'कार धनंजयाने (इ.स.९७४ ते १०००) राजशेखराच्या कर्पूरमंजरीतील 'रण्डा चण्डा दिख्खिदा धम्मदारा' (कूर्पर १.२३) व विद्धशालभंजिकेमधील 'सुधाबद्धग्रासैरुपवन चकोरैः' (विद्ध. १.३१) हे श्लोक उद्धृत केले आहेत. याखेरीज अभिनवगुप्त, कुंतल व क्षेमेंद्र यांनीही राजशेखराचा उल्लेख केला आहे. हे सारे अकराव्या शतकाच्या पूर्वार्धामधील लेखक आहेत. तेव्हा राजशेखर हा वरील लेखकांच्या अगोदर होऊन गेला हे स्पष्ट आहे.

(२) साहित्यशास्त्रकारांप्रमाणेच सोमदेव व सोढल या कवींनीही राजशेखराचा नामोल्लेख केलेला आहे. 'यशस्तिलकचम्पू'कार सोमदेव (इ.स.९६०) याने प्रस्तुत ग्रंथात राजशेखराचा स्पष्ट नामोल्लेख केला आहे. तसेच त्याच्या जवळजवळ समकालीन असणाऱ्या 'उदयसुंदरी'कार सोढलानेही उल्लेख केलेला आहे. तेव्हा इ.स.९६० ही त्याच्या कालाची उत्तर मर्यादा ठरते.

(३) स्वतः राजशेखराने आपल्या 'बालरामायण' या दशांकी नाटकाच्या प्रस्तावनेत आपण पूर्वजन्मात वाल्मीकी-भर्तृमेण्ठ व त्यानंतर भवभूती यांच्या रूपात अवतरल्याची शेखी मिरविली आहे. सूत्रधार म्हणतो -

''बभूव वल्मीकभवः कविः पुरा ततः प्रपेदे भुवि भर्तृमेण्ठताम् ।
स्थितः पुनर्यो भवभूतिरेखया स वर्तते सम्प्रति राजशेखरः ॥

(बाल रामा. अंक १ श्लोक १६)

वाल्मीकी ऋषींचे 'रामायण' हे आदिकाव्य सर्वप्रथम आहे. पण नंतरच्या भर्तृमेण्ढ कवीबद्दल माहिती मिळत नाही. त्याने 'हयग्रीववध' नामक काव्य लिहिल्याचा उल्लेख आढळतो. त्यातील काही श्लोक अलंकारशास्त्रावरील ग्रंथात

घेतले आहेत. उदा. 'विनिर्गतं मानदमात्ममन्दिरात' हा श्लोक मम्मटाच्या काव्यप्रकाशात उद्धृत केलेला आहे. वर दिलेल्या क्रमावरून भर्तृमेंठ हा भवभूतीपूर्वी (इ.स.७००) होऊन गेलेला दिसतो. याच्या काव्याविषयी म.म. डॉ. वा. वि. मिराशी लिहितात - ''हे काव्य इतके रसभरीत होते की ते वाचले जात असता त्याचा रस गळून जाऊ नये म्हणून तत्कालीन काश्मीरचा राजा मातृगुप्त याने त्या ग्रंथाच्या खाली सोन्याची थाळी ठेवली होती. अशी आख्यायिका 'राजतरंगिणी' त दिली आहे. (पाहा. भवभूति पृष्ठ ३६४)

याशिवाय त्याने भारवी, बाणभट्ट, वाक्पतिराज, अमरु, भट्टनारायण (इ.स.७५०) इत्यादी कवींचे व उद्भट (इ.स.८००) व आनंदवर्धन (इ.स.८५०) या काव्यमीमांसकाचे नामोल्लेख केलेले आहेत. चंडकौशिक नाटकाचा कर्ता क्षेमीश्वर, 'मृगांकलेखा'कार अपराजित व कृष्णशंकरशर्मा हे लेखक त्याचे समकालीन होते. त्याने आपल्या नाटकाच्या प्रस्तावनेत त्यांचा उल्लेख केला आहे. यावरून इ.स.८५० ही त्याच्या काळाची पूर्वमर्यादा ठरते. तेव्हा राजशेखर हा इ.स.८८० ते ९३० च्या दरम्यान होऊन गेला. असे नि:शंकपणे म्हणता येईल.

* * *

त्याच्या वाङ्मयकृतीतील चार नाटकांचा आता क्रमाने विचार करू.

## बालरामायण

हे दशांकी महानाटक असून यात सीता स्वयंवरापासून तो थेट सीतेच्या अग्निपरिशुद्धीपर्यंतचा कथाभाग आलेला आहे. उत्कृष्ट कविवाणीचा जयजयकार करून कवीने नाटकास प्रारंभ केला आहे. प्रस्तावनेत स्वत:विषयी माहिती देताना कवीने आपल्या यायावर कुलाचा, अकालजलद, सुरानंद इत्यादी पूर्वजांचा उल्लेख केला आहे. आपण स्वत: पूर्वजन्मी वाल्मीकी, भर्तृमेंठ व भवभूती असल्याचे सांगितले आहे. इतकेच नव्हे तर शंकरवर्मा या त्याच्या समकालीन कवीने रचलेले व ज्यात राजशेखराचा गुणगौरव आहे असे दोन श्लोक उद्धृत केले आहेत. प्रस्तावनेनंतर नाटकास सुरवात झाली आहे. प्रारंभी मिश्र विष्कंभकामध्ये शुन:शेप व तापस वेषधारी राक्षस यांचा संवाद आहे. त्यावरून

विश्वामित्र हे राक्षसांपासून यज्ञयागाचे रक्षण करण्यासाठी राम-लक्ष्मणांना आणण्यासाठी अयोध्येस गेले आहेत हे समजते. तसेच सीतेच्या स्वयंवरात शिवधनुष्यावर दोरी चढवण्याचा पण लावलेला आहे. या स्वयंवरास रावण येणार आहे. त्याने आपल्या मायामय नामक राक्षसास परशुरामाकडे त्याचा परशू आणण्यासाठी पाठवले आहे.

मुख्य प्रवेशात रावण मिथिलेला येतो. त्याला पाहून सीता दुःखी होते. शिवधनुष्य रावणासमोर आणण्यात येते. पण त्या जीर्ण धनुष्यास दोर लावण्यात रावणाला कमीपणा वाटतो. त्यामुळे तो धनुष्य टाकून देतो. धनुष्याचा अपमान झालेला पाहून जनकाला संताप येतो. तो रावणाला शस्त्र घेऊन व शाप देऊन शासन करण्याचे ठरवतो. पण शतानंद त्यास शांत करतो. मग रावण तेथेच 'जो कोणी या धनुष्यास दोरी लावून सीतेला जिंकून घेईल त्याला मी माझ्या चंद्रहास खड्गाने कंठस्नान घालीन' अशी प्रतिज्ञा करून तो निघून जातो. (अंक पहिला)

रावणाने शिवधनुष्याचा अपमान केल्याची वार्ता परशुरामास समजते. तेव्हा तो संतापतो. आधीच रावणाने त्याचा परशू मागून त्याला डिवचलेले असते. त्यामुळे तो रावणाशी लढण्यासाठी मिथिलेत येतो. इकडे रावण मात्र सीतेचे स्मरण करीत असतो. मायामय राक्षस येऊन रावणाला सांगतो की परशुरामाने आपला परशू दिला नाही. हे सांगत असताच परशुराम आपल्या माठर नामक शिष्यासमवेत त्या ठिकाणी येतो. त्याचे व रावणाचे भांडण सुरू होते. दोघेही भगवान शंकराचे भक्त असूनदेखील एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढू लागतात. आत्मप्रशंसा व परनिंदा यांनीच हे भांडण भरलेले आहे. दोघे युद्धास सज्ज होतात. रावण पुष्पक विमान मागवून त्यावर आरूढ होतो. इतक्यात शंकराचा भृंगिरिटी नावाचा गण येऊन दोघांचे युद्ध थांबवतो. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस मिश्रविष्कंभक आहे. गृध्रमिथुनाच्या संवादातून ताडकेचा वध, रामलक्ष्मणाचे विश्वामित्रासह मिथिलानगरीस गमन, रामाने शिवधनुष्याचा भंग करून सीतेची करून घेतलेली प्राप्ती इत्यादी हकीकत सांगितली आहे. भरतमुनींनी सीता-स्वयंवरावर नवीन नाटक रचून त्याचा स्वर्गात प्रयोग केला. तो प्रयोग पाहण्याची रावणाने इच्छा व्यक्त केली असून त्यानुसार भरतपुत्र व अप्सरा लंकेकडे निघाले आहेत.

मुख्य प्रवेशात रावणासाठी सीता-स्वयंवर नाटकाचा प्रयोग दाखविण्यात येत आहे. तो कथाभाग गर्भांकात घातलेला आहे. रावण हा सीतेची प्राप्ती न

झाल्याने अगदी बेचैन झालेला आहे. गर्भनाटकात विश्वामित्रासमवेत राम-लक्ष्मण प्रवेश करतात. स्वयंवरात नाना प्रांतांतून राजे आलेले आहेत. या राजांचे सूक्ष्म वर्णन केलेले आहे. अनेक राजे शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न करतात पण त्यांना यश येत नाही हे पाहून रावण त्यांची टिंगल करतो. अखेरीस राम पुढे येतो. धनुष्य उभे करून त्यावर दोर चढवू लागताच ते एकाएकी मोडते. रामाने सीतेला स्वयंवरात जिंकल्याचे पाहताच रावण खवळून उठतो. तेव्हा प्रतिहारी 'हे सारे नाटक आहे.' असे सांगून त्यास शांत करते. त्यानंतर संध्याकाळ झाल्याची सूचना मिळताच रावण आपल्या वाड्यात परत जातो. (अंक तिसरा)

चौथ्या अंकाच्या प्रारंभी मिश्र-विष्कंभक असून त्यात एक उपाध्याय व परशुरामाचा भवभूती नामक शिष्य यांचा संवाद आहे. हा शिष्य विद्याग्रहण करण्यासाठी आला असल्याचे पाहून उपाध्यायास नवल वाटते. तेव्हा तो शिष्य सांगतो की शिवधनुष्याचा भंग केल्यामुळे परशुराम रामावर संतापला आहे व त्याच्याशी युद्ध करण्यासाठी मिथिलेकडे निघाला आहे. मुख्य प्रवेशात दशरथ इंद्राला साह्य करून इंद्राच्याच रथातून पृथ्वीवर परत येत आहे. तसेच राम व सीता यांचा विवाह संपन्न झाला असून ते सारे जण आता अयोध्येस जाण्याच्या तयारीत आहेत. गुरुजन सीतेला विवाहोत्तर स्त्रीच्या कर्तव्याचा उपदेश करीत आहेत. शतानंद म्हणतो -

"हे सीतादेवी, पतीवर निर्व्याज प्रेम कर. नणंदांशी नम्रतेने वाग. सासूविषयी पूज्यभाव ठेव. नातेवाइकांशी प्रेमाने वाग. नोकरांना मायेने वागव आणि सवतीशी हसतमुखाने व्यवहार कर. पतीच्या मित्राबरोबर गोडीगुलाबीने वर्तन कर. तर त्याच्या शत्रूबाबत खिन्नता धारण कर. असे वर्तन म्हणजे पतीला वश करण्याचे औषधच आहे."

(अंक ४, श्लोक ४४)

या वेळी परशुराम त्या ठिकाणी येतो. तो रागाने रामावर आरोप करतो. पण राम अत्यंत नम्रतापूर्वक त्याचे स्वागत करतो. विश्वामित्र वगैरे वडील मंडळी परशुरामाला शांत होण्याची विनंती करतात पण तो ऐकत नाही. तो रामाला आपल्या वैष्णव धनुष्यावर दोरी चढवण्यास सांगतो. तेव्हा रामाऐवजी लक्ष्मण पुढे होतो व धनुष्यावर दोरी चढवून दाखवतो. त्याबरोबर जनक आपली कन्या उर्मिला लक्ष्मणास प्रदान करतो. तसेच जनकाचा भाऊ कुशध्वज याच्या मांडवी व श्रुतकीर्ती या दोन कन्या भरत व शत्रुघ्न यांना देऊ केल्या जातात. इतके झाले

तरी परशुराम आपला हेका सोडत नाही. अखेरीस राम व परशुराम युद्ध करण्यासाठी रणांगणावर जातात. (अंक चौथा)

पाचव्या अंकाच्या प्रारंभी विष्कंभक आहे. मायामय नावाच्या राक्षसास रावणाने रामाकडून सीतेला घेऊन येण्याचा आदेश दिला आहे. त्या राक्षसाची माल्यवानाशी भेट होते. रावणाच्या करमणुकीसाठी यंत्रजानकी व सिंदूरिका अशा दोन बाहुल्या तयार करण्यात आल्या आहेत. माल्यवानाच्या हातांत मिथिलेत राहात असलेल्या एका हेराचे पत्र आहे. त्या पत्रात राम व परशुराम यांच्यात घनघोर युद्ध होऊन शेवटी रामाने परशुरामास पराभूत केल्याचा वृत्तांत आहे. मुख्य प्रवेशातं रावण येतो. सीतेच्या प्राप्तीसाठी तो अगदी व्याकुळ झाला आहे. इतक्यात दोन बोलक्या बाहुल्या घेऊन मायामय येतो. त्या बाहुल्या अगदी सजीव वाटाव्यात इतक्या हुबेहूब असतात. त्यामुळे रावणाची फसगत होते. तो दोघींशी संभाषण करू लागतो. त्या दोघीही बोलू लागतात. सीतेला बाहुपाशात घेण्यासाठी रावण पुढे होतो. बाहुलीचा स्पर्श होताच त्याला आपली फसगत झाल्याचे समजते. मायामय दोन्ही बाहुल्या घेऊन निघून जातो. मग रावण आपले मन रमविण्यासाठी लीलोद्यानात जातो. मग त्याची सेवा करण्यासाठी सहाही ऋतू क्रमाक्रमाने प्रवेश करतात. ते निघून गेल्यावर हिमालय, मंदार, मलय व नेपाल येथील पर्वतांच्या स्त्रिया येतात. रंभा-मेनकादी अप्सरा येतातं. तापी, कावेरी, मुरला इत्यादी नद्या स्त्रीरूपाने प्रवेश करतात. लक्ष्मी, सरस्वती, वारुणी वगैरे देवता येतात. पण कोणाच्याही उपचाराने रावणाच्या मनातील कामसंताप दूर होत नाही. तो साऱ्यांना निरोप देतो.

इतक्यात नाक-कान कापून विद्रूप केलेली शूर्पणखा तेथे येते व रावणाच्या पायावर कोसळते. बहिणीची दशा पाहून रावण खवळतो व रामावर सूड उगवण्याची प्रतिज्ञा करतो. (अंक पाचवा)

सहाव्या अंकाच्या प्रारंभी मिश्र-विष्कंभक असून त्यात मायामय राक्षस व शूर्पणखा यांचा संवाद घातलेला आहे. त्यांच्या संवादावरून माल्यवानाच्या सूचनेप्रमाणे मायामय व शूर्पणखा यांनी दशरथ व कैकेयीचे रूप घेऊन अयोध्येत प्रवेश केला. त्या वेळी खरे दशरथ व कैकेयी हे इंद्राला मदत करण्यासाठी स्वर्गात गेले होते. मायावी कैकेयीने मायावी दशरथास रामास वनात पाठविण्याची मागणी केली. ही राक्षसांची माया आहे हे समजले तरी व लोकांनी त्याने वनात जाऊ नये म्हणून आग्रह धरला तरी राम सीता व लक्ष्मण यांच्या समवेत वनात गेला आहे. मुख्य प्रवेशात खरे दशरथ व कैकेयी स्वर्गातून परत येतात. त्यांना

रामाच्या वनवासाची वार्ता समजताच धक्काच बसतो. नंतर सुमंत्र येऊन रामाचा वनातील समाचार सांगतो.

इतक्यात आकाशमार्गाने जटायूचा रत्नशिखंड नावाचा दूत येतो व तो खाली उतरतो. रावणाच्या तलवारीच्या फटक्याने त्याचे पंख जखमी झालेले आहेत. तो आपल्या आगमनाची वार्ता देतो. जटायूचा दूत आल्याचे समजताच दशरथ त्यांना रामाचे कुशल विचारतो. त्या वेळी तो रावणाने सीतेला पळवून नेल्याची व तसेच जटायूचा वध केल्याची अत्यंत दु:ख देणारी वार्ता सांगतो. ही बातमी ऐकताच दशरथ गंगा-यमुनेचा संगम असलेल्या प्रयाग क्षेत्रात प्राण देण्याचे ठरवतो. (अंक सहावा)

सातव्या अंकातील मिश्र-विष्कंभकात दोन वैतालिकांचे संभाषण आहे. दशरथाच्या मृत्यूची वार्ता रामाला समजलेली आहे. तसेच रामाने वालीचा वध करून सुग्रीवाशी मैत्री केली आहे. आता समुद्रावर सेतू बांधण्याचे ठरले आहे. रामाने समुद्रावर अग्निबाण सोडताच तो शरण येतो. मग सेतू बांधण्याचे काम सुरू होते. त्या कामात विघ्न आणण्यासाठी राक्षसांचे सैन्य येते. राम त्या राक्षससेनेचा नाश करतो. इतक्यात सीतेचे मस्तक रामाच्या समोर येऊन पडते. ते पाहताच राम शोकाकुल व संतप्त होतो. पण ते मस्तक मायावी असते. त्यातील सारिका खरी हकीकत सांगते. तेव्हा रामाला हायसे वाटते. त्यानंतर सिंहनाद नावाचा एक भयंकर राक्षस लढाई करण्यास येतो. राम त्यास नगरीपासून दूर अंतरावर युद्ध करण्यात यावे अशी सूचना करतो. (अंक सातवा)

आठव्या अंकाच्या प्रारंभी मिश्र विष्कंभक आहे. सुमुख आणि दुर्मुख या दोन राक्षसांच्या संवादातून मागच्या अंकाच्या शेवटी लढाईस प्रवृत्त झालेल्या रावणपुत्र सिंहनादाचा वध झाल्याचे समजते. मग रावणाने तुला-युद्धाचा प्रस्ताव पुढे केला. त्या प्रस्तावानुसार रामाकडील एक व रावणाकडील एक अशा दोनच वीरात परस्पर युद्ध होईल व त्या युद्धाचा निकाल अंतिम मानण्यात येईल. रावणाचे शब्द याप्रमाणे आहेत -

"हे रामा, तुझा प्रतिनिधी जर विजयी झाला तर ही लंका व सीता तुझी होईल आणि जर माझा प्रतिनिधी विजयी झाला तर अयोध्यानगरी व इतर गोष्टींवर माझे स्वामित्व राहिल."

(अंक ८, श्लोक २)

लक्ष्मण, सुग्रीव, मारुती इत्यादि वीर 'नको-नको' म्हणत असताना रामाने सदर प्रस्ताव मान्य केला व प्रतिनिधी म्हणून अंगदाची निवड केली. रावणाने

नरांतक नामक राक्षसाची निवड केली. यानंतर त्रिजटा तेथे येते व अंगद व नरांतकाच्या युद्धाची वार्ता विचारते. तेव्हा ते दोघे युद्धाचा समाचार सांगतात. तो याप्रमाणे - अंगद व नरांतक आपल्या हातात उग्र दिसणारे खड्ग घेऊन रणभूमीवर आले व प्राणपणाने एकमेकावर प्रहार करू लागले. एवढ्यात अंगदाने आपल्या कट्यारीने नरांतकाच्या गळ्यावर आघात केला. त्याबरोबर तो राक्षसांचा प्रतिनिधी जमिनीवर कोसळला. वानरसेनेने जयघोष केला. राक्षसांची तोंडे काळीठिक्कर पडली.

खरे तर तुलायुद्धाच्या नियमानुसार रावणाने युद्ध संपवायला हवे होते. पण त्याने ते चालू ठेवले. 'रावणाने लाजेला जलांजली दिली' असे सार्थ उद्‌गार त्रिजटेने काढले आहेत. मग रावणाने कुंभकर्णाला जागे करण्याचा प्रयत्न केला. त्रिजटा हा वृत्तांत सीतेला सांगण्यासाठी निघून जाते.

मुख्य प्रवेशात रावण येतो. क्षुद्र राक्षसांच्या वधाने देव आनंदित झाल्याचे पाहून त्याला नवल वाटते. देव रावणाचा पराक्रम विसरले की काय? आता मेघनादाला बोलावले आहे. कुंभकर्णाला जागे केले जाणार आहे. यानंतर मेघनादाचे लक्ष्मणाशी व कुंभकर्णाचे रामाशी युद्ध सुरू होते. हे युद्ध रावणास दिसत आहे व त्याचे दूत वर्णन करून सांगत आहेत. घनघोर युद्धात राम कुंभकर्णाचे हात तोडून शिरच्छेद करतो तर शूलपाणी शंकराचे ध्यान करून लक्ष्मणाने सोडलेल्या अग्नीने इंद्रजित भस्मसात होतो. हा धक्का रावणाला सोसत नाही. तो मूर्च्छित होतो. (अंक आठवा)

नवव्या अंकाच्या सुरुवातीस शुद्ध विष्कंभक असून प्रथम यमाचा दूत प्रवेश करतो. तो सांगतो की लंकेत घडलेल्या घटनांची माहिती मिळवण्यासाठी लंका-पट तयार करण्यात आला आहे. त्यात कोणत्या वीराने कोणाला ठार केले व राम आणि रावण यांच्यातील युद्धाचा काय परिणाम होणार आहे ते सांगितले आहे. त्या माहितीवरून हे युद्ध एकंदर पाच दिवस होणार असून पाचव्या दिवशी राम हा रावणास ठार मारणार आहे.

मुख्य प्रवेशात इंद्र, दशरथ व दोन भाट येतात. नंतर राम व रावण दोघेही युद्ध करण्यासाठी रणभूमीवर उतरतात. तिघांच्या संवादातून या युद्धाचे वर्णन ऐकवले आहे. सुरुवातीलाच राम रावणास सीतेला परत करण्यास सांगतो. अन्यथा इतर राक्षसांप्रमाणे त्याचीही अवस्था झाल्याखेरीज राहणार नाही. पण रावण या धमकीला दाद देत नाही. लवकरच दोघांचे युद्ध सुरू होते. ते युद्ध पाहात असताना

दशरथास भान उरत नाही. तो आपले धनुष्य मागतो. पण इंद्र त्याला शांत करतो. रावण आपल्या दहा धनुष्यांतून रामाच्या एका मस्तकावर बाण सोडत होता तर राम एकाच धनुष्यातून रावणाच्या दहा मस्तकांवर बाण सोडत होता. रामाच्या बाणाने रावणाची मस्तके छेदली जात होती पण पुन्हा येऊन बसत होती. शेवटी त्याने मायाहर अस्त्राची योजना केली व ब्रह्मास्त्र सोडून त्याची सारी मस्तके तोडली. रावण खाली कोसळतो व देवता आकाशातून रामावर पुष्पवृष्टी करू लागतात. (अंक नववा)

दहाव्या अंकाच्या मिश्र-विष्कंभकात प्रारंभी शोकाकुल लंकानगरी प्रवेश करते. तिचे सांत्वन करण्यासाठी अलकानगरी येते. दोघींच्या संवादप्रसंगी पडद्यात घोषणा होते. सीता अग्नीत प्रवेश करणार आहे. तिच्या रक्षणासाठी पार्वती, लक्ष्मी, सरस्वती इत्यादी देवतांना आवाहन करण्यात येते. सीता अग्नीत प्रवेश करते व काही वेळाने सुखरूपपणे बाहेर येते.

मुख्य प्रवेशात राम, लक्ष्मण, सीता, त्रिजटा, सुग्रीव व बिभीषण हे सारे पुष्पक विमानात बसून अयोध्येकडे येऊ लागतात. इंद्राच्या आदेशानुसार रत्नशेखर नावाचा विद्याधर भूप्रदेशांची माहिती देण्यासाठी त्याच्याकडे येतो. आता लंकेकडून अयोध्येकडे येणारे विमान आपला प्रवासमार्ग बदलून प्रथम हिमालयाकडे येते. हिमालय, कैलास, मंदार, मेरू या मार्गांनी ते अमरावती, चंद्रलोक व ब्रह्मलोकावर जाते व पुन्हा खाली येते. मग मलय, ताम्रपर्णी नदी या मार्गाने अगस्तीच्या आश्रमाकडे येते. तेथे उतरून ऋषींना वंदन करून ते पुन्हा निघतात. केरळ, कर्नाटक, आंध्र, महाराष्ट्र, लाट, माळवा, उज्जयिनी, पांचाल, प्रयाग, वाराणसी, मिथिला या मार्गाने अयोध्येस येते.

तेथे भरत, शत्रुघ्न व वसिष्ठ ऋषी त्यांचे स्वागत करतात. त्यानंतर रामाला राज्याभिषेक होतो. कुबेर रामाकडे पुष्पक विमानाची मागणी करतो व राम ते त्यास देऊन टाकतो. शेवटी भरतवाक्य होऊन नाटक समाप्त होते. (अंक दहावा)

* * *

बालरामायणाची कथावस्तू वाल्मीकि-रामायणावर आधारलेली आहे. हे सांगायला नको. स्वत: कवीनेही वाल्मीकीचे स्मरण केले आहे. पण या रामायण कथेत राजशेखराने अनेक लहान-मोठे बदल केले आहेत. काही प्रसंग नव्याने रचून घातले आहेत. उदा. -

(१) मायामय राक्षस व शूर्पणखा हे दशरथ व कैकेयीच्या गैरहजेरीत अयोध्येत येतात व राम-लक्ष्मण-सीता यांना वनवासात पाठवतात. रामही त्यांचे कपट समजले तरी वनात जातो. हा प्रसंग नव्याने रचण्याचा उद्देश रामाला वनवासात पाठविण्याचा दोष जो दशरथ व कैकेयी यांना लागलेला आहे त्यातून त्यांना मुक्त करणे हा आहे.

(२) रावणाने शिवधनुष्याचा अपमान करणे व त्या निमित्ताने रावण व परशुराम यांच्यात झगडा होणे, हा भाग नव्याने घातला आहे. रामायणात यास आधार नाही.

(३) सर्वात महत्त्वाचा प्रसंग म्हणजे तुला-युद्धाचा होय. भावी-संहार टाळण्यासाठी रावणाने रामासमोर तुला-युद्धाचा प्रस्ताव मांडलेला आहे. रावणाकडचा एक वीर व रामाकडचा एक वीर यांच्यात द्वन्द्व करावयाचे व रामाचा वीर विजयी होईल तर लंकेचे राज्य रामाला द्यावयाचे व रावणाचा वीर विजयी झाल्यास सीता व अयोध्येचे राज्य रावणाला द्यावयाचे. रामही या प्रस्तावास मान्यता देतो. त्याप्रमाणे सिंहनाद व अंगद यांच्यात युद्ध होते. सिंहनाद त्यात मारला जातो. पण रावण आपला शब्द पाळत नाही. हा प्रसंग कोणत्या उद्देशाने घातला आहे हे स्पष्ट नाही.

(४) शेवटचा प्रसंग म्हणजे राम-रावण युद्ध अवघ्या पाच दिवसात संपले असे राजशेखराने दाखवले आहे. वाल्मीकींनी लक्ष्मण व इंद्रजित यांचेच युद्ध तीन दिवस चालले असल्याचे सांगितले आहे.

वास्तविक पाहता मूळ कथानकात असे बदल करण्याचे काही कारण नव्हते. कारण या बदलांनी काहीही साधलेले नाही. या संदर्भात डॉ. गंगासागर राय लिहितात : ''वैसे, यह प्रश्न विचारणीय है कि नाटककारने परिवर्तन कर किस लक्ष्यको प्राप्त किया है। यदि इतने परिवर्तन न कर कथाको मूल रूपमें भी रहने दिया जाता तो नाटकके महत्त्वमें संभवतः अंतर नहीं पडता।'' (बालरामायण : प्रस्ता. पृष्ठ २२)

* * *

राजशेखराने प्रस्तुत नाटकाची रचना करताना भवभूतीचे महावीरचरित व उत्तररामचरित तसेच मुरारीचे अनर्घराघव या नाटकातून उसनवारी केली आहे. तसेच या नाटकाचा विस्तारही खूप मोठा आहे. दहा अंक असलेल्या नाटकात एकूण ७८१ श्लोक आहेत. तसेच प्रस्तावनाही स्वतंत्र अंक वाटावी इतकी

विस्तृत आहे. स्वत: राजशेखराला आपल्या या दोषाची जाणीव असावी असे दिसते. अंक १ श्लोक १२ मध्ये त्याने प्रस्तुत नाटकाच्या विस्तारावर टीका करणाऱ्या लोकांना उत्तर दिले आहे- "जर नाटकात काव्यगुण असतील तर विस्तार हा दोष मानू नये."

पण हे त्याचे म्हणणे पटणारे नाही. राजशेखराला इतिहास-पुराणाचे सूक्ष्म ज्ञान आहे. विद्वत्ताही पहिल्या प्रतीची आहे. पण प्रत्येक बारीक-सारीक गोष्टींचे तपशीलवार वर्णन व संयमाचा अभाव यामुळे अनेक प्रसंग कंटाळवाणे झाले आहेत. वर्णनाच्या भरात तो अक्षरश: वाहावत जातो त्यामुळे त्याचा कथासूत्रावरील ताबा वारंवार सुटतो. सारांश राजशेखराचे हे 'बाल(?) रामायण' हे नाटक महावीरचरित व अनर्घराघव यांच्यापेक्षाही रटाळ झाले आहे.

दुसरे म्हणजे राजशेखराजवळ तारतम्य ओळखण्याची शक्ती नाही. चौथ्या अंकात शतानंद सीतेला आशीर्वाद देताना 'सवतीशी प्रेमाने वाग' असा उपदेश करतो. आता रामाला दुसरी पत्नी नाही हे शतानंदास किंवा खरे तर राजशेखरास ठाऊक नव्हते असे नाही, पण शाकुंतलातील कण्वाने केलेल्या उपदेशाचे अनुकरण करताना त्याला भान राहिले नाही.

तिसऱ्या अंकातील गर्भांकात प्रेक्षक म्हणून आलेल्या राजांच्या वर्णनात नाटककाराने स्वाभाविक व अस्वाभाविक गोष्टींची एकच खिचडी करून टाकली आहे. तसेच शेवटच्या अंकातील प्रवासवर्णन करताना मुरारीप्रमाणे राजशेखरानेही भूगोलास धाब्यावर बसवले आहे.

* * *

यातील व्यक्तिचित्रणे तशी चांगली वठली आहेत. पण राजशेखराला कोणत्याही पात्रात म्हणावा तसा रंग भरता आलेला नाही. नाटकात लहान-मोठी अशी एकंदर सदुसष्ट पात्रे आहेत व त्यात देवता, मनुष्य, राक्षस, ऋषिमुनी व पशु-पक्षी यांचा समावेश आहे. श्री. गंगासागर राय यांनी म्हटल्याप्रमाणे 'बालरामायणात नाटककाराने पात्रांचे नुसते जंगलच उभे केले आहे.' यातील राम, परशुराम, रावण व सीता या प्रमुख पात्रांचे चित्रण थोडक्यात याप्रमाणे -

**राम** : राम हा नाटकाचा नायक आहे व नायकाला शोभतील असे गुण त्याच्या ठिकाणी आहेत. नम्रता हा त्याच्या अंगी असलेला विशेष गुण आहे. त्यामुळेच त्याच्या पराक्रमाला शोभा आली आहे. आपल्यावर क्रुद्ध झालेल्या परशुरामाशी बोलताना त्याने नम्रता सोडलेली नाही. परशुराम युद्धाच्या हट्टालाच

पेटल्यावर रामाचा नाइलाज होतो. परशुरामास पराभूत केल्यावरदेखील तो नम्रतेनेच व्यवहार करतो. समुद्राला शासन करण्यापूर्वी तो त्याला मार्ग देण्याची विनंती करतो. रावणाशी युद्ध करण्यापूर्वीदेखील तो त्याला सीतेला परत पाठवण्याची विनंती करतो. त्याचा पराक्रम वाखाणण्यासारखा आहे. नवव्या अंकात राम-रावणाचे युद्ध चालू असता इंद्र म्हणतो -"रामाचे हे धनुर्विद्येतील प्रावीण्य पाहून मला त्रिपुरासुराचा नाश करणाऱ्या शंकराचीच आठवण झाली."

**परशुराम** : परशुराम हा अत्यंत पराक्रमी पण तितकाच गर्विष्ठ व शीघ्रकोपी आहे. रावणाने शिवधनुष्याचा अपमान केल्याचे समजताच तो रावणाला शासन करण्यास प्रवृत्त होतो पण शंकराच्या गणाच्या मध्यस्थीमुळे दोघातले युद्ध टळते. रामाशी मात्र युद्ध होऊन त्यात तो पराभूत होतो. परशुरामाने कार्तिकेयाचा पराभव केला आहे. कार्तवीर्य सहस्रार्जुनास ठार मारले आहे पण मातृवधाचा कलंक त्याच्या माथ्यावर आहे. आपल्या शौर्याची तो वारंवार बढाई मारताना दिसतो.

**रावण** : परशुरामाप्रमाणे रावणही गर्विष्ठ व असहिष्णू आहे. दोघेही शिवाचे भक्त असूनदेखील त्यांच्यात उत्तम गुणांचा अभाव आहे. रावण तर इतका उर्मट आहे की शिवभक्त असूनही तो पार्वतीस ती स्त्री असल्याने नमस्कार करीत नाही. त्यामुळे तीही त्याला आशीर्वाद देत नाही. रावण सीतेवर मोहित झालेला आहे व त्याचा लंपटपणा हा वीराला शोभणारा नाही. तसेच युद्धापूर्वी रामासमोर त्यानेच तुला युद्धाचा प्रस्ताव मांडलेला आहे. पण त्याचा प्रतिनिधी युद्धात मारला जाताच तो आपले वचन मोडून युद्ध चालूच ठेवतो. असत्य वर्तन, कपटाचरण, गर्विष्ठपणा इत्यादी दुर्गुण त्याच्यात भरलेले आहेत. राजशेखराने रावणाचे वर्णन काळ्या रंगातच केले आहे.

**सीता** : ही आदर्श आर्य स्त्री आहे. रामाबरोबर ती स्वत: होऊन वनवासात येते व तेथील हाल-अपेष्टेचे जीवन धैर्याने सहन करते. ती अत्यंत सुंदर आहे. त्या अनुपम सौंदर्यानेच तिचा घात केला आहे. रावण तिच्या दर्शनानेच घायाळ झालेला आहे. सीतेला वश करण्यासाठी रावण अनेक उपाय करतो पण सीता त्याला बधत नाही. हनुमानाच्या भेटीने तिला आपल्या सुटकेची आशा वाटू लागते. रावणाच्या वधानंतर तिला अग्निदिव्याच्या प्रसंगातून जावे लागते. त्यातूनही ती तावून सुलाखून बाहेर पडते.

* * *

राजशेखर हा अत्यंत प्रतिभासंपन्न कवी आहे. त्याचा शास्त्रकाव्यांचा व्यासंग अचंबित करणारा आहे. संस्कृत भाषेवर त्याचे विलक्षण प्रभुत्व आहे. शार्दूलविक्रीडित, स्रग्धरा यांसारखी विशाल वृत्ते त्याने सफाईने हाताळली आहेत. रामायण कथेत त्याने अनेक लहान मोठ्या प्रसंगांची भर घातली आहे. परंतु एवढे मोठे नाटक रचण्यामागचा त्याचा उद्देश स्पष्ट नाही. रामायण कथेचा कोणता अर्थ त्याला अभिप्रेत आहे ते समजत नाही. भवभूतीची नाटके नजरेसमोर असूनही त्याने इतकी निर्जीव रचना करावी याचे आश्चर्य वाटते.

## बालभारत किंवा प्रचंड-पांडव

बालभारत हे नाटक अपूर्ण आहे. याचे दोनच अंक उपलब्ध आहेत. हे महाभारतातील पांडवांच्या कथेवर आधारलेले आहे. पहिल्या अंकात द्रौपदी-स्वयंवराचा प्रसंग आहे. या निमित्ताने अनेक प्रांतांतील राजे आलेले आहेत. अर्जुन हा मत्स्यभेद करून द्रौपदीला जिंकतो. दुसऱ्या अंकात द्युताचा प्रसंग वर्णन केलेला आहे. युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञात अपमानित झालेल्या दुर्योधनाने मुद्दामच त्याला द्यूत खेळण्याचे निमंत्रण दिले आहे. इच्छा नसतानाही युधिष्ठिर तेथे आलेला आहे. त्या द्युतात तो आपले सारे राज्य, स्वत:सकट चार भाऊ व द्रौपदी यांना गमावून बसतो. भर सभेत द्रौपदीला आणण्यात येते. तिला विवस्त्र करण्याचा दु:शासनाचा प्रयत्न सफल होत नाही. विशेष म्हणजे दुर्योधनाचा भाऊ विकर्ण हा या प्रकरणी कौरवांची निंदा करतो, असे दर्शविले आहे.

या नाटकाचे मुळात दहा अंक असावेत असा तर्क डॉ. विंटरनिट्झ यांनी केला आहे. म्हणजे पांडवांच्या वनवासापासून ते थेट कौरव-पांडवांच्या युद्धानंतर युधिष्ठिर सिंहासनावर बसतो, येथपर्यंतचा सारा कथाभाग नाटककारास अभिप्रेत असावा. राजशेखराने हे नाटक अर्ध्यावरच सोडून दिले आहे की याचे पुढील अंक गहाळ झाले आहेत, हे समजण्यास मार्ग नाही. राजशेखराच्या लेखनपद्धतीचा विचार केला तर नाटक बरेच मोठे झाले असावे असे वाटते.

## कर्पूरमंजरी

नाट्यशास्त्राच्या भाषेत कर्पूरमंजरी (प्रा. कप्पूरमंजरी) हे सट्टक आहे. 'साहित्यदर्पणा'त सांगितल्याप्रमाणे याची रचना संपूर्ण प्राकृत भाषेत आहे.

याचे स्वरूप पुढे स्पष्ट करण्यात येईल. देवी सरस्वती, व्यासादी कवी, रति-मदन व शिवपार्वती यांना वंदन करून नाटककाराने सट्टकास प्रारंभ केला आहे. प्रस्तावनेत स्थापक हा प्रेक्षकांना नाटककाराचा परिचय करून देतो. तसेच कवीची पत्नी अवंतिसुंदरी हिनेच हा प्रयोग सादर केला असल्याचे सांगितले आहे. मुख्य प्रवेशात वसंत ऋतूच्या आगमनाने वातावरण प्रफुल्लित झाले आहे. नाटकाचा नायक राजा चंडपाल (प्रा. चण्डवाल) व राणी विभ्रमलेखा (प्रा. विब्भमलेहा) वसंतोत्सवाच्या निमित्ताने एकमेकाचे अभिनंदन करतात. भाट वसंतऋतूचे वर्णन करतात. राणीची दासी विचक्षणा ही काव्यरचनेत प्रवीण असल्याने राणी तिला वसंताचे वर्णन करण्यास सांगते, तेव्हा ती म्हणते -

''जे लंकेतील पर्वतावरून खाली घसरल्यावर, संभोगक्रीडेने थकलेल्या नागिणीकडून विस्तारलेल्या फणांनी प्राशन केले जाताच अत्यंत क्षीण झाले ते मलयपर्वतावरील वारे आता विरहिणीचा नि:श्वास त्यात मिसळल्यामुळे लहान असूनही एकदम तरुण झाले आहेत.''

(जवनिका १, श्लोक २०)

तिच्या वर्णनावर खूष होऊन राजा तिला श्रेष्ठ कवयित्रीचा दर्जा देतो. त्यामुळे विदूषकाला राग येतो. विचक्षणा त्याची टिंगल करते. दोघांचे भांडण जुंपते. अगदी अश्लील शब्दात दोघे एकमेकाला शिव्या देतात आणि हे सारे राजा-राणी समोर असताना चालते. शेवटी विदूषक संतापून चालता होतो. पण थोड्या वेळाने तोच यांत्रिक भैरवानंद राजाला भेटायला आल्याचे सांगत येतो.

भैरवानंद हा कौलसंप्रदायाचा अनुयायी आहे. त्याला काही सिद्धी अवगत आहेत. तो आपल्याला मंत्र-तंत्र काही ठाऊक नाहीत असे सांगतो. मद्यप्राशन करून बायकांचा उपभोग घेणे एवढेच त्याला माहीत आहे. त्याने एका छिनाल विधवेशी विधिपूर्वक विवाह केला आहे. तो आपल्या संप्रदायाची प्रशंसा करतो. आपल्या सामर्थ्याविषयी तो म्हणतो -

''मी आकाशातील चंद्र पृथ्वीवर आणू शकतो. सूर्याचा रथ अर्ध्या वाटेत रोखू शकतो. यक्ष, देव, सिद्धगण यांच्या स्त्रियांना खाली आणू शकतो. मला साध्य होत नाही असं या जगात काहीही नाही.''

(जवनिका १, श्लोक २५)

मग राजा त्यास विदर्भ देशातील सर्वोत्तम स्त्री (ही वाशिम नगरीतील सुंदरी असते व तिला विदूषकाने पाहिलेले असते) ताबडतोब आणण्यास सांगतो.

त्याबरोबर स्नानोत्तर कपडे परिधान करीत असलेली कप्पूरमंजरी एकाएकी प्रकट होते. सर्वजण तिच्या दर्शनाने चकित होतात. राजा तिच्या अनुपम सौंदर्यावर फिदा होतो. राणी तिला ओळखते, कारण ती तिची मावस बहीण असते. राणी तिला आपल्याकडे आठ-दहा दिवस ठेवून घेण्याचे ठरवते व त्याप्रमाणे भैरवानंदास सांगते. (जवनिका पहिली)

राजाला कर्पूरमंजरी शिवाय काही सुचत नाही. कर्पूरमंजरीही त्याच्या प्रेमात पडलेली आहे. इतकेच नव्हे तर तिने आपल्या भावना व्यक्त करणारे प्रेमपत्र केतकीच्या पानावर लिहून विचक्षणेकडे दिले आहे. विचक्षणा ही हकीकत विदूषकास सांगते. ते पत्र राजाला मिळताच राजा त्यावर काव्यपूर्ण टिप्पणी करतो. त्यानंतर राजा व विचक्षणा स्त्रीसौंदर्याचे मर्म कशात आहे यावर चर्चा करतात. राजा सांगतो की खरे सौंदर्य हे नैसर्गिक असते. कपड्यांचा डामडौल हा व्यर्थ आहे. त्यामुळे खरे सौंदर्य झाकले जाते. हा निर्णय त्याच्या लंपटपणाचे द्योतक आहे हे सांगायला नको.

नंतर राजा प्रमदवनात जातो. तेथे कर्पूरमंजरी झोपाळ्यावर बसून झोके घेत असते. राजा तिच्या कमनीय आकृतीकडे व आकर्षक क्रीडेकडे एकटक पाहात राहतो. तिच्या रूपसौंदर्याचे सूक्ष्म वर्णन करतो. एके ठिकाणी तो म्हणतो -

"हिचे लालसर ओठ, सोन्याप्रमाणे सळसळीत शरीरयष्टी, नव्या चंद्रकोरीची शुभ्रता जिंकणारी नजर, काजळसदृश केशकलाप, हरिणीप्रमाणे चंचल नेत्र असलेल्या हिच्या ठिकाणी मदनाच्या विविध रंगछटा प्रकट झाल्या आहेत. म्हणूनच मदन उद्दाम बनून तरुणांना जिंकण्याच्या कामी यशस्वी होतो, असे मला वाटते."

(जवनिका २, श्लोक ४१)

नंतर विचक्षणा येऊन राजाला सांगते की राणीने कुरबक (म्ह. कोरांटी), तिलक व अशोक या वृक्षांचे दोहद पूर्ण करण्याची कामगिरी कर्पूरमंजरीवर सोपवलेली आहे. मग उत्तम वेशभूषा करून नायिका प्रमदवनात येते. ती कुरबकास आलिंगन देते. तिलकवृक्षाकडे तिरपे कटाक्ष टाकते व अशोकवृक्षावर लत्ताप्रहार करते. त्याबरोबर तीनही वृक्ष फुलतात. तो रमणीय देखावा पाहताच राजाला प्रतिभेचे भरते येते. तो काव्यरचना करू लागतो. इतक्यात संध्याकाळ झाल्याने सर्व जण आपापल्या निवासस्थानाकडे परततात. (जवनिका दुसरी)

यानंतर सुमारे एक महिन्याचा काळ उलटलेला आहे. राजा व विदूषक बोलत असता राजा आपल्या स्वप्नात कर्पूरमंजरी अगदी शय्येजवळ आल्याचे सांगतो. मग विदूषकही आपल्याला पडलेले लांबलचक स्वप्न सांगतो. यानंतर दोघे प्रणयाच्या स्वरूपावर चर्चा करू लागतात. या महिन्याभराच्या अवधीत राणीला राजा व कर्पूरमंजरी यांच्या प्रेमाचा सुगावा लागल्याने तिने कर्पूरमंजरीला कैदेत टाकलेले आहे. राजा व विदूषक त्या कैदखान्याजवळ येतात.

राजाला कर्पूरमंजरीचे आर्त उद्‌गार ऐकू येतात. तो आत जातो व कर्पूरमंजरीला भेटतो. त्याला पाहिल्यावर कर्पूरमंजरीला साक्षात मदन पृथ्वीवर आला आहे की पूर्णचंद्र उगवला आहे याचा संभ्रम पडतो. ती त्याचे स्वागत करते. राजा तिला घेऊन भुयारी मार्गाने प्रमदवनात येतो. कर्पूरमंजरीच्या स्पर्शाच्या लाभाने राजाच्या अंगावर रोमांच उमटतात. उद्यानात दासी, विदूषक चंद्र उगवताच वर्णने करू लागतात. तेव्हा कर्पूरमंजरीची दासी कुरंगिका ही कर्पूरमंजरीने रचलेला चंद्रवर्णनपर श्लोक राजापुढे म्हणून दाखवते -

"हस्तिदंती पिंजऱ्याची शोभा जणू चोरून नेणाऱ्या चंद्राच्या मंडलावर शोभणारा हा कलंकरूपी हरीण क्रीडाकोकिलाशी साम्य धारण करीत आहे."

(जवनिका ३, श्लोक ३१)

तिचा श्लोक ऐकताच राजा उत्स्फूर्तपणे म्हणतो - "वाहवा ! कर्पूरमंजरीचे नवीन अर्थ प्रकट करण्याचे कौशल्य, उक्तीमधील वैचित्र्य, रमणीय शब्दयोजना आणि रसप्रवाह हे सारे अप्रतिम आहे. (राजशेखर या ठिकाणी आपल्या कलाकृतीचीच प्रशंसा करीत आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.)

याचे काव्यगायन चालू असताना, कसे काय कोणास ठाऊक पण राणीला कर्पूरमंजरी कैदखान्यात नसल्याचा सुगावा लागतो व ती नोकरांना उद्यानात पाठवते. तिचा शोध करीत सेवक तेथे येताच कर्पूरमंजरी गडबडीने भुयारी मार्गानेच कारागृहात रवाना होते. (जवनिका तिसरी)

तिसऱ्या जवनिकेनंतर सुमारे महिन्याचा काळ उलटलेला आहे. वटपौर्णिमा आली आहे. राणीला भुयारी मार्गाचा पत्ता लागल्याने तिने तो दगडविटांनी बंद केला आहे. उपद्व्यापी विचक्षणेची हकालपट्टी करण्यात आली आहे. तसेच कारागृहाच्या चारही बाजूंस दासींचा पहारा बसवलेला आहे.

वटपौर्णिमेचा उत्सव सुरू झालेला आहे. त्यात सादर होणारी विविध नृत्ये पाहण्यासाठी राणीने राजाला निमंत्रण दिले आहे. राजा विदूषकासमवेत

राजवाड्याच्या गच्चीवरून उत्सव पाहू लागतो. त्या निमित्ताने नवरसांचा परिपोष करणारी नृत्ये सादर करण्यात येतात, त्यांचे वर्णन विदूषकाच्या मुखाने केले आहे.

यानंतर सारंगिका नावाची एक दासी येऊन राजाला राणीचा निरोप सांगते. राणीने भैरवानंदाच्या सांगण्यावरून गौरीची प्राणप्रतिष्ठा केली, तेव्हा त्याला काही गुरुदक्षिणा द्यावयाचे कबूल केले होते. राजाचा विवाह लाट देशाची राजकन्या घनसारमंजरीबरोबर झाल्यास राजाला चक्रवर्तिपद प्राप्त होणार आहे. राणीची या गोष्टीला संमती मिळाली आहे. राजा लग्नासाठी चामुंडा देवीच्या मंदिराजवळ येतो. राणी त्या ठिकाणी येते, तेव्हा कर्पूरमंजरी भुयारातील मार्गाने येऊन बसलेली असते. त्यामुळे राणी बुचकळ्यात पडते. ती कारागृहाकडे जाते तेव्हा कर्पूरमंजरीही भुयारातून राणीच्या अगोदर कारागृहात जाऊन बसते. राणीला हा घोटाळा समजत नाही. तेव्हा कर्पूरमंजरी व घनसारमंजरी दिसायला अगदी सारख्या असाव्यात अशी ती स्वत:ची समजूत करते. त्यानंतर विवाहविधी सुरू होतो. विदूषक (कपिंजल) हा पुरोहिताचा वेष घेऊन दोघांचे लग्न लावतो. त्या वेळी वधूचे नाव 'कर्पूरमंजरी' असे सांगताच राणीचा संभ्रम दूर होतो. राजा भरतवाक्य म्हणतो व नाटक समाप्त होते. (जवनिका चौथी)

* * *

कर्पूरमंजरीचे कथानक स्वतंत्र दिसत असले तरी राजशेखराने या सट्टकाची कथा कालिदासाचे मालविकाग्निमित्र व श्रीहर्षाच्या प्रियदर्शिका व रत्नावली या नाटकांवरून सरळ-सरळ उचललेली आहे. स्पष्ट सांगायचे झाल्यास हे सट्टक मालविकाग्निमित्र - विशेषत: रत्नावलीचे भ्रष्ट अनुकरण आहे. कथावस्तू व स्वभावचित्रण या दृष्टीने पाहता वरील कृतीपेक्षा किती तरी हिणकस आहे. कथा सरित्सागरातील 'कर्पूरिके'च्या कथानकाशी हिचे साम्य आहे. दंडीच्या दशकुमारातील ऐंद्रजालकाशी भैरवानंदाचे साम्य दिसून येते. पण त्याहीपेक्षा मालती-माधवातील अघोरघंटाशी त्याचे अधिक साम्य आहे. सारांश, राजशेखराने कथा जुळवण्याचेच काम केले आहे.

दंडीच्या 'दशकुमारचरिता'च्या सुरुवातीस 'पूर्वपीठिका' नामक जी प्रस्तावना जोडलेली आहे तिच्या पाचव्या उच्छ्वासात राजवाहनाची कथा आहे. राजवाहनास विश्वेश्वर नामक इंद्रजालक भेटतो. राजवाहनाचे 'अवंतिसुंदरी' नामक मालव राजकन्येवर प्रेम असते. मालवराजाच्या दरबारात हा इंद्रजालक अनेक

दृश्ये दाखवून सर्वांना चकित करतो. प्रयोगाच्या शेवटी आपण एक विवाह समारंभ सादर करणार आहे असे तो जाहीर करतो व सर्वांसमक्ष राजवाहन व अवंतिसुंदरी यांचे लग्न लावून देतो. हा प्रसंग प्रस्तुत सट्टकातील राजा व कर्पूरमंजरी यांच्या लग्नसमारंभाशी ताडून पाहण्यासारखा आहे.

सांगायची गंमत म्हणजे राजशेखराच्या पत्नीचे नाव अवंतिसुंदरी हेच आहे. ती क्षत्रिय कन्या आहे. तेव्हा या दोघांचा प्रेमविवाह झाला असावा, अशी शंका येते. त्यामुळे आपल्या चरित्रातील हा भाग नाटककाराने सदर कलाकृतीत दाखल केला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

* * *

या सट्टकाच्या संविधानकात तसेच त्याने योजलेल्या नाटकतंत्रात अनेक दोष आढळतात. त्यांपैकी ठळक दोषांचा उल्लेख केला आहे.

(१) कर्पूरमंजरी स्नान करून कपडे परिधान करीत असता भैरवानंदाने अचानक तिला चंडपाळ राजाच्या दरबारात उभे केले आहे. तेव्हा ती घाबरल्याचे किंवा भांबावून गेल्याचे दिसत नाही. त्यानंतर राणी विभ्रमलेखा तिला आठ-दहा दिवस ठेवून घेण्याचे ठरवते व भैरवानंदास तशी विनंती करते. पण त्यानंतर ती दोन-अडीच महिने तेथे राहते तरी तिला घरची ओढ लागत नाही किंवा स्त्रीसुलभ भीती वाटत नाही. तिच्या घरची माणसेही तिची चौकशी करीत नाहीत हे सारेच अनाकलनीय आहे.

(२) नाटककाराने कर्पूरमंजरीविषयी सारे काही पहिल्याच जवनिकेत सांगून टाकल्याने कथानकातील सारे औत्सुक्य संपुष्टात आले आहे. मालविकाग्निमित्रात मालविका व रत्नावलीत सागरिका या राजकन्या आहेत व त्या विपरीत दैवामुळे राजाच्या अंत:पुरात राहात आहेत हे रहस्य शेवटी सांगितलेले आहे. त्यामुळे कथानकातील रंगत कायम राहिलेली आहे.

(३) पहिल्या जवनिकेतील विदूषक कपिंजल व दासी विचक्षणा यांच्यातील कलह विनाकारण उद्भवलेला आहे. तो अत्यंत अप्रस्तुत, औचित्यहीन व हिणकस अभिरुचीचा निदर्शक आहे. हा भाग उथळ मनोवृत्तीच्या - आजच्या भाषेत सांगायचे झाल्यास पिटातील - प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी घातलेला असावा. एरव्ही याची संगती लागण्यासारखी नाही.

(४) दुसऱ्या जवनिकेत विदूषक राजाला आपले लांबलचक स्वप्न सांगतो. त्यातील वर्णन हीन दर्जाचे आहे. हा भाग कशासाठी घातला आहे, हेच समजत

नाही. त्याचप्रमाणे राजा आणि विचक्षणा यांच्यात झालेली सौंदर्यविषयक चर्चा अप्रस्तुत आहे. त्या चर्चेचा निष्कर्ष राजाच्या स्त्रीलंपट स्वभावास साजेल असाच आहे. यात पांचटपणाशिवाय काही नाही. तिसऱ्या जवनिकेतील राजा व विदूषक यांच्यातील चर्चा ही अशीच निरर्थक आहे.

(५) राणी विभ्रमलेखा ही भोळसटच दिसते. पहिल्या जवनिकेत कर्पूरमंजरी दिसल्यावर राजाचे मनोविकार तिच्या लक्षात यावयास हवे होते. ती झोपाळ्यावरील क्रीडा व दोहदपूरण ही कामे विश्वासाने कर्पूरमंजरीकडे सोपवते. पण आपला पती कर्पूरमंजरीसाठी झुरत आहे हे काही तिच्या ध्यानात येत नाही. त्यानंतर मात्र ती एकदम नायिकेला तुरुंगात डांबते. या तिच्या वर्तनाची नीट संगती लागत नाही.

(६) कर्पूरमंजरीतील लहान-सहान दोष एकवटून सांगताना प्रा. दि. मो. हातवळणे लिहितात - ‘‘सारांश, कर्पूरमंजरीत कथानकाचे वैचित्र्य नाही अथवा मांडणी नवीन ठशाचीही नाही. वर्णनावर भर दिल्यामुळे संविधानकाची गती ठायी ठायी खुंटलेली आहे. सर्वत्र गतिमानतेचा (Tempo) अभाव जाणवतो. रसनिर्मितीवर नाटककाराला भर द्यावयाचा आहे. पण रसनिर्मिती नाट्यतंत्रानुरूप कथानकाच्या प्रगतीतून किंवा घटनातून साधलेली नसून वर्णनांच्या द्वारा आविष्कृत केली आहे.’’ (कर्पूर-प्रस्तावना पृष्ठ १६)

* * *

सट्टक हा उपरूपकाचा एक प्रकार आहे. प्राचीन शास्त्रकारांनी हा प्रकार सांगितलेला नाही. यावरून तो बराच अर्वाचीन असावा. याचे स्वरूप नाटिकेसारखे असते. सट्टकाची रचना प्रथम राजशेखरानेच केली असावी. घन:शामकृत आनंद-मंजरी, मार्कंडेयाची विलासवती व विश्वेश्वररचित शृंगार मंजरी इत्यादी हाताच्या बोटावर मोजण्याएवढी सट्टके उपलब्ध आहेत. साहित्यदर्पणात सट्टकाची सांगितलेली लक्षणे वरील सट्टके नजरेसमोर ठेवूनच बांधण्यात आली आहेत. स्वत: राजशेखराने सट्टकाचे लक्षण याप्रमाणे दिले आहे.

‘‘सो सट्टओ त्ति भण्णइ दूरं जो णाडिआइ अणुहरइ ।
किं उण पवेस विक्खंभकाइं केवलं पा दीसंति ॥’’

(कर्पूर. १.६)

म्हणजे सट्टकाचे स्वरूप प्राय: नाटिकेसारखेच असते. फक्त यात प्रवेशक व विष्कंभक यांचा अभाव असतो. यातील अंकांना जवनिका असे नाव असते. नाटिकेप्रमाणे चार अंक (म्ह. जवनिका) असतात. याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते संपूर्ण प्राकृतात असते. तसेच 'सट्टअं णच्चिदव्वं' या सूत्रधाराच्या उद्‌गारावरून यात नाच-गाण्याला प्राधान्य असावे असे दिसते. सट्टक या शब्दाचा अर्थ नृत्य करणे असाच होतो. तसेच यात शृंगार हा प्रमुख रस असतो व तो बराच उत्तान व ग्राम्य असतो. कथावस्तू अगदीच सपाट असते. अद्भुताचाही वापर असतो. पात्रांचे स्वभावही सरळसोट असतात. त्याच्या या एकंदर स्वरूपावरून त्याचे लोकनाट्याशी साम्य आढळते. कदाचित सट्टकातूनच आजचे लोकनाट्य उदयाला आले असावे. प्रस्तुतचे सट्टक त्या काळी बरेच लोकप्रिय झाले असावे.

दशरूपकापैकी नाटक व प्रकरण हे दोनच प्रकार शिष्टमान्य झालेले दिसतात. प्रहसन व भाण यात उत्तान शृंगार, हिणकस अभिरुची व टिंगल-टवाळी असल्याने ते बहिष्कृत झाले. डिम, व्यायोग, समवकार, वीथी अंक व ईहामृग हे प्रकार भासाचा अपवाद वगळला तर तुरळकपणे हाताळण्यात आले. म्हणजे एका दृष्टीने ते मागे पडले. प्रयोगप्रधान रंगभूमीवर सवंग लोकप्रियता असलेले प्रकार गाजू लागले. सट्टकाचा उदय म्हणजे एका दृष्टीने संस्कृत भाषेची पीछेहाटच होती. दर्जेदार नाटके पुढे येण्याऐवजी उथळ नाट्यप्रकारांचा सुळसुळाट झाल्याने संस्कृत नाटकांनाच उतरती कळा लागली असे म्हणण्यास हरकत नाही.

* * *

नाटकातील पात्रांचे स्वभावदर्शन अत्यंत ढोबळ आहे. यातील कोणतेही पात्र लक्षात राहण्यासारखे ठसठशीत नाही.

**(१) राजा चंडवाल :** 'मालविकाग्निमित्रा'तील अग्निमित्रासारखाच हा भोगलंपट व निष्क्रिय असा राजा आहे. विदूषकाच्या विनंतीवरून भैरवानंद जेव्हा कर्पूरमंजरीला राजदरबारात उभी करतो तेव्हा राजा तिच्या ओलेत्या सौंदर्याचे राणीसमक्ष वर्णन करतो. प्रेमाची व सौंदर्याची चर्चा करणे, सुंदर स्त्रीला चोरून न्याहाळणे व तिचे अगदी गहिऱ्या शब्दांत वर्णन करणे याशिवाय त्याला दुसरा उद्योग नाही. या कामुक राजाकडून पराक्रम अथवा राजनीतीमधील प्रावीण्य यांची अपेक्षा करण्यात अर्थ नाही. मंत्र्यावर राज्यकारभार सोपवूनच असले राजे अंत:पुरात रममाण झालेले असतात. कालिदासाचा अग्निमित्र निदान राज्यकारभारात निपुण आहे. तो प्रत्यक्ष राजकारणात लक्ष घालताना दिसतो. पण चंडवाल मात्र काही करीत नाही. भैरवानंद, विदूषक व दासी विचक्षणा हे

त्याला प्रेमप्रकरणात मदत करतात. अखेरीस राणीची चक्क फसवणूक करून तो कर्पूरमंजरीशी विवाह करतो. असला राजा लोकनाट्यातच शोभणारा आहे.

**(२) कर्पूरमंजरी :** ही सदर सट्टकाची नायिका अनुपम लावण्यवती आहे. तिच्या सौंदर्याचे दर्शन घडणारे अनेक श्लोक आढळतात. ती हुशार, बोलण्यात चतुर व काव्यरचना करण्यात पटाईत आहे. दुसऱ्या जवनिकेत तिने राजाला प्रेमपत्रच पाठवले आहे. तिसऱ्या जवनिकेत तिने केलेले चंद्राचे वर्णन ऐकून राजा तिची प्रशंसा करतो. तिचे राजावर उत्कट प्रेम आहे. भुयारातून जाताना राजाशी लगट करण्याइतपत ती धीटही आहे. पण भैरवानंदाच्या तालावर नाचणाऱ्या बाहुलीव्यतिरिक्त तिला स्वत:चे व्यक्तिमत्त्व नाही. राणी तिची मावसबहीण असल्याचे तिला माहीत नाही. त्याचप्रमाणे आपण परक्या ठिकाणी आल्याचे तिला भय वाटत नाही. तिचे चंडवालासारख्या प्रौढ राजावर प्रेम का जडावे, हे समजत नाही. सारांश, राजावर चोरून प्रेम करणे, त्याच्यासाठी सतत झुरणे व येन केन प्रकारेण राजाच्या गळ्यात माळ घालणे यापलीकडे ती काही करताना दिसत नाही.

**(३) भैरवानंद :** खरे म्हटले तर भैरवानंद हा कथानकातील सूत्रधार आहे. हा कौलपंथाचा अनुयायी आहे. आपल्याला मंत्रतंत्राचे ज्ञान नाही असे तो सांगतो, पण ते खरे वाटत नाही. त्याला काही सिद्धी अवगत आहेत. त्यांच्या जोरावरच त्याने कर्पूरमंजरीला अगदी स्नानगृहामधून थेट दरबारात आणून उभे केले आहे.मात्र यानंतर त्याला काही चमत्कार करावे लागलेले नाहीत. तो राणीकडून राजाचे घनसारमंजरीशी लग्न लावण्यासाठी संमती घेतो. पण तिला फसवून कर्पूरमंजरीचे राजाशी लग्न लावून देतो. फक्त प्रश्न असा पडतो की, हा भैरवानंद कोण आहे? हा चंडपाल राजाकडे का येतो? राजावर एवढी मेहरबानी का करतो? नाटककाराने याबाबत काहीच खुलासा केला नाही.

**(४) राणी विभ्रमलेखा :** ही राजाची ज्येष्ठ राणी आहे. आपली मावसबहीण नवऱ्याच्या मनात भरलेली आहे हे समजूनदेखील ती गाफील राहते. ती कर्पूरमंजरीकडेच दोलाक्रीडन व वृक्षांचे दोहदपूरण करण्याची कामगिरी सोपवते. उभयतांचे प्रेमप्रकरण वाढीस लागल्यावर ती नायिकेला बंदीत टाकते. पण हा तुरुंग इतका विचित्र आहे की यातील भु यारी मार्गाने कर्पूरमंजरी उद्यानात ये-जा करू शकते. राणी ही विक्रमोर्वशीयातील उर्वशीप्रमाणे धार्मिक आहे. स्वभावाने तशी भोळसट पण आपण होऊन राजाच्या मार्गातून दूर होण्याइतकी उदार

नाही. मालविकेतील इरावतीप्रमाणे रागीट व तडफदार नाही. त्यामुळे तिचे चित्रण सपक झाले आहे.

**(५) विदूषक** : प्रस्तुत सट्टकातील विदूषक हा रूढ, सांकेतिक पद्धतीने रंगवलेला आहे. याचे नाव कपिंजल (प्रा. कविंजल) हा विवाहित आहे. राजाचे मनोरंजन करणे व त्याच्या प्रेमप्रकरणात मदत करणे हे त्याचे मुख्य काम आहे. विदूषक हा प्राय: निरक्षर, अडाणी, खादाड व अजागळ असा दर्शविलेला असतो. कपिंजल हा त्यास अपवाद नाही. त्याने सांगितल्याप्रमाणे त्याच्या सासऱ्याचा सासरा लोकांच्या घरी पोथ्या वाहण्याचे काम करीत होता. हा बोलण्यात चतुर आहे. त्याच्या तोंडी अनेक सुभाषिते व वाक्प्रचार आलेले आहेत. तो काव्यरचना करण्यात प्रवीण आहे. तोंडाळ दासीबरोबर भांडण करण्याइतका हजरजबाबी आहे. राजा व कर्पूरमंजरी यांची एकांतात भेट होताच लगेच दिव्यावर फुंकर घालण्याइतका चतुर आहे. नाटकाच्या अखेरीस विवाहाचे पौरोहित्य करण्यासही तो पुढे होतो. यावरून तो हुशार, धूर्त व कावेबाज असल्याचे दिसून येते. त्याचा अडाणीपणा व बावळट वृत्ती ही पांघरलेली असावी.

याखेरीज दासी विचक्षणा ही नावाप्रमाणे हुशार व चतुर आहे. काव्यरचना करण्यात निष्णात आहे. पण तिला आपल्या शहाणपणाची घमेंड आहे. त्यामुळेच ती विदूषकाचा पाणउतारा करते व त्याला हवी तशी दुरुत्तरे करते. तिच्या खोडसाळपणामुळे तिची अंत:पुरातून हकालपट्टी झालेली आहे.

* * *

थोडक्यात सांगायचे झाल्यास 'कर्पूरमंजरी' हे सट्टक म्हणजे हलकी फुलकी सुखात्मिका आहे. रंजकता हेच तिचे मूल्य आहे. त्यामुळे तिच्या कथावस्तूची चिकित्सा करण्यात शहाणपण नाही. 'बालरामायणा'सारखे मोठे, विद्वत्ताप्रचूर नाटक लिहिल्यानंतर राजशेखर लोकनाट्याशी नाते सांगणाऱ्या सट्टकाकडे वळलेला दिसतो. त्याच्या काळात संस्कृत भाषा ही शिष्टजनापुरतीच मर्यादित राहिली होती. तेव्हा बहुजनांना समजणाऱ्या प्राकृत भाषेत नाटक सादर करण्याचा त्याने उपक्रम केला आहे व तो बराच सिद्धीला गेला आहे.

राजशेखराचे भाषेवरील प्रभुत्व, कल्पनाशक्ती, पांडित्य हे सारे या कृतीत स्पष्ट प्रत्ययास येते. या सट्टकास चांगली लोकप्रियता लाभली असावी. एक निराळी वाट शोधण्याचे व यशस्वी प्रयोग सादर करण्याचे श्रेय राजशेखरला

जरूर द्यावयास हवे. शुद्ध वाङ्मयीन दृष्ट्या पाहिल्यास 'कर्पूरमंजरी' अगदीच साधारण प्रतीचे सट्टक आहे. त्यातील उणीवा व दोष वर दर्शविले आहेत.

## विद्धशालभंजिका

ही राजशेखराची अखेरची नाट्यकृती आहे. कर्पूरमंजरीप्रमाणे हिचे कथासूत्रही मालकविकाग्निमित्र व रत्नावली या नाटकांच्या आधारे घेतलेले आहे. रतिसौख्यरूपी नाटिकेचा सूत्रधार असलेल्या मदनाचे व दृष्टीने जाळलेल्या मदनास दृष्टीनेच जिवंत करणाऱ्या सुंदरीचे स्तवन करून राजशेखराने नाटिकेस प्रारंभ केला आहे. विद्याधरमल्ल नामक राजाचा महामंत्री भागुरायण याने राजाचा विवाह लाट देशाची राजकन्या मृगांकावली हिच्याशी करण्याची योजना आखलेली आहे. कारण ती ज्याच्याशी विवाह करील तो राजा चक्रवर्ती होईल असे ज्योतिषाने भविष्य वर्तविले होते. लाट देशाचा राजा चंद्रवर्मा हा विद्याधरमल्लाचा सामंत होता. तसेच विद्याधर मल्लाची राणी मदनवती हिचा मामाही होता. चंद्रवर्म्यास पुत्र नव्हता, फक्त एक मुलगीच होती. तिला पुरुषवेष देऊन विद्याधरमल्लाच्या राजवाड्यात आणण्याची योजना महामंत्री भागुरायणाची आहे. मृगांकावली ही राणीची मामेबहीण आहे. पण ती पुरुषवेषात असल्याने राणी तिला ओळखत नाही.

दरम्यान राजाच्या मनात कुंतलराजाची मुलगी कुवलयमाला ही भरलेली आहे. स्त्रीलंपट राजाची फजिती करण्यासाठी राणी पुरुषवेषधारी मृगांकावलीस (त्याने मृगांकवर्मा असे नाव घेतले होते) स्त्रीवेष देऊन राजाशी त्याचे लग्न लावायचे ठरवते. त्याप्रमाणे दोघांचे लग्न लागते. नंतर राणीला मृगांकवर्मा हा पुरुष नसून स्त्री असल्याचे समजते व त्यामुळे तिचीच फजिती होते. अशी ही चमत्कृतिपूर्ण नाटिका आहे.

भागुरायणाने शिल्पकाराकडून राजवाड्यात रत्नजडित खांब असलेले एक भवन बनवून घेतले आहे. पहिल्या अंकाच्या सुरुवातीस राजा सकाळी उठल्यावर आपला मित्र चारायण (म्ह. विदूषक) याला स्वप्नात एक सुंदरी पाहिल्याचे सांगतो व तिचे वर्णन करतो. तिचेच स्मरण करीत तो प्रमदवनात जातो. तेथील स्फटिकाच्या भिंतीवर तिचीच आकृती असल्याचा भास होतो. थोडे पुढे गेल्यावर तीच सुंदरी झोके घेत असलेली दिसते. आणखी थोडे पुढे जाताच तिची मूर्ती

दृष्टीस पडते. राजा तिच्या गळ्यात मोत्याची माळ घालतो. तिथे श्लोकाचा एक चरण लिहिलेला असतो तो वाचून तो आनंदित होतो. आणखी पुढे गेल्यावर क्रीडापर्वतावर ती दिसते. ती तेथून जात असलेली पाहून राजा तिच्या मागोमाग जाऊ लागतो. पण माध्यान्हकाळ झाल्याची सूचना मिळताच तो विदूषकासमवेत परत येतो. (अंक पहिला)

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक असून त्यात तरंगिका व कुरंगिका या दासींचा संवाद आहे. तरंगिका सांगते की कुंतल प्रांताचा राजा चंडमहासेन हा राज्य गेल्यामुळे येथे आलेला आहे. त्याची कन्या कुवलयमाला ही राजाच्या मनात भरलेली आहे. पण राणीच्या मनात तिचा विवाह तिच्या मामाचा मुलगा मृगांकसेन याच्याशी लावून द्यावयाचा आहे. त्या विवाहाची तयारी करण्याची कामगिरी तरंगिकेवर सोपवली आहे. तर राजाचा मित्र चारायण विदूषकाची फजिती करण्यासाठी त्याचा विवाह स्त्रीरूपधारी पुरुषाशी लावायचा, असे राणीने ठरविले आहे. त्या लग्नाची तयारी करण्याची कामगिरी कुरंगिकेकडे आली आहे.

मुख्य प्रवेशात राजा व विदूषक प्रवेश करतात. राजा विरहाने व्याकुळ झालेला आहे. तर विदूषकाने मौन धारण केलेले आहे. राजाने कारण विचारताच तो राणीने आपला विवाह लावण्याचे ठरविले असल्याचे सांगतो. वास्तविक पाहता विदूषक हा विवाहित आहे. इतक्यात दासी येऊन राजाला विदूषकास घेऊन विवाहास उपस्थित रहाण्याची विनंती करते. विवाहाच्या वेळी ती वधू स्त्री नसून पुरुष असल्याचे रहस्य फुटते व विदूषक रागारागाने निघून जातो. राजाही उद्यानात जातो. तेथे त्याला मृगांकमाला चेंडूने खेळताना दिसते. राजा विदूषकासमवेत तिच्या मागे जातो. तिच्या कंदुकक्रीडेचे वर्णन करताना तो म्हणतो -

"हिच्या कपाळावरचा टिळा घामाच्या थेंबांनी धुतला गेल्यामुळे हिचा मुखचंद्र स्पष्ट दिसतो. चेंडूवर वारंवार आघात करीत ती जणू नृत्य करीत आहे. चेंडूच्या वर खाली उसळण्याबरोबरच तिची नजरही वर-खाली फिरत आहे. तिच्या या कंदुकक्रीडेने आम्ही प्रसन्न झालो आहोत."

(अंक २, श्लोक ८)

ती कंदुकक्रीडा थांबवून घाईने निघून जाते. राजा व विदूषक तिच्या पाठीमागे जातात पण ती दिसेनाशी होते. त्याला एक तालपत्र सापडते. त्यावर दोन ओळी लिहिलेल्या दिसतात. पडद्यातून तिच्या विरहव्यथेचे वर्णन राजाच्या कानावर पडते व तिचे नाव मृगांकमाला आहे हे त्याला समजते. (अंक दुसरा)

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी प्रवेशक असून त्यात विचक्षणा व सुलक्षणा या दोन दासींचा संवाद आहे. विचक्षणा सांगते की महामंत्री भागुरायणाने तिला बोलावून सांगितले की मृगांकसेन हा पुरुष नसून स्त्री आहे व तिचे नाव मृगांकावली आहे. त्यानंतर हरदासाच्या सांगण्याप्रमाणे मृगांकावलीने राजाला अनेक ठिकाणी दर्शन दिले. राजा तर तिच्यावर मोहित झालाच पण खुद्द मृगांकावलीही आता त्याच्यासाठी झुरत आहे. तिची अवस्था -

"ती महालात निवास करण्यास घाबरते, उपवनाचा त्याग करते, चंद्राच्या कांतीचा द्वेष करते. चित्रकलामंडपाचा दरवाजाही पाहू इच्छित नाही, वस्त्रप्रावरणास विषतुल्य मानते. महाराजांची आकृती मनात धरून त्या ध्यानात बुडून जाते व कमळाच्या तंतूच्या शय्येवर नुसती बसून राहते."

(अंक ३, श्लोक २)

यानंतर सुलक्षणा सांगते की मेखला नामक दासीने विदूषकाचा जो स्त्रीवेशधारी पुरुषाशी विवाह लावण्याचा उपद्व्याप केला होता त्याचा सूड घेण्याचे त्याने ठरवले. राजाने तिला (म्ह. सुलक्षणेला) बोलावून सांगितले की उपवनातील एका वृक्षावर बसून तू मेखलेला भयभीत कर. त्याप्रमाणे मेखला त्या झाडाखाली आली असता दासी गंभीर आवाज म्हणाली, "मेखला, येत्या वैशाखी पौर्णिमेस तुला मृत्यू येईल." हे ऐकून मेखला घाबरली व तिने यावर उपाय विचारला तेव्हा सुलक्षणेने त्यास चारायणाच्या चरणकमलावर लोटांगण घालण्यास सांगितले. आज पौर्णिमा असल्याने दासी त्या गडबडीत आहे.

मुख्य प्रवेशात राजा व विदूषक प्रवेश करतात. राजा मृगांकावलीचे चिंतन करीत आहे तर विदूषक आता मेखलेवर सूड उगवण्यास उतावीळ झाला आहे. सुंदरीच्या चिंतनात राजा गढलेला पाहून विदूषक त्याला म्हणतो, "अरे, मी जसा माझी विद्या विसरलो तसा तू महाराणीला विसरलास काय?" राजा त्याला आपल्या हृदयाची दोन भागात वाटणी झाल्याचे सांगतो. यानंतर राणी मेखलेला घेऊन राजाकडे येते व विदूषकाला मेखलेस जीवनदान देण्याची विनंती करते. मेखला आपले मस्तक त्याच्या पायावर ठेवते. मग विदूषक आपल्या मिथ्याविवाहाचा आपण सूड घेतल्याचे सांगतो. तेव्हा राणी मेखलेला घेऊन रागारागाने निघून जाते.

मग ते दोघे उद्यानाकडे जातात. पडद्यातून चंद्रवर्णनपर श्लोक ऐकू येतात. ते ऐकून विदूषकही चंद्राचे वर्णन करू लागतो. ते ऐकून राजा म्हणतो - "तुझ्या पोरकट वर्णनात अजून सुधारणा झाली नाही." त्यानंतर राजाला मृगांकावली

दिसते. मग राजा व विदूषक कदलीकुंजात लपून तिचे बोलणे ऐकू लागतात. ती राजाच्या दर्शनाने व्याकुळ झालेली आहे. राजालाही तिची व्याकुळ स्थिती उमगते.

मृगांकावली आपल्या मनाची स्थिती विचक्षणेसमोर उघड करते. त्या दोघींचे बोलणे राजा व विदूषकांच्या कानावर पडते. पण कोणी तरी आल्याचा भास झाल्याने त्या दोघी झाडाच्या आड लपतात तेव्हा राजा व विदूषक पुढे येतात. त्यांना कमलपत्रावर लिहिलेली पंक्ती मिळते. ती वाचून ते दोघे तिचा शोध घेऊ लागतात. ती दिसताच तिच्याजवळ जातात. मृगांकावली चकित होऊन राजाकडे पाहते. मग राजा आपल्या गळ्यातील मोत्याची माळ नायिकेच्या गळ्यात घालतो.

इतक्यात पडद्यातून महाराणी उद्यानाकडे येत असल्याची सूचना मिळते. कारण सिद्धमुनींच्या औषधी प्रभावाने माधवीच्या मांडवावर लालसर रंगाचे गुच्छ लागले आहेत. ते पाहण्यासाठी ती इकडे येत आहे. ते शब्द ऐकताच विचक्षणा राजाचा निरोप घेते व सर्व जण निघून जातात. (अंक तिसरा)

चौथ्या अंकात प्रारंभी प्रवेशक आहे. विदूषकाची पत्नी झोपलेली आहे. सकाळ झाल्यामुळे विदूषक तिला जागी करत आहे. इतक्यात ती झोपेत बडबडू लागते. तिच्या बोलण्याचा आशय असा : राणीच्याजवळ असलेल्या मृगांकवर्म्याची बहीण मृगांकमाला आपल्या भावाला भेटायला आली आहे. ज्योतिषांचे भविष्य असे आहे की तिचे ज्याच्याशी लग्न होईल तो सम्राट होईल. तेव्हा राणीने राजालाच तिच्याशी विवाह करण्याची विनंती केली आहे. पण राणीचा बेत वेगळा आहे. ती मृगांकवर्म्यास स्त्रीवेष देऊन त्याचे राजाशी लग्न लावणार आहे. हा सारा बनाव विदूषकाने ऐकलेला आहे.

मुख्य प्रवेशात राजा व विदूषक येतात. ग्रीष्म-ऋतूचा जोर वाढलेला आहे. मदनसंतापाने व उकाड्याने राजा अधिकच हैराण झाला आहे. इतक्यात दासी येऊन विवाहाची तयारी झाल्याचे सांगते. सामग्री आणण्यात येते. राणी मृगांकावलीस व कुवलयमालेस घेऊन येते. मग राजा व मृगांकावलीचा विवाह होतो. राणीला आपण राजाचे लग्न स्त्रीवेषधारी पुरुषाशीच लावले आहे असे वाटत आहे. इतक्यात चंद्रवर्म्याचा दूत व भागुरायण इत्यादी मंडळी दारावर आल्याचे समजते.

दूत सांगतो की आपल्या स्वामीला पुत्रप्राप्ती झाली आहे. तरी मृगांकावलीचा विवाह योग्य वराशी करावा. नंतर तो दूत खुलासा करतो की चंद्रवर्म्यास

मृगांकावली ही एकच मुलगी होती. मुलगा नसल्याने त्याने तिलाच मुलाप्रमाणे पोषाख घालून त्याचे मृगांकवर्मा असे नाव ठेवले होते आणि पुरुषवेशातच त्याला राणीकडे आणलेले होते. हे ऐकताच राणीची फटफजिती होते. मग ती नाइलाजाने कुवलयमालेचेही राजाशी लग्न लावते. त्यानंतर राजाला दक्षिणेच्या शत्रूवर विजय मिळाल्याची वार्ता येते व तो चक्रवर्ती बनतो. भागुरायणाला आपल्या योजलेल्या कार्यात यश मिळते. भरतवाक्याबरोबर नाटक समाप्त होते. (अंक चौथा)

* * *

या नाटिकेची कथावस्तू अगदी साधारण असली तरी ऐतिहासिकदृष्ट्या या नाटिकेस महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्धशालभंजिकेचा प्रयोग त्रिपुरानगरीत राजसभासदांसमोर करण्यात आला. राजशेखराने नावे बदलून तत्कालीन कथेला नाट्यरूप दिले आहे.

नाटकाचा नायक विद्याधरमल्ल हा त्रिपुरीचा राजा आहे. याचे उपनाव केयूरवर्ष किंवा कर्पूरवर्ष होते. हा कलचुरी वंशाचा प्रमुख आहे. हा राजा म्हणजे कलचुरी नृपती. केयूरवर्ष प्रथम युवराजदेव हा होय. यास त्रिलिंगाधिपती असे बिरुद होते. हा युवराजदेव इ.स.९१५ ते ९४५ पर्यंत गादीवर होता. नाटकातील राणी विलासवती ही पांचाल राजाची कन्या दाखवली आहे. वास्तवात ती कनोजचा प्रतिहार राजा महिपाल देवाची कन्या असून तिचे नाव विलासवतीच होते व तिचे केयूरवर्षाशी लग्न झाले होते. याच्या मंत्र्याचे नाव भाकमित्र असे होते. नाटकात याचे नाव भागुरायण असे ठेवलेले आहे.

नाटकात कुंतलदेशाचा राजा चंडमहासेन हा आपले राज्य नष्ट झाल्यामुळे त्रिपुरानगरीस आलेला आहे. याचे दुसरे नाव वीरपाल असे आहे. या घटनेसही ऐतिहासिक आधार आहे. प्रथम युवराजदेवाच्या दरबारी त्याचा जावई बद्दिग ऊर्फ तृतीय अमोघवर्ष काही काळ राहिलेला होता. याचा पुतण्या चतुर्थ गोविंद हा मान्यखेट येथील गादीवर होता. ही तेव्हा राष्ट्रकूटांची राजधानी होती. तेव्हा हा बद्दिग हाच नाटकात आलेला वीरपाल असावा असे मत म.म.डॉ. मिराशी प्रभृतींनी व्यक्त केले आहे. (पाहा - संशोधन मुक्तावली सर-१)

तथापि डॉ. बुद्धप्रकाश यांनी वीरपाल हा राष्ट्रकूट राजा बद्दिग ऊर्फ तृतीय अमोघवर्ष हा केयूरवर्षाचा जावई होता. त्याची मुलगी कंदुकवती ही बद्दिगाला दिली होती. नाटकात वीरपाल अथवा चंडमहासेनाची मुलगी कुवलयमाला

हिच्याशी विद्याधरमल्लाचे लग्न झाल्याचे दाखवले आहे. तेव्हा वीरपाल हा बद्दिग ऊर्फ अमोघवर्ष होता असे मानणे चुकीचे आहे, असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. खुद्द डॉ. बुद्धप्रकाश यांच्या मते आंध्र प्रदेशातील चालुक्यवंशी भीम हा राजा वीरपाल असावा. याची गादी युद्धमल्लाने बळकावली होती. या कामी त्यास राष्ट्रकूटाचे साह्य झाले होते. युद्धमल्लाने युवराजदेवाची मदत घेऊन आपले राज्य मिळवले असावे. यासाठी त्याने आपली कन्या युवराजदेवास दिली असावी. कुवलयमालेच्या विवाहप्रसंगाने राजशेखराने विद्धशालभंजिकेत ही घटना दर्शविली असावी असे डॉ. बुद्धप्रकाश यांनी म्हटले आहे.

म.म.मिराशी यांनी 'विद्धशालभंजिके'तील वीरपाल हा पूर्वचालुक्यवंशी द्वितीय भीम होता या डॉ. बुद्धप्रकाश यांच्या मताला काडीचाही आधार नाही, असे स्पष्ट म्हटले आहे. तूर्त या वादात न शिरता इतकेच म्हणता येईल की कुवलयमालेशी राजाचा विवाह नाटकात दाखवला आहे त्यामुळे बद्दिग व वीरपाल यांच्यात ऐक्य कल्पिण्यात अडचण येते ही गोष्ट खरी आहे. म.म.मिराशींनीही ही गोष्ट मान्य केली आहे. डॉ. अळतेकरांच्या मते कथानकात अधिक गुंतागुंत करण्यासाठी राजशेखराने ही घटना दर्शविली असावी.

या ठिकाणी एक गोष्ट ध्यानात घ्यावयास हवी ती ही की नाटककार इतिहासाचा उपयोग कथानकास आधार घेण्यासाठी करतो. इतिहासातील काही तपशील तो गाळतो. तेव्हा बद्दिग हा युवराजदेवाचा जावई आहे या घटनेकडे त्याने लक्ष दिले नाही. वीरपालाच्या कन्येचा विद्याधरमल्लाशी विवाह लावण्यात त्याला त्यामुळे अडचण वाटली नाही. नाटकात असे इतिहास व कल्पना यांचे थोडे मिश्रण असावयाचेच. असो. समकालीन घटनांचा असा चतुराईने उपयोग करून राजशेखराने आपली नाटिका संपन्न बनविलेली आहे.

* * *

नाटकात नायक विद्याधरमल्ल, नायिका मृगांकावली, महाराणी मदनवती, महामंत्री भागुरायण, विदूषक चारायण ही पात्रे महत्त्वाची आहेत. याशिवाय राजाची दुसरी प्रेयसी कुवलयमाला, दासी विचक्षणा, मेखला, विदूषकाची पत्नी पिंगलिका व भागुरायणाचा आज्ञाधारक शिष्य हरदास अशी पात्रे आहेत. त्यांपैकी प्रमुख पात्रांचा परिचय करून घेऊ.

**(१) राजा विद्याधर मल्ल :** हा कलचुरी वंशाचा प्रमुख असून त्रिपुरीचा राजा आहे. हा धीरललित प्रकृतीचा राजा आहे. असा राजा प्राय:

'सचिवायत्तसिद्ध' असतो. म्हणजे हा आपला राज्यकारभार मंत्र्यावर सोपवून खुशाल सुखविलासात मग्न असतो. विद्याधरमल्लही आपला सारा राज्यभार भागुरायण या महामंत्र्यावर सोपवून निवांत वावरत आहे. तो विद्वान् व सुसंस्कृत आहे. याला अठरा लिप्यांचे ज्ञान आहे. हा शृंगारप्रिय आहे. यास मदनवती नावाची ज्येष्ठ महाराणी आहे. तिच्या शिवाय त्याने अनेक राण्यांशी विवाह केलेला आहे. असे असता तो नर्मदा नदीत स्नान करणाऱ्या कुवलयमाला नामक तरुणीस पाहून विचलित होतो. नंतर मृगांकावलीचे दर्शन होताच तिच्यासाठी झुरू लागतो. यावरून तो भोगलंपट असल्याचे स्पष्ट दिसून येते. असे असले तरी महाराणी मदनवतीविषयी त्याच्या मनात आदराची भावना आहे. तो तिला यत्किंचितही दुखवू इच्छित नाही. सारांश, विद्याधरमल्ल हा राजा अथवा प्रस्तुत नाटकाचा नायक हा राजा उदयन अथवा अग्निमित्र यांच्या वर्गात मोडणारा आहे.

**(२) नायिका मृगांकावली :** मृगांकावली ही लाट देशाचा राजा चंद्रवर्मा याची कन्या असून महाराणी मदनवतीची धाकटी मामेबहीण आहे. हिचा जिच्याशी विवाह होईल तो राजा चक्रवर्ती होईल असे ज्योतिषांनी भविष्य वर्तवले होते. भागुरायणाच्या कानावर हे येताच तो राजासाठी तिच्या प्राप्तीचा प्रयत्न करतो. मृगांकावलीस तिच्या माता-पित्यांनी पुरुषवेषात वाढवून तिचे नाव मृगांकसेन असे ठेवले होते.भागुरायण तिला पुरुषवेषातच त्रिपुरीला घेऊन येतो व महाराणीच्या स्वाधीन करतो. ती तरुण, सुंदर व क्रीडानिपुण आहे. काव्यरचनेतही कुशल आहे. राजावर मन जडल्यानंतर तीही त्याच्या प्राप्तीसाठी तळमळू लागते. राणीजवळ ती पुरुषवेषात वावरत असली तरी राणी तिला स्त्रीवेष देऊन आपली करमणूक करून घेते. वीरपालाची कन्या कुवलयमालाही राजधानीतच आहे. तिच्याशी या मृगांकसेनाचे लग्न लावण्याचा तिचा विचार आहे. अखेरीस राजाची फजिती करण्यासाठी मृगांकसेनास स्त्रीवेश देऊन तिचा राजाशी विवाह लावते पण या प्रकरणात तिचीच फटफजिती होते. पण यामध्ये मृगांकावलीला किती मनस्ताप होईल याचा कोणी विचार करीत नाही. पण ती हे सारे शांतपणे सहन करते. राजाशी विवाह झाल्यावर ती प्रसन्न होते. इतकेच नव्हे तर कुवलयमालेचाही सवत म्हणून आनंदाने स्वीकार करते. एक सुंदर बाहुली यापलीकडे तिच्या चित्रणात काही आढळत नाही.

**(३) महाराणी मदनवती :** मदनवती ही राजा विद्याधरमल्लाची ज्येष्ठ राणी आहे. तसेच नायिका मृगांकावलीची थोरली मामेबहीण आहे. ती प्रौढ, गंभीर

व मानी स्वभावाची आहे. राजावर तिचा विलक्षण प्रभाव आहे. ती आपल्या परीने राजाचे मनोविनोदन करते. राजाचा स्त्री-लंपट स्वभाव तिच्या चांगल्या परिचयाचा आहे. तिच्या मनात सवतीमत्सर अजिबात नाही. कारण तिने अनेक स्त्रियांचा राजाशी विवाह लावून दिला आहे. त्याच्या उनाडक्यांना पायबंद घालण्यासाठी ती त्याचा स्त्रीवेशधारी पुरुषाशी (म्ह. मृगांकसेनाशी) विवाह लावायला जाते पण ते प्रकरण तिच्या अंगलट येते. विदूषकाची फजिती करण्यासाठी ती हाच प्रयोग करते पण तोही यशस्वी होत नाही. उलट तिच्या दासीचीच त्रेधा-तिरपीट उडते. मात्र ती स्वभावाने सौम्य आहे. 'मालविके'तील इरावतीप्रमाणे तापट वा आतताई नाही किंवा विक्रमोर्वशीयातील राणी औशीनरीप्रमाणे उदारही नाही.

**(४) प्रधानमंत्री भागुरायण** : हा राजाचा मुख्य अमात्य आहे. राज्यकारभाराची धुरा तोच सांभाळत आहे. तो राजनीतीनिपुण असून राजावर त्याची निष्ठा आहे. राजाला चक्रवर्तिपद प्राप्त व्हावे म्हणून तोच धडपडतो. तसे पाहिले तर तोच नाटकाचा सूत्रधार आहे. याच्याच प्रयत्नामुळे राजाला मृगांकावलीची प्राप्ती होते व गंगेच्या उगमस्थानापासून ताम्रपर्णी नदीपर्यंतचा प्रदेश राजाच्या अमलाखाली येतो. नाटकात तो पहिल्या व चौथ्या अंकातच रंगभूमीवर येतो. विदूषक चारायणाने त्याला 'अभिनव चाणक्य' असे म्हटले आहे ते उगीच नव्हे.

**(५) विदूषक चारायण** : हा राजाचा परममित्र व नर्मसचिव आहे. अन्य विदूषकांप्रमाणे हाही खादाड आहे. तो बोलताना उपमाही खाद्यपदार्थांच्या देतो. पहिल्या अंकात वनश्रीचे वर्णन करताना त्याने सिंदुबार फुलांना भाताची, अशोकाच्या घोसांना तुपाची तर नवमल्लिकेच्या फुलांना दह्याची उपमा दिली आहे. तो समयसूचक असून बोलण्यात चतुर आहे. अजागळ दिसला तरी तसा वस्ताद आहे. राणी आपले स्त्रीवेषधारी पुरुषाशी लग्न लावत आहे. हे ध्यानात येताक्षणीच तो विवाहविधी उधळून निघून जातो. इतकेच नाही तर आपल्याला फसवणाऱ्या दासीला लक्षात राहील अशी अद्दल घडवतो. हा रागीट असल्यामुळे दासीनी याला 'दुर्वास' असे नाव दिले आहे. प्रसंगी तो राणीच्या रागाचीही पर्वा करीत नाही. तिसऱ्या अंकात रागावलेली राणी अश्रुपात करीत निघून गेल्यावर विदूषक राजाला म्हणतो, "रडली तर रडू दे. त्यामुळे तिच्या डोळ्यातून मोती तर सांडत नाहीत ना?" ('रुदतु रुदतु । किमस्याः मौक्तिकानि गलिष्यन्ति ।'

अंक ३) विशेष म्हणजे हा विदूषक विवाहित आहे. इतकेच नव्हे तर त्याची पत्नी ब्राह्मणी हिला नाटककाराने चौथ्या अंकात रंगभूमीवरही आणलेले आहे.

* * *

(१) या नाटिकेचे नाव 'विद्धशालभंजिका' हे आहे. 'शालभंजिका' म्हणजे पुतळी किंवा बाहुली. 'विद्धा स्तम्भे उत्कीर्णा या शालभञ्जिका पुत्तलिका।' असे नारायण या टीकाकाराने स्पष्टीकरण दिले आहे. स्वप्नात पाहिलेल्या सुंदरीची प्रतिमा आपल्या चित्रशाळेत खोदून घेतलेल्या पुतळ्यात दिसताच राजा तिच्या गळ्यात मोत्याची माळ घालतो. या प्रसंगास अनुलक्षून नाटिकेस 'विद्धशालभंजिका' असे नाव दिलेले आहे. ही चार अंकी नाटिका आहे. मात्र हिला नायिकेचे नाव दिलेले नाही.

(२) मागे निर्देश केल्याप्रमाणे विद्धशालभंजिकेचे कथानक समकालीन गोष्टीवर आधारलेले असले तरी त्याची रचना राजशेखराने भासाचे 'स्वप्नवासवदत्त', कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र' व श्रीहर्षाची 'प्रियदर्शिका' व 'रत्नावली' या नाटिकांच्या आधारे केलेली आहे, हे अगदी स्पष्ट आहे. यातील राजकन्येशी विवाह करणाऱ्या राजास चक्रवर्तिपद प्राप्त होणार असल्याची कल्पना स्वप्नवासवदत्ता व रत्नावली नाटकात आलेली आहे. तसेच तरुण मुलगी येऊन राजाच्या अंत:पुरात राहणे व राजाचे तिच्यावर प्रेम जडणे ही कल्पना 'मालविकाग्निमित्र' व 'रत्नावली'मध्ये आलेली आहे. नायिकेने चेंडू खेळण्याची कल्पना 'स्वप्नवासवदत्ता' नाटकात आहे. त्यामुळे राजशेखराच्या अंगी स्वतंत्र निर्माण करण्याची कुवत बेताचीच असल्याचे दिसते. प्रसंगांची उसनवारी करून जोडण्याचे काम मात्र त्याने चांगल्या प्रकारे केले आहे.

(३) या नाटकात अनेक खटकणाऱ्या गोष्टी आहेत. त्यांपैकी पहिली म्हणजे (अ) नायकाचा शेवटी दोन स्त्रियांशी विवाह झालेला आहे. खरे तर राजाने कुवलयमालेस एकदाच पाहिलेले आहे. त्यामुळे तिच्याशी लग्न झालेले दर्शविण्यात काही स्वारस्य नाही. इतर कोणत्याही नाटकात असा चमत्कारिक प्रकार आढळत नाही. त्यामुळे कोणत्या उद्देशाने हा विवाह दर्शविला आहे हे समजत नाही.

(ब) नाटकाची कथावस्तू अत्यंत विस्कळित आहे. त्यातल्या काही गोष्टी मुळीच पटणाऱ्या नाहीत. उदा. मृगांकमाला ही पुरुषवेशात अंत:पुरात येऊन

दाखल होते तेव्हा ती स्त्री आहे हे अंत:पुरात कोणालाही समजले नाही, ही गोष्ट मुळीच पटणारी नाही. महाराणी मदनवतीचे मनोरंजनाचे प्रकार विचित्र आहेत. पुरुषवेषधारी मृगांकमालेचे (म्ह. मृगांकसेनाचे) लग्न ती कुवलयमालेशी लावण्याचे ठरवते. त्यालाही कुवलयमालेची ना नाही. नंतर ती मृगांकमालेला स्त्रीवेश देते आणि स्त्रीवेषधारी पुरुषाचे राजाशी लग्न लावून फजिती करण्याचे ठरवते. एवढ्याने भागत नाही म्हणून विदूषकाची फजिती करण्यासाठी ती असलाच प्रयोग करते. असल्या विकृत गोष्टी करण्यात तिला काय आनंद वाटतो ते नाटककारच जाणे.

(क) आपल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी विदूषक मेखलेला अद्दल घडवतो तो साराच प्रकार अत्यंत पोरकट आहे. यावरून नाटककाराची अभिरुची अतिशय खालच्या दर्जाची दिसते. अथवा प्रेक्षकांची सवंग करमणूक करण्यासाठी त्याने हे आचरट प्रकार दर्शविले आहेत, असे म्हणावे लागते. तेव्हा कर्पूरमंजरीच्या रचनेपासून नाटककार हळूहळू लोकनाट्याकडे वळू लागलेला दिसतो. काही झाले तरी हे प्रकार त्याला शोभणारे नाहीत, असे स्पष्ट म्हणावेसे वाटते.

(४) असे असले तरी राजशेखराच्या अभिजात प्रतिभेचे, उत्कृष्ट कल्पनाशक्तीचे यात दर्शन घडल्यावाचून राहात नाही. प्रस्तुत नाटिकेत शृंगार हा प्रमुख रस आहे. त्याच्या संभोग व विप्रलंभ या दोन्ही प्रकारांचा नाटककाराने उत्तम परिपोष केलेला आहे. राजाला स्वप्नात मृगांकमाला दिसली या प्रसंगाचे उत्तम वर्णन 'कथय किमिह बालै' (अंक १, श्लोक १८) या श्लोकात आलेले आहे. विरहाने व्याकुळ झालेली नायिका चंदनाने काढलेली चंद्राची आकृती दातांनी ओठ रगडत नष्ट करते तर फुलांना कामदेवाचे बाण समजून फेकून देते असे वर्णन 'चंद्र चंदन कर्दमेन' (अंक २, श्लोक २०) या श्लोकात केले आहे.

निसर्गाची वर्णनेही उत्कृष्ट वठलेली आहेत. प्रभातवर्णन (अंक १, श्लोक ११), माध्यान्हवर्णन (१.४३), संध्यावर्णन (२.२२) ही पाहण्यासारखी आहेत. त्याने सहाही ऋतूंची वर्णने केली आहेत. त्यात वसंतऋतूचे वर्णन सरस आहे. उदा. मलयानिलाचे वर्णन (१.२७) हे पाहावे. तिसऱ्या अंकात आलेले अभिसारिकेचे वर्णनही (३.७) मनोरम आहे.

त्याने प्रतीप, अतिशयोक्ती व व्यतिरेक वा अलंकारांची योजना केली आहे. मंगलाचरणात आलेला व्याघात हा अलंकार उत्तम साधलेला आहे. शंकरांनी

डोळ्यांनी जाळलेल्या कामदेवास स्त्रियांनी आपल्या डोळ्यांनीच जिवंत केले अशी मनोरम कल्पना 'दशा दग्धं मनसिज' (अंक १, श्लोक २) मध्ये आलेली आहे. तसेच विभावना व स्वभावोक्ती हे अलंकारही साधले आहेत.

विद्धशालभंजिकेत एकंदर अठरा वृत्ते वापरलेली आहेत. राजशेखर हा 'शार्दूलविक्रीडित' या वृत्ताची योजना करण्यात निपुण आहे, अशी क्षेमेंद्राने आपल्या 'सुवृत्ततिलका'त त्याची प्रशंसा केली आहे. राजशेखराने प्रसंगवशात वैदर्भी, पांचाली व गौडी या तीनही रीतींचा वापर केला आहे.

* * *

राजशेखराच्या चारही नाटकांचा एकत्रित विचार केल्यावर नाटककार म्हणून त्याची कोणती वैशिष्ट्ये ध्यानात येतात, हे येथे पाहावयाचे आहे.

(१) राजशेखर हा अत्यंत प्रतिभासंपन्न कवी व व्यासंगी पंडित आहे. यात वादच नाही. पण त्याच्यातील पांडित्याने कवित्वावर कुरघोडी केलेली आहे. त्याला इतिहास-पुराणांचे सूक्ष्मज्ञान आहे. तथापि संयमाच्या अभावामुळे त्याचे 'बालरामायण' कसे रटाळ व कंटाळवाणे उतरले आहे, हे मार्ग दर्शविले आहे. प्रस्तुत नाटकाच्या विस्तारावर टीका करणाऱ्यांना त्याने जे उत्तर दिले आहे ते मुळीच पटणारे नाही.

(२) राजशेखराचा विद्याव्यासंग मोठा आहे. तो चतुरस्र लेखक आहे. संस्कृत व प्राकृत भाषांवर चांगले प्रभुत्व आहे. त्याने भास, कालिदास, श्रीहर्ष व भवभूती यांच्या नाटकांचा चांगला अभ्यास केलेला आहे. तसेच हरिवृद्ध, नंदिवृद्ध, हाल-सातवाहन, पोट्टिस या प्राकृत कवींचा कर्पूरमंजरीच्या प्रस्तावनेत उल्लेख केलेला आहे. आपल्या 'काव्यमीमांसा' या ग्रंथात त्याने उद्भट, रुद्रट, रत्नाकर व आनंदवर्धन यांच्या वाङ्मयविषयक मतांचा उल्लेख केलेला आहे.

(३) राजशेखर हा चतुरस्र पंडित व कवी असला तरी त्याच्या ठिकाणी स्वतंत्र रचना करण्याचे सामर्थ्य नाही. त्याची नाटके रामायण, महाभारत व पूर्वसूरींच्या नाटकांच्या आधारे रचण्यात आलेली आहे. त्याने नुसत्या कथांचीच उसनवारी केलेली नाही तर अनेक प्रसंगही उचललेले आहेत. यावरून त्याच्या ठिकाणी प्रसंगांची जुळवाजुळव करण्याचे कौशल्य दिसून येते. त्याने असंख्य पात्रांची निर्मिती केली आहे. बालरामायणात तर त्याने पात्रांचे जंगल उभे केले आहे. पण कोणत्याही पात्राच्या चित्रणात त्याला रंग भरता आलेला नाही. रावणासारखे अत्यंत प्रभावी पात्रदेखील नेभळट उतरले आहे. यावरून राजशेखर

हा प्रथम दर्जाचा नाटककार तर नाहीच पण दुय्यम दर्जाच्या नाटककारातही त्याचा क्रमांक वर लागत नाही.

(४) तो उत्तम कवी आहे. त्याची कल्पनाशक्तीही तरल आहे. वर्णनामध्ये तो निपुण आहे. संस्कृत-प्राकृत भाषांवर त्याचे उत्तम प्रभुत्व आहे. त्याचे अनेक श्लोक सुश्लिष्ट व काव्यगुणांनी नटलेले आहेत. वृत्ते व अलंकारांची योजना करण्यात तो वाकबगार आहे. संवादही खटकेबाज आहेत. पण या साऱ्यांनी ज्यास नटवायचे ती कथावस्तूच बेंगडी आहे. त्याच्या काही गोष्टींचा अक्षरशः उबग येतो. उदा. कर्पूरमंजरीतील विदूषक व दासी यांच्यातील निरर्थक तंटा अथवा विदूषकाला पडलेल्या स्वप्नाचे वर्णन. बालरामायणात त्याने वेषांतराची कल्पनाही कमालीची ताणली आहे. 'विद्धशालभंजिके'मधील नायिकेचे पुरुषवेषात वावरणे, राणीने तिला स्त्रीवेष घ्यायला लावणे, अखेरीस राजाचे दोन स्त्रियांशी लग्न होणे, हे प्रसंग पटणारे नाहीत. ते ओढूनताणून आणल्यासारखे वाटतात. नाटकातील युद्धाचे वर्णन कंटाळवाणे आहे.

(५) राजशेखराच्या ठिकाणी तारतम्याचा अभाव आहे. त्याने 'बालरामायणा'त सीतेच्या स्वयंवरासाठी स्वकालीन राजे आलेले सांगितले आहेत. उदा. त्रिपुरीचा चेदी, लाट देशाचा चालुक्य, शक राजा वगैरे. यात कालविपर्यास होतो आहे, हे त्याच्या गावीही नाही. भौगोलिक प्रदेशाच्या वर्णनात त्याने मनमानी केली आहे. उदा. लंकेपासून अयोध्येपर्यंतचा प्रवास वर्णन करताना त्याने हिमालय, कैलास, मानससरोवर, इंद्राची अमरावती ही स्थळे घुसडली आहेत. विद्धशालभंजिकेतील कुवलयमालेचा विवाह ही अनावश्यक घटना आहे. यावर कडक टीका करताना म.म.मिराशी लिहितात - "ही असंभाव्य आणि आक्षेपार्ह घटना त्या नाटकात घालणे हे अविवेकीपणाचे लक्षण आहे. राजशेखराच्या बाबतीत हा अविवेक सुतराम संभवनीय आहे. कारण त्याने इतक्या मूर्खपणाचे नसले तरी अनेक अविवेकी प्रसंग आपल्या इतर ग्रंथांत घातले आहेत." (संशोधन मुक्तावली : सर सहावा : पृष्ठ १७५)

# उत्तरकालीन नाटककार

राजशेखरानंतर म्हणजे इसवी सनाच्या दहाव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत जे अनेक नाटककार होऊन गेले त्यांच्या कामगिरीचा या प्रकरणात धावता आढावा घ्यावयाचा आहे. इ.स. अकराशेच्या आसपास कृष्णमिश्राचे प्रबोधचंद्रोदय हे रूपकात्मक किंवा उपदेशात्मक नाटक रंगभूमीवर आले. हे नाटक पं. वासुदेव पणशीकरांनी दोन संस्कृत टीकांसह प्रकाशित केले आहे. या नाटकाचे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, डच व रशियन या भाषांत अनुवाद झाले आहेत. हे नाटक अत्यंत प्रसिद्ध व लोकप्रिय आहे. याचा स्वतंत्र परिचय पुढे करून दिलेला आहे.

या काळातील दुसरा उल्लेखनीय नाटककार जयदेव हा होय. याचे 'प्रसन्न राघव' हे नाटक इ.स.१२०० च्या सुमारास रंगभूमीवर आले. याही नाटकाचा पुढे परिचय करून दिला आहे. याच सुमारास वत्सराज हा नाटककार होऊन गेला, हा कालिंजरचा राजा परमर्दिदेव (इ.स.११६३ ते १२०३) याचा मंत्री होता. याने रूपकांचे प्रकार नजरेपुढे ठेवून सहा प्रकारच्या रूपकांची रचना केली आहे. कर्पूरचरित (एकांकी भाण), किरातार्जुनीय व्यायोग (एकांकी व्यायोग), हास्य-चूडामणी (एकांकी प्रहसन), रुक्मिणी हरण (चार अंकी ईहामृग), त्रिपुरदाह (चार अंकी डिम) व समुद्रमन्थन (तीन अंकी समवकार)

या काळाच्या थोडे-फार मागे-पुढे सुभट या नाटककाराने लिहिलेले 'दूताङ्गद' हे नाटक उल्लेखनीय आहे. हे पहिले 'छाया' नाटक आहे. याचे कथानक रामायणावर आधारलेले आहे. यात दूतकर्म करणारा अंगद व रावण यांचा संवाद आहे. 'छाया' या प्रकारच्या नाटकात रंगभूमीवर प्रत्यक्ष पात्रे येत नाहीत तर त्यांच्या सावल्या येतात. हे नाटक अनहिलवाडच्या त्रिभुवनपालाच्या

(इ.स.१२०० ते १२५०) समोर सादर करण्यात आले. या नाटकात भवभूती व राजशेखर यांच्या नाटकातील श्लोक घेतलेले आहेत.

दामोदर मिश्राचे हनुमन्नाटक अथवा महानाटक हेही उल्लेखनीय आहे. हे नाटक प्रत्यक्ष मारुतीने रचले अशी आख्यायिका आहे. पण ती खरी नसून पश्चिम भारतात मिळालेली प्रत दामोदर मिश्राने लिहिलेल्या नाटकाची आहे तर बंगाली प्रत मधुसूदनाच्या नावावर आहे. राजा भोजाने या नाटकाच्या लेखनास प्रोत्साहन दिले अशी आख्यायिका असल्याने या नाटकाची रचना इ.स.११०० च्या सुमारास झाली असावी. याही नाटकाचा स्वतंत्र परिचय करून दिला आहे.

अकराव्या शतकात होऊन गेलेल्या कुलशेखरवर्माने 'तापती संवरण' व 'सुभद्रा-धनंजय' अशी दोन नाटके लिहिली आहेत. ही दोन्ही नाटके त्रिवेंद्रम संस्कृत ग्रंथमालेमध्ये शिवरामाच्या संस्कृत टीकेसह श्री. गणपतीशास्त्रींनी प्रसिद्ध केली आहेत. बाराव्या शतकामध्ये कान्यकुब्जच्या राजा गोविंदचंद्राच्या दरबारात असलेल्या कविराज शंखधराने 'लटकमेलक' या सुप्रसिद्ध प्रहसनाची रचना केली आहे. हे प्रहसन अत्यंत मनोरंजक आहे. याच काळात महाराज विग्रहराजाने भारवीच्या 'किरातार्जुनीय' या विख्यात महाकाव्याच्या आधारे 'हरकेलि' नावाचे नाटक रचले आहे.

तेराव्या शतकातील कर्नाटकातल्या हस्तिमल्लनामक जैन कवीने अंजनापवनंजयम्, सुभद्रा (नाटिका), मैथिली कल्याण व विक्रांतकौरव अशी चार नाटके लिहिली आहेत. त्यांपैकी पहिली दोन प्रकाशित झालेली आहेत. कर्नाटकामध्ये या नाटकांचा चांगला प्रसार झालेला आहे. यादववंशीय राजा रविवर्म्याने (इ.स. १२६५) 'प्रद्युम्नाभ्युदय' हे पाच अंकी नाटक लिहिले आहे.

चौदाव्या शतकात 'साहित्य-दर्पणा'चा कर्ता विश्वनाथ याने 'सौगंधिकाहरण' नामक एकांकी व्यायोगाची रचना केली आहे. हेही नाटक काव्यमालेत प्रकाशित झाले आहे. ज्योतिरीश्वराचे 'धूर्तसमागम' हे प्रसिद्ध प्रहसन याच काळात रचलेले आहे. पंधराव्या शतकात वामनभट्ट बाणाने 'पार्वती-परिणय' या प्रसिद्ध नाटकाची रचना केली आहे. यातील कथा कालिदासाच्या 'कुमारसंभवा'तून घेतली आहे. अथवा कुमारसंभवास कवीने नाट्यरूप दिले आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. एकेकाळी हे नाटक 'कादंबरी'चा कर्ता बाणभट्ट याने रचले, असे मानण्यात येई. त्यामुळे या नाटकाला बरीच प्रसिद्धी मिळाली. या नाटकाचा स्वतंत्र परिचय करून दिला आहे. रामदेवाने या काळात रामाभ्युदय, पांडवाभ्युदय व सुभद्रापरिणय अशी तीन नाटके लिहिली आहेत.

सोळाव्या शतकात शेषकृष्ण याने 'कंसवध' या नावाचे सात अंकी नाटक लिहिले आहे. नाटककार अकबराच्या राजवटीत राहात असून त्याने तोडर-मलाच्या मुलासाठी प्रस्तुत नाटकाची रचना केली असे प्रो. सुशीलकुमार दे यांनी म्हटले आहे. सतराव्या शतकातील उल्लेखनीय नाटक म्हणजे रामभद्र दीक्षित कृत जानकी परिणय हे होय. महादेवाचे 'अद्भुतदर्पण' हेही नाटक विचारणीय आहे. याचा कर्ता 'कृष्णसूरीचा पुत्र असून तो कौंडिन्य गोत्री होता. इ.स. सतराव्या शतकाच्या मध्यावर याचा काळ आहे. यातील कथावस्तू रामायणावर आधारलेली आहे. यात रामाला जादूच्या आरशात लंकेतील दृश्ये दिसतात असे दर्शविले आहे. दुसरे म्हणजे याने महोदर विदूषक रामाचा मित्र दर्शविला आहे.

या आढाव्यात ठळक नाटकांची थोडक्यात माहिती दिली आहे. अगदी एकोणिसाव्या शतकापर्यंत नाटकांची रचना झालेली आहे. उत्तरकालीन नाटकांची कल्पना घेण्यासाठी एवढी माहिती पुरेशी आहे.

****

## दामोदर मिश्र

हे विलक्षण नाटक 'महानाटक' म्हणून ओळखले जाते. परंपरेनुसार याची रचना साक्षात हनुमानाने केली आहे. त्याने नाटक रचण्यास प्रारंभ केला. मारुती रामायणावर नाटक लिहीत असल्याचे समजताच वाल्मीकी ऋषी अस्वस्थ झाले. मग मारुतीने हे नाटक शिळांवर कोरून त्या शिळा समुद्रात टाकल्या. ही आख्यायिका भोज राजाच्या कानावर आली. त्याने समुद्रात शोध घेतला तेव्हा त्याला काही शिळा प्राप्त झाल्या. त्याने आपल्या दरबारातील दामोदर मिश्र या कवीकडून नाटक व्यवस्थित लिहून घेतले. भोजराजाचा काळ इ.स.११ व्या शतकाचा पूर्वार्ध इतका असल्याने हे नाटक या काळात रचले गेले हे उघड आहे.

या नाटकाची दोन स्वतंत्र हस्तलिखिते उपलब्ध आहेत. यातील पश्चिम भारतीय प्रत दामोदराची असून ती प्राचीन आहे. या प्रतीत चौदा अंक असून एकंदर ५८४ श्लोक आहेत. दुसरी हस्तलिखित प्रत बंगाल प्रांतातील आहे. हिच्यात दहा अंक असून श्लोक संख्या ७२० इतकी आहे. या दोन्ही नाटकांचे

वैशिष्ट्य म्हणजे यात सर्व संवाद संस्कृतात आहेत. नांदीश्लोक आहे पण प्रस्तावना नाही. गद्यापेक्षा पद्यभाग मोठा आहे. यातील अनेक श्लोक भवभूती, मुरारी, राजशेखर यांच्या नाटकातून घेतलेले आहेत. त्यामुळे हे स्वतंत्र नाटक नसून संकलन आहे, हे मत आता मान्य झाले आहे. नाटकात पात्रे भरपूर आहेत पण विदूषकाचा अभाव आहे. डॉ. ल्यूडर्स यांच्या मते हे 'छायानाटक' आहे. पण हे मत पटणारे नाही.

****

## क्षेमीश्वर

क्षेमीश्वर अथवा क्षेमेंद्र हा राजशेखरानंतर थोड्याच काळात होऊन गेला. याने हरिश्चंद्राच्या कथेवर 'चंडकौशिक' या नाटकाची रचना केली आहे. एका तरुण स्त्रीस बळी देण्यात येत आहे, हे पाहून हरिश्चंद्र विश्वामित्रांना दोष देतो. त्यामुळे ते संतापून त्यास शाप देतात. त्यांच्या कोपाची शांती करण्यासाठी हरिश्चंद्र आपले राज्य व एक हजार सुवर्णमुद्रा देऊ करतो. पण सुवर्णमुद्रांसाठी तो स्वत:ची व बायको-मुलाची विक्री करतो. चांडाळाच्या हाताखाली तो स्मशानात काम करू लागतो. एक दिवस त्याची पत्नी तारामती मुलाचेच प्रेत घेऊन स्मशानात येते. अर्थात ही त्याची परीक्षा पाहण्यासाठी रचलेली माया होती. मुलगा जिवंत होतो व हरिश्चंद्राला आपले राज्य परत मिळते, असा कथाभाग आहे. कौशिक म्हणजे विश्वामित्र हे तापट असल्यामुळे नाटकास 'चंडकौशिक' हे नाव दिलेले आहे.

नाटकाची कथा सामान्य आहे व रचनाही शिथिलच आहे. यात स्मशानभूमीची, कात्यादेवीच्या रक्तरंजित पूजेची वर्णने प्रभावी आहेत. भाषाशैली प्रौढ आहे. मोठाले समास योजलेले आहेत. याने 'नैषधानंद' नावाचे सात अंकी नाटक लिहिले आहे. यात नळराजाचे आख्यान आहे.

****

## बिल्हण

बिल्हण हा काश्मिरी कवि-नाटककार इसवी सनाच्या अकराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला. 'कर्णसुंदरी' ही नाटिका अनहिलवाडच्या कर्णदेव

त्रैलोक्यमल्ल राजाच्या विवाहप्रसंगी लिहिण्यात आली आहे. हा राजा इ.स.१०६४ ते ९४ या काळात राज्य करीत होता. याचे लग्न कर्णाटचा राजा जयकेशी याची कन्या मियानल्लदेवी हिच्याशी झाला. बिल्हणाने आपली 'कर्णसुंदरी' ही नाटिका कालिदास, श्रीहर्ष व राजशेखर यांच्या नाटिकांच्या आधारे रचली असल्याचे स्पष्ट दिसून येते.

चालुक्यराजास विद्याधर राजाच्या कर्णसुंदरी नामक मुलीशी विवाह करावयाचा असतो. कारण त्यामुळे तो सम्राट बनणार असतो. त्यास अनुसरून राजाचा मंत्री तिला राजाच्या अंत:पुरात आणून सोडतो. राजा प्रथम तिला स्वप्नात पाहतो. त्यानंतर त्याला तिची तसबीर दिसते. तिच्या सौंदर्यावर मोहित होऊन तो तिच्या प्रेमात पडतो. त्याच्या राणीला या प्रेमप्रकरणाचा सुगावा लागताच ती त्यास विरोध करते. त्यासाठी ती स्वत: कर्णसुंदरीप्रमाणे पोशाख करून राजाला संकेतस्थळी भेटते. त्यानंतर राजाची फजिती करण्यासाठी एका तरुण मुलास कर्णसुंदरीचा वेष देऊन राजाचे त्याच्याशी लग्न लावण्याचा घाट घालते. पण राजाचा मंत्री सावध असतो. तो ऐनवेळी त्या मुलाच्या जागी कर्णसुंदरीला उभी करतो. त्यामुळे राजाच्या ऐवजी राणीचीच फजिती होते. विवाह होताच राजाने परकीय शत्रूंचा पाडाव केला असल्याची वार्ता येते. त्या आनंदात ही नाटिका समाप्त होते.

या नाटिकेवर राजशेखराच्या विद्धशालभंजिकेची स्पष्ट छाप दिसते. राजाला नायिका स्वप्नात दिसणे अथवा चित्रात दिसणे ही कल्पना विद्धशालभंजिकेत आलेली आहे. तसेच पुरुषाला स्त्रीचा वेष देऊन त्याचा राजाशी विवाह करण्याचे ठरवणे हाही प्रकार राजशेखराच्या नाटकात दिसतो. एखाद्या राजकन्येशी विवाह केल्यामुळे चक्रवर्ती पद प्राप्त होणे या कल्पना भास, कालिदासांनी योजलेल्या आहेत. त्यामुळे बिल्हणाने सारा आयता मालमसाला घेऊन ती नाटिका तयार केलेली दिसते. नाटकाची भाषा, व्यक्तिचित्रण व रस परिपोष या दृष्टीने नाटिका अगदी सामान्य आहे. राजशेखरानंतर नाटक हे कसे घसरणीला लागले होते. याची कल्पना येण्यास या नाटिकेचे उदाहरण पुरेसे आहे. या नाटिकेव्यतिरिक्त बिल्हणाने 'विक्रमाङ्कदेवचरित' हे अठरा सर्गाचे ऐतिहासिक महाकाव्य लिहिले आहे. तसेच 'चौर्यपंचाशिका' नामक पन्नास श्लोक असलेले प्रणयरम्य काव्य लिहिले आहे.

* * *

# कृष्णमिश्र

कृष्णमिश्राच्या 'प्रबोधचन्द्रोदया'चा पहिला प्रयोग गोपालाच्या आदेशावरून कीर्तिवर्मा राजाच्या समोर सादर करण्यात आला, अशी माहिती या नाटकाच्या प्रस्तावनेत आली आहे. महेश्वर या टीकाकाराच्या मते गोपाल हा कीर्तिवर्म्याचा सेनापती असून ब्राह्मण होता. इ.स.१०९८ मधील देवगड येथे मिळालेल्या कोरीव लेखात तो लेख जेजकभुक्तीच्या कीर्तिवर्म्याचा आहे असे म्हटले आहे. तसेच महोवा येथील कोरीव लेखात कीर्तिवर्म्याने त्रिपुरीचा चेदीराजा कर्ण याचा पराभव केल्याचा उल्लेख आहे. या कामी गोपालाने त्याला मदत केली होती. हा लेख इ.स.१०४२ चा आहे. यावरून या नाटकाची रचना इ.स.१०४२ ते १०९८ च्या दरम्यान झाली असावी. तेव्हा कृष्णमिश्र हा इ.स.च्या अकराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला असे निश्चितपणे म्हणता येते.

परंपरागत हकीकतीनुसार कृष्णमिश्र हा अद्वैत वेदांताच्या हंस या पंथातील एक संन्यासी असून त्याचे अनेक शिष्य होते. त्यातील एका शिष्यास काव्याची आवड होती. सदर शिष्यास तत्त्वज्ञानाचे पाठ देण्यासाठी कृष्णमिश्राने या नाटकाची रचना केली असे म्हणतात. 'प्रबोधचन्द्रोदय' हे नाटक रूपकात्मक आहे. याच्या पूर्वीही रूपकात्मक नाटकाची रचना झालेली आहे. अश्वघोषाच्या उपलब्ध झालेल्या त्रुटित रूपकात कीर्ती, धृती व बुद्धी ही पात्रांची नावे असल्याचा उल्लेख मागे आलेला आहे. नवव्या शतकात होऊन गेलेल्या 'न्यायमंजिरी'कार जयंतभट्टाचे 'आगमाम्बर' नावाचे अप्रकाशित नाटक रूपकात्मक आहे, असे म्हणतात.

'प्रबोधचन्द्रोदय'या नाटकाच्या नावाचा अर्थ 'ज्ञानरूपी चंद्राचा उदय' असा होतो. प्रबोधन म्हणजे जाग येणे, आध्यात्मिक जाणीव होणे. नाटकातील पुरुषास परमेश्वराशी असलेल्या ऐक्यभावाची विस्मृती झाली. त्यास जणू झोप लागली आहे असे समजून विद्येने त्याला जागे केले. जाग आल्यावर त्याला ऐक्याची जाणीव झाली, असा एकंदर कथाभाग आहे. सदर समासाचा विग्रह 'प्रबोधः एव चन्द्रः प्रबोधचन्द्रः। तस्योदयः प्रबोधचन्द्रोदयः।' असा करण्यात येतो. या नाटकाची आवृत्ती निर्णयसागर मुद्रणालयाने प्रकाशित केली असून तिच्यात 'चंद्रिका' व 'प्रकाश' या दोन संस्कृत टीकांचा समावेश आहे.

* * *

हे रूपकात्मक नाटक आहे. याचे संविधानक थोडक्यात असे सांगता येईल. पुरुष आणि माया या जोडप्यास मनस हा पुत्र झाला. त्याला प्रवृत्ती व निवृत्ती अशा दोन बायका होत्या. त्याला प्रवृत्तीपासून मोह व निवृत्तीपासून विवेक अशी दोन स्त्रियांपासून दोन मुले झाली. मनसने अहंकाराच्या मदतीने पुरुषाला संभ्रमात टाकले. या कामी मोह वगैरेनी मनसला साह्य केले. अहंकाराच्या प्रभावाने पुरुषाला आपल्या मूळ स्वरूपाचे विस्मरण झाले.

पुरुषाच्या विवेक या दुसऱ्या मुलास मती व उपनिषद् अशा दोन बायका होत्या. त्याला उपनिषद् या स्त्रीपासून विद्या ही कन्या व प्रबोधचंद्र हा पुत्र झाला. पुरुषाला आपल्या मूळ स्थितीला आणण्यासाठी विद्या व प्रबोधचंद्र यांच्या मदतीची आवश्यकता होती. पण या बाबतीत मनसच्या मोह आणि विवेक या दोन पुत्रातच संघर्ष सुरू झाला.

मोह हा आपला पणतू दंभ यास बनारस येथे जाऊन शम-दमाच्या कार्यात विघ्न आणण्यास सांगतो. दंभ हा अहंकाराचा पुत्र लोभ याचा मुलगा आहे. दंभ व अहंकार यांची बनारसमध्ये भेट होते. मोहाचा परममित्र चार्वाक हा मोहास विष्णुभक्तीची कल्पना देतो. त्यानुसार मोह कामादी षड्रिपूंना विष्णुभक्तीच्या विरोधात काम करण्यास सांगतो.

इकडे विष्णुभक्ती स्वस्थ बसलेली नसते. ती श्रद्धेकरवी विवेकास निरोप पाठवते. त्यात ती विवेकास काम व क्रोध या मोहाच्या सहकाऱ्यांचा पराभव करण्यास सांगते. एकदा त्याचा पाडाव झाला की वैराग्य उत्पन्न होण्यास वेळ लागणार नाही. मग विवेक हा मोहाशी लढा देण्यासाठी बनारसला येतो. यानंतर लढाईस प्रारंभ होतो.

प्रथम आस्तिक व नास्तिक या दोन्ही मतांना विरोध करणाऱ्या चार्वाकाचा त्या लढाईत पाडाव होतो. त्याबरोबर त्याच्याशी मैत्री असणारे बौद्ध, जैन व कापालिक पंथी तेथून पळ काढतात. मग पुरुषाचे आपल्या अंतर्गत शत्रूशी युद्ध होते. त्यात वस्तुविचार कामास, क्षमा क्रोधास, संतोष हा लोभास, अनसूया ही मत्सरास पराभूत करतात. त्यामुळे मोह अदृश्य होतो.

सरस्वतीच्या उपदेशाने मनस ताळ्यावर येतो व तो उपदेशग्रहणास तयार होतो. त्याच्या मनात वैराग्य निर्माण होते. ममता पाशापासून त्याची सुटका होते. मनाला शांती प्राप्त होते. पुरुषाला आपल्या मूळ स्वरूपाचे स्मरण होऊ

लागते. विष्णुभक्तीच्या कृपेने तो ध्यानात मग्न होतो. त्याला आपण परमेश्वर असल्याची जाणीव होते. अखेरीस तो विष्णुरूपात विलीन होतो.

* * *

वर नाटकातील कथानकाचा त्रोटक गोषवारा दिला आहे. कृष्णमिश्राने वेदान्तमताचा वैष्णव मताशी समन्वय केला आहे व त्यास भक्तीची जोड दिली आहे. शंकराचार्यांच्या अद्वैत वेदांतात वैष्णव संप्रदाय व भक्ती या दोन्हीं गोष्टी आढळत नाहीत. भागवत पुराणात कृष्णभक्तीला महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. नाटककाराने मुख्यत्वे करून याचाच आश्रय केला आहे. भक्तीमुळे पुरुषाला ज्ञानाची प्राप्ती होते व त्यायोगे त्याला आपले विष्णुरूपाशी ऐक्य असल्याची जाणीव होते, हे या नाटकाचे प्रमुख सूत्र आहे.

नाटकात सत्प्रवृत्ती व दुष्प्रवृत्ती यांच्यातील संघर्ष दर्शविला आहे. भगवद्गीतेत ज्याप्रमाणे दैवी संपत्ती व आसुरी संपत्ती अशा दोन बाजू सांगून प्रत्येक बाजूला असलेल्या गुणांची यादी दिलेली आहे, तसेच येथेही केले आहे. तो संघर्ष साकार करण्यासाठी सद्गुण व दुर्गुण यांना मनुष्यरूप दिले आहे.

यात वैदिक व अवैदिक पंथांचा उल्लेख आलेला आहे. वैदिक पंथात मीमांसा, न्याय, वैशेषिक व सांख्य ही दर्शने आहेत. पूर्वमीमांसेतील भाट्ट व प्राभाकर या दोन्ही पंथाचा निर्देश आहे. योग हा स्वतंत्रपणे सांगितलेला नसला तरी त्याला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. शैव व वैष्णव हे दोन्ही संप्रदाय वैदिक पंथातच मोडतात.

अवैदिक अथवा नास्तिक दर्शनात चार्वाक, बौद्ध व जैन हें पंथ येतात. नाटकात चार्वाक मतास महत्त्वाचे स्थान आहे. कारण नास्तिक मताचा तोच मोठा प्रसारक असून वैदिक मताचा विरोधक आहे. चार्वाक मताची स्थापना वाचस्पती अथवा बृहस्पतीने केली असून त्यांना लोकायत असे दुसरे नाव आहे. हे पूर्ण जडवादी आहेत. त्यांचा वर्णव्यवस्था व नीतिमत्ता यांच्यावर विश्वास नाही. त्यांच्या मते प्रत्यक्ष हे एकच ज्ञानाचे प्रमाण असून अर्थ व काम असे दोनच पुरुषार्थ आहेत. ते देहालाच आत्मा मानतात. त्यांचा इंद्रियभोगावर भर आहे. या मताचे विस्तृत प्रतिपादन दुसऱ्या अंकात आहे. त्यासाठी चार्वाक हे पात्रही घातलेले आहे. कृष्णमिश्राच्या मते जैन व बौद्ध हे पंथ चार्वाक मतावर आधारलेले आहेत. कापालिकांचाही यात उल्लेख आहे. त्यांच्या भ्रष्ट आचारांचे नाटकात स्पष्ट दर्शन घडवले आहे.

अशा या विरोधी मताचा पाडाव केल्याशिवाय वैदिक मताचा निभाव लागणे अशक्य आहे. या नास्तिक मताबरोबर शरीरातील कामादी षड्रिपू व त्यांचा गोतावळा हाही यथार्थ ज्ञानास मारकच आहे. गीतेतही काम आणि क्रोध हे दोन मोठे शत्रू असून त्यांना आटोक्यात आणण्यासाठी प्रथम इंद्रियांवर विजय मिळवला पाहिजे, असे म्हटले आहे. त्याच मताचे सविस्तर प्रतिपादन करून नाटककाराने भक्तिमार्गाचा उपदेश केला आहे.

ज्ञानप्राप्ती होण्यासाठी अवैदिक मार्ग उपयुक्त नाहीत हे प्रथम समजणे आवश्यक आहे. ते मार्ग चुकीचे आहेत इतकेच नव्हे, तर घातक आहेत हे ध्यानात घेतले पाहिजे. नुसते विरोधी विचार नष्ट होऊन चालत नाही. खरे ज्ञान होण्यासाठी वैदिक मार्ग हेच पुरुषाचे खरे मित्र आहेत.

ज्याला आपण रूढ अर्थाने धर्म म्हणतो त्या धर्माची व त्यातील कर्मकांडाची कृष्णमिश्राने उपेक्षा केलेली आहे. त्याच्या मते माणसाच्या आध्यात्मिक प्रगतीत धर्माला स्थान नाही. त्यामुळे नित्य व नैमित्तिक कर्माचे अनुष्ठान यात सांगितलेले नाही. तसेच गीतेत प्रतिपादन केलेला निष्काम कर्मयोगही त्यात अभिप्रेत नाही. विवेक, वैराग्य, ध्यानमार्ग व भक्तिमार्ग यावरच त्याने भर दिलेला आहे. अर्थात त्याने वेदांत मतातून कोणते विचार घेतले आहेत व त्यास कृष्णभक्तीची कशी जोड दिली आहे हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. येथे नाटकाच्या स्वरूपाची कल्पना येण्यासाठी स्थूलमानाने माहिती दिली आहे.

संस्कृत नाटकाच्या ऱ्हासकाळातील हे एकमेव असे महत्त्वाचे नाटक आहे. नाटककाराने यात एक स्वतंत्र विषय घेऊन त्याची अभिनव पद्धतीने मांडणी केली आहे, ही खरोखर कौतुकाची गोष्ट आहे. हे नाटक अत्यंत वाचनीय व विचारास खाद्य पुरवणारे आहे. यास्तव येथे थोड्या विस्ताराने परामर्श घेतला आहे.

'प्रबोधचन्द्रोदया'च्या आधारे मराठीत रचना झालेली आहे. 'मनश्चन्द्रबोध' या नावाचा ओवीबद्ध ग्रंथ रचण्यात आलेला आहे. पण तो कोणी रचला हे ज्ञात नाही. पण त्याच्या आधारे श्री. नेवाळकरांनी 'मनोविजय' नामक नाटक लिहिले होते. यातील विवेकाची भूमिका मराठीतील सुप्रसिद्ध संगीतनट श्री. दत्तोबा हल्याळकर करीत असत, अशी माहिती नाटककार श्री. भा.वि. वरेरकरांनी आपल्या 'नाटकी संसारात' दिली आहे. (पाहा - माझा नाटकी संसार, पृष्ठ - १७६)

उपदेशात्मक किंवा रूपकात्मक आणखी काही नाटके याप्रमाणे सांगता येतील. यश:पाल या नाटककाराने 'मोहपराजय' या नाटकाची इ.स. १२३० च्या सुमारास रचना केली. या नाटकात कुमारपालाने जैन धर्माचा स्वीकार केल्याची हकीकत आली आहे. तसेच त्याचा कृपासुंदरीशी विवाह झाल्याचे वर्णन आहे. यानंतर वेंकटनाथ किंवा वेंकटेश याने संकल्प-सूर्योदय या नावाचे दहा अंकी नाटक लिहिले आहे. हे नाटक एका टीकेसह प्रकाशित झाले आहे.

इ.स.१५२५ च्या सुमारास कर्णपूराचे 'चैतन्यचन्द्रोदय' हे नाटक रचण्यात आले. हे नाटक प्रतापरुद्राच्या आदेशानुसार लिहिण्यातआले, असे म्हटले आहे. हे काव्यमाला संस्कृतग्रंथमालेत १९०६ मध्ये प्रकाशित झाले आहे. गोकुलनाथ उपाध्यायांनी 'अमृतोदय' या नाटकाची इ.स.१६९३ च्या आसपास रचना केली. हे नाटक पांडित्यपूर्ण असून यात श्रुति, आन्वीक्षिकी, पतंजलि, जाबालि अशी पात्रे आहेत. हेही नाटक काव्यमाला ग्रंथमालेत प्रसिद्ध झाले आहे.

* * *

## जयदेव

संस्कृत वाङ्मयेतिहासात जयदेव नावाचे अनेक कवी होऊन गेले आहेत. जर्मन पंडित ऑफ्रेट यांच्या सूचीत जयदेव नावाचे पंधरा लेखक आहेत असे म्हटले आहे. प्रस्तुतच्या 'प्रसन्नराघव' या नाटकाचा कर्ता जयदेव हा 'गीतगोविंद'कार जयदेवाहून वेगळा आहे. याने नाटकाच्या प्रस्तावनेत आपल्या आईचे नाव सुमित्रा व वडिलांचे नाव महादेव असे सांगितले आहे. तसेच आपण 'कौंडिन्य' गोत्राचे असल्याची माहिती दिली आहे. 'चंद्रालोक' या अलंकारशास्त्रावरील ग्रंथाचा कर्ता जयदेव व प्रसन्नराघवाचा कर्ता हे दोघे एकच आहेत. कारण त्यानेही आपल्या आई-वडिलांची नावे हीच दिली आहेत. पीयूषवर्ष हे याचेच दुसरे नाव असावे. याचे जन्मगाव विदर्भातील कुंडिनपूर हे आहे. नैयायिक जयदेव मिश्र ऊर्फ पक्षधर हा मात्र आपल्या जयदेवाहून वेगळा आहे.

जयदेवाचा काल निश्चित करण्यासाठी दोन ठळक पुरावे उपलब्ध आहेत ते याप्रमाणे -

(१) जयदेवाने चंद्रालोकामध्ये मम्मटाच्या काव्यप्रकाशात दिलेल्या काव्यलक्षणावर टीका केलेली आहे. मम्मटाचा काळ अकराव्या शतकाचा

उत्तरार्ध हा असल्याने जयदेव हा या काळानंतर होऊन गेला, हे स्पष्ट आहे. तेव्हा अकराव्या शतकाचा उत्तरार्ध ही त्याच्या काळाची पूर्वमर्यादा मानता येईल.

(२) त्याने रुय्यकाच्या 'अलंकार सर्वस्वा'तील उक्तीचे अनुकरण केलेले आहे. उदा. 'तुल्यबल विरोधो विकल्पः' (अलं. सर्वस्वः) तर 'विकल्पस्तु तुल्यबलयो विरोधश्चातुरीयुतः' (चंद्रा. ५.९६). या रुय्यकाचा शिष्य मंख अथवा मंखुक हा काश्मीरचा राजा जयसिंह (इ.स. ११२८ ते ४९) याच्या दरबारात होता. यावरून जयदेव हा बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला असावा.

पण डॉ. रमाशंकर त्रिपाठी प्रसन्नराघवाच्या हिंदी आवृत्तीत सांगतात की या नाटकाच्या प्रस्तावनेतील 'यस्याश्चोरश्चिकुर' (अंक १, श्लोक २२) या श्लोकातील हर्षाचा उल्लेख हा 'नैषधीयचरित कार हर्षाचा आहे. आता नैषधीयचरित कार हर्ष हा बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला. या पुराव्यावरून जयदेव हा बाराव्या शतकाच्या शेवटी होऊन गेला असे म्हणावे लागेल, परंतु हे मत पटणारे नाही.

जयदेवाच्या काळाची उत्तरमर्यादाही निश्चित करता येते. विश्वनाथाने आपल्या 'साहित्यदर्पणा'त 'प्रसन्नराघव' नाटकातील 'कदली कदली करभः करभः' (प्रसन्न. अंक १, श्लोक ३७) हा श्लोक उद्धृत केला आहे. विश्वनाथ हा चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. म्हणजे तेराव्या शतकाची अखेर ही जयदेवाच्या कालाची उत्तरमर्यादा आहे, असे म्हणता येईल. सारांश जयदेव हा इ.स.१२०० ते १२५० च्या दरम्यान होऊन गेला असे निश्चितपणे म्हणता येते.

* * *

या नाटकात सीता स्वयंवरापासून रावणवधापर्यंतचा कथाभाग आहे. जयदेवाने रामायणकथेत फारसे बदल केलेले नाहीत. सीता लक्ष्मणास कठोर शब्दांनी ताडन करते तो प्रसंग व वालीचा कपटाने केलेला वध हे प्रसंग जयदेवाने गाळलेले आहेत. त्याने केलेला विशेष बदल म्हणजे त्याने राम आणि सीता यांची भेट स्वयंवरापूर्वीच घडवून आणली आहे. तसेच नवीन रचून घातलेला प्रसंग म्हणजे रावण बिभीषणास संपवण्यासाठी त्याच्यावर एक शक्ती फेकतो. लक्ष्मण ती शक्ती आपल्या छातीवर झेलतो व मूर्च्छित होतो. पण त्यामुळे बिभीषणाचे प्राण वाचतात.

नाटकाच्या पाचव्या अंकात दोन नद्यांचा संवाद आहे. सहाव्या अंकात गर्भाङ्काची (म्ह. नाटकात नाटक दर्शवणे) योजना आहे. यात रत्नशेखर हा विद्याधर लंकेतील वृत्तांत इंद्रजाल विद्येच्या योगाने रामापुढे सादर करतो. ही कल्पना मात्र नवीन व मनोरम आहे.

अशा प्रकारे या नाटकाचे एकंदर स्वरूप पाहिले तर यात नाट्यगुण फारच थोडे आहेत. जयदेवाची प्रतिभा नाट्यरचनेस मुळीच अनुकूल नाही. यापेक्षा त्याने काव्यरचना केली असती तर ती अधिक प्रभावी ठरली असती. या नाटकातील चौथा अंक सर्वात सरस आहे. राम आणि परशुराम यांच्या स्वभावांचे विशेष यात प्रकट झाले आहेत. परशुरामाचे धगधगीत व्यक्तिमत्त्व याने प्रभावीपणे साकारले आहे. पण खलनायक असलेल्या रावणाचे स्वभावचित्र अत्यंत सुमार उतरलेले आहे. लंकेवर झालेल्या आक्रमणाच्या वृत्तांताचा तो 'काल्पनिक' म्हणून उपहास करतो. यात त्याचा पोरकटपणाच दिसून येतो.

जयदेवाची भाषा सुबोध व रसाळ आहे. श्लोकरचनाही सुश्लिष्ट आहे. त्याने शृंगार व वीर या दोन रसांचा उत्तम परिपोष केला आहे. वर सांगितल्याप्रमाणे नाटकातील चौथा अंक उत्तम वठला आहे. पण नाट्यदृष्ट्या पाहिले तर निराशा पदरी येते. अनेक महत्त्वाचे प्रसंग कोरड्या निवेदनातून व्यक्त केले आहेत. मुख्य म्हणजे रामकथेचा कोणताही नवा अर्थ त्याला अभिप्रेत नाही. त्याच्यावर भवभूतीची छाप दिसते. यातील काही वाक्ये 'उत्तररामचरितातील' वाक्यांची आठवण करून देतात. 'हे संस्कृत नाटकांच्या ऱ्हास काळातील नाटक आहे.' हे डॉ. कीथ याचे विधान अगदी योग्य आहे.

* * *

## वामन बाणभट्ट

'पार्वतीपरिणय' हे नाटक वत्सकुलातील अभिनव बाण अथवा वामन बाण याने लिहिले असून तो इसवी सनाच्या पंधराव्या शतकात होऊन गेला, असे पंडित आर.व्ही. कृष्णम्माचारियर यांनी आपल्या 'संस्कृत वाङमयाच्या इतिहासा'त म्हटलेले आहे. त्याने याव्यतिरिक्त नलाभ्युदय, शृंगारभूषण बाण, वेमभूपालचरित इत्यादि ग्रंथ रचले आहेत.

या नाटकाचे कथानक ‘कुमारसंभवा’वर आधारलेले आहे. किंबहुना नाटककाराने ‘कुमारसंभवा’तील कथा घेऊन तिचे नाटकात रूपांतर केले आहे, असे म्हटले तर अधिक योग्य होईल. पूर्वी हे नाटक ‘कादंबरीकर्त्या’ बाणभट्टाने लिहिले आहे, अशी समजूत होती. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या ‘संस्कृत कविपंचक’ या पुस्तकात या मताचे खंडन केले आहे. तथापि म.म.डॉ. पां.वा.काणे, लोकमान्य टिळक व ‘बाणाभट्टा’चे चरित्रकार पांडुरंगशास्त्री पारखी यांच्या मते हे नाटक बाणभट्टाचेच आहे. पण आता त्यांचे मत कोणी मानत नाही. असो.

पित्याच्या यज्ञकुंडात उडी घेणारी सतीच पुढील जन्मात पार्वती होऊन हिमालयाच्या पोटी जन्माला आली. तिच्या मनाची स्वाभाविक ओढ शंकराकडे होती. नारदाने हिमालयास तिला शंकराच्या सेवेसाठी पाठवण्यास सांगितले. त्याप्रमाणे पार्वती ध्यानस्थ शिवाची परिचर्या करू लागली.

त्रिपुरासुराचा पिता तारकासुर याचे स्वर्गावर आधिपत्य होते व त्याचा वध शंकराच्या पुत्राकडून होणार होता. शंकराचे मन कामातूर करण्यासाठी इंद्रादी देवांनी मदनाची योजना केली. पार्वती शिवास वंदन करीत असता मदनाने त्याच्यावर बाण रोखला. शिवाच्या मनात क्षणभर चलबिचल झाली. पण लगेच त्याने आपल्या मनात झालेल्या बदलाचे कारण शोधले. मदन दृष्टीस पडताच त्याच्या तृतीय नेत्रातून अग्निरेषा उफाळली. मदन त्या आगीत जळून खाक झाला. रती बेशुद्ध पडली. ती शोक करू लागताच आकाशवाणी झाली ‘शंकर जेव्हा पार्वतीशी विवाह करील तेव्हा मदन जिवंत होईल.’

मदनदहनामुळे पार्वती निराश झाली. तिने उग्र तपश्चर्या करून शंकरास प्रसन्न करून घेण्याचे ठरवले. त्याप्रमाणे ती कठोर तपाचरण करू लागली. शंकरास ही वार्ता समजली. त्याने नंदीस पाठवून ती हकीकत जाणून घेतली. मग बटूचा वेष घेऊन तो पार्वतीकडे आला. त्याने मुद्दामच आपली (म्ह. शंकराची) निंदा केली व इतर कोणत्या तरी देवाशी विवाह करण्याचा सल्ला दिला. पार्वती खवळली. तिने बटूच्या आक्षेपास उत्तर दिले. मग शंकर प्रकट झाला. त्याने गांधर्व-विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. पण पार्वतीच्या मैत्रिणींनी त्यास हिमालयाकडे कन्येस मागणी घालण्यास सांगितले.

सप्तर्षींनी त्याप्रमाणे मागणी घातली. दोघांचा विवाह ठरला. सारे देव आले. लग्नसोहळा संपन्न झाला. त्याबरोबर मदन जिवंत झाला. देवांनी शंकरास पुत्रोत्पत्ती करण्याची विनंती केली. भरतवाक्य होऊन नाटक समाप्त होते.

* * *

नाटककाराने हा कथाभाग 'कुमारसंभवा'मधून जसाच्या तसा घेतलेला आहे. काही किरकोळ बदल केले आहेत पण ते नगण्य आहेत. या कथेस नाटकाचे स्वरूप देण्यात बाणास कितपत यश आले आहे हे आता पाहावयाचे आहे.

स्पष्ट सांगायचे झाल्यास महाकाव्याच्या आधारे नाट्यरचना करण्याचा कवीचा प्रयत्न साफ फसलेला आहे. उदा.-

(१) शंकराने मदनास जाळल्याचा प्रसंग कुमारसंभवाच्या तिसऱ्या सर्गात आला आहे. या भागाचे नाट्यात रूपांतर करताना नाटककाराने निवेदनाचा आश्रय केला आहे. नाटकाच्या तिसऱ्या अंकात नारदमुनी येऊन इंद्र व बृहस्पतींना हा वृत्तांत सांगतात असे दर्शविले आहे. त्या निवेदनात कुमारसंभवातील वर्णनाचा गोषवारा आला आहे.

(२) शिवाने बटुवेश धारण करून पार्वतीची परीक्षा घेतल्याचा प्रसंग नाटकात अगदी सपक उतरला आहे. शिवाने केलेली स्वनिंदा व पार्वतीने त्याच्या आक्षेपास दिलेली तिखट उत्तरे हा प्रसंग खरे तर नाट्यास अत्यंत अनुकूल आहे. कुमारसंभवाच्या पाचव्या सर्गातील हा संवाद संस्कृत वाङ्मयात अजरामर ठरलेला आहे. पण नाटककाराने दोन-चार श्लोकातच हा प्रसंग गुंडाळून त्याचा पार विचका केला आहे.

(३) नाटकाच्या पाचव्या अंकात आणखी एक सुमार प्रसंग घातलेला आहे. शंकर-पार्वतीचे लग्न ठरले आहे. वधूला सजवण्याचे काम चाललेले आहे. कौशिकी नावाची एक प्रौढ स्त्री हिमालयाकडे येते व आपण पार्वतीस कसे नटवले आहे, ते विस्ताराने सांगते. त्या वर्णनासाठी नाटककाराने बारा श्लोक घातले आहेत. त्यात कुमारसंभवाच्या सातव्या सर्गातील वर्णनाच्या सारांशाव्यतिरिक्त काही नाही.

यापेक्षा नाटककाराने 'कुमारसंभवा'चे कथासूत्र घेऊन त्याचा स्वतंत्रपणे विस्तार केला असता तर त्याला अधिक यश आले असते. या नाटकावर कडक टीका करताना विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणतात -

''पार्वतीपरिणय' म्हणून एक नाटक बाणकवीच्या नावाने आमच्या पाहण्यात आले आहे. ते या विख्यात कवीनेच रचिले किंवा कसे याचा लांब वाद करणे नलगे. जो यातील एखादा अंक वाचील त्याला त्याच्या अप्रयोजकपणाचा व ग्रंथकर्त्यांच्या साहसाचा चमत्कार वाटल्यावाचून राहणार नाही. बाणकवीचे नाव व कुमार-संभवातील चोरलेला मजकूर ही यातून वजा केली असता ग्रंथकाराचा मूर्खपणा व धाडसाची शर्थ हीच खालची निव्वळ बाकी.''

-(संस्कृत कविपंचक)

# अन्य नाटकांचा आढावा

नाटक या रूपकाच्या मुख्य प्रकारानंतर प्रकरणादी जे इतर प्रकार आहेत त्यांची या प्रकरणात माहिती घ्यावयाची आहे. प्रकरण हे नाटकापेक्षा मोठे असून ते सामाजिक वातावरणयुक्त असते. शूद्रकाचे मृच्छकटिक व भवभूतीचे मालती-माधव ही दोनच प्रकरणे प्रसिद्ध आहेत. मालती-माधवाचे सर्वतोपरी अनुकरण करून पंधराव्या अथवा सतराव्या शतकात होऊन गेलेल्या उद्दंडीने 'मल्लिकामारुत' या प्रकरणाची रचना केली आहे.

उद्दंड अथवा दंडी हा कांची प्रांतातील लाटपूर या गावाचा रहिवासी असून त्याचे कुलनाम वाघूल असे होते. सदर नाटकाचा प्रयोग कुक्कुयकोड (म्ह. कालिकत) येथील विक्रमराजाच्या समोर सादर करण्यात आला. या प्रकरणात दहा अंक आहेत. याची कथावस्तू म्हणजे मालती-माधवाची सही सही नक्कल आहे. पाटलीपुत्र नगरीच्या परिसरातील आश्रमात मंदाकिनी (कामंदकी) ही संन्यासिनी राहात असते. अमात्य विश्वावसूस (भूरिवसू) मल्लिका (मालती) नावाची कन्या असते व तिचे मारुतावर (माधव) प्रेम असते. पण त्याच नगरीतील शंबरक (नंदन) हा अमात्य राजामार्फत मल्लिकेला मागणी घालतो. मल्लिकेच्या पित्याची तो फसवणूक करतो त्यामुळे तो आपली कन्या शंबरकास द्यावयास तयार होतो. मारुताचा मित्र कलकंठ (मकरंद) याचे रमयंतिका (मदयंतिका) नामक तरुणीवर प्रेम असते.

मल्लिकेस शंबरकाला देण्याचे ठरले हे समजताच मारुत निराश होऊन देवीच्या देवळात जाऊन आत्महत्येचा प्रयत्न करतो. इतक्यात एक राक्षस आकाशमार्गाने मल्लिकेला पळवून नेताना दिसतो. मल्लिका किंचाळते व त्याच्या हातून सुटून खाली येऊ लागते. मारुत तिला झेलतो. त्या राक्षसावर वार करताच एक दिव्य

पुरुष प्रकट होतो व त्याचे नाव माकंद असे होते. तो मारुताला मदत करण्याचे कबूल करतो.

नंतर मंदाकिनी ही मल्लिका व मारुत यांचे गुप्तपणे लग्न लावते. माकंद हा मल्लिकेचा वेष घेऊन शंबरकाशी लग्न लावतो. एकांतात तो शंबरकाला चांगले बदडून काढतो. शंबरकाचा शिष्य रमयंतिकेशी लग्न करणार असल्याने माकंदाचा सेवक रमयंतिकचा वेश घेऊन त्यालाही फसवतो. तिकडे कलकंठ व रमयंतिका यांचेही लग्न लागते.

मग मल्लिका अचानक बेशुद्ध पडते. तिच्यावर उपचार करण्यासाठी मंदाकिनी तिला गुप्तपणे आकाशमार्गाने कांचीला घेऊन जाते. बाकीच्यांना काहीच ठाऊक नसल्याने सर्व जण शोक करू लागतात. शेवटी मंदाकिनी तिला घेऊन आल्यावर सर्व जण आनंदित होतात. शेवटच्या अंकात मंदाकिनी मल्लिका व मारुत यांच्या पूर्वजन्मातील हकीकत सांगते व भरतवाक्य होऊन नाटक संपते.

वर कथानकाची त्रोटक रूपरेषा दिली आहे. त्यावरून नाटककाराने भवभूतीची किती उसनवारी केली आहे हे स्पष्ट दिसते. त्याने दोन-तीन प्रसंगात बदल केले आहेत पण ते कलात्मक ठरण्यापेक्षा रसभंग करणारे ठरले आहेत. मालती-माधवात अघोरघंटाची शिष्या कपालकुंडला ही मालतीचे अपहरण देवीपुढे बळी देण्याच्या उद्देशाने करते. या नाटकात राक्षस मल्लिकेला कशासाठी पळवतो ते समजत नाही. तसेच अघोरघंटाच्या हत्येचा सूड घेण्यासाठी कपालकुंडला मालतीला दुसऱ्यांदा पळवते पण येथे फुसके कारण सांगून मंदाकिनी तिला कांचीला नेते.

त्यांचप्रमाणे मकरंद स्वत: मालतीचा वेश घेऊन नंदनाशी लग्न करतो पण येथे तिसराच एक राक्षस ते काम करतो. भवभूतीच्या योजनेमुळे मुख्य कथा व उपकथा यात संबंध जोडला गेला आहे. तसेच दहाव्या अंकात सांगितलेली पूर्वजन्माची हकीकत अगदी पोरकट व अनावश्यकही आहे. सारांश मालती-माधवसारखे प्रकरण रचण्याचा उद्दंडीचा प्रयत्न पूर्ण फसलेला आहे.

हेमचंद्राचा शिष्य रामचंद्र (इ.स.११५०) याने कौमुदी-मित्रानंद नावाचे दशांकी प्रकरण लिहिले आहे. नाटकात अद्भूत प्रसंगांची अगदी रेलचेल आहे. यात नावालाही नाट्य नाही. कथानकातही संगती आढळत नाही. डॉ. कीथ यांनी सदर प्रकरणाची रचना आधुनिक प्रकारासारखी (Pantomime) आहे असे म्हटले आहे. नाटककाराने मुरारीचा उल्लेख केला आहे.

जैन नाटककार रामभद्र मुनी याने प्रबुद्धरोहिणेय नामक सहा अंकी प्रकरणाची रचना केली आहे. यात्रेच्या वेळी जैन-मंदिरात याचा प्रयोग करण्यात आला. सदर नाटककार इ.स.१२०० च्या आसपास होऊन गेला. याही प्रकरणात विचित्र प्रसंग आलेले आहेत. तसेच या सुमारास होऊन गेलेल्या यशश्चंद्राने 'मुद्रित कुमुदचंद्र' नामक प्रकरण रचले आहे. हा धर्कट वंशात होऊन गेलेल्या धनदेवाचा नातू व पद्मचंद्राचा पुत्र आहे. नाटकाचा विषय एकदम वेगळा आहे. यात श्वेतांबर मुनी आचार्य देवसुरी व कुमुदचंद्र यांच्यात झालेल्या वादाचे वर्णन आहे. हा वाद इ.स.११२४ मध्ये झाला होता असे म्हणतात. या वादात कुमुदचंद्राचा पाडाव झाला असल्याने नाटकाचे नाव 'मुद्रित कुमुदचंद्र' असे ठेवलेले दिसते. अशा प्रकारची प्रकरणे फारच थोडी लिहिण्यात आली आहेत.

* * *

## भाण

'भाण' या प्रकाराची सामान्य माहिती मागे दिली आहे. तसेच चतुर्भाणीचाही उल्लेख केला आहे. भाणांची संख्या भरपूर आहे. पंधराव्या शतकात होऊन गेलेल्या वामन बाणाचा **'शृंगारभूषण'** भाण प्रसिद्ध आहे. भाणात एकटा विटच बोलत असतो. या भाणात विलासशेखर नावाचा विट बोलत आहे. त्याला वेश्यावस्तीमधून हिंडण्याची आवड आहे. मेंढ्यांच्या टकरा, कोंबड्यांची झुंज, भांडण, झगडे यांची यात वर्णने आहेत.

रामभद्र दीक्षितांचे **शृंगारतिलक** अथवा अय्याभाण याच प्रकारचे आहे. याचा प्रयोग मदुरेच्या मीनाक्षीदेवीच्या विवाहोत्सवात करण्यात आला. नायक भुजंगशेखर हा पत्नीच्या विरहाने व्याकूळ झाला आहे व वेश्यांच्या वसतिस्थानात फिरत आहे. अखेरीस त्याचे आपल्या प्रेयसीशी मीलन होते. शंकरमिश्राच्या **'शारदातिलक'** भाणात याच प्रकारची दीर्घ वर्णने आहेत. इ.स.१७०० च्या सुमारास होऊन गेलेल्या नल्लाकवीने **'शृंगारसर्वस्व'** नामक भाण लिहिला आहे. यातील नायक अनंगशेखर हा आपल्या प्रियेपासून वियुक्त झालेला आहे. एका उन्मत्त हत्तीने रस्त्यातील लोकांना घाबरवून सोडले होते. नायक त्या हत्तीला गणेश समजून त्याची पूजा करतो. त्या हत्तीमुळेच त्याची प्रिया त्याला भेटते, असा चमत्कारिक कथाभाग आहे. वत्सराजाने रचलेल्या **'कर्पूरचरित'** या भाणाचा उल्लेख मागे आलेला आहे.

* * *

## प्रहसन

महेंद्रविक्रमाचे **'मत्तविलास'** हे प्रहसन अग्रगण्य आहे. गणपतिशास्त्रींनी त्रिवेंद्रम ग्रंथमालेत हे प्रसिद्ध केले आहे. याचा कर्ता महेंद्रविक्रम हा पल्लव राजा इसवी सनाच्या सातव्या शतकात कांचीवर राज्य करीत होता. याने प्रस्तुत प्रहसनाची रचना केली आहे. याची प्रस्तावना भासाच्या नाटकाच्या प्रस्तावनांची आठवण करून देते, पण लेखकाने आपले नाव व पुस्तकाचे नाव देण्याची काळजी घेतली आहे.

यात शैवपंथी कापालिक, त्याची प्रिया देवसोमा व एक बौद्ध भिक्षू यांचा रस्त्यावरील गोंधळ दाखवला आहे. हा कापालिक सांगतो की मद्यप्राशन करून सुंदर स्त्रीचे मुखावलोकन करणे हाच मोक्षाचा मार्ग आहे. तर बौद्ध भिक्षू हा आपल्याला मद्यप्राशन करण्याची अथवा स्त्रीचा उपभोग घेण्याची बुद्धाने परवानगी दिली नाही म्हणून दु:खी आहे. एवढ्यात कापालिकाचे भिक्षापात्र हरवते व तो ते बौद्ध भिक्षूने चोरल्याचा आरोप करतो. नंतर तेथे पाशुपत पंथी येतो. कापालिकाचे भिक्षापात्र एका कुत्र्याने चोरलेले होते. कापालिक भिक्षूची क्षमा मागतो. या प्रहसनावरून लेखकाला बौद्ध धर्माची बरीच माहिती असावी असे वाटते. सर्वच पंथात भ्रष्टाचार कसा शिरला होता, हे यावरून दिसून येते, डॉ. कीथ यांच्या मते हेच सर्वात जुने प्रहसन असावे.

आणखी एक उल्लेखनीय प्रहसन म्हणजे **'भगवदज्जुकीय'** हे होय. याचा कर्ता व त्याचा काळ ज्ञात नाही पण हेही प्रहसन जुने असावे. एका बौद्ध भिक्षूचा शांडिल्य नामक शिष्य अज्जुका नावाच्या गणिकेच्या प्रेमात पडला पण ती गणिका साप चावून मरण पावली. आपल्या शिष्याला ताळ्यावर आणण्यासाठी तो भिक्षू आपले प्राण गणिकेच्या शरीरात घालतो. गणिका जिवंत झाली पण तिची वृत्ती पालटली. एवढ्याने भागले नाही म्हणून यमदूतांनी गणिकेचे प्राण भिक्षूच्या शरीरात घातले. त्या दोघांचे विपरीत आचरण पाहून लोकांना आश्चर्य वाटते. आपली चूक यमदूतांना समजताच ते प्राणांची अदलाबदल करतात. सारे स्थिरस्थावर होते. या प्रकरणातील कल्पना मनोरम असून ती प्रहसनात अगदी चपखल बसली आहे. या प्रहसनाने एक प्रकारची उंची गाठली आहे.

एवढी दोन प्रहसने सोडली तर बाकीची सारी प्रहसने खालच्या दर्जाची आहेत. बाराव्या शतकाच्या मध्यावर कनोजच्या गोविंदचंद्र राजाच्या कारकिर्दीत

शंखधराने **'लटकमेलक'** हे विनोदी प्रहसन लिहिले आहे. शीर्षकाचा अर्थ गुंडांचा समूह किंवा संमेलन असा होतो. यात एका गणिकेच्या घशातला काटा वैद्य तिला नुसते हसवून बाहेर काढतो, असा यात कथाभाग आहे. पंधराव्या शतकाच्या अखेरीस नरसिंह राजाच्या काळात ज्योतिरीश्वराने **'धूर्तसमागम'** हे प्रहसन लिहिले. यात स्वत:ला साधू म्हणवून घेणारे गुरु-शिष्य हे अनंगसेना नावाच्या गणिकेच्या प्रेमात पडतात. मग दोघांत भांडण जुंपते. त्या कलहाचा निर्णय करण्याचे काम एका ब्राह्मणावर सोपविण्यात येते. पण तो ब्राह्मणही गणिकेच्या सौंदर्यावर मोहित होतो. असा यात एकच गोंधळ आहे.

जगदीश्वराचे **'हास्यार्णव'** हे प्रहसन बरेच प्रसिद्ध आहे. पण कर्त्याचा काळ अनिश्चित आहे. राजा अनयसिंहाच्या राज्यात सर्व लोक आपापले धर्म पाळत असल्याचे पाहून राजा उद्विग्न होतो. मंत्र्याच्या सल्ल्यानुसार राजा बंधुरा नावाच्या कुंटिनीच्या घरी जातो. तेथे तिची मुलगी मृगांकलेखेशी त्याचा परिचय होतो. पुढे गुरु-शिष्यांच्या दोन जोड्या तेथे येतात व तिच्या प्राप्तीचा प्रयत्न करू लागतात. यांचा शेवट एकदम विचित्र आहे. दोन्ही गुरूंना मृगांकलेखा प्राप्त होते. तर दोन शिष्य तिच्या आईच्या नादी लागतात. या विचित्र घटनेने राजाच्या मनासारखे होते. पंडित गोपीनाथाने 'कौतुकसर्वस्व' नावाचे प्रहसन लिहिले आहे. याचाही काळ ज्ञात नाही. बंगालमध्ये दुर्गापूजेच्या उत्सवात याचा प्रयोग झाला होता. यात राजा व त्याचे मंत्री हे टीकेचे विषय आहेत. कविवत्सल राजाच्या राज्यात गोंधळ माजला आहे. लोकांना छळणे, खोटे बोलणे, धार्मिक लोकांचा तिटकारा करणे हे प्रकार चालत होते. सेनापती इतका शूर आहे की तो तलवारीने लोणी कापण्याचे काम करतो. स्वत: राजा एका गणिकेच्या फंदात अडकतो. शेवटी राजा आपले सारे राज्य ब्राह्मणांना देऊन टाकतो, असा चमत्कारिक शेवट आहे.

सामराज दीक्षितांच्या **'धूर्तनर्तक'** या सतराव्या शतकात लिहिलेल्या प्रहसनात एक शैव संन्यासी आपल्या दोन शिष्यांवर देखरेख करण्यासाठी नर्तकीची योजना करतो. ते शिष्य त्या नर्तकीच्या नादाला लागतात. पण ते न जमल्यामुळे साधूची निंदा करतात, अशी कथा आहे. अशी अनेक प्रहसने आहेत की त्यात थिल्लरपणापलीकडे काही सापडत नाही. भाण आणि प्रहसने ही हलक्या लोकांच्या करमणुकीसाठी, चार घटका हशा पिकवण्यासाठी

लिहिलेली दिसतात. त्यांचा दर्जा सुमार तर आहेच पण रचनाही व्यवस्थित नाही.

भाण-प्रहसनानंतर 'व्यायोगा'चा विचार प्रस्तुत होतो. भासाच्या 'मध्यम व्यायोग' या एकांकिकेनंतर 'व्यायोग' या प्रकारची फारशी रचना झालेली नाही. मागे उल्लेखलेल्या वत्सराजाने **'किरातार्जुनीय'** एकांकी व्यायोगाची रचना केली आहे. भारवीच्या किरातार्जुनीयातील कथानकास यात नाट्यरूप दिले आहे. बाराव्या शतकात प्रल्हादनदेवाने **'पार्थ पराक्रम'** नामक व्यायोग रचला आहे. यातील कथानक महाभारतातील विराटपर्वात आलेल्या 'उत्तर गोग्रहण' प्रसंगावर आधारलेला आहे. कौरवांनी विराटराजावर हल्ला करून त्याच्या खिल्लारातील गायी पळवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा अर्जुनाने त्यांचा प्रयत्न विफल केला. तथापि या व्यायोगाची रचना सामान्य दर्जाचीच आहे.

'साहित्यदर्पण'कार विश्वनाथाने (इ.स.१३२०) **'सौगंधिकाहरण'** या नावाची रचना केली आहे. द्रौपदीसाठी सुगंधी कमळे आणण्यासाठी भीम हा कुबेरांच्या सरोवरात प्रवेश करतो, असा यात कथाभाग आहे. तेथे त्याला हनुमान व काही यक्ष यांच्या बरोबर झगडा करावा लागतो. पण तो कमळे मिळवण्यात यशस्वी होतो व द्रौपदीची इच्छा पूर्ण होते. कांचन पंडिताने **'धनंजय विजय'** नावाची रचना केली आहे. यातील कथानकही कौरवांचा विराटावरील हल्ला यावरच आहे. अर्जुन दिव्यास्त्रांचा उपयोग करून विजय मिळवतो. अखेरीस विराटाची कन्या उत्तरा व अर्जुनाचा मुलगा अभिमन्यू यांचा विवाह होतो.

**'ईहामृग'** या प्रकाराची प्रमुख रचना वत्सराजाची आहे. त्याने कृष्णाने केलेल्या रुक्मिणीहरणाच्या प्रसंगावर चार अंकी नाट्यरचना केली आहे. खरे तर रुक्मिणी शिशूपालाची वाग्दत्त वधू असते. पण रुक्मिणीच्या विनंतीवरून कृष्ण तिला पळवून नेतो. पण याची रचना सामान्य आहे. रुक्मिणी, तिचा भाऊ रुक्मी, शिशुपाल यांच्यापैकी कोणाचेच चित्रण चांगले वठले नाही. चौथ्या अंकात विजय मिळावा म्हणून कृष्ण रंगभूमीवरच समाधी लावतो.

**'डिम'**या प्रकारातही मुख्य रचना वत्सराजानेच केली आहे. शंकराने केलेला त्रिपुरासुराचा नाश या कथेवर ही चार अंकी रचना आहे. या डिमाचे नाव **'त्रिपुरदाह'** हेच आहे. पण हे रूपक अत्यंत रटाळ आहे. रंगभूमीवर पात्रांची गर्दी आहे. शिवाचा विजय झाल्यावर देवता त्याची स्तुती करतात. नाटकाचे भरतवाक्य इंद्राच्या तोंडी घालण्यात आले आहे.

वत्सराजाने **'समुद्रमंथन'** नामक **समवकाराची** रचना केली आहे. यात तीन अंक आहेत. यात अमृतप्राप्ती हे उद्दिष्ट असले तरी नाटककाराने विष्णूला झालेली लक्ष्मीची प्राप्ती हे उद्दिष्ट मानले आहे. त्या दृष्टीने पहिल्या अंकात आपल्या सख्यांसमवेत लक्ष्मी विष्णूचे चित्र पाहात असल्याचा प्रसंग घातला आहे.

**अंक** अंथवा **उत्सृष्टिकांक** या प्रकारची रचना कमी आहे. याला प्रेषणक असे नाव दिलेले आहे. भास्करकवीचे **'उन्मत्तराघव'** हे या प्रकारचे उदाहरण आहे. या नाटकाचा रचनाकाळ ज्ञात नाही. हे नाटक म्हणजे कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीय' या नाटकातील चौथ्या अंकाची भ्रष्ट नक्कल आहे. यातील कथानकही विचित्र आहे. राम आणि लक्ष्मण सुवर्णमृगाचा पाठलाग करीत असता दुर्वास ऋषी सीतेच्या आश्रमात येतात व तिला शाप देतात. त्यामुळे सीतेचे हरिणीत रूपांतर होते. मग राम तिच्या विरहाच्या दुःखाने रानावनात हिंडू लागतो व झाडांना पशु-पक्ष्यांना तिला वृत्तांत विचारतो, अशी कथा आहे.

असा हा नाटकाव्यतिरिक्त इतर रूपक प्रकारांचा पसारा आहे. यांचे प्रयोगमूल्य बेताचेच आहे. परंतु वाङ्मयीन दृष्ट्याही ही नाटके खालच्या प्रतीची आहेत. त्यामुळे अभ्यासकांवाचून कोणाच्या वाचनात येण्यासारखी नाहीत.

या प्रकारांव्यतिरिक्त **'छायानाट्य'** हा एक प्रकार आढळतो. त्याचा ओझरता उल्लेख मागे केलेला आहे. हा प्रकार केव्हा अस्तित्वात आला हे समजत नाही. मेघप्रभाचार्यांचे **'धर्माभ्युदय'** हे या प्रकारचे पहिले नाटक मानले जाते. स्वतः लेखकानेच याचा 'छायानाटक प्रबंध' असा निर्देश केला आहे. तसेच 'पुत्रक' असा बाहुलीवाचक शब्दही दिसतो. या प्रकाराचे प्रसिद्ध उदाहरण म्हणजे सुभटाने लिहिलेले **'दूताङ्गद'** हे नाटक होय. छायानाट्याची रचना दोन अंकांच्या दरम्यान दृश्य दर्शविण्यासाठी करण्यात येत असे. हा काय प्रकार असावा हे पुरेसे स्पष्ट नाही. डॉ.ए.बी. कीथ यांनी या संदर्भात "The play itself unluckily contains nothing to help us to a decision as to its real character" (Sanskrit Drama pp 269) असे उद्गार काढले आहेत.

अशा प्रकारे रूपकाच्या अवांतर प्रकारांची संख्या मोठी आहे. अनेक नाटके अप्रकाशित आहेत. त्यांचा शोध घेणे अगत्याचे आहे. या प्रकारांची बखर होणे आवश्यक आहे. या ठिकाणी कल्पना येण्यापुरता त्रोटक आढावा घेतलेला आहे.

# आधुनिक काळातील संस्कृत नाटके

सर्वसाधारणपणे जगन्नाथ पंडिताच्या काळापर्यंत म्हणजे सतराव्या शतकापर्यंतचे संस्कृत साहित्य हे अभ्यासकांच्या नजरेसमोर असते. संस्कृत नाट्यवाङ्मयाबाबतही हीच स्थिती आहे. त्यामुळे एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील संस्कृत नाटकाबाबत सामान्य वाचकच नव्हेत तर अभ्यासकही अंधारात आहेत.

या काळात असंख्य नाटकांची निर्मिती झालेली आहे. काही नाटके प्रकाशित झाली आहेत तर बरीच नाटके हस्तलिखित स्वरूपातच पडून आहेत. नारायणशास्त्री ऊर्फ बहुल सरस्वती यांनी एकंदर ब्याण्णव नाटके रचल्याचा उल्लेख आहे. त्यांपैकी फक्त दहा नाटके प्रकाशित झालेली आहेत. तसेच मद्रास येथील श्री. व्ही. रामानुजाचार्य यांनी दशरूपकाचे जे नाटक प्रकरणादी प्रकार आहेत, त्यांना धरून दहा नाटके लिहिली आहेत. पण ही नाटके पारंपरिक आहेत. त्यांना नव्या काळाचा अथवा विचारांचा स्पर्श झालेला नाही.

विसाव्या शतकातील गेल्या साठ-सत्तर वर्षांत लिहिल्या गेलेल्या संस्कृत नाटकांकडे पाहिले तर भाषांरित नाटकांचे प्रमाण बरेच दिसून येते. इंग्रजी व मराठीतील उत्तम कलाकृतींचे भाषांतर करण्यात आले आहे. श्रीयुत रामचंद्राचार्यांनी शेक्सपिअरच्या 'ॲज यू लाइक इट' या नाटकाचे 'पुरुष दशा सप्तक' असे तर 'हॅम्लेट' नाटकाचे 'पितुरूपदेश' हे नाव देऊन भाषांतर केले आहे. कृष्णम्माचार्यांनीही 'ॲज यू लाईक इट' नाटकाचे भाषांतर केले आहे. त्यांनी दिलेले 'यथाभिमतम्' हे नाव समर्पक आहे. त्यांनी शेक्सपिअरच्या 'मिडसमर नाईटस ड्रीम' याही नाटकाचे भाषांतर केले असून त्यास 'वासंतिका

स्वप्नः' असे नाव दिले आहे. श्री. ताडपत्रीकरांनी गोएथ (Goethe) च्या 'फाऊस्ट' नाटकाचे 'विश्वमोहनम्' या नावाने भाषांतर केले आहे.

पाश्चात्त्य नाटकांप्रमाणे मराठीतील नाटकांची भाषांतरेही उल्लेखनीय आहेत. श्री. भि. वेलणकरांनी आण्णासाहेब किर्लोस्करांच्या सौभद्र नाटकाचे 'सङ्गीत सौभद्रम्' या नावाने भाषांतर केले आहे. विशेष म्हणजे नाटकातील पदेही त्यांनी त्या चालीत रूपांतरीत केली आहेत. डॉ.ग. बा. पळसुले यांनी खाडिलकरांच्या 'भाऊबंदकी' या नाटकाचे 'भ्रातृकलहम्' हे नाव देऊन भाषांतर केले आहे. मुंबईच्या ब्राह्मण सभेने हे संस्कृत रूपांतर रंगभूमीवर आणलेले होते. विख्यात अभिनेते श्री. दाजी भाटवडेकरांनी राघोबाची भूमिकाही केली होती. देवलांच्या 'शारदा' नाटकाचे श्री. लिमये यांनी 'संगीत शारदम्' या नावाने भाषांतर केले आहे. तर त्यांच्याच संशयकल्लोळ या नाटकाचे 'संशयकल्लोळम्' असे प्रा. देशपांडे यांनी भाषांतर केले आहे.

कालिदास व भर्तृहरी या संस्कृत कवींच्या जीवनाचे दर्शन घडवणारी संस्कृत नाटकेही अवतरली आहेत. श्री. वेलणकरांनी 'कालिदास चरितम्' या नाटकात तसा प्रयत्न केला आहे तर श्री. गांगलांनी भर्तृहरीच्या जीवनाचा 'भर्तृहरीयम्' या नाटकात वेध घेतला आहे. त्यासाठी त्यांनी त्याच्या शतकत्रयांचा आधार घेतला आहे. त्यातील प्रसंगोचित सुभाषितेही घेतलेली आहेत. तसेच श्री. लिमये यांनी प्रसिद्ध लेखक डॉ. कन्हैयालाल मुन्शी यांच्या मुंज राजाच्या जीवनावरील कादंबरीच्या आधारे 'पृथ्वीवल्लभम्' हे नाटक रचले आहे. हे नाटक मराठीप्रमाणे पाच अंकी असून एका अंकात अनेक प्रवेश घातलेले आहेत.

छत्रपती शिवाजी, राणा प्रताप, पृथ्वीराज चव्हाण यांसारख्या ख्यातनाम ऐतिहासिक वीरपुरुषांच्या चरित्रावरही नाट्यरचना झालेली आहे. बडोद्याच्या श्री. मूळशंकर याज्ञिकांनी 'छत्रपति साम्राज्यम्' हे दहा अंकी नाटक लिहिले आहे. त्यांनीच राणाप्रताप वर 'प्रताप विजयम्' हे नऊ अंकी नाटक रचले असून 'संयोगिता स्वयंवरम्' याही नाटकाची रचना केली आहे.

सामाजिक, विनोदी, उपहासप्रचुर अशा नाटकांची अलिकडे निर्मिती झाली आहे. त्यांपैकी सगळ्यांचीच माहिती देणे अशक्य व अनावश्यक आहे. वानगीदाखल दोन-चार नाटकांचा उल्लेख करतो. सुंदरेश शर्मा यांनी 'शृंगार शेखर भाण' या नाटकात फॅशनेबल स्त्रिया, त्यांची वेशभूषा, क्लबात जाणे वगैरे गोष्टी दर्शविल्या आहेत. केळ तिरूवेंकयाचार्य यांच्या 'अमर्षमहिमा' या

नाटकात कार्यालयात काम करणारा अधिकारी आपला राग हाताखालच्या कारकुनावर व बायकोवर काढतो, असे दाखवले आहे. शास्त्री यांच्या चामुण्डा नाटकात सनातनी लोभी आधुनिक सुधारणांना कशी नावे ठेवतात, हे दाखवले आहे.

शाळा-कॉलेजातील स्नेहसंमेलनात करण्यासाठी नाटके लिहिण्यात आली आहेत. आकाशवाणीवरूनही नवी संस्कृत नाटके सादर करण्यात आली आहेत. श्री. वेलणकरांचे योगदान प्रशंसनीय आहे. त्यांच्या 'संगीत सौभद्रम्' व 'कालिदास चरित्रम्' या नाटकांचा वर उल्लेख आलेला आहे. त्यांनी आकाशवाणीसाठी कैलासकम्प, स्वातंत्र्यलक्ष्मी, हुतात्मा दधीचि, राणी दुर्गावती, स्वातंत्र्यमणि, स्वातंत्र्य चित्ता व मध्यमपाष्टव: अशी सात नाटके लिहिली आहेत. 'कालिंदी' नावाचेही स्वतंत्र नाटक लिहिले आहे. हे नाटक रूपकात्मक आहे.

या आधुनिक नाटकांची भाषा सरळ व सहज समजेल अशी आहे. क्लिष्ट गद्य अथवा श्लोकांच्या माळा असा प्रकार आढळत नाही, तरीदेखील ही अलिकडील भाषा थोडी कृत्रिम वाटते. त्यात सहजता अथवा लालित्य प्रतीत होत नाही. संस्कृतला अनुकूल काळ नसतानाही संस्कृतात नाटके लिहिण्यात येतात व ती प्रयोगान्वितही होतात ही गोष्ट प्रशंसा करण्याजोगी आहे. हौसेपलीकडे यात फारसे काही मिळत नाही. असो. आधुनिक काळातही कशा प्रकारची नाटके रचण्यात आली आहेत, याची कल्पना येण्यासाठी हा त्रोटक आढावा घेतलेला आहे.

# संस्कृत नाटकांचा ऱ्हास

खरे तर भवभूती-भट्टनारायण यांच्या काळातच संस्कृत नाटकाला उतरती कळा लागली. या नाटककारांनी आपल्या नाटकात वर्णनाचा अतिरेक करून त्यातील नाट्याची अक्षरश: गळचेपी केली. अस्वाभाविक व अनावश्यक प्रसंगांची गर्दी, औचित्याचा व तारतम्याचा अभाव, दृश्य भागापेक्षा श्राव्य भागावर अधिक भर, यामुळें ही नाटके बोजड बनली. आपण रंगभूमीसाठी नाटक रचत आहोत, याचे भानच या नाटककारांना राहिले नाही. त्यामुळे सामान्य वाचकांनी वा प्रेक्षकांनी याकडे पाठ फिरवली नसती तरच नवल.

दहाव्या शतकानंतर मुस्लिमांचे आक्रमण अधिक प्रमाणात होऊ लागले. येथील ख्याली-खुशालीत रममाण असलेल्या राजांचा या आक्रमणापुढे निभाव लागला नाही. धामधुमीचा काळ आला. मुस्लिम राजांनी नाट्यकलेला आश्रय दिला नाही. परिणामी नाटकाचे प्रयोग बंद पडले. साहजिकच नवी नाटके लिहिण्याचा उत्साह मंदावला. या काळात ज्यांनी नाटके लिहिण्याचा प्रयत्न केला, त्यांनी शब्दबंबाळ रचना केली. एवढ्या प्रतिकूल परिस्थितीतदेखील नाटके लिहिली जात होती, हे विशेष आहे.

या अवनतीच्या काळात नाट्यकलेचे पुनरुज्जीवन करणारा प्रभावी नाटककार निर्माण झाला नाही. दुसरे म्हणजे नाट्यशास्त्रावर नवीन ग्रंथ लिहिणाऱ्या धनंजय अथवा विश्वनाथ यांनी भरतमुनीच्या विचारांची उजळणी करण्यापलीकडे काही केले नाही. त्यामुळे तेच ते विषय व त्यांची ठराविक पद्धतीची मांडणी यांच्या भोवऱ्यात संस्कृत नाटक सापडले, ते त्यातून बाहेर निघालेच नाही.

या साऱ्या वातावरणात कृष्णमिश्राचे **'प्रबोध-चन्द्रोदय'** हे एकमेव रूपकात्मक (Allegorical) नाटक लक्ष वेधून घेणारे आहे. याची रचना

इ.स.१०५० नंतर केव्हा तरी झाली. सहा अंक असलेल्या या नाटकात अद्वैत विष्णुभक्तीचा प्रसार केलेला आहे. मनात चालणाऱ्या चांगल्या-वाईट विचारांचा संघर्ष दाखवण्यासाठी त्याने मनोवृत्तींनाच स्त्री-पुरुष पात्रांचे रूप दिले आहे. वैदिक व अवैदिक पंथांचा निर्देश केला आहे. या वैचारिक झगड्यात विष्णुभक्तीचा कसा जय होतो ते दर्शविले आहे.

एवढे नाटक सोडले तर बाकी सारा उजेडच आहे. मुरारी, राजशेखर व त्यांच्या नंतरच्या नाटककारांनी नाट्यरचना करताना विवेक सांभाळला नाही. रामाच्या कथेवर नाटक रचणाऱ्यांनी जुन्या नाटकांची उसनवारी करण्यापलीकडे काही केले नाही. रामाच्या कथेवर पुनः पुनः रचना करण्याचा त्यांचा काय उद्देश आहे, हे कधीच स्पष्ट झाले नाही. एखादा प्रसंग नवा आढळला तरी एकंदर नाटकाच्या दृष्टीने तो गौणच वाटतो. दुसरे असे की वर्णने करताना या नाटककारांनी सारे संकेत धाब्यावर बसवले आहेत. सीतेच्या स्वयंवरास शक, चालुक्य, चेदी वंशातील राजे उपस्थित राहिलेले आहेत, असे वर्णन करण्यात काल-विपर्यास होतो आहे ही शंकाही त्यांच्या मनास शिवलेली नाही. तसेच लंकेहून अयोध्येला येताना रामाचे विमान चंद्रलोक, स्वर्गनगरी, हिमालय. मानससरोवर या मार्गाने कसे येते, हे त्या नाटककारांनाच ठाऊक. हा दोष पूर्वीच्या नाट्यकृतीत आढळत नाही. भौगोलिक तपशिलाबाबत कालिदासादी नाटककार किती काटेकोर आहेत हे सांगायला नको.

पुढे पुढे तर हे नाटककार इतके आळशी बनले की पूर्वीच्या नाटकातून प्रसंगांची उसनवारी करून त्यांचे समाधान होईना. त्यातील श्लोकांचीही उसनवारी करण्यात येऊ लागली. हनुमन्नाटकात भवभूती, मुरारी, राजशेखर यांच्या नाटकांतील श्लोक घेतले असल्याचे मागे सांगितले आहेच.

नाटकाच्या हस्तलिखित प्रती करणाऱ्यांनी तर अभूतपूर्व गोंधळ घातलेला आहे. मूळ संहितेतील श्लोक गाळणे, हा नेहमीचाच प्रकार आहे. काही वेळा चुकून एखादा श्लोक उतरून घेण्याचे राहते, हे समजण्यासारखे आहे. पण स्वतःला न रुचणारे श्लोक गाळण्याचा प्रकार सरसकट आढळतो. त्यामुळे कोणत्याही नाटकाच्या किंवा काव्याच्या चार-पाच हस्तलिखित प्रती मिळतात व त्यातील श्लोकसंख्येमध्ये फरक आढळतो. काव्यशास्त्रकारांनी भासाचे म्हणून उद्धृत केलेले अनेक श्लोक त्रिवेंद्रम काव्यमालेत प्रसिद्ध झालेल्या नाटकात सापडत नाहीत, याचे कारणही हेच आहे.

पण याहीपेक्षा मूळ संहितेत भर घालण्याचा निंद्य प्रकारही आढळून येतो. शाकुंतलाची बंगाली प्रत हे याचे मोठे उदाहरण आहे. इतर प्रतीत व बंगाली प्रतीत खूप फरक आहे. हनुमन्नाटकाच्या दोन प्रती हेच कटू सत्य सांगतात. त्यामुळे नाटकाची शुद्ध प्रत तयार करणे जिकीरीचे झाले आहे. प्रो. तोडरमल यांनी महावीरचरिताची प्रत तयार करताना अठरा हस्तलिखित प्रती जमवल्या होत्या, ही गोष्ट पुरेशी बोलकी आहे.

असे असूनही एकोणिसाव्या शतकापर्यंत नाटके लिहिली जात होती. ही गोष्ट नवलाची खरी. नाटककार नाटके कोणासाठी लिहीत होते व त्यांचे कधी प्रयोग होत होते का या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. पण या नाटकातील 'नाट्य' मात्र मरून गेलेले होते. त्यामुळे ऱ्हास काळातील ही नाटके भव्य वास्तूच्या भग्नावशेषासारखी केविलवाणी वाटतात.

# उपसंहार

कोणताही पूर्वग्रह मनात न बाळगता समतोल दृष्टीने संस्कृत नाट्यसृष्टीकडे पाहिले तर संस्कृत नाटकांची संख्या फारच कमी असल्याचे दिसून येते. हजार-बाराशे वर्षांच्या काळातील तीस ते पस्तीस नाटकेच काय ती विचारणीय आहेत. आता काळाच्या उदरात असंख्य नाटके गडप झालेली आहेत ही गोष्ट खरी आहे, पण उपलब्ध नाटकांतही म्हणावी तशी विविधता नाही. मुद्राराक्षस, मृच्छकटिक, नागानंद अथवा प्रबोध चन्द्रोदय यांसारखी बोटावर मोजण्याइतकी नाटके थोडीफार चाकोरीच्या बाहेर गेलेली आहेत. बहुतेक नाटके रामायण, महाभारत, बृहत्कथा यातील कथांवर आधारलेली आहेत. प्रतिज्ञा यौगंधरायण, मालविकाग्निमित्र व मुद्राराक्षस ही नाटके इतिहासावर आधारलेली आहेत. स्वतंत्र नाटकांचा जवळ जवळ अभाव आहे.

अर्थात ही नाटके आधारित आहेत म्हणून ती कमी प्रतीची आहेत असे नाही. कथावस्तू कोठूनही घेतली असली तरी तिची मांडणी करण्यात नाटककाराचे चातुर्य दिसून येते. रसपरिपोष करण्यावर संस्कृत नाटककारांचा भर असतो. त्यासाठी ते मूळ कथानकात लहान-मोठे बदल करतात. असे बदल करण्यास आनंदवर्धनाने त्यांना परवानगी दिलेली आहे. पण वर्णनाचा सोस, संयमाचा अभाव व औचित्याचा भंग केल्यामुळे उत्तरकालीन नाटके कृत्रिम व बोजड बनली व त्यांची विनाशाकडे वाटचाल सुरू झाली हा इतिहास आहे.

अनेक संस्कृत नाटकांचा नायक राजा हाच आहे. तो विवाहित असून नव्या तरुण स्त्रीच्या प्रेमात पडलेला असतो. 'मालविकाग्निमित्र' या कालिदासाच्या नाटकापासून संस्कृत सुखात्मिकेचा एक साचाच (Formula) बनून गेला. प्रियदर्शिका, रत्नावली, कर्पूरमंजरी, विद्धशालभंजिका, कर्णसुंदरी ही सारी

'नाटिका' या प्रकारात मोडणारी नाटके याच धर्तीची आहेत. तर महावीरचरित, अभिषेक, अनर्घराघव, प्रसन्नराघव, हनुमन्नाटक ही नाटके सरधोपट आहेत. यात रामायणातील कथा रंगवून सांगण्यापलीकडे काहीही सापडत नाही. नाही म्हणायला भासाच्या 'प्रतिमा' नाटकात व भवभूतीच्या 'उत्तरामचरित' या नाटकात रामकथेला नवा अर्थ देण्याचा चांगला प्रयत्न केलेला आहे.

सर्व संस्कृत नाटके ही सुखान्त (Comedies) आहेत. दमलेल्या, भागलेल्या व दु:खित जीवांना विरंगुळा लाभावा यासाठी भरतमुनींनी नाट्य निर्माण केले असल्याने यात शोकान्तिकेला (Tragedy) अवसर नाही. याचा अर्थ संस्कृत नाटकात दु:खे नाहीत असा नाही. मृच्छकटिक, मालतीमाधव, उत्तररामचरित, नागानंद यांसारख्या नाटकात दु:खाचे दारुण प्रसंग आहेत. वसंतसेना व मालती या तर मृत्यूच्या कचाट्यापासून सुटलेल्या आहेत. नागानंदात जीमूतवाहनाने आपल्या प्राणांचे बलिदान केले आहे. उत्तररामचरितात राम व सीता विरहाग्नीत बारा वर्षे होरपळत आहेत. तरी देवतांच्या कृपेमुळे सारी अरिष्टे टळून शेवट गोड झालेला आहे. यात कृत्रिमता आहे हे मान्य करायला हवे.

संस्कृत नाटकात शोकात्मिका नाहीत, ही एक मोठी उणीवच मानायला हवी. पाश्चात्त्य नाटकात, विशेषत: ग्रीक नाटकात दुर्दैव व स्वभावदोष यांच्या विळख्यात सापडलेल्या थोर व्यक्तीचा कसा सर्वनाश होतो, हे भव्योत्कट स्वरूपात दाखवण्यात येते. त्या रंगभूमीवर पाहताना अगर वाचताना रसिक पुरता हादरून जातो. त्याला मानवी जीवनाचे एक नवीनच दर्शन घडते. सोफोक्लीसचा इडिपस व अँटिगॉन, शेक्सपिअरचा हॅम्लेट व किंग लियर, इब्सेनची नोरा, डॉ. स्टॉकमन व ब्रांद, बर्नार्ड शॉची सेंट जोन, मराठी नाटकांकडे नजर टाकली तर विद्याहरणातील शुक्राचार्य, एकच प्यालातील सुधाकर, 'उद्याचा संसार' मधील बॅ. विश्राम, 'इथे ओशाळला मृत्यू'मधील संभाजी अथवा 'नटसम्राट' मधील गणपतराव बेलवलकर या व्यक्तिरेखा अजरामर झाल्या आहेत. त्यांच्या पुढे संस्कृत नाट्यातील गाजलेली व्यक्तिचित्रणेही फिकी पडतात.

डॉ. गो. के. भटांनी आपल्या 'ट्रॅजेडी अँड संस्कृत ड्रामा' या ग्रंथात संस्कृत नाट्यसृष्टीत शोकांतिका कोठे आढळते का याचा कसून शोध घेतला आहे. त्यांच्या मते भासाच्या 'कर्णभार' व 'ऊरुभंग' या दोन एकांकिका शोकांतिकेच्या समीप जाणाऱ्या आहेत. कर्णभारात कवच-कुंडलाचे दान केल्याने कर्णाचा

मृत्यू सूचित झाला आहे तर ऊरुभंगात दुर्योधनाचे रंगभूमीवरच निधन झालेले आहे. दोघांचीही चित्रणे अगदी हृदयाला भिडणारी आहेत.

'कर्णभार' व 'ऊरुभंग' या नाटकांच्या चर्चेत या प्रश्नाचा विचार केलेला आहे. कर्ण व दुर्योधन या दोघांवरही 'खलपुरुष' हा शिक्का बसलेला आहे. त्यामुळे त्यांच्या मृत्यूने सामान्य प्रेक्षकांना दुःख होत नाही उलट समाधानच वाटते. महाभारताचा संदर्भ सोडून पाहिले तर त्या दोघांविषयी सहानुभूती वाटते हे खरे. कर्णाविषयी तर अलिकडे विशेष जिव्हाळा वाटत आहे. असे असूनही त्यांना शोकांतिका मानता येत नाही याचे कारण त्या एकांकिका आहेत. त्यांच्या जीवनाचे मोठ्या प्रमाणात चित्रण झालेले नाही. एखाद्या सच्छील पुरुषाच्या जीवनाची शोकान्तिका झालेली दाखवण्याचे धाडस कोणत्याही नाटककाराने, अगदी भासानेही दाखवले नाही. असो.

भास आणि कालिदास यांच्या नाटकात नाट्य आणि काव्य यांचा समतोल, साधलेला आहे. भासाने वेगवेगळ्या प्रकारचे प्रयोग सादर करून रंगभूमी वरील नाट्य जिवंत ठेवले आहे. काव्य-दृष्ट्या भासाची नाटके थोड्या कमी प्रतीची वाटतील. प्रसंग उत्कट असूनही भासाने रस-परिपोष संक्षेपानेच केलेला आहे पण का कोणास ठाऊक त्याची नाटके विस्मृतीत बुडाली. 'टीकाकारांनी भासाची नाटके अग्नीत टाकली. त्यातील 'स्वप्नवासवदत्त' नाटक तेवढे अग्नीने जळले नाही' या अर्थाचा श्लोक राजशेखराने उद्धृत केला आहे. रामायण व महाभारत यांच्या कथानकात हवी तशी फिरवा-फिरव केल्यामुळे टीकाकारांचा त्याच्यावर रोष झाला की काय हे सांगता येत नाही. परंतु स्वतः कालिदास व बाणभट्ट यांनी त्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. त्याच्या 'स्वप्नवासवदत्त'तील अवतरणे काव्य-शास्त्रकारांनी उद्धृत केली आहेत.

कालिदासाच्या नाटकात मात्र नाट्य व काव्य यांचा सुरेख संगम झालेला आहे. मागे सांगितल्याप्रमाणे तो नाटकाच्या कथा, संवाद, स्वभाव-चित्रण व रसपरिपोष या चारही अंगांत निपुण आहे. त्याची भाषाशैली प्रासादिक, नाट्यानुकूल व रसाळ आहे. त्याने औचित्याचे पालनही कसोशीने केलेले आहे. तेव्हा त्याची तीनही नाटके आदर्श आहेत, असे म्हणण्यास हरकत नाही.

पण नंतरच्या नाटककारांना हा तोल सांभाळता आला नाही. त्यांनी रस परिपोषाकडे अधिक लक्ष पुरवले. त्यामुळे श्लोकांच्या माळा सुरू झाल्या.

श्रीहर्षाची नाटकेही यातून सुटलेली नाहीत. भासाचे 'चारुदत्त' नाटक नव्या स्वरूपात सादर करताना शूद्रकाने विस्ताराचाच अवलंब केला आहे. पुढे भवभूतीपासून तर नाटकातील काव्य फोफावत गेले व त्यात नाट्य गुदमरू लागले. मुरारी, राजशेखर यांनी तर कहरच केला. त्यामुळे संस्कृत नाटके बोजड होऊ लागली. प्रयोग दृष्ट्याच नव्हे तर वाचतानाही रटाळ व कंटाळवाणी वाटू लागली.

येथे एका गोष्टीचे भान ठेवणे जरूर आहे. भवभूती, भट्टनारायण व काही प्रमाणात राजशेखर यांनी काव्यदृष्ट्या आपली नाटके खूप उंचीवर नेऊन ठेवली आहेत. यातील काव्य हे खरोखरच अव्वल दर्जाचे आहे. आजच्या दृष्टीतून पाहिले तर संस्कृत नाटकातील उत्तम व दर्जेदार काव्य ही त्याची जमेची बाब आहे, हे आपल्याला विसरता येणार नाही.

या साऱ्या गदारोळात 'विशाखदत्ता'च्या मुद्राराक्षसाने आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. शृंगार अथवा वीर या रसांना फाटा देऊन त्याने राजकारणासच नाटकाचा विषय बनवले आहे. नगण्य अशा ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे चाणक्य व राक्षस या अप्रतिम व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. रंजक मालमसाल्याचा अभाव असूनही जिवंत नाट्य उभे केले आहे. याची रचना पक्की बांधलेली आहे. प्रारंभापासून शेवटपर्यंतच्या साऱ्या घटना व प्रसंग एका नाट्यसूत्रात गोवलेले आहेत. विशेष म्हणजे त्याने नाटक व काव्य यांचा समतोल अजिबात ढळू दिला नाही. कथावस्तूवर जबरदस्त हुकूमत असणारे नाटक म्हणून मुद्राराक्षसकडेच बोट दाखवावे लागेल.

नाटक, प्रकरण व नाटिका यांच्यातच संस्कृत नाटकांचा संसार आटोपलेला आहे. अंक,व्यायोग, समवकार,वीथी, डिम, ईहामृग या प्रकारांची रचना हाताच्या बोटावर मोजण्याइतकी भरेल. त्या मानाने भाण आणि प्रहसनांची रचना विपुल आहे. पण त्यांचे स्वरूप सदभिरुचीला धक्का लावणारे आहे, भाणात विट हा एकटाच बोलतो. यातील स्थळ वेश्यांची वस्ती हे असते. उत्तान शृंगार, रांगडी, अश्लील भाषा यांचा भरणा असतो तर प्रहसनात कामी पुरुष, कंचुकी, तपस्वी यांसारखी पात्रे असतात. यातही 'भगवदज्जुकीय' यासारखे प्रहसन लक्ष वेधून घेते. यामुळेच या भाण व प्रहसनांना शिष्ट समाजात थारा मिळाला नाही. त्यांचे प्रयोगही फारसे झाले नसावेत.

अशा प्रकारे नानाविध कसोटींच्या चाळण्यातून परीक्षा करीत असता काही मौल्यवान नाटके नजरेला पडतात. ती म्हणजे भासाचे 'स्वप्नवासवदत्त', कालिदासाचे 'अभिज्ञान शाकुंतल', शूद्रकाचे 'मृच्छकटिक', विशाखदत्ताचे 'मुद्राराक्षस' आणि भवभूतीचे 'उत्तररामचरित'. संस्कृत नाट्यसृष्टीतील ही मनोरम शिखरे आहेत. संस्कृत नाट्याचे हे पंचप्राण आहेत. यांच्या थोरवीबद्दल दुमत होईल असे वाटत नाही.

दुसऱ्या रांगेत बसणारी काही नाटकेही उत्तम आहेत. प्रतिमा,अविमारक, मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय, रत्नावली, नागानंद, मालती-माधव, वेणीसंहार, कर्पूरमंजरी, प्रबोधचन्द्रोदय इत्यादि. आणखी काही नाटकांचा या श्रेणीत समावेश करता येईल. उरलेली सारी नाटके ही सामान्य दर्जाचीच आहेत, यात शंका नाही.

संस्कृत नाटकांचे प्रयोग क्वचित् हौस म्हणूनच सादर होतात. आजही नवीन संस्कृत भाषांतरे झालेली आहेत. मुंबईतील ब्राह्मण सभा जुन्या-नव्या नाटकांचे प्रयोग निष्ठेने सादर करीत आहे. महाराष्ट्र सरकारही स्पर्धा आयोजित करून संस्कृत नाटकांना प्रोत्साहन देत आहे. पण दुसऱ्या बाजूला संस्कृत भाषेचेच उच्चाटन होईल, अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशा स्थितीत ही प्राचीन संस्कृत नाटके दिलासा देतील असे वाटते. डॉ. गो. के. भटांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास "पण हा वारसा उपेक्षणीय नाही, इतकी खूणगाठ मनाशी असावी. म्हणजे मग मराठी रंगभूमीपुढे जेव्हा एखादा प्रकल्प उभा राहील आणि त्या वेळी 'डॉलर-पौंड' यांचा विचार सुरू होईल, तेव्हा घरचे 'सुवर्ण' शोधण्याची बुद्धी कोणाला तरी होईल." (संस्कृत नाट्यसृष्टी पृष्ठ- १६४)

# परिशिष्ट-१

## नाटकावरील संस्कृत टीका व टीकाकार

रघु-कुमारादी महाकाव्ये, मेघदूत-अमरू शतक किंवा गीत-गोविंद या काव्यांवरील संस्कृत टीकांप्रमाणे नाटकांवरही उत्तम संस्कृत टीका लिहिण्यात आलेल्या आहेत. निर्णयसागर मुद्रणालयाने अशा उत्तम टीका नाटकाबरोबरच प्रसिद्ध केलेल्या आहेत. अलिकडच्या पंडितांनीही नाटकावर संस्कृत टीका लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातील टीकाकारांचा व त्यांच्या टीकांचा येथे थोडक्यात परिचय करून द्यावयाचे ठरवले आहे.

या संस्कृत टीका साधारणपणे बाराव्या शतकानंतर लिहिण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी या टीका लिहिण्यात आल्या असाव्यात. नाट्यशास्त्रातील तत्त्वे प्रत्यक्ष कलाकृतीला लावण्याचे कार्य या टीकांनी केलेले आहे.

धनंजयाचे दशरूपक, गुणचंद्र-रामचंद्र यांचे नाट्यदर्पण व विश्वनाथाचे 'साहित्यदर्पण' यामध्ये संस्कृत काव्य व नाटके यातून अवतरणे घेतलेली आहेत. त्यात श्लोकाप्रमाणे गद्य अवतरणेही आढळतात. नाट्यदर्पणात आज अनुपलब्ध असलेल्या अनेक नाटकांतील अवतरणे आढळतात पण याहीपेक्षा नाटकावरील संस्कृत टीका या महत्त्वाच्या आहेत.

या टीका म्हणजे धावते विवेचन (Running Commentary) आहे. यात नाटकातील नांदी, सूत्रधार, प्रस्तावना इत्यादी पारिभाषिक संज्ञांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. नाट्यशास्त्रातील लक्षणे उद्धृत केलेली असतात. महत्त्वाच्या व कठीण श्लोकांचे स्पष्टीकरण दिलेले असते. काही टीकांत तर नाटकातील प्राकृत

भाषणांची संपूर्ण संस्कृत छाया दिलेली असते. नाटकातील पाच प्रमुख संधिस्थळे तशीच संध्यंगे सांगितलेली असतात. काही टीका संक्षिप्त आहेत तर राघव भट्ट, वीरराघव, रंगनाथ, त्रिपुरारी, ढुंढिराज यांच्या टीका सविस्तर व वाचनीय आहेत.

**१) भास** - भासाची नाटके साधारणपणे दहाव्या शतकापर्यंत उपलब्ध असावीत. पण पुढे ती विस्मृतीत गडप झाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत ती उपलब्ध नसल्याने नामवंत टीकाकारांच्या यावर टीका नाहीत. यातील 'स्वप्नवासवदत्त' व 'प्रतिमा' या दोन नाटकांवर प्रो. एम्. आर. काळे यांनी संक्षिप्त संस्कृत टीका लिहिल्या आहेत. एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो की सांगली येथील सिटी हायस्कूलमधील संस्कृतचे माजी शिक्षक श्री. पुरुषोत्तमशास्त्री दत्तवाडकर यांनी 'स्वप्नवासवदत्ता'वर संस्कृत टीका लिहिली असून निर्णयसागर मुद्रणालयाने प्रसिद्ध केली आहे. ती प्रत आता बरीच दुर्मिळ झालेली आहे.

**कालिदास** - कालिदासाच्या तीनही नाटकांवर उत्तम टीका उपलब्ध आहेत. 'मालविकाग्निमित्र' नाटकावर काटयवेमाची टीका प्रसिद्ध असून ती निर्णयसागरच्या प्रतीत व प्रो. काळ्यांच्या आवृत्तीतही घेतली आहे. हा टीकाकार दाक्षिणात्य असून त्याने अनेक संस्कृत नाटकांवर टीका लिहिल्या आहेत. टीकेच्या अखेरीस आलेल्या श्लोकात त्याने स्वत:चा उल्लेख काट्यवेम भूप असा केलेला आहे. त्यावरून तो मांडलिक राजा असावा असा तर्क होतो.

'विक्रमोर्वशीया'वर रंगनाथाची उत्कृष्ट टीका असून निर्णयसागर मुद्रणालयाने ती प्रकाशित केली आहे. रंगनाथाने आपली टीका शके १५७७ मध्ये (इ.स.१६५५) लिहिली. रंगनाथ दीक्षितास नारायण व बाळकृष्ण अशी दोन मुले होती. यातील नारायणाने उत्तररामचरित व विद्धशालभंजिका नाटकावर टीका लिहिल्या आहेत. बाळकृष्णास रंगनाथ हा मुलगा होता. याने 'विक्रमोर्वशीया'वर टीका लिहिली आहे. रंगनाथाची टीका सविस्तर असून त्याने शेकडो अवतरणे उद्धृत केली आहेत. त्याने आपल्या टीकेचे नाव 'प्रकाशिका' असे ठेवले आहे. ही उत्तम टीका उपलब्ध असूनही प्रो. काळ्यांनी सदर नाटकावर स्वत: संस्कृत टीका का लिहिली आहे, ते समजत नाही.

अभिज्ञान-शाकुंतलावर राघव भट्टाची उत्कृष्ट टीका असून निर्णयसागर प्रतीत व काळ्यांच्या आवृत्तीत ती छापलेली आहे. हा पृथ्वीधराचा पुत्र असून व्याकरण,

न्याय, मीमांसा या शास्त्रात पारंगत आहे. याने शाकुंतलाच्या नांदीतील श्लोकाचा दुसरा अर्थ विस्ताराने स्पष्ट केला आहे. तसेच दुसऱ्या अंकातील 'अनाघ्रातं पुष्पं' (अभि२.१०) या श्लोकाचे कामशास्त्रास धरून विवेचन केले आहे. त्याच्या टीकेचे नाव 'अर्थद्योतनिका' आहे.

**विशाखदत्त** - याच्या 'मुद्राराक्षस' नाटकावर ढुंढीराजाची टीका प्रसिद्ध आहे. निर्णयसागर व काळ्यांच्या प्रतीत तीच घेतलेली आहे. ढुंढिराजाने स्वत: विषयीची माहिती प्रास्ताविक श्लोकात दिलेली आहे. याचे कुलनाम 'व्यास' हे असून त्याच्या वडिलांचे नाव लक्ष्मण होते. याने आपली टीका शके १६३५ (इ. स. १७१३) मध्ये पूर्ण केली.

ही टीका विद्यार्थ्यांच्या व अभ्यासकांच्या दृष्टीने उपयुक्त आहे. नाटकाची कथावस्तू समजण्यासाठी त्याने पारंपरिक श्लोक उद्धृत केले आहेत. नाटकातील अंगांचे विवेचन करताना दशरूपकातील मुबलक अवतरणे दिली आहेत.

**श्रीहर्ष** - आश्चर्याची गोष्ट अशी की याच्या प्रियदर्शिका, रत्नावली व नागानंद या नाटकांवर अस्सल संस्कृत टीकाकारांची टीका नाही. वास्तविक पाहता याचे रत्नावली नाटक खूप लोकप्रिय आहे. नाट्यशास्त्रावरील ग्रंथात याच्यातील मुबलक श्लोक उद्धृत केलेले आहेत. असे असूनही कोणाला या नाटकावर टीका लिहावीशी वाटली नाही. प्रो. काळ्यांनी याच्या तीनही नाटकांवर संस्कृत टीका लिहिल्या आहेत.

**शूद्रक** - शूद्रकाच्या 'मृच्छकटिका'वर पृथ्वीधराची टीका प्रसिद्ध असून ती निर्णयसागर व प्रो. काळे यांच्या प्रतीत छापलेली आहे. पृथ्वीधराने टीकेच्या प्रारंभी व अखेरच्या श्लोकात नावापलीकडे काहीही सांगितले नाही. त्याची टीकाही अगदी संक्षिप्त आहे. त्यामुळे त्याच्याविषयी काही सांगता येत नाही. हेही नाटक टीकाकारांच्या नजरेतून कसे सुटले, हे समजत नाही.

**भवभूती** - भवभूतीच्या 'महावीरचरित' व 'उत्तमरामचरित' या नाटकावर वीरराघवाची टीका आहे. याने आपली कुलपरंपरा साक्षात् रामचंद्रापासून सुरू झाल्याचे सांगितले आहे. याचे कुलनाम अथवा आडनाव 'वाघूळ' असे असून गावाचे नाव भूसार अथवा भूमिसार असे दिलेले आहे. 'महावीरचरिता'वरील टीकेत त्याने आपले नाव अन्नपंगार्य असे दिलेले आहे. हा अठराव्या शतकात होऊन गेला.

'मालती-माधवा'वर जगद्धर व त्रिपुरारी अशा दोन टीकाकारांच्या टीका प्रसिद्ध आहेत. निर्णयसागर मुद्रणालयाच्या प्रतीत त्रिपुरारीची टीका दिलेली आहे. हा दाक्षिणात्य असून त्याने आपल्या पित्याचे नाव पर्वतनाथ असे दिले आहे. याची टीका पहिल्या सात अंकांवर आहे. पुढील तीन अंकांवर नान्यदेवाची टीका आहे.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने त्रिपुरारी-नान्यदेवाची टीका उपयुक्त आहे. याची टीका विस्तृत असून त्यात नाटकीय संज्ञाचे स्पष्टीकरण, लक्षणे, श्लोकांचे मार्मिक स्पष्टीकरण व प्राकृत भाषणांची संस्कृत छाया आहे. विशेष म्हणजे त्याने संधिस्थळे व संध्यंगे बारकाईने दर्शविली आहेत. प्रक्षिप्त मानलेल्या श्लोकांवरही टीका लिहिली आहे.

प्रो. काळ्यांच्या आवृत्तीत जगद्धराची टीका आहे. निर्णयसागर प्रतीतही परिशिष्टांत जगद्धराची टीका छापलेली आहे. जगद्धराने गदाधर-विद्याधर- रत्नधर या क्रमाने वंशावळ दिली आहे. याच्या पित्याचे नाव रत्नधर असून तो महामहोपाध्याय, पंडितराज, महाकवी व राजधर्माधिकारी होता. जगद्धराच्या आईचे नाव दमयंतिका असे होते. मालती-माधवाच्या टीकेमधील प्रास्ताविक श्लोकात त्याने आपण सदर टीका पूर्वीच्या टीका पाहून व कोश, अलंकार, छंदशास्त्र यांचा अभ्यास करून लिहिली आहे, असे म्हटले आहे. जगद्धर हा मल्लिनाथा (इ.स.१४३०) नंतर होऊन गेला. कारण मालती-माधवच्या टीकेत मल्लिनाथाचा उल्लेख आलेला आहे. जगद्धराची टीकापद्धती प्रौढ आहे. त्यामुळे त्याच्या टीकेत काही श्लोकांचे स्पष्टीकरण आढळत नाही. त्याने कामंदकी, भूरिवसु, माधव, देवरात, अघोरघंट ही पात्रांची नावे कशी सार्थ आहेत ते सांगितले आहे. जगद्धराने 'वेणीसंहारा'वरही टीका लिहिली आहे.

मालती-माधवावर पूर्णसरस्वती या नामवंत टीकाकाराचीही टीका आहे. ही टीका माझ्या पाहण्यात आली नाही. डॉ. टी. जी. माईणकरांनी आपल्या 'स्टडीज इन ड्रॅमॅटिक क्रिटिसिझम्' या पुस्तकात त्या टीकेचा परिचय करून दिला आहे.

'उत्तमरामचरिता'वरील वीरराघवाची टीका सविस्तर व प्रौढ आहे. त्याने घन:शामाचा (इ.स.१७००) नामोल्लेख न करता त्याच्या मतावर टीका केली आहे. हा मोठा विद्वान् व रसिक टीकाकार आहे. विशेष म्हणजे याने उत्तररामचरिताच्या पहिल्या अंकातील 'किमपि किमपि मन्दम्' (उ.रा.च.१-

२७) या श्लोकाचे कामशास्त्राला धरून विवेचन केले आहे. निर्णयसागर प्रतीत व प्रो. काळ्यांच्या आवृत्तीत हीच टीका छापलेली आहे.

वर उल्लेख केलेल्या घन:शामाचीही 'उत्तररामा'वरील टीका प्रसिद्ध आहे. म.म. काण्यांनी आपल्या आवृत्तीत ही टीका प्रसिद्ध केली आहे. याचे आडनाव चोंडो असे आहे. याने आपल्या वडिलांचे नाव महादेव, आईचे नाव काशी, भावाचे नाव चिदंबर व बहिणीचे नाव शाकंबरी असल्याचे सांगितले आहे.

याची टीका समाधानकारक नाही. तो श्लोकांचे किंवा प्रसंगांचे स्पष्टीकरण देत नाही. पाठभेदांचीही चर्चा करीत नाही. त्याची टीका त्रोटक आहे. अनेक श्लोकांचे त्याने स्पष्टीकरण केलेले नाही. अवतरणे देण्यात चुका केल्या आहेत. उदा. त्याने कल्पिलेले ईश्वरकृष्ण, कालिदास व भर्तृमीढ यांचे ऐक्य आश्चर्यकारक आहे. असे असूनही त्याने आपल्या विद्वत्तेची प्रौढी मिरवली आहे. याने राजशेखराच्या विद्धशालभंजिकेवरही टीका लिहिली आहे.

**भट्टनारायण** - भट्टनारायणाच्या 'वेणीसंहारा'वर वर सांगितल्याप्रमाणे जगद्धराची टीका प्रसिद्ध आहे. निर्णयसागर प्रतीत व प्रो. काळ्यांच्या आवृत्तीत तीच छापलेली आहे. ही टीका मालती-माधवावरील टीकेच्या मानाने संक्षिप्त आहे. त्याने आपल्या टीकेला 'टिप्पणिका' असेच संबोधले आहे.

**मुरारी** - मुरारीचे 'अनर्घराघव' हे नाटक निर्णयसागर मुद्रणालयाने रुचिपतिदत्ताच्या संस्कृत टीकेसह प्रकाशित केले आहे. आचार्य श्री. रामचंद्र मिश्रांनी आपल्या आवृत्तीमध्ये रुचिपतिदत्ताव्यतिरिक्त आठ टीकाकारांची नावे दिली आहेत. ती नाटकाच्या विवेचनात दिली आहेत. याशिवाय निर्णयसागर प्रतीत नृसिंहसूनु हरिहर, मिश्रभवनाथ, उदयसूनु धनेश्वर व विष्णुभट्ट या चार टीकाकारांची नावे दिली आहेत. श्री. रामचंद्र मिश्रांनी स्वत: 'प्रकाश' नामक टीका लिहिली आहे, ती निराळीच.

रुचिपतीची टीका असलेली सर्वात जुनी प्रत शके १५३५ मधील आहे. (इ.स.१४५७) यावरून रुचिपती इसवी सनाच्या पंधराव्या शतकात होऊन गेला हे निश्चित आहे. त्याने स्वत:बद्दल थोडी हकीकत दिली आहे. नरसिंहदेवाचा पुत्र भैरवसिंह हा राजा त्याचा आश्रयदाता होता. त्याच्या प्रोत्साहनामुळे त्याने ही टीका लिहिली. बैजोली हे त्याचे जन्मगाव असून खौआल हा वंश असावा. याने 'मेदिनी' कोशातील अवतरणे दिली आहेत.

**राजशेखर** - राजशेखराच्या 'बालरामायणा'वर कोणती संस्कृत टीका आहे, हे समजले नाही. बालभारत अथवा प्रचंड पांडवाचे फक्त दोनच अंक उपलब्ध आहेत. कर्पूरमंजरी या सट्टकाची निर्णयसागर मुद्रणालयाने वासुदेवाच्या संक्षिप्त टीकेसह पहिली आवृत्ती प्रकाशित केली आहे. ही टीकाही माझ्या पाहण्यात नाही. विद्धशालभंजिकेवर जीवानंद विद्यासागर, घन:शाम व नारायण यांच्या संस्कृत टीका आहेत. यातील नारायणाची टीका उत्तम आहे. हा रंगनाथ दीक्षिताचा मुलगा. याला श्रिम्वेकर असे संबोधण्यात येई. याचा काळ सोळाव्या शतकाची अखेर किंवा सतराव्या शतकाचा प्रारंभ असा सांगता येतो.

नारायणाची टीका विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे. त्याची भाषा सुबोध आहे. त्याने पाठभेदांची चर्चा केली आहे. प्राकृत भाषणांची संस्कृत छाया दिली आहे. त्याने काही श्लोकांवर अजिबात टीका लिहिली नाही. ही गोष्ट खटकणारी आहे.

**जयदेव** - याच्या 'प्रसन्नराघव' नाटकाची आवृत्ती निर्णयसागर मुद्रणालयाने प्रकाशित केली होती. पण तिच्यात कोणाची टीका होती हे समजले नाही. मोतीलाल बनारसीदास या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या डॉ. रमाशंकर त्रिपाठी यांच्या आवृत्तीत डॉ. त्रिपाठी यांनीच टीका लिहिली आहे.

आधुनिक विद्वानांनी लिहिलेल्या संस्कृत टीकांमध्ये प्रो. मो. रा. काळे यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांनी स्वप्नवासवदत्त, प्रतिमा, विक्रमोर्वशीय, प्रियदर्शिका, रत्नावली व नागानंद अशा सहा नाटकांवर संस्कृत टीका लिहिल्या आहेत. या टीका विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊनच लिहिल्या असल्याने त्या सुबोध आहेत, हे सांगण्याची आवश्यकता नाही.

* * *

# परिशिष्ट २ : संदर्भ ग्रंथांची यादी

## १) संस्कृत नाटकांच्या संपादित आवृत्त्या

### भास -


| | |
|---|---|
| दूतवाक्य | संपा. डॉ. रमाशंकर त्रिपाठी (हिंदी) |
| दूत घटोत्कच | संपा. डॉ. रमाशंकर त्रिपाठी (हिंदी) |
| पंचरात्र | श्री. निगमानंद शास्त्री (हिंदी) |
| कर्णभार | प्रा. दि. मो. हातवळणे |
| मध्यमव्यायोग | प्रा. दि. मो. हातवळणे |
| ऊरुभङ्ग | प्रा. दि. मो. हातवळणे |
| अभिषेक | श्री. मोहनदेव पंत (हिंदी) |
| बालचरित | डॉ. कमलेशदत्त त्रिपाठी (हिंदी) |
| अविमारक | आचार्य रामचंद्र मिश्र (हिंदी) |
| प्रतिज्ञा-यौगंधरायण | डॉ. सुषमा पांडेय (हिंदी) |
| प्रतिमा | प्रो. एम्. आर. काळे (इंग्रजी) |
| प्रतिमा | तारिणीश झा (हिंदी) |
| स्वप्नवासवदत्त | डॉ. गो. के. भट |
| स्वप्नवासवदत्त | डॉ. रा. शं. वाळिंबे |
| चारुदत्त | श्री. रामायण द्विवेदी (हिंदी) |
| यज्ञफल | डॉ. सुधाकर मालवीय (हिंदी) |


### कालिदास-


| | |
|---|---|
| मालविकाग्निमित्र | प्रो. एम्. आर. काळे (इंग्रजी) |
| मालविकाग्निमित्र | प्रो. सी. आर्. देवधर (इंग्रजी) |
| मालविकाग्निमित्र | प्रा. अरविंद मंगरूळकर, हातवळणे, केळकर व कोपरकर |
| मालविकाग्निमित्र | प्रा. गो. श्री. बनहट्टी |
| विक्रमोर्वशीय | प्रो. एम्. आर. काळे (इंग्रजी) |
| अभिज्ञान शाकुंतल | प्रो. एम्. आर. काळे (इंग्रजी) |
| अभिज्ञान शाकुंतलं | प्रो. सी. आर्. देवधर (इंग्रजी) |

**विशाखदत्त -**

| | |
|---|---|
| मुद्राराक्षस | प्रो. एम्. आर. काळे (इंग्रजी) |
| मुद्राराक्षस | डॉ. रा. शं. वाळिंबे |
| मुद्राराक्षस | डॉ. गो. के. भट |

**श्रीहर्ष -**

| | |
|---|---|
| प्रियदर्शिका | पं. रामनाथ त्रिपाठीशास्त्री (हिंदी) |
| रत्नावली | संपा. डॉ. के. ना. वाटवे - गायधनी |
| रत्नावली | प्रा. दि. मो. हातवळणे, केळकर |
| नागानन्द | संपा. प्रो. आशा व्ही. तोरस्कर - देशपांडे (इंग्रजी) |
| नागानन्द | संपा. श्री. संसारचंद्र (हिंदी) |

**शूद्रक**

| | |
|---|---|
| मृच्छकटिक | प्रो. एम्. आर्. काळे (इंग्रजी) |
| मृच्छकटिक | वासुदेवशर्मा पणशीकर (संस्कृत) |

**भवभूति**

| | |
|---|---|
| महावीरचरित | आचार्य श्री. रामचंद्र मिश्र (हिंदी) |
| मालती-माधव | प्रो. एम्. आर. काळे (इंग्रजी) |
| मालती-माधव | श्री. शेषराज शर्मा शास्त्री (हिंदी) |
| उत्तर रामचरित | प्रो. एम्. आर्. काळे (इंग्रजी) |
| उत्तर रामचरित | म.म. डॉ. पां. वा. काणे (इंग्रजी) |
| उत्तर रामचरित | श्री. जनार्दनशास्त्री पांडेय (हिंदी) |

**भट्टनारायण**

| | |
|---|---|
| वेणीसंहार | प्रो. एम्. आर्. काळे (इंग्रजी) |
| वेणीसंहार | प्रो. ए. बी. गजेंद्रगडकर (इंग्रजी) |
| वेणीसंहार | डॉ. गो. के. भट - गायधनी |
| वेणीसंहार | प्रा. रा. ना. गद्रे - हातवळणे. |

**मुरारि**

| | |
|---|---|
| अनर्घराघव | आचार्य श्री. रामचंद्र मिश्र (हिंदी) |

**राजशेखर**

| | |
|---|---|
| बालरामायण | डॉ. गंगासागर राय (हिंदी) |
| कर्पूरमंजरी | प्रा. दि. मो. हातवळणे |
| विद्धशालभंजिका | प्रा. बाबुलाल शुक्ल (हिंदी) |

**कृष्णमिश्र**

प्रबोधचन्द्रोदय — डॉ. सीता के. नम्बियार (इंग्रजी)

**जयदेव**

प्रसन्नराघव — डॉ. रमाशंकर त्रिपाठी (हिंदी)

**शंकरमिश्र**

शारदातिलक भाण — फाब्रिझा बलदिसेरा (इंग्रजी

**वामन भट्टबाण**

पार्वतीपरिणय — डॉ. रमापति मिश्र (हिंदी)

## २) संस्कृत नाट्यशास्त्रावरील ग्रंथ

**भरतमुनी**

नाट्यशास्त्र (अध्याय १ ते ७) — श्री. बाबुलाल शुक्ल (हिंदी)

**धनंजय**

दशरूपक — डॉ. वैजनाथ पांडेय (हिंदी)

**रामचंद्र-गुणचंद्र**

नाट्यदर्पण — पं. धानेशचंद्र उप्रेती (हिंदी)

**विश्वनाथ**

साहित्यदर्पण — पं. शाळिग्राम शास्त्री (हिंदी)

## ३) समीक्षा

डॉ. ए. बी. कीथ — संस्कृत ड्रामा (इंग्रजी)

कु. गोदावरी केतकर — भरतमुनींचे नाट्यशास्त्र

डॉ. गो. के. भट — संस्कृत ड्रामा (इंग्रजी)

डॉ. गो. के. भट — भरतनाट्यमंजिरी (इंग्रजी)

डॉ. गो. के. भट — ट्रॅजेडी अँड संस्कृत ड्रामा (इंग्रजी)

डॉ. गो. के. भट — संस्कृत नाट्यसृष्टी

डॉ. गो. के. भट — संस्कृत नाटके व नाटककार

डॉ. जयकिशन खंडेलवाल — संस्कृत नाट्यसाहित्य (हिंदी)

| | |
|---|---|
| डॉ. टी. जी. माईणकर | स्टडीज इन ड्रॅमॅटिक क्रिटीसिझम् (इंग्रजी) |
| डॉ. गो. के. भट | भास स्टडीज (इंग्रजी) |
| डॉ. चिं. त्र्यं. केघे | भास समस्या |
| डॉ. बलदेवसिंह उपाध्याय | महाकवि भास (हिंदी) |
| डॉ. र. पं. कंगले | कालिदासाची नाटके |
| प्रि. आर. डी. करमरकर | कालिदास (इंग्रजी) |
| म.म.डॉ. वा. वि. मिराशी | कालिदास |
| श्री. चंद्रबली पांडेय | कालिदास (हिंदी) |
| डॉ. टी. जी. माईणकर | कालिदास : हिज आर्ट अँड थॉट (इंग्रजी) |
| श्री. विद्यालंकार वागीश्वर | कालिदास और उनकी काव्यकला (हिंदी) |
| प्रा. मा. दा. आळतेकर | कालिदासाची सृष्टी |
| डॉ. गो. के. भट | कालिदास दर्शन |
| म.म.डॉ. वा. वि. मिराशी | भवभूति |
| डॉ. गो. के. भट | भवभूति |
| डॉ. गो. के. भट | विदूषक (प्रबंध) |
| डॉ. गो. के. भट | वागीश्वरी (लेखसंग्रह) |
| म.म.डॉ. वा. वि. मिराशी | संशोधन मुक्तावली (लेखसंग्रह) |

### ४) संस्कृत नाटकांचे मराठी अनुवाद

| | |
|---|---|
| श्री. ब. पां. किर्लोस्कर | अभिज्ञान शाकुंतल |
| श्री. के. वि. गोडबोले | अभिज्ञान शाकुंतल |
| श्री. गो. ब. देवल | मृच्छकटिक |
| श्री. गो. ब. देवल | विक्रमोर्वशीय |
| डॉ. श्री. कृ. बेलवलकर | उत्तमरामचरित |
| डॉ. गो. के. भट | मालविकाग्निमित्र |
| ब. रा. हिवरगावकर | भासकवीची नाटके |



**श्री. सुरेश वि. महाजन,** सांगली

जन्म तारीख : २८ जुलै १९४३
जन्म स्थळ : बार्शी, जि. सोलापूर
शिक्षण : बी. ए. संस्कृत - १९६४
एम्. ए. मराठी - १९७६
व्यवसाय : दि. सांगली बँक लि. मध्ये नोकरी
एप्रिल २००२ मध्ये सेवेतून निवृत्त
प्रकाशित
साहित्य : १. श्री मम्मटाचार्य प्रणीत
'काव्य प्रकाश' या संस्कृत ग्रंथाचे
प्रस्तावना व परिशिष्टे यासह संपूर्ण
मराठी भाषांतर - एप्रिल २००२

२. महाकवी भारवीच्या
'किरातार्जुनीय' या संस्कृत
महाकाव्याचा चिकित्सक
अभ्यास - मार्च २००४

सावली प्रकाशन
पुणे